उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२७ ऑगस्ट , २००४

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२७/८/२००४ रोजीच्या
विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शुक्रवार दि. २७.८.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती.मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा.महापौर :— श्रीमती. मालती करोतिया.

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ११. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल |
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | १२. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ४. | श्री. दिलीप गायकवाड | १३. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| ५. | श्री. ऐडके गणपत गोविंद | १४. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| ६. | श्री. उमाप रामदास राघोजी | १५. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| ७. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | १६. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| ८. | श्री. नाना आनंदा पवार | १७. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ९. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | १८. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| १०. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | १९. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर

**मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी** हया सभेस अनुपस्थित होत्या. तसेच मा. सदस्य / सदस्या १. श्री. सोनवणे नथु काशीराम,२.श्री. टेकचंदानी राजु मथुरादास, ३.श्रीमती रामचंदानी भावना मनोहर,४.श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे, ५.श्रीमती सीमा चंदाराम मोकल,६.श्रीमती कालानी ज्योती सुरेश,७.श्री. वाघे शामु बाबु, ८. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, ९.श्रीमती शर्मा कमला गंगाधर, १०.श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल, ११. श्री. यादव लालबिहारी बुझारत ,१२.श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन,१३. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती,१४.श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र,१५.श्री. शांताराम निकम, १६.श्रीमती आहुजा निता प्रकाश,१७.श्री. रूपानी चिमन अमरूमल,१८.श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा, १९.श्री. ठाकुर विनोद लालसिंग,२०.श्रीमती सोनेजी मीना (सोंडे),२१.श्रीमती मसंद माया घनश्यामदास, २२.श्री. सुरेश नामदेव गायकवाड,२३.श्रीमती वनवारी मोना अशोक, २४.श्री. मोहन साधवानी,२५.श्री. जेसवानी सतराम पुनमदास,२६.श्री. रमेश महादेव चव्हाण, २७.श्रीमती खिलनानी भावना,२८.श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी, २९.श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर,३०. श्रीमती माने किरण बाळकृष्ण,३१.श्री. जाधव सुरेश मधुकर,३२.श्री. दर्शनसिंह खेमाणी,३३.श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल,३४.श्री. पमनानी ईश्वर सतरामदास,३५.श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ, ३६. श्रीमती जयश्री सुर्वे, ३७. श्री. पाटील विश्वनाथ गौतम,३८. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, ३९.श्रीमती कृष्णानी रेखा हरेश,४०. श्री.भालेराव गौतम यशवंत,४१.श्री. ठाकुर अशोक भगवानदास,४२.श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे,४३.श्री. अंकुश म्हस्के, ४४.श्रीमती पंजाबी दिपा नारायण,४५.श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद, ४६.श्री.साधवानी मनोज लालचंद, ४७.श्री. रामरख्यानी मोहनदास,४८.श्री. जयसिंघानी अनिल,४९. श्री. संजय रामचंद्र बठीजा,५०. श्रीमती. किरण माखिजा, ५१.श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर,५२.श्री. विनोद चंदीराम तलरेजा,५३.डॉ. निना प्रकाश नाथानी, ५४.श्रीमती छाबरीया भारती पहलाज, ५५.श्रीमती रिझवाणी सुजाता रमेश,५६.श्री. बहरानी मोहन, ५७.श्रीमती मिनु राजकुमार दासानी,५८.श्री. हरदास माखिजा,५९.श्री. बेहरानी ठाकुरदास, ६०.श्री. वदरीया राजेश हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—आजची सभा गणपुर्ती अभावी स्थगित करावी लागणार आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—कधी पर्यंत स्थगित करणार?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—मा. महापौर महोदया, रिक्षा युनियनचे अध्यक्ष श्री. बबन काळप यांच्या मातोश्रींचे निधन झाले आहे. जर सभा स्थगित करायची असेल तर त्याआधी त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—कृपया सर्वांनी दोन मिनिटे उभे राहुन मौन पाळावे.

सुचकाचे नाव :— श्री. दिलीप लालवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

शोक प्रस्ताव :—

रिक्षा युनियनचे अध्यक्ष श्री. बबन काळप यांच्या मातोश्री यांचे दु:खद निधन झाले आहे.
त्यांचे कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ४७ अ दिनांक:—२७.८.२००४.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री बबन काळप यांच्या मातोश्रींच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. महापौर : ही सभा पुढील सूचना मिळेपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.
मा. सचिव : कृपया राष्ट्रगीतासाठी उभे रहावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ४. ४० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः–२० जानेवारी , २००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/१/२००५ रोजीच्या

विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शुक्रवार दि. २७.८.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली होती. सदरची सभा गणपुर्ती अभावी स्थगित करण्यांत आली होती. त्यानंतर सदरची सभा पुनश्च गुरूवार दि. २०.१.२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजीत करण्यांत आली होती. सदर सभेत खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा.महापौर :– श्रीमती. मालती करोतिया

२) मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३६. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर, | ३७. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम, | ३८ | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ३९ | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४० | श्री. सुरेश जाधव |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ४१ | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ४२. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४३. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४४. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४५. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १३ | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४६. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४७ | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४८. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १६. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४९. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १७. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५०. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५१. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५२. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २०. | श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र | ५३. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २१. | श्री. नाना आनंदा पवार, | ५४. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २२. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५५. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २३. | श्री. जग्यासी राजु | ५६. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २४. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५७. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २५. | श्री. शांताराम निकम, | ५८. | श्रीमती किरण लखी माखिजा, |
| २६. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५९. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २७. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६०. | श्री. विनोद तलरेजा |
| २८. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६१. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २९. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६२. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ३०. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, | ६३. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३१. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६४. | श्री. बेहरानी मोहन, |
| ३२. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६५. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३३. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास, | ६६. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३४. | श्री. लुंड गोविंदराम | ६७. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३५. | श्रीमती भावना रवी खिलनानी | ६८. | श्री. हरदास माखिजा |
| | | ६९. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर,

मा. सदस्य / सदस्या १. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर,२. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, ३.श्री. यादव लालबिहारी बुझारत,४. श्री. मोहन साधवानी, ५.श्री. रमेश चव्हाण, ६.श्रीमती. जयश्री सुर्वे ७. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, ८. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास,९.श्रीमती. पंजाबी दिपा नारायण, १०.श्री. संजय रामचंद्र बठीजा, ११.श्री. बेहरानी ठाकुरदास ,१२. श्री. वदरीया राजेश नानिकराम हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४ .३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

प्रभारी आयुक्त श्री. आर. के. सोनवणे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री. संजय दुसाने (उपायुक्त) हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

**मा. महापौर या अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी या पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ होत्या.**

मा. सचिव:—विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय :— उल्हासनगर—१ शहाड स्टेशन जवळील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १४२ व १८९ हे महानगरपालिकेचे भुखंड विकसित करण्याचा प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करणे.

मा. सदस्य श्री राजेंद्रसिंह भुल्लर:—जोपर्यंत करवाढ रद्द होत नाही तोपर्यंत कोणतीही बैठक घेण्यांत येवु नये. आयुक्तांनी जी करवाढ केली आहे, मागील वेळी सत्तापक्षातील सदस्य त्यासाठी सभागृहात जमिनीवर बसले होते.

पीठासीन अधिकारी:—ते फक्त एकाच बैठकीसाठी बोलले होते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—एका बैठकीसाठी कुठे बोलले होते? यामध्ये काहीतरी काळेबेरे आहे असे वाटते.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—मा. महापौर महोदया, तो आमचा सांकेतिक विरोध होता. यासाठीच ती बैठक आम्ही अदयाप स्थगित ठेवली आहे. तो आमचा सांकेतिक विरोध आताही आम्ही प्रदर्शित करीत आहोत. परंतु यासाठी महापालिकेचे कामकाज ठप्प करणे योग्य होणार नाही. आमचा विरोध कायम आहे. या बैठकीचे कामकाज पुढे सुरू ठेवावे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—आपण सांगितले की सचिवांना वेळ मिळत नाही, परंतु आपले उल्हासनगरचे आमदार आहेत त्यांची एवढी चालते, आता तर उल्हासनगरमध्ये दोन—दोन आमदार झाले आहेत. एवढे झाल्यानंतरही जर सचिवांना उल्हासनगरसाठी वेळ मिळत नसेल तर ही ओंजळभर पाण्यात बुडुन मरण्यासारखी गोष्ट झाली. आमदारांची एवढी चालते व त्यांनतरही वेळ मिळत नाही ही लाजीरवाणी गोष्ट आहे. या करवाढीच्या मुद्दयासाठी वेळ मिळत नाही.

यावेळी मा. प्रभारी आयुक्त श्री. आर. के. सोनवणे यांनी सभागृहात प्रवेश केला व ते त्यांच्या जागेवर आसनस्थ झाले.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—आमदारांना वेळ घेण्यासाठी सांगण्यांत आलेले नाही. महासभेत असे ठरले होते की, महापौर महोदया, संबंधित विभाग व मुख्यमंत्री महोदयांकडुन वेळ घेणार होते. आमदारांबद्दल येथे वाच्यता झालीच नव्हती. जर आमदारांचे बोलत असाल तर आम्ही आमदारांचाही सहयोग घेवु. आमचे आमदार कार्यक्षम नाही व त्यामुळे वेळ मिळत नाही असे नाही आहे. यासाठी आमदारांवर चिखलफेक करणे योग्य होणार नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—यामध्ये चिखलफेक करण्याचा प्रश्नच कुठे येतो.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—आमच्या आमदार साहेबांवर सभागृहाने ही जबाबदारी टाकली नव्हती त्यामुळे असे बोलणे योग्य होणार नाही. ही जबाबदारी मा. महापौर महोदयांवर टाकली होती.

मा. पीठासीन अधिकारी:—कृपया शांतता राखावी. व आजच्या विषयावर चर्चा करा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):— मा.महापौर महोदया, व सभागृहात उपस्थित असलेले सर्व सदस्य सभागृहासमोर हा जो विषय आहे आणि जो आरक्षित भुखंड आहे. त्याच्या विकासाबाबत सांगु इच्छितो की तेथे आय.टी. पार्क, मल्टीप्लेक्स, वाणिज्य संकुल, पार्कींग सुविधा आणि तेथील झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन व तेथील जे दुकानदार आहेत त्यांचे पुनर्वसन याबाबतचा एक सविस्तर प्रस्ताव आपल्या समोर ठेवला आहे. त्याची जी खास वैशिष्टये आहेत त्याबाबत एक पॉवरपॉइंट सादरीकरण मी येथे देवू इच्छितो. जेणेकरून आपणांस त्याबाबत सविस्तर माहिती मिळेल. सादरीकरणापुर्वी मी आपणांस विनंती करेन की, आपण जर तो प्रस्ताव वाचला असेल व त्याबाबत आपणांस काही शंका असेल, काही माहिती हवी असेल तर ती माहिती मला देण्यास आवडेल. आपणांस जे एक पुस्तक देण्यात आले होते त्यामध्ये सविस्तर माहिती होती. जर त्याबाबत काही शंका आहे, माहिती हवी असेल तर ती आधी विचारावी त्यांनतर मी सादरीकरण करेन.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—या प्रकल्पात किती घरे, दुकाने, झोपडया बाधीत होणार आहेत त्याची यादी जसे २५० घरे आहेत किंवा ५० दुकाने आहेत अशी माहिती कृपया दयावी.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):— मा.महापौर महोदया, तो जो प्रस्ताव आहे त्यामध्ये आकडेवारी दिलेली आहे. जवळपास १११ निवासी व ७७ वाणिज्य कुटूंबाचे किंवा दुकानांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. संपुर्ण क्षेत्रफळ हे १७,००० चौ.मी. पेक्षा जास्त आहे. या पॉवर पॉइंट सादरीकरणामध्ये जी कुटूंबे आहेत त्यांची यादी आहे. मी जे सादरीकरण करणार आहे त्यामध्ये त्याची विस्तृत माहिती येईल. १११ कुटूंबे बाधित होणार आहेत. जवळ जवळ ७७ वाणिज्य बांधकामे आहेत.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—त्यांना वाचवणार कसे? आधी तोडणार आणि मग नंतर रस्त्यावर टाकणार व नंतर सांगणार की दहा—वीस वर्षांनी बनवुन देतो असे होणार का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):— मा.महापौर महोदया आपण हा पुर्ण प्रस्ताव जर वाचला तर त्यामध्ये आधी पुनर्वसन आणि नंतर विकास करण्यांत येणार आहे. हेच धोरण अवलंबिले आहे. पुनर्वसनासाठी काय करायचे आहे याची माहिती प्रस्तावामध्ये दिली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—साहेब तुम्ही सांगा, आम्ही तर प्रस्ताव वाचला नाही कारण आम्हाला पासच करायचा नाही. तुम्ही आम्हाला सांगा जर आम्हाला पटले तर आम्ही तुम्हाला सहयोग देवू. समजले नाही तर मंजुर नाही असे सांगु. तुम्ही आम्हाला सांगा की त्यांचे पुनर्वसन कसे करणार?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):— मी आधी सादरीकरण करतो नंतर सांगतो. मला असे वाटले होते की, मी जो प्रस्ताव दिला आहे त्याबद्दल आपण विचाराल.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—आम्हाला हा प्रस्ताव मंजुर करायचाच नव्हता त्यामुळे आम्ही वाचलाच नव्हता. आता येथे सर्व लोक म्हणत आहेत की, आयुक्तांनी चांगला प्रस्ताव आणला आहे. तर तुम्ही आम्हाला सांगा की तो काय प्रस्ताव आहे. समजला तर सहयोग करू अन्यथा विरोध करू.

मा. पीठासीन अधिकारी:—मी आयुक्तांना आदेश देते की त्यांनी सर्वांना या प्रस्तावाची माहिती दयावी.

यावेळी मा. प्रभारी आयुक्तांनी पॉवर पॉइंट सादरीकरण प्रोजेक्टरच्या माध्यमातुन सुरु केले व सर्वांना माहिती देण्यास प्रारंभ केला.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):— उल्हासनगर शहराचा विकास आराखडा, १९७४ चा मंजुर विकास आराखडा व त्याचा हा नकाशा आहे. आपणां सर्वांना हे माहितीच आहे. त्यामध्ये या साईटचे लोकेशन शहाड स्टेशनच्या बाहेर जो एक आरक्षित भुखंड आहे. तेथे दाखवले आहे. त्याचा आकार त्रिकोणी आहे. आपण सर्वांनी ती जागा बघितली असल्याने सांगण्याचा प्रश्न नाही. यामध्ये जागेचा नकाशा व त्याची विस्तृत माहिती दिलेली आहे. शहाड पुल, कल्याण —मुरबाड रोड व शहाड स्टेशन व आय.डी.आय. कंपनीकडे जाणारा रस्ता याच्या मधील जी जागा आहे ती जवळ जवळ १७,००० चौ. मी. एवढी आरक्षित आहे. तेथील सध्याच्या परिस्थितीची काही छायाचित्र मी आपणांसमोर सादर करतो. या छायाचित्रांमध्ये तेथे कशाप्रकारे अतिक्रमण झाले आहे, कुठे कुठे

झोपडया आहेत याची माहीती दिलेली आहे. एकुण किती भागावर अतिक्रमण झाले आहे याची माहिती या नकाशामध्ये दिसुन येत आहे.या प्रकल्पात बाधित होणा–या सर्व व्यक्तींची ही यादी आहे. त्यांचे घर, झोपडी याचे क्षेत्रफळ किती आहे, त्याचा वापर ते कसा करतात, निवासी आहेत की व्यापारी आहेत. याबद्दल माहिती दिलेली आहे. अतिक्रमीत झालेला भाग जवळ पास १२,८८१ चौ.मी. एवढा आहे. त्याठिकाणी दोन आरक्षणे आहेत व दोन्ही आरक्षणे मिळुन २३, १८७ चौ.मी. एवढे आहे. एकुण क्षेत्रफळ १९,००० चौ.मी. एवढे आहे. रेल्वे स्टेशन जवळ आहे यामुळे व हा भुखंड पार्कींगसाठी त्याठिकाणी वाहतुकीची पाहणीही करण्यांत आली. किती लोक रेल्वेने जातात, कशाप्रकारे जातात, रेल्व आल्यानंतर तेथे किती लोक येतात. रिक्षाने किती लोक जातात याची सर्व पाहणी केली गेली आहे. यामध्ये वाहतुकीची दिशा व कोणत्या वेळेला किती वर्दळ असते याची माहिती यामध्ये दिलेली आहे. सरासरी उतारूंची संख्या ४८७. ५ आहेत. सकाळच्या वेळी किती लोक येतात याची माहिती यामध्ये दिली आहे. यामध्ये रिक्षा, दुचाकी वाहनांची व चारचाकी वाहनांची पार्किंग कशी होते याची माहिती दिलेली आहे. हा जो प्लॉट क्र. १४२ आहे व १८९ आहे. त्याची माहिती दिली आहे. पुनर्वसनाची इमारत , शॉपिंग सेंटर, आय.टी. सुविधा, शॉपिंग मल्टीप्लेक्स व पार्कींग यामध्ये आहे. व आपल्याकडे जे पुस्तक आहे त्यामध्ये याची विस्तृत माहिती दिलेली आहे. या प्रकल्पाची जी वैशिष्टये आहेत त्याचे घटक मी तुम्हाला सांगितले. जे लोक बेघर होणार आहेत त्यांचे पुनर्वसन, या शहरामध्ये सध्या ९००० एवढया क्षमतेचे मनोरंजन केंद्र आहे, जे चित्रपटगृह आहेत. या शहराची लोकसंख्या लक्षात घेवुन अजुन चित्रपटगृहांची आवश्यकता आहे. येथे एक मल्टीप्लेक्स प्रस्तावित करण्यांत आलेला आहे १,४०० क्षमतेचा. येथे जो आयटी पार्क विकसित करण्यांत येईल त्यामध्ये ३००० प्रत्यक्ष नोक–या व १५००० अप्रत्यक्ष नोक–या प्राप्त होणार आहेत. आयटीचे जे प्रमाण आहे ते एक प्रत्यक्ष नोकरी व ५ अप्रत्यक्ष नोक–या असे आहे. येथे बिझनेस प्रोसेस आऊट सोर्सिंग मुळे १५००० अप्रत्यक्ष नोक–या प्राप्त होणार आहेत. या प्रकल्पाचे जे नियोजन करण्यांत आले तर यासाठी आपणच आम्हाला अनुमती दिली होती. यासाठी मास्टर ॲंड मास्टरस् यांची नियुक्ती करण्यांत आली होती. हे सर्व नियोजन आहे ते त्यांनी केले आहे. येथे एक पेट्रॉल पंप आहे तो खाजगी मालकाचा आहे. यामध्ये जी निळी जागा दाखवली आहे तेथे व्यापारी वापरासाठी नियोजन करण्यांत आले आहे. पुनर्वसनासाठी येथे जागा दर्शविण्यांत आलेली आहे. यातुन जी जागा उरेल तेथे ही सौदर्यीकरण करण्यांत येईल. तेथे रेल्वेस्टेशन असल्याने राज्य वाहतुक महामंडळासाठी एक बस टर्मिनल असेल, रिक्षास्टॅण्ड असेल व हा प्रकल्प पुर्ण झाल्यावर कल्याण मुरबाड रस्त्यावरून तो असा दिसेल व शहाड स्टेशन येथुन असा दिसेल. पुनर्वसनाची जी इमारत असेल ती आधी या ठिकाणी बांधण्यांत येईल व त्यानंतर उर्वरित भागामध्ये प्रस्तावित आयटी पार्क बनविण्यांत येईल. पुनर्वसनाची इमारत तळमजला अधिक चार मजले अशी असेल.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>परंतु यामध्ये तीनच मजले दिसत आहेत.

**मा. महापौर श्रीमती मालती करोतिया यांनी सभागृहात प्रवेश केला व त्यांच्या जागेवर आसनस्थ झाल्या.**

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u> यासाठीच मी प्रस्तावात सविस्तर माहिती दिली होती. तळमजला अधिक तीन मजले अशी ती इमारत आहे. दुसरी जी इमारत आहे ती तळमजला अधिक सहा मजले अशा स्वरूपाची आहे. पुनर्वसनाची नाही तर उर्वरित वाणिज्य संकुलाची इमारत, पुनर्वसनाची चार मजल्याची इमारत व उर्वरित सहा मजल्यांची इमारत असेल. येथे प्रत्येक मजल्याचा नकाशा दर्शविला आहे. प्रत्येक मजल्याचे एकुण क्षेत्रफळ येथे दर्शविले आहे. आपण या भुखंडावर पुनर्वसन व नविन नियोजन एकत्र करीत असल्याने आयटी पार्क साठी आपणांस जास्तीचा एफ.एस. आय मिळणार आहे. आयटी पार्क जेथे विकसित केला जातो त्याठिकाणी १०० टक्के जादाचा एफ.एस. आय मिळतो. राज्य शासनाचे आयटीशी संबंधित जे धोरण आहे त्याची माहिती देखिल प्रस्तावात दिलेली आहे. हा शॉपिंग मॉलचा नकाशा आहे. कार पार्कींगचा हा ले आऊट आहे. हा मल्टीप्लेक्स चा नकाशा आहे. हा वाणिज्य संकुलाचा नकाशा आहे. त्या ठिकाणी ६० दुकाने प्रस्तावित करण्यांत आली आहेत. एकुण दुकाने २०४ आहेत. कारपेट ऐरीया ५१. ४३ ते ९५. २८ चौ.मी. पर्यंत आहे. दुकानांसाठी एकुण कारपेट ऐरिया ८९७. ५६ चौ.मी. एवढा आहे. आता ही पुनर्वसनाची इमारत आहे. पुनर्वसनाची प्रत्येक सदनिका, तीचा वापर याठिकाणी दाखवला आहे. पुनर्वसनाच्या इमारतीची पुढील बाजु अशी असेल. एकुण क्षेत्राचे क्षेत्रफळ मी आपणांस आधी सांगितले आहे. त्याची माहिती याठिकाणी दाखविली आहे. आतुन ही इमारत कशी दिसेल ते दर्शविले आहे. आपणांस यामध्ये आता काही नाविन्य वाटणार नाही कारण आपण ब–याच ठिकाणी अशा इमारती बघितल्या आहेत. परंतु उल्हासनगरमध्ये हे प्रथमच होणार आहे. हे व्हायला हवे यासाठी येथिल प्रशासनाने हे स्वप्न आपल्या मार्फत बघितले आहे. येथे प्रकल्पाचे विशेष वैशिष्टये दर्शविण्यात आलेली आहेत. जी इमारत बनविण्यात येईल ती भुकंप रोधक बनविण्यांत येईल त्यामध्ये पाणीपुरवठा पुर्नवापराचे प्रयोजन देखिल ठेवले आहे. उर्जा बचतीचा पर्यायही ठेवण्यांत आला आहे. अद्यावत तंत्रज्ञानाचा उपयोग करून या इमारतीचा नकाशा तयार करण्यांत आलेला आहे. या उपरही आपले काही प्रश्न असतील तर त्यावर खुलासा करण्यास मला आवडेल.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—आयुक्त साहेब, आपण एक फार चांगला प्रस्ताव सादर केला. चांगले आहे. मी आधी विचारू इच्छितो की, आपल्या महापालिकेवर कर्ज किती आहे? दुसरे असे की, या प्रकल्पावर खर्च किती आहे? तिसरे म्हणजे तुम्ही ज्या कोप—यात पुनर्वसन करणार आहात तो कोपरा खाली आहे का? आपण आधी सांगितले की, पुनर्वसन करण्यासाठी आपण त्यांना हटविणार नाही. तर त्यासाठी जागा शिल्लक आहे का? त्या ठिकाणी ज्यांच्याकडे सनद आहे, जे खाजगी जमिनीचे मालक आहेत त्यासाठी आपण काय विचार केला आहे? जसे आपण पेट्रोल पंपचे सांगितले त्याचप्रमाणे तेथे शासकीय दुकाने आहेत. तसेच शहाड स्टेशन समोर काही सनद धारक आहेत. सनद धारकांकडुन त्यांच्या जागेचे संपादन करावे लागते. जागा संपादन करण्याचे काम म्हणजे काही लहान मुलांचा खेळ नाही. यासाठी बरीच वर्ष लागु शकतात. याबद्दल आपण काय नियोजन केले आहे? असे चार प्रश्न मी आपणांस विचारत आहे. याचे उत्तर मिळाल्यानंतर मी अजुन चार प्रश्न विचारेन.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—आठही प्रश्न एकाच वेळी विचारा.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—नाही. नाही. एकाच वेळी नाही. आपण उत्तर दिल्यानंतर मी उर्वरित प्रश्न विचारेन.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, आपल्या महापालिकेवर किती कर्ज आहे. हे आजमितीस बघितल्यास ते रू. ४०—५० कोटी एवढे आहे. परंतु यामध्ये थकबाकी रू. २० कोटी एवढी आहे. जी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अदा करायची आहे. उर्वरित कर्ज जसे आय.आर.डी. पी. साठी रू. १८ कोटी, पाणी पुरवठा योजनेसाठी रू. २५ कोटी ही जी काही कर्ज घेतली आहे त्यांचा हप्ता जो प्रत्येक महिन्याला, तिमाहीला किंवा वर्षाला जो येतो तो आम्ही भरत आहोत. आजमितीस फक्त रू. २० कोटी एवढी थकबाकी आमच्यावर आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडुन भुयारी गटार योजनेसाठी आम्ही जे कर्ज घेतले होते. ते मागील कित्येक वर्षात भरण्यांत आलेले नाही त्यामुळे रू. २० कोटीची थकबाकी आहे. एम.आय.डी.सी. ची जी रू. ३४ कोटीची थकबाकी होती. ती येत्या दहा वर्षात भरायची आहे. प्रत्येक वर्षी रू. ३. ४० कोटी भरायचे आहेत यासाठी मागील वर्षी आम्ही हप्ता देणे सुरू केले आहे. मागील वर्षीचा रू. ३. ४० कोटीचा हप्ता आम्ही ३१ मार्च पुर्वी भरलेला आहे.  या वर्षी जे रू. ३. ४० कोटी भरायचे होते त्याचा देखिल आम्ही भरणा केला आहे. यावरून आजमितीस महापालिकेवर फक्त रू. २० कोटीचे दायित्व आहे जे अदयाप आम्ही अदा करू शकलेलो नाही. या प्रकल्पासाठी एकुण खर्च जवळपास रू. ४८ कोटी एवढा येणार आहे. या प्रकल्पातुन रू. ५५ कोटींचे उत्पन्न अपेक्षित आहे. यापेक्षा जास्तही मिळु शकते. परंतु ५५ कोटींचे उत्पन्न या प्रकल्पापासुन मिळणार असल्याने रू. ७ ते ८ कोटींपेक्षा जास्त, याची आकडेवारी पुस्तकात दिलेली आहे. मी आकडे पुर्णांकात सांगत आहे. आपण पुस्तक पाहिल्यास आपल्या निर्दशनास येईल की, या प्रकल्पापासुन महापालिकेस जवळ पास रूपये ८ कोटींचा महसुल प्राप्त होणार आहे. पुनर्वसनाचे आपण विचारले त्याबाबत सांगु इच्छितो की, आपण हा पुर्ण भुखंड पाहिला आहे. त्यामध्ये ब—याच ठिकाणी रिकाम्या जागा उपलब्ध आहेत. पुनर्वसनासाठी तेथील बाधित व्यक्तींना रिकाम्या जागी हलविले जाईल व त्यानंतर जेवढी जागा लागेल तेवढी जागा रिकामी करून तेथे पुनर्वसन करण्यासाठी इमारती बनविण्यात येतील. त्यांचे तात्पुरते स्थलांतर त्याच भुखंडावर करण्यात येईल. तात्पुरते स्थलांतर संक्रमण शिबिरांमध्ये करण्यांत येते. आम्ही तर त्यांना संक्रमण शिबिरात स्थलांतर न करता त्याच भुखंडावर त्यांचे तात्पुरते पुनर्वसन करणार आहोत. आपला अजुन एक प्रश्न होता त्याबद्दल मी सांगु इच्छितो की, सनद धारकांकडुन जागा संपादन करताना दोन प्रकारे जागा संपादीत केली जाते. या भुखंडावरील बहुतेक जमिन शासनाची आहे. खाजगी जागा असल्यास दोन प्रकारे जागा संपादीत करता येते. पहिले म्हणजे सनद धारकांशी चर्चा करून त्यांचे पुनर्वसन व त्यांच्या जागेची किंमत देवुन, यापैकी जो पर्याय ते स्विकारतील त्याप्रकारे त्यांची जमिन संपादित करता येवू शकेल. शासकीय जमिन आजही आमच्या ताब्यात आहे. त्यावर अतिक्रमण झाले आहे कारण आम्ही त्या भुखंडाचे संरक्षण करू शकलो नाही. जर वाटाघाटी करूनही भुसंपादन झाले नाही तर मा. जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातुन आपण भुसंपादन करू शकतो व त्यामध्ये कित्येक वर्ष जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. हे आरक्षण आहे, ही सर्व जमिन शासनाची होती. जेव्हा त्या लोकांना सनद देण्यात आली तेव्हा त्यामध्ये एक अट होती की जेव्हा केव्हा सार्वजनिक उपयोगासाठी जागेची आवश्यकता भासेल त्यावेळी त्यांना त्यासाठी जागा हस्तांतर करावीच लागेल. तर यामध्ये काही अडचण येईल असे मला वाटत नाही. कठीण जरूर आहे परंतु जेव्हा तुमचे व आमचे ध्येय एकच असेल तेव्हा मला वाटते की या सर्व अडचणी किरकोळ अडचणी म्हणुन आपल्या समोर येतील.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—आयुक्त साहेब,आता आपण जी यादी दिली. तर ज्यावेळी तुम्ही सर्वेक्षण केले त्यावेळी तुम्हाला तेथे किती सनदधारक आढळुन आले? याची माहिती आपल्याकडे आहे का?

**मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):–**मी आधीच सांगितले की आमच्याकडे जी माहिती आहे त्याप्रमाणे फक्त जो एक पेट्रोल पंप आहे त्याच्याकडेच सनद आहे. उर्वरित जागेच्या सनदेबाबतची विस्तृत माहिती आजमितीस आमच्याकडे नाही. पेट्रोल पंपची जी जागा आहे ती खाजगी मालकीची आहे.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–**आयुक्त साहेब, आधी सर्वेक्षण पुर्ण करा. नाहीतर आपण इथे फक्त बोलत राहतो. आपण बघितले की डॉल्फीन क्लब येथे झोपडपट्टी रिकामी केली होती. आपले लोक सर्वेक्षण व्यवस्थित करीत नाहीत. आधी सर्वेक्षण करायला हवे की, कुणाकडे सनद आहे, कुणाकडे काय आहे याचा अभिलेख बघायला हवा. फक्त टेबलावर बसुन काम केले जाते. फक्त कुणाला तरी पाठवुन कुठे काय आहे, कुठे कोण राहातो याची जुजबी माहिती घेतली जाते. आता या भुखंडावर कुणाकडे सनद आहे याची माहितीच नाही तर आपण कसे काय पास करणार? कुणाची सनदची जागा घ्यायची हे आम्ही कसे सांगणार? कित्येक लोक तेथे १९६५ च्या पुर्वीपासुन रहात आहेत. त्यांना कसे हटविणार? त्यांच्याकडे डी.आय.एल.आरचा १९६५ पुर्वीचा रेकॉर्ड आहे. अशा लोकांना कसे हटविणार? कोण कधी पासुन रहात आहे याचे व्यवस्थित सर्वेक्षणच केलेले नाही. आम्ही पास कसे करणार? आम्ही देखिल यामध्ये फसुन जावु. तेथील लोक आम्हालाही न्यायालयात खेचतील.

**मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):–**मी आपल्या या मताशी बिलकुल सहमत नाही की, सर्वेक्षण व्यवस्थित केलेले नाही. आम्ही अगदी व्यवस्थित सर्वेक्षण केलेले आहे. मी आपणांस प्रश्न विचारायला नको परंतु मी विचारू इच्छितो यापुर्वी एक कोणत्या प्रकल्पाचा आपण एवढा सविस्तर अभ्यास केला होता का? माझ्याप्रमाणे तर यापुर्वी कधीही एवढा सविस्तर अहवाल बनविला नव्हता. पेट्रोल पंप शिवाय इतर एक दोन ठिकाणी सनद असु शकते. लोक स्वत:हुन सनद असल्याची माहिती देत नाहीत. तेथील जे बाधित लोक आहेत त्यांच्या समवेत दोन वेळा आम्ही बैठक घेतली आहे. प्रत्येका सोबत आम्ही बोललो आहोत. व तेथील जेवढी निवासी अतिक्रमणे आहेत. ते सर्व लोक स्वत: पुढे आले आहेत व त्यांनी सांगितले आहे की जर आमचे वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत पुनर्वसन करणार असाल तर आम्ही या प्रकल्पासाठी तयार आहोत. उर्वरित लोकां समवेत देखिल चर्चा झाली आहे. ते लोक देखिल विकासासाठी तयार आहेत. फक्त तेथे काही लोकांनी मोठया प्रमाणावर अतिक्रमणे केली आहेत. व त्यांची जास्त जागा जात आहे. त्यामुळे या प्रकल्पाला विरोध केला गेला होता. त्यावेळी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे देखिल लोकांनी जावुन स्थगिती आणली होती. आम्ही राज्य शासनाकडे देखिल एक अहवाल पाठवला व तो स्थगिती आदेश आता उठवला आहे. या भुखंडाच्या विकासासाठी आता फक्त महापालिकेच्या मंजुरीची आवश्यकता आहे. मला या भुखंडाच्या विकासासाठी इतर कोणतीही बाधा आढळुन येत नाही.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–**आयुक्त साहेब, तुम्ही आता जे सांगितले की, या प्रश्नावर मी सर्वांशी बोललो आहे, सर्व लोक मला येवुन भेटुन गेले आहेत तर तुमच्या या बोलण्याशी मी सहमत नाही. आपले हे विधान चुकीचे आहे. तेथील सर्व लोकांशी आपले बोलणे झालेले नाही. सर्व लोकांनी त्यांचे घर तोडायला परवानगी दिली याच्याशी मी सहमत नाही. तुम्ही सांगाल हा येवुन गेला तो येवुन गेला तर तुमच्या या बोलण्याशी मी सहमत नाही. तेथे बरेच लोक आहेत. ज्यांच्याशी आयुक्तांचे बोलणे झालेले नाही. परंतु आपण जे बोलता की सर्वांशी बोलणे झाले आहे व सर्व त्यांचे घरे तोडण्यास तयार आहेत तर हे चुकीचे आहे. मी याच्याशी सहमत नाही.

**मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):–**मा. महापौर महोदया, मी असे कधी बोललो नाही की मी प्रत्येकाशी बोललो आहे. तेथील लोकांसमवेत बैठक घेवुन मी चर्चा केली आहे. तेथे १११ लोक असतील तर त्यापैकी बहुतांश लोक त्या बैठकीत उपस्थित होते. त्यांचे म्हणणे हेच होते की जर पुनर्वसन होत असेल, आम्ही तसा करार करत असु तर ते लोक माझ्याशी एवढे पण बोलले की, हा पुर्ण विभाग आम्ही स्वत: रिकामा करून देवू. वर्षभर इतरत्र राहु. एवढे देखिल त्यांनी सांगितले आहे. मी त्याचे चित्रीकरण केलेले नाही. दोन वेळा बैठक झाली. त्या लोकांनी एवढे सांगितले की आम्ही एक वर्ष इतरत्र कुठे राहु, भाडयाच्या घरात राहु परंतु या शहरात असा विकास होत असेल तर आम्ही यासाठी तुमच्या सोबत आहोत असे त्या लोकांनी मला सांगितले, त्यावेळी माझे काही अधिकारी सोबत होते. आपल्यापैकी काही व्यक्ती पण होत्या. होवु शकते की प्रत्येक व्यक्ती सोबत बोलणे शक्य नाही आणि तसे आवश्यकही नाही.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–**ही जी यादी आहे ती आपण पुर्ण वाचली आहे का? ज्या लोंकांची घरे बाधित होत आहेत त्यांची यादी आपण व्यवस्थित वाचली आहे का? त्यामध्ये माझे देखिल नाव असु शकते.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—आपण स्वत: तेथे अनाधिकृत बांधकाम केले असेल तर पुढे काय बोलणार?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिह भुल्लर:—आयुक्त साहेब, आपल्या लोकांनी व्यवस्थित सर्वेक्षणच केले नाही. आपण जे बोलता की व्यवस्थित सर्वेक्षण केले आहे, सर्वांशी बोललो आहे यासाठी मी बोललो की आपण सर्वांशी बोललेच नाही. आपल्या लोकांनी तेथे व्यवस्थित सर्वेक्षणच केले नाही. माझे नाव देखिल यादीत नसेल. माझे तेथिल बांधकाम १९६५ पुर्वीचे आहे. घर बसल्या बसल्या सर्वेक्षण करतात.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—मा. महापौरजी, उपस्थित सर्व मित्रांनो आज महासभेत..........

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—यांचे नाव यादीत असताना देखिल आपण त्यांना विश्वासात घेतले नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मी स्वत: त्यांच्याशी याबद्दल बोललो आहे. त्यांचे देखिल अतिक्रमण तेथे आहे याची मला माहिती नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—त्यांचे अतिक्रमण नियमित आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—१९६५ पुर्वीचे आहे. याला आपण अतिक्रमण असे म्हणु शकत नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—आपल्याकडे त्या जागेचा यु नंबर, ई नंबर असु शकेल, जे काही असेल.

**मा. सदस्या श्रीमती ज्योती कलानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—त्या जागेचा यु नंबर व चालता नंबर दोन्ही आहे. जर सर्व्हेक्षण बरोबर झाले असते तर हे सर्व समोर आले असते. तुमच्या माणसांनी तुम्हांला सर्व्हेक्षण बरोबर करुन दिलेले नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—१०० टक्के योग्य सर्व्हेक्षण झालेले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— नाही झाले आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—नाही झाले तर तुम्ही तसे सिध्द करुन दाखवा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— सर्व्हेक्षण योग्य झाले असते तर त्यांनी यांना देखील संपर्क साधला असता.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— तुम्ही यादी बघा. त्यामध्ये माझे नाव आहे का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—कोणत्या नावाने आहे? तुमचे तेथे बांधकाम आहे की, काय आहे? कोणत्या नावाने आहे?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर या नावाने आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— श्री. भुल्लर महाराज यांच्या सारख्या नशिबवान नगरसेवकाच्या प्रभागात एवढा मोठा प्रकल्प येत आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— प्रकल्प येत आहे ते बरोबर आहे, परंतु आम्ही विरोध कश्यासाठी करीत आहोत? यांचे म्हणणे आहे की, सर्व्हेक्षण योग्य झाले आहे. यांच्याकडे आताही जी यादी आहे. त्यापेक्षा अधिक लोक तेथे आहेत. आमचे म्हणणे असे आहे की, सर्व्हेक्षण योग्य प्रकारे व्हायला हवे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— एवढा मोठा प्रकल्प तुमच्या प्रभागात येत आहे हे तरी तुम्ही मानताना?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— माल तर तिकडेच जाणार आहे ना?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):— नाव नाही आहे याचे कारण ज्यावेळी पहाणी झाली त्यावेळी सदर ठिकाणी कोणी योग्य माहिती दिली नसेल, परंतु मी सांगतो की, हे सर्व्हेक्षण आजही तुम्ही तेथे नकाशा घेवून जा, जसे आम्ही केले आहे तसेच तुम्हांला तेथे आढळून येईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— आयुक्त साहेब मला तेथे महापालिकेकडुन नोटिस देखील प्राप्त झाली आहे. जर मला नोटिस दिली आहे तर माझे नाव यादीत कसे काय नाही?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):— ज्यावेळी जागेवर बांधकाम कोणाचे आहे हे विचारले असता त्यावेळी नाव सांगितले नसेल अथवा चुकीचे सांगितले असेल आपण बांधकाम बघितले तर ते त्यामध्ये आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— शहाड फाटक हा असा विभाग आहे जेथे कोणी कोणाला घाबरत नाही. नाव विचारले तर पटकन सांगतात. इतर ठिकाणी परिस्थिती वेगळी असू शकते.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— त्यांनी नाव सांगितले नाही, तर त्यांना नोटिस कशी काय मिळाली?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— माझे नाव नाही तर नोटिस कशी काय मिळाली? यासाठी मी तुमच्या म्हणण्याशी सहमत नाही. तुम्ही सर्व्हेक्षण पुन्हा करा. आम्ही आता पास करतो, पास करायला आमचा विरोध नाही. आपण चांगला प्रकल्प आणला आहे. सर्व्हेक्षण व्यवस्थित करा. कोणाचे किती बांधकाम जात आहे? कारण यामध्ये जे दाखविले आहे त्यात कमी जास्त देखील होवू शकते. तुम्ही नेहमी तुमच्या कनिष्ठ अधिका—याला वाचविण्याचा प्रयत्न करीत असतात. तुम्ही त्यांना एवढे संरक्षण देवू नका. तुम्ही नेहमी त्यांना वाचवता. तुम्ही त्यांच्या चुका स्वत:वर ओढवून घेता. तुम्ही अधिका—यांचा बचाव करीत आहात. सर्व्हेक्षण योग्य व्हायला हवे.

**मा. सदस्या श्रीमती ज्योती कलानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— तुम्ही चुकीच्या माणसांचा बचाव करीत आहात.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :— आयुक्त साहेब व उपस्थित सर्व सदस्य आज महासभेत शहाड स्टेशन जवळील गुलशन नगर येथिल जो प्रकल्प आला आहे, यासाठी मी महापालिका आयुक्त श्री. रामनाथ सोनवणे, सत्ताधारी पक्षातील सर्व सदस्य , कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंगेस व या शहराचे आमदार या सर्वांचे अभिनंदन करतो.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— विरोधी पक्षाचे सहकार्य देखील आपणांस मिळत आहे. आपण त्यांचे नाव का घेत नाही? तुम्हांला विरोधी पक्षाचा सहयोग नको का? शहराच्या विकासासाठी.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :— विशेष करुन मी विरोधी पक्षाचे अभिनंदन करत आहे. ज्यांचे नेते श्री. भुल्लर यांनी या प्रकल्पासाठी स्विकृती दिली आहे व जे आता याच्या बाजूने मत देणार आहे. परंतु आमच्या काही शंका आहेत. आज शहरातील जेवढे काही झोपडयांचे विभाग आहेत, आयुक्त साहेब मी तुमच्याशी बोलत आहे. संपुर्ण शहरात जेथे जेथे झोपडपट्टी आहे व तेथे मागील ३५—४० वर्षांपासून जे लोक राहत आहेत त्यांच्या काही शंका आहेत. मला असे वाटते की, आयुक्तांनी त्या बद्दल खुलासा करावा. सर्वप्रथम या गुलशन नगरचा जो प्रस्ताव आमच्या समोर आला आहे, तेथिल काही नागरीकांनी न्यायालयात महापालिकेवर दावा दाखल केला आहे. तो दावा न्यायालयात असतांना हा जो प्रस्ताव महासभेसमोर आला आहे, त्याला आपण स्विकृती देवू शकतो का? कायदेशीररित्या आपण तो पास करु शकतो का? सचिवांनी कृपया याची माहिती दयावी. आजही त्या दाव्यावर कल्याण येथिल न्यायालयात सुनावणी होती. दुसरे म्हणजे शहरात वेगवेगळी झोपडपट्टयांमध्ये आमचे जे लोक आहेत, मागील ३५—४० वर्षांपासून जे तेथे राहत आहेत, त्यांच्याबद्दल महाराष्ट्र राज्याच्या ब—याच मराठी वर्तमानपत्रांमध्ये बातम्या छापुन आलेल्या आहेत की, उल्हासनगर येथिल झोपडपट्टया हटविल्या जाणार आहेत. तर मी असे सांगेन की, आयुक्तांनी या महासभेत या विषयावर खुलासा दयावा तसेच वर्तमानपत्राातील बातम्यांमुळे लोकांच्या मनात जी भिती आहे, ती दूर करणे महापालिका आयुक्तांचे कर्तव्य आहे. माझ्या माहिती प्रमाणे या शहरात विविध ठिकाणी सुमारे १२५ झोपडपट्टया आहेत. ज्यापैकी ४८ झोपडपट्टया या घोषित

आहेत. उर्वरित ज्या झोपडपट्टयांना महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली नाही. त्यांचे काय होणार हे आज आपणांस महासभेसमोर सांगावे लागेल. जेणेकरुन आम्ही आमचे जे लोक विविध ठिकाणी बसलेले आहेत त्यांच्या मनातील भय दूर करु शकू. आज महापालिकेवर आरपीआय तर्फे मोठा मोर्चा आलेला आहे. ज्यामध्ये या सर्व गोष्टींचा उल्लेख करण्यात आला की, उल्हासनगर मधील सर्व झोपडपट्टया हटवून तेथे मोठे–मोठे प्रकल्प होणार आहे. तर याचे स्पष्टीकरण महापालिकेतर्फे व्हायला हवे, आम्ही राजकिय पक्षाचे नेते आमच्या तर्फे करुच. परंतु ही आयुक्तांची जबाबदारी होते की, आयुक्तांनी वर्तमानपत्रामध्ये याबद्दल खुलासा करावा की, महापालिकेतर्फे अशी कोणतीही कार्यवाही होणार नाही. तिसरे म्हणजे, गुलशन नगर मध्ये जो विकास होत आहे, तेथे जे निवासी संकुल किंवा वाणिज्य संकुल, आयटी पार्क, पार्किंग, मल्टीप्लेक्स तयार होत आहे. हे शहराच्या विकासासाठी उचललेले एक सोनेरी पाऊल आहे. त्याला आमचे पूर्ण समर्थन आहे. परंतु त्याच बरोबर त्या विभागात जे लोक आहेत, त्या लोकांचे पुनर्वसन करण्याचा जो प्रस्ताव आहे, त्याबद्दल ठोस आश्वासन सभागृहासमोर दयायला हवे की कोणतीही व्यक्ती जी तेथे गेल्या ३०–३५ वर्षापासुन रहात आहे. १९६५ पुर्वी तेथे राहायला आली असेल व आजपर्यंत तेथे रहात असेल त्या व्यक्तीला निर्वासित करण्यापुर्वी तिची व्यवस्था करण्यात येईल. आधी ज्या निवासी इमारती आहेत तेथे त्यांचे पुनर्वसन करण्यांत यावे. दुसरे शहाड स्टेशन लगत जो रस्ता होणार आहे या प्रकल्पानुसार तो ६० फुट रूंदीचा रस्ता आहे. तेथे गेल्या ४० वर्षापासुन रस्त्याच्या बाजुला बरीच दुकाने आहेत. त्या दुकानांचे जेवढे पण निष्कासन होईल त्यांना महापालिकेच्या आधीच्या धोरणाप्रमाणे जसे जेथे जेथे रस्ता रूंदीकरणाचे वेळी, श्री. चंद्रशेखर साहेबांच्या किंवा श्री. शिंदे साहेबांच्या काळात ज्या लोकांनी आपली बांधकामे हटविली होती तेव्हा त्यांना तळमजला अधिक दोन मजले बांधकाम करण्यासाठी महानगरपालिकेने परवानगी दिली होती. ही सवलत शहाड येथील बाधित व्यक्तींना देखिल दयायला हवी. शहाड स्टेशनच्या लगत जो रस्ता तयार होणार आहे तेथिल लोकांना देखिल ही सवलत दयावी. तिसरे म्हणजे तेथे एक मंदीर, मशिद व एक उर्दु शाळा आहे. डॉ. झाकीर हुसेन शैक्षणिक संस्था या नावाने तेथे गेल्या ब–याच वर्षापासुन एक शाळा सुरू आहे. तसेच तेथे एक मंदीर व मशीद देखिल आहे. त्याबद्दल आयुक्तांनी आश्वासन दयावे की ही जी तीन स्थाने आहेत ती या प्रकल्पाने बाधीत नाहीत. आम्ही आपल्या अधिका–यांकडुन माहिती घेतली तेव्हा आम्हाला कळले की ही तिन्ही बांधकामे मंदीर, मशीद व शाळा ही कोणत्याही प्रकल्पाने बाधीत होत नाही. तर याबद्दलही सभागृहात आपण ठोस आश्वासन दयावे. चौथे म्हणजे त्याठिकाणी सेंच्युरी रेयॉन कंपनीच्या भिंतीलगत जो रस्ता आहे, जो आय.डी.आय. व उल्हासनगरच्या दिशेने जातो तो आजमितीस ८० फुट रूंदीचा आहे. आमची अशी सूचना आहे त्या रस्त्याची रूंदी ८० फुट न करता ६० फुट करण्यांत यावी. जेणेकरून जास्तीत जास्त लोकांचे पुनर्वसन त्या रस्त्यावर करता येईल. म्हणजे लोकांचे कमीत कमी नुकसान होवुन त्यांना दिलासा मिळेल. महाराजजी हे मी आपल्यासाठी सांगत आहे.

**मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>तुम्ही हे माझ्यासाठी बोलता हे ठिक आहे परंतु जसे आयुक्त साहेबांनी सांगितले त्याप्रमाणे तेथे एक इंचही जागा शिल्लक उरणार नसुन कोणाला पानाची टपरी टाकण्यासाठी जागा राहणार नाही. तुम्ही म्हणता तेथे तळमजला अधिक दोन मजल्यांचे बांधकाम करणार ही तर चंद्रावर डाग लावण्यासारखी गोष्ट झाली. तेथे कोणाचे काही होणार आहे का? तेथे १०–२० फुट वाचणार आहे का, रस्ता छोटा करणार का? याठिकाणी कोणाचे एक इंच बांधकाम देखील वाचणार नाही. आयुक्त साहेब, तेथे कोणाचे काही बांधकाम वाचणार आहे का? हे आधी येथे स्पष्ट करा. आपण सर्वांचे तोडणार आहोत तर कोणाला तळमजला + दोन मजले बांधकामाची परवानगी मिळणार आहे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :–</u>दुसरे म्हणजे ज्या लोकांकडे सनद आहे, त्यांची संपादनाची जी प्रक्रीया होईल, तेव्हा त्यांना योग्य भरपाई मग ती टीडीआर मार्फत अथवा रोख रक्कम देवून त्यांना न्याय दयायला हवा. उर्वरित ज्यांना सनद नाही व ज्यांनी नुसते अतिक्रमण केले आहे, त्यांना आपण जसे सांगितले की, २२५ चौ. फुटाची जी सदनिका आपण त्यांना देणार आहात, व दुकानदारांना ११० चौ. फुटाचे देणार आहात. हे धोरण आपण अवलंबू शकतात. परंतु ज्यांच्याकडे मालकीची जमिन जास्त आहे, ते सनदधारक नसतील तरी त्यांना जास्त सवलत दयायला हवी असा आमचा या सभेत दृष्टीकोन आहे. या सर्व मुद्दयांवर आपण सभागृहात एक ठोस आश्वासन दयावे. व नंतर प्रस्ताव पारीत केला तर योग्य होईल असे आमचे म्हणणे आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> आयुक्त साहेब, श्री. भुल्लर महाराज व श्री. हरदास माखिजा यांनी सांगितल्याप्रमाणे हा खरोखरच चांगला प्रस्ताव आहे. यापूर्वी आरक्षित भुखंडावर प्रशासनाने कधीही अभ्यास केला नव्हता हे देखील मान्य आहे. एवढे विस्तृत सर्वेक्षण व प्रदर्शन यापूर्वी याठिकाणी कधीही झाले नव्हते. परंतु या महापालिकेचा एक वेगळा अनुभव आहे. आरक्षणातील भुखंड विकसित केले जातात, ते सर्वसामान्य लोकांसाठी

नाही तर धनदांडग्यांसाठी केले जातात. कोणाच्या तरी घशात घालण्यासाठी हे भुखंड विकसित केले जातात. महापालिकेसमोर प्रस्ताव आणला जातो. प्रशाासनातर्फे कधीही त्यांची बाजू कमी पडु दिली नव्हती. प्रत्येकवेळी प्रशासनाने आम्ही आणलेला हा प्रस्ताव चांगला आहे असेच सांगितले आहे. यापुर्वीचे जे प्रस्ताव आले ते सुध्दा असेच आले आहेत. तो टाऊन हॉलचा असु दे, अॅब्रोसिया हॉटलचा असु दे किंवा दुसरा कुठलाही असु दे. जो जो प्रस्ताव आला आहे तो सर्वसामान्यांच्या फायदयाचा कसा आहे हे प्रशासनाकडुन सांगण्यात आले.पण जे निष्पन्न झाले ते वेगळेच आहे. सर्वसामान्यांना त्याचा काडीचाही उपयोग नाही त्याचा फायदा धनदांडग्यांनाच झाला आहे. ज्यांच्या घशात घालण्यासाठी हे प्रस्ताव तयार करण्यांत आले होते त्याचा पध्दतशीर फायदा याठिकाणी घेतलेला आहे मागच्या महासभेमध्ये देखिल एक उदाहरण दिले होते. प्लॉट क्र. ६१९ या आरक्षणाचे उदाहरण दिले होते. हाऊसिंग फॉर डिसहाऊस, विस्थापितांना तेथे जागा देण्यासाठी इमारत बनविण्यात येणार होती. ती इमारत तो विकासक देणार होता परंतु त्याने उलटेच केले. त्याला फायदयाचे होते तेवढेच केले आणि विस्थापितांची जी जागा होती ती अजुन तशीच आहे. गेल्या चार वर्षापासुन तशीच आहे. तसे होवु नये. प्रत्येक गोष्टीचे जसे फायदे आहेत तसे तोटे पण आहेत. आपल्याला तोटे जास्त होत आहेत व फायदे कमी होत आहेत म्हणुन सर्व साशंक आहेत. योजना जरी चांगली असली तरी त्याची अंमलबजावणी व्यवस्थित व्हायला हवी. ती कराल अशी अपेक्षा आहे. त्याबद्दल विरोध कोणाचा नसला तरी आज जसे श्री. हरदास माखिजा यांनी सांगितले, श्री. नाना पवार यांची लक्षवेधी आहे की , उल्हासनगरच्या झोपडपट्टीमधील नागरिकांमध्ये एक संभ्रमावस्था आहे. आणि भितीचे वातावरण आहे त्याचा परीणाम म्हणुन बाहेर हजारोंच्या संख्येने मोर्चा आलेला आहे. याचे कारण काय? तर परवा डॉलफिन रस्त्यावरील झोपडपट्टी तुटलेली आहे. आणि आज हा गुलशन नगर विकासाचा प्रस्ताव आलेला आहे. इकडे झोपडपट्टया तुटत आहेत, पण ३३ रस्ते आम्ही १९९९ साली मंजुर केले होते त्यावेळेस आमच्या महापौरांनी व सत्ताधारी पक्षांनी विरोध केला होता परंतु नंतर ते सामिल झाले त्याचे कारण हे सर्वांना माहित आहे. माखिजा साहेब बरोबर आहे ना? ३३ रस्ते. तेव्हा सुरूवातीला विरोध केला होता परंतु नंतर मंजुर केले. त्यावेळी एक रस्ता होता तेथे चित्रीकरण करण्यात आले. आम्ही कुर्बानी देवू परंतु आजपर्यंत चार वर्षात खेमाणी ते आझाद सोप फॅक्टरी हा जो रस्ता आहे तो जसाच्या तसाच आहे. फक्त चार ते पाच फुट भिंत जात होती. त्यामुळे जो रस्ता थांबला आहे त्याला प्रशासन काहीच करत नाही. आणि डॉल्फिन रोड येथे बुलडोझर फिरविण्यात आला. कुर्बानी कुणाची दिली? हे सर्व एकाचवेळी व्हावयास पाहिजे होते. यामुळे झोपडपट्टीतील लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना आहे. ते प्रशासन काढणार आहे का? तर आणि तरच असे प्रस्ताव आणले तर आम्ही त्याचे समर्थन करू. सर्व सामान्यांसाठी सुविधा असल्या पाहिजेत. हे झाले उल्हासनगर मधील सर्वसामान्य जनतेची भावना त्यांच्या आपणांकडुन असलेल्या अपेक्षा. आता या प्रस्तावाबाबत बोलायचे झाले तर प्रशासनाने जो प्रस्ताव दिला आहे त्यात पर्याय क्र. ४ हा चांगला आहे. यासाठी कोणी विकासक आपल्याकडे आलेला आहे का? तो विकासक तुम्ही कसा काय नेमणार आहात त्याची माहिती नाही. त्यानंतर वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत तुम्ही झोपडपट्टीचा विकास करणार आहात.त्याचा खर्च सर्व केंद्रशासनाच्या योजनेमार्फत येणार आहे. जो निधी झोपडपट्टी विकासासाठी लागणार आहे तो केंद्रशासन देणार आहे. मग विकासकाला हे दयायची गरजच काय? हे कशापध्दतीने होणार आहे? आता तुम्ही जो पर्याय क्र. ४ सांगितला तो स्पष्ट नाही. पर्याय क्र. ४ जो आहे तो संयुक्त उपक्रम तत्वाद्वारे विकास हक्क म्हणजे यात विकासकाला जमिन उपलब्ध करून देवून विकासकाच्या आर्थिक भांडवलाद्वारे सध्याच्या रहिवाश्यांचे, दुकानदारांचे पुनर्वसन, क्षेत्रफळ, वाहनतळ, शाळा इत्यादी साठी आवश्यक क्षेत्र वगळुन उर्वरित उपलब्ध होणा—या जागेतील गाळे मल्टीप्लेक्स थिएटर, व्यापारी संकुल, माहिती तंत्रज्ञान यांची विक्री करण्याचे अधिकार विकासकास देवुन म्हणजे वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत आम्ही आधी झोपडपट्टीचा विकास करणार आणि राहीलेली जमिन आहे ती विकासकाला देवून आम्ही दोघांनी भागीदारीमध्ये, महापालिका व विकासक यांच्या भागीदारीने ते चालणार आहे का? असेच आहे ना? तर ही माहिती कळलेले नाही म्हणुन विचारतो आहे. ते कशा पध्दतीने चालणार आहे. त्यानंतर अशाच पध्दतीचे इतर ठिकाणी जे आरक्षित भुखंड विकसित केले आहेत तिथेही लक्ष दया. प्रश्न काही ठिकाणी आहेत आम्ही बघतो ब—याच ठिकाणी लोकांना दिलेले आहे. पण त्यांच्याकडुन परत काहीच घेतले नाही. तर तसे होता कामा नये. जे महापालिकेच्या ताब्यात घ्यायला हवे ते घेतलेले नाही. तसे येथे होणार नाही. याची काळजी घ्या. आणि ज्या लोकांच्या भावना आहेत. वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत आपण जे २४० चौ. फुटाचे किंवा २२५ फुटाचे आणि ज्यांचे व्यापारी आहे, दुकान आहे त्यांना किती फुटाचे ते ही जरा स्पष्ट करा. तर झोपडपट्टयांमधील लोकांची जी भावना आहे की, फक्त आमच्या झोपडपट्टयाच उध्वस्त होणार आहेत. आणि इथे २२५ फुटाचा, १००० फुटाचा आमचा भाग दयायचा आणि २२५ चौ.फुट आम्ही घ्यायचे शहराचा विकास होण्यासाठी ही सर्रास योजना सर्व ठिकाणी लागु होणार आहे का? ही लागु झाली तर आम्ही देशोधडीला लागु अशी झोपडपट्टीधारकांची भावना आहे ती जरा स्पष्ट केली तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—सन्माननिय महापौर, सन्माननिय आयुक्त साहेब हा जो विकासाचा प्रस्ताव आणला आहे. त्याचे आमच्या वतीने अभिनंदन केलेले आहेच आणि सन्माननिय सदस्य, विरोधी पक्षनेते श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी या ठिकाणी आपल्या वतीने सुध्दा सांगितले आहे. सगळयांनी आपल्या सूचनेनुसार या ठिकाणी सांगितले आहे की, ज्यावेळेस कोणत्याही झोपडपट्टीचे पुनर्वसन अथवा विकासाचा प्रस्ताव येतो. विकास करत असताना तेथील घरे तोडली जातात. पर्यायी योजना म्हणुन त्यांना घरे दिली जात नाहीत. अशी अनेक उदाहरणे या ठिकाणी सांगितलेली आहेत. पुन्हा मी या ठिकाणी सांगु इच्छित नाही परंतु मला महत्वाचे या ठिकाणी सांगायचे आहे. गेल्या अनेक वर्षापासुन या उल्हासनगर शहरामध्ये अनेक जाती, अनेक धर्माचे, पंथाचे लोक रहात आहेत. त्या परिसरामध्ये देऊळ आहेत, मशिद आहेत, शाळा आहेत. त्याठिकाणी झोपडपट्टीचाच विकास होत आहे. चांगली गोष्ट आहे विकास झाल्यानंतर त्यापासुन मध्यम वर्गीयांना त्याचा फायदाही व्हायला पाहिजे. यासर्व गोष्टी या ठिकाणी प्रशासनाकडुन बोलल्या जातात. गेल्या अनेक वर्षापासुन लोक त्याठिकाणी घरे बांधुन रहात आहेत. परंतु या उल्हासनगर शहरामध्ये ज्या परिसरामध्ये ज्या प्रभागामध्ये घरे बांधली गेलेली नाहीत, आरक्षित जागा आहेत, महापालिकेचा रिकामा भुखंड आहे. तो भुखंड महापालिका ताब्यात घेत नाही ही फार मोठी महत्वाची व दु:खाची बाब आहे. महत्वाची गोष्ट म्हणजे गेल्या दिड वर्षापासुन सातत्याने माझ्या प्रभागातील २३ नंबर मराठी शाळेचा भुखंड रिकामा पडलेला आहे, तोडफोडीच्या अवस्थेमधील आहे.अनेक वर्ष त्या ठिकाणी शाळा होती. महापालिकेची आजही त्या ठिकाणी एक हजेरी शेड बांधलेली आहे. वारंवार महापालिकेला पत्रव्यवहार करून सुध्दा ती जागा महापालिका कुंपण घालुन देखिल ताब्यात घेत नाही यामागील कारण काय? त्या जागेमध्ये लोकांना अतिक्रमण करून दयायचे, घरे बांधुन दयायची, आणि नंतर तोडायची असे प्रशासनाचे नियोजन आहे काय? त्याच बरोबर धोबीघाट परिसरातील एक चांगला भुखंड मी गेल्यावर्षी आपल्या निदर्शनास आणुन दिला आहे. आपण सांगितले की वॉटर फिल्टरसाठी जो नाला गेलेला आहे तेथुन उल्हास नदीच्या पिण्याच्या पाण्यामध्ये संपुर्ण या शहराचे घाणेरडे पाणी मिश्रीत होत आहे. त्या नाल्याच्या बाजुला वॉटर फिल्टरचा प्लान्ट करायचे आपले नियोजन होते, काही योजना होत्या. आपण सांगितले होते परंतु अजुन ती जागा प्रशासनाने आपल्या ताब्यामध्ये घेतलेली नाही. त्याचप्रमाणे शाळेची सुध्दा जागा तेथे एक कुंपणही बांधलेले नाही. आणि येथे मात्र डॉल्फिन हॉटेलच्या बाजुला गेल्या अनेक वर्षापासुन शहाड स्टेशनच्या बाजुला गुलशन नगर येथे १९६५ सालापासुन राहिलेल्या लोकांची घरे तोडली जातात. पण ज्या ठिकाणी रिकामे भुखंड आहेत. तो या ठिकाणी महापालिकेने ताब्यात घ्यावा अशी मी या ठिकाणी विनंती करतो.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—आयुक्त साहेबांना खुलासा तर करू दया.

मा. सचिव:—उल्हासनगर येथील दिवाणी न्यायालयात दावा क्र. १८३/२००४ गुलशन नगर ब—याच प्रतिनिधींनी दाखल केला होता. त्यामध्ये मंदीर, मशीद व व्यापारी महामंडळाचे प्रतिनिधी होते. तसेच अजुन काही संस्था आहेत ज्यांनी त्यात म्हंटले होते की, आमची जी जमिन आहे ती महापालिका काही प्रकल्प करण्यासाठी ताब्यात घेत आहे. त्यांचे म्हणणे होते की महापालिकेची कारवाई बेकायदेशिर आहे. ही कारवाई थांबवण्यासाठी त्यांनी न्यायालयात एक अर्ज केला होता की आम्हाला स्थगन आदेश दयावा. जो अदयाप पर्यंत त्यांना प्राप्त झालेला नाही. त्यांचा दावा दाखल झाल्यानंतर आम्ही देखिल आमचे म्हणणे व ही पुस्तिका जी आपणांस देखिल दिलेली आहे. तीची प्रत देखिल न्यायालयासमोर ठेवण्यात आली आहे. हे सर्व पाहील्यानंतर अदयाप पर्यंत न्यायालयाने यावर काहीही आदेश दिलेले नाहीत. जे आपल्या समोर सादर केले आहे ते न्यायालयासमोर देखिल सादर केले आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—आपण येथे निर्णय घेतला तर न्यायालयाचा अवमान होणार नाही का?
मा. सचिव :—कोणताही आदेश दिलेला नसल्याने न्यायालयाचा अवमान होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. आदेश असेल तरच अवमान्यता होईल. प्रलंबित असल्याने काही होत नाही. प्रलंबित आहे म्हणुन निर्णय घ्यायचा नाही असे नाही. आपल्याला फक्त न्यायालयाची अवमान्यता होणार नाही एवढेच पाहायचे आहे. कोणता आदेश झाला आहे? नाही. कोणता आदेश नाही तर अवमान्यतेचा प्रश्नच नाही. अशी हजारो प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. तरी देखिल आपल्यातर्फे निष्कासनाची कारवाई काही ठिकाणी केली जाते. ज्यामध्ये स्थगन आदेश नसतो. त्या प्रकरणात कार्यवाही करता येते.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—सचिव साहेब, यापुर्वी जे काही न्यायालयात प्रलंबित होते त्यावेळी महापालिकेतर्फे उत्तर दिले की, प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. त्यामुळे येथे चर्चा करू शकत नाही. एक दोन प्रश्नांच्या वेळी

ज्यावेळी येथे चर्चा झाली त्यावेळी आपल्याकडुन असे उत्तर आले होते की हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामध्ये कोणताही स्थगन आदेश नव्हता अथवा निर्णय झाला नव्हता.

<u>मा. सचिव:—</u>हे अशासाठी होते की ज्यावेळी एखादे प्रकरण न्यायालयात जाते तर त्यावेळी न्यायालयात आपण आपली बाजु मांडतो. त्यावर आपण काही भाष्य करू शकत नाही. भाष्य केल्याने आपल्या बजाव पक्षाची बाजु कमकुवत होऊ शकते यामुळे काही वेळा आम्ही प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यावर भाष्य करीत नाही. यामध्ये असा काही मुद्दा नाही की जो आम्ही न्यायालयासमोर मांडलेला नाही.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—</u>आयुक्त साहेबांनी आम्हाला काही उत्तरे दिली ज्यावर मी संतुष्ट नाही. पहिले म्हणजे महानगरपालिकेवर त्यांच्या म्हणण्याप्रमाणे रू. २० कोटी एवढे कर्ज आहे. मी त्यांच्या या म्हणण्याशी सहमत नाही. ज्या कर्जाचा आपण हप्ता भरतो ते कर्ज होवू शकत नाही का? ५० कोटी एवढे कर्ज असेल व आपण त्याचा हप्ता भरत असु तर ते कर्जामध्ये समाविष्ट होणार नाही का? ही सभागृहाची दिशाभुल करण्याची गोष्ट आहे की आम्ही त्याचा नियमित हप्ता भरत आहोत म्हणजे आमच्यावर काही कर्ज नाही. हे एकदम चुकीचे आहे. दुसरे म्हणजे आपण ज्या लोकांना त्याठिकाणी घरे देणार आहोत त्यांच्याकडुन आपण पैसे घेणार आहात काय? हे ही आपण सभागृहासमोर स्पष्ट करावे. ज्यांना आपण दुस—या ठिकाणी हलवुन २२५ चौ. फुट जागा देणार आहात. त्यांच्याकडुन काही पैसे घेणार आहात काय? की मोफत देणार आहात? याबद्दलही आपण सभागृहात स्पष्टीकरण दयावे. व सनदधारकांबद्दल आपण सांगितले की फक्त पेट्रोल पंपवाल्यांकडे सनद आहे. तर माझ्या माहितीप्रमाणे त्या ठिकाणी ब—याच जणांकडे सनद आहे. त्यांच्याकडुन भुसंपादन करणे हा काही मुलांचा खेळ नाही. सर्वोच्च न्यायालयापर्यंत सदरची प्रकरणे जावु शकतात व त्यामध्ये बरीचशी वर्षे जावु शकतात. माझ्या माहितीप्रमाणे महापालिकेवर १०० कोटी पेक्षा जास्त कर्ज आहे. तर अशी महापालिका एखादया प्रकल्पावर रूपये ४८ कोटी खर्च करू शकेल यावर मला शंका आहे. ते रूपये ४८ कोटी आपल्याकडे कुठून येणार आहेत. जे आपण तेथे खर्च करणार आहात. याचेही स्पष्टीकरण दीले तर बरे होईल.

**मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>सनदेची प्रत घेण्यासाठी आपल्याला त्याभागात जायची काहीही आवश्यकता नाही. न्यायालयात जे प्रकरण प्रलंबित आहे त्यामध्ये सर्वांच्या सनदेची प्रत जोडली आहे.

<u>मा. सचिव:—</u>कोणाचीही प्रत जोडलेली नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>नाही लावली? आधी लावली होती. दुकानदारांना तुम्ही किती जागा देणार? त्यांच्याकडुन काही पैसे घेणार का? हे देखिल सांगा.

<u>मा. सचिव:—</u>एकाही व्यक्तीने सनदेची प्रत जोडली नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>मा. महापौर महोदया, येथे बोलले गेले की मी सभागृहाची दिशाभुल केली आहे. सन्माननिय सदस्य श्री. मोहन बेहरानी यांच्या या विधानावर माझी आपत्ती आहे. मी आधी जे पुस्तक दिले त्यामध्ये स्पष्ट लिहिले आहे की, आमच्यावर रू. ५० कोटीचे कर्ज आहे. पान क्र. १० वाचले तर त्यामध्ये महानगरपालिकेचे उत्पन्न किती, खर्च किती , महानगरपालिकेची आर्थिक स्थिती, मत्ता व दायित्व याची माहिती पान क्र. ९ व १० वर सविस्तर दिली आहे. आजही सभागृहात मी निवेदन केले त्यावेळी बोललो की, आम्हाला प्रत्येक महिन्याला अथवा वर्षाला कर्जाचा जो हप्ता दयावा लागतो तो व आजपर्यंत आम्ही जे कर्ज घेतले आहे ते रू. ४० ते ५० कोटी एवढे आहे. आमची थकबाकी रू. २० कोटी एवढी आहे. असे विधान मी केले होते. व यामुळे सभागृहाला काहीही चुकीची माहिती दिलेली नसुन वस्तुस्थिती सभागृहासमोर सादर केली आहे. दुसरे म्हणजे या लोकांचे जे पुनर्वसन करण्यात येणार आहे.त्याबद्दल देखिल उल्लेख केला आहे की वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत जे रू. ४० हजार मिळणार आहेत. ते ४० हजार महापालिकेला मिळणार असुन आम्ही ते विकासकाला देवु. उर्वरित खर्च विकासकाने स्वत: करावयाचा आहे. आपण जर प्रत्येक परिच्छेद लक्षपुर्वक वाचला तर पान क्र. ६ वर स्पष्टपणे लिहिले आहे की, परिच्छेद क्र. २ मध्ये ''प्रत्येक लाभार्थ्यासाठी रू. ४० हजार पर्यंत अर्थसहाय्य शासनाकडुन उपलब्ध होवु शकते. उर्वरित खर्च विकासकाने करावा असे प्रस्तावित आहे''. मी आपणांस विनंती करेन की, आपण हे पुन्हा वाचले तर आपल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर यामध्ये दिलेले आहे. जी वाणिज्य दुकाने आता तेथे आहेत त्यांच्या पुनर्वसनाचे बघितले तर ते देखिल पान क्र. ७ वर असे लिहिले आहे की ९.३

चौ. मी. ची जागा त्यांना मोफत देण्यात येईल. त्यापेक्षा जास्त हवी असेल तर बाजारभावाप्रमाणे ते विकत घेवु शकतात. खाजगी जमिनीचे संपादन कसे करायचे याची माहिती देखिल यामध्ये दिलेली आहे. मला वाटते की, हा प्रस्ताव स्वयंस्पष्ट आहे यामध्ये आपली प्रत्येक शंका, प्रश्न याचे उत्तर त्यामध्ये दिलेले आहे. फक्त एकच आहे ते म्हणजे जो पर्याय आपण स्विकृत करत आहोत त्यानंतर त्याचे काय करणार? श्री. बोडारे यांनी विचारले की आपल्या माहितीत कोणी विकासक आहे का? आमच्या मनात सध्या कोणीही विकासक नाही. राष्ट्रीय स्तरावरच्या वर्तमानपत्रामध्ये आम्ही निविदा सूचना प्रसिध्द करू त्यानंतर त्याला जो काही प्रतिसाद मिळेल त्यापैकी महापालिकेच्या दृष्टीने फायदेशिर असलेला प्रस्ताव आपल्या समोर ठेवुन नंतर संमत करू.

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—**ज्यावेळी आपण निविदा प्रसिध्द कराल त्यावेळी त्यामध्ये कोणता पर्याय देणार याचा उल्लेख करावा लागेल.

**मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—** पर्याय आपणांस निवडायचा आहे. आम्ही आपणांस चार पर्याय दिलेले आहेत. आधी आपण पर्याय निवडा. जो पर्याय आपण निवडाल तो लक्षात घेवुन आम्ही निविदा प्रसिध्द करू. ज्या निविदा येतील त्यापैकी महापालिकेच्या हिताचा जो पर्याय असेल तो आपल्या समोर ठेवु. आपण जर त्याला स्विकृती दयाल तरच हे काम होईल. आता आपण मंजुरी दिली आणि आम्ही काम केले असे होणार नाही.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—**प्रशासनाचा प्रस्ताव काय आहे हे मला विचारायचे होते.

**मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—**ते मी त्यामध्ये दिले आहे. माझे तेच रडगाणे आहे की आपण प्रस्ताव वाचलेला नाही.

**मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—**बाकीच्या झोपडपट्टयांबद्दल आपण काय करणार याचे स्पष्टीकरण आपण दिलेले नाही.

**मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—**तेथे प्रकल्प झाल्यावर काही वाचणार आहे की नाही हे पण सांगुन टाका. तुम्ही तळमजला अधिक दोन मजले याचे जे सांगत आहात. लोकांना तसे बनवता येईल का? हे आपण सांगून टाका. लोकांच्या मनात भ्रम असता कामा नये की, सत्तापक्षवाल्यांनी याची दिशाभुल केली. दहा फुट इकडे वाचवू, दहा फुट तिकडे वाचवु, तुम्ही तळमजला अधिक दोन मजले बांधा आम्ही बसलो आहे. हे देखिल लोकांना कळायला हवे की येथे कोणाचे काही वाचणार आहे की नाही. आपण हे सभागृहाला सांगावे म्हणजे सर्वांना समजेल.

**मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—**आयुक्त साहेब, हे मंदीर, मशीद व शाळा प्रकल्पाने बाधीत होत नाही असे आम्हाला अधिका—यांकडुन कळले आहे. यावर आपले स्पष्टीकरण दयावे.

**मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—**मा. महापौर महोदया, आमच्या प्रस्तावात तेथील शाळेचे काय करायचे याचे दोन प्रस्ताव दिलेले आहेत. त्यांना पर्यायी जागा देवु शकतो. परत बांधु शकतो. किंवा त्याच जागेवर जी पुनर्वसनाची इमारत तयार होईल त्याचबरोबर काही सुविधा दयाव्या लागतात. त्या सुविधानुसार ती शाळा देखिल तेथे बनवु शकतो. पान क्र. ७ आपण वाचले तर त्यामध्ये ते दिले आहे. व आपणांस जसे वाटले की, रस्ता रूंदीकरण झाल्यावर ज्यांचे बांधकाम वाचेल त्यांना परत बांधण्यासाठी जसे या आधी शहरात झाले आहे. तसे करण्याची आवश्यकता भासणार नाही. कारण जे पात्र लोक आहेत त्यांचे तेथेच पुनर्वसन होईल. वाणिज्य असले तरी पुनर्वसन होईल. निवासी असले तरी पुनर्वसन होईल. याचा अर्थ तो पुर्ण भुखंड मोकळा करून त्याचा विकास केला जाईल. जे बाधित लोक आहेत व जे पात्र आहेत त्यांचे पुनर्वसन करण्यांत येईल. जी बांधकामे पात्र आहेत त्यांचे पुनर्वसन होईल. असे काही बांधकामे आहेत. त्यांबद्दल कायदयातील तरतुदीनुसार निर्णय घेतला जाईल. कायदयाच्या कक्षेत राहुनच प्रत्येक बाधीत व्यक्तीबद्दल निर्णय घेण्यात येईल. मी फक्त तेथे मंदीर, मशीद असल्याचा उल्लेख केला आहे. त्याचे काय करायचे याची तरतुद आम्ही त्यामध्ये दिलेली नाही. कारण की तेथे अतिक्रमण झाले आहे. त्याचे काय करायचे हे आपणांस ठरवायचे आहे. आपले धोरण शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे असायला हवे याबाबत सभागृहात मी आता काही बोलु शकत नाही. शहरातील उर्वरित ज्या झोपडपट्टया आहेत. ज्या झोपडपट्टया आरक्षित जमिनीवर बनविण्यात आल्या आहेत तर त्या आरक्षणाचा जेव्हा विकास करायचा असेल, १ जानेवारी, १९९५ पुर्वीची संरक्षित झोपडपट्टी असेल, संरक्षित निवासी असेल तर त्याचे पुनर्वसन शासनाच्या निर्णयाप्रमाणे केल्यानंतरच त्या राखीव भुखंडाचा विकास होवु शकतो. आपल्या समोर

आता हा जो प्रस्ताव आला आहे तो त्याच प्रमाणे आला आहे. उर्वरित झोपडपट्टयांबाबत १.१.१९९५ नंतर जेवढया झोपडपट्टया बनल्या आहेत त्या निष्कासित कराव्यात असे शासनाचे स्पष्ट आदेश आहेत. १.१.१९९५ पुर्वीच्या ज्या झोपडपट्टया आहेत व ज्यांनी फोटो पास घेतला आहे फक्त त्याच झोपडपट्टया संरक्षित आहेत. बाकी शासकीय जमिनीवर अथवा आरक्षित भुखंडावर जेवढया झोपडया आहेत त्याबद्दल राज्यशासनाचे धोरण स्पष्ट आहे व जे राज्य शासनाचे धोरण आहे तेच महापालिकेचे देखिल धोरण आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–</u>आयुक्त साहेब, आपण तेथील लोकांना जी घरे देणार आहात त्याबद्दल काही आकार घेणार आहात काय? त्यांच्याकडुन काही रक्कम वसुल केली जाणार आहे का?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):–</u>मी यामध्ये दिले आहे की जे २२५ चौ.फुटाचे घर देण्यात येणार आहे त्याची त्यांना काहीच किंमत दयायची नाही. त्यानंतर देखभालीचा जो खर्च आहे, मग ते विद्युत देयक असेल, पाण्याचे देयक असेल ते त्यांना दयावेच लागेल.

<u>मा. सचिव:–</u>पास? पर्याय कोणता घ्यायचा? पहिला, दुसरा, तिसरा की चौथा? चौथा आपल्या फायदयाचा आहे.

<u>काही सदस्य:–</u>पास. पास.

<u>मा. महापौर:–</u>सदरच्या प्रस्तावातील पर्याय क्र. ४ हा स्विकारुन प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय :–</u> उल्हासनगर–१ शहाड स्टेशन जवळील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १४२ व १८९ हे महानगरपालिकेचे भुखंड विकसित करण्याचा प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करणे.

<u>प्रस्तावना :–</u>

उल्हासनगर शहराचा मंजुर विकास आराखडा वर्ष 1974 मध्ये शासनाने मंजुर केला असून तेव्हापासून महानगरपालिकेतर्फे या मंजूर विकास आराखडयाप्रमाणे विकासकामे करण्यात येत आहेत. या विकास आराखडयामध्ये एकूण 203 भुखंड विविध कारणास्तव आरक्षित ठेवण्यात आली आहेत. उल्हासनगर शहराचा प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात आला त्यामध्ये देखील 240 भुखंड विविध कारणास्तव आरक्षित दाखविण्यात आलेले आहेत.

उल्हासनगर शहरामध्ये अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, गलिच्छ वस्त्या यांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे शहरामध्ये मुलभुत सोयीसुविधा पुरविण्यासाठी महानगरपालिकेवर आर्थिक भार येत आहे. अन्य शहरांच्या तुलनेंमध्ये उल्हासनगर शहरामध्ये नियोजनबध्दरित्या बांधलेली व्यापारी संकुले अथवा निवासी संकुले नाहीत. शहरामध्ये व्यापार व व्यवसायाची भरभराट होत असली तरी येथे व्यापार व व्यवसायाला पोषक असे वातावरण नाही. वास्तविक पाहता विकास आराखडयातील व्यापार व उद्योगासाठी राखीव भुखंडाचा नियोजनबध्द विकास केला असता तर येथे व्यापार व उद्योगधंदयात वाढ होऊन रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होण्याबरोबरच शहराचा सर्वांगीण आर्थिक व सामाजिक विकास झाला असता. 1947 नंतर आलेल्या निर्वासितांनी स्वकष्टाने उद्योगाची निर्मिती करून शहर विकासाला हातभार लावला आहे. परंतू त्यांच्या वैयक्तिक प्रयत्नांना स्थानिक स्वराज्य संस्थेचे अपेक्षित सहकार्य व सहभाग मिळाल्याचे दिसून येत नाही. शहराच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी शहरामध्ये उच्च दर्जाच्या पायाभुत सुविधा स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत पुरविणे आवश्यक असते. त्यासाठी विकास आराखडयातील आरक्षित भुखंडाचा नियोजनबध्द विकास करण्याबरोबरच मालमत्ता कर व जकात करासारख्या स्थानिक करांचे दर माफक ठेवणे

गरजेचे आहे. त्याचबरोबर विकास करतांना आरक्षित भुखंडावर अतिक्रमण करून राहणारे नागरिक बेघर होणार नाहीत याचीही दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा प्रकल्पग्रस्तांचे शासनाच्या मार्गदर्शक धोरणानुसार पुनर्वसन करणे अनिवार्य आहे.

2) आरक्षित भुखंडांच्या विकासाबाबत एकात्मिक दृष्टीकोणाची आवश्यकता:

उल्हासनगर शहराच्या विविध समस्यांचा सर्वांगीण विचार करून विकास आराखडयातील आरक्षित भुखंडांचा क्रमाक्रमाने एकात्मिक दृष्टीकोण समोर ठेवून विकास करणे प्रस्तावित आहे. रेल्वेस्टेशन परिसर हा व्यापार व व्यवसायाच्या दृष्टीने Growth Center म्हणून ओळखला जातो. त्यामुळे शहरामध्ये रेल्वेस्टेशन परिसरात असलेल्या आरिक्षित भुखंडांचे मंजुर तसेच प्रारूप विकास आराखडयाप्रमाणे विकास करण्याचे प्रस्तावित आहे. शहाड रेल्वे स्टेशन समोरील आरक्षित भुखंड क्र. 142 व 189, विठठलवाडी रेल्वेस्टेशन समोरील भुखंड क्र. 193, उल्हासनगर रेल्वेस्टेशन समोरील आरक्षित भुखंड, टेलिफान एक्सचेंजमागील आरक्षण क्र. 6, प्लॉट क्र.705 विकासित करण्याची योजना तयार करण्यात येत आहे.

3) आरक्षण क्र. 142 व 189 च्या विकासासाठी धोरणात्मक निर्णयाची आवश्यकता.

शहाड रेल्वे स्टेशन समोरील भुखंडाचे क्षेत्रफळ 17500 चौ. मी. इतके असून मंजुर विकास आराखडयाप्रमाणे शॉपिंग सेंटर व पार्कीग व प्रारूप विकास आराखडयाप्रमाणे परिवहन सेवा, मनोरंजनाकरीता खुली जागा, मार्केट व शॉपिंग सेंटर या प्रयोजनासाठी आरक्षीत आहे.

या जागेवर सद्यस्थिती मध्ये गुलशन नगर ही झोपडपट्टी असुन या झोपडपट्टीमध्ये रहिवास व वाणिज्य वापर असलेली बांधकामे आहेत. त्यात प्रामुख्याने 111 निवासी झोपडया व 79 दुकान गाळे आहे. याशिवाय एक उर्दु शाळा, मंदिर, मसजिद, पेट्रोल पंप इत्यादि स्वरूपाची बांधकामे आहेत. सदरच्या भुखंडाची मालकी राज्य शासनाची असून विकास आराखडयात सदर भुखंड उक्त नमुद प्रयोजनासाठी आरक्षीत असल्यामुळे सदरच्या भुखंडाचा ताबा तत्कालीन नगरपालिकेकडे दिनांक 26/3/1987 रोजी हस्तांतरीत करण्यात आला आहे. नगरपालिकेकडे सदर भुखंडाचा ताबा देतांना त्यांवरील अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामांसह देण्यात आला. इतकेच नव्हे तर नगरपालिकेकडे भुखंडाचे हस्तांतरण झाल्यानंतर देखील सदर भुखंडावर निवासी व वाणिज्य स्वरूपाचे अतिक्रमणे झालेली आहे. त्यामुळे आता सदर भुखंडाचा विकास करण्यापुर्वी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

विकास आराखडयातील तरतुदीनुसार सदर भुखंडाचा विकास करणे अनिवार्य असल्यामुळे महानगरपालिकेचे स्थापत्य सल्लागार मे. मास्टर ॲन्ड असोशिएट्स यांना या जागेत वाहनतळ, व्यापारीसंकुल व माहिती तत्रंज्ञान उद्योग संकूलाचे संकल्पचित्र तयार करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी आपला प्रस्ताव सादर केला आहे.

4) आरक्षण क्रमांक 142 व 189 च्या प्रकल्पातील जमिनीचा प्रस्तावित वापर.

प्रस्तावित विकासकार्य यांचे क्षेत्रफळ दर्शविणारी माहिती

| | | |
|---|---|---|
| 1 | भुखंडाचे विकास आराखडयाप्रमाणे क्षेत्रफळ | 17500 चौ.मी |
| 2 | पेट्रोल पंप क्षेत्रफळ | (-)1509.62चौ. मी |

| | | |
|---|---|---|
| 3 | शिल्लक क्षेत्रफळ (1-2) | 15990.38 |
| 4 | मनोरंजन विकास कार्या करीता क्षेत्रफळ (शिल्लक क्षेत्रफळ पैकी 15 %) | (-) 2398.00 |
| 5 | शिल्लक क्षेत्रफळ (3-4) | 13592.00 |
| 6 | अनुज्ञेय चटई क्षेत्रनिर्देशांक | 2.00 |
| 7 | अनुज्ञेय चटई क्षेत्र (5X6) | 27184.76 |
| 8 | माहिती तंत्रज्ञान, मल्टीप्लेक्स दुकाने इत्यादी इमारतींकरीता क्षेत्रफळ | 19880.75 |
| 9 | पुनर्वसन विकास कार्यशाळा यांचे बांधकामाचे क्षेत्रफळ | 4859.65 |
| 10 | दुकानांचे पुर्नवसन करीता प्रस्तावित बांधकाम क्षेत्रफळ | 1417.00 |
| 11 | प्रस्तावित एकंदर बांधकाम क्षेत्रफळ | 26157.40 |
| 12 | चटई क्षेत्राचा प्रस्तावित वापर | 1.96 |

सविस्तर प्रकल्प अहवालात वरील तपशिलात आवश्यकतेनुसार बदल होवू शकतो.

## 5) प्रस्तावित योजनेतील प्रमुख घटक

21 वे शतक हे माहितीचे व संगणकाचे युग असल्यामुळे व्यापार व्यवसायाला माहिती तंत्रज्ञानाची जोड देणे अनिवार्य झाले आहे. उद्योग व व्यवसायाच्या वाढीसाठी राज्य सरकारने अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले असून सदर निर्णयांचा लाभ उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उद्योजकांना मिळावा याचा विचार करून योजना तयार करण्यात आली आहे. तसेच ही योजना राबवितांना सदर भुखंडावरील रहिवाशांचे हित लक्षात घेऊन त्यांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करणे प्रस्तावित आहे. स्थापत्य सल्लागारांनी तयार केलेल्या योजनेतील प्रमुख घटक खालील प्रमाणे आहेत.

अ) माहिती व तंत्रज्ञान उद्योग संकूल
ब) मल्टिप्लेक्स पाच पडदयांचे सिनेमागृहे,
क) कौटुंबिक मनोरंजन केंद्र व किओस्क शॉपिंग
ड) वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अतंर्गत झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन
इ) दुकानांचे पुर्नवसन
ई) वाहनतळ व इतर सेवा

## i) माहिती तंत्रज्ञान संकूल

उल्हासनगर शहरातील प्रतीवर्ष व्यापारी उलाढाल सुमारे रू 6,000 कोटी इतकी आहे. यात प्रामुख्याने इलेक्ट्रीकल्स व इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, रेडिमेड गारमेंन्टस व फर्निचर व कन्फेक्सनरी इत्यादी वस्तुंची निर्मिती व विक्री केली जाते. शहरातील काही उद्योजक परदेशात आपल्या वस्तू निर्यात करतात. परंतू येथे उच्च दर्जाच्या पायाभुत सुविधा नसल्यामुळे उद्योजकांना आपल्या मालाचा योग्य दर्जा व गुणवत्ता राखता येत नाही. त्यामुळे येथील व्यापार व उद्योगाला माहिती तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यास येथील व्यापार व उद्योगाची भरभराट होवून परदेशी बाजारपेठ मिळण्याची शक्यता आहे.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योगधंद्यांसाठी शासनाने शासननिर्णय क्र. आय.टी.पी. -2003/सी.आर.-3311/आय.एन.डी-7 नुसार धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार महानगरपालिका हद्दीमध्ये या क्षेत्रातील उद्योगधंदयांना कर व चटई क्षेत्र निर्देशांकामध्ये खालील सवलती दिलेल्या आहेत.

अ) माहिती तंत्रज्ञान उद्योगाकरीता आवश्यक असलेला कच्चा माल व भांडवली साहित्य यावर जकात करापासून सुट.

ब) माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी बांधण्यात येणा-या सर्व इमारती / मिळकतींवर मालमत्ता कर रहिवास दराने भरण्याची सुट.

क) माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी अतिरिक्त 100 % चटई क्षेत्र अनुज्ञेय आहे.

ड) नोंदणी शुल्कात 100% सुट

इ) विक्री करात सवलती

शासनाच्या माहिती तंत्राज्ञान उद्योगाला प्रोत्साहन देण्याच्या वरील धोरणाचा लाभ घेवून माहिती तंत्रज्ञान संकूल उभारणे प्रस्तावित आहे.

विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार चटई क्षेत्र निर्देशांक 1 अनुज्ञेय आहे. शासनाच्या धोरणानुसार माहिती तंत्रज्ञान उद्योगाचे इमारतींकरीता 100% अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक मिळणे शक्य आहे. त्यानुसार एस.टी.पी.आय.शी नोंदणी करून चटई क्षेत्र निर्देशांक 2 पर्यंत उपलब्ध करून घेण्याकरीता वेगळा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

### <u>ii) मनोरंजन केंद्र</u>

उल्हासनगर शहरात सध्या ९ सिनेमागृहे असून त्यांची आसन क्षमता ८७०३ इतकी आहे. तथापी शहरातील नागरिकांना मनोरंजनासाठी अत्याधुनिक सुविधांनी युक्त असे मनोरंजन केंद्र येथे उपलब्ध नाही. उल्हासनगर शहर हे व्यापारी केंद्र असल्यामुळे तेथे बाहेरून येणा—या प्रवाशांची संख्या देखील जास्त आहे. त्यांनाही मनोरंजनासाठी अत्याधुनिक सुविधा असलेल्या मनोरंजन केंद्राची आवश्यकता भासते. शासनाच्याा धोरणानुसार थिएटर उद्योगामध्ये ४ पेक्षा जास्त पडद्यांचे थिएटर एका ठिकाणी असल्यास करमणूक करामध्ये सुट मिळते. राज्यातील मुंबई—पुणे व ठाणेसारख्या महानगरांमध्ये मल्टीप्लेक्स थिएटर सुरू झाल्यानंतर त्याला प्रेक्षककांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. उल्हासनगर शहरातील नागरिक त्याकडे आकर्षित होवून मनोरंजनासाठी मुंबई व ठाणे येथे जात आहे. सदर सुविधा त्यांना उल्हासनगर शहरातच प्राप्त झाल्यास नागरिकांच्या वेळेची व पैशांची बचत होईल व शहरातील पैसा शहरातच राहील्यामुळे अर्थव्यवस्था देखील मजबुत होईल.

सदर बाब लक्षात घेवून या संकूलामध्ये पाच पडदयांचे सिनेमागृह प्रस्तावित केले आहेत. यामध्ये दोन सिनेमागृहे प्रत्येकी 168 आसनांचे (200 चौ.मी. क्षेत्रफळ), दोन सिनेमागृहे प्रत्येकी 144 आसनांचे (176 चौ.मी.क्षेत्रफळ), आणि एक सिनेमागृह 180 आसनाचे(245 चौ. मी.क्षेत्रफळ) प्रस्तावित आहे. त्याशिवाय या ठिकाणी कौटुंबिक मनोरंजन केंद्रे, खादय पदार्थ केंद्रे असणार आहेत.

### <u>iii) वाहनतळ</u>

सदर भूखंड रेल्वे स्टेशन समोर असल्यामुळे व प्रामुख्याने वाहनतळ व व्यापारी संकुलासाठी राखीव असल्यामुळे तेथे वाहनतळ बांधणे प्रस्तावित आहे. त्यासाठी तेथील वाहतुकीचे सर्वेक्षण

करण्यात आले असून दुचाकी, तीनचाकी, व चारचाकी वाहनांसांठी भविष्यातील गरज लक्षात घेवुन संकुलामध्ये तळघर व निम्नस्तरीय तळमजला या ठिकाणी 2940.90 चौ. मी. क्षेत्रफळ वाहनतळ बांधणे प्रस्तावित आहे.

## iv) प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन

केंद्र शासनाच्या वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अतंर्गत नागरी भागातील झोपडपट्टीवासियांचे जीवन मान उंचविण्याकरीता शासन निर्णय क्र.एच.एस.जी 2002/प्र.क्र. ४/गृविध्मे–1 दिनांक 19/9/2001 अन्वये दिनांक 1/1/1995 पुर्वीच्या झोपडीधारकास 225 चौ. फुट क्षेत्रफळाचे घर बांधण्याकरीता रू. 40,000/- इतके अर्थिक सहाय्य शासनाकडून उपलब्ध होऊ शकते. ही योजना ज्या जागेवरील झोपडपट्टीकरीता राबविण्यात येते त्या जागेचे आरक्षण व विकास विनियम शिथिल करण्याची सवलत शासनाने जाहीर केलेली आहे. या सवलतीचा तसेच शासनाकडून उपलब्ध होणा-या अनुदानातून प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे प्रस्तावि आहे.

आरक्षण क्रमांक 142 व 189 या आरक्षीत भुखंडावर गुलशनगर ही 1/1/1995 पूर्वीची झोपडपट्टी आहे. या झोपडपट्टीमध्ये एकंदर 111 निवासी घरे आहेत. यातील पात्र लाभार्थ्यांना वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत 21 चौ.मी.(225 चौ फुट) क्षेत्रफळाची घरे बांधून देणे प्रस्तावित आहे. प्रत्येक लाभार्थ्यासाठी रू 40,000/-पर्यंत अर्थसहाय्य शासनाकडून उपलब्ध होवू शकते. उर्वरित खर्च विकासकाने करावा असे प्रस्तावित आहे.

गुलशननगर येथील पात्र लाभार्थ्यांबरोबरच महानगरपालिकेच्या इतर आरक्षीत भुखंडावरील अतिक्रमण धारकांचे पुनर्वसन करता येणे शक्य व्हावे म्हणून 225 चौ. फुटाच्या एकूण 140 सदनिकांचे बांधकाम करणे या प्रकल्पा अंतर्गत प्रस्तावित केले आहे.

### अ) दुकान गाळे धारकांचे पुनर्वसन

सदर भुखंडावर एकूण 79 दुकाने आहेत. आरक्षीत भुखंडापैकी काही जमिन खाजगी मालकीची असून या जमिनीची सनद उप-विभागीय अधिकारी यांनी संबंधीतांना दिलेली आहे. सदर भुखंड आरक्षीत असल्यामुळे संबंधीत जमिन मालक या भुखंडाचा विकास करू शकत नाही. तथापी त्यांनी या भुखंडावर अनधिकृत इमारती बांधून त्याचा वाणिज्य वापर सुरू केलेला आहे. सदर वाणिज्य वापराखालील बांधकामे निष्कासित करून खाजगी जमिन संपादित करणे व तिचा विकास आराखडयातील प्रयोजनासाठी वापर करण्यासाठी महानगरपालिका सक्षम आहे. सबब ज्या जमिन मालकांकडे जमिनीची सनद आहे अशा जमिन मालकांशी चर्चा करून त्यांना आर्थिक मोबदला देवून अथवा त्यांचे प्रस्तावित व्यापारी संकूलामध्ये दुकान गाळा देवून पुनर्वसन करणे शक्य आहे. संपादित करावयाच्या जमिनीचा मोबदला व दुकान गाळयाची किंमत लक्षात घेवून सदर व्यापारी गाळे धारकांचे पुनर्वसन करता येईल. तसेच ज्या गाळे धारकांकडे जमिनीची सनद नाही परंतु गेल्या कित्येक वर्षापासून सदर गाळे धारक तेथे व्यवसाय करत आहे अशा सर्व दुकानधारकांकडून जमिनीची किंमत, बांधकाम खर्च व नाममात्र नफा घेऊन त्यांचे पूनर्वसन करणे शक्य आहे. पुनर्वसन करण्यात येत असलेल्या दुकानदारांना प्रति लाभार्थी 9.3 चौ.मी. क्षेत्रफळाचा गाळा देणे प्रस्तावित आहे. रहिवास व दुकान असे संयुक्त वापर असलेल्या गाळयांना 30.30 चौ.मी.ची जागा देणे प्रस्तावित आहे.

प्रस्तावित योजने अंतर्गत एकूण 1417 चौ. मी. क्षेत्रफळाच्या 86 दुकान गाळयांमध्ये 79 विस्थापितांचे पुनर्वसन केल्यानंतर उर्वरित गाळे इतर ठिकाणच्या रस्ते रूंदीकरणामध्ये अथवा विकास कामामुळे बाधित होणा-या दुकानदारांचे पुनर्वसन करण्याकरिता महानगरपालिकेला उपलब्ध होवू शकतील.

**vi) आस्तित्वातील उर्दु शाळेची पुर्नउभारणी**

सदर आरक्षीत भुखंडावर डॉ. झाकीर हूसेन उर्दू शाळा असुन उल्हासनगर शहरातील ही एकमेव उर्दू माघ्यमाची शाळा आहे. या शाळेत सुमारे 584 विदयार्थी शिक्षण घेत आहेत. आरक्षीत भुखंडावरील निवासी अतिक्रमण धारकांचे पुनर्वसन करण्याबाबत राज्य शासनाचे निश्चित असे धोरण आहे. तथापी आरक्षीत भुखंडावरील इतर अतिक्रमण व अनधिकृत बांधकामांच्या पुनर्वसनाबाबत कोणतेही धोरण नाही. तथापी उल्हासनगर शहरात 20 वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून उर्दु माध्यमातील विदयार्थ्यांना ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत असलेल्या व अल्प संख्यांक समाजाच्या विदयार्थ्यांच्या शिक्षणासाठी कार्यरत असलेल्या या शाळेच्या पुर्नउभारणी बाबत महानगरपालिकेने सहाभुतीपुर्वक विचार करणे आवश्यक आहे असे वाटते. त्यामुळे प्रकल्पापैकीच्या सोयीसुविधा कारणासाठी प्रस्तावित जागेत शाळेची इमारत बांधून महानगरपालिका ठरवेल त्या कालावधीकरीता नाममात्र भाडेतत्वाने संस्थेस देणे अथवा संस्था बांधकाम खर्च करण्यास तयार असल्यास त्यांना कायम स्वरूपी जागा काही अटी शर्तीवर देवूनही पुर्नउभारणी करणे अथवा विकास आराखडयातील प्राथमिक शाळेसाठी राखीव असलेल्या इतर भुखंडावर पुर्नउभारणी करणे शक्य आहे. तथापी याबाबतचा निर्णय महानगरपालिकेने घ्यावा.

6) प्रस्तावित असलेल्या विकास कामांवरील अपेक्षीत खर्चाचा तपशिल

स्थापत्य सल्लागाराने तयार केलेल्या प्रस्तावित विकास कामासाठी अंदाजे रू. 48 कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर योजना ढोबळ स्वरूपाची असून अपेक्षीत खर्चात वाढ अथवा घट होण्याची शक्यता आहे.

7) उक्त प्रकल्पामधुन प्राप्त होणारे उत्पन्न.

महानगरपालिकेमध्ये निहीत आरक्षीत भुखंडांचा विकास करतांना नागरिकांना पायाभुत सुविधा पुरविण्याबरोबरच महानगरपालिकांच्या उत्पन्नाचे स्त्रोत बळकट करणे अपेक्षीत असते. हा उद्देश लक्षात घेवून सदर योजना तयार करण्यात आली असून प्राथमिक अंदाजानुसार सदर योजनेतून महानगरपालिकेस अंदाजे 8 ते 10 कोटी रूपयांचा महसूल प्राप्त होवू शकेल. त्याशिवाय या प्रकल्पामधुन महानगरपालिकेस

अ) मालमत्ता करापोटी मिळणारे उत्पन्न
ब) संकुलामध्ये होणा-या व्यापारामुळे महानगरपालिकेस मिळणारे जकात उत्पन्न
क) संकुलास होणा-या पाणी पुरवठा मधुन मिळणारे उत्पन्न
ड) संकुलामध्ये प्रस्तावित असलेल्या वाहनतळापासुन मिळणारे उत्पन्न इत्यादी माध्यमातून नियमित महुसल प्राप्त होवू शकेल.

8) रोजगाराची संधी

स्थानिक स्वराज्य संस्था हया नागरिकांना मुलभुत सुविधा पुरविणा-या संस्था आहेत. हा प्रचलित समज असून त्यात आता बदल होण्याची आवश्यकता आहे. नागरिकांना पाणी पुरवठा, सार्वजनिक स्वच्छता, रस्ते, पथदिवे इत्यादी पायाभुत सुविधा पुरविण्याबरोबरच नागरिकांच्या आर्थिक व सामाजिक स्तर उंचविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या क्षेत्रात व्यापार व उद्योगाच्या वाढीसाठी पोषक वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. कारण व्यापार व उद्योगाच्या निकोप वाढीमुळे शहरात रोजगाराच्या विविध संधी निर्माण होवून ते शहर आर्थिक विकासाचे केंद्र (Growth Center) बनू शकते. उल्हासनगर शहर हे मुळातच व्यापारी केंद्र असुन येथे व्यवसायाच्या अनेक संधी निर्माण होवू शकतात. सदर बाब लक्षात घेवून प्रस्तावित योजना तयार करण्यात आलेली आहे. या योजनेद्वारे सुमारे 3000 व्यक्तिंना प्रत्यक्ष रोजगार व सुमारे 15000 व्यक्तिंना अप्रत्यक्ष रोजगाराची संधी उपलब्ध होईल.

## 9) आरक्षीत भुखंडाच्या विकासासाठीचे महापालिकेसमोरील पर्याय.

**पर्याय क्रमांक 1:-** महानगरपालिकेने स्वत:च्या निधीमधून (Self funding) खर्च करून... पार्कींग, दुकाने, वाणिज्य गाळे, माहिती तंत्रज्ञान गाळे, मल्टीप्लेक्स भाडयाने देणे / विक्री करणे

**पर्याय क्रमांक 2:-** कालांतराने देयक अदा करणे (Deferred Payment Scheme) वित्तीय क्षमता असलेल्या इच्छुकांकडून देकार मागवून त्यास योजनेतून प्रत्यक्ष उत्पन्न उपलब्ध झाल्यावर कामाच्या खर्चाची रक्कम निश्चित केलेल्या वेळेत अदा करणे.

**पर्याय क्रमांक 3:-** ''बांधा,वापरा, व हस्तांतरीत करा'';Build, Operate and Transfer) तत्वावर विकास करणे विकासकाकडून दरसाल मोबदला घेवून 30 वर्षाकरिता अथवा विहीत कालावधीकरीता वापराचे हक्क देवून विहित मुदतीनंतर मालमत्ता महानगरपालिकेस नाममात्र किंमतीवर हस्तांतरीत करणे.

**पर्याय क्रमांक 4:-** संयुक्त उपक्रम (Joint Venture) तत्वाद्वारे विकासहक्क देवून यात विकासकास जमिन उपलब्ध करून देवून विकासकाच्या आर्थिक भांडवलाद्वारे सद्याच्या रहिवाशांचे व दुकानदारांचे पुनर्वसनाकरिता क्षेत्र, वाहनतळ, शाळा इत्यादीसाठी आवश्यक क्षेत्र वगळून उर्वरित उपलब्ध होणा-या जागेतील गाळे, मल्टीप्लेक्स थिएटर, व्यापारी संकूल / माहिती तंत्रज्ञान संकुलातील गाळे, यांची विक्री करण्याचे अधिकार देवून विकासकास होण-या नफ्यापैकी काही नफा महापालिकेस देणे.

## 10) महानगरपालिकेची आर्थिक स्थिती-मत्ता व दायीत्व

**वर्ष 2003-2004 मध्ये प्राप्त झालेल्या एकूण उत्पन्न व खर्चाचा तपशिल पुढील प्रमाणे.**

| | | उत्पन्न (आकडे रू. हजारांमध्ये) | खर्च (आकडे रू. हजारांमध्ये) |
|---|---|---|---|
| 1) | महसुल | 903718 | 761788 |
| 2) | भांडवली | 67014 | 181635 |
| 3) | असाधारण लेखे | 76070 | 71075 |
| | एकूण:- | 10,46,802 | 1014498 |

महानगरपालिकेचे महसुली उत्पन्न फक्त रूपये ९0 कोटी असून सदर उत्पन्नातून ८0% खर्च महसुली स्वरूपाच्या कामावर व उर्वरित 20% खर्च भांडवली स्वरूपाच्या कामावर केला जातो.

उल्हासनगर शहरात विकास कामाच्या विविध योजना राबविणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP), हुडको (Hudco), एम. एम. आर. डी. ए. (MMRDA) यासारख्या वित्तीय संस्थांकडून महानगरपालिकेने एकूण 50 कोटी रूपये कर्ज रूपाने उभारलेले आहे. सदर कर्जाची व्याजासह परतफेड सुरू असुन ती येत्या 10 ते 15 वर्षात करावयाची आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) चे थकीत 34 कोटी रूपये पुढील 10 वर्षात परतफेड करावयाचे आहे.

यावरून महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती समाधानकारक आहे असे म्हणता येत नाही.

**11) प्रशासनाचा प्रस्ताव**

महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता, उपलब्ध पर्यायापैकी पर्याय **क्रमांक 4 हा स्विकारार्ह वाटतो याची कारण मिमांसा खालील प्रमाणे आहे.**

पर्याय क्रमांक १ महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता कर्ज उभारणी करणे किंवा अर्थसहाय्य घेऊन अथवा स्वत:च्या निधीतून प्रस्तावित विकास करणे शक्य नाही. तसेच महानगरपालिकेस इतर कोणतीही वित्तीय संस्था कर्ज रूपाने निधी उपलब्ध करून देईल अशी शक्यता दिसत नाही.

पर्याय क्रमांक 2: या पर्याया अंतर्गत इतक्या मोठया प्रमाणात आर्थिक गुंतवणूक करण्यास खाजगी उद्योजक तयार होणार नाही. तसेच यातील गाळयांची विक्रीची जबाबदारी महापालिकेवर येईल व त्यामध्ये विक्रीची जोखीम महागनरपालिकेस घ्यावी लागेल. महानगरपालिकेने उभारलेली यापूर्वीची व्यापारी संकुले पहाता ही जोखीम स्विकारणे योग्य वाटत नाही.

पर्याय क्रमांक 3 प्रथमत: 30 वर्षाच्या मर्यादित कालावधीमुळे खाजगी उद्योजक या पर्यायासाठी पुढे येण्याची शक्यता कमी आहे. तसेच महानगरपालिकेस मिळणारे उत्पन्न हे 30 वर्षाच्या कालावधीत

उपलब्ध होईल व त्याचा सध्याच्या तातडीच्या आर्थिक गरजासांठी उपयोग होणार नाही.

पर्याय क्रमांक 4 या पर्यायातून संयुक्त उपक्रमांतर्गत जमिन या महापालिकेच्या भांडवलाशिवाय इतर कोणताही खर्च अथवा जोखीम न घेता निश्चित स्वरूपाचे ठोक उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

स्थापत्य सल्लागांनी सादर केलेल्या अहवालाची तांत्रीक छाननी शहर अभियंता यांनी केली असून सदर प्रस्ताव तांत्रीक दृष्टया योग्य आहे. तसेच सदर प्रस्तावावर नगररचनाकार यांचे अभिप्राय घेण्यात आले असून प्रस्तावित विकास, विकास आराखडयातील तरतुदीनुसार व विकास नियंत्रण नियमावतील तरतूदीनुसार अनुज्ञेय आहे.

सबब महापालिकेचे हित व आर्थिक स्थिती पहाता खालील बाबींवर निर्णय होण्यासाठी सदर प्रस्ताव प्रकल्प अहवालासह महानगरपालिकेच्या पटलावर ठेवण्यात यावा.

अ) प्रकल्पासाठी खाजगी / शासकीय जमीन संपादन करणे.
ब) आरक्षणात किरकोळ फेरबदल करणे.
क) विकासहक्क देवून विकासकामार्फत संयुक्त उपक्रमाद्वारे आरक्षीत जमिनीचा विकास करणे.:

विशेष महासभा ठराव क्र. ५३ दिनांक:—२०.१.२००५

सुचकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार शहाड स्टेशन जवळील उल्हासनगर शहराचे मंजुर विकास आराखडयातील आरक्षण क्र. १४२ व १८९ चे जमिनीचे महापालिकेने विकास हक्क देवून संयुक्त उपक्रम (Joint Venture) तत्वाव्दारे विकास करण्याकामी प्रशासनाचा प्रस्ताव जसा आहे तसा मान्य करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:—विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विषय :- महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37

अन्वये मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. 142 व 189 या जागेवरील आरक्षणात किरकोळ फेरफार करणेस मान्यता देणे.

आरक्षण बदलाचा हा प्रस्ताव आहे. वरील प्रस्तावाशीच हा प्रस्ताव संबंधित आहे. यासाठी आरक्षण बदलावे लागेल.

काही सदस्य:—पास. पास.

मा. महापौर:—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर व श्री. अनिल जयसिंघानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

विषय :- महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. 142 व 189 या जागेवरील आरक्षणात किरकोळ फेरफार करणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना :-**

शहराचे मंजुर विकास आराखडयात आ. क्र. 142, दुकान केंद्र (क्षेत्र 4900 चौ. मी.) व आ. क्र. 189 (पार्किंग, क्षेत्र 6500 चौ.मी) या उपयोगासाठी आरक्षित आहे. या क्षेत्राप्रमाणे जागा प्रशासक, उल्हासनगर यांनी न. पा. चे ताब्यात दिलेली आहे. एम.एम.आर.डी. ए. ने. तयार करून प्रसिध्द करणेस आलेल्या प्रारूप विकास आराखडयात आरक्षण क्र. 5 (परिवहन सुविधा क्षेत्र 0. 50)व आरक्षण क्र. 6 (मनोरंजनासाठी खुली क्षेत्र 0. 5) व आरक्षण क्र. 7 (बाजार व व्यापार संकुल) क्षेत्र 0. 75 हे याप्रमाणे दर्शविली आहे. सदर जागेवर सध्या रहिवासी, वाणिज्य व शैक्षणिक बांधकामे आहेत. त्या जागेवरील शाळा, दुकाने, रहिवास, पुर्नवसनाशिवाय प्रकल्पाची अंमलबजावणी करणे शक्य नाही. त्यामुळे आरक्षण प्रस्तावात बदल करणे गरजेचे आहे. प्रस्तावातील जागेच्या हद्दीत क्षेत्र प्रारूप आराखडयाप्रमाणे असुन त्याप्रमाणे आरक्षणाचे हद्दीत व क्षेत्रात बदल करणे आवश्यक आहे.

प्रस्तावाप्रमाणे जागेचा वापर करावयाचा असल्यास यासाठी मंजुर विकास आरखडयातील आरक्षण क्र. 142 व 189 यांचे उपयोगात, हद्दीत व क्षेत्रात व वापरात बदल करून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार किरकोळ फेरबदलासंबंधी कार्यवाही करून त्यास मान्यता घ्यावी लागेल. यासाठी खालीलप्रमाणे किरकोळ फेरबदल आराखडयात करणे आवश्यक आहे.

| मंजुर विकास आराखडयाप्रमाणे | प्रस्तावित किरकोळ फेरबदलाप्रमाणे |
|---|---|
| आ. क्र. 189 'वाहनतळ' क्षेत्र 0 . 65 हेक्टर | आरक्षणाचे उपयोगात वाहनतळ ऐवजी बाधितांचे घरासाठी शाळेसह असा व आरक्षणाचे हद्दीत नकाशात दर्शविल्याप्रमाणे बदल करून क्षेत्रात बदल करणे.<br>आ. क्र. 189 बाधितांचे घरासाठी (क्षेत्र 2650 चौ.मी) |
| आ. क्र. 142, दुकान केंद्र क्षेत्र 0. 49 | आरक्षणाचे क्षेत्र हद्दीत बदल करून |

| | |
|---|---|
| हेक्टर | उपयोगात खालीलप्रमाणे बदल करणे.<br>आ. क्र. 142 ' वाहनतळासह वाणिज्य व मनोरंजन सुविधा' (क्षेत्र 14850 चौ.मी) |

यप्रमाणे किरकोळ फेरबदल कार्यवाही करण्यासाठी व आयुक्तांना याकामी प्राधिकृत करण्यासाठी सदर प्रस्ताव महासभेपुढे मंजुरीसाठी ठेवण्यात येत आहे.

विशेष महासभा ठराव क्र. ५४ दिनांक:—२०.१.२००५

सुचकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कायदयांच्या पुर्ततेच्या अधिन राहुन उल्हासनगर शहराचे मंजुर विकास आराखडयातील आरक्षण क्र. १४२ व १८९ चे जमिनीवरील आरक्षणात, उपयोगात, हद्दीत, क्षेत्रात व वापरात व प्रारूप विकास आराखडयातील अपेक्षित आरक्षणात बदल करण्याकरिता सदरहु जागा प्रशासनातर्फे प्रस्तावित शाळा, दुकाने, रहिवास, माहिती व तंत्रज्ञान उद्योग संकुल, मल्टिप्लेक्स पाच पडदयांचे सिनेमागृह, कौटुंबिक मनोरंजन केंन्द्र व किओस्क शॉपिंग, वाल्मीकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन, दुकानदारांचे पुनर्वसन, वाहनतळ व इतर एकात्मिक विकास प्रकल्पाकामी आरक्षणात फेरबदलाचे प्रस्ताव मान्य करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५. ४० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—८/४/२००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ८/४/२००५
विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शुक्रवार दिनांक ८.४.२००५ सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा.महापौर :— श्रीमती ज्योती कालानी
२) मा. उपमहापौर :— श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३१. | श्री. रमेश चव्हाण |
| ४. | श्री. टेकचंदानी राजु | ३२. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ५. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३३. | श्री. जाधव सुरेश |
| ६. | श्रीमती मोकल सीमा | ३४. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ७. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ३५. | श्री. देवेंद्रसिंह खेमाणी |
| ८. | श्री. एडके गणपत गोविंद | ३६. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ९. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३७. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १०. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ३८. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ३९. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १२. | श्री. यादव लालबिहारी बुझारत (तुझारत) | ४०. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १३ | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४१ | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १४. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४२. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १५. | श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र | ४३. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १६. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४४. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १७. | श्री. नाना पवार | ४५. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १८. | श्री. जग्याशी राजु | ४६. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| १९. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ४७ | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २०. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ४८. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २१. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ४९. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २२. | श्रीमती सोनेजी मिना | ५०. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २३. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५१. | श्री. बेहरानी मोहन |
| २४. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, | ५२. | श्रीमती मालती करोतिया |
| २५. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ५३. | श्रीमती मिनु राज दासानी |
| २६. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५४. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २७. | श्री. सतरामदास जेसवानी | ५५. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २८. | श्री. लुंड गोविंदराम | ५६. | श्री. माखिजा हरदास |
| २९. | श्रीमती भावना रवी खिलनानी | ५७. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३०. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ५८. | श्री. राजेश वदारिया |

तर,

मा. सदस्य / सदस्या १. श्रीमती. संगिता रमेश जावळे, २. श्री. सोनवणे नथु काशिराम, ३. श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे, ४. श्री. वाघे शामु बाबु, ५. श्री. दिलीप गायकवाड, ६. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, ७. श्रीमती. आहुजा निता प्रकाश, ८. श्री. शांताराम निकम, ९. श्री. मोहन साधवानी, १०. श्रीमती जया साधवानी, ११. श्री. राज असरोंडकर, १२. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण, १३. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास, १४. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, १५. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, १६. श्री. चौधरी राजेंद्र शांताराम, १७. श्रीमती. भटीजा

कोमल अमृत, १८. श्री. जयसिंघानी अनिल, १९. श्री. रामरख्यानी मोहनदास , २०. श्रीमती किरण लखी माखिजा, २१. डॉ. निना प्रकाश नाथानी, २२. श्री. संजय बठिजा, २३. श्री. ठाकुर बेहरानी हे सभेस अनुपस्थित होते.

वंदेमातरम म्हणून सायंकाळी ४.३५ वाजता सभेची सुरुवात करण्यात आली.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—**मा. महापौरजी, नुकतेच उल्हासनगरचे व्यापारी एकता मंडळाचे अध्यक्ष श्री. श्रीचंद रोहरा यांचे निधन झाले आहे. तर आम्हांला असे वाटते की, त्यांना येथे श्रध्दांजली अर्पित केली जावी

**मा. महापौर :—** पोप जॉन पॉल यांचे देखिल निधन झाले आहे. त्यांना देखील श्रध्दांजली अर्पित करण्यात येत आहे.

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

**शोक प्रस्ताव :—**

अब्जावधी कॅथलिकपंथीय ख्रिस्ती धर्मियांचे सर्वोच्च श्रध्दास्थान असलेले पोप जॉन पॉल (द्वितीय) यांचे दिनांक २/४/२००५ रोजी निधन झाले आहे. पोप यांनी केलेली समाजबांधणी मानवतेवर आधारीत होती तसेच ते शांततेचे पुरस्कर्तेही होते.

तसेच उल्हासनगरचे व्यापारी एकता मंडळाचे अध्यक्ष श्री. श्रीचंद रोहरा यांचे देखिल नुकतेच निधन झाले आहे.

वर उल्लेखिलेल्या मृतात्म्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ९३ अ (१)** **दिनांक:—८.४.२००५.**

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार ख्रिश्चन धर्मगुरु पोप जॉन पॉल (द्वितीय) व श्रीचंद रोहरा यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—** मा. महापौरजी, सभागृहाचे कामकाज सुरु करण्यापूर्वी या शहराचे आयुक्त, कार्यक्षम अधिकारी श्री. आर.के. सोनवणे यांची उल्हासनगर महापालिकेत तीन वर्षासाठी पुर्ण वेळ आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे. यासाठी महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख व सर्व कॅबिनेट, नगरविकास विभागाचे सचिव यांचे देखिल मी अभिनंदन करतो. मी एका गोष्टीचा खास उल्लेख करु इच्छितो की, आयुक्तांच्या नियुक्तीचे जे पत्र आले आहे त्यामध्ये एक खास ओळ लिहिण्यात आली आहे की, उल्हासनगरचे प्रभारी आयुक्त यांना नियमित आयुक्त या पदावर नेमण्याचे एक खास कारण आहे की, मागील अडीच ते तीन वर्षाच्या त्यांच्या उल्हासनगरमधील कार्यकालावधीत त्यांचे काम समाधानकारक आहे. या गोष्टीचा मी अजुन एक पुरावा देवू इच्छितो की, हा नियुक्तीचा आदेश जारी होण्यापूर्वी उल्हासनगरमधील समस्यांबाबत मंत्रालयात एक बैठक झाली होती. त्यावेळी मा. मुख्यमंत्री महोदयांनी आयुक्त साहेबांची जी स्तुती केली होती त्याचा देखील मी येथे उल्लेख करु इच्छितो. जे मी स्वत: ऐकले आहे व पाहिले आहे. मा. मुख्यमंत्री यांनी उल्हासनगरच्या आयुक्तांची स्तुती करतांना सांगितले की, त्यांनी उल्हासनगर येथे जावून नागरीक सुविधा केंद्रासारखी जी सुविधा दिली आहे, ती महाराष्ट्रातील इतर महापालिकांनी देखील अंगिकारायला पाहिजे. अशी क्षमता असणारा अधिकारी आपल्या येथे आयुक्त म्हणून आहे. मी मागील बैठकीत देखील बोललो होतो की, आपण वर्तमानपत्रात जी मुलाखत दिली आहे की, मी येथून बदली करु इच्छितो. तर आपण असा विचार देखील करु नये. आमचे सरकार आहे आम्ही सरकारला समजावु. शेवटी आमचे आमदार व मा. महापौर हे सरकारला समजावण्यात यशस्वी ठरले. आज या शहरासाठी ही सौभाग्याची बाब आहे की, त्यांना श्री सोनवणे यांच्या सारखा कार्यक्षम अधिकारी आयुक्त म्हणुन प्राप्त झाला आहे. मला आशा आहे की,त्यांच्या येत्या तीन वर्षाच्या कार्यकालावधीत ते उल्हासनगर शहरामध्ये नक्कीच चांगले काम करुन दाखवतील व शहराचे विकास कार्य जोमाने करतील. दुसरे म्हणजे भारतीय मानक संघाकडुन महापालिकेच्या सचिव कार्यालयास आयएसओ ९००१:२००० हे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. यासाठी मी आमचे सचिव श्री प्रकाश कुकरेजा यांचे देखिल अभिनंदन करतो. मला असे वाटते की, देशातील ही पहिली महापालिका असेल जीच्या महापालिका सचिव कार्यालयास असे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. अशाप्रकारे सचिव कार्यालयास हे प्रमाणपत्र देण्याचा प्रघात नाही परंतु ही उल्हासनगरच्या महापालिका सचिवांची क्षमता आहे, याबद्दल मी त्यांची सार्वजनिक ठिकाणी देखिल प्रशंसा केलेली आहे. ते महापालिका सचिव म्हणून एक उत्कृष्ट अधिकारी आहेत. आज मी सभागृहात देखील बोलतो की, जेव्हापासून त्यांनी महापालिका सचिव म्हणून काम हाती घेतले आहे, मागील सहा—सात वर्षापासून. मला असे वाटते की, १९९६ पासून महापालिका अस्तित्वात आली आहे. तेव्हा पासून ते हे काम बघत आहे. यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत ज्या महासभा झाल्या आहेत, त्या हाताळण्यामध्ये यांनी जी भुमिका बजावली आहे, मला असे वाटते की, कुणीही अधिकारी असे काम करु शकत नाही. महापालिका सचिव यांच्या कार्यालयाचे काय काम असते हे मी सभागृहाला थोडक्यात सांगु इच्छितो. महापालिकेच्या बैठकांचे आयोजन हे व्यवस्थित व शिस्तबध्दरित्या करणे तसेच सभागृहाचा गौरव व औचित्य राखणे.सभागृहातील वादविवाद, चर्चा या विधायक कामांसाठी व सभा सूचनेबरहुकूम होतील याची काळजी घेणे. महापालिकेची प्रतिमा व विश्वसनियता वाढविणे. संविधानीक व नियमातील तरतुदींची पुर्तता करणे. जनतेच्या पुर्ण समाधानासाठी गुणवत्ता व्यवस्थापन धोरणात सातत्याने परिणामकारक सुधारणा करणे. मी असे मानतो की, यामध्ये ज्या काही सुचना आहेत, या सर्व सुचनांची पुर्तता करण्यात श्री. प्रकाश कुकरेजा हे १०० टक्के यशस्वी ठरले आहेत असे मला वाटते. आपल्या महापालिकेला महापालिका सचिव म्हणून असा अधिकारी लाभला आहे हे आपले सौभाग्य आहे. मला असे वाटते की, आपल्या महापालिकेतील जे दुसरे अधिकारी आहेत त्यांनी आमचे आयुक्त श्री. आर.के. सोनवणे, महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा यांच्या पासुन धडा घेवून त्यांच्या मार्गावर चालल्यास उल्हासनगर महापालिकेबद्दल शहरातील जनतेला काही एक तक्रार राहणार नाही. धन्यवाद.

**मा. सदस्या श्रीमती मालती करोतीया हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—** मा. महापौरजी, आम्ही देखील भाजपा व शिवसेनेच्या वतीने आयुक्त व सचिवांचे अभिनंदन करतो व त्याचबरोबर दोन गोष्टी राहुन गेल्या, मी त्याची पुनरावृत्ती करत नाही. एक म्हणजे राजीव गांधी प्रशासकिय गतिमानता या संदर्भात देखील महापालिकेस पारीतोषिक प्राप्त झाले आहे. व दुसरे म्हणजे एमईडीए कडुन उर्जा बचत केल्याबाबत महापालिकेस क्रमांक दोनचे पारीतोषिक प्राप्त झाले आहे. याबद्दल देखील मी प्रशासनाचे व सर्वांचे अभिनंदन करतो. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :—** मा. महापौरजी, ४ तारखेला जी महासभा झाली होती त्या महासभेत मी आमचे महापौर व उपमहापौर व आयुक्त साहेबांना एक निवेदन केले होते की, माझ्या प्रभागात एके ठिकाणी जमिन बळकावण्याचा प्रयत्न सुरु होता. आज मला असे सांगतांना आनंद होत आहे की, मा. महापौरांच्या आदेशाप्रमाणे त्याच दिवशी आमचे आयुक्त साहेब यांनी फक्त ते कामच थांबविले नाही तर माझ्या सोबत तेथे येवून जे लोक

फलक लावत होते, ते फलक देखील काढुन टाकले. आज या महासभेत मी महापौर , उपमहापौर व आयुक्तांना धन्यवाद देतो.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> ३१ मार्चला येथे जी बैठक झाली होती ती १८ डिसेंबर रोजी स्थगित केलेली महासभा होती. ती महासभा मालमत्ता कराच्या दरवाढी विरोधात स्थगित केली होती. त्यावेळी मी बोललो होतो, एक सल्ला दिला होता तो मा. महापौरांनी स्विकारला होता. मी बोललो होतो की, हा जो ठराव रद्द होवून आला आहे, त्याच्या विरोधात आपण सरकारकडे अपिल करु शकतो. व दुसरा उपाय शोधु शकतो. हा सल्ला मा. महापौरांनी मान्य देखील केला होता. आता अशी माहिती मिळाली आहे की, या करवाढी विरोधात शहरातील काही नागरीक मुंबई उच्च न्यायालयात गेले आहेत. महापालिका त्यामध्ये प्रतिवादी आहे हे स्वाभाविक आहे. आपण सर्वांनी माझी सुचना मानली होती. आपण सर्व कर वाढीच्या विरोधात आहात, तर माझी अशी सूचना आहे की, त्यामध्ये महापालिका जी प्रतिवादी आहे, महापालिकेने यामध्ये करवाढीचा विरोध करण्यासाठी आपला वकील नेमायला हवा. ज्याने कर वाढीच्या विरोधात न्यायालयात बोलायला हवे. तर मला असे वाटते की, कर वाढीच्या विरोधात महापालिकेने एका वकिलाची नेमणूक करावी. महापौरजी मी खुलासा करतो की, कायदयात अशी तरतुद असते की, एक वादी असतो एक प्रतिवादी असतो. यामध्ये आयुक्त व महापालिका प्रतिवादी आहेत. तर या प्रकरणात आयुक्तांची भुमिका वेगळी असू शकते. आपण जे येथे महापालिका आहोत, आपली भुमिका वेगळी आहे. तर मला असे वाटते की, आपण तेथे कर वाढी विरोधात महापालिकेच्या वतीने लढायला हवे. ही माझी सुचना आहे. मागील वेळी आपण माझी सुचना मंजुर केली होती. म्हणून मी आपणांस येथे विनंती करीत आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u> मा. महापौरजी, मी आपणामार्फत यांच्याकडुन माहिती घेवू इच्छितो की, हे म्हणत आहे की, काही लोक मुंबई उच्च न्यायालयात गेले आहेत. त्यांनी जनहित याचिका दाखल केली आहे की, याचिका दाखल केली आहे?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> काहीही असले तरी महापालिका ही त्यामध्ये प्रतिवादी आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u> यामध्ये फरक आहे. जर आपण याचिका दाखल केली असेल, व निर्णय त्यांच्या बाजुने झाला तर त्याचा फायदा फक्त एकाच मालमत्तेला मिळेल. जर जनहित याचिका असेल तर सर्वांना फायदा मिळेल.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> मी वाचले आहे. ती जनहित याचिका आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u> आधी आपण पुर्ण माहिती घेवून या त्यानंतर बोला.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> जर आपण सर्व येथे खरोखर प्रमाणीक असू तर महापालिकेला कर वाढी विरोधात भुमिका घ्यावी लागेल. तसे नसेल तर गोष्ट वेगळी आहे. हवे असेल तर महापालिकेने या विरोधात जावे.

<u>मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u> मा. महापौरजी, माझ्या माहितीप्रमाणे ती एक याचिका आहे. ते सर्व एका माणसाच्या फायदयासाठी केले जात आहे. ही गोष्ट लक्षात घेतली जावी.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> मी ती याचिका वाचली आहे. त्यामध्ये संपुर्ण शहरातील कर वाढीला आव्हान दिले आहे.मी वाचली आहे म्हणून बोलत आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>याचिका स्वत:च्या फायदयासाठी केली जाते.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> तुम्हांला करायचे नसेल तर गोष्ट वेगळी आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> मा. महापौर महोदया, आपण येथे जर एकमताने कर वाढीच्या विराधात बोलत असु, तीन–तीन वेळा बैठक घेत असु, आणि श्री. लाल पंजाबी यावर एक साधा सरळ मार्ग सुचवत असतील तर त्यामध्ये काही हरकत नाही. मग ती याचिका असु दे अथवा जनहित याचिका असु दे.

मा. महापौर :–याचिका जी असते ती स्वत:च्या फायदयासाठी असते. जनहित याचिका ही जनतेच्या फायदयासाठी असते. तर श्री. राजेश वदारिया यांचे एवढेच म्हणणे आहे की, ती याचिका आहे की, जनहित याचिका आहे?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– ही जी याचिका आहे त्यामध्ये आयुक्तांच्या करवाढीच्या आदेशाला आव्हान देण्यात आले आहे. त्यांनी जी करवाढ केली आहे त्याला.

मा. महापौर :– दुसरे म्हणजे आयुक्तांनी आपला ठराव शासनाकडुन विखंडीत करुन आणला आहे. आयुक्त या प्रकरणात आता काही मदत करु शकतात का हे आपण त्यांना विचारु.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– मा. महापौरजी, मी आपणांस समजावून सांगतो. या प्रकरणात आयुक्तांची व महापालिकेची भुमिका वेगवेगळी असु शकते.

मा. महापौर :– यासाठी आपणांस पुन्हा ठराव पारीत करावा लागेल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– आपणांस महापालिकेची भुमिका वेगळी घ्यायची आहे.

मा. महापौर :– आता हा विषय येथे नाही. यासाठी आपण पुन्हा बैठक बोलवून ठराव पारीत करु. जर आधीचा ठराव चालत असेल तर त्याचीच प्रत देवुन टाकु.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– कोणाला देणार?

मा. महापौर :– आयुक्त साहेबांना जे उत्तर दयायचे आहे त्यामध्ये देवु.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– मी पुन्हा एकदा आपणांस सांगतो की, कोणत्याही प्रकरणात दोन पक्ष असतात. एक आयुक्त व दुसरी महापालिका. आयुक्तांची भुमिका वेगळी आहे, आपण महापालिकेच्या वतीने लोकप्रतिनिधी म्हणुन लढु शकतो.

मा. महापौर :– आम्ही विधी अधिकारी यांना अभिप्राय देण्यासाठी सांगु.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– याचा अर्थ यासाठी आपण प्रामाणीक नाहीत. मी आपणावर उघड आरोप लावतो.

मा. सदस्य श्री.राजेश वदारिया :–आधी त्या याचिकेची प्रत सभागृहाला दयायला हवी. आम्हांला त्यावर अभ्यास करण्यासाठी संधी मिळायला हवी.

मा. सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :– मा. महापौरजी, हे श्री. वदारिया जे याचिकेबद्दल बोलतात, तर ३१ तारखेला जेव्हा आपला निर्णय झाला त्यावेळी याचिकेचा प्रश्न नव्हता. आपले असे ठरले होते की, आपणांस सुनावणी न देता जो ठराव रद्द केला आहे त्याविरुध्द अपिल करण्यात यावे. त्यावेळी याचिका अथवा जनहित याचिका याचा प्रश्नच नव्हता. आता ते बोलतात की, आम्ही याचिका वाचु. त्याच्याशी आमचा संबंध नाही. सर्व सभागृहाने एकमताने जो ठराव पास केला होता तो सुनावणी न घेता रद्द करण्यात आला. त्यासाठी आपणांस अपिल करायचे आहे. याचिकेशी आपला संबंध नाही. याचिका जनतेनी केली आहे. सभागृहाने त्या विरुध्द अपिल करावे असा निर्णय झालेला आहे. जर आपण ते टाळत असाल तर ती आपली मर्जी आहे.

मा. महापौर :–आम्ही जो ठराव पारीत केला होता, त्यावर आम्ही अजुनही ठाम आहोत.

मा. सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी:– मा. महापौर महोदया, जर कोणी न्यायालयात गेले नसते तरी आपण ३१ तारखेला निर्णय घेतला आहे की, आपण त्या विरुध्द अपिल करु. आपले सर्वानुमते ठरले होते की, करवाढी

विरोधात आपण जो ठराव केला होता, तो आयुक्तांनी शासनाकडे पाठविला. शासनाने आपणांस सुनावणी न देता तो रद्द केला. आपण त्यावर अपिल करु. यासाठी आपण सहमत झाला होतात. आता याचिका, जनहित याचिका कुणी केली आहे याच्याशी काही संबंध नाही.

<u>मा. महापौर :–</u> आज हा विषय नाही. आम्ही आधी जे बोललो होतो, त्यावर आता देखील ठाम आहोत. आम्ही आपसात बसून यावर मार्ग काढण्यासाठी चर्चा करु. आवश्यकता भासल्यास पुन्हा महासभा बोलावु.

<u>मा. सचिव :–</u>विषय वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. १:–</u> महासभा ठराव क्र ६७, दिनांक १८/२/२००५ मध्ये अंशत: बदल करणे.

<u>मा. सचिव :–</u> श्री. लाल पंजाबी व श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांच्याकडुन एक सुचना प्राप्त झाली आहे. त्याची प्रस्तावना पुढील प्रमाणे आहे.

शिवसेना – भाजपा युतीच्या वतीने प्रस्ताव देण्यात येतो की, महासभा ठराव क्र. ६७, दिनांक १८.२.२००५ मध्ये अंशत: बदल करण्याबाबतचा विषय विशेष महासभेसमोर ठेवण्यात आला असून त्यामध्ये वाढ केलेली जकात दरवाढ, मालमत्ता करवाढ, पाणी पट्टी दर वाढ, पाणी टॅंकर भाडे, व विशेष सफाई कर ही संपुर्ण वाढ रद्द करुन पुर्वी प्रमाणे लागु असलेले दर कायम ठेवावे.

<u>मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, आज ही जी विशेष महासभा बोलावली आहे. यामध्ये फक्त तीन बाबी ज्या मी त्यादिवशी इतिवृत्त कायम करतांना सांगितल्या होत्या. तिसरे म्हणजे, टॅंकर साठी आपण जो ठराव केला होता, त्यामध्ये स्पष्टपणे लिहिले होते की, जेथे जलवाहिन्या आहेत परंतु पाणी जात नाही मग ही इमारत असो, झोपडपट्टी असो, चाळ असो अथवा बॅरेक असो. तेथे जोपर्यंत पाण्याची सुविधा मिळत नाही तोपर्यंत तेथे टॅंकर मोफत देण्यात यावा. त्यासाठी आम्ही मा.महापौरांना , आम्ही असे ठरविले होते की, मा. महापौर हे कोणाला टॅंकर दयायचे अथवा नाही हे ठरवतील. आमची ती जी चर्चा झाली होती ती फक्त चर्चेमध्येच आली. त्याचा ठरावात उल्लेख आला नाही. असे सांगुन १ तारखेपासुन फुकट टॅंकर बंद केले आहेत. ज्यावेळी इतिवृत्त आले तेव्हा मी ओरडलो की, कृपा करुन टॅंकर मोफत करावे व ज्या दोन बाबी मध्ये बदल करावयाचा होता की, सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलियम पदार्थ जे २.५० वरुन ३.०० केले होते ते २.७० केले जावे. फक्त २० पैशांची वाढ करावी. व दुसरे जे केमिकलचे होते त्यामध्ये रुपये ३.२५ वरुन ४.०० केले होते. ते मी ३.४५ करावे असे सांगितले होते. जकातीच्या या दोन बाबींमध्ये चुक झाली होती ती दुरुस्ती केली जावी. माझे अजुनही असे म्हणणे आहे की, आता उन्हाळयाचे दिवस आहेत. ३० जुन पर्यंत मग ते इमारत असो, झोपडपट्टी असो, चाळ असो अथवा बॅरेक असो. जोपर्यंत पाणी पुरवठा सभापतींची नियुक्ती होत नाही तोपर्यंत मा. महापौरांनी त्यांना जेथे योग्य वाटेल तेथे मोफत टॅंकर दयावे. येथे आपल्या समोर एक उदाहरण आले आहे, १ तारखेपासुन आपण मोफत टॅंकर बंद केले, त्यानंतर जेथे जेथे लोकांनी पैसे देवुन टॅंकर घेतले त्या विभागात खरोखर पाण्याची टंचाई आहे हे सिध्द् होते. तर नगरसेवक मा. महापौरांना जेथे पाण्याची आवश्यकता आहे असे सांगतो तेथे मोफत टॅंकर द्यावे. तसेच आता येथे मी जे बोलत आहे ते कृपा करुन ठरावात घेतले जावे. नंतर सांगतात की, तुमचे बोलणे ६० पानांचे आहे, त्यामुळे प्रत्येक गोष्ट ठरावात घेवू शकत नाही. तर कृपा करुन मी आता जे बोलत आहे, ते ठरावासाठीच बोलत आहे. या तीन्ही बाबी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता आजपासून लागू करण्यात याव्यात. अशी माझी सभागृहाला विनंती आहे. उर्वरित आमच्या काही सदस्यांचा ठराव आला आहे. तर मला असे वाटते की, बजेटच्या मिटींगच्या वेळेस देखील त्यांच्या याच भावना होत्या. परंतु त्यावेळी बहुमताने बजेट पास झाले होते. आज आपणांस फक्त तीन सुधारणा करायच्या आहेत. जोपर्यंत आपण पाणी पुरवठा करत नाहीत, तोपर्यत त्या विभागांमध्ये टॅंकर मोफत देण्यात यावेत. याचे अधिकार मा. महापौर व पाणी पुरवठा विभागाच्या सभापतींना देण्यात यावेत. तसेच टॅंकर त्वरीत देण्यात यावेत. ज्या विभागात आपण पाणी पुरवठा करु शकत नाही, त्या विभागात कमीत कमी मोफत टॅंकर तरी दयावेत. अशी माझी सभागृहातील सर्व सदस्यांना विनंती आहे. व कृपा करुन या तीन्ही गोष्टींचा ठराव आजच तयार करावा व इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता लागु करण्यात यावा. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मा. महापौर व आयुक्त साहेब, १ वर्षापुर्वी आयुक्तांनी श्वेतपत्रिका जारी केलेली होती. त्यामध्ये लिहिले होते की, प्रत्येक प्रभागात दररोज किमान दोन तास पाणी दिले जाईल. तर मला असे वाटते की, आयुक्त साहेबांनी आजपर्यंत ते काम केले नाही. माझ्या प्रभागात २०—३०—४० मिनिटे पाणी येत आहे. आज गेल्या एक महिन्यापासुन मी श्री. सावकारे साहेबांना व तेथिल उप—अभियंताना विनंती करुन थकलो आहे. आज माझ्या प्रभागात काही विभाग असे आहे जेथे फक्त १० मिनिटे पाणी येते. टॅकर देखील बंद केले आहे. आमच्या प्रभाग क्रमांक १० मध्ये ७ झोपडपट्टया आहेत, त्यामधील ३ घोषित झोपडपट्टया आहेत. टॅकर बंद केला त्यानंतरही आठवडयातुन एक दिवस पाणी बंद केले आहे. मी आज श्री. सावकारे यांना एक दिवसासाठी पाणी बंद करण्याचे कारण विचारले, त्यावर त्यांनी सांगितले की, बाकीचे दिवस आपणांस पाणी चांगले मिळेल. ते तर मिळाले नाहीच फक्त १० मिनिटे पाणी येत आहे. जेथे ३० मिनिटे यायचे तेथे १० मिनिटे येत आहे. जेथे एक तास होते तेथे चाळीस मिनिटे केले आहेत. यासाठी मी आयुक्तांना विनंती करतो की, याबद्दल श्री. सावकारे यांना खुलासा करण्यास सांगावे.

मा. सदस्य श्री. दिलिप लालवानी :— मा. महापौर महोदया, आम्ही हे आधी देखील सांगितले आहे की, जोपर्यंत नळामध्ये पाणी येत नाही तोपर्यंत टॅकरचे पैसे घेवू नये. आमच्या या भुमीकेवर आजही आम्ही कायम आहोत. त्याच सोबत आयुक्तांना माझी विनंती आहे की, जे लोक व्यापारी कामासाठी पाण्याचा वापर करीत आहेत, ज्यांच्याकडे टॅकर जात आहेत. त्यांच्याकडुन आपण पैसे घ्यावेत. परंतु घरगुती वापरासाठी पैसे घेवू नयेत. जे लोक गाडी धुण्यासाठी, बांधकामासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करीत आहेत, पाणी वाया जात आहे, अशा व्यक्तींवर दंड व कठोर कारवाई करावी. पाण्याचा वापर लोकांनी कमीत कमी करावा, यासाठी महापालिकेकडुन मोहिम चालवायला हवी.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— मा. महापौर महोदया, श्री. किशोर वनवारी, सभागृह नेता यांनी सांगितले की, दोन गोष्टी इतिवृत्तात यायला हव्यात. पहिले म्हणजे जे लोक पैसे भरु शकतात, त्याच लोकांनी पैसे भरुन टॅकर घेतले आहेत. झोपडपट्टीचे लोक पैसे भरु शकत नाहीत. यासाठी त्यांनी पैसे भरले नाहीत. त्यांनी जो निकष लावला की, ज्यांनी पैसे भरले त्यांनाच गरज आहे व ज्यांनी पैसे भरले नाहीत त्यांना गरज नाही असे नाही. ज्यांनी पैसे भरले आहेत ते या पुढे देखिल घेवु शकतात. परंतु बरेचसे लोक जे पैसे भरु शकत नाहीत, ते आज पाण्यासाठी वणवण भटकत आहेत. दुसरे एक उदाहरण आहे, आमच्या श्री. जमनु पुरस्वानी यांनी सांगितले की, पैसे भरुन पहिला टॅकर मी घेतला आहे, रुपये २५० भरुन. त्यांच्या घरी कार्यक्रम होता. म्हणजे मला गरज आहे असे होत नाही. पैसे भरण्याचा निकष लावणे चुकीचे होईल. दुसरे म्हणजे, जे प्रशासनाचे काम आहे ते प्रशासनानेच करायला हवे. पाण्याच्या टॅकरसाठी महापौर व पाणी पुरवठा सभापती यांना अधिकार देणे हे चुकीचे होईल. हे प्रशासनाचे काम आहे, आयुक्त आहेत, कार्यकारी अभियंता आहेत. ते यासाठी मंजुरी देतील. जर असे झाले तर. ही चर्चा सुरु आहे. आमच्या समोर शासनाने रद्द केलेल्या ठरावाची प्रत आहे. चर्चेतुन काही निष्पन्न होईल असे मला वाटत नाही. परंतु असे झाले तर ते चुकीचे होईल. जे प्रशासनाचे काम आहे ते प्रशासनानेच करायला हवे. तुम्ही फक्त त्यांना आदेश दयावेत.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :— मा. महापौर व आयुक्त साहेब, आपणांस हे माहिती आहे की, उल्हासनगर कॅम्प ४ व ५ मध्ये एमआयडीसी कडुन किती पाणी यायला हवे व प्रत्यक्षात किती पाणी येत आहे. आमचे महापौर व उपमहापौर मंत्रालयात जावुन संबंधित अधिका—यांना भेटले होते, मंत्री महोदयांनी कार्यकारी अभियंत्यांना आदेश देखील दिले परंतु कार्यकारी अभियंता यांनी अदयाप त्याची अंमलबजावणी केलेली नाही. आयुक्तांना चांगल्या प्रकारे माहिती आहे की, उल्हासनगर ४ व५ मध्ये पाण्याची टंचाई आहे. एकतर नळाला पाणी येत नाही, टॅकर पण बंद हा कुठला न्याय आहे? ही आयुक्त साहेबांची जबाबदारी आहे. आमच्या एका सदस्याने जसे सांगितले की, हे प्रशासनाचे काम आहे तर प्रशासनाने त्यांचे काम करायला हवे. जर त्यांनी केले नसेल तर चुकीचे आहे. त्यांनी बघायला हवे की, झोपडपट्टीत जेथे पाण्याची टाकी ठेवली आहे, अथवा जेथे पाणी जात नाही. तेथिल टॅकर कसे काय बंद केले? आधी अशा या विभागात ताबडतोब टॅकर पाठवायला हवे. आमच्या प्रभाग क्रमांक १२ मध्ये दररोज किमान चाळीस टॅकरची आवश्यकता आहे. तेथे एवढया इमारती आहेत. आधी तेथे २० ते २२ टॅकर जायचे परंतु आता एक देखील जात नाही. तर आता तेथिल लोकांची परिस्थिती काय असेल? आमच्या आमदार साहेबांनी तेथिल पाण्याची कमतरता दुर करण्यासाठी नविन जलवाहिन्या टाकण्याचा प्रस्ताव पास केला आहे. त्याचे काम अजुन चालु झाले नाही तर तेथे पाणी पोहचेल तरी कसे? तर मेहरबानी करुन जेथे नविन जलवाहिन्या टाकल्या नाहीत, ?जेथे पाणी जात नाही, तेथे टॅकर निशुल्क देण्यात यावे. झोपडपट्टीमध्ये तर फार त्रास आहे. आम्ही झोपडपट्टयांशी जोडलेलो आहोत. तेथिल लोकांची काय हालत

आहे ते आम्ही बघतो. कृपा करुन जेथे जेथे पाण्याच्या टाक्या ठेवल्या आहेत, तेथे तेथे आजपासुनच टॅंकर पाठवावेत. प्रभाग क्र. १२ मध्ये तीन वर्षापासुन पाण्याचा त्रास आहे. तर कृपा करुन पाण्याची कमतरता कशी दुर होईल, श्री. नागे हे का ऐकत नाही. आपण त्यांच्याविरुध्द येथे प्रस्ताव पास करुन पाठवावा. कृपया या बाबींकडे लक्ष दयावे धन्यवाद.

या व्यतिरिक्त श्री सतरामदास जेसवानी यांनी मा. महापौरांकडे पत्र सादर केले, पत्रातील मजकुर पुढीलप्रमाणे आहे.

''उल्हासनगर महानगरपालिका की और से नयी बन रही इमारतों, बांधकामो पर घरपट्टी के नए दर लगाकर घरपट्टी बिल भेजे जाने से यहां के नागरिको व व्यापारियों मे असंतष्टता देखी जा रही है इसके पहले भी इस घरपट्टी वृद्धी बिलो को रद्द कर पहले के घरपट्टी दर से बिल दिलाये जांए ऐसा प्रस्ताव महासभा में पास किया था सर्व सहमती से पर उस प्रस्ताव पर अब तक महापालिका की और से कोई सहयोग न मिलने से समस्या यू क्यु त्यू बनी हुयी है ।

कुछ पॅनलों मे, कुछ भागों में पाणी कमी के कारण नागरिक परेशान है वहां नई पाणी लाईने डालवाने का प्रस्ताव आमदार फंड से पास किया हुआ है पर अब तक काम चालु व पुरा न होने से पाणी कमी समस्या यू क्यू त्यू बनी हुयी है महापालिका की और से पाणी टॅंकर निशुल्क ऐसी जगह भेजे जाते रहे थे । कई जगह झोपडपट्टीयों मे भी पाणी टाकियां रखी गई थी जहां पाणी टॅंकर पाणी खाली कर आते थे उन टाकियों में जिससे गरीब झोपडपट्टीवासियों को पाणी पीने की सुविधा बनी हुयी थी १/४/२००५ से महापालिका की और से पाणी कमी रही जगहों पर निशुल्क पाणी टॅंकर भेजने बंद किये गऐ जिससे यहां के इमारतों में रहते नागरिक व झोपडपट्टीवासी परेशान है ।

जब तक नलो में सही मात्रा में पाणी व्यवस्था हो नई लाईनें डालवाने का काम पुरा हो पाएं तब तक ऐसी जगहों पर निशुल्क पाणी टॅंकर दिलाये जांए ।

इस वर्ष जकात दरों में बढोत्तरी किये जाने से यहां के व्यापार में बहुत परेशानी देखी जा रही है व्यापरी वर्ग इस परेशानी के कारण बहुत दुखी है जितना व जिन जिन पदार्थो पर सहयोग बन पाएं उतना सहयोग कर पाएं ताकि, शहर के व्यापार में कठनाई ना हो ।

शहर की नागरिकों व्यापारियों के मनोभावना को देखकर सही संभव सहयोग कर दिलाये नम्र विनंती धन्यवाद.''

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–</u> मा. महापौरजी, माझ्या प्रभागात गेल्या दोन अडीच महिन्यापासुन पाण्याचा त्रास आहे. एक महिन्यापुर्वी मा. आयुक्तांना पत्र देवुन मी याची माहिती दिली आहे. आमचे श्री. सेलवन व श्री. विसपुते हे प्रयत्न करीत आहेत. परंतु त्यांच्या प्रयत्नांना यश प्राप्त झाले नाही. कृष्णा नगर, दुलारी पाडा, २६ सेक्शन, गुरुनानक नगर, या विभागात पाण्याची फार टंचाई आहे. मी आपणांस निवेदन करेन की, यासाठी लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करावी.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> मा. महापौर , आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्य हिंदीमध्ये एक म्हण आहे की, हत्तीचे दात दाखवायचे वेगळे असतात व खायचे वेगळे असतात. ही म्हण सत्ताधारी पक्षासाठी लागु पडते. मालमत्ता कर वाढ झाली यासाठी आम्ही सांगितले की, आपण ठोस पावले उचला. आपण तसे न करता, टाळाटाळ करत आहात. टॅंकर बाबतीत देखील तसेच आहे. आमचे व तुमचे नगरसेवक ओरडत आहेत. टॅंकर मोफत दयायला हवे. काही जण ३० जुन पर्यत म्हणत आहेत. आमचे म्हणणे असे आहे की, जोपर्यंत शहरात सर्व ठिकाणी पाणी जात नाही तोपर्यंत मोफत दयायला हवे. परंतु हा जो ठराव रद्द होवुन आला आहे, ज्याची प्रत सभागृहात आल्यावर आम्हांला मिळाली, त्यावर काय करायला हवे, सरकारकडे अपिल करायला हवे, न्यायालयात कसे जायला हवे, त्यावर कोणी विचार करीत नाही. यामुळे मला नाईलाजास्तव म्हण सांगावी लागत आहे की, हत्तीच्या दात दाखवायचे वेगळे व खायचे वेगळे. कारण आपण काहीही करु इच्छित नाही. तुम्ही फक्त बाहेरुन तसे बोलत आहात की, आम्ही करवाढीच्या विरोधात आहोत, पाणी टॅंकरच्या विरोधात आहोत. परंतु मनापासुन आपण असे म्हणत नाही. कारण की, आपण कोणतीही ठोस पावले उचलत नाहीत असा माझा स्पष्ट आरोप आहे. जेथपर्यंत अन्य करांची गोष्ट आहे, जकात कर सव्वा पाच वरुन तेहतीस टक्के किंवा जे इतर कर

वाढविले आहेत. आम्ही आधी देखील त्याला विरोध केला होता व आजही करत आहोत. यासाठी आम्ही ठराव दिला आहे की, ती कर वाढ रद्द केली जावी. अशी आमची स्पष्ट भुमिका आहे.

<u>**मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–**</u> मा. महापौरजी, हे आयुक्तांच्या अधिकारात आहे. ते कुठेही त्यांच्या अधिकारात टॅंकर पाठवू शकतात. आता उन्हाळयाचे दिवस आहेत, पावसाळयापर्यंत आयुक्तांना ज्याठिकाणी आवश्यकता आहे अशा ठिकाणी मोफत टॅंकर पाठविण्यासाठी मा. महापौरांनी आदेश दयावेत.

<u>**मा. सदस्य श्री. विश्‍वनाथ पाटील:–**</u> मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, आजच्या महासभेत आम्हांला जे पत्र दिले आहे, त्यामध्ये टॅंकर वरील खर्च दिवसेंदिवस कसा वाढत गेला ते दाखविले आहे. या आधीच्या महासभांमध्ये मी बोललो होतो की, आधी त्याचे सर्वेक्षण करा आणि जेथे आवश्यकता आहे तेथेच टॅंकरने पाणी पुरवठा करा. पण मला असे वाटते की, आजपर्यंत अशा प्रकारे सर्वेक्षण केले गेलेले नाही. कारण जेथे आवश्यकता नाही, तेथे टॅंकर पाठविले जातात. आणि जेथे आवश्यकता आहे, तेथे टॅंकर पाठविले जात नाही. व्यवस्थित सर्वेक्षण करुन ज्या ठिकाणी पाणी जात नाही त्या ठिकाणीच टॅंकरने पाणी पुरवठा केला गेला तर निश्‍चितच टॅंकरवरील खर्च कमी होईल. खरोखरच ज्या ठिकाणी पाणी पुरवठा होत नाही, अशा ठिकाणी देखील महापालिका मग त्याच्या घरामध्ये नळ असो अथवा नसो, पाणी पोहचत असो अथवा नसो, महापालिका त्यांच्याकडुन मालमत्ता करामध्ये पाणी पट्टी वसुल करीत आहे. त्यांना पाणी पट्टी देणे बंधनकारक आहे. परंतु अशा लोकांना पाणी मिळते अथवा नाही, मिळत नसेल तर त्यावर काय उपाययोजना आहे, याच्यावर कधी अधिकारी लोकांनी विचार केला आहे का? का टॅंकरद्वारे वर्षानुवर्ष त्यांना पाणी पोहचवायचे? आणि त्यांच्याकडुन टॅक्स वसुल करायचा. ज्यांच्या घरामध्ये नळाद्वारे पाणी पुरवठा होतो आणि टॅंकरद्वारे ज्यांच्याकडे पाणी पुरवठा होतो त्यांना होणारा त्रास किंवा ज्यांना कमी दाबाने पाणी पुरवठा होतो, परंतु त्यांना मोटरने स्वत:च्या घरामध्ये पाणी खेचुन घ्यावे लागते त्यांचा इलेक्ट्रीकवर होणारा खर्च याचा महापालिकेच्या अधिका–यांनी कधी विचार केला आहे का? या सर्व गोष्टी विचारात घेवून आणि पुर्ण उल्हासनगरचे सर्वेक्षण करुन कोणत्या विभागात पाणी पुरवठा होत नाही, कोणत्या विभागात पाणी पुरवठा होतो आणि असे सर्वेक्षण केल्यानंतर ठराविक प्रभागांमध्ये जेथे पाणी पुरवठा होत नाही तेथे विनाशुल्क टॅंकरद्वारे पाणी पुरवठा व्हावा, असा जर अधिका–यांनी निर्णय घेतला तर हा जो वर्षानुवर्षे खर्च वाढत आहे, हा एकदम कमी होण्याची शक्यता आहे, आणि होईलच अशी माझी स्वत:ची खात्री आहे. दुसरे म्हणजे टॅंकरद्वारे होणा–या पाणी पुरवठयावर आपण पैसे आकारणार आहात. यामुळे असा प्रश्न उद्भवेल, आता आमच्या नगरसेवकांनी सांगितले की, ज्या झोपडपट्टीमध्ये पाणी पुरवठा होत नाही अशा लोकांना पाणी हवे असेल, ज्यांची पैसे भरण्याची ताकत नाही, नगरपालिका त्यांच्याकडुन पाणी पट्टी वसुल करते असे असतांना त्यांनी टॅंकरसाठी पैसे का भरावे? हा सगळयात महत्वाचा प्रश्न आहे. महापालिका पाणी पट्टी वसुल करणार आणि टॅंकरचेही पैसे घेणार हा कोणता न्याय आहे? दुसरे म्हणजे पैसे घेवून टॅंकरद्वारे पाणी पुरवठा केला तर ज्याच्याकडे पैसे आहेत अथवा जे त्यापासुन उत्पन्न घेणार आहेत, असेच लोक पैशाने टॅंकर घेणार आहेत आणि त्यांच्या फायदा करुन घेणार आहेत. ते पैसे कमवतील मग ते बिल्डर असो, अथवा मोठे हॉटेलवाले असो, अशा लोकांना जे मोठे व्यापारी आहेत, असे लोक पैसे भरुन टॅंकर विकत घेतील व उत्पन्न कमवतील. जे गरीब लोक झोपडपट्टीमध्ये राहतात, जे पैसे भरुच शकत नाही आणि ज्यांना महापालिका पाणी पुरवठा करु शकत नाही त्यांनी टॅंकरद्वारे पाणी पुरवठयासाठी पैसे का भरावे, आणि ते पैसे कुठून भरणार? आणखी एक गोष्ट मागच्या वेळेस मी बोललो होतो त्याला उत्तर मिळाले नाही. असा विषय आहे, तसा विषय आहे असे बोलले होते. पण आता काही नगरसेवकांनी सांगितले कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची समस्या आहे. पाणी पुरवठयाबाबत सर्व नागरीक त्रस्त आहेत. कल्याण विभागातील एका बिल्डरला पाणी पुरवठा केला जातो. आणि याचा अर्थ कॅम्प नं. ४ व ५ साठी भरपुर पाणी आहे असा होतो. दुस–यांना पाणी पुरवठा केला तरी चालेल असा त्याचा अर्थ होतो. तरी कृपया असे कोण करीत आहे व का करीत आहे याचा खुलासा येथे करावा.

<u>**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :–**</u> मा. महापौरजी, उप–महापौरजी व आयुक्त साहेब, सर्वप्रथम महापालिका सचिव श्री. कुकरेजा यांना ज्या प्रमाणपत्राने सन्मानित केले आहे, त्याबद्दल त्यांचे पक्षातर्फे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे मा. सोनवणे साहेब, जे आमच्या शहराला पुर्णवेळ आयुक्त म्हणुन लाभले आहेत, तीन वर्षांसाठी लाभले आहेत. त्याबद्दल संपुर्ण उल्हासनगर शहरामधुन त्यांना शुभेच्छा व्यक्त करतांना ब–याचशा गोष्टींचा ऊहापोह येथे करावासा वाटतो. श्री. सोनवणे हे प्रभारी आयुक्त असतांना ज्या–ज्या पध्दतीने या शहराच्या समस्या सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला, संकटातुन सोडवायचा प्रयत्न केला असेल किंवा ब–याचशा आडकाठया असतांना प्रयत्न केला असेल, पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे आणि हे सर्व करत असतांना ते प्रभारी आयुक्त होते पण आज ते पुर्णवेळ आयुक्त आहेत. या संपुर्ण शहराला विकसीत करण्यासाठी तीन वर्षाचा कालावधी हा फार मोठा

आहे. आमची अपेक्षा, ज्या विभागातुन आम्ही प्रतिनिधित्व करतो, ज्या झोपडपट्टी विभागातुन आम्ही प्रतिनिधीत्व करतो, त्यांच्याकडुन आपल्याबद्दल फार मोठया अपेक्षा आहेत. पाण्याचा प्रश्न आहे, सुरुवातीला आपण टॅंकर मुक्त उल्हासनगर करु या. आज उल्हासनगर टॅंकर मुक्त झाले आहे. परंतु पाणी कुठे मिळाले आणि कुठे नाही हा फार मोठा गहन विषय आहे. मला वाटते आजच्या परिस्थितीत पाणी फक्त शेवटच्या टोकाला, जेथे झोपडपट्टी विभाग असतो तेथे नाही. भौगोलिक परिस्थितीमुळे काही इमारतींच्या परिसरात पाणी मिळत नाही. आज आपण टॅंकर मुक्त उल्हासनगर करीत असतांना या विभागाची परिस्थिती कशी सोडवता येईल आणि किती लवकर सोडवता येईल याचा विचार येथे झाला पाहिजे. त्याच्यावर उपाययोजना झाल्या पाहिजेत. आजच आमच्या आम्रपाली येथे पाणी भरत असतांना एक माणुस वडोल गावात जात होता. वडोल गावातून रेल्वे ट्रॅक ओलांडुन पाणी आणतात. आज सकाळी १०.०० वाजता एक माणुस रेल्वे खाली कापला गेला. आज भारत नगर हा विभाग जो शेवटच्या टोकाला आहे जेथे जलवाहिन्या नाहीत. तेथिल सर्व वस्ती अंबरनाथ येथुन पाणी आणते. हे जे प्रकार आहेत हे जेव्हा पासुन टॅंकर बंद केले तेव्हा पासुन चालु झाले आहेत. आम्हांला टॅंकर मुक्त उल्हासनगर हवे आहे. परंतु पाणी देखील हवे आहे. या सर्व गोष्टींच्या उपाययोजना करीत असतांना आणखी एक आयुक्तांना विनंती करेन की, झोपडपट्टीवाल्यांचा, दारीद्रय रेषेखालच्या व्यक्तींना फोटोपास देतांना येणा–या अडचणी, फोटोपास देतांना महापालिकेचे कर्मचारी त्यांची करत असलेली अडवणुक ही कशा पध्दतीने थांबविता येईल आणि तुमच्या आयुक्त पदाच्या दोन–तीन वर्षाच्या कालावधीत संपुर्ण शहरामध्ये हा झोपडपट्टी धारक वर्ग तो सुधरवता कसा येईल, त्याचा विकास कसा करता येईल, याच्या उपाययोजना आपण आखाव्यात. आपल्या आयुक्त पदासाठी पिपल्स रिपब्लीकन पक्षातर्फे या शुभेच्छा व्यक्त करतो. धन्यवाद.

<u>मा . सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> मा. महापौर, उप–महापौर व आयुक्त साहेब, पंधरा दिवसांपुर्वी श्री. धनंजय बोडारे व माझ्या प्रभागातुन मोर्चा काढण्यात आला होता. मोर्चा काढल्यानंतर तेथे आपण आम्हांला आश्वासन दिले होते की, एक दिवस तुमच्या येथिल पाणी बंद करणार व बाकीचे दिवस पाणी वाढवुन देणार. तसे करत असतांना आपण कोणत्या विभागातील पाणी कमी केले आहे व कोणत्या विभागात वाढविले आहे. याची विस्तृत माहिती आपण आम्हांला दयावी. मला अशी शंका आहे की, आमच्याच विभागातील पाणी एक दिवस बंद केले आहे व वाढविलेले बिल्कुल नाही. उलट कमी झाले आहे. आज आमच्याकडे पंधरा –वीस मिनिटे पाणी येत आहे. आमचे जे पाणी कमी केले आहे ते कुठे वाढविले आहे? हे तुम्ही आम्हांला स्पष्ट करुन दया. दुसरी गोष्ट अशी की, आनंद नगर बुस्टर वरुन जे पाणी येते ते सकाळी तुमच्या वेळेप्रमाणे ५ तास पाणी देतात. पण आम्हांला ते दोन तासही मिळत नाही. जे दोन तास मिळते ते देखील कमी दाबाने असते. कुणाच्या घरात ते पाणी पोहचतही नाही. मी माझ्या बाजुला सुरेश जाधव, प्रशांत जाधव, सुर्वे, माने ताई आणि राज असरोंडकर आम्ही तुम्हांला एक पत्र दिले आहे की, तुम्ही आम्हांला दोन तास पाणी एम.एस. मधुन दया. सी.आय. मधुन तुम्ही पाणी देत असतांना त्या पाण्याची भरपुर ठिकाणी गळती होते, त्यावर नळ बसविले आहे. वडोल गांव व ब–याच ठिकाणी ते पाणी घेतले आहे. तुम्हीही त्यांना पाणी दया. सकाळी अडीच तास त्यांना दया. संध्याकाळी अडीच तास आम्हांला दया. परंतु ते पुरेशा दाबाने दया. कोणतीही एक वेळ ठरवा जेणेकरुन त्यांना पाणी देतांना आम्हांला त्रास व्हायला नको, व आम्हांला पाणी देतांना त्यांना त्रास व्हायला नको. तुमची समांतर जलवाहिनी तेथुन गेलेली आहे. तुम्हांला फक्त ती सुरु करायची आहे. मी तुम्हांला महिनाभरापासुन हे सांगत आहे परंतु काही कार्यवाही होत नाही. श्री. सावकारे यांच्या पाठीमागे महिनाभरापासुन लागलो आहे. ते सांगतात मी आयुक्तांशी बोलतो. दुसरी गोष्ट म्हणजे आता टॅंकर बंद केल्यामुळे ज्या–ज्या ठिकाणी तुम्ही पाणी देवु शकत नाही. त्या त्या ठिकाणी माझ्या प्रभागात जलवाहिन्या मंजुर झाल्या आहेत. ते काम जर पुर्ण झाले तर तेथे टॅंकरची आवश्यकता भासणार नाही. आणखी एका महत्वाच्या विषयावर मागे मी तुमच्याशी बोललो आहे. शहरातील बहुतेक इमारतींना कुपनलिका नाहीत. असल्या तरी ते दुरूस्त करून घेत नाहीत कारण त्यांना टॅंकरची सवय लागली आहे. तुमच्या अधिका–यांनी जावुन त्यांना सूचना दयावी की आम्ही फक्त तुम्हाला पिण्यासाठी पाणी देत आहोत बाकीच्या वापरासाठी तुम्ही बोअरवेलचे पाणी वापरावे. असे केले तरी आपले बहुतेक प्रश्न सुटतील. ज्या ठिकाणी तुम्ही पाणी देवु शकत नाही तेथे तुम्ही पाणी कसे देणार आहात हे आम्हाला सांगावे. जोपर्यंत तुम्ही पाणी देत नाही तोपर्यंत त्या लोकांनी काय करायचे? त्यांनी कुठून पाणी भरायचे. पाण्याची व्यवस्था काय आहे? तुम्ही टॅंकर बंद केले ते ठीक आहे परंतु तुम्ही त्यांना पाणी तर दया. तुम्ही जलवाहिन्या टाकाल तोपर्यत आठ ते पंधरा दिवस जातील. तोपर्यंत लोकांनी काय करायचे? तोवर कुठून भरायचे ते तुम्ही सांगा.

**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>**मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर:‘–**</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची जी भयंकर समस्या निर्माण झाली आहे. असा कोणता दिवस नाही की आम्ही आपल्या अधिका–यांना कळविले नाही की आमच्या येथे पाणी येत नाही. यावर उत्तर असे मिळते की पाले येथुन पाण्याचा दाब कमी आहे. पाले येथुन

पाण्याचा दाब कमी आहे तर यावर आपण काय करणार आहात. आपण नविन एम.बी.आर येथे पाणी घेवुन आनंद नगर मधुन पाणी पुरवू शकता. आपले अधिकारी असा प्रयत्न का करत नाहीत की आनंद नगर येथुन पाणी वाढविण्यासाठी व दुसरी गोष्ट म्हणजे टॅंकर तेथे दिला जातो जेथे महापालिका पाणी पुरवठा करण्यात अपयशी ठरली आहे. तर अचानक महासभेत एक चर्चा झाली, काही आश्वासने दिली गेली व ठराव काही वेगळा झाला. पुर्ण शहराची जनता आज पाण्यामुळे एवढी त्रस्त आहे की शेवटी ते करतील तरी काय. जनता म्हणते की आम्ही एवढी जकात भरतो, मालमत्ता कर भरतो, पाण्याचे बिल भरतो त्यानंतरही महापालिका नळाद्वारे पाणी का देवु शकत नाही. टॅंकरसाठीही आम्ही का पैसे भरावेत. अशी वेळ येईल की नगरसेवकांना हे शहर सोडुन जावे लागेल. आपण जरा विचार करावा. शहरातील जनता त्रस्त आहे. लोक बाहेरून टॅंकर मागवितात त्यामुळे त्यांना त्वचा रोग होतात. कृपया लक्ष दयावे.

<u>मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी:—</u>मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब माझी आपणांस विनंती आहे की, टॅंकरचे पैसे घेण्या ऐवजी ग्रामीण भागात जे पाणी जात आहे. त्यांच्याकडुन पैसे वसुल केले जावेत. त्यांच्याकडुन आपली वसुली वाढु शकते. तसेच पाले गावात जी ७००—८०० मीटरची जलवाहिनी टाकायची आहे त्यावर निर्णय घेवुन ती ही लवकरात लवकर टाकली जावी. जेणे करून पाण्याची समस्या सुटू शकेल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:—</u>मा. आयुक्त साहेब व मा. महापौरजी मी एक प्रश्न केला होता की माझ्या प्रभागात १०—१५ मिनिटे पाणी येते. आयुक्त साहेबांनी दोन तासाचे आश्वासन दिले होते. श्री. सावकारे यांना विचारावे की माझ्या प्रभागात कोणत्या वर्षी दोन तास पाणी येईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौरजी,आज आम्ही या ज्या तीन सुधारणा करणार आहोत याकरिता आता दोन चार गोष्टी ऐकाव्या लागल्या त्याबद्दल थोडे स्पष्टीकरण करतो. मा. बोडारे साहेब असे बोलले की मी मा. महापौर व सभापती पाणी पुरवठा हे टॅंकर देतील असे बोललो. मागच्या महासभेत मी मा. महापौर व आयुक्त साहेब असे बोललो होतो की ते लोक टॅंकर देतील. परंतु आज १ तारखेपासुन टॅंकर बंद केल्याने आज शहरवासियांना जो त्रास झाला आहे. त्याकरिता मी बोललो की यानंतर मा. महापौर व सभापती हे टॅंकर देतील. टॅंकर बंद केल्याने आपणांस जेवढे वाईट वाटले आहे त्यापेक्षा जास्त आम्हाला वाटले आहे. श्री. अशोक ठाकुर बोलले की येथे काही बोलले आणि ठरावात काही दुसरेच आले. जर आम्ही मोफत टॅंकर देण्याच्या बाजुने नसतो तर आज आम्ही सुधारणा करण्यासाठी ही महासभा बोलावली नसती. मी आधीच बोललो की इमारत असो, झोपडपट्टी असो, बॅरेक असो अथवा चाळ असो सर्व ठिकाणी टॅंकर जायला हवे. मी अशा सदस्यांचे नाव घेत नाही जे ४० इमारतींना टॅंकर दयावा म्हणुन पत्र घेवुन फिरत आहेत. त्रास असेल म्हणुन फिरत असतील त्यांना टॅंकर दयायला हवा. मी महासभेत स्पष्ट बोललो होतो की नगरसेवक सांगेल तेथे, जेथे पाणी पुरवठा होत नाही तेथे मोफत टॅंकर देण्यात यावे. आज कराचा मुद्दा येथे आला आहे, आमचे श्री. लाल पंजाबी बोलले की हत्तीचे दाखवायचे दात वेगळे असतात व खायचे दात वेगळे असतात. परंतु जे कायदेशिर असेल तेच करता येईल. मला पण यावर एक म्हण आठवते की म्हैस पुर्ण काळी असते ती गायीला म्हणते तुझी शेपुट काळी. तुम्ही नेहमी सत्ताधारी पक्षावर आरोप लावता की तुमचे दाखवायचे दात वेगळे व खायचे वेगळे आहेत. जेव्हा कर वाढ झाली तेव्हा जमिनीवर आम्ही बसलो होतो, तुम्ही बसला नव्हतात. आम्ही तीन वेळा जमिनीवर बसलो होतो. आजही सत्ताधारी पक्षाची भुमिका स्पष्ट आहे आम्ही करवाढीच्या विरोधात आहोत. जी नविन कर आकारणी झाली होती ती जुन्या दरानेच व्हायला हवी. त्यावेळी कायदा सांगण्यासाठी सचिवांनी पुस्तक देखिल मागविले होते. परंतु आपण ते ऐकलेच नाही व चर्चा संपवुन टाकली. ते सांगत होते की ठराव रद्द झाला तर पुढे काय करू शकतो. तर आपण हे निश्चित समजा जो ठराव एकमताने मंजुर झाला होता त्यावर सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष शेवट पर्यंत ठाम राहतील. परंतु ते कायदयाने व्हायला हवे. जसे लहान मुल हट्ट करते की चंद्र आणुन दया तर असे होत नाही. आपण कायदयाने जे कराल त्यासाठी आम्ही तुमच्या बरोबर आहोत. टॅंकर मोफत दयायचा जो प्रश्न आहे तर आवश्यकता असेल तर दोन सहा अथवा बारा महिने मोफत देण्यात यावे. जोपर्यंत सगळीकडे पाण्याची व्यवस्था होत नाही तोपर्यंत टॅंकर फुकट दयायला हवेत. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मा. महापौर, मा. आयुक्त साहेब आमच्या मनात एक शंका आहे की येथे ठरावात जे अंशत: बदल करणार आहोत जसे टॅंकर मोफत देणार तर यावर मी आयुक्तांना विचारू इच्छितो की येथे ठराव पास झाल्यावर आपण मोफत टॅंकर देणार आहात का? कृपया आपण सांगावे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—**मा. महापौरजी, यामुळे जी तुट निर्माण होणार आहे. व जे टॅंकर मोफत देणार आहोत यापासुन जेवढी तुट निर्माण होईल तेवढी रक्कम कर वसुलीमध्ये जास्तीची दाखविण्यात येईल. यावेळी आम्ही मालमत्ता कर वसुली कमी दर्शविली आहे. जकातीमुळे व टॅंकर फुकट दिल्याने जे नुकसान होणार आहे. ते मालमत्ता कर वसुलीमध्ये दर्शविण्यात यावे.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**आयुक्त असे करू शकतात का हे सांगावे.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:—**मा. महापौरजी, माझे मित्र श्री. जमनादास पुरस्वानी ज्याप्रकारे विचारत आहेत की, प्रस्ताव पास झाल्यावर आयुक्त त्याची अंमलबजावणी करणार अथवा नाही ............

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—**आम्ही एवढे बोललो त्याचे आम्हाला उत्तर तर मिळायला हवे.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी बोलत असल्याने नेमके कोण काय बोलत आहे हे कळुन येत नव्हते.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:—**मा. महापौरजी, आमच्या सभागृह नेत्यांनी जे प्रस्ताव ठेवले आहेत ते लवकरात लवकर पास करावेत. काम करणारा सत्ता पक्ष आहे. निर्णय घेतल्यानंतर दुरूस्ती करण्याची आवश्यकता असेल तर तसे देखिल करू.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—**टॅंकरने पाणी घेण्याची आमची अजिबात इच्छा नाही.

**मा. आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—**मा. महापौर महोदया, येथे दोन विषयावर चर्चा झाली. आधी करांचे दर जे कलम ९९ प्रमाणे निश्चित केले आहेत त्यामध्ये काही बदल केले आहेत. जोपर्यंत जकात नियमांचा प्रश्न आहे, तर महापालिकेला ते दर कधीही कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार आहे. परंतु ते कोणत्या तारखेपासुन लागु करायचे हे देखिल महापालिकेला ठरवायचे असते. परंतु आता सभागृहात जी चर्चा झाली त्यामध्ये ते ठरले नाही. दुसरे सभागृह नेता यांनी सांगितले की, यामुळे जे उत्पन्न कमी होईल ते जमा बाजुस वाढविण्यात यावे. असे होवु शकत नाही. जर उत्पन्न कमी होत असेल तर खर्चात देखिल कपात करावी लागेल. कोणत्या खर्चात कपात करायची हे देखिल आपणांस येथे सांगावे लागेल. हे झाले जकाती बाबत. तुमचा प्रस्ताव कायदेशिर आहे. नियम ५ मध्ये तशी तरतुद आहे. कोणत्या तारखेपासुन सुधारित दर लागु करायचे हे फक्त आपणांस आता ठरवायचे आहे. दुसरा पाण्याचा मुद्दा येथे उपस्थित केला. टॅंकरद्वारे होणारा पाणी पुरवठा मोफत करावा असे बोलले गेले. आपणांसमोर आम्ही एक शासन निर्णय ठेवला आहे. प्रशासनाचा एक प्रस्ताव जो स्थायी समितीने व महासभेने फेटाळला होता त्यावर आम्ही शासनाला कलम ४५१ प्रमाणे कळविले होते. आपले ते दोन्ही ठराव विखंडीत झाले आहे. त्याशिवाय झोपडपट्टया जिकडे जलवाहिन्या नाहीत तेथे पाण्याची कमी दुर करण्यासाठी आपणांस मोफत टॅंकर दयायचे असतील तर त्यासाठी देखिल खर्चासाठी आपणांस बजेटमध्ये तरतुद करावी लागेल. आपण फक्त मोफत टॅंकर दयायचे आहेत असा ठराव कराल व बजेटमध्ये खर्चासाठी तरतुद नसेल तर तो खर्च करणे देखिल शक्य होणार नाही. एक तर आपणांस पुर्नसमायोजन करावे लागेल, दुसरा खर्च कमी करून यासाठी तरतुद करावी लागेल. हा निर्णयही आपणांस घ्यायचा आहे. तो निर्णय घेतल्यानंतर आपणांस हे ठरवायचे आहे की, झापडपट्टयांना दयायचे आहे की इमारतींना दयायचे आहे. आणि दयायचे असेल तरी फुकट का दयायचे. जेथे जलवाहिन्या आहेत, पाणी कमी येते. येथे असे होते की इमारतीची दैनिक गरज १०० लीटर असेल व तेथे दररोज ७० लिटर पाणी येत असेल तरी देखिल तेथे टॅंकर मोफत मिळण्याची तेथिल लोक अपेक्षा करतात. हे चुकीचे आहे. जर त्या इमारतीत पुरेशा नळ जोडण्या नसतील व त्यामुळे जर इमारतीत पाणी येत नसेल तरी देखिल लोक फुकट टॅंकर मिळण्याची अपेक्षा करतात हे देखिल चुकीचे आहे. आपल्याकडे जर नविन जलवाहिनी देण्याची क्षमता असेल, त्यानंतर नळाद्वारे पाणी मिळत असेल तर त्या मालमत्ता धारकाला नळाद्वारेच पाणी घ्यायला हवे. येथे मी आपल्या एका गोष्टीशी सहमत आहे की जेथे झोपडपट्टया आहेत, जलवाहिन्या कमी आहेत. तेथे सवलतीच्या दरात अथवा जे गरीब लोक आहेत त्यांना मोफत देण्यात यावे. कारण पाणी ही एक जीवनावश्यक वस्तु आहे. यासाठी त्यांना स्टॅण्ड पोस्ट अथवा टॅंकरद्वारे पाणी दयायला मी सहमत आहे. परंतु जसे यापुर्वी दिले जायचे आता येथे एका सदस्याने उल्लेख केला की त्यांच्या एकटयाच्या प्रभागात ४० टॅंकर्सची आवश्यकता आहे. जर एकाच्या प्रभागात ४० टॅंकर दिले तर, येथे ८० नगरसेवक आहेत, ८०x ४० एवढया टॅंकर्सची लोक अपेक्षा करतील, आपण सर्व लोकप्रतिनिधी अपेक्षा कराल. आणि जर त्याची पुर्तता करायची असेल तर यासाठी आधी वर्षाला सव्वा कोटी खर्च यायचा तो खर्च आता ५—६ कोटीच्या वर जाईल. तर टॅंकर कुठे दयायचे हे धोरण देखिल सभागृहाला

येथे ठरवावे लागेल. तसेच यासाठी मंजुरी प्राधिकरण म्हणुन कोणाला नेमायचे हे देखिल ठरवावे लागेल. आमच्या कार्यकारी अभियंत्यांना जागेवर जावुन पहाणी करून आवश्यकता भासली की येथे नळाद्वारे पाणी देता येवु शकते तर नागरिकांना आपण त्या ठिकाणी नळाद्वारे पाणी घेण्यास बंधनकारक करू शकतो. होवु शकते आम्ही दोन तास पाणी देवु शकत नाही परंतु अर्धा , एक तास देवु शकतो. तुम्हाला महाराष्ट्रातील परिस्थिती सांगतो, महाराष्ट्रात बरीचशी जिल्हयाची ठिकाणे आहेत. जेथे आठवडयातुन एकदा पाणी येते. काही ठिकाणी आठवडयातुन दोन वेळा पाणी येते. येथे आम्ही दररोज पाणी देतो. फक्त काही ठिकाणी दोन तासांच्या जागी अर्ध्या, एक तास येते. काही ठिकाणी चार तासांपेक्षा जास्त आहे. परंतु आपली वितरण व्यवस्थाच तशी आहे. काही ठिकाणी आठ तासही येते. वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी वेळ लागेल. यामध्ये जोपर्यंत सुधारणा होत नाही तोपर्यंत जेथे वितरण वाहिन्या नाहीत त्या ठिकाणी टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणे, जेथे झोपडपट्टया आहेत तेथे टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणे याबाबत आपण धोरणात्मक निर्णय घेवुन प्रशासनाला निर्देश दिले तर प्रशासनातर्फे नक्कीच त्याचे अनुपालन केले जाईल.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः—मा. महापौरजी, माझ्या प्रभागात काही झोपडपट्टयांमध्ये सहा महिन्यापुर्वी जलवाहिन्या टाकलेल्या आहेत. त्या जलवाहिन्यांमध्ये आजपर्यंत पाणी आलेले नाही. मा. आयुक्त साहेब माझ्या प्रभागात आमदार निधीतुन व म्हाडाच्या निधीतुन काही ठिकाणी जलवाहिन्या टाकलेल्या आहेत. त्या जलवाहिन्यामध्ये आजपर्यंत एक थेंबही पाणी आलेले नाही. त्या जलवाहिन्या तशाच्या तशा आहेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—मा. महापौर महोदया, याचा अर्थ आज विशेष महासभेद्वारे येथे जो प्रस्ताव आणला आहे की, कर वाढीत अंशत: बदल व टॅकर बाबत. आयुक्तांच्या म्हणण्याप्रमाणे आपण हे केल्यास याचा परिणाम बजेटवर होणार आहे. जर आमचे उत्पन्न कमी करत असू तर खर्चातही कपात करावी लागेल. म्हणजे आता जो प्रस्ताव आहे तो अर्धवट आहे यासाठी आपणांस पुन्हा महासभा बोलवावी लागेल. दुसरे म्हणजे आयुक्त साहेब बोलले की कार्यकारी अभियंता पहाणी करतील व जेथे आवश्यकता आहे तेथे टॅकर देतील. याच्याशी आम्ही सहमत आहोत. तेथे महापौर व पाणी पुरवठा सभापती जावु शकत नाहीत. यापुर्वीही आम्ही बोललो की हे आयुक्तांचे अधिकार आहेत, कार्यकारी अभियंता यांचे अधिकार आहेत ते त्यांच्याच हातात राहायला हवेत. याला राजकीय विषय बनवायला नको. पाण्याला रंग असता कामा नये. यासाठी प्रशासनाचे जे काम आहे जेथे पाणी जात नाही तेथे त्यांचे पथक जाईल. पाणी येत असेल तर टॅकर बंद करतील. पाणी नसेल तर टॅकर चालु करतील. परंतु आमची मागणी अशी आहे की, लोकांना पाणी मिळायला हवे यासाठी प्रशासनाने जास्तीत जास्त प्रयत्न करावेत. नळाद्वारे पाणी मिळायला हवे.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—मा. महापौरजी, आज ही जी चर्चा झाली त्याबाबत मी खुलासा करू इच्छितो की दोन वेळा मी महासभेत बोललो की हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता आजपासुनच लागु होईल. हे मी आधीच सांगितले आहे. दुसरे म्हणजे दरवर्षी आम्ही मालमत्ता कराची वसुली रूपये ५० कोटी एवढी दाखवतो. पाणी पट्टी रू. ४५ कोटी दाखवतो. यावेळी आम्ही ती कमी दाखवली आहे. रू. २५ कोटी व त्यापेक्षा कमी दाखवली आहे. तर मी असा खुलासा केला की टॅकर मोफत दिल्याने व जकातीचे दर कमी केल्याने जे नुकसान होईल ते मालमत्ता कर वसुलीमध्ये जी दरवर्षी आम्ही रू. ४५ ते ५० कोटी ठेवतो. ती आता थोडी वाढविण्यात यावी. २५ चे २६ कोटी होतील. जर दोन कोटी वाढले तर २७ कोटी होईल. परंतु मागच्या वर्षी पेक्षा कमी असतील. दुसरे म्हणजे मी आज जो प्रस्ताव दिला तर कार्यकारी अभियंता जावुन पहाणी करतील की आवश्यकता आहे अथवा नाही. परंतु मा. महापौर व पाणी पुरवठा सभापती हे ज्या ठिकाणी पाण्याची कमतरता असेल तेथे टॅकर दयायला सांगु शकतात. यामध्ये भेदभाव केला जाणार नाही. आज मी जसा प्रस्ताव ठेवला आहे तसाच पास व्हायला हवा. आता यावर चर्चा फार झाली आपण मतदान घेवु शकता. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—आम्ही आमचा प्रस्ताव ठेवला आहे. जर त्यावर सहमती असेल तर आम्ही आपल्या बरोबर आहोत. अन्यथा आपल्या प्रस्तावाला आमचा विरोध आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—मी आधीच बोललो की मतदान घ्यावे.

मा. महापौरः—टॅकरच्या विषयावर मागील अर्ध्या तासापासुन जी चर्चा चालु आहे. दरवर्षी उन्हाळयात पाण्याची टंचाई निर्माण होते. ही गोष्ट लक्षात घेवुन ३० जुन पर्यंत शहरात मोफत टॅकर देण्यात यावेत. ज्या विभागात जलवाहिन्या

नाहीत अथवा जेथे पाण्याची टंचाई आहे. अशा विभागात टॅंकर देण्यात यावे. बजेटमध्ये देखिल याची तरतुद करण्यात येईल. जकाती बाबत सभागृहाने जो प्रस्ताव दिला आहे तो देखिल मंजुर केला जात आहे.

**मा. सदस्य श्री. रोहडा श्यामसुंदर, श्री. साधवानी मनोज व श्री. होशियारसिंग लबाना हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मा. महापौर महोदया, अशा प्रकारे जो टॅंकर वरील खर्च वाढेल व जकात वसुली कमी होईल तर जो शिल्लकीचा रूपये पाच लाखाचा अर्थसंकल्प होता तो तुटीचा होईल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मी आधीच सांगितले की, मालमत्ता कर वसुली तेवढी रक्कम जास्त दर्शविण्यात येईल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—किती रक्कम कमी होईल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—तुम्हाला माहित नाही का यापुर्वी देखिल बजेट अशाच प्रकारे वाढविण्यात आले होते. शहराचे काहीही होवु दया तुम्हाला फक्त आकडे वर खाली करायचे आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—ते मी श्री. लाल पंजाबी यांच्याकडुन शिकलो आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—आम्ही अशा गोष्टी शिकवत नाही.

मा. महापौर:—जकातीचे दर जे आम्ही आता कमी केले आहे त्यासाठी नियमाप्रमाणे सात दिवसाची नोटीस दिली जाईल व त्यांनतर १५ मे पासुन त्याची अंमलबजावणी केली जाईल.

मा. सचिव:—आपले या प्रस्तावाला समर्थन आहे का?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—आम्ही आमचा प्रस्ताव दिला आहे. संपुर्ण करवाढ रद्द करण्यात यावी.

मा. सचिव:—म्हणजे आपला प्रती प्रस्ताव आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—होय. आमचा प्रती प्रस्ताव आहे. आम्ही कोणत्याही प्रकारच्या करवाढीस विरोध करतो.

मा. सचिव:—मतदान घ्यावे?

मा. महापौर:—सचिव साहेब, मतदान घ्या.

मा. सचिव:—जे सदस्य श्री लाल पंजाबी व श्री राजेंद्रसिंह भुल्लर यांच्या प्रस्तावाच्या बाजुने आहेत व सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

*१२ मते*

१. श्रीमती मोकल सिमा चंदाराम
२. श्री. उमाप रामदास
३. श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद
४. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
५. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह
६. श्रीमती बामणकर नंदीनी
७. श्रीमती खांडेकर प्रेमा
८. श्री. चव्हाण रमेश
९. श्री. बोडारे धनंजय

१०.श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहीदास
११.श्री. चौधरी राजेंद्र शांताराम
१२.श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल

<u>मा. सचिव:—</u>जे सदस्य श्री लाल पंजाबी व श्री राजेंद्रसिंह भुल्लर यांच्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत व सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>*३५ मते*</u>

१. श्री. टेकचंदानी राजु
२. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर
३. श्रीमती कालानी ज्योती
४. श्री. एडके गणपत गोविंद
५. श्री. मोकल चंदाराम विठोबा
६. श्रीमती शर्मा कमला गंगाधर
७. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
८. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
९. श्रीमती गुप्ता अनिता धर्मेन्द्र
१०.श्री. नाना आनंदा पवार
११.श्री. जग्यासी राजु
१२.श्री. ठाकुर विनोद लालसिंग
१३.श्रीमती सोनेजी मीना (सोंडे)
१४.श्रीमती मसंद माया घनश्यामदास
१५.श्री. सुरेश नामदेव गायकवाड
१६.श्रीमती वनवारी मोना अशोक
१७.श्री. वनवारी किशोर नारायणदास
१८.श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१९.श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
२०.श्रीमती भावना रवी खिलनानी
२१.श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ
२२.श्री. सुरेश जाधव
२३.श्री. देंवद्रसिंग खेमाणी
२४.श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल
२५.श्री. भालेराव गौतम यशवंत
२६.श्री. ठाकुर अशोक भगवानदास
२७.श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
२८.श्रीमती पंजाबी दिपा नारायण
२९. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
३०. श्री. विनोद तलरेजा
३१. श्रीमती छाब्रिया भारती
३२. श्रीमती रिझवानी सुजाता रमेश
३३. श्रीमती मीनु दासानी
३४. श्री. लाल बिहारी यादव
३५. श्री. बेहरानी मोहन

<u>मा. महापौर:—</u>विरोधी पक्षातर्फे सादर करण्यात आलेला खालील प्रती प्रस्ताव बहुमताने अमान्य करण्यात येत आहे.

प्रस्तावकाचे नांव : श्री लाल पंजाबी

अनुमोदकाचे नांव : श्री राजेंद्रसिंह भुल्लर

प्रस्तावना:—

शिवसेना भाजपा युतीचे वतीने प्रस्ताव देण्यात येतो की, महासभा ठराव क्र. ६७, दिनांक १८/२/२००५ मध्ये अंशत: बदल करणेबाबतचा विषय विशेष महासभेसमोर ठेवण्यात आलेला असुन त्यामध्ये वाढ केलेली जकात दरवाढ, मालमत्ता करवाढ, पाणीपट्टी दरवाढ, पाणी टॅकर भाडे व विशेष सफाई कर ही संपूर्ण वाढ रद्द करुन पूर्वीप्रमाणेच लागू असलेले दर कायम ठेवावेत. म्हणुन महासभेपुढे प्रस्तावित.

विशेष महासभा ठराव क्र: ९३अ दिनांक:—०८/०४/२००५.

ही महासभा ठराव क्र. ६७, दिनांक १८/२/२००५ अन्वये करण्यात आलेली जकात, मालमत्ताकर, विशेष सफाई दर, टॅकरभाडे ही दरवाढ पूर्णपणे रद्द करण्यास मान्यता देत नाही.

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. महापौर:—सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव खालीलप्रमाण बहुमताने संमत करण्यांत येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र. १:— महासभा ठराव क्र ६७, दिनांक १८/२/२००५ मध्ये अंशत: बदल करणे.

स्थायी समितीने दिनांक ९/२/२००५ चा ठराव क्र. १५८ प्रमाणे सन २००५—०६ चे रु. ६५,९६ लाख शिलकीचा अर्थसंकल्पीय अंदाज तयार केला होता. त्या अनुषंगाने काही वस्तुंवर जकातीचे दर वाढवणे, टॅकरद्वारे करण्यात येणा—या पाणी पुरवठयावर वाहतुक खर्च आकारणे व मालमत्ता करात दरवाढ करणे प्रस्तावित केले होते. महानगरपालिकेने दिनांक १८/२/२००५ चा ठराव क्र. ६७ अन्वये काही वस्तुंच्या जकातदरात वाढ, टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणेकामी वाहतुक खर्च आकारणे व मालमत्ता करा संबधात पथकर, पाणी पुरवठा लाभकर व विशेष साफसफाई कर या तिनही करात दरवाढ निश्चित केली होती. उल्हासनगर महानगरपालिका दिनांक १/४/२००५ पूर्वी टंचाईग्रस्त भागात टॅकरद्वारे मोफत पाणी पुरवठा करीत होती. दिनांक १/४/२००५ नंतर प्रत्येक टॅकरवर रु २५० व रु ३०० अशाप्रकारे दर आकारण्याचे निश्चित झाले होते. दिनांक १/४/२००५ नंतर महापालिकेने प्रत्येक टॅकरवर रु २५० व रु ३०० आकारणे सुरु केल्यानंतर शहरात पाण्याची टंचाई असल्याने लोकांच्या असंतोषाला तोंड द्यावे लागत होते. टंचाईग्रस्त भागातील मोफत पाणी पुरवठा बंद केल्याने तेथील जनतेची पाणी पुरवठयाअभावी कुचंबणा होत आहे. त्यामुळे टॅकरद्वारे करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठयावरील वाहतुक खर्च मागे घेणे आवश्यक आहे.

तसेच दिनांक १/४/२००५ पासून उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ अनुसूची १ मधील वस्तु गट क्रमांक १३, ३८अ, ४०ब, ५३क, ६१, ६५, ७१ व ७७ या वस्तुंवरील जकात दरात वाढ करण्याचा प्रस्ताव मान्य केला होता. वस्तु गट क्रमांक ३८अ (सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलिअम पदार्थ) व ४० ब (सर्व प्रकारचे केमिकल्स) या औद्योगिक वापराशी संबधित असुन त्याचा वापर मुख्यत्वे कच्च्या मालासाठी केला जात आहे. तसेच याचा वापर औद्योगिक क्षेत्रात मोठया प्रमाणावर होत असल्याने व्यापारी वर्गातुन सदर बाबींवरील

जकात दरवाढीस मोठया प्रमाणावर विरोध व्यक्त होत आहे. व्यापा—यांनी सदर बाबींवरील जकात दर कमी करण्यासाठी अभिवेदन दिलेले असल्याने त्यावर फेरसुधारणा होणे आवश्यक आहे.

वरील बाबी विचारात घेवुन यापूर्वी महासभा ठराव क्र. ६७, दिनांक १८/२/२००५ मध्ये अंशत: बदल करण्यासाठी प्रस्ताव.

<u>विशेष महासभा ठराव क्र: ९४</u>                    <u>दिनांक:—०८/०४/२००५.</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता खालील प्रयोजनासाठी महासभा ठराव क्र. ६७, दिनांक १८/२/२००५ मध्ये अंशत: बदल करीत आहे.

- दिनांक ३०/०६/२००५ पर्यंत टंचाईग्रस्त भागात टॅकरने करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठयावर वाहतुक खर्चाची आकारणी न करता मोफत पाणी पुरवठा करण्यास मान्यता देत आहे.
- दिनांक १५/०५/२००५ पासून सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलिअम पदार्थ या वस्तुंवर जकात दर २.७०% या दराने लागु करण्यास फेरनिश्चित करीत आहे.
- दिनांक १५/०५/२००५ पासून सर्व प्रकारचे केमिकल्स या वस्तुंवर जकात दर ३.४५% या दराने लागु करण्यास फेरनिश्चित करीत आहे.
- उपरोक्त करांच्या दरात फेरनिश्चितीमुळे व टॅकरद्वारे पाणी पुरवठयावर दिनांक ३०/०६/२००५ पर्यंत वाहतुक खर्चाची आकारणी न केल्याने सन २००५—०६ या वर्षातील उत्पन्न व खर्चाचा मेळ बसविण्यासाठी आवश्यक असेल तेव्हा महापालिकेने जमा खर्चाचे पुर्नसमायोजन करणेस व अर्थसंकल्पीय अंदाजात परिणामी उपाययोजनांस स्विकृती देत आहे.
- या ठरावाद्वारे ज्या सुधारणा करण्यात आल्या आहेत त्या पूर्वीचा महासभा ठराव क्र. ६७, दिनांक १८/२/२००५ चा भाग मानण्यात येतील.

सदरहु ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता करण्यात यावी.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:—</u>मा. महापौरजी, टॅकर कधी पासुन सुरू होणार? आज पासुन चालु होणार की उदयापासुन?

<u>मा. सचिव:—</u>कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.५० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२८ एप्रिल , २००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२८/४/२००५ रोजीच्या
विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा गुरूवार दि. २८.४.२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. उपमहापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३३. | श्री. जेसवानी सतराम फतनदास |
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३४. | श्रीमती जया साधवानी |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३५. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु | ३६. | श्रीमती भावना रवी खिलनानी |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३७. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३८ | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ३९ | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ४० | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४१ | श्री. सुरेश जाधव |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४२. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४३. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १३ | श्री. एडके गणपत गोविंद | ४४. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १६. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४७ | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४८. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४९. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५०. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २०. | श्रीमती गुप्ता अनिता धर्मेन्द्र | ५१. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २१. | श्री. नाना आनंदा पवार | ५२. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २२. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५३. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २३. | श्री. जग्यासी राजु | ५४. | श्रीमती किरण लखी माखिजा |
| २४. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५५. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २५. | श्री. शांताराम निकम, | ५६. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २६. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५७. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५८. | श्रीमती करोतिया मालती |
| २८. | श्रीमती मसंद माया घनश्यामदास | ५९. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| २९. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६०. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३०. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६१. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६२. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३२. | श्री. साधवानी मोहन | | |

तर,

१. मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी मा.सदस्य / सदस्या २. श्री. ठाकुर विनोद लालसिंग, ३. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन,४. श्रीमती श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर, ५.श्रीमती. जयश्री सुर्वे, ६. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी, ७. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, ८. श्री. ठाकुर अशोक भगवानदास, ९.श्री. चौधरी राजेंद्र शांताराम, १०. श्रीमती. भटीजा कोमल अमृत, ११. श्री. जयसिंघानी अनिल, १२. श्री. रामरख्यानी मोहनदास , १३. श्रीमती. छाबरीया भारती पहलाज, १४. श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश १५. श्री. संजय रामचंद्र बठीजा, १६. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, १७. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास , १८. श्री. हरदास माखिजा, १९. श्री. वदरीया राजेश नानिकराम हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. २२ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**मा. उपमहापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.**

**मा. सदस्य श्री. मोहन साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सचिवः—विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १ :— महासभा ठराव क्र ९४, दिनांक ८/४/२००५ मध्ये अंशत: बदल करणेचा प्रस्ताव——उपरोक्त ठरावाप्रमाणे सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलिअम पदार्थ व सर्व प्रकारचे केमिकल्स या वस्तुंवरील सुधारित जकात दर दिनांक १५/५/२००५ ऐवजी दिनांक १/५/२००५ पासुन लागु करणे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—मा. महापौरजी, आम्ही या प्रस्तावास या अगोदरच विरोध केलेला आहे. आता तर आपण केवळ तारीख बदली करत आहात. परंतु या अगोदरचा जो मुळ प्रस्ताव होता त्यास आम्ही विरोध केला होता व आम्हाला असे वाटत होते की ही जी जकात वृध्दी आहे ती केवळ या दोन बाबींवर कमी न करता ती सर्व बाबींवरील जकात वृध्दी रद्द केली जावी. आणि यासाठी आम्ही या ठरावाचा सुध्दा विरोध करत आहोत. कारण की जो मुळ ठराव आहे त्यालाच आमचा विरोध आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, सभागृहात आज विशेष महासभेचे आयोजन केले आहे. या सभेपुढे दोन विषय आहेत. एक विषय हा आहे की, काही जकातीच्या बाबींवर आम्ही जकात दर कमी केले होते. त्यासाठी जी कालमर्यादा निश्चित केली होती मला वाटते की, ती कालमर्यादा जास्त आहे. जो काही ठराव आहे त्याची अंमलबजावणी ७ दिवसात होवु शकत होती. सभागृहातील सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की, जकात विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी आजपासुनच झाली पाहिजे. या दोन्ही दरामधील जो फरक आहे तो आजपासुन त्यांना मिळाला पाहिजे. आज नाही उदयापासुनच सुरूवात होईल. ७ दिवस झाले म्हणजे उदयापासुनच सुरूवात झाली पाहिजे. साहेब, आजपासुन कसे होईल उदया पासुन कसे होईल,व्हायचे आहे ते होईल. तर या ठरावाची अंमलबजावणी जी आहे ती उदयापासुन झाली पाहिजे. दुसरा जो कर वाढीचा प्रस्ताव आहे. जो ठराव महासभेने केला होता त्यास आयुक्तांनी...........

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—पहिल्या ठरावावर तर निर्णय होवु दया. त्यानंतर दुस—या ठरावाबाबत आपण बोला.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—एकेक ठरावावर चर्चा करू या.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—होय या प्रमाणेच.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मी बोललो तर, यापुढे बरीच चर्चा व्हायची आहे.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—आयुक्त साहेब आपण स्पष्टीकरण करा.

मा. आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदय, मागील वेळेस सुध्दा मी म्हंटले होते की, दर वाढविण्याचा अधिकार महासभेला आहे. परंतु ते कोणत्या तारखेपासुन लागु होतील ते महासभेने ठरवायचे आहे. व ते लागु होण्याअगोदर काही कार्यपध्दती पुर्ण करायची आहे. आपण लोकांनी ते नियम पाहिले पाहिजेत नियम पाच हा जो आहे त्यानुसार जो ठराव पारीत होईल त्या ठरावास प्रसिध्दी दयायची आहे. व त्यानंतर तो कोणत्या तारखेपासुन लागु होईल. वर्तमानपत्रामध्ये याबाबत जी नोटीस प्रसिध्द होईल त्या नोटीसमध्ये ही तारीख प्रसिध्द केली जाईल की कोणत्या तारखेपासुन ठराव लागु होईल. आज आपण म्हणत आहात आजपासुन लागु करा. उदयापासुन लागु करा. सभागृह नेताजी नियमांमध्ये ही जी तरतुद आहे त्याची पुर्तता करणे हे प्रशासनाचे काम आहे. त्यासाठी प्रशासनास काही दिवसांचा कालावधी मिळाला पाहिजे. भलेही आपण आज ठराव पारीत कराल की उदयापासुन लागु करा. परंतु ठराव आमच्याकडे आल्यानंतर तो स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यासाठी जेवढा काही कालावधी पाहिजे. लोकांना त्याबाबतीत माहिती होण्यासाठी जेवढा काही वेळ पाहिजे. आमचे जकात विभागाचे जे कर्मचारी आहेत.जे जकातीची आकारणी करणार आहेत. त्यांच्याकडे आदेश पोहचण्यासाठी जो कालावधी पाहिजे. तेवढा तरी दिला पाहिजे?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—महापौर महोदय, आयुक्त साहेबांनी सांगितले की जे दर कमी करायचे आहेत त्याबाबत वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी दयायची आहे. आपल्या कर्मचा—यांना कळवायचे आहे. लोकांना सांगायचे आहे, परंतु जर आम्हाला जकात दर वाढवायचा असेल तर लोकांना कळविले पाहिजे कारण की तोपर्यंत ते जकात दर देणार नाहीत. परंतु जकात दर कमी करायचे असल्याने ही त्यांच्यासाठी आनंदाची गोष्ट आहे. जर ते ४ टक्के दराने जकात भरत असतील आणि त्यांच्याकडुन जर आता सव्वा तीन टक्क्यांनी जकात आकारली जाणार असेल तर त्यांच्यासाठी काही त्रासाचे नाही. यासाठी हे अतिशय कमी वेळेमध्ये होवु शकते. आपल्या संबंधित विभागास फक्त सांगायचे आहे व जकातीचा दर कमी करायचा आहे. त्यामुळे नागरिक खुश होणार आहेत. याबाबतीत थोडयाच वेळात लोकांना माहित पडेल. याबाबत कार्यवाही जेवढया लवकर होवु शकत असेल तेवढया लवकर केली जावी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, आता सभागृहात आम्ही लोक जकातीच्या विषयाबाबत चर्चा करत आहोत. पहिल्या याबाबतीत निश्चित झाले होते की, १५ मे पासुन कार्यवाही केली जाईल. त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी आम्ही ही सभा बोलावली आहे. परंतु त्या प्रस्तावाच्या प्रस्तावनेमध्ये १ मे पासुन कार्यवाही केली जावी असे दिले आहे. ठिक आहे. १ मे पासुन हा प्रस्ताव लागु केला जावा. व व्यापा—यांना फायदा दिला जावा. धन्यवाद.

**मा. सदस्या श्रीमती किरण माखिजा हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—मा. महापौरजी, मी आपणांकडुन दोन मिनिटाची वेळ घेवु इच्छितो. उल्हासनगरमध्ये कुण्या नगरसेवकाने चुकीचे काम केले आहे. त्याचा मी येथे उल्लेख करू इच्छितो.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—प्रत्येकाच्या घरचा वैयक्तिक प्रश्न आहे. येथे आमच्या माता, भगिनी बसलेल्या आहेत. येथे असे घाणेरडे शब्द बाहेर पडतील की, त्यांना येथून बाहेर जावे लागेल. म्हणून वर्तमानपत्रामध्ये छापुन आलेल्या बातमीचे कात्रण सभागृहात वाटप करण्याची व याबाबतीत सभागृहात निवेदन करण्याची अशी परवानगी कुणालाही दिली जावू नये.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— हे आजच्या वर्तमानपत्रामध्ये छापुन आलेले आहे.

यावेळी विरोधी पक्षातील काही सन्माननिय सदस्य आपापल्या आसनाजवळ उभे राहुन जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे कळुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—वर्तमानपत्रामध्ये बरेचसे छापुन येते. या अगोदर सुध्दा ब—याच वर्तमानपत्रामध्ये काही काही छापुन आले आहे ती वर्तमानपत्रे आणु का?

**मा. सदस्य श्री. शांताराम निकम व श्री.सुरेश जाधव आणि श्री. प्रशांत जाधव हे सभागृहातुन बाहेर गेले**

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—आपण राजकारण खेळता, चुकीचे धंदे करता. महिलांबरोबर अत्याचार होत आहेत.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—ते त्यांचे घरचे प्रकरण आहे ते येथे कशाला आणता?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—यापुढे असे होईल की कुणीही माता, भगिनीस निवडणूक लढविण्यात लाज वाटेल.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—कृपया आपण बसुन घ्या.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—घरगुती प्रकरण आपण येथे कशाला आणता?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—महिलांवर अत्याचार होत आहेत.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—श्री. नारायण पंजाबीजी, कृपया आपण बसुन घ्या.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—महिलांनी तर शेम, शेम असे म्हंटले पाहिजे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—महापौर महोदय, आयुक्त साहेब, मला वाटते जकात दर निश्चित करण्यासाठी ही तिसरी सभा आहे. बहुमताच्या जोरावर आपण ठराव पारीत करता, या लोकांना वारंवार अशा कितीवेळा आपण आशा दाखवाल. आज जे आपण बहुमताच्या जोरावर दर निश्चित करत आहात ते तरी अंतिम आहेत काय? नाहीतर त्यासाठी सुध्दा पुन्हा दुरूस्ती करण्यासाठी, दुरूस्ती करण्यासाठी मागील सभेत यासाठी एक समिती स्थापन केली होती. त्या समितीचे संशोधन एक वर्षापर्यंत चालु होते. प्रशासनाने आपली कार्यवाही केली तर आज आपण बहुमताच्या जोरावर नेहमी ज्या चुका करता त्याप्रमाणेच करत आहात की लोकांना काही फायदा देत आहात? आजच्या सभेत ज्यास अंतिम स्वरूप दयाल ते अंतिम असेल का? किंवा त्यासाठी पुन्हा आणखी एखादी सभा बोलवावी लागेल? एखादी विशेष महासभा........

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—महापौर महोदय, आताच आमच्या सन्माननिय सदस्यांनी म्हंटले की बहुमताच्या जोरावर आपण चुकीची कामे करत असता. सत्ताधारी पक्षात बसलो असल्यामुळे याबाबत मला आक्षेप आहे. बहुमताच्या जोरावर कोणतेही चुकीचे काम करत नाही. बहुमताच्या जोरावर आम्ही जे काही करत आहोत ते जनतेच्या हिताचे करत आहोत. व्यापा—यांचे हिताचे करत आहोत. समाजाच्या हिताचे करत आहोत. यासाठी आमच्यावर हे जे आरोप लावले जात आहेत की, आम्ही बहुमताच्या जोरावर चुकीची कामे करत आहोत. याबाबत मी येथे तीव्र आक्षेप नोंदवु इच्छितो की आम्ही कोणत्याही प्रकारचे चुकीचे काम करत नाहीत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—लालवानीजी, चुकीचे आहे म्हणुन तर शासनाने तो ठराव विखंडीत केला आहे. तो जर बरोबर असता तर शासनाने विखंडीत केला नसता. आपलेच शासन आहे, आपल्याच शासनाने आपला ठराव विखंडीत केला तो चुकीचा होता म्हणुनच विखंडीत केला.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—हे पहा जर मी माझ्या हातावर इंग्रजीत ९ हा आकडा लिहून आपणांस दाखविला तर तो आपणांस इंग्रजीतील ६ आकडा दिसेल. व मला तोच आकडा ९ असा दिसेल. म्हणुन हा आपण ज्या ठिकाणी बसतो त्या जागेचा फरक आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—आपला हा ६ चा आकडा आपल्याकडेच ठेवा.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—आपण त्यास ६ म्हणा परंतु तो आमचा ९ चा आकडा आहे. म्हणुन बहुमताच्या जोरावर आम्ही जे काही करत आहोत ते जनतेच्या हिताचे करत आहोत. जनतेने राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस व आरपीआयला बहुमत दिले आहे. जनतेच्या बाबतीत आम्ही पुर्णपणे जबाबदार आहोत. व तेवढी नैतिक जबाबदारी आम्ही समजतो.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—ठिक आहे. मतदान घेतले जावे.

मा. सचिवः—विषयात उल्लेख केलेल्या वस्तुंवर दि. १.५.०५ पासून जकात दर लागू करण्यास व सन २००५—२००६ करिता इतर वस्तुंवर निश्चित केलेली जकात दर वाढ कमी करण्यास सहमत नाहीत अशा सन्माननिय सदस्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या बाजुने :— ३५ मते

१. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२. श्रीमती रामचंदानी भावना
३. श्री. लिंगे सुर्यकांत
४. श्री. वाघे शामु
५. श्री. ऐडके गणपत
६. श्रीमती. शर्मा कमला
७. श्री. वलेचा पृथ्वी
८. श्री. रोहडा श्यामसुंदर
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ
१०. श्रीमती गुप्ता अनिता
११. श्री. पवार नाना
१२. श्रीमती आहुजा निता
१३. श्री. राजु जग्यासी
१४. श्रीमती. सोनेजी मीना
१५. श्रीमती मंसद माया
१६. श्री. गायकवाड सुरेश
१७. श्रीमती वनवारी मोना अशोक
१८. श्री. वनवारी किशोर नारायणदास
१९. श्री. जेसवानी सतराम पुनमदास
२०. श्री. लुंड गोविंदराम
२१. श्रीमती खिलनानी भावना
२२. श्रीमती कारीरा रेखा
२३. श्री. पमनानी ईश्वर
२४. श्री. पंजाबी नारायण
२५. श्रीमती पंजाबी दिपा
२६. श्री. साधवानी मनोज
२७. श्री. लबाना होशियारसिंग
२८. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
२९. श्री. तलरेजा विनोद
३०. श्रीमती नाथानी नीना
३१. श्रीमती. दासानी मिनु
३२. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
३३. श्री. लालबिहारी यादव
३४. श्री. टाले प्रमोद
३५. श्री. मुलचंदानी महेंद्र

मा. सचिवः—व जे सन्माननिय सदस्य सन २००५—२००६ करिता इतर वस्तुंवर निश्चित केलेली दर वाढ कमी करण्यास सहमत आहेत व विषयात उल्लेख केलेल्या वस्तुंवर दि. १.५.२००५ पासुन जकात दर फेर निश्चितीस समर्थनिय नाहीत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—प्रस्तावाच्या विरोधातच नाही तर आम्ही संपुर्ण जकात वाढीच्या विरोधात आहोत.

मा. सचिवः—होय. आपले जे म्हणणे आहे ते तेच आहे. आपणांस जकातीच्या कोणत्याही बाबींवर जकात वृध्दी नको आहे ना?

प्रस्तावाच्या विरोधात १४ मते

१. श्रीमती. जावळे संगिता
२. श्री. उमाप रामदास
३. श्री. पुरस्वानी जमनादास
४. श्री. रूपचंदानी बच्चाराम
५. श्रीमती. कृष्णानी रेखा
६. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
७. श्री. सोनावणे नथु
८. श्री. गायकवाड दिलीप
९. श्रीमती खांडेकर प्रेमा
१०. श्रीमती माने किरण
११. श्री. चव्हाण रमेश
१२. श्री. धनंजय बोडारे
१३. श्री. पाटील विश्वनाथ
१४. श्रीमती. ससाणे लक्ष्मी

कॉंग्रेसची ३ मते तटस्थ

१. श्रीमती साधवानी जया
२. श्री. भालेराव गौतम
३. श्रीमती करोतिया मालती

मा.उपमहापौर तथा पीठासीन अधिकारीः—सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यात येत आहे.

विषय क्र. १:— महासभा ठराव क्र ९४, दिनांक ८/४/२००५ मध्ये अंशत: बदल करणेचा प्रस्ताव——उपरोक्त ठरावाप्रमाणे सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलिअम पदार्थ व सर्व प्रकारचे केमिकल्स या वस्तुंवरील सुधारित जकात दर दिनांक १५/५/२००५ ऐवजी दिनांक १/५/२००५ पासुन लागु करणे.

प्रस्तावना:—

स्थायी समितीने दिनांक ९/२/२००५ चा ठराव क्र. १५८ प्रमाणे सन २००५—०६ चे रु. ६५,९६ लाख शिलकीचा अर्थसंकल्पीय अंदाज तयार केले होता. त्या अनुषंगाने काही वस्तुंवर जकातीचे दर वाढवणे, टॅकरद्वारे करण्यात येणा—या पाणी पुरवठयावर वाहतुक खर्च आकारणे व मालमत्ता करात दरवाढ करणे प्रस्तावित केले होते. महानगरपालिकेने दिनांक १८/२/२००५ चा ठराव क्र. ६७ अन्वये दिनांक १/४/२००५ पासून उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ अनुसूची १ मधील वस्तु गट क्रमांक १३, ३८अ, ४०ब, ५३क, ६१, ६५, ७१ व ७७ या वस्तुंवरील जकात दरात वाढ करण्याचा प्रस्ताव मान्य केला होता. वस्तु गट क्रमांक ३८अ (सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलिअम पदार्थ) व ४० ब (सर्व प्रकारचे केमिकल्स) या औद्योगिक वापराशी संबधित असुन त्याचा वापर मुख्यत्वे औद्योगिक क्षेत्रात मोठया प्रमाणावर होत असल्याने व्यापारी वर्गातुन सदर बाबींवरील जकात दरवाढीस मोठया प्रमाणावर विरोध व्यक्त होत होता. त्यामुळे विशेष महासभा ठराव क्र. ९४, दिनांक ८/४/२००५ अन्वये सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलिअम पदार्थ व सर्व प्रकारचे केमिकल्स या वस्तुंवरील सुधारित जकात दर १५/५/२००५ लागु करणेत आले होते. परंतु आता सदरचे सुधारित जकात दर दिनांक १५/५/२००५ ऐवजी दिनांक १/५/२००५ पासुन लागु करणेकामी विशेष महासभा ठराव क्र. ९४, दिनांक ८/४/२००५ मध्ये अंशत: बदल करणेसाठी प्रस्तावित.

विशेष महासभा ठराव क्र: ८ दिनांक:—२८/०४/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलिअम पदार्थ व सर्व प्रकारचे केमिकल्स या वस्तुंवरील सुधारित जकात दर दिनांक १५/५/२००५ ऐवजी दिनांक १/५/२००५ पासुन लागु करणेकामी पूर्वीचा विशेष महासभा ठराव क्र ९४, दिनांक ८/४/२००५ मध्ये अंशत: बदल करण्यास मान्यता देत आहे. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावांतर्गतच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:—विषय क्र. २ वाचून दाखवितात.

विषय क्र. २ :—उल्हासनगर शहरातील मालमत्ता कराचे आकारणीसाठी पात्र असलेल्या इमारतींचे व जमिनींचे आयुक्तांनी ठरविलेले करयोग्य मुल्य संबधातील महासभा ठराव क्र. ४, दिनांक १९/५/२००४ शासनाने विखंडीत केला असुन त्या संबधात योग्य तो निर्णय घेणे.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—सर्व संमतीने पारीत?

मा. सचिव:—विरोधी पक्षाच्या सन्माननिय सदस्यांकडुन प्रति प्रस्ताव आलेला आहे. तो असा आहे.

सन २००३—२००४ पासून ज्या खाजगी मालमत्तामध्ये बदल करून नव्याने बांधण्यात आल्या किंवा मालमत्तेचे क्षेत्र वापर बांधकाम प्रकार यात बदल झाला अश्या मिळकतीवर सुधारीत दर लागु केले आहेत परंतु सदरचा दर रद्द करून सन १९९६—१९९७ या सरकारी वर्षात लागु असलेले कर योग्य मुल्यांकाचे दर लागु करणेसाठी महासभा ठराव क्र. ४ दि. १९.५.२००४ पारीत करण्यात आला. सदर ठराव शासनाने विखंडीत केल्याने महापालिकेतर्फे शासनास अपील करण्यात यावे. व करमूल्यांकना विरूध्द न्यायालयात याचिका दाखल केलेल्या याचिकाकर्त्यांना पाठिंबा जाहिर करून सन १९९६—९७ या सरकारी वर्षातील लागू असलेले कर योग्य मुल्यांकनाचे दर लागु करणेत यावेत. व सन १९९६—९७ सालचे (पुर्वीचे) दर कायम ठेवण्यात यावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—कर कमी करण्याबाबतची आजची जी प्रस्तावना / ठराव दिला आहे. या अगोदर मालमत्ता करामध्ये १ रू. सुध्दा वाढ करू नये अशाप्रकारचा ठराव सर्व पक्षांनी सर्व संमतीने पारीत केला होता. ज्यास शासनाने विखंडीत केला आहे. त्याबाबत मी खुलासा करू इच्छितो की, आपण महाराष्ट्र शासनाअंतर्गत आहोत व तो जो ठराव विखंडीत झाला आहे तो केवळ आमचा ठराव नव्हता. तर तो सर्व पक्षांचा होता. महाराष्ट्र शासनाने जो ठराव विखंडीत केला तसाच दुसरा ठराव आणु शकत नाहीत, या विरोधात आमचे काही लोक

न्यायालयात गेले होते. पंरतु त्यांना न्यायालयाकडुन अंतरिम आदेश अदयाप प्राप्त झालेला नाही. याचिका केवळ दाखल करून घेण्यात आलेली आहे. यावर निर्णय कधी होईल हे सांगता येत नाही पंरतु जो काही निर्णय येईल. तो आपणां सर्वांना स्विकारावा लागेल. मग भलेही ती लोकनियुक्त बॉडी असो महाराष्ट्र शासन असो किंवा आयुक्त साहेब असो त्यांना न्यायालयाचा आदेश मान्य करावाच लागेल. त्या ठरावाची जर अंमलबजावणी करण्याची वेळ आली तर सर्वात जास्त आनंद आम्हाला होईल. पंरतु तोपर्यंत तसाच ठराव सभागृहापुढे आणणे योग्य नाही. परंतु त्या ठरावात थोडा फार बदल करून आम्ही येथे दिला आहे. ज्या अन्वये करामध्ये थोडीफार वृध्दी सुचविली आहे. इतर जे कर आहेत ते रद्द केले जावेत. नाममात्र कर आकारले जावेत व शहरवासियांना फायदा दिला जावा. आयुक्त साहेबांनी प्रत्येक कॅम्पात झोनींग तयार केले होते. कॅम्प नं. १ चा भाव अलग , २ चा भाव अलग, ३ चा अलग, ४ चा अलग हे जे झोनिंग आहे ते सुध्दा रद्द केले जावे. हे जे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र आहे ते अतिशय लहान आहे. महापालिकेचे पुर्ण क्षेत्र १३ चौ. कि.मी चे आहे. त्यामध्ये वेगवेगळे दर लावणे मला वाटते योग्य नाही.उल्हासनगर कॅम्प १ ते ५ मधील सर्व मालमत्ताधारकांना एकसारखाच दर आकारला पाहिजे. कारण की शहरामध्ये दिवसेंदिवस पाणीपट्टीचे दर वाढविले जात आहेत. सार्वजनिक दिवाबत्तीचेही दर वाढविले जात आहेत. नियमानुसार कर्मचा–यांचे पगारही दिवसेंदिवस वाढत असतात. या गोष्टी लक्षात घेता आणखी ओझे लादणे ठिक नाही. आयुक्त साहेब तीन वर्षापर्यंत येथे आहेत. महाराष्ट्र शासनाने आयुक्त म्हणुन त्यांना नियुक्तीचे आदेश दिले आहेत. त्यांनी या शहराचा विकास करण्याची प्रतिज्ञा केली आहे. विकास कामे करण्यासाठी करांमध्ये काही ना काही वाढ करणे आवश्यक आहे. नाहीतर आम्ही आयुक्तांकडे काम करवुन घेण्यासाठी त्यांच्याकडे जावुन बसतो व करांमध्ये वृध्दी करण्याचा प्रस्ताव आला तर त्यांना सहकार्य करणार नाही. हे चुकीचे आहे. यासाठी काही ना काही कर वृध्दी करणे आवश्यक आहे. संध्याकाळच्या वेळेस आयुक्त साहेबांकडे जावुन बसणे व त्यांना सांगणे की हे विकसित करा ते विकसित करा ही चांगली गोष्ट नाही. परंतु यापेक्षा हे चांगले आहे की हा जो प्रस्ताव आलेला आहे तो अतिशय चांगला आहे. लोकांवर कराचे फार मोठे ओझे पडु नये. व महापालिकेसही थोडाफार फायदा होवो. म्हणुन या ठरावाची अंमलबजावणी केली जावी व ४५१ नुसार आम्ही लोकांनी महाराष्ट्र शासनाकडे अपिल केले आहे की, हा जो ठराव आहे तो लागु करण्यासाठी आम्हास वेळ दिली जावी. ठराव विखंडीत झाला आहे त्याबाबत कुणालाही सूनावणी दिली नव्हती. हे लक्षात घेता महाराष्ट्र शासनास आमची अपिल आहे की हा जो ठराव आहे तो लागु केला जावा. महाराष्ट्र शासनाने महापालिकेची ही बाजु ऐकुन घ्यावी. महापालिकेचाही विचार करावा. जनतेचेही ऐकुन घ्यावे. आम्हालाही शहराचा विचार करायचा आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेता या ठरावाची अंमलबजावणी झाली पाहिजे व हा ठराव लागु झाल्यानंतर ज्या लोकांनी पैसे भरले आहेत त्यांना पुढच्या वर्षी फायदा दिला जावा. असे केल्याने फार चांगले होईल. व हा जो ठराव आहे मला वाटते तो अतिशय चांगला ठराव आहे व तो सर्वांनी मिळून पारीत केला पाहिजे अशी मी सभागृहास विनंती करतो. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:–</u>जेव्हा अर्थसंकल्पाची सभा झाली होती १८ फेब्रुवारी रोजी व कर वृध्दीबाबत बोलले जात होते, या अगोदर २००३–२००४ या वर्षात कर वृध्दीबाबत बोलले जात होते तर त्यावेळस आम्ही एक विशेष सभेची मागणी केली होती. लोकसभेच्या निवडणूकांमुळे ही सभा त्यानंतर मे महिन्यात झाली. व हा ठराव सर्व संमतीने पारीत झाला की आम्ही कर वृध्दीच्या पुर्णपणे विरोधात आहोत. याबाबतचा ठराव नंतर महाराष्ट्र शासनाकडुन रद्द होवुन आला. याबाबत आपली जी मागील सभा झाली त्यावेळेस मी म्हंटले होते की आपणांस आपले लक्ष दुसरीकडे न वळविता या प्रस्तावाकडे लक्ष केंद्रीत केले पाहिजे आम्ही आजसुध्दा करवृध्दीच्या विरोधात आहोत. व कोणत्याही प्रकारची कर वृध्दी असेल तर त्यास आम्ही प्रखर विरोध करत आहोत. आम्ही आमचा एक प्रतिप्रस्ताव दिलेला आहे. सर्वसाधारणपणे असा प्रस्ताव कधी दिला जात नाही. कारण की मुलभूत तत्वाची गोष्ट आहे. म्हणुनच आम्ही आमचा एक स्वतंत्र ठराव दिला आहे. केवळ करवृध्दीच रद्द झाली पाहिजे असे नाही तर त्याचबरोबर त्या ठरावान्वये आम्ही ही सुध्दा मागणी केली आहे की शासनाकडुन जो ठराव विखंडीत होवुन आला आहे त्याबाबत महानगरपालिकेने राज्य सरकारकडे अपिल केले पाहिजे. एवढेच नाही तर करवृध्दीच्या विरोधात आमचे जे काही लोक उच्च न्यायालयात गेले आहेत त्यांना सुध्दा आम्ही सहकार्य केले पाहिजे. आम्ही आमच्या भुमिकेवर आज सुध्दा कायम आहोत. व कोणतीही करवृध्दी असो त्यास आमचा विरोध कायम आहे.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:–</u>मा.महापौरजी, मा. आयुक्त साहेब ही जी प्रस्तावना दिली आहे त्यामध्ये दर प्रतिचौरस फुट प्रतीमहा असे लिहिले आहे. १९९६ पासुन २००४ पर्यंत तर ही टंकलेखनाची चुक आहे की बरोबर आहे. येथे दर लिहिताना प्रती चौरस फुट याप्रमाणे लिहिले आहे.

**मा. सदस्या श्रीमती जया साधवानी व मा. सदस्य श्री. गौतम भालेराव सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—बरोबर आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—बरोबर आहे?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—प्रस्तावनेमध्ये ही जी शेवटची वाक्यरचना आहे की सबब याप्रकरणी कायदयाच्या तरतुदीचे पालन झालेले नाही. म्हणजे शासनाने कायदयाचे पालन केले नाही. कायदयाच्या तरतुदीचे पालन झालेले नाही हे बरोबर आहे का? असेल तर शासनाला आपण नोटीस पाठवु शकतो. शासनाच्या अधिका—यांनी जे बेकायदेशिर केले आहे त्याबाबतीत आपण शासनाला कोर्टात खेचु शकतो. श्री. लाल पंजाबीजी हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे ना? येथे स्पष्टपणे लिहिले आहे की कायदयाच्या तरतुदीचे पालन करण्यात आले नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आम्हाला सुनावणी दिली नाही. हे बरोबर नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—कायदयाच्या तरतुदीचे पालन केलेले नाही. म्हणजेच शासनाने चुकीचे केले आहे. शासनाने जो निर्णय घेतला आहे तो चुकीचा आहे. कायदयाच्या अनुसार नाही. कायदयाच्या बाहेर आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—कायदयात तरतुद आहे की आम्हास सुनावणी दिली पाहिजे होती.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—होय ना. म्हणजेच त्यांनी चुकीचे केले आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—शासनाने आम्हाला सुनावणी दिली नाही म्हणुन आम्ही ठराव पारीत करत आहोत व विनंती करत आहोत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—अशा शासनाचा तर धिक्कार केला पाहिजे. जे चुकीचे काम करतात.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आम्ही त्यामध्ये सुधारणा करू इच्छितो की कायदयानुसार आम्हाला सुनावणी दिली पाहिजे.

**मा. सदस्या श्रीमती सीमा मोकल यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सचिव:—असे यांचे म्हणणे आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—बरोबर आहे. असे यांचे म्हणणे आहे. खरे आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—खरे आहे असे मी म्हंटले नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—आपण लेखी दिले आहे. कायदयाच्या तरतुदीचे पालन केलेले नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—ठिक आहे ना म्हंटले ना, दुरूस्ती करू म्हणुन. मी म्हंटले ना की त्यामध्ये लिहु की कायदयानुसार महाराष्ट्र शासनाने चुकीचे केले आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—हेच तर मी म्हणत आहे की आपण वारंवार चुका करता. आपण दुरदृष्टी ठेवत नाहीत. जनतेला काय पाहिजे, काय केले पाहिजे. कोणताही विचार न करता आपण करता त्यानंतर.....

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—मा. महापौर महोदय, आमचे सन्माननिय सदस्य शब्दामध्ये आम्हाला पकडत आहेत. आताच आमच्या सभागृह नेत्यांनी म्हंटले की आम्ही त्यामध्ये दुरूस्ती करतो. कृपया आपण आम्हास काय म्हणायचे आहे ते समजुन घ्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आम्ही जे लिहिले आहे त्यामध्ये असे वाक्य जोडले जावे की आमचे असे म्हणणे आहे की ..................

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—तोपर्यंत जे करयोग्य मुल्य आहे जसे आता लागु आहे तेच आहे. म्हणजे प्रशासनाने, आयुक्तांनी जे करयोग्य मुल्य लागु केले आहे. ते चालु आहे असाच प्रस्ताव आहे. म्हणुन कर वृध्दीसाठी आमचा या अगोदर सुध्दा विरोध होता. व आज सुध्दा आमचा विरोध कायम आहे. आम्ही बदलत नाहीत.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:—मा. महापौर, आयुक्त साहेब या करवाढीच्या प्रस्तावाच्या अगोदर, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्येक जमिनधारकाला किंवा तेथे राहणा—या व्यक्तीला योग्य रक्कमेचे बिल पाठवितात का? सर्वात अगोदर हा विचार केला पाहिजे कारण अशा ब—याचशा तक्रारी आहेत. की ज्यांना.......

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—हे पहा आजच्या सभा सूचनेवर हा विषय नाही.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:—हाच विषय आहे ना? घरपट्टीची बिले बरोबर पाठवत नाहीत तर करवाढींना काय अर्थ आहे. असे घर आहे जेथे भिंतीना प्लास्टर नाही. महादेव नगरमध्ये माझ्या प्रभागामध्ये एका व्यक्तीस टॅक्सचे बिल पाठविले आहे. त्याच्या घराला आतुन बाहेरून प्लास्टर सुध्दा नाही. त्यास टियर गर्डर/ आर.सी.सी. बांधकामाचे बिल पाठविले आहे. या माणसाने एका वर्षापुर्वी अर्ज केला होता की, माझे असे काही बांधकाम नाही. आपण प्रत्यक्ष येवुन पहावे व योग्य त्या प्रकारे कर आकारणी करून बिल पाठवा. तरीही अदयाप पर्यंत महापालिकेचा कुणीही संबंधित अधिकारी तेथे गेला नाही. त्या व्यक्तीस यावर्षी सुध्दा त्याच बांधकामाच्या हिशोबाने मालमत्ता कराचे देयक पाठविले आहे. योग्य त्या रक्कमेची कराची बिले महापालिका पाठवित नाही. तर मग कर वाढविण्यात किंवा कमी करण्यात फायदा काय? सर्वात प्रथम योग्य त्या प्रकारे सर्वे करून कर आकारणी करा. त्यानंतरच मग कराचे दर वाढवायचे आहेत किंवा कमी करायचे आहे याचा विचार करा.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—सचिव साहेब, जो ठराव येथे आणला आहे. त्याच्या मागील हेतु काय आहे हे कुणाच्या लक्षात आले नाही. आमच्या तरी लक्षात आले नाही. कर वृध्दीला मान्यता दयायची होती. आता यामध्ये सुध्दा तोच विषय आहे की करवृध्दीला मान्यता दयायची आहे. आमचा तर या प्रस्तावास विरोध आहे. प्रस्तावावर मतदान घेताना आपण म्हणाल की प्रस्तावाच्या बाजुने कोण आहे? प्रस्तावित ठरावातील मुद्दा क्र. ३ मध्ये स्पष्टपणे नोंद आली आहे की, जी करवृध्दी झालेली आहे तीला मान्यता देण्यात येत आहे. जी की पहिले टियर गर्डर या अगोदरचे करयोग्य मुल्य होते ७. ५० आताचे त्याचे कर योग्य मुल्य आहे ९. ५० तर यास जी मान्यता दिली आहे ती प्रशासनाने अगोदर दिलेली आहे. हा ठराव यावेळेस पुन्हा आणण्याचा उद्देश काय आहे तो काही समजुन येत नाही. परंतु त्यांनी हा जो प्रस्ताव आणलेला आहे शासनाकडुन सुनावणी घेण्यासाठी तर कृपा करून जसा ठराव आहे तो वाचुन ठरावाच्या बाजुने किंवा ठरावाच्या विरोधात अशाप्रकारे मत आजमावावे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मा. महापौर, हा जो प्रस्ताव आयुक्त साहेबांनी दिलेला आहे. व जो सत्ताधारी पक्षाकडुन देण्यात आलेला आहे यामध्ये काही फरक नाहीच आहे.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—ठिक आहे ना? आपण लोक सहमती दया ना?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आपण चौ. फुटाच्या हिशोबाने दर ठेवले आहेत. त्याचे यांनी चौ.मीटर मध्ये रूपांतर करून दर ठेवले आहेत. हे म्हणत आहेत की आम्ही कर वाढ कमी करत आहोत. तर आपण कृपया याचे रूपांतर करून पहा. आयुक्त साहेबांनी जे दर वाढविले होते २००३—२००४ चे चौ. फुटाचे जे दर आहेत. तेच दर यांनी आज चौ. मीटरमध्ये रूपांतरीत करून ठेवले आहेत. त्यामध्ये थोडासा सुध्दा फरक नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, जकातीचा ठराव आम्ही पारीत करणार आहोत तो ठराव इतिवृत्त कायम होण्याच्या अगोदर अंमलात आणला जावा. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता अंमलात आणला जावा.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—आयुक्त साहेब हे शक्य आहे का?

मा. आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदय, हा जो ठराव आपण करत आहात त्याच्या अंमलबजावणीची माझी जबाबदारी नाही. राज्य शासनाकडे तो ठराव अभिवेदन म्हणुन आपणांस पाठवायचा आहे.

महासभेचे हे जे मत आहे. पहिला ठराव विखंडीत करण्याचा शासनाने जो निर्णय घेतलेला आहे. त्याबाबत महासभेचे हे जे मत आहे ते आपण पाठवत आहात त्याची अंमलबजावणी मी करणार नाही. यावर शासनाकडुन जेव्हा निर्णय होईल तेव्हा विचार केला जाईल.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी:—मा. महापौरजी, मला असे वाटते की येथे मराठीचे बरेचसे जाणकार बसले आहेत. चुका काढुन आम्हाला विचारतात. कदाचित त्यांनी ठराव वाचला तर त्यांच्या लक्षात येईल की ठरावात असे लिहिले आहे की आम्ही त्या कायदयानुसार तो प्रस्ताव शासनाकडुन मंजुर करून घेवू. व यावर्षी जी नविन बिले निघणार आहेत ती ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये निघणार आहेत. आम्ही स्वत: राज्य शासनाकडे अपिल करत आहोत. कलम ४५१ नुसार त्यांनी जो ठराव रद्द केला आहे. त्याऐवजी हा जो ठराव आहे. हा ठराव आम्हास लागु करून दिला जावा. व अपिल करण्यासाठी आम्हाला सुनावणी दिली जावी. याबाबत आयुक्त साहेबांकडुन खुलाश्याची आवश्यकता नाही हे आमच्या प्रस्तावामध्ये लिहिले आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आपण येथे जो प्रस्ताव आणलेला आहे. त्याबाबत आपण येथे आकडेमोड करून पहा. आयुक्त साहेबांचा जो प्रस्ताव आहे. व आपला जो प्रस्ताव आहे त्यामध्ये एक नया पैशाचा सुध्दा फरक नाही. १०० चौ. मीटरचे आयुक्तांच्या हिशोबाने आकडेमोड केली तर व १०० चौ. मीटरचे आपल्या हिशोबाने आकडेमोड केली तर यामध्ये कुणाचा दर जास्त आहे? आपण जो प्रस्ताव आणला आहे त्याचा दर जास्त आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, मी स्पष्टपणे म्हंटले आहे आम्ही ७५ टक्के दर कमी करत आहोत. आपण जर चर्चा करत आहात तर सर्व संमतीने ठराव पारीत करणार असाल तरच चर्चा करा.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—सर्व संमतीने आम्ही ठराव पारीत करू परंतु ......

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—जर आपणांस प्रस्तावाच्या विरोधात मतदान करायचे आहे. तर हरकत नाही विरोधात मतदान करा.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मी सचिव साहेबांना विचारू इच्छितो की,

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आपण प्रत्येक वेळी विरोधात मतदान करता असे मला बोलण्याची वेळ का येते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—जर आपण फक्त लोकांना दाखवु इच्छिता की, आम्ही कर कमी करत आहोत तर येथे मी आपणांस विचारू इच्छितो की आज जो आपण प्रस्ताव आणलेला आहे. १०० चौ.मीटरवर एका वर्षाला किती कर लागेल? याची आकडेमोड करून मला सांगा. लोकांची दिशाभुल करू नका. १०० चौ. मीटरवर मला सांगा किती कर लागेल? आजच्या प्रस्तावाचे हिशोबाने किती कर होईल? व आयुक्त साहेबांचा या अगोदरचा जो प्रस्ताव होता त्याच्या हिशोबानुसार किती कर असेल? हे कृपया मला सांगा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मी हे सुध्दा सांगणे जरूरीचे नाही की मतदान घ्या......

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—लोकांना आपण सांगत आहात की,......

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—खुलासा केला जावा.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—श्री. जमनुजी कृपया आपण बसुन घ्यावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मतदानाबाबत मी जे म्हंटले की, आपण नेहमी आरोप लावता की, आपण बहुमताच्या जोरावर, मतदानाच्या जोरावर निर्णय घेता म्हणुन मी म्हंटले.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आपण ७५ टक्के कर कमी केलात तर आम्ही आपले समर्थन करू. परंतु प्रथम आपण ते सिध्द करून दाखवा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आपली जी शंका आहे तीचेही आम्ही निरसन करतो.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—श्री. जमनुजी आपल्या पक्षाने प्रस्तावास विरोध केला आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—विरोधाची गोष्ट नाही. मी विचारू इच्छितो, होवु शकते मी आपले समर्थन करू. परंतु त्या अगोदर मला आकडेमोड करून सांगा की १०० मीटर वर आयुक्त साहेबांनी जो दर ठेवला आहे त्या हिशोबाने किती कर होईल व आपल्या प्रस्तावाच्या हिशोबाने किती कर होईल? हे लोक उलट कर वाढवित आहेत. व लोकांना सांगत आहेत की आम्ही कर कमी करत आहोत.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—आपण प्रस्तावास विरोध केला आहे ना?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—त्याची आकडेमोड करून मला सांगा.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—कृपया ऐकुन घ्या आम्ही येथे ५० वर्षापासुन रहात आहोत. सर्व व्यापारी आहेत, प्रत्येक पंचायतीचे प्रतिनिधी येथे बसले आहेत. आज प्रशासनाकडुन जर काही झाले असेल तर त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी येथील नागरिकांना, व्यापा—यांना जर काही कराचे ओझे होत असेल तर व वाजवी पेक्षा जास्त कराचे ओझे होत असेल व आम्हाला असे वाटत असेल की हे जे कराचे ओझे लादले आहे ते नाहक लादले आहे त्यामध्ये काही सुधारणा करण्यासाठी आम्ही अपिल करत आहोत. आम्ही त्यांच्यावर कराचे ओझे वाढवु इच्छित नाही. परंतु एखादा नविन व्यवसाय उघडण्यासाठी व्यवसाय चालविण्यासाठी कधी ना कधी नाईलाजाने थोडी फार करवाढ करावी लागत असेल तर ती नाईलाजाने करावी लागते. आम्हाला सुध्दा असे वाटत नाही की तेथील नागरिकांवर कराचे ओझे पडावे. परंतु नेहमीसाठी व्यवसाय चालवायचा आहे. नेहमी करता दुकान चालवायचे आहे. दरवर्षी खर्च वाढत चालला ओह. म्हणुन नाईलाजाने काही करावे लागत आहे. म्हणुन कुणालाही आनंद होत नाही की आमच्या नागरिकांवर कराचे ओझे वाढावे असे कधीही वाटत नाही. आम्ही जे काही करत आहोत ते चांगले करत आहोत. शहरवासियांसाठी व्यापा—यांसाठी, दोन वेळेस प्रस्ताव पारीत करण्यासाठी आम्हांस आपण या अगोदर आम्हाला जसे सहकार्य दिले. आम्ही सर्व जण जमिनीवर बसलो होतो. आम्ही जो जमिनीवर बसलो होतो तो काही आनंद म्हणुन बसलो नव्हतो. कर वृध्दी येथिल नागरिकांबाबत, व्यापा—यांबाबत जेव्हा आम्हाला कष्टप्रद वाटू लागली तेव्हा आपण सुध्दा आम्हाला सहकार्य दिले होते. तो प्रस्ताव पारीत केला होता. शासनाने आमची बाजु ऐकुन घेतलेली नाही. आमचे म्हणणे ऐकुन घ्यावे म्हणुन आम्ही शासनाकडे अपिल करत आहोत. आमच्याकडे सुध्दा कुणासाठी वेळ नाही. आज येथे बसलो आहोत ते वेळेत वेळ काढुन येथे बसलो आहोत. व्यापा—यांना त्रासाचे होवु नये म्हणुन आजची सभा आयोजित केली आहे. माझी सर्व सन्माननिय सदस्यांकडुन हीच अपेक्षा आहे की कृपया यापुर्वीप्रमाणेच सहकार्य करा. जी चुक प्रशासनाने केली आहे. नागरिकांवर जे कराचे ओझे लादले आहे त्याविरोधात आपण राज्य शासनाकडे जावुन अपिल करून येथील लोकांना न्याय देवु. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मा. महापौर महोदय, आयुक्त साहेब, १०० चौ. मीटर जागेस मा. आयुक्त साहेबांनी आकारलेल्या दरानुसार किती कर आकारला जाईल.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—श्री. जमनुजी आपण बसुन घ्या.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—नाही. नाही. असे कसे बसुन घेणार. १०० चौ.मीटर मागील कर आपण सांगा.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—मतदान घ्या.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मी मतदान कसे करणार, प्रस्तावाच्या बाजुने किंवा प्रस्तावाच्या विरोधात. मला १०० चौ.मीटरला महापालिकेने कोणता दर ठेवला आहे व आताचा दर कोणता आहे हे मला आता सांगा. मला मतदान करायचे आहे. प्रस्तावाच्या बाजुने करू की विरोधात, म्हणुन मला हा दर सांगा. १०० चौ. मीटरला आयुक्त साहेबांनी जास्त दर ठेवला आहे की आपण.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—सचिव साहेब याचा खुलासा करा. होवु शकते प्रस्तावाच्या बाजुने मतदान होईल.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—जर दर कमी झाला तर आपण प्रस्तावाच्या बाजुने मतदान कराल ना?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—बिल्कुल, अ, क, ड मध्ये आयुक्त साहेबांनी जो दर प्रती चौरस मीटर १.१२ प्रती महिना ठेवला आहे. त्या हिशोबाने १०० चौ. मीटरचा कर किती होईल? व यांनी जो दर ठेवला आहे त्यानुसार १०० चौ.मीटरचा कर किती होईल?

श्री. हरेश इदनानी (मुख्य लेखा अधिकारी):—मा. महापौर, आयुक्त साहेबांकडुन जे दर निश्‍चित करण्यात आले होते त्यामध्ये पुर्ण शहराचे चार विभागामध्ये वर्गीकरण करण्यांत आले होते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—अ,क,ड या विभागाचे दर सांगा.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—त्यांना खुलासा करू दया ना. आपण जी मागणी केली त्यानुसार ते खुलासा करत आहेत.

**मा. सदस्य श्री. वाघे शामु व श्री. राजु टेकचंदानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मला फक्त एवढेच सांगा की आर.सी. सी. बांधकामाचे विभाग अ,क,ड मधील प्रत्येक १०० चौ. फुटामागील कराचे दर काय असतील?

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—श्री. जमनुजी प्रस्तावाच्या बाजुने मतदान करण्यासाठी आपण फक्त तयार रहा.

मा. सदस्य श्री.पृथ्वी वलेचा:—ऐकुन घेत नाहीत. शांत रहा.

श्री. हरेश इदनानी (मुख्य लेखा अधिकारी):—चार विभाग पाडण्यात आले होते.अ,ब,क,ड त्यामध्ये प्रत्येक विभागामध्ये आतील व बाहेरील असे भाग पाडण्यांत आले होते. चार विभागापैकी तीन विभागांना वेगळे करण्यात आले होते. अ,क,ड या विभागांसाठी एकसारखे दर ठेवण्यात आले होते. आतील व बाहेरील वेगळे ब मध्ये सुध्दा आतील व बाहेरील भागांसाठी वेगळे दर ठेवले होते. अशा प्रकारे दोन भागांमध्ये वर्गवारी करण्यात आली होती. परंतु त्यामध्ये चार प्रकारचे दर होते. आतील भागातील वेगळे, बाहेरील भागातील वेगळे. अ,क,ड या विभागांसाठी एकसारखे दर ठेवण्यात आले होते. आतील व बाहेरील वेगळे ब मध्ये सुध्दा आतील व बाहेरील भागांसाठी वेगळे दर ठेवले होते. यांचे म्हणजे असे आहे की हे जे चार विभाग होते त्यामध्ये सन १९९६—९७ च्या करयोग्य दरसूचीमध्ये २५ टक्के , ५० टक्के, ७० टक्के अशाप्रकारे वेगवेगळी वाढ करण्यात आली होती. यांनी हे सर्व बाजुला सारून १९९६—९७च्या करामध्ये फक्त २५ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव येथे आणला आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आपण फिरवुन फिरवुन उत्तर दिले आहे. मी आपणांवर सुध्दा आरोप लावत आहे. आपण फक्त मला एवढेच सांगा. अ,क,ड या विभागातील बाहेरच्या बाजुच्या भागातील आर.सी.सी. बांधकामावर आयुक्त साहेबांनी आकारलेल्या दरानुसार प्रती वर्षास किती कर आकारला जाईल. व यांच्या प्रस्तावानुसार किती कर आकारला जाईल? एक मिनिटाची आकडेमोड आहे. जर आपण करत नसाल तर मी आकडेमोड करून सांगतो.

श्री. हरेश इदनानी (मुख्य लेखा अधिकारी):—मी सांगतो असे नाही सांगणार नाही. कृपया आपण मला तो अ,क,ड च्या दरांची सूची दया. हे जे दर आहेत ते अ,क, ड या विभागातील आतील बाजुच्या जे जवळचे भाग आहेत त्यांचे आहेत. किती जागेच्या कराची रक्कम आपणांस सांगायची आहे? १०० चौ. मीटरची? १०० चौ. मीटरचे चौ. फुटामध्ये रूपांतर केले तर १०.७६ने गुणायचे झाले तर त्याचे एकुण १०७६ फुट होतात. त्याचा जो दर आहे तो १ रू. १२ पैसे हा एक महिन्याचा आहे. १२ महिन्याचे वार्षिक भाडे होते १४,४६१/— त्यातुन १० टक्के सुट वजा केली असता १३,०१५/— करयोग्य मुल्य होते. यावर महानगरपालिकेचे जे कर आहेत ते मागील ४१. ५ टक्के दराने ५,४०१/— रू. कर लागेल. याच्या जवळपासचा कर लागेल.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—याच्या जवळपास म्हणजे?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—प्रत्यक्षात आपण कर वाढवत आहात आणि लोकांना मात्र सांगत आहात की आम्ही कर कमी करत आहोत. लोकांची दिशाभुल केली जात आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—एक सांगितले दुसरे सांगा. जरा स्पष्टपणे सांगा.

श्री. हरेश इदनानी (मुख्य लेखा अधिकारी):—ही जी आकडेमोड केली त्यानुसार हा दर १२.०५ असा आहे.

मा.सदस्या श्रीमती मोना वनवारी, श्रीमती मीना सोंडे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—याचाच अर्थ, आयुक्त साहेबांचा जो प्रस्ताव आहे व यांचा जो प्रस्ताव आहे यांनी चौ.फुटाचे चौ. मीटरमध्ये रूपांतर करून प्रस्ताव ठेवला आहे. आणखी काही बदल नाही. लोकांना सांगत आहेत आम्ही कर कमी करत आहोत. खरे आहे की नाही?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—७५ टक्के कर कमी केला आहे.

मा. सदस्य श्री. मोकल चंदाराम यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—७५टक्के कर कुणाचा कमी केला आहे? सावकार लोकांचा ७५ टक्के कर कमी केला आहे. गरीब लोकांचा कर कमी केला नाहीत. आपण सांगु शकता अ,क,ड या विभागात कोण येते व ब विभागात कोण येते? फक्त श्रीमंत लोकांचाच बचाव केला आहे. अ.क,ड या विभागात जेवढे काही गरीब लोक येतात त्यांना दर चौ. फुटाचे दर चौरस मीटर मध्ये रूपांतर करून सर्वांवर एकसारखाच कर आकारला आहे.व आपण लोकांना सांगत आहात की आम्ही कर कमी करत आहोत. आपण जमिनीवर बसुन शहरास काय दाखवु इच्छित आहात की आम्ही कर कमी करण्याच्या बाजुने आहोत. जमिनीवर बसु शकतो, आम्ही शहराच्या बाजुने आहोत. दर चौ. फुटाचे, दर चौ. मीटरमध्ये रूपांतर न करता आपण प्रत्यक्षात कर कमी करा. अशाप्रकारचा देखावा करू नका.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—सचिव साहेब मतदान घ्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आणखी काही अडचण असेल तर दुरूस्ती करू. श्री. जमनुजी यांनी काही सुधारणा सूचविली तर ती करण्यासाठी दुसरी सभा आयोजित करू.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—माझी काही सूचना नाही. पुर्वीचे जे कराचे दर आहेत तेच ठेवा.

मा. सदस्य श्री. मनोज साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—आपला जो प्रस्ताव होता तो श्री. हरेश इदनानी यांनी स्पष्ट केला आहे. आता यावर कुणाची काही शंका नाही. इदनानी साहेबांनी बरोबर स्पष्टीकरण केले आहे. त्याबद्दल इदनानी साहेबांचे अभिनंदन.

मा. सचिव:—जे सन्माननिय सदस्य सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावाच्या बाजुने व विरोधी पक्षाने दिलेल्या प्रतिप्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावाच्या बाजुने :—३२ मते

१. श्रीमती रामचंदानी भावना
२. श्री. लिंगे सुर्यकांत

३. श्री. मुलचंदानी महेंद्र
४. श्री. ऐडके गणपत
५. श्रीमती. शर्मा कमला
६. श्री. वलेचा पृथ्वी
७. श्री. रोहडा श्यामसुंदर
८. श्री. गुप्ता प्रभुनाथ
९. श्रीमती गुप्ता अनिता
१०. श्री. पवार नाना
११. श्रीमती आहुजा निता
१२. श्री. राजु जग्यासी
१३. श्रीमती मंसद माया
१४. श्री. गायकवाड सुरेश
१५. श्री. वनवारी किशोर नारायणदास
१६. श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१७. श्री. लुंड गोविंदराम
१८. श्रीमती खिलनानी भावना
१९. श्रीमती कारीरा रेखा
२०. श्री. पमनानी ईश्वर
२१. श्री. पंजाबी नारायण
२२. श्रीमती पंजाबी दिपा
२३ श्री. लबाना होशियारसिंग
२४. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
२५. श्री. तलरेजा विनोद
२६. श्रीमती नाथानी नीना
२७. श्रीमती. दासानी मिनु
२८. श्री. म्हस्के अंकुश निव्त्ती
२९. श्री. लालबिहारी यादव
३०. श्री. टाले प्रमोद
३१. श्री. चंदाराम मोकल
३२. श्रीमती करोतिया मालती

मा. सचिवः—व जे सन्माननिय सदस्य विरोधी पक्षांनी दिलेल्या प्रतिप्रस्तावाच्या बाजुने आहेत व सत्ताधारी पक्षाने दिलेल्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

प्रति प्रस्तावाच्या बाजुने व सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावाच्या विरोधातः—१५ मते

१. श्रीमती. जावळे संगिता
२. श्रीमती मोकल सिमा
३. श्री. उमाप रामदास
४. श्री. पुरस्वानी जमनादास
५. श्री. रूपचंदानी बच्चाराम
६. श्रीमती. कृष्णानी रेखा
७. श्री. राजेंद्रसिहं भुल्लर
८. श्री. सोनावणे नथु
९. श्री. गायकवाड दिलीप
१०. श्रीमती खांडेकर प्रेमा
११. श्रीमती माने किरण
१२. श्री. चव्हाण रमेश
१३. श्री. धनंजय बोडारे

१४. श्री. पाटील विश्वनाथ
१५. श्रीमती. ससाणे लक्ष्मी

**मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—**विरोधी पक्षीय सदस्यांचा प्रतीप्रस्ताव बहुमताने नाकरण्यांत येत आहे व सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांचा प्रस्ताव बहुमताने समंत करण्यांत येत आहे.

**विषय :—** उल्हासनगर शहरातील मालमत्ता कराचे आकारणीसाठी पात्र असलेल्या इमारतीचे व जमिनीचे करयोग्य मुल्य संबधातील महासभा ठराव शासनाने विखंडीत केल्याबाबत.

**प्रस्तावक:— श्री. लाल पंजाबी.**
**अनुमोदक:— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर.**

## ''प्रस्ताविक''

शिवसेना भाजपा युतीचे वतीने प्रस्ताव देण्यात येतो की, महासभा ठराव क्र. ४ दि. १९/५/२००४ शासनाने विखंडीत केला असून त्या संबधात योग्य तो निर्णय घेणेबाबत विशेष महासभेसमोर विषय ठेवण्यात आलेला असून खाजगी मालमत्तांपैकी ज्या मालमत्तामध्ये बदल करून नव्याने बांधण्यात आलेल्या आहेत किंवा मालमत्तेचा वापर क्षेत्र बांधकाम प्रकार यात बदल झाला अशा मिळकतीवर कर आकारणी सन २००३—२००४ पासून सूधारीत दर लागु केले होते. परंतु सदरचा दर रद्द करून सन १९९६—९७ या सरकारी वर्षात लागू असलेले कर योग्य मुल्यांकाचे दर लागु करणेसाठी महासभा ठराव क्र. ४ दि. १९/५/२००४ पारील करण्यात आला होता. सदर ठराव शासनाने विखंडीत केल्याने महानगरपालिकेतर्फे शासनाकडे अपील करण्यात आले पाहिजे तसेच मा. कोर्टात कर मूल्यांकनाविरूध्द ज्या याचिका दाखल केल्या आहेत. अश्या याचिका कर्त्यांना पाठिंबा जाहिर केला पाहिजे.

**विशेष महासभा ठराव क्र: ८ अ** **दिनांक:—२८/०४/२००५.** सन २००३—२००४ पासून ज्या खाजगी मालमत्तामध्ये बदल करून नव्याने बांधण्यात आल्या किंवा मालमत्तेचे क्षेत्र वापर बांधकाम प्रकार यात बदल झाला अश्या मिळकतीवर सुधारीत दर लागु केले आहेत परंतु सदरचा दर रद्द करून सन १९९६—१९९७ या सरकारी वर्षात लागु असलेले कर योग्य मुल्यांकाचे दर लागु करणेसाठी महासभा ठराव क्र. ४ दि. १९.५.२००४ पारीत करण्यात आला. सदर ठराव शासनाने विखंडीत केल्याने महापालिकेतर्फे शासनास अपील करण्यात यावे. व करमूल्यांकना विरूध्द न्यायालयात याचिका दाखल केलेल्या याचिकाकर्त्यांना पाठिंबा जाहिर करून सन १९९६—९७ या सरकारी वर्षातील लागू असलेले कर योग्य मुल्यांकनाचे दर लागु करणेत यावेत. व सन १९९६—९७ सालचे (पुर्वीचे) दर कायम ठेवण्यात यावे.

**बहुमताने**

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. २:— उल्हासनगर शहरातील मालमत्ता कराचे आकारणीसाठी पात्र असलेल्या इमारतींचे व जमिनींचे आयुक्तांनी ठरविलेले करयोग्य मुल्य संबधातील महासभा ठराव क्र. ४, दिनांक १९/५/२००४ शासनाने विखंडीत केला असुन त्या संबधात योग्य तो निर्णय घेणे.

प्रस्तावक:— श्री. किशोर वनवारी

अनुमोदक:— श्री. होशियारसिंग लबाना

## ''प्रस्ताविक''

सन १९४९ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर झालेल्या फाळणीमुळे सिंधप्रांतामधुन फार मोठया प्रमाणावर निर्वासित भारतामध्ये आले. महाराष्ट्र राज्यामध्ये त्यांच्यासाठी पुण्याजवळील पिंपरी व मुंबई जवळील उल्हासनगर हया प्रमुख ठिकाणी छावण्या उघडण्यात आल्या. दुसरे महायुध्द संपल्यानंतर उल्हासनगर येथे लष्करी सैनिकांसाठी बांधलेल्या बॅरेक्स निरूपयोगी व रिकाम्या झाल्या होत्या. त्यामुळे शासनाने निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी त्यांचा उपयोग करण्याचे ठरविले. एप्रिल, १९४८ च्या सुमारास या सर्व संक्रमण छावण्या भारत सरकारच्या सहाय्य आणि पुर्नवसन मंत्रालयाच्या (रिलीफ अॅड रिहॅविलीटेशन मिनिस्ट्री) ताब्यामध्ये मुंबईमध्ये येणा—या निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी सुपूर्द करण्यात आल्या. या निर्वासितांना या ठिकाणी नुसताच आश्रय दिला नाही तर त्यांना घरगुती उपयोगाचे सामान, कामधंदा अशा प्रकारची मदतही देऊ केली. त्यावेळी अंदाजे ९४,४०० निर्वासितांनी या संक्रमण छावणीमध्ये आश्रय घेतला होता. कालांतराने या निर्वासितांनी त्याचे स्वत:चे कामधंदे सुरू केले आणि हळूहळ त्यांचे पुनर्वसन होऊन उल्हासनरमध्ये नव्याने आर्थिक आणि सांस्कृतिक समाजाची उभारणी झाली. गेल्या ४ दशकांमध्ये उल्हासनगर शहराची फार मोठया प्रमाणात वाढ होऊन आता ते शहर म्हणजे उद्योगधंद्याचे या प्रदेशातील प्रमुख केंद्र बनले आहे. उल्हासनगरमधील घर मिळकतींना सन १९८६ ते सन १९९७ पर्यंत खालीलप्रमाणे कर मुल्य निश्चिती करून घरपट्टी कराची आकारणी पालिकेतर्फे करण्यात येत होती.

दर प्रति चौ. फुट प्रति माह

| TYPE OF STRUCTURE | Ulhasnagar Municipal Corporation | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1986-87 (Any Where) | | 1991-92 (Any Where) | | 1996-97 (Any Where) | |
| | Res. | Com. | Res. | Com. | Res. | Com. |
| R.C.C. | 0. 20 | 0. 30 | 0.45 | 0.68 | 0.89 | 1.34 |
| G.Tier | 0.12 | 0.18 | 0.27 | 0.41 | 0.70 | 1.05 |
| AC.Bricks | 0.09 | 0.14 | 0.24 | 0.36 | 0.54 | 0.81 |
| Wooden | 0.07 | 0.11 | 0.15 | 0.23 | 0.19 | 0.29 |
| Mud | 0.05 | 0.08 | 0.09 | 0.14 | 0.19 | 0.29 |
| Open | 0.005 0.0075 | | 0.02 | 0.10 | 0. 09 | 0.23 |
| Ind. Open | 0.00 | 0. 030 | 0.00 | 0.10 | 0.00 | 0.23 |

सन २००३—२००४ या वर्षापासून आयुक्तांनी आपल्या अधिकारात नविन मिळकतीवर खालील प्रमाणे कर मूल्य निश्चिती करून कर आकारणी केलेली आहे.

दर प्रति चौ. फुट प्रति माह

| TYPE OF STRUCTURE | Ulhasnagar Municipal Corporation | |
|---|---|---|
| | 2003-04 (A,C,D Zone) | 2003-04 (B Zone) |

| | (Outer Area) | | (Inner Area) | | (Outer Area) | | (Inner Area) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Res. | Com. | Res. | Com. | Res. | Com. | Res. | Com. |
| R.C.C. | 1.12 | 1.67 | 1.39 | 2.09 | 1.68 | 2.51 | 1.86 | 2.79 |
| G.Tier | 0.93 | 1.39 | 1.12 | 1.67 | 1.12 | 1.67 | 1.67 | 2.51 |
| AC.Bricks | 0.75 | 1.12 | 0.84 | 1.26 | 0.84 | 1.26 | 1.12 | 1.67 |
| Wooden | 0.28 | 0.42 | 0.37 | 0.56 | 0.37 | 0.56 | 0.47 | 0.70 |
| Mud | 0.28 | 0.42 | 0.37 | 0.56 | 0.37 | 0.56 | 0.47 | 0.70 |
| Open | 0.75 | 0.74 | 0.74 | 0.74 | 1.42 | 1.42 | 1.42 | 1.42 |
| Ind. Open | -- | 0.74 | -- | 0.74 | -- | 1.42 | -- | 1.42 |

सन २००३—२००४ करिता आयुक्तांचे आदेशा अन्वये अधिकतम अधिक दराने कर योग्य मुल्य निर्धारित केलेले आहे व त्यावर आधारलेल्या कर आकरणीची रक्कम वाढुन गेलेली आहे. सन २००३—२००४ च्या सरकारी वर्षात आकारणी पुस्तकात सुधारण्याकरिता आयुक्तांनी अधिकतम अधिक कर योग्य मुल्य ठरविले आहे. त्यामुळे शहरातील लोक नाराज होऊन ओरड करित होते व दुःखी होऊन प्रत्येक नगरसेवकाकडे कर योग्य मुल्याचे विरोधात अभिवेदन देत होते.

आयुक्तांनी ठरविलेल्या कर योग्य मुल्य निर्धारणाविरूध्द ब—याचशा तक्रारी येत होत्या व लोकांवर अधिक आर्थिक बोजा पडलेला आहे. आयुक्तांनी ठरविलेले कर योग्य मूल्य खालील कारणांमुळे अयोग्य आहे.

१. रहिवास परीमंडळातील जमिनीचे व इमारतीचे कर योग्य मुल्य वाणीज्य वापर क्षेत्राशी सुसंगत करण्यात आलेले आहे. कारण सदर मालमत्ता वाणीज्य बाजारामागे आहेत.

२. कर योग्य मुल्य निर्धारणासाठी परिमंडळ अयोग्य प्रमाणे ठरविण्यात आले आहे.

३. मुल्यनिर्धारणा विरूध्द तक्रारी करणा—यास त्याच्या तक्रारीची चौकशी न करता व सुनावणी योग्य प्रकारे न देता प्रभाग निहाय कर आकारणी पुस्तक प्रमाणात करण्यात आले आहे.

४. शहरातील स्थानिक परिस्थिती, धंदे, व्यवसाय, प्रकार धरून उत्पन्नाची मर्यादा व करदात्याची क्षमता विचारात न घेता प्रशासनातर्फे कर योग्य मुल्यांकन दर सूची तयार करण्यात आली.

५. कर योग्य मुल्यांकन दर सुची महापालिकेच्या पुर्व मंजुरी विना लागु करण्यात आली आहे.

६. काही इमारती सन १९९६—९७ पुर्वी तयार असून कर आकरणीस पात्र असुन त्या संबंधी प्रशासनातर्फे कर आकारणी पुस्तकात नोंद दाखल केलेली नसून त्या इमारतीचे नोंद सन २००३—२००४ चे आकारणी पुस्तकात नोंद दाखल करण्याकरिता २००३—२००४ ची मुल्यांकन दर सुची प्रमाणे कर योग्य मुल्याची व त्यावर आधारलेल्या कर आकरणीचीच रक्कम करदात्यावर वाढविण्यात आली आहे.

वरील परिस्थिती पाहता सन २००३ —२००४ पासून शहरातील कर आकारणी पात्र असलेल्या इमारती व जमिनीस नविन कर योग्य मुल्याकन दर सूची लागु करण्यात आल्यामुळे तसेच करमुल्य निर्धारण करताना आयुक्तांनी आतील एरीया व बाहेरील एरीया असाही भेदभाव केल्याने नागरिकांत नाराजगी निर्माण होऊन करदाता मालमत्ताकर देण्यास अडचणीचे दर्शवित असल्याचे निदर्शनात आल्याने उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन्माननिय नगरसेवकांनी दि. १९.५.२००४ रोजीच्या महासभेमध्ये आयुक्तांच्या वर नमुद वाढीव दराने कर मुल्य आकारणी विरूध्द खालील प्रमाणे ठराव एक मताने संमत केला.

“
महासभा ठराव क्र. ४ दिनांकः—१९/५/२००४.

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता सन १९९६—९७ या सरकारी वर्षात लागु असलेल्या करयोग्य मुल्यांकनाची दरसुची लागु करणे मान्य करीत आहे व सन २००३—२००४ या सरकारी वर्षात प्रशासनातर्फे लागु करण्यात आलेल्या नविन करयोग्य मुल्यांकनाची दरसूची रद्दबादल करीत आहे. व त्या परिणामात सन २००३—२००४ च्या आकारणी पुस्तकातील नोंदी बाबत संबंधित व्यक्तीने अभिवेदन केल्यावर घरपट्टी रक्कम भरल्या दिनांका पासुन सहा महिन्याच्या आत परताव्याची देय रक्कम अदा करणेस प्रशासनास निर्देशित करीत आहे. ”

तरीही महापालिकेच्या उत्पन्नाची बाजू विचारात घेता तसेच या शहराचे क्षेत्रफळ १३ चौ. कि. मी लक्षात घेता आयुक्तांनी सुचविलेल्या प्रमाणे प्रभाग निहाय वर्गिकरण किंवा अंतर्गत किंवा बाहय असे भेदाभेद रूप विभागीकरण न करता समान तत्वावर खाली सुचविल्याप्रमाणे काही प्रमाणात करमुल्य वृध्दी होण्यास हरकत नाही.

प्रति चौ. मीटर प्रति माह

| Type of Structure | 1996-1997 | | Type of Structure | 2003-2004 | |
|---|---|---|---|---|---|
| | Res. | Comm. | | Res. | Comm. |
| R.C.C. | 9.59 | 14.38 | R.C.C. | 12 | 18 |
| G.Tier | 7.50 | 11.25 | G.Tier | 9.50 | 14.25 |
| AC.Bricks | 5.83 | 8.75 | AC.Bricks | 7.30 | 10.95 |
| Wooden | 2.08 | 3.12 | Wooden | 2.60 | 3.90 |
| Mud | 2.08 | 3.12 | Mud | 2.60 | 3.90 |
| Open | 1.00 | 2.50 | Open | 1.25 | 3.13 |
| Ind. Open | -- | 2.50 | Ind. Open | -- | 3.13 |

आयुक्तांनी उल्हासनगर महानगरपालिकेची नविन मालमत्ताच्या कर मुल्य निश्चितीद्वारे केलेल्या करनिर्धारणा विरूध्द उल्हासनगर महानगरपालिकेने वर नमुद प्रमाणे दि. १९/५/२००४ च्या महासभेमध्ये वरील प्रमाणे ठराव क्रमांक ४ मंजुर करून सन २००३–२००४ या सरकारी वर्षात प्रशासनातर्फे लागु करण्यात आलेल्या नविन करयोग्य मुल्यांकनाची दरसूची रद्दबादल ठरविली त्याविरूध्द आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी मा. प्रधान सचिव, नगरविकास, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे जा. क्र. उमपा/करवि/१२८०/२००४, दि. ७/१२/२००४ नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ प्रमाणे सदर महासभा दि. १९/५/२००४ ठराव क्र. ४ विखंडीत करणेकरीता प्रस्ताव सादर केला. शासनाच्या नगरविकास खात्याने त्यांच्या पत्र क्र. उमपा–२३२४/९४१९/प्र.क्र. १४९०४ नवि–२१, दि. १६/२/२००५ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेने पारित केलेला दि. १९/५/२००४ चा ठराव क्र. ४ शासनाकडुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५१ अन्वये विखंडीत केल्याचे कळविण्यात आले आहे. येणेप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेने आयुक्तांनी केलेल्या नविन करयोग्य मुल्यांकनाची दर सूची रद्दबादल करण्याचा ठराव क्र. ४ दि. १९/५/२००४ हा ठराव शासनाकडून विखंडीत करण्यात आलेला आहे. ज्याची झळ शहरातील नागरिकांना बसून शहरातील नागरिकांत असंतोषाचे वातावरण पसरत असून त्यामुळे शांततेचा भंग होण्याचा संभव आहे. नागरिक लोकप्रतिनिधींकडे या बद्दल जाब विचारत आहेत. सबब शासनाने सदरचे ठराव महानगरपालिकेस त्यांची बाजू मांडण्याची संधी न देता विखंडीत करण्यामागची शासनाची भुमिका जाणुन घेणे तसेच शासनाने विखंडीत केलेले ठराव संमत करण्यामागील महानगरपालिकेची भुमिका शासनाकडे मांडणे व जनतेची बाजु शासनापर्यंत पोहचवणे या कामी चर्चा करून आवश्यक ते निर्णय घेणेसाठी सदरची विशेष सर्वसाधारण सभा बोलविणे क्रमप्राप्त झाले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम ४५१ चे तरतुदीनुसार कोणत्याही ठरावा विरूध्द शासनास कारवाई करायची असेल तर शासन लेखी आदेशाद्वारे अशा ठरावाचे कार्यान्वयन त्यामध्ये ते विनिर्दिष्ट करील अशा मुदतीसाठी निलंबित करता येईल किंवा अशी कृती करण्यास मनाई करता येईल. अशा आदेशाची एक प्रत शासनाने महानगरपालिकेस व आयुक्तांस पाठविली पाहिजे. उपरोक्त प्रमाणे आदेशाची प्रत मिळाल्यावर महानगरपालिकेस किंवा आयुक्तांस उक्त आदेशाविरूध्द राज्य शासनाकडे अभिवेदन करता येईल. असे अभिवेदन ३० दिवसांच्या मुदतीत मिळाले नसेल तर किंवा मिळालेले कोणतेही अभिवेदन विचारात घेतल्यानंतर शासनास तयांनी दिलेला आदेश एक तर रद्द करता येईल, त्यात फेरबदल

करता येईल किंवा तो कायम करता येईल किंवा सर्व परिस्थिती विचारात घेवुन जी न्याय किंवा इष्ट असेल अशी इतर कारवाई करता येईल.

वरीलप्रमाणे कायदेशीर तरतुद पाहता शासनाने आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांचा उपरोक्त प्रस्ताव ठराव विखंडनासाठी प्राप्त झाल्यानंतर प्रथम सदर ठराव निलंबित करण्याची कारवाई करून त्याची एक प्रत महानगरपालिकेसही पाठवावयास हवी होती व या महानगरपालिकेस त्यांची बाजु मांडण्याकरिता अभिवेदन सादर करण्याची संधी द्यावयास हवी होती व त्यानंतरच ठराव विखंडीत करण्याची कारवाई करावयास हवी होती. परंतु हा ठराव विखंडीत करताना प्रथम निलंबनाची नंतर अभिवेदन विचारात घेण्याची अशी कोणतीही कारवाई केली गेली नाही व परस्पर ठराव विखंडीत करण्यात आलेला आहे. परिणामी महानगरपालिकेचा बाजू मांडण्याचा हक्क डावलला गेलेला आहे. सबब या प्रकरणी कायद्याच्या तरतुदीचे पालन झालेले नाही त्यामुळे महानगरपालिकेची बाजु शासनाच्या समोर मांडणे तसेच असे ठराव संमत करण्यामागील भुमिका शासनासमोर मांडणे करीता या प्रकरणी कलम ४५१ चे पोट कलम २ अन्वये अभिवेदन सादर करणे आवश्यक बनलेले आहे. सबब या प्रकरणी आवश्यक ते निर्णय घेण्यासाठी व आवश्यक त्या मंजुरीसाठी सदर प्रस्ताव महासभेच्या पटलावर ठेवण्यात येत आहे.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ९ <u>दिनांक:—२८/०४/२००५.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता खालील प्रमाणे ठराव मंजुर करित आहे.

१. शासनाने विखंडीत केलेल्या महासभा ठराव क्र. ४ दि. १९.५.२००४ विखंडीत करण्याच्या शासनाच्या निर्णयासंबंधाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम ४५१ पोट कलम २ अन्वये अभिवेदन शासनास सादर करून आपली व जनतेची बाजु ऐकुन घेण्याची विनंती शासनास करून व त्यानंतरच शासनाने या प्रकरणी अंतिम निर्णय घ्यावा अशीही विनंती शासनास करण्यात यावी.

२. वरीलप्रमाणे कारवाई पुर्ण होई पर्यंत व शासनाने अभिवेदन प्रस्ताव स्विकारून ठराव विखंडीत करण्याचा निर्णय रद्द केल्यास दरम्यानच्या काळात या ठराव विखंडणामुळे वसुल करण्यात आलेली रक्कम अशा वसुलीधारकास पुढील आर्थिक वर्षामध्ये वळती करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सन २००३—२००४ या सरकारी वर्षा पासून प्रशासनातर्फे लागु करण्यात आलेल्या नविन कर योग्य मुल्यांकनाची दर सुची रद्द करण्याचा निर्णय घेतला असला तरीही वर प्रस्तावनेत नमुद प्रमाणे करमुल्य वृध्दीस या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

<u>बहुमताने</u>

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u> कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५.२० वाजता मा. पीठासीन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांकः—२० मे, २००५

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/५/२००५ रोजीच्या</u>

<u>विशेष महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा बुधवार दिनांक २०.०५.२००५ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

<u>१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी</u>

<u>२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ३६. | श्री. बच्चाराम रुपचंदानी |
| ४. | श्री. टेकचंदानी राजु | ३७. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर, |
| ५. | श्रीमती रामचंदानी भावना | ३८ | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ६. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३९ | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ७. | श्री. वाघे शामु बाबु | ४० | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्रीमती मोकल सीमा | ४१ | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्री. दिलीप गायकवाड | ४२. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १०. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४३. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | श्री. एडके गणपत गोविंद | ४४. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १२. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १३ | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १४. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४७ | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १५. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४८. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १६. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४९. | श्रीमती पंजाबी दिपा |
| १७. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५०. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १८. | श्रीमती अनिता गुप्ता | ५१. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| १९. | श्री. पवार नाना | ५२. | श्रीमती भटिजा कोमल |
| २०. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५३. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २१. | श्री. जग्यासी राजु | ५४. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २२. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५५. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २३. | श्री. निकम शांताराम | ५६. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २४. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५७. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २५. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५८. | श्री. संजय रामचंद्र बठीजा, |
| २६. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २७. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६०. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २८. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६१. | श्रीमती करोतिया मालती |
| २९. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६२. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३०. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६३. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३१. | श्री. साधवानी मोहन | ६४. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३२. | श्रीमती जया साधवानी | ६५. | श्री. हरदास माखिजा |
| ३३. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ६६. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३४. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६७. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |
| ३५. | श्रीमती भावना खिलनानी | | |

तर,
मा.सदस्य / सदस्या १. श्रीमती. संगिता रमेश जावळे, २. श्री. सोनवणे नथु काशिराम, ३. श्री. महेंद्र मुलचंदानी, ४.श्री. उमाप रामदास राघोजी, ५. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण, ६. श्री. चव्हाण रमेश महादेव, ७. श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ, ८. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, ९. श्री. जयसिंघानी अनिल, १०. श्रीमती किरण लखी माखिजा, ११. श्री.भालेराव गौतम यशवंत, १२. श्री. सुरेश जाधव, १३. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, १४. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४.०० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. आयुक्त श्री. आर. के. सोनवणे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री. उत्तम लोणारे, उपायुक्त (मुख्यालय) हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १ :—**उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामांविरुध्द कारवाई वर विचार करणे व त्यांचे परिणामाबाबत दिशा ठरविणे.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**मा. महापौर, मा. उप—महापौर व आयुक्त साहेब आपले सचिव साहेब जे विधी अधिकारी सुध्दा आहेत, आम्ही त्यांना विचारु इच्छितो की, या विषयाबाबत मुंबई उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना आपण त्यावर चर्चा करु शकतो का? सांगा ना, आपण विधी अधिकारी आहात, हे जे लोक आहेत यांची दिशाभुल होता कामा नये. उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना त्यावर आपण चर्चा करु शकतो का? त्यावर निर्णय घेवू शकतो का? याबाबत सभागृहापुढे ठराव आणू शकतो का? याबाबत सभागृहाला समजावून सांगितले जावे.

**मा. सचिव :—** मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाबाबत या सभेत कोणतेही भाष्य करायचे नाही. येथे जो विषय आहे तो वेगळया प्रकारचा विषय आहे. विषय असा आहे की, अनाधिकृत बांधकामां विरुध्द कारवाई करण्याबाबत विचार करुन त्याचे परिणाम काय होतील? त्याची दिशा देण्यासाठी, परिणाम काय होतील? त्यांना दिशा देण्यासाठी............

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश आहे, त्या विरुध्द आपण येथे ठराव आणु शकतो का? याबाबत जरा आम्हांला सांगा.

**मा. सचिव :—** मी काय सांगितले, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाबाबत आपणांस कोणत्याही प्रकारचे भाष्य करायचे नाही. असे काही बोलायचे नाही की, ज्यामुळे विपरित परिणाम होतील. आपण जेव्हा भाष्य कराल तेव्हा ते विचारपुर्वक करायचे आहे, जेणेकरुन मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही. व याबाबत आपली दिशा व दशा काय आहे हे अदयाप मला समजले नाही. याबाबतची दिशा व दशा आपणांस ठरवायची आहे.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** असे ऐकण्यात आले आहे की, एक ठराव तयार होऊन येणार आहे. तर अशा प्रकारचा ठराव महासभेत आणु शकतो का?

**मा. सचिव :—** मी काय म्हटले की, असे कोणतेही प्रतिकुल भाष्य करता येणार नाही.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** ठराव आल्यानंतर आपण आपले मत दया. तोपर्यंत जावु दया. ठराव आणल्यानंतर आम्ही विचारु त्यावर चर्चा होवू शकते काय?

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—** सचिव साहेब, एक सांगा दशा व दिशा आम्हांला ठरवायची आहे का? दशा व दिशा काय होईल ते तर उच्च न्यायालयाने दिले आहे ना? आम्ही लोक कोणती दशा व दिशा करु शकतो ते आम्हांला सांगा. आम्ही उच्च न्यायालयाला निर्देश देणार आहोत का की दशा व दिशा अशी नाही होणार अशी—अशी होईल.

**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—** सचिव साहेब, सभा सुचनेवर आपण जो विषय आणला आहे, त्याचा व उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा काही संबंध आहे का? जर संबंध नसेल तर सभा सुचनेवरील विषय बरोबर आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णयाशी या सभा सुचनेवरील विषयाचा काही संबंध आहे किंवा नाही हे सुध्दा आपण स्पष्ट करा.

**मा. सचिव :—** या सभा सुचनेवर कुठेही असा उल्लेख करण्यात आलेला नाही की मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर त्यावर आपण चर्चा करत आहोत. यामध्ये असे लिहिले आहे की, अनाधिकृत बांधकामांवर जी कारवाई होणार आहे, व त्याचा काय परिणाम होणार आहे, त्याबाबतीत विचार विनिमय करुन योग्य दिशा / मार्ग काढायचा आहे. आपण कोणता ठराव करणार आहात याचे मला अनुमान नाही. आपण काय निर्णय घेणार आहात हे सुध्दा मला माहित नाही. जेव्हा महासभेमध्ये एखादा विषय येतो, तेव्हा तो महासभेची संपत्ती होतो. त्या विषयास दिशा व दशा देणे हे आपले काम आहे. आपणां सर्वांनी मिळून निर्णय घ्यायचा आहे. आपण काय निर्णय घेणार आहात त्याचा येथे काहीही उल्लेख नाही.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :— सचिव साहेब, आपण हे स्पष्ट केले पाहिजे की, उच्च न्यायालयाचा ८५५ इमारतींबाबत जो निर्णय आला आहे, त्या विषयाचा व सभा सुचनेवरील विषयाचा काही संबंध आहे का?

मा. सचिव :— मी काय म्हटले की, विषय आपल्या समोर आहे व विषयामध्ये कुठेही मा. उच्च न्यायालयाचा उल्लेख नाही. आपल्या समोर जो विषय आला आहे, त्यावर निर्णय आपणांस घ्यायचा आहे. आपण तो कोणत्या दिशेत घेवून जात आहात व कोणत्या दशेमध्ये निर्णय देत आहात. हे आपणांस ठरवायचे आहे. आता तर या विषयावर काहीही चर्चा झालेली नाही. तर मी काय म्हणणार?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :— मुंबई उच्च न्यायालयाचा जो निर्णय आला आहे, त्याचा व या विषयाचा काहीही संबंध नाही?

मा. सचिव :— मी असे काहीही म्हटलेले नाही. आपल्या चर्चेनंतर यावर अंतिम निर्णय होईल.

मा. सदस्या श्रीमती निना नाथानी :—मा. महापौर, मला एका शब्दाचा अर्थ येथे स्पष्ट करुन घ्यायचा आहे. दी कंम्पलीट सिटी ऑफ देवनगरी, देवनगरी या शब्दाचा अर्थ काय आहे, तो जरा कुपया आपण स्पष्ट कराल? उच्च न्यायालयाने आपणाकडे जो आदेश पाठविला आहे, त्यामध्ये देवनगरी हा जो शब्द वापरला आहे, त्याचा अर्थ काय? तो जरा स्पष्ट करुन सांगितला जावा.

मा. सचिव :— आपणास हे वाचनासाठी कोठुन मिळाले? कुठे आहे हे?

मा. सदस्या श्रीमती निना नाथानी :—मी अर्थ विचारत आहे.

मा. सचिव :— माझ्या तर वाचण्यात आले नाही. दि कंम्पलीट सिटी ऑफ देवनगरी असे कुठे लिहिले आहे?
मा. उप—महापौर :— ज्यांना बोलायचे आहे त्यांनी कृपया मा. महापौरांची परवानगी घ्यावी, परवानगी न घेता उभे राहून बोलणे सुरु करता?

मा. सदस्या श्रीमती निना नाथानी:—मी म्हंटले ना, मा. महापौरजी..........

मा. उप—महापौर :— आपण परवानगी घेतलीत?

मा. सदस्या श्रीमती निना नाथानी :— मी म्हटंले, ठिक आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— महापौर महोदया, हे जे व्हिडीओ शुटींग केले जाते, ते थेट प्रेक्षेपण आहे की काय?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— सहारा न्युज चॅनेलचे पत्रकार आहेत. बातम्यांसाठी ते सभागृहाच्या कामकाजाचे चित्रीकरण करत आहेत.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— हे जे दोघे बसले आहेत ते दोघेही एकाच चॅनलचे आहेत काय?

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :— मा. महापौरजी, उप—महापौरजी, या सभागृहात उपस्थित असलेले माझे सहकारी बंधु आणि भंगिनींनो, आज या सभागृहामध्ये सभा सुचनेवर जो विषय आला आहे, त्या विषयाच्या बाबतीत मी एक विशेष गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की, हा जो विषय आहे ''उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामांविरुध्द कारवाई वर विचार करणे व त्यांचे परिणामाबाबत दिशा ठरविणे.'' या विषयाबाबत खास करुन मी या सभागृहामध्ये उल्लेख करु इच्छितो. या विषयाबाबत या सभागृहात जी काही चर्चा होईल, जे सन्माननिय सदस्य त्या चर्चेत भाग घेतील, ती चर्चा जी आहे, ती विल बी साट ऑफ मर्सिपिटीशन टुअडर्स द गव्हर्मेंट ॲण्ड अदर ऑथरिटीज ऑफ द स्टेट. इन नो वे दीस हाउस इन्टेन्स टू कॉमेंटस् ऑन द जजमेंट ऑफ द हॉनरेबल हायकोर्ट वुई रिस्पेक्ट व्हेरीमच. हॉनरेबल लॉर्डस ऑफ द मुंबई हायकोर्ट ॲण्ड अवर डिस्कशन वील नेव्हर बी ए पार्ट ऑफ कमेन्ट ऑन द जज्मेंट. हे मी सभागृहाला स्पष्ट करुन सांगु इच्छितो. राहिला प्रश्न सभागृहात हा जो

विषय आलेला आहे, याची अंमलबजावणी काय होईल? यापुढे शहरातील वातावरण कसे होईल? लोकांच्या प्रतिक्रिया काय होतील? शहरामध्ये किती नुकसान होणार आहे? किती लोक बेघर होवू शकतात? काय शहरामध्ये अशा कारवाई मुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो? या सर्व ज्या गोष्टी आहेत, त्यावर आम्ही सभागृहात चर्चा करु इच्छितो. मी अतिशय स्पष्ट केले आहे की, मुंबई उच्च न्यालयाच्या आदेशावर आम्ही कोणतीही टिप्पणी करणार नाही. ना आम्ही टिप्पणी करु इच्छित. ना आम्ही त्यासाठी सक्षम आहोत. ना आम्ही त्यामध्ये जावु इच्छित, मी माझी चर्चा पुढे सरकविण्या अगोदर मला असे वाटते की, सभागृहामध्ये आमचे जे सदस्य आहेत, जे बंधु व भगिनी आहेत, या महानगरपालिकेची जी नोकरशाही आहे, व शहरातील जी जनता आहे, किंवा शहरातील येणारी आमची जी पिढी आहे, त्यांना कमीत कमी हे माहित पडावे. या शहराचा इतिहास काय होता? हे शहर कसे तयार झाले? व आज हे शहर जर तुटण्याच्या मार्गावर आले आहे, तर त्याचे कारण काय आहे? मी सभागृहाला सांगु इच्छितो की, देशाच्या फाळणीनंतर १९४७ मध्ये जेव्हा हिंदुस्तान व पाकिस्तान असे एका देशाचे दोन देश निर्माण झाले, व पाकिस्तानच्या भागातील जी जमिन गेली, त्यावेळेस आमच्या देशाचे जे नेता गण होते, त्यावेळेस त्यांनी पंजाबला अर्धा पंजाब दिला. बंगालला अर्धा बंगाल दिला. परंतु त्यावेळेस जो सिंध प्रांत होता, व त्यामध्ये राहणारे जे हिंदु लोक होते, त्यांना सांगण्यात आले की, आपणांस काही जमिन मिळु शकणार नाही. आमच्या विषयी असा अन्याय का? जेव्हा पंजाबला अर्धा पंजाब दिला गेला, बंगालला अर्धा बंगाल दिला, तर कमीत कमी सिंधचेही दोन भाग करा, एक भाग हिंदुंना दया. व दुसरा भाग जो आहे, ज्यांच्यामुळे आमच्या देशाची फाळणी झाली, त्या धर्मीयांना दया. परंतु त्यावेळेस भारत सरकारमध्ये आमचे जे नेतागण होते महात्मा गांधीजी, पंडीत जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, आचार्य कृपलानी जे त्यावेळेस कॉंग्रेसचे अध्यक्ष होते, कॉंग्रेस पक्ष श्रेष्ठी व भारत सरकारने आचार्य कृपलानी यांना सिंध मध्ये पाठविले व सांगितले की, आपण जरा सिंधी बंधुंना समजावून सांगा. जर आपणाला सिंधचा काही भाग मिळु शकत नसेल तर फार मोठी काही गोष्ट नाही, पुर्ण हिंदुस्तान आपला आहे. हिंदुस्तानमध्ये जेथे–जेथे आपणांस हवे तेथे आपण बसु शकतात व या देशामध्ये नागरीक म्हणुन आपणांस सर्व सन्मान मिळेल. आपल्या अधिका–यांचे रक्षण होईल. त्यावेळेस या देशाला भारत, इंडिया असे नाव दिले होते. या देशामध्ये आपल्या अधिकारांचे रक्षण होईल. काही हिंदु, सिंधी देशाच्या फाळणीनंतर नेते मंडळीच्या आश्वासनानंतर आपली जमिन, मालमत्ता, मातृभुमी, जन्मभुमी सर्व काही सोडुन नेते मंडळींवरील विश्वासावर आपल्या धर्माच्या रक्षणासाठी देशाच्या रक्षणासाठी आम्ही भारत हा जो या अगोदर सुध्दा आमचा देश होता. जो आज सुध्दा आमचा देश आहे, त्याचा आम्ही स्विकार करु. व संपुर्ण देश आमचा आहे. व संपुर्ण देशामध्ये आम्हांस सन्मानाने वागविले जाईल. व सर्व सन्मान व समान अधिकार इतर भारत वासियांप्रमाणे आम्हांलाही मिळतील. या आशा–आकांक्षा घेवून सिंध मधील आमचे सर्व हिंदु ज्यामध्ये फक्त सिंधीच नव्हते, आमचे काही महाराष्ट्रीयन बंधु सुध्दा त्यात होते, जे सिंध मध्ये राहत होते, जे शासकिय सेवेमध्ये मोठ–मोठया उच्च पदांवर कार्यरत होते, शिख होते, पंजाबी होते, असे कितीतरी जाती धर्माचे लोक होते. लबाना शिख सुध्दा होते, ते सर्व या देशातील नेतेमंडळींच्या आश्वासनावर सिंध सोडुन येथे आले. कुण्या काळात १९३५–३६ च्या अगोदर सिंध हा मुंबई राज्याचा एक भाग होता. मुंबई प्रदेश होता, त्याचा एक भाग होता. मी आज सुध्दा जेव्हा ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात जातो, तेव्हा पाहतो की, १९३० मध्ये मिरचंदानी नावाचा कुणी जिल्हाधिकारी तेथे होता. याचाच अर्थ असा आहे की, सिंध हा १९३५–३६ मध्ये मुंबई राज्याचा एक भाग होता. प्रशासकिय कामकाजाच्या दृष्टीने १९३६ मध्ये ब्रिटीशांनी सिंधला मुंबई राज्यातुन वेगळे केले. त्यास विर सावरकर यांनी विरोध केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुध्दा विरोध केला होता. इंग्रजांचे राज्य होते, त्यामुळे कुणाचे काही चालले नाही. फाळणीनंतर कित्येक सिंधी वेगवेगळया राज्यांमध्ये गेले, काही लोक मध्य प्रदेशात गेले काही उत्तर प्रदेशात गेले, काही राजस्थानमध्ये गेले, काही तामिळनाडुत तर काही कर्नाटकात गेले. काही आंध्र प्रदेशात गेले. परंतु काही सिंधी बांधवांचा समुह मुंबई विभागात आला. १९६० मध्ये ज्याने महाराष्ट्र राज्य म्हणुन रुप धारण केले. व महाराष्ट्राच्या मुंबईच्या जनतेने, आपल्या हिंदु बांधवांना प्रेमाने जवळ केले. त्यांच्या राहण्याची येथे व्यवस्था केली. हिंदुस्तानमध्ये त्यांच्या खाण्या पिण्याची व्यवस्था केली. व त्यावेळेस मुंबई व महाराष्ट्र राज्यातील, बंधु –भंगिनींनी या सिंधी , हिंदु बांधवांना जे सहाकार्य दिले, ती एक ऐतिहासिक बाब आहे. सिंधी समुदाय ही घटना कधी विसरु शकणार नाही. आज असे वाटत आहे की, जी स्थिती १९४७ मध्ये होती, तीच स्थिती पुन्हा तर तयार होत नाही? असे का होत आहे? ज्या लोकांना लष्करी छावणी मध्ये वसविले, जो भाग दुस–या जागतिक महायुध्दात कल्याण तालुक्याचा एक भाग होता. उल्हासनगर एक लष्करी छावणी होती. ९ खेडे गांवांच्या विभागास उल्हासनगर शहराचे नांव श्री. राज गोपालाचार्य यांनी ८ ऑगस्ट, १९४९ मध्ये दिले. त्या ९ खेडेगावांमध्ये ६० हजार सिंधी बांधवांना १३ किलोमिटरची जमिन दिली गेली. ज्यावेळी ती फक्त लष्करी छावणी होती. तेथे न रस्ते होते, ना पाण्याची व्यवस्था होती, ना लाईटची व्यवस्था होती, ना शौचालयांची व्यवस्था होती, काहीही व्यवस्था नव्हती. एवढेच नव्हे तर दळण घेवुन लोकांना कल्याणला जावे लागत होते. अशी त्या लष्करी छावणीची स्थिती होती. त्या लष्करी छावणीला मागील ५८

वर्षामध्ये, या शहरामधील जी जनता आहे, जी त्यावेळेस येथे आली होती. त्यांनी एक–एक विट ठेवून हे शहर तयार करावयास सुरुवात केली. आपल्या रोजी–रोटीसाठी जे लोक आले होते, त्यांनी सरकारवर ओझे म्हणून राहणे मान्य केले नाही की ज्या सरकारने, ज्या लोकांनी आम्हांला सहकार्य केले, सहाय्य केले. आम्ही त्यांच्यावर ओझे म्हणुन राहु इच्छित नाही. लोकांनी लहान–लहान उदयोग सुरु केले. आपल्या खांदयावर ओझे घेवून, कपडे घेवून, बिस्कीटे, कंन्फेक्शनरी घेवून मुंबईस जात होते, लोकल ट्रेनमध्ये व्यवसाय करत होते. पैसे कमावुन आपल्या कुटुंबियांचे पालन–पोषण करत होते. परंतु ५८ वर्षानंतर आपल्या मेहनतीने, आपल्या घामाने, या शहरातील लोकांनी हे शहर निर्माण केले. एवढेच नाही तर या शहराला व्यापाराच्या क्षेत्रात एवढया उच्च स्थानात नेवुन ठेवले की, भारताच्या सर्व प्रदेशातील लोक उल्हासनगरमधील व्यापारी दृष्टीकोन पाहून उल्हासनगरकडे येवू लागले. एक अशी स्थिती निर्माण झाली, देशाच्या सर्व प्रदेशातील लोकांना असे वाटु लागले की, आपणाला जर रोजगार मिळणार असेल, नोंकरी मिळणार असेल, व्यापार चालणार असेल, व त्याच बरोबर जर घरही मिळणार असेल तर ते मुंबईच्या बाजूला असलेल्या उल्हासनगरमध्येच मिळेल. जे शहर मुंबई पासुन ६० किलो मिटर अंतरावर आहे, व प्रत्यक्षात असेच झाले. आज उल्हासनगर मध्ये संपुर्ण देशभरातील लोक येथे येवून राहतात, हे शहर केवळ सिंधी बांधवांचेच राहिले नसुन ते सर्व भाषिकांचे शहर झाले आहे, देशाच्या सर्व भागातील लोक येथे राहतात, धंदा, व्यापार, व्यवसाय करतात आणि त्यांचे कुंटुंब चालवितात. आज दुस–या प्रदेशांमधुन जे लोक आले आहेत, जे येथे राहत आहेत, त्यांना येथे सुध्दा घर आहे, व त्यांच्या प्रदेशात सुध्दा घर आहे. येथे सुध्दा सदनिका असेल, दुकान असेल, मध्य प्रदेशामध्ये राजस्थानमध्ये, उत्तर प्रदेशमध्ये, तमिळनाडु, केरळामध्ये, कुठेतरी स्वत:ची जमिन असेल, बंगला असेल, शेत जमिन असेल, ५–५० एकर जमिन असेल, ५०० एकर जमिन असेल, असे लोक आज उल्हासनगरमध्ये राहत आहेत. उल्हासनगर हे एक छोटे हिंदुस्तान झाले आहे. ही आमच्यासाठी व संपुर्ण महाराष्ट्र राज्यासाठी सौभाग्याची गोष्ट आहे. या शहराने असे एक स्थान निर्माण केले आहे. ज्या शहरामध्ये विविध प्रदेशातील लोक राहतात व सुखाने व शांतीने राहतात. मागील ५८ वर्षामध्ये या शहरामध्ये कधीही जातीय दंगली झाल्या नाहीत. आज संपुर्ण देशाची स्थिती पाहीली तर आपणांस कित्येक ठिकाणी शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचा दिसेल. जातीय दंगली झाल्याचे दिसेल. ५८ वर्षाचा उल्हासनगर शहराचा इतिहास जर पाहिला तर कुठेही जातीय दंगीचा लवलेश या शहरामध्ये दिसुन येणार नाही. जेवढे काही लोक येथे राहतात मग ते कोणत्याही जाती–धर्माचे असोत शांतीने राहतात. व आपला परिवार चालविण्यासाठी या शहराची राजनिती चालविण्यासाठी, प्रत्येक क्षेत्रात त्यांची भागीदारी आहे. असे शहर ज्यास छोटे हिंदुस्तान म्हटले जाते. आज–उदया या शहराची स्थिती काय होणार आहे हे कुणालाही माहित नाही. कुणाला माहित नाही. शहरामध्ये अशा चर्चा चालु आहेत की, ८५५ ज्या इमारती तुटतील, कमीत कमी या शहरातील लोक बेघर होतील. एवढेच नाही तर काही कायदेतज्ञ जे आहेत, त्यांचे हे मानने आहे की, शहरातील प्रत्येक अनाधिकृत बांधकामाची महापालिकेकडुन ओळख पटवुन त्याच्यावर कारवाई केली जाईल. जर अशा प्रकारची कारवाई झाली तर मला असे वाटते, जवळ–जवळ ९० टक्के शहर निष्कासीत होईल. जवळ–जवळ ९० ते ९५ टक्के बांधकामे ही शासकिय किंवा खाजगी जमिनिवर, महापालिकेच्या जमिनीवर आहेत. ही सर्व बांधकामे अनाधिकृत आहेत. यामुळे संपुर्ण शहर उध्दवस्त होईल व जर असे झाले तर कमीत कमी ६ लाख लोक बेघर होतील. ही एक अशी समस्या निर्माण झाली आहे, जिच्याकडे ना केवळ महाराष्ट्र राज्य सरकारचे लक्ष गेले पाहिजे, तर भारत सरकारचे सुध्दा लक्ष गेले पाहिजे की, ज्या सढळ हेतुने ही जागा निर्वासीत लोकांना राहण्यासाठी दिली आहे. व शहर वसाहत कार्यालयाकडुन विकास आराखडयातील नियमानुसार हे शहर चालविले जात होते. १९७१ मध्ये ही सर्व जमिन भारत सरकारने हस्तांतरीत केली. व असे आदेश सुध्दा दिले की, या शहरामध्ये जमिनीच्या विक्रीचे जे व्यवहार होतील. त्यामधुन जो पैसा येईल, जो महसुल येईल महाराष्ट्र राज्य सरकार तो पैसा प्लॉट साठी शहराच्या विकासासाठी खर्च करेल. अशा परिस्थितीतून गेलेले आमचे हे शहर आहे. मागील ५८ वर्षामध्ये आमच्या शहरामध्ये जी नेते मंडळी झाली, आमदार झाले, खासदार झाले, १ ऑक्टोंबर १९६० रोजी नगरपालिका स्थापन झाली. जे नगराध्यक्ष झाले. १९९६ मध्ये दस–याच्या दिवशी या शहरामध्ये महानगरपालिकेची स्थापना झाली. कित्येक महापौर झाले, सर्व नेत्यांनी सुरुवातीपासुन आजपर्यंत आपापल्या हिशोबाने, आपापल्या क्षमतेने, आपापल्या राजकिय प्रभावाने सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला आहे. या शहराची जी स्थिती आहे , ती एक विशिष्ट प्रकारची आहे. या शहरामध्ये एक वेगळया प्रकारची स्थिती आहे. जी बाकी शहरामध्ये नाही. परंतु १९४७ मध्ये जे लोक येथे राहु लागले त्यांनी त्यावेळेस जे सरकारी अधिकारी होते, ज्याचा उल्लेख उल्हासनगर महानगरपालिकेचे आमचे जे आयुक्त आहेत, त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात जे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे, त्यामध्ये सुध्दा केलेला आहे. त्यामध्ये हे लिहिले आहे की, त्यावेळेस जे सरकारी अधिकारी होते, जे पुर्नवसन अधिकारी होते, त्यांनी जनतेला मौखिक आदेश दिले होते की, आपणांस आपल्या रोजगारासाठी, राहण्यासाठी जेथे जमिन दिसेल ती जमिन आपण ताब्यात घ्या. असा प्रतिज्ञापत्रात हा सुध्दा उल्लेख आहे की, त्यावेळेस १९६५ पुर्वी ३० हजार पेक्षा अधिक अनाधिकृत बांधकामे आढळून आली होती.

ती नियमित करण्यासाठी सरकारने धोरण ठरविले. ११/५/१९६५ पुर्वीची जेवढी काही अनाधिकृत बांधकामे असतील ती नियमित केली जावी. उल्हासनगर शहराच्या विकास आराखडयात बाधित होत नसतील तर परंतु मी एक गोष्ट सांगु इच्छितो, १९४७ पासुन या शहरामध्ये जे मोठया प्रमाणावर विकास कार्य सुरु झाले, व ज्या शहराचा विकास आराखडा १९७४ मध्ये आला. त्यावेळेस जवळ जवळ सर्व शहर विकसित झाले होते. मला चांगल्या प्रकारे आठवण आहे की, १९७८ मध्ये श्री. प्रल्हाद अडवाणी जेव्हा नगराध्यक्ष झाले होते, ते जनतेमधुन थेट निवडुन आले होते. जनतेने त्यांना थेट नगराध्यक्ष म्हणुन निवडुन दिले होते. त्यावेळेस मी विकास आराखडयावर जेव्हा नजर टाकली, तेव्हा असे वाटले की, शहराचा विकास आराखडा नाही तर शहराला उध्दवस्त करणारा प्लॅन आहे. ते यासाठी की, तो जो विकास आराखडा तयार केला होता, तो एका टेबलावर बसुन एका खोलीमध्ये शहराचा विकास आराखडा तयार केला होता. त्या प्लॅनमध्ये अशा अशा तरतुदी होत्या, एक ४० फुटाचा रस्ता जो शासनाने बांधलेल्या मिळकती होत्या ज्यांना बॅरेकस् म्हटले जात होते, जे सरकारने स्वत: बांधले होते, जे लष्कराच्या काळात बांधण्यात आलेले होते, ते तोडुन ४० फुटाचा रस्ता करायचा आहे. अशा परिस्थितीमध्ये हे शहर विकसित होवू लागले. नगरपालिका आल्यानंतर लोकनियुक्त जे प्रतिनिधी आले. बाकी शहरामध्ये जावुन दिल्ली, मुंबई, कलकत्ता, मद्रासमध्ये तेथिल विकास पाहत होते. त्यांना पण असे वाटत होते की, आम्ही उल्हासनगरमध्ये राहतो, आम्ही पण आमच्या शहरवासियांना असे शहर दयावे. जो दुस–या शहरांच्या तुलनेत काही तरी दिसेल. १९७८ पासुन आज २००५ पर्यंत शहराच्या विकासाच्या आड या शहरातील कित्येक लोकांच्या मिळकती आम्ही निष्कासीत केल्या आहेत. या शहरातील हजारो लोकांचे आर्थिक नुकसान नगरपालिका व महानगरपालिकेने केले आहे. फक्त शहर विकासाच्या नावाने कारण की, या शहराची जनता या शहरातील लोक नियुक्त प्रतिनिधी ते नगरसेवक असोत, महापौर असोत, नगराध्यक्ष असोत, आमदार असोत, खासदार असोत त्यांना वाटत होते की, हे शहर योग्य रितीने विकसीत व्हावे. असे प्रयत्नही केले होते. अनाधिकृत बांधकामे निर्माण करण्याची प्रवृत्ती या शहरामध्ये का निर्माण झाली? त्या मागे सुध्दा एक बराच मोठा इतिहास आहे. त्यावेळच्या निर्वासीतांना राहण्यासाठीही लष्करी छावणी दिली होती. त्यावेळी त्यांची संख्या होती ६० हजार व १३ चौरस किलोमिटरची जमिन व आज शहराची लोकसंख्या आहे, ती जवळ–जवळ ७ लाख. शहराचे क्षेत्र वाढविण्यासाठी येथिल नेते मंडळी राज्य शासनाकडे वेळोवेळी विनंती केली आहे. मुंबई कमी पडु लागली तर नवी मुंबई निर्माण केली गेली. औरंगाबाद कमी पडु लागले तर नविन औरंगाबाद तयार केले गेले. दिल्ली कमी पडु लागली तर नवीन दिल्लीचा विकास झाला. जेथे–जेथे लोकसंख्या वाढते तेथे राज्य सरकारचे कर्तव्य ठरते की, अशा शहरांना जादा जमिन देवुन अशा शहरातील लोकांच्या रहिवास, व्यापार व औद्योगिक विकासा आडच्या समस्या दुर व्हाव्यात, परंतु दुर्भाग्याने म्हणावे लागत आहे की, उल्हासनगरला आता पर्यंत जादा जमिन मिळालेली नाही. १३ चौरस किलोमिटरची जमिन आजपर्यंत तेवढीच राहिली आहे. त्यामध्ये आजपर्यंत काहीही वाढ झालेली नाही. याबाबत आम्ही कित्येक वेळा सरकारकडे शिष्टमंडळे घेवून गेलो आहोत. महाराष्ट्र राज्याच्या अलग–अलग मुख्यमंत्री महोदयांना भेटलो आहोत. त्यांच्याकडे आमची जी निवेदने आहेत ती त्यांच्या दप्तरी पडुन आहेत. परंतु आजपर्यंत या शहरास जमिन वाढुन मिळालेली नाही. मागील ५८ वर्षापुर्वी जी कुटुंबे आली होती, त्यावेळेस जे ५ माणसांचे कुटुंब होते त्याचे आता २५ माणसे झाली आहेत. कुठे जातील हे लोक? कुठे राहतील? त्यांना कोणताही पर्याय नाही. म्हणुनच लोक टावर सारखी उंच–उंच बांधकामे करु लागले आहेत. समांतर बांधकामांची काही शक्यता दिसत नव्हती. म्हणुनच दुर्भाग्याने आज शहरामध्ये एवढया मोठया प्रमाणावर अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत. अशी स्थिती फक्त उल्हासनगरमध्येच नाही, इतर ठिकाणी सुध्दा असे झाले आहे. उल्हासनगरच्या आजुबाजुस आपण जर नजर टाकलीत, बाजुला कल्याण–डोंबिवली महानगरपालिका आहे. ठाणे महानगरपालिका आहे. अंबरनाथ व कुळगांव–बदलापुर नगरपालिका आहेत. अशा कित्येक ठिकाणी अनाधिकृत बांधकामे आहेत जेथे–जेथे नगरांचा विकास झाला आहे, जेथे–जेथे रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत, व्यापा–यांच्या संधी वाढल्या आहेत तेथे विविध प्रदेशातील लोकांची ये–जा सुरु होते. व त्यामुळेच या शहरांमध्ये अनाधिकृत बांधकामे करण्याची प्रवृत्ती उदयास येवून ती दिवसेंदिवस वाढत आहे. उल्हासनगर त्याला अपवाद नाही. हे एकटया उल्हासनगरचे उदाहरण नाही की जेथे अशी स्थिती निर्माण झाली आहे. अशी स्थिती आजुबाजुंच्या शहरामध्ये सुध्दा झाली आहे. कोणतीही गोष्ट लक्षात घेता अनाधिकृत बांधकामे करण्याची प्रवृत्ती कधी ना कधी आम्हांला भारी पडणार आहे. या शहरातील नेते मंडळी या बाबत वेळोवेळी राज्य सरकारकडे गेले आहेत. या शहराबाबत असे एखादे धोरण तयार करावे जसे दिल्लीमध्ये अनाधिकृत बांधकामांवर मोठया प्रमाणावर दंडाची रक्कम आकारुन ती नियमित करण्यात आली. तसेच इतर प्रदेशांमध्ये सुध्दा केले आहे. तशी एखादी योजना या शहरासाठी व या शहराच्या आजुबाजुस ठाणे जिल्हयातील जी शहरे आहेत त्या शहरांसाठी आणुन किंवा महाराष्ट्र राज्यांमध्ये बाकी जी शहरे आहेत, त्यांमध्ये अशा प्रकारच्या ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत, तेथे एखादी निश्चित अशी कालमर्यादा ठरवुन २००५ किंवा २००२ पर्यंत जी काही बांधकामे झाली आहेत, त्यांना नियमित करण्यासाठी राज्य सरकारने एखादा कायदा करावा. मी सभागृहाला सांगु इच्छितो की, मागील ५ वर्षात

महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख मागच्या वेळेस महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री होते. सन २००२ मध्ये त्यावेळस मी आपल्या शहराचे आमदारांबरोबर तसेच श्री. वसंतराव डावखरे जे आमच्या विधानपरिषदेचे उप–सभापती यांच्यासह कित्येक बैठकांमध्ये सहभागी झालो होतो. व त्यांच्यासमोर आम्ही आमच्या समस्या मांडल्या होत्या की आमच्या शहराची अशी–अशी स्थिती आहे. व आमच्या शहरासाठी आपण काही तरी करा. मी, मा. विलासराव देशमुख्य, मुख्यमंत्री यांना धन्यवाद देवु इच्छितो. महाराष्ट्र राज्य सरकारच्या सर्व नेते मंडळींना धन्यवाद देवू इच्छितो. ते सर्व खुपच वास्तववादी आहेत. त्यांना अशी जाणिव झाली की, उल्हासनगरची स्थिती अशी आहे व यापुढे काही समस्या उद्‌भवु नये म्हणुन उल्हासनगर मधील अनाधिकृत बांधकामांबाबत संवेदनशिल भुमिका घेतली पाहिजे. व मानवतेच्या दृष्टीकोनातुन शहरासाठी काहीना काही निर्णय घेतला पाहिजे. शेवटच्या बैठकीच्या वेळेस मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी नगरविकास सचिव, महसुल सचिव, पुनर्वसन सचिव यांना सन २००२ मध्ये निर्देश सुध्दा दिले होते. ज्याचे इतिवृत्त आमच्याकडे आहे. उल्हासनगरमधील अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी बाकी शहरांमधील, बाकी प्रदेशांमधील अनाधिकृत बांधकामे कशी नियमित केली याचा अभ्यास करुन या शहराच्या समस्येबाबत काहीना काही तोडगा काढा. परंतु मी असे म्हणेन की, नोकरशाहीची चाल जी असते ती अतिशय संथ असते. ते लोक हळुहळु चालतात. महाराष्ट्र राज्य सरकार व त्याचें नेतागण कोणत्याही पक्षाचे असो महाराष्ट्राची ही प्रथा आहे. प्रदेशात राहणारे जितके पण १० –११ करोड लोक आहेत, जनता आहेत, त्यांचे पालन–पोषण चांगल्या त–हेने व्हावे. महाराष्ट्र प्रदेश, सर्व जगात क्रमांक १ वर असावा. त्या दृष्टीनेच महाराष्ट्राचे नेता प्रयत्न करतात. कोणत्याही जाती धर्माचे लोक असोत, त्यांना त्यांच्या वास्तव्यासाठी त्यांची चांगल्या त–हेने व्यवस्था होवू त्यासाठी नेहमी सरकार व त्यात असलेले मुंख्यमंत्री व मंत्री प्रयत्नशील असतात. आम्हांला आज देखील पुर्ण विश्वास आहे. शहरातील लोकांना विश्वास आहे. शहरातील ७ लाख जनतेला विश्वास आहे. या शहरातील नेत्यांना विश्वास आहे. या शहरातील जितके पण प्रतिनिधी आहेत वेगवेगळया राजकिय पक्षाचे त्यांना देखील विश्वास आहे की महाराष्ट्र राज्य सरकार या समस्येचे नक्कीच निराकरण करेल. या महानगरपालिकेतसुध्दा वेळोवेळी सरकारला सूचीत केले आहे. मी येथे त्याचा उल्लेख करु इच्छितो. दिनांक २०.११.९७ रोजी ठराव क्र. २७ याच महापालिकेच्या सदनामध्ये पारीत झाला होता. त्यात असे लिहिले होते की, शहरातील जितके पण अनाधिकृत बांधकामे आहेत ती १.१.९५ पर्यंत नियमित केले जावे. तो ठराव सर्व संमतीने पास करुन बोडारे साहेब ऐका जेव्हा शिवसेनेचे महापौर होते. त्यावेळेस तो ठराव सर्वसंमतीने पारीत झाला होता की महाराष्ट्र सरकारने उल्हासनगरमधील १.१.९५ मधील अनधिकृत बांधकामांना नियमित करावे. म्हणुन ती ठरावाची प्रत शासनाकडे पाठविली होती. शिवसेनेचे महापौर होते उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये आणि मला वाटते त्यावेळी महाराष्ट्र शासनावर देखील शिवसेनेचे सरकार होते. यानंतर एक दुसरा ठराव २० मार्च २००२, ठराव क्र. ३० आहे, तो संमत केला होता. ज्यात बाल्कनी स्टेअर केसेस अशा काही अनियमितता ज्या इमारत बांधकाम करतांना केल्या गेल्या. व चटई क्षेत्र वाढविण्यासाठी, चटई क्षेत्र एक वरुन तीन करण्यासाठी ठराव होता. सर्वसंमतीने तसा प्रस्ताव पारीत करण्यात आला होता. पारीत करुन महाराष्ट्र शासनाकडे पाठविला होता. सन २००२, १९ ऑक्टोंबर ठराव क्र. ४० त्यात पण असा प्रस्ताव केला गेला. ३१ मार्च २००२ मध्ये जितके पण अनाधिकृत बांधकाम झाले, त्याला शासनाने नियमित करावे असा ठराव उल्हासनगर महापालिकेने केला. सांगण्याचा अर्थ असा आहे, या शहरातील जितके पण निवडुन आलेले प्रतिनिधी आहेत, शिवसेनेचे असोत, भाजपाचे असोत, राष्ट्रवादीचे असोत, कॉंग्रेसचे असोत, विपक्ष असोत, कुणी पण असोत ते नेहमीच दक्ष राहिले आहेत या समस्येविषयी. आणि तसे महाराष्ट्र शासनाला आम्ही निवेदन देखील दिले आहे. परंतु दुर्देवाने वेळेनुसार ती गोष्ट घडु नाही शकली. परंतु आज अशी वेळ आली आहे, १–१ सेकंद जरी या विषयाबाबत विलंब झाला, तर शहरात मोठया प्रमाणात विनाश होणार. होवू शकते शहरातील जनता उत्तेजित होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करु शकते. ते हाताळणे नंतर कठिण होवून बसेल. म्हणुन माझी सदनाला विनंती आहे, सर्वांनी सर्व संमतीने एक ठराव पारीत करुन महाराष्ट्र शासनाकडे पाठवुन त्यांना निवेदन करु. तुम्ही या प्रकरणात लक्ष घाला. आणि या समस्येचे समाधान करावे. इमारतीत राहणारे जितके लोक आहेत, त्यांच्यावर जास्त दंड आकारावा परंतु त्या बांधकामाला नियमित करावे. त्यांना बेघर करु नये. जर ८५५ बांधकाम तुटतील तर कमीत कमी २००–२५० करोड राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान होईल. ३ लाख लोक बेकार होतील. जर प्रत्येक बांधकामांना तपासले तर ९० टक्के शहराची राख होईल. निर्वासीत कॉलनी मला असे वाटते महाराष्ट्र शासन हे सहन करु शकणार नाही. उल्हासनगर शहर हे त्यांच्या शरीराचे एक अंग आहे. जर शरीराचा एखादा अवयव काढुन टाकला तर मला नाही वाटत की महाराष्ट्र सरकार हे सहन करेल. म्हणुन मित्रांनो मी तुम्हांला निवेदन करतो की, एकजुट होवून एकमताने असा एक प्रस्ताव पास करावा जो मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवहेलना करणार नाही. त्यावर आपली कोणतीही टिप्पणी नको. परंतु त्याच बरोबर राज्य सरकारला एक असे निवेदन दयावे, माणुसकीच्या नात्याने सहानुभुती

दर्शक दृष्टीकोन ठेवून शहराला वाचविण्याचा प्रयत्न केला जावा. व शहराला उजाड होण्यापासुन वाचवु या. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> तुमचा हा ठराव आता आला आहे. तुम्ही प्रस्तावना वाचली का? उल्हासनगरमधील ८५५ अवैध इमारती तोडण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे या इमारतीत राहणा–या रहिवाशांची अवस्था दयनिय झाली असुन शहरात भितीचे वातावरण निर्माण झालेले असुन हा अवमान आहे की नाही उच्च न्यायालयाचा? या विषयावर चर्चा होत आहे, हा ठराव पास करायचा आहे. आम्ही करु शकतो की नाही ते जरा सांगा ना? आता ठराव तुमच्याकडे आलेला आहे. त्यावर चर्चा करु या ना चांगल्याप्रकारे? आपण आधी सांगा की, हा ठराव कायदेशीर आहे का? तुमच्या हातात ठराव आला आहे, प्रस्तावना व ठराव जरा वाचा व सांगा की यावर चर्चा करु शकतो की नाही? येथे ८६ लोक बसले आहेत, सर्वांची जबाबदारी बनते. सर्व जेल मध्ये जातील जर काही चुकीचे होत असेल तर. तर मला सांगा की हे चुकीचे आहे की बरोबर आहे? आम्ही जेल मध्ये तर नाही जाणार?

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> अजुन प्रस्ताव मांडला नाही आहे, सन्माननिय सदस्यांनी फक्त शहराची स्थिती समोर मांडली आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सचिव साहेब, विधी अधिकारी म्हणुन तुमची जबाबदारी आहे आम्हांला सांगणे. या विषयावर चर्चा होवू शकते की नाही?

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:–</u> तुमचा प्रस्ताव नंतर बघु आम्हांला आधी श्री. प्रकाश कुकरेजा सचिव यांना काही विचारायचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> सचिव साहेब, याची जबाबदारी पुर्ण आपल्यावर राहील. जर असे काही घडले तर याला तुम्ही पुर्ण जबाबदार असाल. कृपया तुम्ही आम्हांला स्पष्ट काय ते सांगा. या विषयावर चर्चा होवु शकते की नाही?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> सचिव साहेब, तुम्ही आधी सांगितले की, प्रस्तावना काय आहे, ठराव काय आहे, हे पाहून मी नंतर टिप्पणी देईल. सुरुवातीलाच महाराज यांनी सांगितले की, ८५५ इमारती तोडणेबाबत मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे इमारतीत राहणा–या रहिवाशांची अवस्था दयनिय झाली असुन शहरात भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे म्हणजेच उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे जनतेची अवस्था दयनिय झाली आहे. हे तुमचे शब्द आले. अवस्था दयनिय व भितीचे वातावरण आहे कोर्टाच्या आदेशामुळे हा अवमान होतो की नाही? हे जरा सांगा. म्हणजेच चर्चेचा उपयोग होईल. महापौर महोदया.........

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> जे शब्द हरकती योग्य असतील ते काढुन टाकण्यात यावे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> सभागृह नेता हा काही लहान मुलांचा खेळ नाही किंवा मस्करी नाही आहे. याचा दहादा विचार करुन नंतर आणायला पाहिजे होते. म्हणुन आम्ही सांगितले की, जर तुम्हांला काही करायचे असेल तर त्यात कोर्टाचा काही विषय त्यात नसला पाहिजे. या त–हेने तुम्ही प्रस्ताव आणा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> तुम्ही प्रस्ताव बनवा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> आम्ही कशाला प्रस्ताव आणु. तुमच्याकडे एकापेक्षा एक तज्ञ माणसे बसली आहेत. हा ठराव जसाच्या तसा पास करु शकतो का? कोर्टाचा अवमान तर नाही होणार? आता तर तुम्ही ठराव वाचला तर तुम्हांला माहित पडले की नाही?

<u>मा. सचिव :–</u> मा. महापौर महोदया, मला आश्चर्य वाटते की, हा विषय महासभेचा आहे. चर्चा पण तुम्हांला करायची आहे. निर्णय पण तुम्हांला घ्यायचा आहे. वारंवार मला विचारले जाते की, हे योग्य आहे की नाही? मी तुमच्या कृतीचा भागीदार होवू शकत नाही. तुम्हीच ठरवायचे आहे हे चुकीचे आहे की बरोबर आहे. त्यासाठी तुम्ही तुमच्या मनाचा आणि बुध्दीचा वापर करुन निर्णय घ्यायचा आहे. काही अशा गोष्टी आहेत त्या

वस्तुस्थितीबाबत मला माहित देखील नाही तर मी कोणत्या याच्यावर तुम्हांला मी त्यावर काय भाष्य करु. कृपया तुम्ही मला न विचारता मा. आयुक्तांच्या जागी जे प्राधिकृत अधिकारी आहेत त्यांना विचारा कारण यात काही अशा गोष्टी आहेत त्याची वस्तुस्थिती मला माहित नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— सचिव साहेब, तुम्हांला वस्तुस्थिती कशी माहित नाही, कागद तुमच्या हातात आहे. ठराव तुमच्या हातात आहे तुम्ही पाहिला आहे.

मा. सचिव :— हा जो प्रस्ताव आहे तो केवळ तुमच्या समोर प्रस्तुत केला आहे. सुचक आणि अनुमोदक अजुन समोर आले नाहीत. अशा प्रस्तावनेत कधीपण सुचना, उपसुचना, बदल येवु शकतो. तुम्ही अजुन निर्णय घेतला नाही. तुम्हांला जर काही हरकती योग्य वाक्य वाटत असेल किंवा उल्लेख असेल तर तो तुम्ही काढु शकता. परंतु तो तुमचा स्वत:चा निर्णय असेल. ती तुमची जबाबदारी असणार.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— आमच्या जबाबदारीचा प्रश्न नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— हे तुम्ही आता सांगत आहात. यापुर्वी तुम्ही सांगितले होते की, प्रस्तावना व ठराव आल्यावर मी सांगेन. मी माझे मत सांगेन. आता चर्चा होणार आहे, तुम्ही ट्रवीस्ट करत आहात. आणि म्हणता ही माझी जबाबदारी नाही. तुम्ही पण या शहराचा एक भाग आहात, या शहराचे नागरीक आहात. महासभेचे सचिव आहात.............

मा. सचिव :— कृपया लक्ष दया.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :— महापौर महोदया, आमची विनंती आहे, १५ मिनिटासाठी सभा स्थगित करा. आम्ही सर्व पक्षीय एकत्र येवुन जर काही हरकती योग्य मुद्दे असतील तर ते प्रस्तावनेमधुन काढु. आमचे पंजाबी साहेब कायदेतज्ञ आहेत, बोडारे साहेब आहेत......

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— त्या आधी मी बोलु इच्छितो.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— महापौर महोदया, त्या आधी आम्ही काही चर्चा करु. काही मुद्दे आहेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— मला काही बोलायचे आहे. चर्चा झाल्यानंतर संशोधन करु शकतो. प्रस्तावनेत उच्च न्यायालयाचा जो उल्लेख झाला आहे त्यास आमचा विरोध आहे. तो उल्लेख नको. न्यायालयाचा अपमान आम्ही करु इच्छित नाही. उल्हासनगरच्या जनतेला महासभेकडुन जी अपेक्षा आहे ती पुर्ण करतांना उच्च न्यायालयाचा अपमान होणार नाही, हे पाहणे आपण सर्व लोकप्रतिनिधींचे कर्तव्य आहे. त्यामुळे प्रस्तावनेत बदल करावा लागेल. त्याच बरोबर जो ठराव आणला आहे. शासनाकडे उल्हासनगर शहरे १९४७ साली देशाच्या फाळणीमुळे विस्थापित होवून आलेल्या लोकांसाठी पुर्नवसन म्हणुन विकसित केलेले हे शहर असल्याने सदयस्थितीत निर्माण झालेल्या परिस्थीचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन शासनाने दिनांक १४/४/२००२ रोजी आणि २४/६/२००२, २७/१२/२००२ रोजीच्या बैठकांमध्ये या प्रकरणी दिलेल्या निदर्शनाप्रमाणे शासनाने या विस्थापित जनतेला सहकार्य होणे प्रकरणी त्याप्रमाणे कार्यवाही करावी. माखिजा साहेब म्हणाले की, ९७ पासुन ही प्रक्रीया चालु आहे. उल्हासनगरची महानगरपालिका ठराव करुन शासनाकडे पाठवते. माखिजा साहेब जेव्हा महापौर होते तेव्हा २००२ मध्ये ठराव झाला. व श्रीमती मालती करोतिया महापौर व उप—महापौर श्रीमती जया साधवानी होत्या. २००२ च्या १० व्या महिन्यात असेच प्रस्ताव केले परंतु आजपर्यंत त्या संबंधी शासनाकडुन काही आदेश आले नाहीत. तो मंजुर झाला की नाकारला काही माहित नाही. याबाबतीत काही आदेश नाही. उल्हासनगरचे प्रत्येक प्रतिनिधी उल्हासनगरच्या जनतेसोबत आहेत. त्यांना अडचणी नाही आल्या पाहिजेत. त्यांची अवस्था दयनीय नाही झाली पाहिजे. म्हणून प्रत्येक प्रतिनिधींचे प्रयत्न आपल्या पक्षातर्फे व वैयक्तीक रित्या चालु आहे. उल्हासनगरच्या या परिस्थितीला कोण जबाबदार आहे? कोणते अधिकारी जबाबदार आहेत. कोणत्या प्रशासनाचे, कोणत्या शासनाचे हा कुणीही विचार करत नाही. कुणाला विचार करायला वेळ पण नाही. परंतु आज जो आपण ठराव करत आहोत, त्याचा काही फायदा होईल काय? जे ९७ साली झाले आहे, २००२ मध्ये झाले, २००२ च्या १० व्या महिन्यात झाले. ते तसेच शासनाकडे प्रलंबित आहे. जर शासनाची काही इच्छा असेल तर यापुर्वीच काही कारवाई झाली असती. या पुर्वी ते आजपर्यंत कारवाई झाली नाही. तर २

महिन्यात शासन कारवाई करणार आहे का? पहिले त्याचे संशोधन झाले पाहिजे. नाहीतर एकेठिकाणी अशी परिस्थिती आहे की, सचिव आपले स्टेटमेंट दयायला घाबरत आहे. कोणी प्रतिनिधी उच्च न्यायालयाचा अपमान होईल म्हणुन घाबरत आहे. अशा अवस्थेत सर्व समस्यांना पार करुन आव्हान घेवून आपण जर ठराव पास केला तर उल्हासनगरच्या जनतेचा त्यात भले होईल का? आधी जसे स्वप्न जनतेला दाखविले तसे दाखवायचे का? आज उल्हासनगरमधील जनतेची अवस्था बिकट आहे. जिकडे जातो तिकडे हाच प्रश्न विचारला जातो की उल्हासनगरचे काय होणार? आणि अशा वेळी फक्त ठराव करुन शासनाकडे पाठवायचा. आजपर्यंत आमचे आमदार १९८७ पासुन उल्हासनगरचे एक सक्रिय नेता आहे. उल्हासनगरची प्रत्येक अवस्था त्यांना माहित आहे. ९२ पासुन ते आमदार आहेत. ते एक निष्णांत व्यक्ती आहे. त्यांना आधीच हे करायला पाहिजे होते. आज उल्हासनगरच्या महासभेला हा ठराव मांडण्याची वेळ आली नसती. जर आमदारांनी ते त्याच पक्षाचे आहे. सत्तापक्ष त्यांचा आहे. तरीपण महासभेला ठराव पाठवावा लागत आहे. उल्हासनगरच्या लोकांची काय स्थिती आहे. शासन स्तरावर निर्देश करणे त्यांच्या लक्षात आणुन देणे हे त्यांचे काम होते त्यांनी केले पण त्याचा काही परिणाम नाही झाला. उच्च न्यायालयात शासनाने काही सांगितले नाही त्यामुळे आज हे आदेश आले आहे. मी उल्लेख करु इच्छित नाही. आपल्या काही चुका आहेत, त्या यापूढे झाल्या नाही पाहिजेत. जर विकासआराखडा तुम्ही सर्व संमतीने नामंजुर केला त्यावेळी तो जर मंजुर झाला असता तर लोकांना काहीतरी सुटकेचा श्वास मिळाला असता. जे रिजर्व्हेशन साईडवर होते शासनाने ते डी.पी मध्ये रद्द केले होते. परंतु आपण त्यावेळी हा विचार केला नाही. जर तो प्लान मंजुर झाला असता तर ५० टक्के लोकांना त्याचा फायदा झाला असता. परंतु त्या चुकीमुळे १०० टक्के लोक त्रास भोगत आहेत. तर अशी चुक होवू नये म्हणुन, फक्त लोकांना दाखविण्यासाठी ठराव बनवायचा आणि त्यांना सांगायचे की आम्ही शासनाकडे पाठवला. असे नाही करायचे. फक्त लोकांकडुन प्रसिध्दी मिळविण्यासाठी सांगायचे आम्ही ठराव केला शासनाकडे पाठविला. रिजल्ट मिळण्यासाठी रिजल्टस् ओरिएंटेशन पाहिजे त्याकरीता शासनाने कार्यवाही केली नाही. उल्हासनगर महापालिकेने वारंवार निवेदन दिले. परंतु त्याच्यावर लक्ष दिले गेले नाही. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जर आंदोलन करावे लागत असेल, शासन स्तरावर, मंत्रालयासमोर. मुख्यमंत्र्यांच्या समोर आवाज निघाला पाहिजे. त्यात आम्हां सर्वांचे सहयोग असेल. शासनाने ते प्रलंबित ठेवल्यामुळे ही समस्या निर्माण झाली आहे. फक्त ठराव करुन या समस्येचे समाधान होणार नाही. परंतु ठराव केल्यानंतर त्यावर शासनाने मंजुरी देवून शासनाचे लक्ष वेधुन घेण्यासाठी असा काही प्रस्ताव आपण कराल. असा माझा सुझाव आहे. त्यात आम्ही तुमच्या सोबत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u> मा. महापौर महोदया, उप—महापौर महोदया, अवैध निर्माणास आमचा नेहमी विरोध होता. मी या चर्चेच्या दरम्यान सांगु इच्छितो की, अवैध निर्माणा विरुध्द आम्ही नेहमी जागरुक राहिलो आहोत. अवैध निर्माणांना संरक्षण देण्याची गोष्ट या सभागृहात कधीही झाली नाही. नगरपालिका असो वा महानगरपालिका अवैध निर्माण झाल्यावर त्याला लगेच तोडण्याबाबत आवाज या सभागृहात उठविला आहे. आणि आज पण आम्ही सर्व लोक याच विचारांशी सहमत आहोत. अवैध निर्माण बनतांनाच पाडुन टाकले पाहिजे. आणि ही समस्या वाढली नाही पाहिजे. सरकारने कायदा केला होता की, ज्यांना दोन पेक्षा अधिक मुले आहेत, त्यांना निवडणुक लढविण्याचा अधिकार नाही, उदाहरण म्हणुन सांगत आहे. परंतु त्या नियमात असे होते की, अमुक—अमुक तारखेच्या आत जर ४—५ मुले असतील, ४—५ असोत, ८ असोत त्यांना दोनच मुले समजले जाते. त्याचप्रमाणे अवैध निर्माणची जी समस्या आहे, त्या समस्येत देखील याप्रकारे समाधान निघायला पाहिजे. अवैध निर्माणाच्या आम्ही सर्व विरोधात आहोत. हे अवैध निर्माण एका दिवसात नाही निर्माण झाले. हे अवैध निर्माण पुर्ण शहराची समस्या आहे. पुर्ण जिल्हयाची समस्या आहे. पुर्ण प्रदेशाची समस्या आहे. पुर्ण देशाची समस्या आहे. या अवैध निर्माणच्या समस्येने ग्रासले आहे. ९५ टक्के अवैध निर्माण आहे. त्याला उध्दवस्त करुन अवैध निर्माणाचा प्रश्न सोडवावा. तर मला वाटते की, हे न्यायोच्चित नाही. सरकार जो काही कायदा तयार करते, तो जनतेसाठी असतो. जनहितासाठी असतो. अनहितासाठी नाही. महाराष्ट्र सरकारचे लक्ष जर एक ठराव पास करुन आपण वेधु इच्छितो. उल्हासनगर शहर ९०—९५ टक्के अवैध निर्माणाने वसलेले आहे. लाचारी काहीही असो, कारण काहीही असो, कल्पीत कुणीही असो, भ्रष्टाचार कारक असोत, भ्रष्टाचाराच्या कारणामुळे जे काही अवैध निर्माण झाले आहे, त्यावेळी जे अधिकारी होते, त्यांनी त्या बिल्डरांशी लागेबंधी केले. हेच कारण आहे त्यामुळे अवैध निर्माण वाढत गेले. याचा अर्थ हा तर नाही की कुणाचा दंड कुणा दुस—यावर आकारला जावा. आपल्या आयुष्याभराची कमाई फ्लॅट व दुकानात गुंतवली आहे. व्याजाने पैसा घेवून त्यात ओतला आहे. ज्यांनी प्रॉपर्टी खरेदी केली आहे त्यांना बेघर करुन रोडवर फेकावे हा काय न्याय आहे? नक्कीच नाही. बियर बार बंद करावे म्हणुन मुद्दा उपस्थित झाला आहे. तर रोडवर इतके हंगामे होतात, आंदोलने होतात, त्यांचे पुनर्वसन करण्यात यावेत म्हणुन... या शहराला ओसाड करत आहेत. आपण इतके घाबरायचे? साठ, सत्तर हजार बारबाला नोकरी जात आहे म्हणुन रोडवर उतरुन प्रदर्शन करतात, हे शहर सात लाख लोकांचे आहे, ८१

त्यांचे जनप्रतीनिधी आहे, एक आमदार आहे, एक खासदार आहे, सर्वांनी मिळुन सामुहीक रित्या महाराष्ट्र सरकारला याची जाणीव करुन दिली पाहिजे की, तुम्ही कायदयात संशोधन करा. पुर्वी जे बालविवाह होत होते २–४ वर्षाच्या मुलींबरोबर तर त्यावेळी कायदा बनला होता की, १३ वर्षाची मुलगी जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विवाह होणार नाही. परत कायदयात सुधारणा होवून १४ वर्ष केले गेले. परत १६ वर्ष केले गेले. व आज १८ वर्ष वय आहे. याचा अर्थ वेळोवेळी कायदा बदलत गेला आहे. आणि तो कायदा शहराच्या, जनतेच्या व लोकांच्या हितासाठी बदलला गेला आहे. जर कायदयात संशोधन केले जाते, कारण की, त्यावेळची परिस्थिती वेगळी होती, गरजा वेगळया होत्या. आजच्या गरजा वेगळया आहेत, परिस्थिती वेगळी आहे. हे सर्व लक्षात घेवून जर कायदयात संशोधन करण्याचा जर आपण प्रयत्न केला आपण काही प्रदर्शने केली तर नक्कीच आपण गुन्हा करत नाही. या शहरातील लोकांनी आपल्याला निवडले आहे. आपल्याला जर काही भिती आहे, दहशत आहे की, आपल्याला डिस–क्वॉलीफाईड केले गेले, शहराला वाचविण्यासाठी, संघर्ष करण्यासाठी आपल्या पदांची पर्वा नाही केली पाहिजे. शहरासाठी भांडले पाहिजे. संघर्ष केला पाहिजे. या शहराचे लोक जे नक्कीच आरामात झोपत नसतील. आज ते आपल्याला मोठया अपेक्षेने पाहत आहेत. आपले जनप्रतिनिधी आपल्यासाठी काय करत आहेत? या शहरातील अवैध निर्माणात आपले अधिकारी राहतात. जनप्रतिनिधी राहतात. या शहराचा व्यापारी पण राहतो, गरीबातला गरीब व्यक्ती देखील राहतो. हे शहराची जी समस्या आहे, ती प्रत्येक समाजाची समस्या आहे. उदाहरणार्थ अजुन एक गोष्ट सांगेल जुन्या आणि प्राचीन गुफांच्या रक्षणासाठी खर्च केला जातो. आमची जी सभ्यता आहे, सिंधी सभ्यता, ज्याच्याशी आमचा संबंध आहे. मोहनजोदडो वेळची संस्कृती आहे. १० हजार वर्षापुर्वीचे आहे. एवढया प्राचिन सभ्यतेचे अवशेष वाचविण्यासाठी व देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व पणाला लावून आलेल्यांसाठी एवढा पण खर्च होवू शकत नाही. संशोधन होवू शकत नाही? प्राचिन अवशेषांचे रक्षण करण्यासाठी पुरातत्व विभाग खर्च करु शकतो. या शहरातील लोक सर्वात जास्त धर्मनिरपेक्ष आहेत. जे देशभक्त आहेत, जे उदयोगपती आहेत, व्यापारी आहेत, ज्यांनी राष्ट्राच्या प्रगतीसाठी खांदयाला खांदा लावुन सहकार्य दिले आहे. सुनामी लाटा आल्या, भुकंप आला, वादळ आले, तर हे शहर सर्वात आधी मदतीसाठी धावुन जाते. आज त्यांच्या मदतीसाठी कोण येत आहे? नक्कीच महाराष्ट्र सरकारचे लक्ष आपण वेधले पाहिजे. एकदा नाही, वारंवार लक्ष वेधले पाहिजे. रोडवर उतरले पाहिजे. ठराव पण पारीत केला पाहिजे. या शहराची जनता आपल्याला विचारत आहे, आम्ही तुम्हांला निवडुन पाठविले आहे, तुम्ही आमच्या रक्षणासाठी काय करत आहात? माझ्या मित्रांनो, सर्व सन्माननिय सदस्यांनो, माझे तुम्हांला निवेदन आहे की, ज्या प्रमाणे वेळोवेळी नियमांमध्ये सुधारणा होते. आपण अपिल मध्ये जातो का जातो? ज्युनिअर कोर्टातुन, सेशन कोर्टात , सेशन कोर्टातुन हायकोर्टात , हायकोर्टातुन बॅच, नंतर सुप्रीम कोर्ट, त्यानंतर राष्ट्रपती, एक खुनी व्यक्तीला देखील राष्ट्रपती शिक्षा माफ करतो. त्यांच्या याचनेवर त्यांना माफ करु शकतात. त्याचे प्राण वाचविण्यासाठी. तर पुर्ण शहराच्या मुद्दयावर राष्ट्रपती का नाही हस्तक्षेप करु शकत नाही? अपिल मध्ये माणुस तेव्हा जातो, जेव्हा त्याला वाटते की, माझ्यावर अन्याय झाला आहे. म्हणुन तो दुस–या कोर्टात जातो. हायर ऑथरीटी म्हणुन या शहराच्या भल्यासाठी आवाज उठविण्यास हरकत काय की या शहरावर अन्याय झाला आहे. कोर्टात हे सांगितले गेले की, ८५५ बांधकामे अवैध आहेत. हे अर्धसत्य कोर्टासमोर आणले गेले. कोर्टाने विचार केला असेल, २० हजार इमारतीमधुन ८५५ इमारती अवैध आहेत. कोर्टासमोर सत्यपरिस्थिती मांडायला पाहिजे होती. पुर्ण सत्यापेक्षा अर्धसत्य खुप धोकादायक असते. पुर्ण सत्य जर कोर्टासमोर मांडले असते तर नक्कीच मानवतेच्या स्तरावर किंवा दृष्टीकोनातुन कोर्टाने हा निर्णय नसता दिला जो आज दिला आहे, म्हणुन वर्तमान परिस्थितीत आपल्या शहराला वाचविण्यासाठी भले आपण पक्षात किंवा विपक्षात बसलेले असू, आज ध्येय सर्वांचे एकच आहे. उद्देश सर्वांचा एकच आहे की, या शहराला वाचवायचे आहे. माझी तुम्हां सर्वांना विनंती आहे, अपिल आहे. निवेदन आहे, आग्रह आहे. राजनैतिक मतभेद बाजुला सारुन पद राहतात की नाही? हा विचार बाजुला करुन आपले शहर वाचु शकते की नाही? आपला समाज वाचु शकतो की नाही? जर शहरच नाही राहीले तर आपला काय फायदा? शहर राहिले तर राजनिती असणार. शहर असेल तर व्यापार असेल. शहर असेल तर आपण सलामत असु. **''सर सलामत तो पगडी पच्चास''** आमचे मित्र श्री. हरदास माखिजा यांनी जो प्रस्ताव मांडला त्या प्रस्तावाचे राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीतर्फे आम्ही समर्थन करतो. आणि त्याचबरोबर सभागृहाला आग्रह करतो की, जर कायदयात देखील संशोधन केले जातात. या प्रस्तावात देखील जर असे काही विवादास्पद बाब तुम्हांला वाटत असेल. तर तुम्ही त्यात संशोधन करा. सभागृहात तुम्ही जर आवाज उठविला तर तो एक स्वरात उठविला गेला पाहिजे. आपण सर्व प्रतिनिधी शहराच्या प्रती पुर्ण त–हेने प्रामाणिक आहोत. जनताची जी जबाबदारी आहे, ती जबाबदारी पेलण्यास आम्ही समर्थ आहोत. सक्षम आहोत. वेळ आली आहे, राजनैतिक भेदभाव विसरुन आपण सर्व एका मंचावर आवाज उठविला पाहिजे. राहिला प्रश्न आमच्या आमदारांविषयी बोलले गेले, या संदर्भात मी हे म्हणेण की, आमचे आमदार साहेब, पुर्ण प्रयास करत आहेत. हा ठराव पास केला नंतर देखील त्याच्यावर अंमलबजावणी व्हावी म्हणुन आमदार साहेब प्रयत्न करणार आहेत, त्यांची पण रात्रीची झोप, चैन, सुख उडाले

आहे. ते पण चिंतीत आहेत कारण या शहराने त्यांच्यावर जी जबाबदारी सोपविली आहे, त्यांना त्याची जाणीव आहे. आणि आम्ही आमच्या आमदार साहेबांना आग्रह देखील केला आहे. तुम्ही खासदार साहेब परांजपे त्यांना देखील सोबत घ्या. कारण हे शहर वाचले पाहिजे, शहरातील लोक वाचले पाहिजे. हा प्रश्न फक्त सिंधी समुदायाचा नाही आहे. हा प्रश्न राजस्थानी समाजाचा नाही, गुजराथींचा नाही, महाराष्ट्रीयनचा नाही, सिंधी किंवा पंजाबी समाजाचा नाही, शिखांचा नाही, मुसलमान बांधवांचा नाही, तर हे शहर सर्व लोकांचे शहर आहे, एक धर्मनिरपेक्ष शहर आहे. एक देशभक्त शहर आहे. अशा शहराची रक्षा, सभ्यतेची रक्षा, अशा शहराच्या संस्कृतीची रक्षा झाली पाहिजे. आताच आमच्या श्री. हरदास माखिजा साहेब, अर्धा पंजाब आम्हांला मिळाला नाही. मी हे म्हणु इच्छितो की, वीर सावरकर म्हणाले होते, जोपर्यंत सिंध प्रांत हिंदुस्थानाला मिळत नाही तोपर्यंत आपला देश स्वातंत्र नाही. त्यांना माहित होते की, सिंधी सभ्यता किती गरजेची आहे. त्यांना माहित होते की, सिंधी सभ्यतामुळे हिंदुस्तानात सभ्यता निर्माण झाली. त्याचे रक्षण झाले पाहिजे. म्हणुन सर्वात जास्त सिंधी समाज असलेले हे शहर आहे. देशात सिंधु धर्माचे हे पवित्र स्थळ मानले जाते. या धर्माची रक्षा करण्याकरीता आपल्याला सामुहिकरित्या एकत्र झालेच पाहिजे. शहराची जनता व्याकुळतेने पाहत आहे. शहराची जनता गोंधळलेली आहे. मदतीची आपल्याकडुन अपेक्षा करत आहे. इथे लिहिले गेले की, भयभित आहे. ज्यासाठी हरकत घेतली गेली. मला तर वाटते जनता भयभित नाही. जनता त्रासलेली आहे. हैराण आहे, मधुमेहाचे प्रमाण वाढले आहे. उच्च रक्तदाबाचे प्रमाण वाढले आहे. जर बुलडोझर लावुन इमारत पाडायला लागल्यावर काय माहित किती लोकांना हदयविकाराचा झटका येईल. ही गोष्ट मी तुम्हांला सांगतो, जनता इतकी हैराण आहे. म्हणुन जनतेची अडचण लक्षात घेवून कमीत कमी बारबालांकडुन एवढे तरी शिका त्या ७५,००० आहेत काही बांग्ला देशातुन आले आहे, ज्यांचा अधिकार नाही पुर्नवसनाचा त्या पण आपल्या अधिकारासाठी भांडतात. आणि महाराष्ट्र सरकारने झोपडपट्टीसाठी ज्या आरक्षित भुखंडावर बनवित आहे. त्यांना १९९५ पर्येत आरक्षण दिले, आता २००५ चालु आहे. त्यांचे पुनर्वसनाचे काम चालु आहे. ही महापालिका इतकी सक्षम आहे की इमारतींना तोडुन झोपडे बनविण्यासाठी जागा देवु शकेल? नक्कीच नाही देवु शकत. कारण की शहराची हद्द मर्यादीत आहे. म्हणुन आपण आभाळाच्या दिशेने वर गेले. या विकासाला आम्ही कोणाची नजर नाही लागु देणार, अजिबात नाही, कधीच नाही. म्हणुन आपण सर्व मिळुन या विषयी आवाज उठवू. दुसरी गोष्ट एक कडक हरकत आहे, मी माझ्या तर्फे देतो की जी करवाढ झाली आहे. ती शहराच्या विकासासाठी झाली आहे. रस्ते, पाणी, दिवाबत्ती यांच्या विकासासाठी करवाढ झाली आहे, जागा तोडण्यासाठी नाही. या करीता नाही की, या पैशामधुन जेसीबी मशीन येईल, बुलडोझर येईल त्याचे घर, त्याचा आशियाना तोडुन जाईल. हा पैसा शहराच्या विकासासाठी दिला आहे. विनाशासाठी नाही. आपले घर ओसाड बनविण्यासाठी नाही. या भावनांना प्रस्तावाच्या माध्यमाने महाराष्ट्र शासनापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करेल. तुम्ही शहराला महासभा संपल्यानंतर देखील असे आव्हान कराल जेणेकरुन शहर एक मंचावर येईल. पार्टीबाजी दुर करुन आपण सर्वांनी एकत्र येवून संघर्ष केला पाहिजे. आपल्या हक्कासाठी आपल्यालाच लढा दयावा लागेल. जेव्हा आपण आपली लढाई आपण स्वत: लढवू तर अल्ला, ईश्वर, भगवान, खुदा पण आपल्याला मदत करेल. मदत केल्याशिवाय तो राहु शकणार नाही या दोन शब्दाबरोबर आपल्या वाणीला मी विराम देतो. जय हिंद , जय महाराष्ट्र, जय भिम, जय झुलेलाल.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :–</u> मा. आयुक्त महोदय, मा. महापौरजी, मा. उप–महापौरजी, सर्व सन्माननिय सदस्य आजच्या या विशेष महासभेमध्ये अनाधिकृत बांधकामाविषयीचा जो विषय आज चर्चेला आला आहे. ब–याचशा सदस्यांची भाषणे ऐकली.........

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:–</u> टाले साहेब, हिंदीत बोला.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :–</u> ब–याचशा सदस्यांचे विचार ऐकले. मराठी समजते ना तुम्हांला? इथे एक मुद्दा विशेष प्रामुख्याने दिसला प्रत्येकाच्या भाषणामधुन एकच जाणवले खरे तर विस्थापीत लोकांचे हे स्थापित शहर त्याचे नाव आहे उल्हासनगर. ५८ वर्षाचे कारकिर्द असलेले हे उल्हासनगर शहर या विस्थापित लोकांचे येथे स्थापित झालेले आहे. ते पुन्हा विस्थापित होण्याच्या मार्गावर आहे. परंतु ब–याचशा वक्त्यांच्या चर्चेवरुन असे दिसले की, फक्त एकच समाज तेथे बरबाद होतो. एकच नाही तर संपुर्ण या शहरामध्ये राहणारा प्रत्येक वर्ग, प्रत्येक समाज येथे बरबाद होतो. उच्च न्यायालयात ८८५ किंवा ८५५ जे काही असेल ते फक्त तेवढेच गेलेले आहेत. खर तर निर्णय असा व्हायला पाहिजे होता की, संपुर्ण शहरातील प्रत्येक घर , शहराविषयी त्यांनी निर्णय घ्यायला पाहिजे होता. आणि हा निर्णय घेत असतांना ''चोर सोडुन सन्याशाला फाशी''. जो वर्ग गोर–गरीब आहे, जो वर्ग कष्टाने कमावुन खाणारा वर्ग आहे, अशा संपुर्ण तमाम समाजाच्या प्रत्येक वर्गाला येथे आज फाशी मिळण्याची वेळ आलेली आहे. मागच्या ४ महिन्यापुर्वी झोपडपट्टी वाशियांचा प्रश्न आला, श्री. विलासराव

देशमुखांनी त्यावेळेस सांगितले की, १९९५ च्या झोपडपट्टया तोडणार. त्यावेळेस आम्ही मैदानात उतरलो, रणांगणात उतरलो. आरपीआयतर्फे मुंडन आंदोलन केले. ब—याचशा संघटना तेथे मैदानावर उतरल्या. आणि त्यावेळेस २००० पर्यंतच्या झोपडपट्टया वाचविण्याचे जे निर्णय घेतले गेले तो आता अंमलात आणला गेला. माझा मुद्दा असा आहे, झोपडपट्टीमध्ये राहणारा माणुसच आहे. बिल्डींगमध्ये राहणाराही माणुसच आहे. आणि जर घटनेनुसार प्रत्येक माणसाला अन्न, वस्त्र, निवारा ज्या मुलभुत गरजा देण्याचे कर्तव्य राज्य शासनाचे आहे. तर बिल्डींगमध्ये राहणा—या एक व्यक्तीला निवारा देण्याचे काम हे शासनाचे आहे. ''चोर सोडुन सन्यासाला फाशी''. आज आमचा कमाऊ वर्ग येथे विस्थापीत होणार आहे. व जबाबदार कोण आहे येथे? त्यांच्यावर काय कारवाई होईल? ८६ नंतरच्या बिल्डींगा घेतल्या तर परंतु आता पर्यंत हा जो निर्णय घेतला गेला त्यामध्ये कोण—कोण जबाबदार आहे? शासन जबाबदार आहे की प्रशासन जबाबदार आहे? कोण—कोण जबाबदार आहे? याच्यावर आपण काय कारवाई करणार? याचा कुठेही काही उल्लेख नाही आहे. आणि हे करुन विस्थापीत जे आज होणार आहे, तसे पाहिले तर संपुर्ण शहर आधीच विस्थापित व्हायला हवे होते. संपुर्ण शहरच्या शहर उचलुन दुसरीकडे न्यायला पाहिजे. आणि हे करत असतांना अंमलबजावणी करत असतांना आजही त्या नावाखाली तुमचे प्रशासन गोर—गरीब लोकांना नाडतंय. त्या नावाखाली धमक्या दिल्या जातात. भिती दाखविली जाते. बरेचसे गैरप्रकार होतात. याचा पण विचार घ्या. अनाधिकृत बांधकामाविषयी आपण चर्चा करतो, त्यावेळेस हा विचार होणे आवश्यक आहे. उल्हासनगर शहराची परिस्थिती अशी का आहे? पुर्वीपासुन चटई निर्देशांक बाबत जर आपण भांडलो असतो, तर कदाचित आज ही परिस्थती वेगळी झाली असती. डीपी प्लॅन विषयी जर आपण योग्य निर्णय घेतला गेला असता तर आज हा प्रश्न उभा राहिला नसता. आणि हे करतांना पुर्वी शासनाने इथे जे लोक राहतात त्यांच्या विषयी कुठलीही प्रक्रीया राबवत नाही, त्यांना चटई निर्देशांक देत नाही. तर राहणार कुठे? संपुर्ण महाराष्ट्रामध्ये नव्हे तर संपुर्ण भारतामध्ये सर्वात डॅम्प सिटी म्हणुन उल्हासनगरचे नाव घेतले जाते. आणि ही डॅम्प सिटी इथे त्या पध्दतीने असेल तर येथे अनधिकृत हा प्रकार होणार म्हणजे होणार. त्याला पर्याय काय करता येईल, अधिकृत कसे करता येईल? या विषयाची जर शासनाची योग्य भुमीका असती तर हा प्रश्न उभा राहिला नसता. आमची राज्य शासनाला पक्षातर्फे आणि संपुर्ण शहरातल्या संपुर्ण लोकांतर्फे आज राष्ट्रवादी वेगळया भुमीकेतुन जाणार, कॉंग्रेस वेगळया, शिवसेना वेगळया, भाजपा वेगळया, आरपीआय वेगळया भुमीकेतुन चालणार उद्देश सर्वांचा एकच आहे. परंतु उद्देश एक असतांना सर्वांनी मिळुन जर आपण त्यावर जर राज्य शासनावर दबाव आणला त्यांच्याकडुन हा विस्थापीत होण्याचा प्रश्न सोडविला तर मला वाटते ते जास्त बरं होईल. आज नेमके ते होत नाही. आणि ठराव पास करुनपण नुसते काय होणार नाही. तर त्याच्यासाठी तुम्हांला रस्त्यावर उतरण्याची तयारी पाहिजे. जोपर्यंत आपण सर्व पक्षाचे लोक जर घेणार नसतील तर त्याचा उपयोग पण होणार नाही. मी सर्व पक्षांना जाहिर विनंती करेल, सर्व नेत्यांना जाहिर विनंती करेल की तुम्ही वेगवेगळया माध्यमातुन जाण्यापेक्षा सर्वांनी एकत्रितपणे जावुन, जसे श्री. लालवानी साहेब बोलले, संशोधन होणे जरुरीचे आहे. ते संशोधन करायला लावण्याची ताकद आपल्यामध्ये व इतर नेत्यांमध्ये तयार झाली पाहिजे. आज मी पुन्हा सर्वांना, परवा मी पुण्याला गेलो, आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. कवाडे साहेब, हा मुद्दा विधानपरिषदेमध्ये ते लवकरच घेणार आहेत, परंतु मला वाटते, एका पक्षाने लढण्यापेक्षा सर्व पक्षांनी जर एकत्रितपणे लढुन आणि फक्त कायदेशीर लढा नाही कायदेशीर बरोबर रस्त्यावर उठुन आंदोलन करण्याची तयारी जर आपण दाखविली तर मला वाटते, आपले हे शहर वाचु शकेल. या शहरातील लोक विस्थापित होणार नाही आणि हे होत असतांना ही सर्व प्रक्रिया राबवत असतांना तुमच्या प्रशासनाने इतर काही लोकांवर अन्याय करु नये. याची पण तुम्ही दक्षता घ्याल एवढी मी नम्र विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u> मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. लालवानी साहेब यांनी आपल्या संभाषणातुन उल्लेख केला आहे मा. खासदार साहेबांचा. मी या ठिकाणी सांगु इच्छितो, शिवसेनेच्या सर्व नगरसेवकांना आणि पदाधिका—यांना एक बैठक घेवून सन्माननिय खासदार साहेब यांनी आणि तसेच आमचे ठाणे जिल्हा प्रमुख मा. एकनाथजी शिंदे साहेब, ठाणे जिल्हयाचे आमदार यांनी सुध्दा आम्हांला वारंवार, या अगोदर जेव्हा पासुन वृत्तपत्रात ही बातमी ८५५ इमारती तोडण्याची सुरुवात झाली तेव्हा पासुन आमच्या बैठकी सुरु केल्या. निर्देशन दिलेले आहे, मार्गदर्शन केलेले आहे की, कुठल्याही परिस्थितीत या इमारती तुटत असतांना किंवा तोडत असतांना त्याच्या विरोधात जावुन आपल्याला जे काही आंदोलन करायचे असेल त्या आंदोलनास सामोरे जायला आपली तयारी असली पाहिजे. आम्ही सर्व या शहराचे रहिवाशी सर्व, उल्हासनगर मधील कुठल्याही जाती—जमातीचे लोक इमारतीत राहतात याला महत्व नाही. सर्वात जास्त महत्व माणुसकीला आहे. अशा विचाराने आम्ही या ठिकाणी संघटनेच्या माध्यमातुन काम करत आहोत. त्याचबरोबर सन्माननिय खासदार साहेबांनी सुध्दा मा. आयुक्त साहेब यांची भेट घेवुन शासनाला एक चांगला प्रस्ताव पाठविण्याचे त्यांनी या ठिकाणी सांगुन ठेवले आहे, आम्हांला सुध्दा या ठिकाणी मार्गदर्शन केलेले आहे. तर आज या ठिकाणी मी

एवढेच सांगु इच्छितो की, सन्माननिय सदस्य श्री. धनंजय बोडारे यांनी सांगितलेले आहे, आम्ही आपल्या बरोबर ज्या प्रमाणे शिवसेना आणि भारतीय जनता पार्टी हे दोन्ही पक्ष आपल्या सोबत आहेत व त्याचबरोबर उच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही, याकडे लक्ष देवून व्यवस्थित प्रस्तावना पाठविण्याची कृपा करावी धन्यवाद.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :— मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आज उल्हासनगरच्या अवैध निर्माणाबाबतची जी चर्चा चालली आहे, मी आपल्या तर्फे विंनती करु इच्छितो उल्हासनगरमध्ये नगररचनाकार श्री. शिंदे साहेब होते, त्यांनी बरेच इमारतीचे प्लॉन मंजुर केले होते. त्या बिल्डींगांना आजपर्यंत कम्पंलीशन सर्टीफिकेट मिळाले नाही. प्लॉन नुसार बिल्डींग बनविली आहे. तर मी महापौरांना विनंती करतो की, जर त्यांना कंम्पलीशन दिले तर त्या इमारती वैध ठरतील. नाहीतर अवैध ठरतील.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— मी या विषयावर जास्त बोलु इच्छित नाही, कारण की, आमचे श्री. धनंजय बोडारे यांनी भाजपा व शिवसेनेचे जे धोरण आहे, ते स्पष्टपणे मांडले आहे. मी त्यांच्या या गोष्टीशी सहमत आहे की, ज्याप्रकारे आम्ही आधी ठराव पास केले होते त्याची जर अंमलबजावणी आमदार किंवा सत्ताधारी पक्षातर्फे झाली असती .........

मा. महापौर :— सत्तापक्षात आपण सुध्दा होते, आपण सुध्दा करु शकलो असतो.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— तर आज हा दिवस बघायला नसता मिळाला. तरीपण श्री. बोडारे जे म्हणाले की, आम्ही सर्व तुमच्या सोबत आहेत. म्हणुन फक्त तुम्ही हे पहा, जसे त्यांनी संशोधन दिले की, कोणत्याही प्रकारचा असा उल्लेख ज्यात मुंबई उच्च न्यायलयाचे नाव आले आहे. त्यात जर थोडा बदल करावा ते योग्य राहील. अजुन एक संशोधन मी देवू इच्छितो की, ती गोष्ट ठरावात लिहिली गेली पाहिजे. माखिजा साहेब, विशेष करुन तुम्हांला सांगतो आपण हे पण सांगितले पाहिजे, जर लोक डिसप्लेस झाले तर या शहराची परिस्थिती अल्टरनेट अकमोडेशन देण्यासारखी नाही. या शहरात जी जमिनीची समस्या आहे, ती अशी आहे की, त्यासाठी पर्यायी काही व्यवस्था नाही. ते पण ठरावात लिहिले पाहिजे असा माझा सुझाव आहे. आणि हा ठराव जसे श्री. हरदास माखिजा हे म्हणाले की, ५ मिनिटे बसून जर नीट पाहिला तर मला असे वाटते तर काहीना काही उपाय निघेल. अजुन एक गोष्ट सांगायची राहिली आहे की, जसे इथे म्हणत आहेत की, सर्व राजकिय पक्षांनी आपापल्या तर्फे प्रयत्न केला पाहिजे. तसेच श्री. दिलीप गायकवाड म्हणाले, शिंदेजी विषयी बोलले, आम्ही दोन दिवसापुर्वी आपल्या पक्षातर्फे मा. श्री. नितीन गडकरीजी व श्री. गोपीनाथ मुंडेजी यांना पण भेटलो. त्यांना पण आम्ही आग्रह केला होता की या प्रश्नावर फक्त सरकारच मार्ग काढु शकते. शासनाने हायकोर्टात जावुन त्या विषयी पाऊल उचलले पाहिजे. होवू शकते की, खुप काही गोष्टी उच्च न्यायालयाच्या समोर गेल्या नसतील. तर सरकारचे कर्तव्य आहे, त्या सर्व गोष्टी त्यांनी न्यायालयाच्या लक्षात आणुन दिल्या पाहिजे. त्यांनी पण आम्हांला आश्वासन दिले की, आम्ही त्या बाबतीत मुख्यमंत्री महोदयांना पत्र देवु. त्यांच्याशी पण बोलु. व म्हणुन मी बोलतो की, आपण सर्व लोक या विषयावर एकत्र आहात.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— एक मिनिट, किशोरजी थोड त्यात वाक्य जोडतो. सुचनेत शासनाला असे पण आले पाहिजे की, यापुर्वी देखील आम्ही तुम्हांला प्रस्ताव पाठविले आहेत की, उल्हासनगरच्या जनतेची हालत ही आहे. त्यावर विचार का नाही केला गेला? त्याचेपण कारण पाहिजे. त्यासाठी जर आपण एखादे उदाहरण प्रस्तावनेत दिले जसे खासदार साहेबांनी काल आम्हांला सांगितले, आंध्र प्रदेशात नायडु यांनी अनियमित बांधकामांना दंड आकारुन नियमित केले होते व आमच्या ठाण्यामध्ये श्री. सतिश प्रधान महापौर होते, वागळे इस्टेट मध्ये अशी बांधकामे झाली होती, त्यांच्यावर दंड आकारुन त्यांना नियमित केले होते. आंध्र प्रदेशात चंद्राबाबु नायडु मुख्यमंत्री होते. त्यांनी त्या अनाधिकृत बांधकामांना नियमित करुन त्या निधीमधुन त्या प्रदेशाचा काही विकास केला तसेच जर इथे करावे असा सुझाव प्रस्तावामध्ये शासनाला दयावा. आंध्र प्रदेशात होते, ठाण्यात होते, तर इथे का नाही? आजपर्यंत आपण लक्ष दिले नाही म्हणुन आज ही कारवाई होत आहे. हे जर निर्देश दिले की यासाठी जबाबदार आपण आहात. असे येथिल जनतेचे म्हणणे आहे. हे जर तुम्ही त्यांच्या लक्षात आणून दिले तर कदाचित यापुढे उल्हासनगरच्या जनतेचा रोष शासनावर नसावा म्हणुन लवकरात लवकर कारवाई करावी. प्रस्तावात जर हे जोडु शकत असाल तर जोडा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, सर्व सन्माननिय सदस्य आज जे अनाधिकृत बांधकामाला नियमित करण्यासाठी सभा बोलावली गेली आहे, मला असे

वाटते की, उच्च न्यालयायाशी त्याचा संबंध जोडण्याचा काही प्रश्नच नाही. तो विषय बाजुला ठेवुन अनाधिकृत बांधकाम नियमित करण्याचा मुद्दा जेव्हा श्री. प्रल्हाद अडवाणी नगराध्यक्ष होते तेव्हा सुरु झाला. ७८ पासुन ८४ पर्यंत तेव्हा उल्हासनगरमधील बहुतेक बांधकाम दंड आकारुन नियमित केले गेले. जेव्हा महापालिका झाली तेव्हा ९७ मध्ये जेव्हा ठराव झाला. माजी महापौर श्री. हरदास माखिजा यांनी उल्लेख केला, ठराव क्र. २७ मध्ये सुध्दा सुचक– अनुमोदक सर्व पक्षाचे होते. सुचक होते श्रीमती पन्ना वारींगे, श्री. बी.बी. मोरे, श्री. हरदास माखिजा, अनुमोदक होते श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, श्री. भिमसेन मोरे, श्री. रामभाऊ आढाव सर्व पक्षाचे सदस्यांनी तो ठराव केला होता. त्यावेळेस ९७ मध्ये भाजपा–शिवसेनेचे राज्य होते. शिवसेनेचे महापौर होते. ९७ पासुन ते ९९ पर्यंत महाराष्ट्र शासनात देखील शिवसेना–भाजपाचे राज्य होते. तरी पण त्या ठरावावर दोन वर्षात काही अंमलबजावणी झाली नाही. तेव्हा पण थेट प्रक्षेपण होते. मा. महापौर श्री. गणेश चौधरी होते, त्यानंतर सुध्दा २ वर्ष सत्ता तुमची होती. तरी पण तुम्ही त्या ठरवावर काही कार्यवाही केली नाही. मला इथे दु:खाने म्हणावे लागते, वारंवार आमदार साहेबांचे नाव घेतले जाते, ५ व्यांदा खासदार साहेब सुध्दा निवडुन आले होते. ते थेट प्रधानमंत्रीशी बोलतात. उल्हासनगर शहर सुध्दा ठाणे क्षेत्रात येते. खासदार साहेबांनी सुध्दा या गोष्टीला गांभिर्याने घेतले नाही. मला दु:खाने म्हणावे लागते, त्यांनी पण सहयोग दिला पाहिजे. मी हिंदुहद्य सम्राट जे भारतात एकमात्र असे नेते आहेत, श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे मी आभार मानतो. सर्वात प्रथम त्यांनी जाहिर केले की उल्हासनगर शहरात जर काही संकट आले तर सर्वात आधी आम्ही तेथे उभे असू. असे सर्व पक्षांनी उभे राहिले पाहिजे. आमदार साहेब २४ तास या विषयासाठी प्रयत्न करत आहेत. फक्त उच्च न्यायालयाने दिलेले अनाधिकृत बांधकामांचा संबंध नसुन संपुर्ण शहराच्या बांधकामाचा संबंध आहे. उच्च न्यायालयात बरेचसे स्टे वॅकेट झाले आहे. ९७ च्या आधी देखील हारले होते. तेव्हा पास करते वेळेस कोर्टाचा उल्लेख नव्हता. २००२ मध्ये ठराव केला होता, तेव्हा सुध्दा खुपसे स्टे वॅकेट झाले होते. आम्ही कधी कोर्टाचा उल्लेख केला नाही ना आज करायचा. ना आम्ही कोर्टा विरुध्द जात आहे. आज आम्ही महाराष्ट्र शासनाला अपील करत आहोत. आज राजकीय पक्षातर्फे करत आहोत. ही प्रस्तावना आपण मंजुर करत नाही. सर्व पक्षाचे लोक ज्यांना काही वाक्यांवर हरकत असेल किंवा काही अजून जोडायचे असेल ते सर्व करुन नंतर महाराष्ट्र शासनाला विनंती करु. मा. पालक मंत्री यांनी वर्तमानपत्रात स्टेटमेंट दिले होते की, अनाधिकृत बांधकामाचा मुद्दा फक्त उल्हासनगर शहराचा नसुन पुर्ण महाराष्ट्राचा आहे. तर अशा त–हेने एक प्रथा सुरु होईल. शासनाने उल्हासनगर बरोबर पुर्ण महाराष्ट्राचा विचार केला पाहिजे. पुर्ण महाराष्ट्राचा प्रश्न आहे. आज जसे २००० पर्यंत झोपडपट्टयांविषयी सरकार विचार करत आहे. आमचे जे बांधकाम आहेत ती २००० पर्यंत शासनाने नियमित केली पाहिजे. आणि जर आरक्षित भुखंडावर बांधकाम असेल तर त्याविषयीचे जे कायदे आहे त्या नुसार कार्यवाही झाली पाहिजे. परंतु महाराष्ट्र शासनाने मध्ये पडुन त्यावर मार्ग काढला पाहिजे. आजपर्यंत आपण २००२ मध्ये आम्ही ३ ठराव केले होते. एफएसआय १ ते ३ अनाधिकृत बांधकाम रेग्युलाईज करणे, व तिसरा होता बाल्कनी व स्टेअर केसचा होता. स्टेअर–केसचा एफएसआय ठाण्याला मिळतो, अंबरनाथला मिळतो, मंबईला मिळतो, बाल्कनी व स्टेअरसाठी लोक पैसे भरतात, त्यांना एफएसआय वेगळे मिळते. तो कायदा सुध्दा येथे लागु झाला पाहिजे. तसेच येथे नगररचनाकार नियमित नाही, महाराष्ट्र शासनाने येथे दिले पाहिजे. नगररचनाकारांचा एडीशनल चार्ज आहे, जसे श्री. विनोद ठाकूर यांनी मुद्दा उठविला होता. कंम्पलीशन सर्टीफिकेट दया. ती बांधकामे नियमित असुन देखील त्यांना का सर्टीफिकेट मिळत नाहीत. त्या सुविधा दिल्या पाहिजेत. मी समजतो की, जितके पण सदस्य आहेत, जे पण येथे बसले आहेत, त्यांच्या सर्वांच्या प्रभागात ही समस्या आहे. सर्वांनी जर ह्दयावर हात ठेवून विचारले की, पुर्ण उल्हासनगरचा विषय आहे, महाराष्ट्राचा विषय आहे, भारताचा विषय आहे. या विषयावर गंभीरतेने विचार करुन महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव दिला पाहिजे की, त्यांनी आम्हांला मदत करावी, शहर ओसाड नाही झाले पाहिजे. जे अनाधिकृत बांधकाम आहेत ते नियमित झाले पाहिजे. जसे आमचे बोडारे साहेब म्हणाले, हे ठाण्यात होवू शकते. चंद्रबाबु नायडु करु शकतात. अशा खुपशा सर्वोच्च न्यायालयाच्या जजमेंट आहेत. ज्यात सर्वोच्च न्यायालयाने लोकांना मदत केली आहे. उच्च न्यायालयाचे निर्णय आहे. महाराष्ट्र सरकाने खुपशा जागांबाबत अनाधिकृत बांधकामाविषयी विचार केला होता. आणि त्यांना न्याय दिला जसे ठाण्याला न्याय दिला आहे. आंध्र प्रदेशात तसेच इतर ठिकाणी न्याय दिला असेल. तसेच इथे देखील विशेष सवलती देवून उल्हासनगरमध्ये अनाधिकृत बांधकामांना पास केले पाहिजे. हे आज आम्ही अपिल करतो. महासभेच्या वर महाराष्ट्र शासन आहे त्यास ही महासभा विनंती करते की, उल्हासनगर वाशियांना मा. मुख्यमंत्री, उप–मुख्यमंत्री, पक्षांचे नेतागण, विरोधी पक्ष असो, गटनेता असो, सर्व पक्षाचे नेता गण, यांनी उल्हासनगरला मदत करावी. हे जे उल्हासनगर शहर दुविधेत फसले आहे, त्यातुन त्यांना काढा. आमचे मा. खासदार साहेबांना देखील आमच्या तर्फे व आपण आपल्यातर्फे विनंती करुन पुर्ण शहराचा मुद्दा आहे. सर्व वर्गाचे जातीचे लोक त्यात आहे. कृपया हरकती योग्य शब्द काढुन टाकुन सर्व पक्षांसोबत बसुन महाराष्ट्र शासनाला अपील करण्यासाठी मुद्दा आणला आहे. हे पहिल्यांदा नाही, ९७ मध्ये

पण आले होते. त्यावर कार्यवाही केली जावी. ते ठराव लागु केले जावे. व उल्हासनगरवाशियांना सवलत दिली जावी. एवढीच सदनाला विनंती करतो. धन्यवाद.

<u>मा. सचिव:–</u> मा. महापौरजी यांचे म्हणणे आहे की, कुणास काही हरकत नसेल तर ही सभा १५ मिनिटासाठी स्थगित करण्यात यावी.

<u>काही सदस्य :–</u>ठिक आहे, ठिक आहे.

<u>मा. महापौर :–</u> ही सभा १५ मिनिटासाठी स्थगित करण्यात येत आहे.

पुन्हा काही कालावधीनंतर सभा सुरु करण्यांत आली.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :–</u> मा. महापौरजी, मी आपल्या अनुमतीने सदनाला सांगु इच्छितो की, जो ठराव आम्ही सदनात पास करु इच्छितो, सत्ताधारी पक्ष व विपक्ष यांनी तुमच्या बरोबर बसुन जी चर्चा केली आहे, त्यानुंसार आम्ही सचिवांना प्राधिकृत करतो की, आमच्या म्हणण्यानुसार ठराव केला जावा. व पारीत केला जावा. यात एका गोष्टीचे विशेष लक्ष दिले जावे की, उच्च न्यायालयाचा त्या ठरावात कोणत्याही त–हेने अवमान नाही झाला पाहिजे. ही गोष्ट विशेष करुन लक्षात ठेवावी.

<u>मा. महापौर :–</u>सचिवांकडुन तयार करण्यात आलेला प्रस्ताव खालीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

**विषय क्र. १** :–उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामांविरुध्द कारवाई वर विचार करणे व त्यांचे परिणामाबाबत दिशा ठरविणे.

<u>प्रस्तावना</u>

हिंदुस्तानची फाळणी होवून भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे निर्माण झाल्यानंतर सिंध प्रांतातातुन येणा–या भाषिक अल्पसंख्यांक निर्वासीतांचे तत्कालीन भारत सरकारने उल्हासनगरमध्ये पुर्नवसन केले. शहराचे सिमित क्षेत्र व वाढत्या लोकसंख्येमुळे उल्हासनगर शहरात अनाधिकृत बांधकामे वाढत गेल्याचे दिसुन येते.ही परीस्थिती ध्यानी घेउन शासनाने ही बांधकामे नियमानुकुल करण्याचा विचार केला होता.

अनाधिकृत बांधकामां संदर्भात श्री. हरी होतुमल तनवानी यांनी मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. १०५ / २००३ दाखल केल्याने त्या याचिकेत मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या दिनांक २७/४/२००५ रोजीच्या अंतरीम आदेशात उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील ८५५ इमारती व इतर अनाधिकृत बांधकामे निष्कासीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्या निर्देशाप्रमाणे उल्हासनगर महापालिका प्रशासनाने अनाधिकृत बांधकामे निष्कासीत करण्याची तयारी ठेवली असून ही अनाधिकृत बांधकामे निष्कासीत केल्यास त्याचे खालीलप्रमाणे दुरगामी परिणाम होतील.

१. लाखो लोक निर्वासीत होतील.
२. शहराचे आर्थिक व सामाजिक स्थेर्यावर त्याचे दुरगामी परिणाम होतील.
३. शांततेचा भंग होण्याचा संभव आहे.
४. बांधकामे निष्कासीत करण्यासाठी महापालिकेस निधीची कमतरता पडु शकते.
५. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो.
६. निर्वासीत व बेरोजगार होणारे लोक गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळू शकतील.
७. अशा इमारतीच्या संदर्भातील अनिष्ट गोष्टी, स्वच्छता विषयक दोष निर्माण होवू शकतात.
८. सार्वजनिक आरोग्यावर घातक परिणाम होवू शकतात.
९. महापालिकेकडे पुर्नवसनाची व्यवस्था नसल्याने मोठया प्रमाणावर राहाण्याचा प्रश्न निर्माण होउन अधिकृत कायदेशीर बांधकामे उपलब्ध नसल्याने लोकांना त्रास होणार आहे.
१०. पाकिस्तानातुन एकदा निर्वासीत झालेल्या लोकांना पुन्हा निर्वासीत होण्याची वेळ येणार आहे.

वरील सर्व परिणामांचे दृष्टीकोनातुन शासनास लोकांच्या हितासाठी कल्याणकारी योजना किंवा दिशा ठरविण्यासाठी लोकांचे हित संवर्धनासाठी करावयाची उपाययोजना व आपली बाजु मा. मुंबई उच्च न्यायालयात

मांडणे आवश्यक आहे त्यामुळे शासनाकडे कोणतीही माहिती प्रतिवृत्त, स्पष्टीकरण, आकडेवारी इत्यादी पुरविणे विषयी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली खालील ३५ सदस्यीय समितीची रचना करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | नाव | | पदनाम |
|---|---|---|---|
| १. | सौ. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी | महापौर | अध्यक्ष |
| २. | श्री. विनोद तलरेजा | उप–महापौर | सदस्य |
| ३. | श्री. किशोर वनवारी | सभागृह नेता | सदस्य |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर (महाराज) | विरोधी पक्षनेता | सदस्य |
| ५. | श्री. दिलीप लालवानी | गटनेता (रा.कॉ.प.) | सदस्य |
| ६. | श्री. मोहन बेहराणी | गटनेता (कॉंग्रेस) | सदस्य |
| ७. | श्री. दिलीप गायकवाड | गटनेता (शिवसेना) | सदस्य |
| ८. | श्री. लाल पंजाबी | गटनेता (भा.ज.पा.) | सदस्य |
| ९. | श्री. प्रमोद टाले | गटनेता (रि.पा.ई.) | सदस्य |
| १०. | श्री. अशोक बोधा | | सदस्य |
| ११. | डॉ.(श्री.) रोचलाणी | | सदस्य |
| १२. | ॲड..(श्री.) एन.के. सोनेजी | | सदस्य |
| १३. | ॲड..(श्री.) संभाजी पाटील | | सदस्य |
| १४. | ॲड.(श्री.) एन.बी. अडवाणी | | सदस्य |
| १५. | ॲड.(श्री.) भोजराज जेसवानी | | सदस्य |
| १६. | श्री. विजय ताराणी | अध्यक्ष रोटरी क्लब | सदस्य |
| १७. | श्री. जे.के. डोके | अध्यक्ष उल्हासनगर आर.पी.आय. | सदस्य |
| १८ | श्री. दिपक गाजरीया | | सदस्य |
| १९. | श्री. मनोहर जेसवानी | | सदस्य |
| २०. | श्री. गोप पेसवाणी | | सदस्य |
| २१. | श्री. राजेश टेकचंदानी | | सदस्य |
| २२. | श्री. एन. रमेश | | सदस्य |
| २३. | श्री. नरेंद्र राजानी | | सदस्य |
| २४. | श्री. प्रकाश माखिजा | | सदस्य |
| २५. | श्री. कुमार आयलाणी | | सदस्य |
| २६. | श्री. अमरलाल छाब्रिया | | सदस्य |
| २७. | श्री. गोवर्धन गिडवाणी | | सदस्य |
| २८. | श्री. धनंजय बोडारे | | सदस्य |
| २९. | श्री. राहू अहूजा | | सदस्य |
| ३०. | श्री. विनोद ठाकुर | | सदस्य |
| ३१. | श्री. हरदास ठारवाणी | | सदस्य |
| ३२. | श्री. हरदास माखिजा | | सदस्य |
| ३३. | श्री. बुलचंद सोनेसर | | सदस्य |
| ३४. | श्री. गिरधर मलानी अध्यक्ष उमा | | सदस्य |
| ३५. | श्री. सुरेश रुपचंदानी अध्यक्ष रोटरी क्लब मिड टाउन | | सदस्य |

सदरहू याचिकेत शासन प्रतिवादी असून शासनाने जर मा.मुंबई उच्च न्यायालयात आपली बाजु मांडली तर बांधकामे निष्कासनामुळे लोकांवर होणा–या दुरगामी परिणामाची तिव्रता कमी होईल व मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची योग्य प्रमाणे कार्यान्वीता करता येईल म्हणून महासभेपूढे प्रस्तावित.

**विशेष महासभा ठराव क्र. १०** दिनांक :– २०/५/२००५

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :–श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेप्रमाणे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली वर उल्लेख केलेल्या ३५ सदस्यीय समितीची रचना करीत आहे व शहरातील अनधिकृत बांधकामे हटविण्याच्या परिणाामांचे दृष्टीकोनातुन लोकांचे हित संवर्धनासाठी शासनास आपली उपाययोजना व बाजु मुंबई उच्च न्यायालयासमोर मांडण्यास नम्र विनंती करीत आहे.

सुचकाची सही /–

अनुमोदकाची सही/–

**एकमताने**

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिव :–** ही सभा येथे समाप्त होत आहे. मा. महापौरांच्या आदेशान्वये दुसरी सभा आरंभ करण्यांत येत आहे.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२० जुन, २००५

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/६/२००५ रोजीच्या**
**तातडीची विशेष महासभेचे इतिवृत्त.**

उल्हासनगर महानगरपालिकेची तातडीची विशेष महासभा सोमवार दिनांक २०.०६.२००५ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ४०. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ४१. | श्रीमती माने किरण |
| ५. | श्री. सोनवणे नथु | ४२. | श्री. चव्हाण रमेश |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४३. | श्री. जाधव प्रशांत |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना | ४४. | श्री. जाधव सुरेश |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४५. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४६. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ४७ | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४९. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १३ | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ५०. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १४. | श्री. एडके गणपत गोविंद | ५१. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५२. | श्री. भालेराव गौतम |
| १६. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५३. | श्रीमती वसिटा बेबी |
| १७. | श्री. उमाप रामदास | ५४. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५५. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १९. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५६. | श्री. अंकुश म्हस्के |
| २०. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५७. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २१. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५८. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २२. | श्रीमती अनिता गुप्ता | ५९. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २३. | श्री. पवार नाना | ६०. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २४. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ६१. | श्रीमती भटिजा कोमल |
| २५. | श्री. जग्यासी राजु | ६२. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २६. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६३. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २७. | श्री. निकम शांताराम | ६४. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २८. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६५. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २९. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६६. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३०. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६७. | श्रीमती छाब्रिया भारती |
| ३१. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६८. | श्री. संजय रामचंद्र बठीजा, |
| ३२. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३३. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ७०. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| ३४. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७१. | श्रीमती करोतिया मालती |
| ३५. | श्री. साधवानी मोहन | ७२. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३६. | श्रीमती जया साधवानी | ७३. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३७. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ७४. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३८. | श्रीमती भावना खिलनानी | ७५. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३९. | श्री. बच्चाराम रुपचंदानी | | |

तर,
मा.सदस्य / सदस्या १. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल, २. श्रीमती माखिजा किरण, ३. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास, ४. श्री. हरदास माखिजा, ५. श्री. वदरीया राजेश नानिकराम, ६. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन दुपारी ३.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

**विषय १ :—उल्हासनगर शहरातील पाणी टंचाईवर उपाय योजना करणे.**

**मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—** मा. महापौर, मा. आयुक्त, मा. सचिव व सभागृहात उपस्थित सर्व सदस्य पाणी पुरवठयात सुधारणा होण्यासाठी विरोधी पक्षातर्फे विशेष महासभा बोलावण्याची मागणी करण्यात आली होती. परंतु मला दु:खाने म्हणावे लागत आहे की, गंभीर समस्या असतांना देखील एक महिन्याने बैठक बोलाविण्यात आली आहे. ती देखील तेव्हा बोलावली जेव्हा आम्ही सचिवांना विचारले की, आम्ही बैठकीचे पत्र दिले होते, त्याचे काय झाले? आम्ही विचारल्यानंतर त्वरीत आजच्या बैठकीची सुचना आम्हांला प्राप्त झाली. मला कळत नाही की, शासन व प्रशासन काय करत आहे? आजपासुन दोन महिन्यापुर्वी आमचे सभागृह नेता श्री. किशोर वनवारी, सत्ताधारी पक्षाचे श्री. सतरामदास जेसवानी, व त्यांचे अन्य सदस्य पाणी पुरवठा कार्यालया बाहेर उपोषणाला बसले होते. एका दिवसातच उपोषण पुर्ण केले जाते. काय झाले, उपोषण कसे काय पुर्ण झाले त्यामध्ये आम्ही जात नाही. आम्ही प्रशासनाला वारंवार विनंती करतो की, आमच्या विभागात पाण्याची टंचाई आहे. यावर एकच उत्तर मिळत होते की, एम.आय.डी.सी. कडुन पाणी कमी येते. आम्ही जेव्हा आयुक्तांशी बोलतो तेव्हा ते सांगतात की, एमआयडीसीचे पैसे देणे बाकी आहे. त्यामुळे पाणी पुरवठा कमी होत आहे. आम्ही जेव्हा कार्यकारी अभियंत्यांशी बोलतो तेव्हा ते सांगतात की, तिसरी जलवाहिनी कल्याणला दिली आहे. त्यामुळे आपणांस पाणी कमी मिळत आहे. शासन व प्रशासन यामध्ये काय ताळमेळ आहे हे आम्हांला समजुन येत नाही. यासाठी आम्ही आजची बैठक बोलावली आहे. मी आयुक्तांना विनंती करतो की, त्यांनी आजची व तीन महिन्यापुर्वीची पाण्याची परिस्थिती काय होती ते सांगावे. आजही आमच्या विभागात अशा काही जागा आहेत जेथे पाणी येत नाही. जेव्हा आम्ही उप—अभियंत्यांना विचारतो तेव्हा ते सांगतात की, आमच्याकडे पुष्कळ पाणी आहे. मी हे विचारु इच्छितो की, उल्हासनगर कॅम्प नं. १ व २ मध्ये किती द.ल.लि. पाणी येते व कॅम्प नं. ४ व ५ मध्ये किती पाणी येते? कारण १९ मार्चला ज्यावेळी स्थायी समिती सदस्यांची निवडणुक होती, त्यावेळी येथे महापौर महोदयांनी एक घोषणा केली होती की, पाणी समस्येवर तोडगा काढण्यासाठी एक उच्च स्तरीय बैठक सुरु आहे. त्यानंतर कॅम्प नं. ४ व ५ ची पाणी समस्या दुर होईल, त्यानंतर ३८ द.ल.लि. पाणी उपलब्ध होईल. तर आपणांस तेवढे पाणी आता प्राप्त झाले आहे काय? मी प्रशासनाला विनंती करेन की, त्यांनी आजची परिस्थिती काय आहे ते सांगावे. कॅम्प नं. ४ व ५ ला ३८ द.ल.लि. पाणी मिळाले का ते देखिल सांगावे. त्यानंतर ज्या ज्या ठिकाणी पाणी टंचाई आहे, त्या विभागांची नावे मी येथे सांगेन.

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—** मा. महापौर, आयुक्त व उपायुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्य, गेल्या अनेक दिवसांपासुन कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची समस्या भेडसावत आहे. आपणांस काही दिवसांपूर्वी पाणी समस्येबद्दल सन्माननिय खासदार श्री. प्रकाश परांजपे साहेब यांनी भेटून चर्चा केली आहे. त्यांनतर आपण आश्वासन दिले की, कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची जी समस्या आहे, ती लवकरात लवकर संपृष्टात आणण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. परंतु अजुनपर्यंत कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची समस्या गेल्या ३ वर्षापासुन भेडसावत आहे. तेथिल नागरीकांना पाण्याची जी टंचाई सोसावी लागते, त्यापासुन त्यांची सुटका झालेली नाही. तरीपण आपण याची काय उपाययोजना करणार आहात ते आम्हांला सांगाल अशी आम्ही विशेष महासभा बोलावून आपणांस याठिकाणी विनंती केलेली आहे.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप:—** मा. महापौरजी, उपमहापौरजी व आयुक्त साहेब, मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, पाणी पुरवठा विभागाचे जे अधिकारी आहेत, त्यांना मला काही विचारायचे आहे. तर त्यांना वर बोलाविण्यात यावे अशी माझी त्यांना विंनती आहे.

**मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—** मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्यांनी त्यांचे जे काही प्रश्न आहेत, ते सभागृहासमोर ठेवावे, आम्ही ते नोंदवुन घेवू व सरतेशेवटी मी व माझे सर्व अधिकारी सर्वांना एकत्र उत्तर देवु.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—** ठिक आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, पाण्याच्या समस्येबाबत मी आपल्या संबंधीत अधिका—याला किती वेळा भेटून किती वेळा विनंती केली आहे? आपण उत्तर देवु शकता. जर आपले अधिकारी वर येवू इच्छित नसतील तर आपण उत्तर दयावे.

**मा. आयुक्त :—** मा. महापौर महोदया, सदस्यांचा प्रश्नच असा आहे की, त्यांनी कितीवेळा अधिका—यांची भेट घेतली. याचे उत्तर त्यांना स्वत:ला माहिती आहे. त्यामुळे त्यांनी त्याचे उत्तर दयावे.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—** हीच तर गोष्ट आहे. जर मी सांगितले की, १०० वेळा, १५० वेळा भेटलो तर आपण ते मान्य कराल का?

**मा. आयुक्त :—** आपले काय म्हणणे आहे, ते आपण सांगु शकता. १०० वेळा भेटले, १५० वेळा भेटले तरी त्याचे उत्तर आम्ही देवु. आपण भेटल्यानंतर आम्ही काय कारवाई केली ते देखिल सांगु.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—** या विषयावर मी एवढेच सांगु शकतो की, माझ्या प्रभागातील पाणी समस्येबाबत गेल्या दिड वर्षापासुन मी पाठपुरावा करीत आहे. पाण्याच्या टंचाईमुळे दोन—तीन वेळा मोर्चे व उपोषण देखील झाले. मोर्चात मला जे आश्वासन दिले होते, त्याची पुर्ती गेल्या दिड वर्षात झालेली नाही. माझ्या प्रभागात जलवाहिन्या टाकण्याचे काम देखील ८—१० महिन्यापुर्वी मंजुर झाले आहे. परंतु त्याचे एकही काम अदयाप सुरु झालेले नाही. पाण्याच्या टंचाई बाबत जनतेचा जो रोष आहे तो नगरसेवकाला दररोज झेलावा लागत आहे. हा त्रास मला अजुन किती दिवस सहन करावा लागेल याचे उत्तर दयावे. तसेच माझ्या प्रभागात पाण्याची जी टंचाई आहे, जलवाहिनेचे जे काम आहे, त्याबद्दल आयुक्तांना मी दोन वेळा पत्र लिहिले आहे. त्यानंतर तीन—चार दिवसापुर्वी शहर अभियंता यांना देखील मी पत्र लिहिले आहे. त्या पत्रात मी त्यांना स्थळ पहाणी करुन कारवाई करण्याची विनंती केली होती. परंतु त्यानंतर देखील काहीच झाले नाही. तर प्रशासन कशा प्रकारे काम करीत आहे हे दिड वर्षाच्या अनुभवावरुन सिध्द होते. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—** मा. महापौर, मा. आयुक्त आपण सर्वांचे उत्तर नंतर एकत्रितरित्या देणार आहात का? मागच्या वेळी असे झाले की, आपण उत्तर पुर्ण देत नाहीत. मध्ये—मध्ये गाळतात. मागच्या वेळचा आमचा असा अनुभव आहे की, तुम्ही नेमकेच उत्तर देतात, आणि नंतर म्हणतात आम्ही उत्तर दिले आहे. आपण एक—एक उत्तर दिले तर बरे होईल.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—** मा. महापौर, उप—महापौर , आयुक्त व सचिव महोदय, सर्वप्रथम मी आपणांस धन्यवाद देतो कारण आज या सभागृहात आपण कुलर लावले आहेत, एसी देखील लवकरच लागतील. पाण्याच्या टंचाईसाठी आमच्या विरोधी पक्षाच्या सदस्यांनी विशेष बैठक बोलावली आहे. त्यामध्ये आम्ही सर्व उपस्थित आहोत. आता येथे श्री. बच्चाराम रुपचंदानी जे सभागृहातील वरीष्ठ सदस्य आहेत, चांगले नगसेवक आहेत, अनुभवी आहेत, त्यांनी सांगितले की, आमचे सभागृह नेता श्री. किशोर वनवारी व सतरामदास जेसवानी यांनी पाणी पुरवठा कार्यालयाबाहेर उपोषण केले होते. ही वस्तुस्थिती आहे. आम्ही सभागृहात खाली जमिनीवर देखील बसलो होतो, कदाचित हे सांगण्याचे विसरले असतील, ही देखील वस्तुस्थिती आहे. परंतु तेव्हा परिस्थिती वेगळी होती. आता वेगळी आहे. तेव्हा पाण्याची टंचाई खरोखर होती. आम्ही हे देखील विचारात घेतले नाही की, आम्ही सत्तापक्षात आहोत. आम्ही त्याचा विरोध केला होता, प्रशासनाला घेराव घातला होता. शासनात असतांना देखील शहरासाठी आम्ही मर्यादेचे उल्लंघन केले होते. आम्ही उपोषण देखील केले होते व उग्र आंदोलन करण्याची सुचना देखील दिली होती. परंतु त्यावेळी खरोखरच पाण्याची टंचाई होती. मी प्रशासनाला व शासनाला धन्यवाद देतो की, आपण पाणी पुरवठा योग्य रितीने होण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहे. याचा एक पुरावा म्हणजे एवढया महिन्यात पाण्यासाठी कुणीही हंडा मोर्चा काढला नाही, धरणे नाही, प्रदर्शने नाही, सर्व सामान्य जनतेत पाण्यासाठी असंतोष नाही. एखादे वर्तमानपत्र बघितले तरी दिसुन येईल की, कच—यासाठी लिहिले असेल, जकातीसाठी कुणी लिहिले असेल अथवा अन्य विषयी लिहिले असेल. परंतु पाणी पुरवठा कमी आहे अशी कुठेही बातमी नाही. याबद्दल आम्ही शासनाला व प्रशासनाला धन्यवाद दयायला पाहिजे. दुसरे म्हणजे सहारा टिव्हीवर काही दिवसांपुर्वी आमचे महापौर व विरोधी पक्ष नेता हे चर्चा करीत होते. त्या चर्चे

दरम्यान देखील हा मुद्दा उपस्थित झाला होता. त्यावेळी महाराज भुल्लर यांनी देखील स्विकारले होते की, पाण्याची आता पुर्वीप्रमाणे टंचाई नाही. त्यावेळी आमच्या महापौर महोदयांनी त्यांच्या निदर्शनास आणले होते की, जेथुन मुख्य जलवाहिनी जाते, तेथे आपला प्रभाग आहे. त्यामुळे आपल्या प्रभागात कधीही पाणी टंचाई होत नाही. पुर्ण शहराला प्यायला पाणी नसले तरी आपल्या प्रभागात मुबलक पाणी असते. यासाठी त्यांनी महापौरांना धन्यवाद देखील दिले होते. आता श्री. रमेश चव्हाण देखील येथे बोलले परंतु माझ्या माहितीप्रमाणे त्यांच्या प्रभागात देखील पुष्कळ पाणी आहे. श्री. बच्चाराम रुपचंदानी यांच्या प्रभागात किती जास्त पाणी आहे, याचे एक उदाहरण मी आपणांस देतो. जेव्हा श्री. ठाकुरदास बेहरानी हे स्थायी समिती सभापती होते, त्यावेळी त्यांच्या प्रभागात एक चार इंचाची जलवाहिनी होती ज्यावरुन टॅंकर भरुन त्यांनी पुर्ण शहराला पाणी पुरवठा केला जात होता. तेथे खोदुन ती जलवाहिनी काढली होती. मी परवा बघितले की त्याटिकाणी पुन्हा जलवाहिनी टाकली आहे व तेथुन पुन्हा टॅंकर भरले जात आहेत व व्यापारी दराने विकले जात आहेत. पाण्याच्या समस्येसाठी जी ही विशेष महासभा बोलावली आहे, ती बोलाविण्याचे काही औचित्य नव्हते. जर काही विभागात थोडीफार पाण्याची टंचाई असेल तर त्यासाठी हे आयुक्त महोदयांच्या दालनात जावुन ही समस्या सोडवु शकले असते.

**यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळून येत नव्हते.**

**मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर, श्रीमती भावना खिलनानी, श्रीमती लक्ष्मीबाई ससाने, श्रीमती बेबी वसिटा यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> आपणांस बोलण्याची संधी मिळेल. मला माझे म्हणणे पुर्ण करु दया. काही विभागात पाण्याची समस्या आहे. याचे कारण काही ठिकाणी वितरणाची समस्या आहे. पाण्याची या शहरात अजिबात कमतरता नाही. वितरणाकडे प्रशासनाने लक्ष दयावे. परंतु त्याच नगरसेवकांनी येथे बोलावे ज्यांच्या प्रभागात पाण्याची खरोखर समस्या आहे. परंतु ज्यांच्यावर झुलेलालची कृपा आहे, ते नगरसवेक जर बोलले की, पाण्याची कमतरता आहे, तर मला असे वाटते की ते योग्य होणार नाही. जर प्रशासन योग्य प्रकारे काम करीत नसेल तर त्यांना घेराव करणे हे आपले काम आहे. परंतु प्रशासन ज्यावेळी चांगल्या प्रकारे काम करते, त्यावेळी त्यांची पाठ थोपटणे हे देखील आमचे काम आहे. जेणेकरुन त्यांचे मनोबल उंचावुन ते चांगल्या प्रकारे काम करु शकतील. या विशेष सभेत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा गटनेता म्हणुन मी प्रशासनाला अनुरोध करेन की, ज्या विभागात पाणी जात नसेल त्या प्रभागात लक्ष देण्यात यावे. वितरण प्रणाली सुधारण्यात यावी. जर एखादया नगरसेवकाच्या प्रभागात ६ तास पाणी येत असेल, एखादयाच्या ३ तास येत असेल तर दोघांच्या प्रभागात ४–४ तास पाणी कसे येईल. याकडे थोडे लक्ष दयावे. अन्यथा पाण्याची टंचाई एवढी नाही जेवढी दाखविली जात आहे. यासाठी मी शासनाला व प्रशासनाला येथे धन्यवाद देतो. आमचे पाणी पुरवठा विभागाचे जे अधिकारी आहेत, ते फार मेहनत करीत आहेत यामध्ये काही संशय नाही. हे योग्य होणार नाही की, एखादयाने १०० वेळा बोलाविले तरी जायचे नाही. माझी पाणी पुरवठा विभागातील अधिका–यांना विनंती आहे की, जर आपणांस कुणी बोलवत असेल तर आपण त्यांच्याकडुन लेखी पत्र घेवुन लेखी उत्तर दयावे. जेणेकरुन आपणावर कुणी असे आरोप लावु शकणार नाही. ही जी विशेष बैठक बोलावली आहे, यामध्ये आमचे निवेदन आहे की, जर एखादया विभागात पाणी पुरवठा होत नसेल, तर असे विभाग शोधुन तेथे पाणी पुरवठा करावा. जेणे करुन पुर्ण शहरात सर्वांना पाणी पुरवठा होईल. तसेच या ठिकाणी फक्त त्यांनीच बोलावे. ज्यांच्या विभागात खरोखर पाणी पुरवठा होत नाही. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः–</u> मा. महापौर, उप–महापौर व आयुक्त साहेब, मी पाण्यासाठी बोलणार नाही, कारण माझ्या प्रभागात पुष्कळ पाणी आहे. परंतु एका गोष्टीसाठी यांना शुभेच्छा देईन कारण यांनी मानले की, जकातीत चोरी होत आहे. वर्तमानपत्रामध्ये जकातीबाबत येत आहे, जकातीमध्ये चोरी होत आहे. ही गोष्ट एनसीपीच्या गटनेत्यांनी मानली याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. कचरा उचलला जात नाही, हे देखील वर्तमानपत्रामध्ये येत आहे. ही गोष्ट मानल्याबदृदल देखील मी त्यांना धन्यवाद देतो.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> माझा हरकतीचा मुददा आहे. ही विशेष महासभा पाणी पुरवठयाच्या विषयावर बोलावली आहे.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळून येत नव्हते.

मा. सदस्या श्रीमती भावना रामचंदानी, श्रीमती दिपा पंजाबी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> ओरडु नका, आम्हांला देखील ओरडता येते. ही बैठक पाणी पुरवठयासाठी आहे. पाणी पुरवठयाबद्दल कुणाचीही तक्रार नाही.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :–</u> पाण्याबदृदल आम्ही सर्व खुश आहोत.

<u>मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब मी फक्त एनसीपी गटनेत्यांना शुभेच्छा देवु इच्छितो की, त्यांनी जकातीमध्ये चोरी होते हे मानले आहे. पाणी पुरवठया बदृदल वर्तमानपत्रात येत नाही म्हणजे काही तक्रार नाही हे ते मानतात. मग जकातीबाबत वर्तमानपत्रात येते याचा अर्थ जकातीमध्ये चोरी होत आहे. कच–याबदृदल देखील तसेच आहे.

<u>मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :–</u> आपण कॅसेट ऐकु शकतो, त्यामध्ये मी जकात चोरी होत आहे असे बोललो नाही. वर्तमानपत्रात जकातीवर, कच–यावर लेख येतात परंतु पाणी प्रश्नावर काही येत नाही असे मी बोललो होतो.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> जकात व कच–यावर बैठक बोलवा आम्ही त्याला येवु.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> येथे चर्चासत्र सुरु आहे का?

<u>मा. महापौर :–</u> कृपया जकातीच्या विषयावर बोलु नये. येथे तो मुद्दा नाही. जकातीवर लक्षवेधी सुचना आली आहे, त्यावर नंतर चर्चा होईल.

<u>मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :–</u> मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, श्री. दिलीप लालवानी हे सत्ताधारी पक्षाचे गटनेता असतांना देखील गोष्ट फिरवुन बोलत आहेत. मला असे वाटते की, यांच्या प्रभागात पाणी फार जास्त येत आहे, म्हणुन ते असे बोलत आहेत. तुम्ही माझ्या प्रभागात येवुन बघा. मी आयुक्त साहेबांना देखील सांगितले की, माझ्या प्रभागात पाणी येत नाही. लोक मोटार लावुन पाणी भरतात, त्यांना लाईटचे बिल किती येत आहे ते बघा. आजही माझ्या प्रभागात पाणी नाही आहे. तुम्ही माझ्या प्रभागात फिरुन बघा. श्री. चाफेकर व श्री. सभागानी यांना मी माझे प्रभागातील पाणी टंचाई बदृदल सांगितले आहे. एक टॅंकर येतो त्यानंतर पुन्हा दुसरा टॅंकर येतो. तुम्ही जावुन बघा तिकडे काय होत आहे. ते लोक पाण्याचे बिल भरत नाही का?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u> ज्याला प्रभाग असतो त्याला पाणी आहे अथवा नाही हे माहिती पडते.

<u>मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :–</u>पाण्याची एवढी समस्या असतांना आपण फिरुन न बोलले तर योग्य होईल.

मा. उप–महापौर श्री. विनोद तलरेजा हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौर व आयुक्त साहेब, पाण्याच्या विषयावर आज ही जी सभा ठेवली आहे, तर मी कमीत कमी एक वर्षापासुन माझ्या प्रभागातील बॅरेक क्र. ११३ येथिल पाण्याच्या टंचाई बाबत मी अधिका–यांना अवगत केले आहे. संपुर्ण वार्डात त्यांना फिरविले आहे. परंतु आजपर्यंत तेथे पाण्याची टंचाई आहे. तेथे टॅंकर देखील दिले जातात. श्री. दिलीप लालवानी यांनी सांगितले की, पाण्याची टंचाई नाही. हे म्हणणे असे झाले की, आंधळयांमध्ये चकणा राजा. जर सगळे आंधळे असतील व एक चकणा असेल तर चकण्याला राजा केले जाते. पाण्याची कमतरता आजही शहरात आहे. परंतु सत्ताधारी पक्षाला हे का दिसत नाही. मी याबद्दल श्री. सतरामदास जेसवानी यांचे उदाहरण देतो, ज्यांनी १५ दिवसांपुर्वी त्यांचे प्रभागात पाणी

नसल्याने उपोषण केले होते. जर पाण्याची टंचाई नसती तर त्यांनी उपोषण का केले असते? ते एक चांगले नगरसेवक आहेत. त्यांनी उपोषण केले म्हणजे नक्कीच समस्या असेल. जर पाण्याची समस्या नसती तर मागील १५ दिवसात टॅंकर बंद झाले असते. तुमच्या रेकॉर्ड प्रमाणे आजही टॅंकर सुरु आहे. ३० तारखेला जेव्हा टॅंकर बंद होतील तेव्हा खरी समस्या समोर येईल. मला कळत नाही की, सत्ताधारी पक्ष पाणी समस्येकडे दुर्लक्ष का करत आहे? पाणी समस्या नसेल तर टॅंकर फुकट का देण्यात येत आहे. पैशाचा अपव्यय होत आहे. अशा समस्या ब—याच ठिकाणी आहेत, परंतु सत्ताधारी पक्षाला त्या माहित नाही. त्या समस्या अवगत करण्यासाठी आम्ही ही बैठक ठेवली आहे. मी निवेदन करेन की, समस्येवर चर्चा करावी. व आमचे जे अधिकारी आहेत, यांना आम्ही काम सांगतो. काम सांगितल्यावर ते त्यावर दुर्लक्ष करतात. छोटी—छोटी कामे करण्यासाठी एक वर्ष लागते. जर २५,००० मध्ये काम होवू शकते तर ते न करता एक वर्ष टॅंकर त्या ठिकाणी पाठविण्यात येतात व एका वर्षात टॅंकरवर ७५,००० खर्च करण्यात येतो. अशा प्रकारे आपल्या शहरात पैसे वाया जात आहे. थोडया दिवसांपुर्वी आम्ही कोटा शहरात प्रशिक्षणासाठी गेलो होतो. मा. महापौर महोदया देखील आमच्या सोबत होत्या. कोटा सारखे शहर जे राजस्थानमध्ये आहे. जेथे पाण्याची टंचाई असायला हवी. परंतु त्या प्रदेशात जेथे भारतीय जनता पार्टीचे सरकार आहे, तेथे २४ तास पाणी पुरवठा होतो, एक मिनिट देखील पाणी बंद होत नाही. जेव्हा आम्ही अधिका—यांना याबद्दल विचारणा केली तेव्हा त्यांनी आम्हांला एक उदाहरण दिले की, या शहराची लोकसंख्या ८ लाख आहे, आम्ही येथुन एक रुपयाही मालमत्ता कर घेत नाही, राजस्थानमधील हे एक असे शहर आहे जेथे कोणाकडुनही, दुकानदारांकडुनही मालमत्ता कर घेतला जात नाही. तेथे जकातही नाही, परंतु २४ तास पाणी पुरवठा केला जातो. आम्ही जेव्हा त्यांना विचारले की, तुम्ही २४ तास पाणी पुरवठा कशाप्रकारे करता? तेव्हा त्यांनी सांगितले की, जर आम्ही एक तास पाणी दिले तर पाण्याचा जो खप आहे, तो २४ तासात जेवढा वापर होईल, त्यापेक्षाही जास्त होईल. पाण्याची टंचाई असल्यास लोक पाण्याचा साठा करुन ठेवतात व दुस—या दिवशी पुन्हा पाणी आल्यावर साठविलेले पाणी फेकुन देतात कारण ते ताजे पाणी वापरु इच्छितात. असे केल्याने पाण्याचा वापर जास्त होतो. परंतु २४ तास पाणी पुरवठा केल्यास लोक पाण्याचा साठा करीत नाहीत. त्यामुळे पाण्याचे नुकसान होत नाही. २४ तास पाणी पुरवठा केल्याने पुर्वीपेक्षा कमी पाणी आम्हांला लागत आहे. असे त्यांनी सांगितले आहे. तर मी निवेदन करेन की, योग्य प्रकारे समस्येवर मार्ग काढावा. एक दुस—यांवर आरोप लावुन जसे पाण्याची कमतरता नाही असे बोलुन पाण्याची टंचाई जाणार नाही. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :—</u> मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त व सचिव साहेब, मला बोलु दया, मी सकाळ पासुन येथे बसलो आहे. उल्हासनगरमध्ये पाणी नाही असे कोण बोलत आहे? पाणी पुष्कळ आहे, परंतु कोणी तुपाशी खातो, कोणी उपाशी राहतो. कोणाच्या बंगल्यात सकाळपासुन वॉचमन १०—१० गाडया धुत असतो, ते पाणी ८० फुटी रस्त्यावरुन डीडी कॉलेज पर्यंत वाहत जाते. हे कोणालाच दिसत नाही. एखादया गरीबाने नळ घेतला तर तेथे एवढे लोक जातात, आपले लक्ष पुर्ण करण्यासाठी, वसुली करण्यासाठी, सर्व फौजफाटा घेवुन नळ कनेक्शन खंडित करतात. परंतु मी प्रश्न टाकला होता, तुम्ही पाणी विकायला माणसाला परवानगी दया अथवा नका दया. परंतु तो जे पाणी विकतो त्याचे पैसे तुम्ही वसुल करा. ते पण झाले नाही. महासभेत एवढे सांगुन देखील, तेथे ४ ॲक्वागार्ड मशिन आहेत, तुम्ही तेथे जा, तेथे मशिनसुध्दा होते. परंतु येथे दाद दिली नाही. शेवटी कोकण भवन येथुन लोक आले व त्यांनी ४ मशिन व लाखो लिटर पाणी जे चोरी केले होते ते पकडले आहे. मी एवढा पाठपुरावा केला तरी आपले प्रशासन झोपलेले आहे. ते जागे व्हायलाच तयार नाही. याचा अर्थ असा की, त्या माणसाला एवढी सुट दिली की, तो एका दिवसात, एका लग्नाचे २ ते ५ हजाराचे बिल घेतो. एक दिवसात ४ ते ५ लग्नाला पाणी पुरवितो. तो माणुस रोजचे २०—३० हजार रुपये कमवत आहे. समजा आपण अर्धा इंची नळजोडणी दिली आहे. या नळ जोडणीतुन एका तासात १२०० लिटर पाणी पुरविले जाते. आपल्या जलवाहिनीत १६ तास पाणी उपलब्ध आहे. तर तो एका दिवसात २०,००० लिटर पाणी खेचतो. त्याचे पैसे किती होतात? ते पाणी विकले जात आहे. आता सुध्दा काल रात्री तेथे गाडी भरणे चालु होते. मी अधिका—यांनाही सांगितले परंतु ते फक्त हो—हो म्हणतात, चॉकलेट देतात. परंतु काही होत नाही. जसेच्या तसे चालु आहे. हे कश्यामुळे चालु आहे. आपल्याला येणारे बिल व आपण एमआयडीसीला जे बिल भरतो त्यामध्ये किती तफावत आहे, ते बघा. पाणी कुठे जात आहे, जात असेल तर ते कुणी भरायचे? आमच्या मानधनातुन कापा, नाहीतर तुमच्या पगारातुन कापा. तसे नसेल होत तर जो चोरी करतो त्याच्याकडुन वसुल करुन दाखवा. गळतीच्या नावावर एवढे पाणी वाया जाते परंतु ते पाणी वाया जात नसुन त्याची चोरी होत आहे. सकाळी रस्त्यावर हजारो लिटर पाणी वाहत असते. सोसायटयांमध्ये २०—२० गाडया आहेत, एकाकडे ४—४ गाडया आहेत. पेट्रोल पेक्षा पाण्याची किंमत जास्त आहे. पेट्रोल शिवाय माणुस जगु शकतो परंतु पाण्याशिवाय तो जगु शकत नाही. काही लोक पाण्याचा खुप उपयोग घेतात, आणि काहींना काहीच मिळत नाही. आमच्या प्रभागातुन एमआयडीसीची जलवाहिनी जाते त्यामुळे आम्हांला पाणी पुष्कळ आहे. परंतु तेथे पाण्याची चोरी झाल्याने गोल

मैदानच्या भागात पाणी जात नाही. आम्ही वेळोवेळी तक्रार करुन सुध्दा, आम्हांला त्याच्याशी काहीही घेणे–देणे नाही. तुम्ही त्या माणसाला अजुन चार ॲक्वागार्ड मशिन आणुन दया. परंतु त्याच्याकडुन पैसे तर वसुल करा. तो धंदयासाठी पाणी वापरत आहे. पिण्यासाठी वापरत असेल तर ठिक आहे. पाणी भरपुर आहे, परंतु त्याचे वितरण व्यवस्थित करा, चोरी कमी करा. गाडी धुणा–यांना आळा घाला, सर्विस सेंटर वाल्यांना आळा घाला. असे केल्याने तुमचेही नाव उज्वल होईल व आम्हांलाही त्रास होणार नाही. याची दखल घ्यावी, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा. सदस्य श्री. भालेराव गौतम, श्री. अशोक ठाकुर, श्री. मोहन साधवानी, श्रीमती जया साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, श्री. दिलीप लालवानी हे एका जबाबदार पक्षाचे जबाबदार पदाधिकारी आहेत. जेव्हा त्यांनी अत्यंत सहजतेने सांगितले की, शहरात कुठेही पाण्याची टंचाई नाही हे ऐकुन आम्हांला आघात झाला आहे व दु:ख झाले आहे. पाण्याच्या कमतरतेचा मोर्चाशी संबंध लावणे, शहरात कुठेही हंडा मोर्चा निघाला नाही, कोणतेही आंदोलन झालेले नाही. हे म्हणणे असे होईल जसे की, सकाळी कोंबडा आरवला नाही तर सुर्य उगवणार नाही. किंवा ८५५ इमारतींवर निष्कासनाचा आदेश झाला आहे. यामुळे शहरात मोठे आंदोलन झाले नाही, मोठा मोर्चा निघाला नाही, उपोषण झाले नाही याचा अर्थ लोक फार खुष आहेत, असे आपण समजायचे का? याकरिता या मुद्दयाला राजकारणाशी जोडणे योग्य होणार नाही. पाण्याची टंचाई नाही असा विचार करणे योग्य होणार नाही. ज्यावेळी १ एप्रिल पासुन मोफत टॅकर बंद करण्याची वेळ आली होती त्यावेळी आपण सर्वांनी येथे शहरात ब–याच ठिकाणी पाण्याची टंचाई आहे यामुळे टॅकर चालु ठेवायला हवे असा निर्णय घेतला होता. त्यावेळी असे ठरले होते की, ३० जुन पर्यंत टॅकर चालु ठेवावे. जर आपण टॅकरची यादी बघितली तर दिसुन येईल की, ब–याचशा प्रभागात दररोज टॅकर लागतात. जर पाण्याची टंचाई नसती तर टॅकरची गरज भासली नसती. मी उदाहरणा दाखल आपणांस ५–६ प्रभागांची नावे सांगतो जेथे टॅकर पुरविले जातात. पॅनल नं. २३ मध्ये मे महिन्यात ९८ टॅकर गेले होते. ही महापालिकेने बनविलेली यादी आहे. जर पाणी टंचाई नसेल तर टॅकर का चालतात? पॅनल नं. १८ मध्ये मे महिन्यात २२५ टॅकर गेले आहेत. एकतर ही यादी खोटी असेल. पॅनल नं. २० मध्ये मे महिन्यात २९८ टॅकर गेलेत. जर टॅकर चालु आहे तर याचा अर्थ शहरात पाण्याची टंचाई आहे असा होतो. पाण्याची कृत्रिमरित्या टंचाई केली जात असेल. मला नेमके कारण माहित नाही. दुसरे कारण असे असु शकेल की, एमआयडीसीकडुन आपणांस पाणी कमी येत असेल. किंवा आपल्याकडुन पाण्याचे असमान वितरण होत असेल त्यामुळे पाणी टंचाई झाली असेल. येथे ब–याच प्रभागात टॅकरने पाणी पुरवठा होतो. माझ्याकडे त्याची यादी आहे. मी आपणांस उदाहरणे दिली अजुनही देवु शकतो. येथे ब–याच नगरसेवकांच्या प्रभागात टॅकरने पाणी पुरवठा होतो परंतु ते सत्ता पक्षात असल्याने बोलु शकत नाही. परंतु ही वास्तविकता आहे. माझ्याकडे आकडे उपलब्ध आहेत, तुम्हांला हवे असेल तर मी सर्व प्रभागाची आकडेवारी सांगु शकतो. दुसरे म्हणजे आपण स्थायी समितीमध्ये पाणी पुरवठयाच्या कामासाठी नेहमी प्राकलने मंजुर करतो की, विवक्षीत विभागात पाण्याची टंचाई असल्याने तेथे जलवाहिनी टाकण्याचे काम मंजुर केले जाते. जर पाणी टंचाई नसेल तर आपण असे काम का मंजुर करतो? तर हे एक उदाहरण दिले. पाण्यासारखा महत्वाचा विषय एवढया सहजतेने घ्यायला नको. यावर आपण सर्वांनी विचार करुन मार्ग काढायला हवा. जर एमआयडीसीकडुन आपणांस पाणी कमी मिळत असेल तर त्यासाठी काय करायचे यावर विचार करायला हवा. जर पाण्याचे असमान वितरण होत असेल तर प्रशासनाचे प्रत्येक विभागात समान वितरण होण्यासाठी मार्ग काढायला हवा. तिसरे म्हणजे आपण जलवाहिन्या टाकण्यासाठी बरीच प्राकलने मंजुर केली आहे. परंतु ती कामे अदयाप चालु झालेली नाहीत. जर आपण बघितले की, २,३,४, इंचाच्या जलवाहिन्या टाकण्यासाठी जेवढी प्राकलने मंजुर झाली आहेत, तर त्यापैकी बरीचशी कामे अदयाप चालु झालेली नाही. ठेकेदार पैसे मिळत नसल्याने काम सुरु करत नाही. यासाठी जोपर्यंत ठेकेदार एक काम पुर्ण करत नाही तोपर्यंत त्याला दुसरे काम देण्यात येवु नये. जी देखील प्रलंबित कामे आहेत ती पुर्ण करण्यासाठी युध्द स्तरावर कारवाई करायला हवी. मला असे वाटते की, सदनाने याविषयी गांभीर्याने विचार केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त उल्हासनगरमध्ये पाण्याची सगळयात जास्त टंचाई आमच्या पॅनल नं. १८ मध्ये आहे. यासाठी आम्ही ब–याचवेळा आयुक्तांना व पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना भेटलो आहोत. त्यांनी आम्हांला चांगले सहकार्य दिले आहे, परंतु आमचा प्रभाग हा शेवटच्या टोकावर असल्याने पाण्याची टंचाई कायम आहे. आता श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, मे महिन्यात माझ्या प्रभागात २२५ टॅकर आले आहेत. ही वस्तुस्थिती आहे. पाण्याची टंचाई असल्याने टॅकर

आवश्यक आहे. यावर मार्ग काढण्यासाठी उपाय देखील मी पाणी पुरवठा विभागाच्या श्री. सावकारे यांना सांगितला आहे. आनंद नगर येथुन आमच्या प्रभागात जे पाणी येते त्याचा कालावधी अर्धा तास वाढविल्यास टॅंकर बंद होवु शकतात. मला असे वाटते की, कार्यकारी अभियंता यांनी यावर खुलासा करावा. आम्ही सहकार्य देण्यास तयार आहोत. आता १ तारखेपासुन टॅंकरवर शुल्क आकारण्यात येणार आहे. त्यानंतर आमच्या प्रभागात पाणी कोठुन येईल? पाणी अर्धा तास वाढविल्यास समस्या सुटु शकते. यासाठी कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी, श्रीमती प्रेमा खांडेकर यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– मा. आयुक्त साहेब, आपण उत्तर नंतर देणार आहात काय? नंतर तुमचे चुकुन काही राहिल्यास पुन्हा उत्तर दयाल ना? दिनांक २५ एप्रिलला मी व श्री. धनंजय बोडारे यांनी मोर्चा काढला होता. त्यावेळी आपण आम्हांला लेखी लिहून दिले होते तसेच आश्वासनही दिले होते. कॅम्प नं. ४ व ५ मध्ये किती पाणी येते सध्या स्थिती काय आहे? त्यांच्या गटनेत्यांनी सांगितले की, सध्या पाण्याची टंचाई नाही. मी तुम्हांला विचारु इच्छितो की, जर पाण्याची कमतरता नसेल तर आमच्या कॅम्प नं. ४ मध्ये शनिवारी पुर्ण एक दिवस पाणी बंद का ठेवता? शहरात पाण्याचा प्रश्न नाही तर मग शनिवारी पाणी बंद का ठेवता? दुसरी गोष्ट म्हणजे तुम्हांला मिटर बसवायला सांगितले होते परंतु तुम्ही अदयाप मिटर बसविले नाही. का बसविले नाही? तुम्हांला वारंवार तक्रार करुन, तुमच्या दालनात येवुन सांगितले तरी अदयाप मिटर बसविले नाही. तिसरी गोष्ट म्हणजे १५ दिवसापुर्वी माझ्या प्रभागातील पाच पांडव कॉलनी व ब्राम्हणपाडयामध्ये १५ दिवस पाणी नव्हते. ही बाब मी श्री. सावकारे व श्री. सेलवन यांच्या लक्षात आणुन दिली. त्यांना आणुन दाखविले त्यानंतर त्यांनी ४ दिवस असेच घालविले. हे चेक कर, ते चेक कर, इथे टॅप मार, प्रेशर किती आहे. परंतु शेवटी असे लक्षात आले की, वॉलमेनच्या चुकीमुळे, त्याने वॉल बंद ठेवला होता, त्यामुळे १५ दिवस पाणी येत नव्हते. श्री. जवादे व श्री. सावकारे यांना मी कमीत कमी १०० वेळा फोन केला असेल. कालही फोन केला, परवाही केला. काल दुपारी केला. तेव्हा ते म्हणाले मी येतो. परंतु ते आले नाही. लोक कनेक्शन घेतात पण पाणी येत नाही. माझ्या प्रभागात एक सोसायटी आहे. परंतु तेथे पाणी येत नाही. मी सावकारे साहेबांना फोन केला ते येतो म्हणुन सांगतात पण येत नाहीत. त्या सोसायटीतील लोक त्यांची रोज वाट पाहत आहेत. लालचक्की विभागाला त्यांनी नविन कनेक्शन दिले आहे. पण ते कनेक्शन पास कसे काय करुन देणार? त्यांना तुम्ही सांगा. एकही दिवस ते येत नाहीत. लोकांनी काय करायचे? दुसरी गोष्ट टॅंकरची. मी त्यांच्या लक्षात आणुन दिले की, तुमचा जो टॅंकरवाला आहे, तो महापालिकेच्या दोन खेपा घालतो व खाजगी चार खेपा घालतो. तो असे करु शकतो का? तुमच्या पाटील साहेबांनी त्याला लेखी पत्र दिल्यानंतरही त्याची मनमानी चालु आहे. तुमच्या अधिका–यांचे त्याच्यावर काहीही नियंत्रण नाही. ते तुमच्या अधिका–याचे काहीही ऐकत नाहीत. आजही तो खाजगी खेपा मारत आहे. स्वत:ची मनमानी करत आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, आम्हांला पेमेंट मिळत नाही. आज एक ते दिड वर्षापासुन आमची प्राकलने मंजुर होवुन पडलेली आहेत. पण कुणीही काम करायला तयार नाहीत. सावकारे साहेबांना विचारले की, काम का होत नाही तर ते सांगतात की, ठेकेदाराला पैसे मिळत नाही. म्हणुन तो काम करत नाही. ते म्हणतात तुमचा ठेकेदार घेवुन या. आम्ही ठेकेदार कोठुन आणणार? ठेकेदार नेमायची जबाबदारी तुमची आहे. त्यांचे पेमेंट करायचे तुम्ही बघा. दिड वर्षापासुन माझे काम रखडले आहे. वारंवार सांगुन देखील होत नाही. ड्रेनेजच्या गाडीचे देखील तसेच आहे. गेल्या आठ दिवसापासून गाडी बंद आहे. पुर्ण शहरात पाणी वाहत आहे. नविन गाडी आली आहे, त्याचे काय झाले? ती चालु का करत नाही ते समजत नाही. पुर्ण शहरामध्ये मुख्य गटारे भरुन वाहत आहेत. याचे आपण सविस्तर उत्तर दयावे. तुम्ही मिटर का लावले नाहीत? कॅम्प नं. ४ व ५ ला किती पाणी येते ते सांगा. पाणी सगळीकडे येत असेल तर एक दिवस आमच्याकडे का बंद ठेवले जाते ते देखील सांगा. कॅम्प नं. ३ मधुन जे पाणी येते ते आधी २ के.जी. दाबाने येत होते. आता ते हळूहळू १ के.जी., त्यानंतर ०.९ के.जी., आता ०.४ के.जी. ने येत आहे. सांगुन सुध्दा तुमचे अधिकारी बिल्कुल लक्ष देत नाहीत. मुख्य जलवाहिनीवर जोडण्या देण्याचे काम चालु आहे. तुम्ही माझ्या समोर त्यांना सांगितले की, जोडणी खंडीत करा अथवा वॉलने नियंत्रित करा. परंतु काही नाही. म्हणजे आम्ही ओरडतो त्याला काही अर्थ नाही. तुम्ही याचे समाधानकारक उत्तर दया.

मा. सदस्य श्री. राजु जग्याशी :– मा. महापौरजी,..............

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– आपण सभापती आहात, आपण नंतर बोलले तर योग्य होईल.

मा. सदस्य श्री. राजु जग्याशी :– आपल्या प्रश्नांचे उत्तर देखील मीच देईन.

मा. उप–महापौर श्री. विनोद तलरेजा यांनी पुन्हा सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– माझ्या प्रश्नांची आपण उत्तर दयावीत अशी आवश्यकता मला वाटत नाही. मा. महापौरजी, मी आयुक्तांना संबोधित करत आहे. मा. सचिव व आयुक्त साहेब, असे म्हणतात की, ''पाणी रे पाणी तुझा रंग कसा?'' मी त्याला सत्तापक्षाचा अथवा विरोधी पक्षाचा रंग न देता, आपणांस हक्काने सांगते. आता तुमच्यावर हक्क सांगणे हा देखील आता आमचा हक्क राहिला नाही असे वाटते. कारण हक्काने आम्ही ब–याच वेळा आपणांस सांगितले आहे, पत्र लिहिले आहे, टेलिफोनवर बोलले आहे, पण आम्हांस आपणाकडुन अदयाप संतोषजनक उत्तर प्राप्त झाले नाही. आम्हांला उत्तर देवु नका, आम्हांला त्याची पर्वा नाही. परंतु आमच्या प्रभागाला पाणी अवश्य दया. मला यायला थोडा उशिर झाला. मला असे कळले की, श्री. लालवानी असे बोलले की, पुर्ण शहरात पाणी पुरवठा होत आहे. हे ऐकुन आश्चर्य वाटते. मी उशिरा आले, परंतु मला असे कळले आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– आपणांस चुकीची माहिती मिळाली आहे. मी चुकीची दुरुस्ती करतो.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– ठिक आहे, तुम्ही दुरुस्ती करा, त्यानंतर मी पुन्हा बोलेन.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– मी असे बोललो की, या आधी जशी पाण्याची टंचाई असायची ज्यासाठी आम्ही धरण्यावर बसायचो, उपोषण करायचो, अशी समस्या आता नाही.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– तुम्ही काय बोलले ते माझ्या लक्षात आले. मी आपणांस धन्यवाद देते की, आपण दुस–यांदा माझ्यासाठी बोललात.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– मी असे देखिल बोललो की, एखादया विभागात पाण्याचे वितरण होत नसेल तर प्रशासनाने लक्ष दयावे.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– आपले म्हणणे आम्ही लक्षपुर्वक ऐकले आहे. आपल्या माहितीसाठी मी सांगु इच्छिते की, आम्ही ब–याच वेळा शासनाला व प्रशासनाला विनंती केली आहे. विशेष करुन माझ्या प्रभागात पाणी बिल्कुल नाही. मला आठवते की, श्री. सोनवणे आयुक्त यांच्याशी माझे सर्वात मोठे भांडण गेले तीन–चार वर्षात केले असेल , मला ती तारीख अजुनही आठवते २९ मार्चला मी श्री. सोनवणे यांच्याशी जोरदारपणे वाद घातला होता. त्यावेळी आपण मला आश्वासन दिले होते की, आम्ही आपल्या प्रभागात पाणी देवु. तसेच आपण हे देखील आश्वासन दिले होते की, आपण जे टॅंकर बंद करणार होता, त्यावर देखील माझे आपल्याशी भांडण झाले होते. त्यावेळी आपण आश्वासन दिले होते की, जोपर्यंत नळाद्वारे पाणी येत नाही तोपर्यंत मोफत टॅंकर बंद करणार नाहीत. त्यानंतर आपण काही महिन्यांसाठी टॅंकरची मुदत वाढविली आहे. मी आपणांस विनंती करेन की, आपण लवकरात लवकर आमच्या शहरातील व माझ्या प्रभागातील नागरीकांना नळाद्वारे पाणी दयावे. जोपर्यंत आपण नळाद्वारे पाणी देत नाही तोपर्यंत टॅंकरचे पैसे घेण्यात येवु नये अशी माझी सर्व शहरवासियांतर्फे आपणांस विंनती आहे. आपण ही बाब गांभीर्याने घ्याल असे मला वाटते. जय हिंद।

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– मा. महापौर महोदया, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे गटनेते श्री. दिलीप लालवानी यांनी ज्या बेफिकरीने वक्तव्य केले आहे, मी श्री. जमनादास पुरस्वानी यांचे शब्द वापरत नाही. येथे नगरसेवक आपल्या भावना ठेवतात. आधी केले होते ते खरे होते व आता केले आहे म्हणजे ते खोटे आहे, नाटक आहे असे म्हणणे चुकीचे आहे. एवढा जबाबदार माणुस असे बेफिकरीने वक्तव्य करतो, की श्री. लाल पंजाबी हे म्हणाले की, मला दु:ख वाटते परंतु मला दु:ख वाटत नाही. त्यांची क्षमता हीच आहे असे मला वाटते. त्यामुळेच त्यांनी असे वक्तव्य केले आहे. येथे ब–याचशा सदस्यांनी त्यांच्या प्रभागातील समस्या मांडल्या. यांना तर प्रभागच नाही. त्यामुळे त्यांना ही समस्या समजत नाही. मराठी मध्ये एक म्हण आहे की, ''वांझोटया बाईला प्रसुतीच्या वेदनाही कळत नाही व सुखही कळत नाही''. तसे यांना काय कळणार आहे? यासाठी त्यामध्ये जावे लागते. पाण्यात मासा कसा पोहतो हे किना–यावर बसुन कळत नाही यासाठी पाण्यात जावे लागते. आज ज्याप्रकारे आपण विधान केले हा सर्व सभागृहाचा अपमान आहे. १५ दिवसापुर्वी आम्ही सुचना दिली की, या–या

प्रभागात पाण्याची समस्या आहे. आम्ही कुणावरही आरोप केला नव्हता. आमचे म्हणणे ऐकुन घेतल्यानंतर आपण बोलला असता तर ठिक होते. परंतु आधीच उठुन तुम्ही चुकीचे आहात, आम्ही केले तेव्हा योग्य होते. हे सांगणारे आपण कोण आहात? आम्हांस आपले स्पष्टीकरण नको होते. जी समस्या होती तीचे निराकरण कसे करायचे, त्यामध्ये आपण काय करु शकतो? यावर विचार करण्यासाठी आम्ही बैठक ठेवली होती. यामध्ये कोणताही राजकिय उद्देंश नव्हता, राजकीय रंग देण्याची आवश्यकता नव्हती. परंतु आज आपण जाणुन–बुजुन याला राजकिय रंग दिला. त्यांनतर आपण आमच्यावर आरोप करत आहात. विषय काय आहे हे बघा. पाण्याची समस्या आहे अथवा नाही हे पाणी पुरवठा विभागाचे अभियंता बघतील. श्री. रमेश चव्हाण यांनी सांगितले की, २४ एप्रिलला आम्ही मोर्चा काढला त्यानंतर कार्यकारी अभियंता, उप–अभियंता, कॅम्प नं. ४ व ५ मधील सर्व सदस्य यांनी बसुन तोडगा काढला व एक दिवस पाणी बंद ठेवायचे ठरले. परंतु बाकीचे ५ दिवशी काही विभागात पाणी जायला हवे. आयुक्त साहेब हे खरे आहे की नाही? जर पाणी टंचाई नसती तर आम्ही याला तयार झालो असतो का, लोक तयार झाले असते का? परंतु ५ दिवसही पाणी मिळत नाही. यासाठी लोक कार्यकारी अभियंता यांना येवुन भेटत आहेत. लोक आम्हांला येवुन भेटतात त्याला आम्हांलाही त्रास होतो. आणि हे किना–यावर बसुन म्हणतात की, पाण्याची समस्या नाही. ही कोणती पध्दत आहे? मोर्चा नाही काढला याचा अर्थ पाण्याची समस्या नाही असा होत नाही. मोर्चा काढुन लोक थकले आहेत असा याचा अर्थ होत नाही. मोर्चे येतात व जातात परंतु यांच्यावर काहीही परिणाम होत नाही. यामुळे लोकांनी त्रस्त होवुन मोर्चे काढणे थांबविले असेल. हे याचा अर्थ नकारात्मक कसा काढतात? मोर्चा नाही म्हणजे सर्व चांगले आहे असे कसे काय समजतात? जर पाण्याची समस्या नसती तर एवढया मोठया प्रमाणावर टॅंकर चालले नसते. आज आमच्याकडे आकडेवारी आहे, प्रभाग क्र. २५ मध्ये मे महिन्यात २५४ टॅंकर गेले आहेत, एकुण ५ महिन्यात १३५६ टॅंकर एकाच प्रभागात गेले आहेत. हे काय दाखवतात, पाण्याची समस्या नाही? लोक त्रस्त आहेत. यावर तोडगा काढण्याऐवजी सत्ताधारी पक्षाचे गटनेता जे एक जबाबदार नेता आहे, ते यावर हसतात. ही चुकीची बाब आहे. आयुक्त साहेब, या प्रश्नावर याआधी लोकांनी बरेच सहले आहे. ५ दिवस पाणी यायचे हे लोकांना चालायचे. विठ्ठलवाडीची टाकी तयार होवून ३ महिने झाले आहेत परंतु ती तुम्ही भरु शकत नाही. जर पाण्याची समस्या असेल तर ती दुर करण्यासाठी काय करणार हे स्पष्ट करा. जर पाण्याची समस्या नसेल तर उदया पासून विठ्ठलवाडीची टाकी भरण्यास सुरुवात करा. लोकांना पाणी मिळायला हवे. आणि येथिल ज्या–ज्या समस्या सदस्यांनी ठेवल्या आहेत त्यावर आपण काय मार्ग काढणार हे आम्हांला सांगावे अशी आमची अपेक्षा आहे. जय हिंद, जय महाराष्ट्र।

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u> सभागृह नेताजी मला श्री. लालवानी यांच्या वक्तव्यावर दोन मिनिटे बोलायचे आहे. मी जास्त बोलणार नाही. श्री. लालवानी साहेबांना मी समजावु इच्छितो की, माझ्या प्रभागातुन ३ वेळा मोर्चा काढायचे ठरले होते. तो मी रद्द केला आहे. आम्ही विरोधी पक्षात असुन देखील अधिका–यांना सहकार्य देतो. मोर्चा काढला नाही याचा अर्थ पाण्याची टंचाई नाही व मोर्चा काढला म्हणजे पाण्याची टंचाई आहे असे नाही. मी सभागृहाला सांगु इच्छितो की, आता मोर्चा काढला तरी लोक आमच्या सोबत येत नाहीत. मोर्चामुळे काहीही फायदा होत नाही हे त्याचे कारण आहे. ज्या–ज्या वेळी महासभा होईल त्यावेळी आम्ही सभागृहामध्ये पाण्याचे विषयावर आंदोलन करुन दाखवु.

**मा. सदस्य श्री. मोहन साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :–</u> मा. महापौर, आयुक्त व सचिव साहेब, सर्व सन्माननिय सदस्य आज येथे पाण्याच्या विषयावर जी चर्चा सुरु आहे हीच चर्चा काही महिन्यापुर्वी सत्ताधारी पक्षाने केली होती. त्यावेळी आजच्या पेक्षा पाण्याची टंचाई जास्त होती. परंतु त्यावेळी विपक्षाच्या एकाही सदस्याने त्या मुद्दयावर चर्चा केली नव्हती. परंतु आज जेव्हा पाण्याची समस्या ९० टक्के कमी झाली आहे तेव्हा आज काहीतरी विषय आणायचा म्हणुन सत्ताधारी पक्ष व आयुक्तांना बदनाम करण्यासाठी षडयंत्र रचले जात आहे. आता आमचे सन्माननिय सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की, ते जेव्हा कोटा येथे प्रशिक्षण घ्यायला गेले होते. त्यावेळी त्यांच्या सोबत मी देखील होतो. त्यांनी जे सांगितले ते अर्धसत्य आहे. त्यांनी सांगितले की, कोटा येथे २४ तास पाणी पुरवठा होतो. परंतु श्री. जमनुजी आपण पुढचे ऐकले नाही. तेथे काही जागा अशा आहेत की जेथे टॅंकरने पाणी पुरवठा केला जातो. त्या शहराची भौगोलिक स्थिती पाहिल्यास शहराच्या चारही बाजुस मोठे–मोठे धरणे असल्याचे दिसुन येते. धरणांमुळे तेथे २४ तास पाणी यायलाच हवे. आपणांस दुस–याच्या धरणांतुन दुरुन पाणी आणावे लागते. त्यामुळे मध्येच बरेचसे पाणी वाहुन जाते. पुर्ण पाणी आपल्याकडे येत नाही. आमचे सन्माननिय सदस्य श्री. रमेश चव्हाण यांनी विचारले की, एक दिवस पाणी बंद का ठेवले जाते त्याचे कारण हेच

आहे की, पुर्ण पाणी आपल्या शहरात येत नाही. ज्या जलवाहिन्या आहेत, त्या जुन्या झाल्या आहेत. त्यामध्ये गळती असल्याने पुर्ण पाणी टाकीत जात नाही हे कारण आपणा सर्वांना माहिती आहे. परंतु हे माहित असतांना देखील केवळ सत्ताधारी पक्षाला बदनाम करण्यासाठी आपण येथे आवाज उठवित आहात असा माझा तुमच्यावर आरोप आहे. येथे सावकारे साहेबांची जी टिम आहे, ती फार चांगल्या प्रकारे काम करीत आहे. मी पुर्ण शहराचे बोलणार नाही कारण तुम्ही शहराचे लिडर आहात, मी माझ्या प्रभागाचा लिडर आहे. माझ्या पक्षाचे, शहराचे नेते शहरासाठी बोलतील. मी माझ्या प्रभागासाठी बोलेन. जेव्हा मी नगरसेवक झालो त्यावेळी माझ्या प्रभागात २९ टॅंकर यायचे. आज माझ्या प्रभागात १ किंवा २ टॅंकर येतात. ते देखिल आठवडयातुन २ किंवा ३ वेळा येतात. जी घरे शेवटच्या टोकाला आहेत, तेथे ते टॅंकर जातात. बघायला गेले तर तो प्रभाग आमच्या क्षेत्रात येत नाही तरी देखील आम्ही त्याचे दायित्व घेतले आहे. त्या प्रभागात आम्ही दोन टॅंकर पाठवतो. मला मनोज कुमारचे एक गाणे आठवते. ''थोडेसे गुजारा होता है, हम उस देश के वासी है, जिस देश मे गंगा बैहती है ।'' जर तुमच्या प्रभागात ८ तास पाणी येवुन देखील आपण म्हणाल की, पाणी येत नाही, तर हे चुकीचे आहे. जसे श्री. मनोज कुमार यांनी सांगितले की, थोडे मिळाले तरी आमचे काम होते, अशा देशातील आम्ही रहिवासी आहोत. तर तुम्ही या देशातील रहिवासी आहात अथवा नाही हे मला कळुन येत नाही. आमच्या आयुक्तांनी ज्यावेळी श्वेतपत्रिका काढली त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, प्रत्येक प्रभागात २ तास पाणी देईन. मी आयुक्त साहेबांना सांगु इच्छितो की, काही प्रभाग असे आहेत जेथे ८ तास पाणी पुरवठा होतो. काही प्रभागात ६ तास पाणी पुरवठा होतो. काही प्रभागात ४ तास पाणी पुरवठा होतो. तर काही प्रभागात अर्धा ते पाऊण तास पाणी पुरवठा होतो. मी आयुक्त साहेबांना सांगु इच्छितो व विनंती करु इच्छितो की, ज्या प्रभागात ८ तास पाणी मिळते त्या प्रभागाचे पाणी कमी करुन ज्या प्रभागात १५–२० मिनिटे पाणी मिळते त्या प्रभागात पाणी वाढवावे. यामुळे आमच्या सदस्यांना जो त्रास होत आहे तो कमी होईल. त्यावेळी मोर्चा आला तर आपण बिल्कुल घाबरु नये आम्ही आपल्या सोबत आहोत. यामुळे यांची समस्या तात्काळ दुर होईल. आपण फक्त ठाम भुमिका घ्यायला हवी. ज्या प्रभागात ८ तास पाणी येते ते कमी करुन दुस–या प्रभागात पाणी दयावे. आपण जी श्वेतपत्रिका काढली त्यातील आश्वासन आपण पुर्ण करावे. मी आमच्या सन्माननिय सदस्यांना सांगु इच्छितो की, आपल्या येथे परिस्थिती ठिक आहे, कमीत कमी एक तास तरी पाणी मिळते. काही प्रभागात २४ तास देखील पाणी मिळते, परंतु धुळे सारख्या शहरात १५ दिवसांनी फक्त एक तास पाणी मिळते. चाळीसगांव सारख्या शहरात ८ दिवसातुन १ तास पाणी मिळते. नागपुर मध्ये १५ दिवसांनी एक तास पाणी मिळते. तरी देखील तेथे लोक जगत आहेत. तेथिल लोक आयुक्तांना धन्यवाद देखील देतात. आपल्याला ८ तास पाणी मिळुन देखिल आपण आयुक्तांवर टिका केली तर लोकांमध्ये चुकीचा संदेश जाईल. हे वर्तमानपत्रात आले तर चुकीचे होईल. आयुक्तांच्या मनोबलावर देखिल यांचा परिणाम होवु शकतो. ते ज्या प्रकारे काम करीत आहेत त्यामध्ये तुम्ही अडथळा आणण्याचा प्रयत्न करीत आहात असे मला या ठिकाणी म्हणायचे आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती रेखा कृष्णानी :–</u> माझ्या प्रभागात ८ तास पाणी येते परंतु एक टाकी देखील भरत नाही. मला एक तास पाणी दयावे त्यांना ८ तास पाणी दया.

<u>मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :–</u> आयुक्त साहेब, श्री. शांताराम निकम यांच्या प्रभागात पाणी येत असेल तर जे दोन टॅंकर सुरु आहेत ते देखिल बंद करावे.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :–</u> मा. महापौरजी, मी आपणा सर्वांसमोर सांगतो की,.............

<u>मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :–</u> तुमच्या प्रभागात पाणी येते तर टॅंकरची आवश्यकताच नाही. आमच्या पॅनल नं. २५ मध्ये तर अजिबात पाणी येत नाही. तुम्ही तिकडे जावुन बघाल का?

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :–</u> मा. महापौरजी यांना खाली बसवावे. माझ्या नंतर बोलण्याची संधी दयावी.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> हे ज्या प्रकारे बोलत आहेत, ती पध्दत चुकीची आहे. यांच्या प्रभागात पाणी येते ठिक आहे. परंतु आमच्या प्रभागात पाणी येते आणि आम्ही नाही बोलतो असे जे म्हणत आहेत ते चुकीचे आहे.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळून येत नव्हते.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :– तुम्ही दादागिरी करता का?

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– तुम्ही जेव्हा सभापती होता, तेव्हा एकदा तरी प्रभागात आला का?

मा. महापौर :– प्रत्येकाला आपली बाजु मांडण्याचा अधिकार आहे. ज्याच्या प्रभागात त्रास आहे तो त्रास आहे असेच बोलेल. ते त्यांच्या प्रभागाबद्दल बोलत आहेत.

**यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळून येत नव्हते.**

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– यांच्या शेजारीच माझा प्रभाग आहे, यांना माझ्या प्रभागात पाणी दयायला सांगा. येथे तर श्री. मुलायमसिंग यादव यांच्या सरकारने दिल्लीला पाणी दिले आहे. तर तुम्ही माझ्या प्रभागात थोडे पाणी दया.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :– मा. महापौरजी, मला माझे म्हणणे पुर्ण करु दया.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– सन्माननिय गुरुजी, तुमच्या प्रभागात टॅंकर सुरु आहेत....................

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– मा. महापौर महोदया, ज्यांना त्रास नाही, ते का बोलतात? यांना पाणी येते तर गप्प बसायला सांगा. आमच्याकडे पाणी येत नाही म्हणुन आम्ही बोलत आहोत. मास्तरांना त्रास नाही तर मास्तरांनी खाली बसावे. आम्हांला त्रास आहे म्हणुन आम्ही बोलत आहोत.

मा. महापौर :– तुम्ही त्यांचे व्यवस्थित ऐकले नाही.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– टॅंकरने किती लाखाचे पाणी दिले ते बघा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– प्रत्येक सदस्याला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. भाजपाचे ८ सदस्य आहेत,......................

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– येथे भाजपा व शिवसेना वेगवेगळी नाहीत. आयुक्त साहेब आपल्याला मोर्च्याची हौस असेल तर आम्ही असा मोर्चा आणु की सर्वांना हलवुन टाकु. हे म्हणत आहेत की, यांचा मोर्चा निघु दया आम्ही उभे राहु. आमच्या मोर्च्यासमोर यांनी उभे राहुन दाखवावे. आम्ही यांना दाखवु की, दहशत काय असते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– मा. महापौर महोदया, ज्यांना त्रास नाही, ते का बोलतात?

मा. सदस्य श्री. शांताराम निकम:– आपला खोटेपणा समोर ठेवायचा होता. म्हणुन बोलत आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– मी काय बोललो ते महाराज भुल्लर यांनी ऐकले नाही. मी असे म्हणालो की, भाजपा–शिवसेना.......................

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– आपण परत तेच बोलत आहात. ते आयुक्त साहेबांना असे म्हणाले की, तुम्ही कोणत्याही मोर्चाला अथवा आंदोलनाला घाबरु नका. आयुक्त साहेबांना मोर्च्याची व आंदोलनाची एवढी हौस असेल तर मग आम्ही मोर्चा आणल्यावर त्यांना माहिती पडेल की, मोर्चा कसा असतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– मला असे म्हणायचे आहे की, भाजपा–शिवसेनातर्फे सदस्य बोलतील, राष्ट्रवादी कॉंग्रेस तर्फे बोलतील, कॉंग्रेस तर्फे बोलतील, शेवटी विरोधी पक्ष नेता यांना बोलायचे आहे. त्यानंतर

मला बोलायचे आहे व शेवटी महापौर आदेश देतील. तर माझी सदस्यांना विनंती आहे की, आमचे श्री. शांताराम निकम हे दोन मिनिटे बोलतील. त्यानंतर श्री. राजु जग्याशी, त्यानंतर श्री. मोहन बेहरानी बोलतील.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—ज्यांना त्रास आहे, त्यांनी बोलावे. ज्यांना त्रास नाही, त्यांनी बोलु नये.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— तुमचे सर्व सदस्य बोलणार असतील तर आमचे देखील ४९ सदस्य बोलतील.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— मी माझे म्हणणे मांडत आहे की, ते बरोबर आहे. परंतु तुम्ही आमचे म्हणणे चुकीचे आहे असे जे म्हणतात ते चुकीचे आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— महाराजजींनी त्यांचे उत्तर दिले आहे. माझे असे म्हणणे आहे की, सर्वांनी एकेक वेळा बोलावे. जर आठ मधुन सहा बोलले, बारा मधुन नऊ बोलले तर ४९ मधुन ३० जणांना बोलावे लागेल. तुम्ही ऐकायची शक्ती ठेवा.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—मा. महापौरजी, जर आपल्या सन्माननिय सदस्यांना चांगल्या गोष्टी ऐकायला आवडतात तर त्यांनी कटु गोष्टी ऐकायची सुध्दा सवय करायला हवी. काही सन्माननिय सदस्य येथे पाण्याची टंचाई आहे, पाण्याची टंचाई आहे असे ओरडत आहेत. त्यांच्या प्रभागात टंचाई नसतांना सुध्दा ते असे ओरडत आहे. गोबेल्स निती प्रमाणे एखादी खोटी गोष्ट जर १०० वेळा बोलुन दाखविली तर ती खोटी गोष्ट सुध्दा वारंवार बोलल्याने खरी वाटायला लागते. आम्ही देखील शहरात राहतो आम्हांला देखील परिस्थीती काय आहे हे माहित आहे.

**यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर—जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळून येत नव्हते.**

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मा. महापौरजी, आम्ही सर्व सदस्यांचे शांतपणे ऐकुन घेतो. आम्ही सुध्दा सदस्य आहोत आमचे म्हणणे सुध्दा शांततेने ऐकायला हवे. ज्याप्रमाणे त्यांना ओरडण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे त्यांनी शांततेने ऐकणे हे सुध्दा कर्तव्य आहे. आम्ही तुमचे ऐकतो तुम्ही सुध्दा ऐकायला हवे. मी येथे माझे वैयक्तीक मत प्रदर्शित करत आहे. जर मी आयुक्तांना सांगितले की, कुणी मोर्चा घेवुन आला तर आम्ही तुमच्या सोबत आहोत. तर हे माझे वैयक्तीक मत आहे. आयुक्तांना काय करायचे ते आयुक्तांनी ठरवावे. जर माझ्या प्रभागात पाण्याची टंचाई नसेल तर मी बोलु नये असे नाही. तुम्ही दोन तास बोलु शकतात आम्ही देखील बोलु शकतो.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— तुमच्या प्रभागात पाण्याची टंचाई नसेल परंतु श्री. प्रमोद टाले यांच्या प्रभागात पाण्याची टंचाई आहे. ते थोडया वेळाने तुम्हांला सांगतील.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मा. महापौरजी, मी एका शाळेत शिक्षक आहे मला कमीत कमी ३५ मिनिट तरी बोलावे लागते. हे म्हणतात दोन तास परंतु जास्त पिरीअड घ्यायची मला सवय नाही.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— गुरुजी, एकेक तास शिकवितात इकडेही एक तास बोला.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—हो मी बोलेन. मा. महापौरजी, जेव्हा मी नगरसेवक झालो त्यावेळी माझ्या प्रभागात पाण्याची फार टंचाई होती. ब—याचवेळा आम्ही श्री. जवादे यांच्याकडे व आयुक्त साहेबांकडे गेलो होतो. त्यांनी म्हाडाच्या निधितुन जलवाहिनी एवढया लवकर टाकली................

मा. सदस्या श्रीमती किरण माने :— तुम्ही गप्प बसा, किती बोलता?

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— तुम्ही नंतर बोला तुम्ही कशाला मध्ये बोलत आहात? मी गप्प बसणार नाही. ऐकायचे नसेल तर निघुन जा. नंतर दुस—या सभेला या. माझ्या प्रभागात भारतनगर म्हणुन विभाग आहे. आयुक्त साहेबांना माहिती आहे तेथिल लोक उपोषणाला बसले होते. दोन—चार वेळा मोर्चे काढले. भरतनगरमध्ये

१५ वर्षापासुन पाणी मिळाले नव्हते. तेथिल लोक नाल्यातुन, कमरेएवढया, छातीएवढया पाण्यातुन जावुन अंबरनाथ येथुन पाणी भरायचे. त्या विभागात आज पाण्याची अजिबात टंचाई नाही. माझ्या प्रभागातील साईबाबा नगर मधील लोक रेल्वे लाईन ओलांडुन श्री. नाना पवार यांच्या प्रभाग क्र. ८ मधुन पाणी भरायचे. आज त्यांच्या घराघरात पाणी पोहोचले आहे. माझ्या प्रभागात जो गणेश नगर विभाग आहे, तेथे बिल्कुल पाणी नव्हते. दिवसाला दोन–तीन टॅकर जायचे. आज त्या विभागात टॅकर बंद झाले असुन त्यांना नळाने पाणी मिळत आहे. माझ्या प्रभागात नागसेन नगर म्हणुन जो विभाग आहे तेथे तीन–तीन टॅकर उभे राहायचे. आज त्या ठिकाणी टॅकर जात नाही. याचा अर्थ १९ टॅकर पैकी आम्ही फक्त २ टॅकर ठेवले आहेत. ते देखिल आणीबाणीच्या वेळेसाठी ठेवले आहेत. मी जसे आधी सांगितले की, आम्हांला जास्त नको थोडया मधुनच काम भागवुन घेवु. तर मी सगळयांना सांगेन की, जेवढे आहे, त्यामध्ये माणसाने समाधान मानायला हवे. जर मी बोललो की, बाजुच्या प्रभागात ८ तास पाणी आहे, म्हणुन मलाही आठ तास पाणी हवे तर त्याने त्रास होईल. जर एखादा माणुस इम्पाला गाडीतुन फिरत असेल आणि पायी चालत असेल तर मला त्रास तेव्हा होईल जेव्हा मला इम्पाला गाडी हवी असेल. परंतु जर मी पायी चालण्यातही समाधानी असेल तर मला त्याचा त्रास होणार नाही. यासाठी मी सर्व सदस्यांना सांगेन की, तुम्हांला जे पाणी मिळत आहे, ते पुरेसे आहे. आता टॅकर बद्दल येथे बोलले जात आहे तर काही दिवसापुर्वी आयुक्त साहेबांनी टॅकर बंद केले होते. मी सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी यांना सांगु इच्छितो की, तुम्ही जो रेकॉर्ड काढला आहे, तर आयुक्त साहेबांनी १० दिवसांसाठी जेव्हा टॅकर बंद केले होते तो रेकॉर्ड देखील काढावा. त्यावेळी आमच्या कॅम्प नं. ५ मध्ये दररोज जेथे ८० ते १०० टॅकर भरले जातात त्याच ठिकाणी १२ ते १४ टॅकर भरले जात होते. त्यावेळी पाण्याची टंचाई नव्हती का? याचा अर्थ टॅकरच्या पाण्याचा गैरवापर केला जात आहे. तो कश्याप्रकारे केला जात आहे ते मी सांगतो. जर आपण यादी पाहिली तर दिसुन येईल की, जास्तीत जास्त टॅकर हे इमारतींना दिलेले आहे. १९९७ चा रेकॉर्ड मी बघितला की, टॅकरची स्थिती काय होती. १९९७ मध्ये टॅकरवर २ लाख खर्च होता आणि आज हा खर्च रुपये १ कोटी का होत आहे? याचा अर्थ टॅकरची चोरी होत आहे. टॅकर लॉबी मोठी होत आहे. यासाठी आपले काही नगरसेवक त्यांना साथ देतात.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> नगरसेवक कोण आहेत, त्यांचे नाव सांगा.
<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मा. आयुक्त साहेब, यांनी आरोप लावला आहे की, ज्या प्रभागात टॅकर जातात, ते नगरसेवक पैसे घेतात.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> हा तुमच्यावर, आमच्यावर, सर्वांवर आरोप आहे.

<u>मा. महापौर :–</u> त्यांना त्यांचे बोलणे पुर्ण करु दया.
<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> ज्या नगरसेवकांच्या प्रभागात जास्त टॅकर जातात, त्यांची चौकशी करायला हवी.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> त्यांना त्यांचे म्हणणे तरी पुर्ण करु दया.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> तुम्हांला हा नगरसेवकांचा अपमान वाटत नसेल परंतु आम्हांला वाटतो. कोण नगरसेवक आहे त्याचे नाव सांगा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> नगरसेवक पाठींबा देतात, तर नगरसेवकांचे नाव समोर यायला हवे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> नुसते आरोप करुन चालणार नाही, कोण नगरसेवक आहे, त्याचे नांव सांगा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> कोण नगरसेवक आहे, त्याचे नांव सांगा अथवा आपले शब्द मागे घ्या.
<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>याची चौकशी बसविली जावी.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> चौकशी नंतर करा आधी येथे नांव सांगा. कोणी कमिशन घेतले ते समोर यायला हवे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> मा. महापौर महोदया, त्यांना काय बोलायचे याबद्दल समज दयावी.

मा. महापौर :— तुम्ही कृपया खाली बसा. आधी त्यांना त्यांचे म्हणणे पुर्ण करु दया. त्यानंतर तुम्ही बोलु शकता.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मा. महापौरजी, यांनी मध्ये अडथळा आणला तर मी पाणी पिऊन पुन्हा बोलेन व जास्त वेळ घेईन. जर त्यांना एक तास ऐैकायचे असेल तर ऐकु शकता.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— मा. महापौरजी, यांना १० वाजेपर्यंत बोलु दया पुष्कळ वेळ आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— मा. आयुक्त साहेब, यांच्या प्रभागात टॅंकरवर किती खर्च झाला हे यांचे भाषण संपल्यावर त्वरीत सांगा. हे म्हणतात दोन टॅंकर आले आहेत. दोनच्या वर टॅंकर गेले असतील तर त्यांची चोरी झाली असेल. याची पण तुम्ही शहानिशा करा. यांचे संपल्यानंतर आम्हांला उत्तर हवे. आता बोला १० वाजेपर्यंत.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम:— आपले मा. सदस्य श्री. सोनवणे साहेब यांना मी स्पष्टपणे सांगितले की, माझ्या प्रभागात फक्त दोनच टॅंकर येतात तर मग अधिक खर्च मागण्याची काही गरज नाही. मराठीमध्ये एक म्हण आहे की, ''खाई त्याला खवखवे''. जर एखादयाने चोरी केली असेल व आपण त्याला म्हंटले की, मी तुम्हांला एक उदाहरण देतो, एकदा एका राजाच्या घरी चोरी झाली, चोर शोधण्यासाठी त्याने सर्व नोकरांना बोलावले व सांगितले की, सर्वानी काठी घेवुन यावी ज्याने चोरी केली असेल त्याची काठी दोन फुट छोटी होईल. जेव्हा सभा सुरु झाली तेव्हा ज्याने खरोखर चोरी केली होती त्याने दोन फुट काठी तोडुन आणली. त्याला वाटले माझी काठी मोठी होईल. व माझी काठी सर्वात मोठी दिसेल. परंतु अशाप्रकारे ज्याची छोटी काठी होती तो पकडला गेला. अजुन एक गोष्ट आहे की, ........

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :— आम्ही येथे कथा ऐकायला आलेलो नाही. पाण्याबद्दल बोला. हे काय चालु आहे? सभागृहाची दिशाभुल आहे. येथे मस्करी करत आहेत काय? हे मास्तर आहेत की कोण आहेत? आम्ही येथे कुत्रा व मांजराची कथा ऐकायला आलेलो आहोत का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—गायकवाड साहेब तुमचा पण कोंबडा बोलतो त्याला आवर घाला.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मा. महापौरजी, मी सांगितले की, जो चोरी करतो त्याच्या मनात भय असते की मी चोरी केली आहे मी पकडला जाईन. आम्ही ब—याच चित्रपटात पाहिले आहे की, एक सरदार असतो तो सर्वांना उभे करतो व विचारतो कोणी चोरी केली आहे? कोण गद्दार आहे?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— येथे कथा ऐकायला कोणीही आलेले नाही. येथे लहान मुले नाहीत. पाण्यावर बोलायचे असेल तर बोला. ही शाळा नाही. यावरुन सत्ता पक्ष पाण्याच्या प्रश्नावर गंभीर नाही हे दिसुन येते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— तुम्ही पण कोंबडयाची गोष्ट बंद करा.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— प्रत्येकजण आपली कथा सांगतो. कोणाची कथा मोठी आहे, कुणाची छोटी आहे. आम्ही तुम्हांला सहन करत आहोत, तुम्ही देखील आम्हांला सहन करा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— येथे कथा चालु केली तर आम्ही देखील एकेकाच्या कथा सांगु.
मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— महाराज जी आपण आम्हांला धमकावत आहात का?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— श्री. शांताराम निकम हे शाळेतल्या मुलांचे शिक्षक आहेत, आमचे शिक्षक नाहीत. येथे गोष्ट सांगायची आवश्यकता नाही.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— मा. महापौरजी, यांनी जी गोष्ट सांगितली ती काठीची नसुन दुसरीच आहे.

मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना :— आधी यांची गोष्ट पुर्ण होवु दया मग आम्ही नथुची गोष्ट ऐकु.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— मास्तर असून सुध्दा गोष्ट चुकीची सांगितली. बिरबलच्या राज्यात एक कोंबडी चोरीला गेली होती, सर्व लोक अकबर कडे गेले.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— भुल्लर महाराज आता तुम्ही गोष्ट ऐका. गायकवाड साहेब तुम्ही पण ऐका.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— सर्व लोक म्हणाले कोंबडीची चोरी झाली. दरबार सुरु झाला तेथे अकबर बसला होता. तो म्हणाला ज्याने कोंबडी चोरली आहे, त्याच्या डोक्यावर पिस लागले आहे. ज्याने चोरी केली होती तो डोक्याला हात लावायला लागला. त्यावरुन मग तोच चोर असल्याचे सिध्द झाले. अशी ही गोष्ट आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मा. महापौरजी, त्यांनी सांगितली ती देखील गोष्ट आहे व मी सांगितली ती देखील गोष्ट आहे.

मा. महापौर :— श्री. शांतारामजी आता गोष्ट संपली आहे व ती सर्वांना समजली आहे. मास्तरजी आता दोन मिनिटात पुर्ण विराम घ्या.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— अजुन ३५ मिनिटे झाली नाहीत. मा. महापौरजी, मी सांगितले की, १९९७ मध्ये टॅकरवर ५ ते ७ लाख रुपये खर्च होत होता. आज तो खर्च रुपये १ कोटी पर्यंत गेला आहे. याचा अर्थ काय आहे? आपली लोकसंख्या एवढी वाढली आहे का? १९९७ मध्ये जेवढे पाणी मिळत होते, त्यापेक्षा जास्त पाणी आता मिळत आहे. तर मग हे पाणी गेले कुठे? याचा अर्थ लोकांना चोरी करण्याची सवय झाली आहे. आपले नगरसेवक त्याला उत्तेजन देत आहेत. मी आपणांस हे सिध्द करुन दाखवेन.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौर महोदया, पुन्हा तेच बोलत आहेत. कोण नगरसेवक उत्तेजन देत आहेत? त्यांची नावे सांगा.

**यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर—जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळून येत नव्हते.**

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— सन्माननिय सदस्य श्री. रमेश चव्हाण जी आपणांस का वाईट वाटत आहे? तुम्ही ऐकु नका. माझे म्हणणे असे आहे की, जर एखादी इमारत बुस्टरच्या अथवा टाकीच्या शेजारी असेल तर त्या इमारतींना टॅकरने पाणी दयायची काय आवश्यकता आहे? जर आम्ही एक तासात खुश होवु शकत असु तर यांनी देखील खुश व्हायला हवे. परंतु टॅकरचे पाणी जे इमारतीत जाते त्याचा गैरवापर होत आहे. मी आपणांस असेही सिध्द करुन दाखवु शकतो की, एका बंगल्यासाठी तीन दिवसात एक टॅकर जातो. आठवडयातुन दोन टॅकर एका बंगल्यावर जातो. येथे काही ठिकाणी १०० लोक एका टॅकरने पाणी भरतात आणि काही ठिकाणी नगरसेवकाचे नातेवाईक असल्याने एक टॅकर एका घरासाठी दिला जातो. काही लोक टॅकरच्या पाण्याचा तरणतलावात वापर करतात. हे देखिल मी पाहिले आहे. येथे सर्वांनी सांगितले की, मोटरने पाणी खेचावे लागते. जर टाकीमध्ये पाणी टाकले तर त्याने विजेचा खर्च वाचेल व सर्वांना पाणीही मिळेल. ही कारणे बघितली तर ज्यावेळी आयुक्तांनी १० दिवसांसाठी टॅकरचे पाणी बंद केले होते त्यावेळी कॅम्प नं. ५ येथून जे ८० ते १०० टॅकर जायचे त्यापैकी १४ टॅकरही गेले नाहीत. तेथे टॅकरवाले उभे होते आणि लोकांची वाट बघत होते, परंतु कुणी गेले नाही, फक्त झोपडपट्टीचे लोक गेले होते व त्यांनी पाणी घेतले होते. मी असे म्हणत नाही की, इमारतींमध्ये टंचाई नाही. काही इमारतींमध्ये टंचाई आहे, परंतु काही लोक पाणी फुकट मिळत असल्याने गैरवापर करीत आहेत. मराठीमध्ये एक म्हण आहे, ''फुकटचे गावले आणि बाप, लेक धावले''. फुकट मिळाले तर बाप व मुलगा दोघे पळतात. फुकट मिळाले तर आपल्या प्रभागात २५—२५ टॅकर देखिल घेवुन जातील.

मा. महापौर :— मला देखिल एक कथा आठवत आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणु इच्छितो की जेथे जेथे टाकीच्या ठिकाणी बुस्टर आहेत तेथे ठेकेदारी तत्वावर लोक ठेवले आहेत. त्यांना काढुन टाकले व आपल्या महापालिकेचे लोक तेथे ठेवले तर ते सर्वांना समान पाणी दयावे लागेल. याकरता पुढील वेळी ठेका न काढता तो रद्द करुन

आपल्या नगरपालिकेतील लोक जे बसुन असतात, तुम्ही कोणत्याही कार्यालयात जा, तर चार–चार शिपाई बसल्याचे दिसुन येते. त्यांना तेथे पाठवा. चार–चार शिपायांची आवश्यकता नाही. येथे फक्त महिला शिपायांना ठेवा व बाकी पुरुष कर्मचा–यांना पाण्याच्या टाकीवर पाठवा. माझे म्हणणे संपवतांना मी सांगेन की, मराठीत अजुन एक म्हण आहे की ''दाटुन बोल पण रेटुन बोल''. याचा अर्थ चुकीचे असेल तरी ते ओरडुन बोलायचे, समोरच्याला गप्प बसवायचे व आपलेच म्हणणे योग्य आहे असे दाखवायचे. तर आपल्या विरोधी पक्षातील सदस्य देखील असेच करीत आहेत. त्यांचे हे कामच आहे. चांगले केले तरी विरोधी पक्ष आहे म्हणुन विरोध करणार. तुम्ही त्यांच्याकडे लक्ष देवु नका. तुम्ही तुमचे काम चालु ठेवा. मला बोलण्याची संधी दिली याबद्दल मी आपला आभारी आहे, तसेच आपण लोकांनीही ऐकुन घेतले याबद्दल देखिल आपला आभारी आहे. जय भिम।

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– मा.महापौर महोदया, यांचे बोलणे पुर्ण झाल्यावर आपण नगरसेवकाचे नाव विचारणार होतात.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :– जर सन्माननिय सदस्यांना नगरसेवकांचे नाव हवे असेल तर ज्याच्या प्रभागात १५ पेक्षा जास्त टॅंकर जातात, त्यांची यादी आमचे श्री. लाल पंजाबी सांगतील.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:–यांचे म्हणणे असे होते की, ते नगरसेवक त्यांना जाणुनबुजुन पाणी देतात, कारण त्यांचा त्यामध्ये रस आहे. तुम्ही यादी काढा, यांचे म्हणणे आहे की, ज्या प्रभागात १५ पेक्षा जास्त टॅंकर जातात, त्या प्रभागातील नगरसेवकाचा काहीतरी हेतु आहे. तो काय हेतु आहे ते यांनी सांगावे. महापौर महोदया, हे स्पष्ट व्हायला हवे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– मा. महापौर महोदया, आपल्या सत्ताधारी पक्षातील सदस्यांच्या प्रभागांमध्ये ४ महिन्यात ५४७६ टॅंकर गेलेले आहेत व इतर प्रभागात १०० टॅंकर गेलेले आहेत. तर यामध्ये सत्ताधारी पक्षातील कोणते नगरसेवक सामिल आहेत, त्यांची नावे सांगावे. आम्ही तुम्हांला यादी दिली आहे, तुम्ही नांवे सांगावी.

मा. महापौर :– तुम्ही जी यादी दिली आहे, त्याची चौकशी करण्यासाठी मी आयुक्तांना निर्देश देत आहे. कोणाच्या वार्डात आधी किती टॅंकर जायचे, टॅंकर बंद झाल्यानंतर किती जायचे व आता किती जात आहेत याची चौकशी करण्यात यावी. जर एखादया नगरसेवकाचा हात यामध्ये आढळून आल्यास आयुक्त साहेब त्याची चौकशी करतील.

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी, श्री. मनोज साधवानी, श्री. संजय बठिजा यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– जर एखादया नगरसेवकाचा हात यामध्ये आढळून आल्यास आपण काय कारवाई कराल? जर अशी प्रथा सुरु झाली तर आम्ही देखिल काहीही विधान करु.

मा. महापौर :– आपले म्हणणे आहे की, सत्तापक्षाच्या प्रभागांमध्ये जास्त टॅंकर जात आहेत.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– जास्तीत जास्त टॅंकर सत्तापक्षाच्या प्रभागात जात आहेत.

मा. महापौर :– ठिक आहे. आयुक्त साहेब याची चौकशी करुन पुढील वेळी अहवाल देतील.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– याचा अर्थ येथे कोणीही काहीही विधान केले तरी चालेल का? यामध्ये नगरसेवकाचा कुहेतु आहे असे ते म्हणाले.

मा. महापौर :– ते कुहेतु असु शकेल असे म्हणाले.
मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– कुहेतु आहे असे ते म्हणाले.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :– हे सत्य आहे मी सिध्द करुन दाखवु शकतो.

मा. महापौर :– तसे असेल तर तुम्ही सिध्द करुन दाखवा.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :– मा. महापौरजी, आधीच आमच्या प्रभागात पाण्याची टंचाई आहे, आणि हा माणुस काहीही माहिती नसतांना काहीही विधान करेल तर आम्ही ऐकुन घेवु का? अशा प्रकारे चुकीचे आरोप लावल्यास आम्ही ऐकुन घेणार नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– श्री. शांताराम निकम यांनी ज्या प्रकारे आरोप केला आहे, याकरीता मी ज्या प्रभागात १५ पेक्षा जास्त टॅंकर जातात त्या प्रभागाचे नाव व नगरसेवकाचे नाव आता येथे सांगण्यास तयार आहे. हा एक गंभीर आरोप आहे. पॅनल नं. २३ मध्ये जानेवारी महिन्यात १०७, फेब्रुवारी महिन्यात १३९, मार्च मध्ये १५१, एप्रिल मध्ये ९९, व मे महिन्यात ९८ टॅंकर गेले आहेत. आपले उप–महापौर देखिल त्या पॅनल मधुन सदस्य आहेत. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे देखिल आहेत. तिस–या डॉ. नाथानी या आहेत. अशा प्रकारे गंभीर आरोप करायला नको. आम्ही विरोधी पक्षातील सदस्य देखिल करीत नाहीत. तुम्ही अशा प्रकारे स्वत:च्या सदस्यांवरच आरोप लावत आहात. ही जी यादी आहे ही महापालिकेने बनविली आहे आम्ही बनविलेली नाही. महापालिकेच्या अधिका–यांनी बनविली आहे, आम्ही फक्त तीची प्रत घेतली आहे. पॅनल नं. १८ मध्ये श्री. अशोक ठाकुर, श्री. गौतम भालेराव व श्रीमती बेबी वसिटा हे सदस्य आहेत. हे तिन्ही नगरसेवक देखिल आपल्या युतीचे नगरसेवक आहेत. त्यानंतर पॅनल नं. २० मध्ये जानेवारी महिन्यात ११५, फेब्रुवारीमध्ये ३०५, मार्च मध्ये ३२७, एप्रिल मध्ये १९९ व मे मध्ये २९८ टॅंकर म्हणजेच जवळपास ३०० टॅंकर गेले आहेत. यामध्ये देखिल श्री. मनोज साधवानी, श्री. नारायण पंजाबी व श्रीमती दिपा पंजाबी हे सदस्य आपलेच आहेत. मी अजुन देखील सांगु शकतो. ही यादी फार मोठी आहे. अशाप्रकारेच पॅनल नं. १९,२५,२४ हे देखिल आहेत. श्री. विनोद तलरेजाजी आपण टॅंकर विकता का?

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. विनोद ठाकुर हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :– हे जे टॅंकर मागवत आहेत, यांची चौकशी करा. हे खरोखर टॅंकर मागवतात अथवा नाही हे देखील पहा. जर सत्ताधारी पक्षातील सदस्यच टॅंकरमध्ये भ्रष्टाचार करीत असतील तर यांच्यावर कारवाई करायला हवी. दुस–यावर आरोप लावण्यापुर्वी स्वत:कडे बघा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–महापौरजी, यामध्ये उप–महापौरजींचा प्रभाग देखील येतो. सत्ताधारी पक्षातील सदस्य उप–महापौरांवरच आरोप लावत आहेत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– मा. महापौर महोदया, याची चौकशी करायला हवी. सत्ताधारी पक्षाच्या नगसेवकाने हा आरोप लावला आहे. हे खरे असेल तर जेवढा खर्च झाला आहे तेवढा खर्च संबंधीत नगरसेवकांकडुन वसुल करायला हवा.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–श्री. जमनुजी हे सत्ताधारी पक्षातील सदस्यांबद्दल बोलत आहेत जर यामध्ये विरोधी पक्षातील सदस्य असतील तर काय करणार?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– विरोधी पक्ष देखील भरण्यास तयार आहे. जर अधिका–याने लिहुन दिले की, टॅंकर चुकीच्या पध्दतीने गेले आहेत तर पुर्ण पैसे संबंधीत नगरसेवकांकडुन घेतले जावेत. अन्यथा पुढील महासभेत त्याचा अहवाल ठेवला जावा की, टॅंकर योग्य पध्दतीने गेले अथवा नाही.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– मा. महापौरजी, मला असे वाटते की, उल्हासनगरमधील जनतेला फक्त पाणी हवे आहे. आरोप व प्रत्यारोप करुन त्यांना पाणी मिळणार नाही. असे करण्याऐवजी ज्या प्रभागात पाणी मिळत नाही त्या प्रभागात पाणी मिळण्याची व्यवस्था केली जावी.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :– आमचे म्हणणे देखील हेच आहे की जेथे पाणी मिळत नाही तेथे पाणी मिळायला हवे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मा. महापौरजी आमचे सन्माननिय सदस्य श्री. रमेश चव्हाण हे म्हणत आहेत की आम्ही आरोप केलेला नाही. ते आरोप करतील तरी कसे? त्यांना आरोप करण्याची गरज देखील नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— ते श्री. देवेंद्रसिंह खेमाणी यांच्या प्रश्नाला उत्तर देत होते.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौर महोदया त्यांना नाव सांगण्याबददल आदेश दया. त्यांच्याकडे पुरावा असेल तर सर्वांसमोर सादर करायला हवा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— हा कोण माणुस आहे? कॅमेरा घेवुन रेकॉडींग करीत आहे.

मा.महापौर :—त्यांनी परवानगी घेतली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— चॅनल अधिकृत आहे का?
मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— परवानगी कोणी दिली आहे?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— चित्रीकरण करण्यासाठी ते चॅनल शासनाने अधिकृत केलेले आहे का?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—आम्हांला यांनी दिलेल्या अर्जाची व परवानगीची प्रत हवी आहे.

मा. महापौर :— आपणांस प्रत देण्यात येईल. पाण्यासारखा महत्वाचा विषय सुरु आहे. वेळ वाया घालवु नका.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. महापौर महोदया म्हणत आहेत की, पाण्यासारखा महत्वाचा विषय आहे, आणि आपला नगरसेवक म्हणत आहे की हे सर्व खोटे आहे. हा कुठला न्याय आहे.

मा. महापौर :— शांतारामजी आपण आपला आरोप सिध्द करणार असाल तर पुरावा दया. अन्यथा आपले शब्द मागे घ्या.
मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मी माझे शब्द मागे घेणार नाही. मी आरोप सिध्द करुन दाखवितो. मा. महापौरजी मी असे म्हणालो की, काही सन्माननिय सदस्यांचा टॅंकर लॉबीमध्ये व टॅंकर पुरविण्यामध्ये रस आहे. हेच शब्द मागे घेण्यासाठी तुम्ही मला बोलत आहात, परंतु ते मी मागे घेणार नाही. मी त्याचे कारण सांगतो की, माझा असा दावा आहे की, प्रत्येक नगसेवकाचा आपल्या प्रभागातील लोकांना जास्तीत जास्त प्रकारे खुश कसे करता येईल यामध्ये रस असतो. जर त्याने अशाप्रकारे काम केले नाही तर त्याला पुढील वेळी निवडणुक लढण्याचा देखील हक्क नाही. मी असे म्हणालो की, मतदारांना खुश करण्यासाठी त्यांचा हेतु आहे. यासाठी आवश्यकता नसतांना सुध्दा ते जास्तीत जास्त पाणी पाठवितात. हे मी सिध्द करु शकतो कारण त्या सदस्यांची माणसे पाणी पुरवठयाच्या ठिकाणी जातात. आमची माणसे तेथे नसतात त्यामुळे आमचा क्रमांक मागे करतात व त्यांच्या प्रभागात सतत टॅंकर जातात. याचा अर्थ काय आहे? याचा अर्थ आपल्या प्रभागात जास्त टॅंकर पाठवितात.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौर महोदया, कोणत्या नगरसेवकाचा माणुस जावुन तेथे दादागिरी करतो हे त्यांना आताच्या आता विचारा. यांच्याकडे तशी तक्रार आहे का?

मा. सदस्य श्री. शांताराम निकम:—मा. महापौरजी, सर्वांना माहिती आहे की, कुणाची माणसे जातात. श्री. रमेश चव्हाण आपल्याला सुध्दा माहिती आहे. मी आयुक्तांना सांगु इच्छितो की, उदयापासुन अशाप्रकारे तेथे माणसे दिसल्यास आपण त्यांच्या विरुध्द एफआयआर दाखल करायला हवा. अशी मी येथे मागणी करत आहे. नगरसेवकाने देखील तेथे जायला नको. जर तुम्ही वेळापत्रक बनवुन दिले असेल तर त्याप्रमाणे टॅंकर जायला हवे. त्याप्रमाणेच टॅंकर जातात परंतु यांची माणसे तेथे जावुन दादागिरी करुन आधी टॅंकर घेवुन जातात व आपापल्या प्रभागात पाणी देतात. त्यांनतर झोपडपट्टीतील लोक मेले तरी चालतील. आयुक्तांना मी मागणी करतो की, उदयापासुन त्यांनी अशा लोकांवर एफआयआर दाखल करायला हवा. आपणांस देखील माहित आहे की, आम्ही नेहमी हे सांगत असतो. ब— याचशा नगरसेवकांची माणसे जावुन सकाळपासुन तेथे बसलेले असतात.

**मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :—** अनेक वेळा महासभेमध्ये सांगितले आहे की, टॅकरने पाणी पुरवठा केल्याने लोकांना त्रास होतो, त्यांना पाणी भरतांना त्रास होतो. टॅकर बंद करायचे सोडुन कोणता नगरसेवक स्वतःच्या प्रभागात टॅकरने पाणी पुरवठा चालु ठेवेल. हे चुकीचे आहे. कुणीही नगरसेवक स्वतःच्या प्रभागात टॅकर वाढविण्याचा प्रयत्न करणार नाही. कारण नळाला पाणी आले तर लोकांना त्रास होणार नाही. नळांना पाणी येत नाही म्हणुन तो टॅकरची मागणी करतो व प्रभागात पाणी पुरवठा करतो. दुसरी गोष्ट अशी की, टॅकरची मागणी केल्यानंतर अनेकवेळा योग्य वेळेवर टॅकर उपलब्ध होत नाही. लोकांना पाण्याची समस्या असते. एकेक, दोनदोन दिवस टॅकर येत नाही. अधिका—यांना सांगुन देखिल येत नाही कारण टॅकरच्या चालकांची तेथे लॉबी झालेली आहे. हे म्हणतात की, नगरसेवकांचा माणुस तेथे असतो. अडचण असेल तर माणुस तेथे जाणारच. माणसांना पाणी मिळाले नाही तर टॅकरसाठी माणुस तेथे पाठवावाच लागेल. अधिका—यांना सांगुनही टॅकर वेळेवर येत नसेल दोन—दोन तीन—तीन दिवस येत नसेल, तुम्ही अधिका—यांना विचारु शकता. अशा वेळी नगरसेवक माणसे पाठविणार नाही तर काय करणार? टॅकरच्या पॉइंटवर गेले तरच टॅकर येतो अन्यथा येत नाही. अनेक वेळा असे आमच्या निदर्शनास आले आहे. येथे ब—याच लोकांनी सांगितले की, आता पाण्याची समस्या नाही. परंतु समस्या आहे, हे सर्व अधिका—यांना माहिती आहे. समस्या काय आहे याची वेळोवेळी महासभेत चर्चा झालेली असतांना सुध्दा त्यांच्या प्रभागात पाणी समस्या कमी झाली असेल तर त्यांचे म्हणणे असे आहे की, पाणी समस्या कुठेच नाही असे नाही. ब—याच विभागात अजुनही पाणी समस्या आहे. अनेक वेळा मोर्चे काढले आहे, तक्रारी केल्या आहेत. अनेक वेळा उपोषणे झालेली आहेत. पॅनल नं १७ व १८ मध्ये शेवटचे टोक आहे म्हणुन पाणी पुरवठा होत नाही असे उत्तर तक्रार केल्यानंतर मिळते. परंतु आज जलवाहिन्या नसल्याने, असमान वितरण असल्याने पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही असे अधिका—यांचे म्हणणे आहे. आज काही ठिकाणी जलवाहिन्या टाकण्याचे काम सुरु आहे, परंतु अधिका—याचे तेथे नियोजन अथवा लक्ष नाही. पॅनल नं. १७ येथिल महादेव नगर म्हणुन विभाग आहे, तेथे जलवाहिनी टाकत आहेत. ती जलवाहिनी उतारा कडुन चढावाकडे जात आहे. परंतु मध्येच जलवाहिन्यांचा अडथळा आहे. हे वेळोवेळी निदर्शनास आणुन सुध्दा ठेकेदार काम तसेच सुरु ठेवत आहे. समोरची लाईन बुजवुन टाकली मी विचारल्यावर अधिका—याने सांगितले की ती बंद केली आहे. तुम्ही जर अशा प्रकारे व्यवस्थित देखरेख न केल्यास असेच होणार आहे. समान वितरण कधी होणार आहे हे देवच जाणे.मला असे वाटत नाही की उल्हासनगरमध्ये कधी समान वितरण होईल. परंतु तसा प्रयत्न करणे हा एक महत्वाचा भाग आहे व तो करुन पाण्याची समस्या दुर होईल असे म्हणायला काही हरकत नाही.

**मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :—** मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता व सन्माननिय सदस्य माझी आपणांस विनती आहे की, मी आता सभेत आपणांस जी माहिती देणार आहे पाणी पुरवठा विभागाचा सभापती म्हणुन मी फक्त ५ ते ७ मिनिटे घेणार आहे. तरी कृपया लक्षपुर्वक ऐकावे. आज या सभेत चर्चेचा मुद्दा असायला हवा आणि तो म्हणजे पाण्याच्या कमतरतेचा मुद्दा नसुन पाण्याचे समान वितरण कसे करायचे हा मुद्दा असायला हवा. आज आपल्या शहरात बरेच विभाग आहे जेथे नळाद्वारे पाणी न देता आपण टॅकरने पाणी देत आहोत. आपल्या चर्चेचा मुद्दा हा असायला हवा की, आपण कशाप्रकारे टॅकर बंद करुन त्यांना नळाने पाणी देवु शकतो. आज ही जी महासभा बोलावीली आहे तर मला सांगतांना फार दुःख वाटते की, अशा प्रकारची महासभा आपण तीन महिन्यांपुर्वी बोलवायला हवी होती. ज्यावेळी कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची खरोखर समस्या होती. मला लक्षात आहे की, २८ फेब्रुवारीला मी होतो, श्री. विनोद ठाकुर होते, श्री. सतरामदास जेसवानी होते आम्ही सर्व एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता श्री. नागे यांना भेटलो होतो. कारण त्यांनी अचानक आपल्या शहराला होणा—या पाणी पुरवठयाचा दाब कमी केला होता. आपणांस नियमित दाबाने जे ४.५० दाबाने पाणी मिळायचे ते त्यावेळी आपणांस ३—३.१० ने मिळत होते. आम्ही त्यांच्याकडे गेलो व त्यांना विनंती केली की, आमच्या शहरात विशेषतः कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची समस्या आहे तर आपण तिकडे लक्ष दयावे. आमच्या महापौरांनी देखील दुरध्वनीवर त्यांच्याशी ब—याचवेळा चर्चा केली होती. परंतु दुर्भाग्याने त्यांच्याकडुन ज्याप्रकारचे सहकार्य मिळायला हवे होते ते मिळाले नाही. त्यानंतर २४ मार्चला आम्ही येथुन सर्वजण त्यामध्ये महापौर, उपमहापौर श्री. विनोद तलरेजा, सभागृह नेता व इतर सदस्य अंधेरीला श्री. सत्रे यांच्याकडे गेलो होतो. त्यांच्याशी आम्ही चर्चा केली. आमचे आमदार श्री. पप्पु कालानी यांनी दुरध्वनीवर त्यांच्याशी चर्चा देखील केली होती. व त्यांना असे निर्देश दिले की, श्री. नागे यांना कॅम्प नं. ४ व ५ ची पाणी समस्या दुर करण्यासाठी योग्य ती कारवाई करण्याबाबत निर्देश दिले. ते आमचे कार्यकारी अभियंता श्री. सावकारे व श्री. नागे यांच्याशी दुरध्वनीवर बोलले. त्या दोघी अभियंत्यांना जागेवर पहाणी करण्याचे निर्देश दिले. पहाणी केल्यांनतर त्यांनी एका ठिकाणी बुस्टर पंप बसविण्याबाबत सांगितले. यासाठी जवळपास रुपये ५५ लक्ष एवढा खर्च व त्या बुस्टर पंपचे विदयुत देयक रुपये ४५ लक्ष प्रतिवर्ष खर्च येईल असे सांगितले. आपल्या महापालिकेची स्थिती अशी नाही की आपण हे काम करु शकु. आम्ही आमच्या महापौर व आमदारांना यावर मार्ग

काढण्यासाठी विनंती केली. यावर एक पर्यायी मार्ग काढण्यासाठी आम्ही आमच्या आयुक्तांशी व कार्यकारी अभियंत्यांशी चर्चा केली. पाले येथिल एमजेपीच्या जलवाहिनीचे जे काम बाकी आहे, जर ते काम आपण लवकरात लवकर पुर्ण केले तर कॅम्प नं. ४ व ५ ची समस्या दूर होवु शकते. यासाठी आमचे महापौर, उप–महापौर व सर्व सदस्य यासाठी कामास लागले. आम्ही त्या गाववाल्यांशी संपर्क केला. गाववाल्यांचे असे म्हणणे होते की, आम्ही तुम्हांला जागा उपलब्ध करुन दिली तर त्याबदल्यात तुम्हांला आमच्या लोकांना महापालिकेत नोकरी दयावी लागेल. आपणांस माहिती असेल की, पुढील महासभेतच आम्ही तसा प्रस्ताव पास केला होता. २८ मे ला महापालिकेमध्ये आमचे आमदार श्री. पप्पु कालानी, श्री. किसन कथोरे यांच्या नेतृत्वाखाली आयुक्तांकडे बैठक झाली. ज्यामध्ये त्या गाववाल्यांना बोलविण्यात आले होते व त्यांनी मान्य केले आहे की जर महापालिकेने लेखी लिहून दिले व आमच्या लोकांना महापालिकेत नोकरी दिली तर त्याठिकाणी आम्ही आपणांस जलवाहिनीचे काम करु देवु. मला याठिकाणी सांगण्यास आनंद होत आहे की, ते प्रकरण सध्या ठाणे येथे भुमी संपादन कार्यालयात आहे. तेथुन एका आठवडयाच्या आत तो प्रस्ताव मंजुर होवुन येईल. त्यानंतर या कामाला जास्तीत जास्त एक महिना लागेल. ते काम झाल्यावर आपणांस या विषयावर चर्चा करण्याची काही आवश्यकता राहणार नाही. हे मी विशेषत: कॅम्प नं. ४ व ५ येथिल लोकांना सांगु इच्छितो. आमचे अशा प्रकारे काम सुरु आहे. त्या सोबत आपल्यासाठी अजुन एक चांगली गोष्ट झाली ती म्हणजे एमआयडीसीचे अधिकारी श्री. नागे हे आपली जी दिशाभुल करीत होते त्यांची बदली झाली आहे. त्यानंतर तेथे श्री. नेरे म्हणुन कार्यकारी अभियंता आले आहेत. त्यांच्या सोबत माझी चर्चा झाली आहे. आपणांस ही माहिती देतांना आनंद होत आहे की ते आल्यानंतर व त्यांच्याशी चर्चा झाल्यानंतर पाण्याचा दाब जो आधी ३.१० किंवा ३.२० असायचा तोच दाब आज ४ पर्यंत पोहोचला आहे. एवढाही पुरेसा नाही आपणांस कमीत कमी ४.५० एवढा दाब आवश्यक आहे. श्री. नागे यांची बदली झाल्यानंतर आपल्याला मिळणा–या पाण्याच्या दाबात वाढ झाली आहे. दुसरे म्हणजे त्याच बरोबर आपण पाले येथे काम करणार आहोत. त्या कामाच्या मागे आमचे आयुक्त साहेब लागले आहेत व आपले पाणी पुरवठा विभागाचे जे कार्यकारी अभियंता आहे त्यांचेही पुर्ण सहकार्य लाभत आहे. मला आनंद वाटत आहे की, आमच्या विरोधी पक्षातील सदस्यांनी देखील त्यांची प्रशंसा केली आहे. काही विभागात पाणी जात नाही हे मान्य आहे परंतु तेथे टॅकरद्वारे पाणी पुरवठा होत आहे. आपणांस तेथिल टॅकर बंद करुन नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. आता आपले सदस्य श्री. लाल पंजाबी हे बोलले की, निधीच्या कमतरतेमुळे बरीचशी प्राकलने मंजुर होवुन देखील काम सुरु करता आले नाही. मी आयुक्तांना विनंती करीन की, पाणी पुरवठा विभागाची जी प्राकलने आहेत त्यांना प्राथम्य दयावे. येथिल सर्व सदस्यांना देखील माझी विनंती राहील की आपल्या प्रभागात पाण्याची समस्या असेल तर आपण बाकीची कामे बाजुला सारुन पाण्याच्या समस्येला प्राथम्य दयावे. जर आपण आपला नगरसेवक निधी दिला तर ती कामे त्वरीत करता येतील. मी आयुक्तांना ही विनंती करीन की, एक आठवडयापुर्वी माझी आयुक्तां समवेत चर्चा झाली होती की आपल्या शहरात ब–याच व्यक्तींकडे पाण्याची बिलाची थकबाकी आहे. आपणांस आकडे मोठे मोठे दिसतात. संगणकामध्ये ब–याच व्यक्तींकडे मोठी–मोठी थकबाकी असल्याचे आकडे दिसुन येतात. कोणाला बिगर घरगुती दराने पाणी पट्टी देण्यात येते. परंतु प्रत्यक्षात इमारतीचे काम पुर्ण होवुन ५ वर्ष झाल्यानंतर देखील लोकांना त्याच दराने पाणी पुरवठा होत आहे. २००१ पासुन त्याच लोकांना मालमत्ता करासोबत पाण्याचेही देयक देण्यात येत आहे व बिगर घरगुती दराने देखिल देयक देण्यात येत आहे. आपल्या शहरातील लोकांना ही मोठी समस्या आहे. ही समस्या दुर करायला हवी तसेच ब–याचशा लोकांकडे थकबाकी आहे, त्यांच्याकडे पाणी येत नाही व ते महापालिकेत अर्ज करत असतात. आपण एक योजना सुरु करायला हवी ज्यामध्ये लोकांचा विलंब शुल्क आकार रद्द करुन वसुली करायला हवी. यामधुन जी वसुली होईल तो निधी जेथे–जेथे जलवाहिन्या टाकायच्या आहेत त्याच ठिकाणी वापरण्यात यावा. असे केल्यास आपण वेगाने काम करु शकतो. ही माहिती देणे मला उचित वाटले. आता मी आपणा सर्वांना व आयुक्तांना विनंती करीन की, पाणी पुरवठा विभागाचे जे प्राकलने आहेत व ज्या नगरसेवकांनी येथे तक्रार केली आहे त्यांनी पाणी पुरवठयासाठी आपला नगरसेवक निधी दिल्यास त्यांचे काम त्वरीत करण्यात यावे. संबंधीत अधिकारी मग त्यामध्ये येथिल कनिष्ठ अभियंता देखील आहे त्यांनी प्रभागात काय समस्या आहेत हे व्यासपिठावर येवुन सांगितले तर आम्हांस आनंद होईल. आयुक्तांऐवजी जे नगरसेवकांशी संबंधीत आहेत, जे नगरसेवक येथे बोलत आहेत की, आमच्या प्रभागात पाणी समस्या आहे त्यांच्या प्रभागातील कनिष्ठ अभियंता येथे येवुन बोलले तर सभागृहासमोर वास्तविकता येवु शकते. असे बोलुन मी माझे बोलणे संपवितो धन्यवाद.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर, श्री. मोहन साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :–** मा. महापौर महोदया, पाण्याचा विषय हा गंभीर विषय आहे. फक्त उल्हासनगरचा हा प्रश्न नाही पुर्ण जगात हा चिंतेचा विषय आहे. आज आपण टीव्ही वर, वर्तमानपत्रांमध्ये बघतो हा एक महत्वपुर्ण विषय म्हणुन पुर्ण जगासमोर आहे. परंतु ज्या प्रकारे या सभागृहात चर्चा सुरु आहे ते ऐकुन फार दु:ख वाटते की, या विषयातील गांर्भीर्य कोठेतरी दुखावले गेले आहे असे माझे वैयक्तीक मत आहे. कोणी उठुन मध्ये बोलण्यापुर्वी सांगतो की, हे माझे वैयक्तीक मत आहे. समस्येच्या गांभीर्याला कुठेतरी धक्का लागला आहे. या शहरात १०–१२ वर्ष मी पत्रकारीता केली असून ३ वर्षांपासुन नगरसेवक म्हणुन काम करीत आहे. या विभागातील पाणी पुरवठा विभागाची काम करण्याची पध्दत जवळुन पाहण्याची संधी मला प्राप्त झाली आहे. या विभागाबद्दल माझे पहिले निरिक्षण असे आहे की, उल्हासनगर मधील पाणी समस्या दुर करण्यासाठी कोणत्याही प्रकारची दिशा नाही. दिशाहिन प्रयत्न केले जात आहेत याचे कारण म्हणजे या सभागृहात सर्व सदस्यांना त्यामध्ये मी ही आहे आपापल्या प्रभागाची चिंता लागली आहे. आपल्या समोर एकच समस्या आहे, आपल्या समोर शहराची समस्या नाही. आपल्या समोर आज प्रामुख्याने कोणती समस्या असेल तर ती माझ्या प्रभागाची आहे. शहराची समस्या माझ्या डोळयासमोर नाही. मला असे वाटते की, या शहराच्या समस्या सोडविण्यासाठी जे प्रयत्न केले जात आहे त्यामध्ये पहिली अडचण येथेच निर्माण होते. जेव्हा मी पत्रकारीता करीत होतो त्यावेळी कल्याण–डोंबिवली महापालिकेतील एक महासभा बघत होतो. त्या महासभेत पाण्याच्या दरांबाबत चर्चा सुरु होती. बरेचसे नगरसेवक दरवाढीला विरोध करीत होते की प्रशासन पाण्याचे दर फार वाढवत आहेत व आम्ही याचा विरोध करीत आहोत. तर त्यावेळचे आयुक्त श्री. श्रीकांत सिंह यांनी सभागृहात सर्व माहिती दिली होती की जगात पाण्याची काय स्थिती आहे, भारतात काय स्थिती आहे व आपल्या शेजारीपाजारी काय स्थिती आहे त्यावेळी त्यांनी एक इशारा दिला होता की, आज आपण येथे पाण्याच्या दरवाढीला विरोध करीत आहात परंतु एक दिवस असा येईल की लोक खिश्यात पैसे घेवुन फिरतील परंतु त्यांना खरेदी करण्यासाठी पाणी उपलब्ध होणार नाही. ही अशी समस्या आहे, सर्व जगात या समस्येवर चिंतन सुरु आहे. आम्ही मागील आठवडयात राजस्थान येथे गेलो होतो. तेथे एका पोस्टरवर मी घोषवाक्य वाचले की, ''पाण्याला पाण्याप्रमाणे वाया न घालविता याला पैश्याप्रमाणे वाचवा.'' या घोषवाक्यावरुन आपणांस पाण्याचे महत्व लक्षात येते. परंतु ज्यावेळी आम्ही उल्हासनगर महापालिकेतील पाणी पुरवठा विभागाचा कारभार जवळुन पाहतो की, कश्या उपाययोजना केल्या जात आहेत. तेव्हा त्यात कोणत्याही प्रकारची दिशा अथवा झोनिंग पध्दत असल्याचे दिसुन येत नाही. एक दिड वर्षापुर्वी आयुक्त साहेबांनी एक श्वेतपत्रिका प्रसिध्द केली होती. त्या श्वेतपत्रिकेमध्ये त्यांनी उल्हानगरमध्ये पाण्याची समस्या नेमकी काय आहे, याचे मुळे कुठे आहे, येथे टॅकरचा खर्च एवढा का आहे? लोकांवर किती भुर्दंड पडतो, लोक मोटार का लावतात? त्यामध्ये संपुर्ण विवरण दिले होते. कोण–कोणत्या विभागात पाण्याची टंचाई आहे त्या विभागांची नावे दिली होती. कोणत्या विभागात आम्ही प्रश्न सोडविणार आहोत, व कोणत्या विभागात आम्ही प्रश्न सोडविला आहे हे देखिल दिले होते. जर मागील दिड–दोन वर्षात आपण श्वेतपत्रिकेला समोर ठेवुन प्राकलने पास केली असते, जलवाहिन्या टाकल्या असत्या तर कदाचित फेब्रुवारी, मार्च व मे महिन्यात देखील आपणांस पाणी टंचाईचा सामना करावा लागला नसता. परंतु असा प्रयत्न येथे केला जात नाही. मी असे पाहिले आहे की, चेहरे बघुन प्राकलने मंजुर केले जातात. सार्वजनिक बांधकाम विभागाबद्दल देखील मी जेव्हा चर्चा करतो तेव्हा माझा प्रशासनावर असा आरोप आहे की, आवश्यकतेचा निकष नेहमी मागे ठेवला जातो व चेह–याला जास्त महत्व दिले जाते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्राकलनाबाबत जे होते तेच पाणी पुरवठा विभागाच्या प्राकलनाबाबत देखील होत आहे. चेहरे बघुन प्राकलने मंजुर केली जातात. कामाची आवश्यकता, त्या विभागातील गरज याकडे लक्ष दिले जात नाही. काम करण्याची कशी पध्दत आहे याचे मी आपणांस एक उदाहरण देतो, माझ्या प्रभागात पाच दुकाने आहेत त्याच्या मागे कधीही पाण्याची टंचाई नव्हती परंतु अचानक काही दिवसापासुन तेथे टंचाई निर्माण झाली आहे. याबद्दल मी संबंधीत विभागात विचारणा केली की, याठिकाणी कधीही पाण्याची टंचाई नव्हती तर आता कशी काय निर्माण झाली आहे? त्यांनी मला सांगितले की, तेथे नविन जलवाहिनी टाकल्याने पाणी समस्या निर्माण झाली आहे. ही कोणती कार्यपध्दती आहे? जर एका विभागात जलवाहिनी टाकल्याने दुस–या विभागात पाणी टंचाई होत असेल तर हा उपाय होवु शकत नाही. जेव्हा मी प्रभागाचा व गल्लीचा उल्लेख करतो तेव्हा हे एक उदाहरण आहे, मी स्वत: ज्या विभागात राहतो तेथे १९९९ मध्ये पाण्याचा गंभीर प्रश्न होता. ४ इंचाची जलवाहिनी आहे, तिला कनेक्शन देण्यासाठी मी त्यावेळचे आयुक्त श्री. शिंदे साहेब यांच्यासोबत प्रयत्न केला त्यावेळी श्री. हरदास माखिजा हे महापौर होते, श्री. धनंजय बोडारे हे उपमहापौर होते. यांचे सहकार्य त्यावेळी प्राप्त झाले होते. त्या ४ इंचाच्या जलवाहिनीला एक २ इंचाची जलवाहिनी जोडण्यात आली होती. त्यामुळे संपुर्ण शेवटच्या टोकाला पाण्याचा प्रश्न सुटला होता. आज आपल्या विभागाने त्या २ इंचाच्या जलवाहिनीवर एक–एक करुन खुप जोडण्या दिल्या आहेत त्यामुळे त्या २ इंचाच्या जलवाहिनीचे पाणी देखिल बंद झाले आहे. अशा प्रकारे या शहरात आपण मार्ग काढत राहिलो तर मला असे वाटत नाही की, येत्या १०–२०–५० वर्षात या शहरातील पाणी प्रश्न सुटु शकेल. आपण जी चर्चा करीत

आहोत ती तेथेच राहिल. माझ्या विभागात प्रभाग समितीच्या निधितून मी सिंटेक्सच्या दोन टाक्या मंजुर केल्या होत्या. त्यापैकी एक टाकी लागली व दुसरी टाकी लागली नाही. मला ब–याच वेळा आश्चर्य वाटते की, लोकांची मानसिकता नेमकी असते तरी काय? ज्या ठिकाणी मला टाकी बसवायची होती त्या विभागातील लोकांनी येवुन मला सांगितले की, आमच्या विभागात पुष्कळ पाणी आहे, त्यामुळे टाकीची आवश्यकता नाही. लोकांच्या मनात काय असते हे आमच्या लक्षात येत नाही. मला असे वाटते की, या मुद्दयावर आधी प्रशासनाच्या निवदेनाने सुरुवात व्हायला हवी होती. प्रशासनाने उभे राहुन माहिती दयायला हवी होती. कारण विरोधी पक्ष जेव्हा विशेष महासभा बोलवितो, तेव्हा यामध्ये राजकारण आहे असा आरोप होवु शकतो. परंतु प्रशासनाची जबाबदारी आहे की, त्यांनी तटस्थपणे येथे माहिती दयायला हवी. त्यांनी व्यासपिठावर उभे राहुन हिंमतीने सांगायला हवे होते की, आपल्या प्रभागात पाणी समस्या नाही आपण खाली बसा. आपल्या प्रभागात पाणी समस्या आहे ती आम्ही सोडवुन देवु. जोपर्यंत अधिका–यांमध्ये हे साहस येत नाही तोपर्यंत आपणांस अशा आरोपांचा सामना करावाच लागेल. सभेची सुरुवातच त्याने व्हायला हवी होती. आधी प्रशासनाने निवेदन करायला हवे होते की, मागील दोन महिन्यात पाण्याची परिस्थिती काय होती, प्रश्न काय होता. आज जेव्हा ४ के.जी. एवढया दाबाने पाणी मिळत आहे तेव्हा काय स्थिती आहे? ज्या विभागात पाणी टंचाई आहे तेथिल समस्या दुर कशी करणार? जी श्वेतपत्रिका प्रसिध्द केली होती त्याप्रमाणे काम केले असते तर मला असे वाटत नाही की, समस्या राहील. अन्यथा प्रत्येक नगरसवेक, प्रत्येक कार्यकर्ता, माझा विभाग, माझी गल्ली असे करुन पाणी ओढत राहिला, जर मी आज दुस–याच्या प्रभागातुन पाणी खेचले तर उदया दुसरा कोणी नगरसेवक माझ्या प्रभागातुन पाणी खेचु शकतो. जर मी निवडणुकीकडे बघितले, मतदारांकडे बघितले तर येणा–या दिवसात या शहरातील प्रश्न सुटेल असे मला वाटत नाही. जेव्हा मी माझ्या विभागाची समस्या सांगितली, मी उप–अभियंता श्री. सेलवन यांच्याशी बोललो की, टाकीतुन माझ्या प्रभागात जलवाहिनी आली आहे. तेथुन सरळ माझ्या प्रभागात पाणी यायला हवे. परंतु असे का होत नाही हे जेव्हा मी त्यांना विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की, जर आम्ही टाकी भरुन पाणी सोडले तर आपल्या विभागात पाणी व्यवस्थित येईल. परंतु पाणी थेट सोडले तर व्यवस्थित येणार नाही. मी त्यांना सांगितले जर आपणांस उपाय माहित आहे तर आपण तसे का करत नाही? त्यांनी मला सांगितले की, आम्हांला असे करु दिले जात नाही. याचा अर्थ काय आहे? माझ्या प्रभागात कोणाला टॅंकर हवा असेल तर टॅंकर थांबविला जातो. हे सर्व काय चालु आहे? हे जे प्रशासन आहे, पाणी पुरवठयाची जी प्रणाली आहे, ही खरोखरच प्रशासनाच्या हातात आहे काय? प्रशासनाच्या नियंत्रणात आहे का? हे आधी आपण बघा, यावर आत्मचिंतन करा की आपले यावर काही नियंत्रण आहे का? मला असे वाटत नाही, मी जबाबदारीने बोलत आहे माझे निरिक्षण असे आहे की, पाणी पुरवठयाच्या वितरण व्यवस्थेवर आपल्या प्रशासनाचे काहीही नियंत्रण नाही. लोकांना जेथे हवे तेथे जलवाहिन्या घेत आहेत, हवे तिकडे व्हॉल्व बसवत आहे. हवे तिकडे पाणी फिरवत आहेत, जे मनात येईल ते करीत आहेत. तर आपल्या हातात व्यवस्था आहे तरी कुठे? मी येथे जे बोललो आहे तर येथे आयुक्त बसले आहेत, कार्यकारी अभियंता बसले आहेत, त्यांनी माझ्या बोलण्याचे खंडन करुन दाखवावे की, मी खोटे बोलत आहे अथवा माझ्या मनाचे बोलत आहे. त्यांनी असे सांगितले तर सभागृहाचे समाधान होईल. परंतु दुसरे असेही बोलतो की, यामुळे आपण स्वतःची दिशाभुल कराल. आपणांस साहस असायला हवे की, शहरात पाण्याची समस्या का आहे? व त्याचा उपाय काय आहे. समस्या का आहे याचे उत्तर देण्याचे साहस आपणामध्ये असायला हवे. तसेच आम्ही हा उपाय सुचवु हे सांगण्याचे साहस देखील आपणामध्ये असायला हवे. असे होत नाही तोपर्यंत काही मार्ग निघेल असे मला वाटत नाही. येथे जी चर्चा सुरु आहे ती संपण्यापुर्वी माझी महापौरांना विनंती आहे की, पाणी पुरवठा विभागाच्या अधिका–यांना येथे निवेदन करायला सांगावे. पाण्याची समस्या का आहे, कधी पर्यंत राहील, समस्या सुटेल अथवा नाही अशा प्रकारचे पुर्ण विवरण सभागृहासमोर दयायला हवे. अशी माझी विनंती आहे. जय हिंद, जय महाराष्ट्र ।

**मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी या सभागृहाबाहेर गेल्या व पीठासीन अधिकारी म्हणुन श्री विनोद तलरेजा हे आसनस्थ झाले.**

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–</u> मा. महापौर, आयुक्त साहेब, ब–याच वेळेपासुन येथे चर्चा सुरु आहे. मी काही बाबी सांगु इच्छितो. जेव्हा आमच्या श्री. सोनवणे साहेबांनी नविन नविन पदभार घेतला होता त्यावेळी टाईम्स ऑफ इंडियाच्या कल्याण–डोंबिवली पुरवणीमध्ये त्यांनी एक विधान केले होते की, आमच्याकडे पुरेसे पाणी आहे फक्त आमचे वितरण व्यवस्थित नाही. मला असे वाटते की, आज त्या गोष्टीस ३ वर्ष उलटुन गेले आहेत. परंतु ३ वर्षात आमच्या शहराची समस्या सुटलेली नाही. मला असे वाटते की, सिस्टीम फेल गेली आहे. श्री. सोनवणे यांनी जी आकडेवारी सांगितली होती, श्री. सोनवणे साहेब हे कधी चुकु शकत नाही. ही सिस्टम सुधरविण्यासाठी बरेच काही बदल करावे लागतील. काही विभाग आहेत, आपल्या शहरात जेथे पाणी जात नाही. तेथे पाणी कसे पोहचेल फक्त यावर विचार करण्याची आवश्यकता आहे. पुर्ण शहरात पाणी टंचाई आहे असे नाही. या छोटया विभागांमध्ये पाणी पोहचवायचे आहे. ही मोठी समस्या आहे असे मला वाटत नाही. माझा पॅनल नं. २५, श्री.

अशोक ठाकुर यांचा पॅनल नं. १८, पॅनल नं. १२ व अशा काही प्रभागांमध्ये पाण्याची समस्या आहे. तेथे पाणी समस्या सुटु शकत नाही असे मला वाटत नाही. आमचे आयुक्त श्री. सोनवणे हे सक्षम आहेत. आम्ही नशिबवान आहोत की आम्हांला असे अधिकारी प्राप्त झाले आहेत. परंतु त्यांनी पुरेसे लक्ष दिलेले नाही असे मला वाटत आहे. आमच्या येथे २४ सेक्शन मध्ये पाण्याची टंचाई आहे. श्री. सावकारे यांना मी यासाठी एका महिन्यात कमीत कमी १०० वेळा फोन करतो. एकाच जागेसाठी सांगतो. ते नेहमी सांगतात की, आता दुसरीकडे जात आहे तुमच्याकडे दोन दिवसात येईन. परंतु ती समस्या अजुन दुर झाली नाही. मनिष नगर मध्ये टॅंकर येतात. मी सांगुन–सांगुन थकलो परंतु मला असे कळले आहे की, तेथे दोन लाखाची जलवाहिनी टाकण्याचे काम मंजुर झाले आहे. जलवाहिनी मंजुर केल्याने समस्या सुटणार नाही. जलवाहिनी टाकण्यासाठी जर ठेकेदारच आला नाही तर काय फायदा होईल? एप्रिल २००४ मध्ये मी जेटपंपाचे काम मंजुर केले आहे. परंतु ते काम करण्यासाठी कुणीही ठेकेदार येत नाही. तर जलवाहिनी टाकण्यासाठी ठेकेदार आला नाही, जेटपंपासाठी ठेकेदार आला नाही, तर शहरातील समस्या सुटेल तरी कशी? एकच मार्ग आहे की, त्या विभागात टॅंकर पाठवावेत. आता असे सांगितले जाते की, थोडया दिवसांनी टॅंकर बंद होणार आहे. जर टॅंकर बंद केलेत तर शहरातील समस्या कशी काय सुटेल? तेथे नळाद्वारे पाणी दयावे. आपल्याकडे पाण्याची कमी नाही असे आम्हांला वाटते. परंतु मला असे वाटते की, श्री. सोनवणे यांनी व्यक्तीशः यामध्ये लक्ष देवुन उपाय काढावा. टॅंकर हा उपाय नसून तात्पुरता मार्ग आहे. मनिष नगर मध्ये वर्षानुवर्ष टॅंकर येत आहेत, तेथे दोन लाखाचे काम मंजुर झाले आहे परंतु जोपर्यंत ठेकेदार काम करत नाही तोपर्यंत समस्या कशी काय सुटेल? मी आयुक्तांना व महापौरांना विनंती करतो की, शहरामध्ये जी ४–१० ठिकाणे आहेत, तेथे नळाद्वारे पाणी देण्याची व्यवस्था करावी. ही गंभीर समस्या आहे त्याचे समाधान करण्यासाठी पावले उचलायला हवीत. जय हिंद, जय महाराष्ट्र।

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी, श्री. मनोज साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :–</u> मा. आयुक्त, मा. महापौर, उपमहापौर व सन्माननिय सदस्य, मघाशी मा. श्रीमती जया साधवानी यांनी सांगितले की, ''पाणी रे पाणी तुझा रंग कसा, ज्यामध्ये मिळविला तसा''. उल्हासनगर महानगरपालिका जेव्हा अस्तित्वात आली तेव्हापासुन येथे ब–याचवेळा पाण्याचे वेगवेगळे रंग आले. कधी भगवे पाणी आले, कधी निळे पाणी आले, कधी वेगळे पाणी आले. परंतु माणसाला पिण्यासाठी कोणत्याही कलरचे पाणी लागत नाही. त्याला पारदर्शक पाणी लागते. ही महासभा चालु असतांना पाण्याचे राजकारण न करता, पाणी का कमी आहे व समस्या सोडविण्यासाठी नेमके काय केले पाहिजे याचा ऊहापोह येथे झाला असता तर बरे झाले असते. उल्हासनगर महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर पाण्याचे व्यवस्थापन आजच्या घडीला पाणी नेमके कमी आहे का? जर असा विचार केला तर शहरामध्ये पाणी नाही, पाण्याचे प्रमाण व्यवस्थित आहे. परंतु पाण्याची टंचाई त्यावेळेस ज्या प्रकारे नव्हते त्याचप्रकारे आजही नाही. त्यावेळेस खुप पाणी होते, परंतु काही प्रभागाच्या ठरावीक लोकांसाठी पाणी होते. आजही त्याच लोकांसाठी पाणी आहे. जिथे पाणी नाही तेथे नाहीच आहे. हा सर्व विचार करतांना नेमके पाणी कुठे कुठे नाही हे जर बघितले तर जो झोपडपट्टी विभाग आहे त्या विभागात पाणी नाही. आजही शेवटच्या टोकाला झोपडपट्टी आहे तेथे पाणी नाही. हे सोडविण्यासाठी, पाण्याची टंचाई सोडविण्यासाठी समस्येचे जे मुळ आहे ते आयुक्तांपर्यंत पोहचते. गतिमान शासन, गतिमान प्रशासन ठेवतांना पाण्याचा प्रश्न जर सोडवायचा असता तर तो न सोडविण्याच्या पाठीमागे जर मुळ पोहचत असेल तर ते आयुक्तांपर्यंत पोहचते. आयुक्त व त्यांचे अधिकारी, त्यांचा कर्मचारी वर्ग, आज श्री. जवादे यांच्या सारखा एक चांगला अधिकारी येथे आल्यानंतर पाण्यामध्ये किती सुधारणा होते, पाण्याची टंचाई कमी कमी होत जाते. परंतु संपुर्ण कर्मचारी वर्ग जर बघितला तर आजच्या घडीला तुमच्या प्रशासनाला पाणी पुरवठा विभागामध्ये काम करणारा अधिकारी वर्ग पुरेसा नाही हे माझे प्रामाणिक मत आहे. एक अधिकारी त्याच्यावर १० जबाबदा–या टाकल्याने नेमकी कुठलीच जबाबदारी पुर्ण करु शकत नाही. पाण्याचा प्रश्न सोडवितांना तुमच्याकडे मजुर नसतात, खड्डे खोदले तर ते बुजवायला माणसे नसतात. गळत्या एवढया आहेत की, अर्धा वेळ घाण पाणी येते. आणि अर्धा वेळ शेवटी स्वच्छ पाणी येते. म्हणजे तुम्ही एक तास पाणी देत असाल तर अर्धा तास पाणी वाया जाते. मागे तुम्ही श्वेतपत्रिका काढली होती. त्यामध्ये तुम्ही सांगितले होते की, या या परिसरात जलवाहिन्या टाकायला हव्यात. माझ्या प्रभागातील आम्रपाली नगर, गणेश नगर, यांचा श्वेतपत्रिकेमध्ये उल्लेख आहे. परंतु आजच्या घडीला कोणत्याही गोष्टीची अंमलबजावणी झालेली नाही. संपुर्ण शहराच्या पाण्याचे जे व्यवस्थापन आहे त्याचे तुम्ही जोपर्यंत विकेंद्रीकरण करत नाहीत, जोपर्यंत कर्मचारी वर्ग वाढवत नाहीत, तोपर्यंत यात सुधारणा होणे फार अशक्य आहे. आजही मी या महासभेतर्फे आयुक्तांना एक विनंती करतो की, व्यवस्थापन व्यवस्थित करण्यासाठी प्रभागनिहाय कर्मचारी वर्ग आणि प्रभागनिहाय व्यवस्थापन हा जर तुम्ही पुरेसा उपलब्ध केला तर प्रभागनिहाय राहिलेले कामे मग ती जलवाहिन्या टाकायच्या असतील, खड्डे बुजवायचे असतील, गळत्या काढायच्या असतील,

शेवटच्या टोकाला पाणी पोहचत नसेल, संपुर्ण उन्हाळा जेटपंप बंद होता, बोअरवेल दुरुस्ती बंद होती, कुठल्याही प्रकारची पर्यायी व्यवस्था नव्हती या सर्व व्यवस्थेचा जर आयुक्तांनी विचार केला तर मला असे वाटते की, पाण्याची टंचाई कमी होईल. आम्ही आंदोलन करीत नाही, काही लोक आंदोलन करतात, काही लोकांना पाणी असुनही आंदोलन करतात. आम्ही मागच्या ५ वर्षापुर्वी जेव्हा श्रीमती यशस्वीनी नाईक या महापौर होत्या, तेव्हा आम्ही आंदोलन केले होते. परंतु तेव्हा परिस्थिती खरोखर खराब होती. ती खरी परिस्थिती होती. आम्ही आंदोलन करीत नाही याचा अर्थ आम्ही षंढ आहोत अशातला भाग नाही, आम्हीही आंदोलन करु शकतो. परंतु योग्य वेळी आंदोलन झाले पाहिजे. मी आयुक्तांनी या सर्व गोष्टींचा विचार करावा एवढे बोलुन मी माझे दोन शब्द संपवतो. धन्यवाद.

**मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला व महापौरपदी आसनस्थ झाल्या.**

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, यांनी माझ्या प्रभागाच्या फार बढाया मारल्या, असे आहे, तसे आहे. माझ्या प्रभागात मिलिटरीच्या काळातील जलवाहिनी तुटली आहे. तिच्या जागी दुसरी जलवाहिनी टाकण्याचे काम मंजुर झाले आहे. आठ महिने झाले आहे परंतु कुणीही ठेकेदार काम करण्यास तयार नाही. तर यासाठी काय करणार हे सांगावे. तसेच एमआयडीसीची जी ३३ इंचाची जलवाहिनी येते, तेथे एवढया मोठया प्रमाणावर गळती आहे, ती सावकारे साहेबांनी त्या दिवशी बघितली. दररोज किमान १०० टॅकर पाणी वाहुन जात आहे. १० मिनिटात एक गाडी भरते, तेथे साडे सोळा तास पाणी असते. अशाप्रकारे दररोज सुमारे १०० टॅकर पाणी वाहत आहे. तुम्ही हे बघावे बाकी काही नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौर, उपमहापौर, सचिव साहेब, आयुक्त साहेब व आमचे श्री. आयलानी साहेब, सर्व प्रथम मी या सर्वांना धन्यवाद देतो की, आज सभागृहात कुलर ठेवले आहेत. कमीत कमी आज आमचे सर्व सदस्यांना थंडावा मिळत आहे. जर आयुक्त साहेब, महापौर व उपमहापौर यांनी सभागृहाला एसी बसविले तर आमचे सदस्य अजुन थंड होतील. कुलरला पाणी लागते. आधीच पाण्याची टंचाई आहे यासाठी एसी बसविणे योग्य होईल. आज माझ्या समोर जे मुद्दे उपस्थित झाले त्यामध्ये महत्वाचा मुद्दा म्हणजे ज्या अधिका—याने चार वर्षापासुन आपणांस त्रस्त करुन सोडले होते जे उल्हासनगरकडे दुर्लक्ष करायचे, ते श्री. नागे साहेब हे श्री. राजु जग्याशी यांनी सांगितल्याप्रमाणे बदली झाले आहेत. त्यांची बदली होताच कॅम्प नं. ४ व ५ ला जे २.८० या दाबाने पाणी मिळायचे तेच पाणी ४ ते ४.२० पर्यंत पोहोचले आहे. त्यांनतर थोडी फार सुधारणा झाली आहे. आमच्या श्री. बोडारे साहेबांनी जसे सांगितले की, जेव्हा टंचाई होती तेव्हा विजेच्या भारनियमनाप्रमाणे पाण्याचेही नियमन केले होते ही वस्तुस्थिती आहे. श्री. नागे साहेब यांनी जेव्हा पाणी कमी केले होते तेव्हा ब—याच विभागात पाणी कमी जात होते. त्यावेळी मी देखील उपोषण केले होते, श्री. सतरामदास जेसवानी हे देखिल होते. त्यावेळी सांगण्यात आले की, तुम्हांला पाणी येते, परंतु तुमचे पाणी एक दिवस बंद केल्याने कॅम्प नं. ४ मध्ये पाणी येईल. तेव्हा आम्ही विचार केला ठिक आहे की पाणी नियमन केल्याने एखादया विभागास १०० टक्के पाणी मिळणार असेल तर आम्ही सहमत होवू. आज जेव्हा पाण्याचा दाब वाढला आहे तेव्हा माझी अशी विंनती आहे की, जे पाण्याचे नियमन केले होते ते बंद केले जावे. जर एखादया सदस्याच्या प्रभागात पाणी व्यवस्थीत येत असेल व तो प्रशंसा करीत असेल, जरी श्री. भुल्लर यांनी प्रशंसा केली नाही, त्यांच्याकडे २४ तास पाणी येते. परंतु जर श्री. शांताराम निकम हे प्रशंसा करीत असतील तर त्यांना दाद दयायला हवी. परंतु हा मुद्दा गंभीर आहे, कोणत्याही सदस्याला पाण्याची समस्या असेल तर आयुक्त साहेबांनी तेथे जलवाहिन्या टाकाव्यात, अधिका—यांना पाठवुन त्यांची समस्या सोडवाल तर चांगले होईल. कारण आमचे सदस्य हे शहरासाठी बोलतात. जर कुणी सदस्य महासभेचे लक्ष केंद्रीत करत असेल तर ती गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. परंतु माझी विरोधी पक्षाच्या सदस्यांना विंनती आहे की, आपल्या व आमच्या संख्येमध्ये मध्ये फरक आहे जसे आपले १२ आहेत, ८ आहेत, आमचे ४९ आहेत, कॉग्रेसचे ७ आहेत. जर तुमचे सदस्य बोलतात तर आमचे सदस्य शांत राहतील, आमचे सदस्य बोलतील तर तुमच्या सदस्यांनी शांत राहावे. आमचे काही सदस्य चिडतात की, पाण्याची टंचाई आहे कथा सांगु नका. तर मला असे वाटते की, श्री. लाल पंजाबी यांनी कथा सांगण्याची सुरुवात केली आहे. बजेटच्या बैठकीत देखील ते कथा सांगतात, आज पाण्याची बैठक होती तरी त्यांनी कोंबडयाची गोष्ट सांगितली. ते बोलतात तेव्हा आम्हांला ही उत्तरे दयावी लागतात. जर तिकडुन कोंबडा बोलला नाही तर इकडुनही कोणी बोलणार नाही. तेथुन बोलतील तर येथुनही बोलतील. टॅकरची जी समस्या आहे, कोणीही माणुस लाचारीने टॅकर घेतो. आज मी मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त व सर्वांना विनंती करीन की, जेथे—जेथे आपण पाणी देवु शकत नाही, ३० जुन नंतर आपण टॅकर बंद करणार आहोत यासाठी यावर पुन्हा विचार करावा. यासाठी बजेटमध्ये समायोजन करावे लागले तर ते देखिल करावे. जोपर्यंत आपण नळांमध्ये

पाणी देत नाही तोपर्यंत त्यांना टॅकरने पाणी दयायला हवे. मी आयुक्तांचे लक्ष आकर्षित करु इच्छितो उल्हासनगर मध्ये असे किती प्रभाग आहेत जेथे मोटार न लावता पाणी येते? यावर मला उत्तर दिले की, फक्त चार प्रभाग आहेत. याचा अर्थ पुर्ण उल्हासनगरमध्ये लोकांना मोटारने पाणी घ्यावे लागते. जर मोटारने पाणी घ्यावे लागले नाही तर आम्ही लोडशेडिंग बंद करु असे एमएसईबी वाल्यांनी सांगितले आहे. हा गंभीर मुद्दा आहे. प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागात मोटार शिवाय पाणी जात नाही. प्रत्येक घराला मग ते दोन तास असो, तीन तास असो, चार तास असो त्यांना मोटार चालुच ठेवावी लागते. त्यांना मोटार शिवाय भुमीगत टाकीत थेट पाणी दिल्यास ते पाणी वर चढविण्यासाठी पुन्हा मोटार चालु करावी लागते. परंतु जर मोटार बंद केली तर पुर्ण शहराचा पाण्याचा प्रश्न सुटु शकतो. लोक म्हणतात जेव्हा ही विज जाते तेव्हा आम्हांला पाणी येते. याचा अर्थ जेव्हा लाईट असते तेव्हा लोक मोटारने पाणी खेचतात व बाकीच्या लोकांना पाणी येत नाही. तर उल्हासनगरमधील सर्व लोकांना मोटार न लावता पाणी उपलब्ध करुन दिले तर फार चांगले होईल. आपण कोणाचेही प्राकलन थांबवत नाही. आयुक्त साहेब पाण्याचे प्राकलन कधीही थांबवत नाही. बिल देतांना नेहमी पाणी पुरवठा विभागाच्या ठेकेदारांनी आधी दयायला हवे. जी कामे प्रलंबित आहेत ती सर्व पुर्ण केली तर सर्व सदस्यांची तक्रार दुर होईल. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.**

<u>मा. आयुक्त:—</u> मा. महापौर महोदया, पाण्याच्या समस्येवर जेवढया गंभीरतेने आज चर्चा झाली प्रशासनाला एक गोष्ट स्विकार करावी लागेल की शहरात काही ठिकाणी पाण्याची टंचाई आहे. परंतु पाण्याची खरी टंचाई काय असते हे बघण्यासाठी आपणांस महाराष्ट्राच्या दुस—या विभागात जावे लागेल. जेथे १५ दिवसातुन एकदा पाणी येते. काही विभागात आठवडयातुन एकदा पाणी येते, काही ठिकाणी दोन वेळा येते. काही ठिकाणी आठवडयातुन एक दिवसा आड पाणी पुरवठा होतो. काही ठिकाणी दिवसातुन एकदा पाणी येते जे पंधरा मिनिट ते एक तास येते. पंधरा दिवसातुन एकदा पाणी येते तेही फक्त एक तास येते. त्याच्याशी तुलना केली तर उल्हासनगर शहरात पाण्याची टंचाई आहे असे म्हणणे चुकीचे होईल असे मला वाटते. परंतु जसे आपल्या पाणी पुरवठा विभागाच्या सभापतींनी सांगितले त्याच्याशी मी सहमत आहे. पाण्याचे वितरण आपल्या शहरात व्यवस्थित नाही. पाण्याचे वितरण व्यवस्थित नसल्याने व पाण्यासाठी आपण एमआयडीसीवर निर्भर असल्याने आपणांस नेहमी पाण्याच्या समस्येला तोंड दयावे लागते. जेव्हा आम्ही २००३ मध्ये एक श्वेतपत्रिका सभागृहासमोर ठेवली होती. त्यामध्ये पाणी समस्या निर्माण होण्याची काही कारणे सांगितले होते. जी मी आपल्या परवानगीने पुन्हा सांगत आहे. आम्ही जी कारणे सांगितली होती त्यामध्ये महत्वाचे कारण म्हणजे आपल्या वितरणवाहिन्या फार जुन्या आहेत. मिलिटरी बॅरेकच्या जलवाहिन्या आपण आजही वापरतो. तिसरे म्हणजे जलकुंभ जे पाण्याचे समान दाबाने वितरण होण्यासाठी आवश्यक असतात त्यांची संख्या आपल्याकडे फार कमी आहे. आज आपण जवळपास ११० द.ल.लि. पाण्याचे वितरण करतो. एवढया पाण्याचे वितरण करण्यासाठी आपल्याकडे कमीत कमी १/३ क्षमतेचे जलकुंभ असणे आवश्यक आहेत. म्हणजेच जवळपास ३५—४० द.ल.लि. पाण्याचा साठा करणे आवश्यक आहे. २ वर्षापुर्वी या शहरात फक्त तीन जलकुंभ होते नंतर ८ जलकुंभ पहिल्या टप्प्यात बनविले गेले. ते देखिल अजुन सर्व पुर्ण झाले नाही, आणि जे पुर्ण झाले आहेत ते भरण्यासाठी ज्या प्रकारची जलवाहिनी हवी होती ती बनविलेली नाही. उदाहरणादाखल चोपडा कोर्ट येथिल जलकुंभ अथवा तक्षशिला येथिल जलकुंभ जे आम्ही पुर्ण भरु शकत नाही. दिवसातुन दोन वेळा भरणे आवश्यक आहे परंतु ते एक वेळा देखिल भरता येत नाही. चोपडा कोर्ट येथिल एकदाही भरता येत नाही. तिसरे कारण म्हणजे या शहराची भौगोलिक रचना उंच सखल म्हणजेच काही ठिकाणी सखल भाग व काही ठिकाणी उंचावरील विभाग आहेत. समान पातळी नसल्याने जे लोक टेकडीवर राहतात त्यांना पाण्याची टंचाई भासते. येथे ज्या जलवाहिन्या टाकल्या आहेत त्यामध्ये समन्वय नसल्याने पाण्याची गळती मोठया प्रमाणावर होते. आपण १९९४ मध्ये किर्लोस्कर कंसल्टन्सीद्वारा जो रिपोर्ट बनविला होता तो आपण पाहिल्यास त्यामध्ये अभ्यास करुन सांगितले आहे की, येथे पाण्याची गळती ५० टक्के आहे. बाकीच्या शहरांमध्ये हेच गळतीचे प्रमाण २० ते २५ टक्क्याच्या दरम्यान आहे. दुसरे म्हणजे येथे अनाधिकृत नळजोडण्यांचे प्रमाण फार मोठे आहे. नळ जोडण्या व बांधकामे यांचे प्रमाण आपण बघितले तर उल्हासनगर शहरात १,४९,००० मालमत्ता आहेत. परंतु इमारतींची संख्या ४०,००० पेक्षा देखील कमी आहेत. या इमारती ज्या आपण बघता यामध्ये जर एका इमारतीत एक नळ जोडणी असती तर ४०,००० जोडण्या राहिल्या असत्या. एका इमारतीत जेवढया सदनिका असतात, जेवढे लोक राहतात त्यांना लक्षात घेवुन एका इमारतीत एक नळ जोडणी हा निकष लावला तर जास्तीत जास्त ४०,००० नळ जोडण्यांची आवश्यकता होती. आमच्याकडे जो रेकॉर्ड उपलब्ध आहे, त्याप्रमाणे ५२,००० जोडण्या अधिकृत आहेत. व ३०,००० पेक्षा जास्त जोडण्या अनधिकृत आहेत. आम्ही नळजोडण्या नियमित करण्यासाठी एक योजना काढली होती त्या योजनेमध्ये ३०,००० पैकी फक्त ३,२०० लोकांनी नळ जोडण्या अधिकृत करुन घेतल्या आहेत. उर्वरित लोकांनी जे रुपये

२,२४० भरायचे होते ते देखील भरले नाही. म्हणजेच अनामत व दंड कमी असुन देखील त्या अनाधिकृत जोडण्या अधिकृत करुन घेतल्या नाहीत. पुढील कारण जे आम्ही सांगितले होते की येथे पाणी खेचण्यासाठी बुस्टर पंप लावले जातात. एका इमारतीत ४ नळजोडण्या असतात. परंतु प्रत्येक जोडणीवर अर्धा अश्वशक्ती ते दोन अश्वशक्तीपर्यंत टिलु पंप लावले जातात. जे पंप लावतात फक्त त्यांनाच पाणी येते. नळ जोडणी घेतांना वितरण वाहिनीमध्ये निपल्स टाकतात ज्यामुळे पुढे पाणी जातच नाही. एमआयडीसीवर आपण जे अवलंबुन आहोत त्याचा उल्लेख मी केला की जो पर्यंत आपण त्यांच्यावर निर्भर राहु तोपर्यंत ते जेवढे पाणी देतील तेवढेच पाणी आपण वितरीत करु शकु. जेवढे देतील, ज्या दाबाने देतील, ज्यावेळी देतील हे सर्व लक्षात घेवुन आम्हांस पाणी वितरीत करावे लागेल. आज आपणा सर्वांना माहिती आहे की, एमआयडीसीशी पाणी कपातीविरुध्द आम्हांस कसा सामना करावा लागला. पुढचे कारण आम्ही सांगितले होते की, निधी उपलब्ध व्हायला हवा. मी वारंवार येथे सांगत आलो आहे, आपणांस चांगले वाटणार नाही. येथे वितरण वाहिन्या नसल्याबाबत चर्चा झाली. या शहरात कशाला प्राथम्य दयायला हवे होते ते वितरण वाहिन्यांना दयायला हवे होते हे दिसुन येते. परंतु या शहराने नेहमी सी.सी. पॅसेजला प्राथम्य दिले आहे. मी यावर जास्त बोलुन आपणांस दु:खी करु इच्छित नाही. परंतु आपले प्राथम्य चुकल्याने दोन प्रकारचे नुकसान झाले आहे. वितरण वाहिन्या ज्याप्रकारे टाकायला हव्या होत्या त्याप्रकारे त्या टाकल्या गेल्या नाहीत. दुसरे म्हणजे सीसी पॅसेज करतांना आधी जी जलवाहिनी होती ती देखील सी.सी. पॅसेजच्या खाली दाबली गेली व पाणी ज्या प्रकारे पुढे जायला हवे, ते आज जावु शकत नाही. अजुन एक कारण आम्ही सांगितले होते की, जुन्या वितरण वाहिन्या बदलणे आवश्यक आहे. सी.सी. पॅसेज करतांना ज्या वाहिन्या दबल्या गेल्या आहेत त्या काढुन नव्याने टाकणे आवश्यक आहे. यासाठी आम्ही काही अल्पकालीन व दिर्घकालीन उपाययोजना सुचविल्या होत्या. अल्पकालीन उपाययोजनांमध्ये वितरण वाहिन्या टाकणे हे सुचविले होते. आज येथे आम्रपाली नगरचे उदाहरण दिले गेले. परंतु अम्रपाली नगर व जेथेही जलवाहिन्या नव्हत्या तेथे जलवाहिन्या टाकल्या गेल्या. परंतु त्यांना जलकुंभाद्वारे पाणी न दिल्याने किंवा झोनिंग पध्दत नसल्याने येथे लोकांना पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होत नाही. ज्यांनी ज्यांनी श्वेतपत्रिकेचा उल्लेख केला त्यांनी ती पाहिल्यास त्यामध्ये आम्ही लिहिले आहे की, आपला स्वत:चा स्त्रोत निर्माण करणे आवश्यक आहे. स्वतंत्र पाणी पुरवठा योजना आवश्यक आहे. यासाठी आम्ही निविदा मागविली होती. निविदा स्विकृतीचे काम अंतिम टप्प्यात आहे. मला खात्री आहे की, ते काम झाल्यानंतर, आपणा सर्वांना माहिती असेल की, २०३८ पर्यंत आपली पाण्याची जी आवश्यकता असेल ती लक्षात घेवुन १७० द.ल.लि. प्रति दिन एवढा कोटा मा. जलसंपदा मंत्री श्री. अजित पवार, आपले पालकमंत्री मा. श्री. गणेश नाईक, आपल्या शहराचे आमदार मा. श्री. पप्पु कलानी यांच्या सहकार्याने मंजुर झाला आहे. लवकरच बीओटी ची योजना येथे सुरु होणार आहे. श्वेतपत्रिकेत आम्ही लिहिले होते कीं, येथिल पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे खाजगीकरण होणे आवश्यक आहे. खाजगीकरण केल्यांनतर आपण समान वितरण करु शकतो. श्री. रमेश चव्हाण यांनी सांगितले की, एका व्हॉल्वमनच्या चुकीमुळे १५ दिवस एका विभागाला पाणी मिळाले नाही. मानवी चुकांमुळे, हस्तक्षेपामुळे काही ठिकाणी पाणी पुरवठा होत नाही. पाणी असते परंतु व्हॉल्वमनच्या अथवा विभागातील काही लोकांच्या चुकीमुळे, ब—याच विभागातुन तक्रार येते की, काही विभागातील लोक ताकदीचा उपयोग करुन स्वत:च्या विभागाला पाणी पुरवठा करुन घेतात. खाजगीकरण केल्यास अशा प्रकारच्या चुका होणार नाहीत. दिर्घ कालीन उपाययोजनांसाठी आम्ही या सभागृहाकडे ३ वर्षाची मुदत मागितली होती व सभागृहाने ती दिली आहे. ज्या अल्पकालीन उपाययोजना होत्या त्यातील काही कामे अदयाप सुरु आहेत. या सभागृहाने सुधारीत पाणी पुरवठा योजनेच्या पहिल्या टप्प्याला जी मंजुरी दिली होती त्या मंजुरीला शासनाकडुन जी मंजुरी हवी होती ती अदयाप प्राप्त झालेली नाही. परंतु पहिल्या टप्प्याचे जवळपास ९० टक्के काम पुर्ण झाले आहे. आता बिओटी तत्वावर जी योजना हाती घेतली जाईल त्यामध्ये ८ नविन जलकुंभ बनविणे व जवळपास १७ किमीच्या वितरण वाहिन्या टाकणे. म्हणजे जलशुध्दीकरण केंद्राच्या शिवाय १७ किमीच्या जलवाहिन्या टाकणे हेही काम येथे घेतलेले आहे. येथे काही सदस्यांनी वैयक्तीक प्रश्न उपस्थित केले त्यांना उत्तर देणे उचित वाटते. सुरुवात श्री. रुपचंदानी यांनी केली. त्यांनी विषय सभागृहासमोर ठेवला. टॅकरद्वारे जो पाणी पुरवठा होतो तो बघितला तर फक्त काही प्रभागात पाणी टंचाई असल्याने दिसुन येते. उदाहरणादाखल पॅनल नं. २३,१८,२०,१९,२५,२४,६,२२,७,३,५ एवढया पॅनल मध्ये सरासरी प्रतीदिन १० पर्यंत टॅकर दिले जातात. उर्वरीत पॅनलमध्ये, चुकुन एखादा पॅनल राहिला असेल, इतर प्रभागांमध्ये सरासरी एक ते दोन टॅकर जातात. आधी जे मी क्रमांक सांगितले ते लक्षात घेवुन ३ ते १० टॅकर प्रतीदिन जातात. कदाचित आपला प्रभाग यामध्ये आला नसेल. पॅनल नं. १२ असे मी बोललो. मी जी आकडेवारी सांगितली आहे ती सरासरी सांगितली आहे. १२ बोललो नसेल तर त्याचा देखील समावेश करु. जर कोणाचा समावेश करायचा असेल तर तो देखील करु. मला एवढेच म्हणायचे आहे की, हे जे पॅनल आहेत यामध्ये पाण्याची टंचाई आहे हे मानावे लागेल. ही दुर करण्यासाठी आपण काही सुचना दिल्या आहेत. त्यामध्ये अनधिकृत नळजोडण्या व त्यांचा वापर, पाणी विकले जात आहे असे बोलले गेले श्री. नथु सोनवणे हे बोलले. त्या बद्दल आम्ही जागेवर जावुन चौकशी

केली होती. तेथे अर्धा इंचाची जोडणी आहे. तो माणुस पाणी मिनरल वॉटर म्हणुन विकतो यासाठी पोलिसांनी स्वत:च तक्रार दाखल केली आहे. यांचे म्हणणे होते की, तेथे जोडण्या जास्त आहेत. परंतु तेथे दोन वेळा पहाणी केल्यानंतरही आम्हांला जास्तीच्या नळजोडण्या आढळुन आल्या नाहीत. परंतु त्या माणसाविरुध्द पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्री. रमेश चव्हाण यांनी सांगितले की, कॅम्प नं. ४ व ५ ला किती पाणी मिळते, कॅम्प नं. ४ व ५ ची लोकसंख्या विचारात घेवुन कमीत कमी ४४ द.ल.लि. पाणी मिळायला हवे. परंतु आम्हांला पाले येथुन जे पाणी मिळते, सरासरी पाणी काही दिवस ३६ द.ल.लि., काही दिवस ३८ द.ल.लि. व काही दिवस २६ द.ल.लि. पाणी मिळाले आहे. परंतु सरासरी पाणी फक्त ३२ द.ल.लि. एवढे मिळाले आहे. परंतु कॅम्प नं. ३ येथिल आनंद नगर बुस्टर येथुन जे पाणी दिले जाते, ही सरासरी ६ द.ल.लि. प्रती दिन मिळाले आहे. याचा अर्थ प्रती दिन सरासरी ३८ द.ल.लि. पाणी आम्ही कॅम्प नं. ४ व ५ ला दिले आहे. यानंतरही तेथे अजुन ६ द.ल.लि. पाण्याची आवश्यकता आहे. पाले येथे टप्पा १ अन्वये जे काम सुरु होते त्या अन्वये ७५० एमएम व्यासाची जलवाहिनी टाकायची होती. तेथिल काही लोकांची जमिन यासाठी हवी होती. त्या कामास सुरुवात केली परंतु भुसंपादनाची कारवाई पुर्ण न झाल्याने ते काम अदयाप प्रलंबित आहे. त्याबद्दल सभापतींनी आपणांस माहिती दिली. त्या लोकांबरोबर आमची चर्चा झाली आहे. त्यांना जिल्हाधिकारी यांच्याकडुन प्रकल्पग्रस्त म्हणुन दाखला मिळाला तर त्यांना महापालिकेत कामाला घेण्यासाठी देखील प्रस्ताव आम्ही सादर केला होता. तो देखील मंजुर झाला आहे. पाणी पुरवठयाचा जो दाब आहे तो जर ४ ते ४.५ एवढया दाबाने प्राप्त झाला तर कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची समस्या होणार नाही. दुसरे म्हणजे येथे मिटर बद्दल बोलले गेले. किती पाणी मिळते व किती वाया जाते हे बघण्यासाठी आम्ही अल्ट्रा सॉनिक मिटर्स भाडयाने घेण्यासाठी एमजेपीला संपर्क केला आहे. ते मिळाल्यावर व काही ठिकाणांवर बसविल्यावर आम्हांस कळेल की, एमआयडीसीकडुन किती पाणी आपणांस मिळत आहे, व कोणत्या जलकुंभात किती पाणी जात आहे. यासाठी प्रयत्न सुरु आहेत. टॅकरद्वारे खाजगी खेपा घातल्या जातात असे येथे सांगितले गेले. माझ्याकडे पहिल्यांदाच अशी तक्रार आली आहे आम्ही त्याकडे नक्कीच लक्ष देवु. जर टॅकर पुरवठा करणारी एजन्सी आधी स्वत:च्या खेपा मारत असेल व नंतर महापालिकेच्या खेपा मारत असेल तर त्यावर नक्कीच कारवाई करण्यात येईल. जी मंजुर प्राकलने आहेत त्यांचे काम, जसे श्री. बेहरानी साहेबांनी सांगितले व श्री. चव्हाण साहेब यांनी सांगितले. फक्त प्राकलने मंजुर होवुन समस्या सुटणार नाही हे आम्हांला देखील ठाऊक आहे. परंतु प्राकलन मंजुर झाल्यानंतर ठेकेदार येथे काम करण्यास का तयार नाही हे आपणा सर्वांना माहिती आहे. निधीबद्दल मागील दोन वर्षात मी कधीही उल्लेख केला नव्हता परंतु जेवढी वसुली व्हायला हवी, जेवढे पाणी आपण देतो तेवढी वसुली होत नाही. जर महापालिकेच्या तिजोरीत पैसा आला नाही तर ठेकेदाराला पैसे कुठुन देणार? जर मी असे बोललो की, पाण्याच्या समस्येसाठी जेवढी वितरण व्यवस्था जबाबदार आहे, आपण सर्वांनी प्रशासनाला यासाठी दोषी ठरविले आहे. परंतु जर प्रशासनातर्फे आपणांस स्पष्ट सांगण्यात आले तर या शहरात कर भरण्यासाठी ज्या प्रकारे लोक उदासिन आहेत, त्यांची उदासिनता देखील या समस्येमागे एक प्रमुख कारण आहे. हे बोलतांना मला काहीही संकोच होत नाही. जर लोकांनी वेळेवर कर भरला तर आम्ही देखील एमआयडीसीला जी थकबाकी असते ती दिली असती. २००३—२००४ मध्ये पुर्ण वर्षात एमआयडीसीची एक रुपयाचीही थकबाकी नव्हती. परंतु २००४—२००५ मध्ये वसुली कमी झाल्याने ३१ मे २००५ ला जवळपास ७.२२ कोटी एमआयडीसीला देणे बाकी आहे. पैसे न भरल्याने ब—याचवेळा एमआयडीसीने पाण्यात कपात केली आहे. आजही आपणांस माहिती असेल की, पाऊस उशिरा आल्याने एमआयडीसीकडुन १५ टक्के पाणी कपात लागु करण्यात आली आहे. लोकांना हे सहन करावे लागेल. ठेकेदार कार्यादेश दिल्यांनतरही काम करीत नाहीत यासाठी निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. यासाठी मी आपणांस विनंती करीन की आपल्या प्रभागातील जे करदाते आहेत त्यांना आपण त्यांची थकबाकी लवकरात लवकर भरणे बाबत समजवावे. जेणेकरुन त्यांना पाण्याची टंचाई भोगावी लागणार नाही. येथे एसएलसीएम गाडी बद्दल बोलले गेले परंतु ते पाण्याबददल नसल्याने त्याबाबत मी नंतर बोलेन. आपणांस वैयक्तीकरित्या त्याचे उत्तर देईन. त्या गाडीची दुरुस्ती सुरु आहे व ती लवकरच सुरु होईल. टॅकरमध्ये हस्तक्षेप होत असल्याबाबत व वितरण व्यवस्थित नसल्याबाबत बोलले गेले. यासाठी आम्ही वेळापत्रक बनवुन दिले होते. त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आम्ही आमच्या प्रभाग अधिकारी व शाखा अभियंता यांच्यावर सोपविली होती. आज जी तक्रार आली आहे त्यावर लक्ष देवुन जे संबंधीत अधिकारी आहेत त्यांना समज देण्यात येईल व त्यांना सुधारणा करण्याची संधी देण्यात येईल. आपली झोनिंग पध्दत व्यवस्थित नसल्याने एक दिवस पाणी पुरवठा बंद ठेवण्यात आला होता. आपणांस पाणी जर कमी मिळाले तर ते कमी पाणी ७ दिवसात ७ झोन करुन एका झोनला स्टार करुन उर्वरीत ६ झोनला व्यवस्थित रित्या पाणी पुरवठा करु शकतो. परंतु येथेही एमएसईबी कडुन विजपुरवठा नसला अथवा व्यवस्थित नसला तर बुस्टर बंद होतात व त्यामुळे व्यवस्थित वितरण होत नाही. याठिकाणी सांगितले गेले की, काही प्रभागात १५ मिनिटे पाणी आहे व काही प्रभागात ८ तास पाणी आहे. जोपर्यत जलकुंभ तयार होत नाही व जोपर्यंत वितरण वाहिन्या व्यवस्थित होत नाही, जो पर्यंत झोनिंग

करणार नाही तोपर्यंत पाणी पुरवठा समान होणार नाही. मला असे वाटते की, कुणीतरी येथे पाणी पुरवठा विभागात कर्मचारी नसल्याचा उल्लेख केला. आज आपणांस सांगायला हवे की, पाणी पुरवठाा विभागात एक कार्यकारी अभियंता, दोन उप–अभियंता, ७ शाखा अभियंता व जवळपास १२० व्हॉल्वमन आहेत. मला असे वाटते की, ही संख्या जास्त असल्यामुळे, व्हॉल्व व व्हॉल्वमनची संख्या जास्त असल्याने असमान वितरण होत आहे. जेवढा मानवी हस्तक्षेप जास्त होईल तेवढा गोंधळ जास्त होईल. झोनिंग जर यशस्वी झाले, वॉल्व व वॉल्वमनची संख्या कमी झाली तरी देखील पाण्याचे समान वितरण संभव आहे. एक दोन ठिकाणी दुषित पाणी पुरवठा होत असल्याबद्दल बोलले गेले, त्याबद्दल देखिल आमच्या विभागाल सक्त सूचना दिल्या जातील. जेथे दुषित पाणी येत आहे, तेथे दुरुस्तीची कारवाई केली जाईल. येथे बुस्टर बद्दल बोलले गेले, प्रत्येक लाईनवर येथे बुस्टर बसविले आहे. ते काढणे तेव्हाच संभव होईल जेव्हा आपले जलकुंभ तयार होतील व जेव्हा समान वितरण वाहिन्या तयार होतील. या शहरात पाण्याची जी समस्या काही ठिकाणी आहे, जी उंच व शेवटच्या टोकाला ठिकाणे आहेत तेथे पाण्याची जी समस्या आहे ती समस्या दुर होण्यासाठी आपली स्वत:ची योजना असणे, वितरण वाहिन्या असणे व जलकुंभ बनविणे तसेच लोकांनी वेळेवर कर भरणे आवश्यक आहे. जेणेकरुन आम्ही नविन योजना हाती घेवु शकु. मला वाटते की, हाच उपाय आहे. अन्यथा येथे ब्रम्हदेव आले, भगिरथ आले तरी या शहराची पाणी पुरवठा व्यवस्था सुधरु शकत नाही. आपणा सर्वांना हे लक्षात ठेवायला हवे. यासाठी लोकांमध्ये जागृती करावी लागेल. पाण्याची जी नासाडी होत आहे, त्यासाठी जागृती करावी लागेल. यामध्ये आपले सहकार्य आम्हांला हवे आहे. ते मिळेल या विश्वासाने मी माझे निवेदन संपवित आहे. जय हिंद, जय महाराष्ट्र।

**मा. सदस्य श्री. रामरख्यानी मोहनदास यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> मा. महापौर महोदया, यामध्ये आयुक्त साहेबांनी एका बाबीचा समावेश केला नाही तो म्हणजे श्री. महाराज भुल्लर यांच्या प्रभागातुन दिवसाला जवळपास १०० टॅकर पाणी गळतीद्वारे वाहून जात आहे. याकडे लक्ष दयावे ही विनंती.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेबांनी जे निवेदन केले त्यामध्ये मी एक गोष्ट ऐकु इच्छित होतो जी आयुक्त साहेब बोलले नाहीत, जलवाहिन्यांची जी प्राकलने मंजुर झाली आहेत व जी कार्यादेश दिले आहेत, ठेकेदाराने काम केले नाही याचे कारण पेमेंट मिळाले नाही असे कळले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे जिल्हा दरसुचीतील दर व सध्याचे बाजारातील दर यामध्ये फार मोठे अंतर आहे. यामुळे कुणीही ठेकेदार काम करण्यास तयार नाही. याबदृदल आपण खुलासा करावा.

<u>मा. आयुक्त :–</u> महापौर महोदया, हे बरोबर बोलले आहेत. ज्यावेळी प्राकलने तयार केली जातात त्यावेळी जिल्हा दरसुचीवर आधारीत बनविली जातात. आमच्याकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची २००३–२००४ ची जी दरसुची उपलब्ध आहे त्यामध्ये स्टीलची किंमत प्रती मेट्रीक टन रुपये १८,००० एवढी दाखविली आहे. आज स्टीलचा बाजारभाव बघितला तर तो २७,००० पेक्षा जास्त आहे. यामुळे जी प्राकलने येत आहेत ती २०,२५,४० टक्के जास्त दराने प्राप्त होत आहेत. प्राकलनीय किंमतीपेक्षा जास्त दराने काम केल्यास लेखा परिक्षणात हरकत उपस्थित होते. हा एक मुख्य मुद्दा असल्याने आम्हांस ज्या निविदा प्राप्त झाल्या आहेत त्यामध्ये आम्ही अदयाप निर्णय घेवु शकलेलो नाही. परंतु काही प्राकलने १५ टक्के जास्त दराने आम्ही स्विकृत केलेली आहेत. जेथे वाजवी वाटले तेथे आम्ही स्विकृत केले आहे. ४० ते ४५ टक्के जास्त दराने प्राप्त झालेली निविदा स्विकृत करतांना आमच्या अधिका–यांच्या मनात नेहमी एक भिती असते की, याबद्दल जर तक्रार झाली अथवा या निर्णयामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले असा अर्थ काढला गेला तर समर्थन करणे कठिण होईल. नविन दरसुची आल्यानंतर स्टीलचे जे दर वाढले आहेत, जर निविदेत २७,००० मेट्रीक टन प्रमाणे दर प्राप्त झाले असते तर अडचण आली नसती. आम्ही फेरनिविदा काढु, त्यामध्ये निविदेच्या किंमती एवढे थोडे जास्त दर प्राप्त झाले तरी आम्ही काम करुन घेवु.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u> आयुक्त साहेब मला अशी माहिती मिळाली आहे की, बाजारात ३–४ ठिकाणच्या दराची आपण तुलना केली व त्याप्रमाणे ठेकेदाराशी वाटाघाटी केल्या तर मार्ग निघु शकतो. असें होवु शकते का?

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्याशी :–</u> आयुक्त साहेब जसे श्री. उमाप साहेबांनी सांगितले की, निविदा जास्त दराने येतात. तर जोपर्यंत नविन जिल्हा दरसुची येत नाहीत तोपर्यंत यावर आपण काही करु शकतो का? नविन दर

सुची येईपर्यंत ६ महिने जातील. तोपर्यंत प्राकलने तसेच पडुन राहतील. आपण नविन आर.ए. बनवु शकतो का? याबाबत खुलासा करावा.

मा. महापौर :— शहरातील पाणी टंचाईवर चर्चा करण्यासाठी विशेष महासभा बोलावली होती. तीन तासाच्या चर्चेत सत्ता व विपक्षातील सदस्यांनी त्यांना होणारा त्रास व त्यांचे मत मांडले. त्यांचे समाधान कसे करता येईल याबाबत आयुक्तांनी उत्तर देखील दिले. शहरात पाण्याची टंचाई नाही परंतु वितरण व्यवस्थित नसल्याने लोकांना त्रास होत आहे. आयुक्त साहेबांना विनंती आहे की वितरण व्यवस्था व्यवस्थित का नाही, नेहमी हाच त्रास का होतो? ब—याच ठिकाणी ही समस्या आहे. माझ्या प्रभागात देखील असे प्रश्न निर्माण होतात. माझ्या प्रभागात काही खाजगी व्यक्ती व्हॉल्व चालु—बंद करतात. मी आयुक्त साहेबांना जागेवर जावुन दाखविले देखिल होते. एक महिला आहे ती व्हॉल्व चालु—बंद करते. आमच्या बरोबर असे होते याचा अर्थ सर्वांना हा त्रास होत असेल. आयुक्त साहेबांना विनंती आहे की, त्यांनी व्हॉल्वमनवर लक्ष ठेवावे. आपण काही ठिकाणी ठेकाही दिला आहे. परंतु अशी तक्रार आली आहे की, काही ठिकाणी लोक त्यांच्यावर दबाव आणुन स्वत:ला हवा तेव्हा व्हॉल्व चालु बंद करतात. काही ठिकाणी काही प्रभागात दबावाने जास्त पाणी दिले जाते. मी स्वत: सांगते की, असे होते. तर यापुढे आपल्या वितरण व्यवस्थेत सुधारणा आणणे गरजेचे आहे. आमचे श्री. राज असरोंडकर यांनी सांगितले की, त्यांना त्यांच्या विभागात एक पाण्याची टाकी लावायची आहे. परंतु ती त्यांना लावु दिली जात नाही. यासाठी श्री. सावकारे साहेबांना निवेदन आहे की, आमच्या नगरसेवकांच्या ज्या लहान—मोठया तक्रारी आहेत, ज्यांचे समाधान लवकर व सहजतेने निघु शकते. ते लवकरात लवकर करण्यात यावे. श्री. राज असरोंडकर यांना त्यांच्या प्रभागात टाकी लावु दिली जावी. आमचे कॉंग्रेसचे सदस्य श्री. बेहरानी, श्री. ठाकुर, श्रीमती साधवानी व विरोधी पक्षांच्या सदस्यांनी पाणी समस्या असल्याबद्दल सांगितले. यादी बघितली तर दिसुन येते की, ज्या प्रभागात टॅंकर जातात तेथे पाण्याची खरोखर आवश्यकता आहे. यासाठी काय करायचे हा प्रश्न आहे. आयुक्त साहेबांना विनंती आहे की, पाण्याच्या वाहिन्या टाकण्यासाठी आमदार साहेबांनी शासनाकडुन जो दोन कोटीचा निधी आणला होता, ते काम पुर्ण झाले आहे का हे आपणांस बघावे लागेल. जर पुर्ण झाले नसेल तर आपण सर्वसाधारण निधीतुन देखील काम करु शकतो. जेथे टॅंकर जास्त जातात तेथे आम्ही विशेष लक्ष देवु. तेथिल प्रश्न लवकरात लवकर सोडविण्यासाठी देखील प्रयत्न केला जाईल. वितरण व्यवस्थित झाले तर ९५ टक्के प्रश्न सुटतील. आयुक्तांना विनंती आहे की, त्यांनी पाणी पुरवठा विभागातुन सर्व अधिका—यांची बैठक बोलावुन त्यांना योग्य ते निर्देश दयावे. आपणही आपल्या प्रभागात दक्ष राहायला हवे असे मला वाटते. ब—याचदा पाणी वाया जाते. आंघोळ करतांना बादलीत पाणी घेवुन आंघोळ केली जाते त्याऐवजी शॉवरने आंघोळ केल्यास पाणी कमी लागेल. महिला जेव्हा कपडे धुतात, त्यावेळी काही साबणांचा जास्त फेस येतो. यामुळे पाणी जास्त लागते. याकडेही लक्ष दयायला हवे. माझ्या घरी देखील बाई जेव्हा भांडे धुते तेव्हा जोरात नळ सोडते मी तिला असे न करण्याबाबत सांगत असते. माझ्या घरी देखील पाण्याचा प्रश्न आहे. काल—परवा मी देखील हंडा घेवुन फिरत होते. लोक म्हणत होते की, आपणांस देखील पाण्याचा त्रास आहे हे दिसायला हवे. कधी कधी विजेचे भार नियमन होते त्यामुळे देखील त्रास होतो. आपण भांडी धुतांना जे पाणी वापरतो ते एकत्र करुन नंतर त्याचा पुन्हा वापर करु शकतो. काही ठिकाणी पाईपने झाडांना पाणी दिले जाते तर काही ठिकाणी अजिबात पाणी नसते. अशा छोटया छोटया गोष्टींकडे आपण लक्ष दिले तर आपण हे पाणी वाचवु शकतो. या बैठकीत सर्वांच्या समस्येचे समाधान एकच आहे की, पाण्याचे वितरण व्यवस्थित व्हायला हवे. ज्या ठिकाणी खरोखर खुप समस्या आहे तेथे लवकरात लवकर तोडगा काढावा ही विनंती. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :— मा. महापौरजी १ तारखेपासुन मोफत टॅंकर बंद करण्यात येणार आहे त्याचे काय करणार? जोपर्यंत वितरण व्यवस्था ठिक होत नाही, तोपर्यंत काय निर्णय घेणार?

मा. महापौर :— यावर्षी पाऊस देखील उशिरा येत आहे. यामुळे कालावधी थोडा वाढवायला हवा असे माझे मत आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— जोपर्यंत पाणी नळामध्ये येत नाही तोपर्यंत कालावधी वाढविला जावा. आम्ही आपणांस प्राधिकृत करीत आहोत. जेव्हा नळामध्ये पाणी येईल तेव्हा कुणीही सदस्य टॅंकरची मागणी करणार नाही.

मा.आयुक्त :— मा. महापौर महोदया, सर्वांना मोफत टॅंकर देणे योग्य होणार नाही असे मला वाटते. इमारतीमध्ये आपण नळाद्वारे पाणी देवु शकतो. एखादया इमारतीत १० कुंटूंबे राहत असतील व तेथे १०,००० लिटर पाण्याची आवश्यकता असेल व नळाद्वारे ७,००० लिटर पाणी येत असेल व तरी देखील टॅंकर घेवुन जात असतील अशा

ठिकाणी टॅंकर देणे योग्य होणार नाही. जेथे झोपडपट्टया आहेत, वितरण व्यवस्था नाही व जे टॅंकरचे २०० रुपये देवू शकत नाही तेथे मोफत देणे योग्य होईल. इतर ठिकाणी काही तरी आकार घेवुन, ना नफा ना तोटा या तत्वावर टॅंकर देणे योग्य होईल असे मला वाटते. निर्णय आपणांस घ्यायचा आहे. परंतु टॅंकर चालु ठेवल्याने देखील आपल्या पाणी पुरवठा व्यवस्थेत समस्या आल्या आहेत. हे देखिल आपणांस लक्षात घ्यायचे आहे. ३० जुन पुर्वी यावर मी स्थायी समितीमध्ये प्रशासनाच्या वतीने एक प्रस्ताव आणेन त्यावर आपण विचार करावा व त्यानंतर निर्णय घ्यावा.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— मा. आयुक्त साहेब आपले म्हणणे असे आहे की, इमारतींमध्ये राहणा—या लोकांकडुन पैसे घ्यायला हवे. मी आपणांस सांगु इच्छितो की, एका इमारतीत ४०—५० सदनिका असतात. ते प्रत्येक महिन्याला आपणांस पाण्याचे रुपये १०० देत असतात. तरी देखील त्यांना पाणी मिळत नाही. असे असतांनाही त्यांच्याकडुन पुन्हा पैसे घेणे हा अन्याय आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आयुक्त साहेब, श्री. बेहरानी हे जे बोलले त्यावर अजुन मी बोलु इच्छितो, ब—याचशा इमारतीत ६—७ जोडण्या असुनही पाणी येत नाही. तर त्यांनी काय करावे? जर इमारती वाल्यांनी रोज एक—दोन टॅंकर मागविले तर त्यांचा देखभालीचा खर्च एवढा वाढेल की, प्रत्येकाला दर महिन्याला रुपये ६०० ते ७०० टॅंकरसाठी दयावे लागतील. हे देखिल लक्षात घ्यायला हवे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी, आपण जर मोफत टॅंकर दिले तर त्यामध्ये भेदभाव करणार नाही सगळयांना देण्यात येईल.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— १ तारखेपासुन टॅंकर बंद करण्यात येणार आहे. त्यानंतर लोकांनी कुठे जावे? यावर काय निर्णय झाला ते सांगा.

मा. महापौर :— आम्ही आयुक्तांना १५ जुलै पर्यंत वाढविण्याबद्दल सांगितले आहे.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— आम्ही तुमच्यावर सोडतो. आपण योग्य निर्णय घेण्यास सक्षम आहात. आम्हांला असे वाटते की, जनतेला पैसे भरण्यास लागु नयेत. नळाद्वारे पाणी दिले तर कुणालाही टॅंकरने पाणी पिण्याची हौस नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— तुम्ही आजच करु शकतात. २० तारीख उलटून गेली आहे. सर्वांचे एकच मत आहे.

मा. महापौर :— आम्ही ठरावाद्वारे मंजुर करतो की, ज्या विभागात पाणी मिळत नाही त्या विभागात टॅंकरद्वारे मोफत पाणी पुरवठा केला जावा.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— मा. महापौरजी याबद्दल मी आपणांस मनापासुन धन्यवाद देते.

मा. महापौर:—सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे

प्रस्तावना:—

प्रस्तावक : श्री किशोर वनवारी

अनुमोदक : श्री राजेंद्रसिंह भुल्लर

विषय क्र. १:— उल्हासनगर शहरातील पाणी टंचाईवर उपाय योजना करणे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ब—याच ठिकाणी पाणी पुरवठा वितरण व्यवस्था ठिक नसल्याने ब—याच विभागात पाणी कमी दाबाने मिळते अथवा अजिबात मिळत नाही. यामुळे शहरात ब—याच

विभागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे. लोकांना पाणी उपलब्ध होत नसल्याने त्यांना पाणी उपलब्ध करुन घेण्यासाठी धावपळ करावी लागत आहे. यामुळे महापालिका प्रशासनाबद्दल सर्वसामान्य जनतेतुन रोष प्रकट होत आहे.

यापूर्वीचा विशेष महासभा ठराव क्र. ९४, दिनांक ८/४/२००५ अन्वये दिनांक दिनांक ३०/०६/२००५ पर्यंत टंचाईग्रस्त भागात टॅकरने करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठयावर वाहतुक खर्चाची आकारणी न करता मोफत पाणी पुरवठा करण्यास मान्यता देण्यात आली होती. दिनांक १/७/२००५ पासुन टॅकरवर वाहतुक खर्चाची आकारणी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

शहरात पाण्याची परिस्थिती बिकट असल्याने व अद्याप सर्व विभागांमध्ये समानरित्या पाणी पुरवठा होत नसल्याने मोफत टॅकर बंद केल्यास शहरातील लोकांना अडचणीला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

जोपर्यंत शहरातील प्रत्येक विभागात नळाद्वारे समानरित्या व पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होत नाही तोपर्यंत टॅकरद्वारे शुल्क वसुल करणे संयुक्तिक होणार नाही. महापालिका प्रशासनाने शहराच्या प्रत्येक भागात व प्रत्येक घराघरात नळाद्वारे समान पाणी पुरवठा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्यानंतरच टॅकरद्वारे शुल्क आकारणी करणे योग्य होईल. म्हणुन महासभेसमोर प्रस्तावित.

<u>विशेष महासभा ठराव क्र :— २२</u> <u>दिनांक:—२०/०६/२००५.</u>

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता शहरात पाणी पुरवठा वितरण व्यवस्था व्यवस्थित करण्यासाठी प्रशासनास निर्देशित करीत आहे आणि खालील प्रयोजनासाठी पूर्वीचा विशेष महासभा ठराव क्र. ९४, दिनांक ८/४/२००५ मध्ये खालीलप्रमाणे अंशत: बदल करीत आहे.

- जोपर्यंत प्रशासन संपुर्ण शहरात नळाद्वारे समान व पुरेशा दाबाने पाणी पुरवठा करीत नाही तोपर्यत टंचाईग्रस्त भागात टॅकरने करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठयावर वाहतुक खर्चाची आकारणी न करता मोफत पाणी पुरवठा करण्यास मान्यता देत आहे.
- या ठरावाद्वारे ज्या सुधारणा करण्यात आल्या आहेत त्या पूर्वीचा महासभा ठराव क्र. ६७, दिनांक १८/२/२००५ चा भाग मानण्यात येतील.

प्रस्तावकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

सांयकाळी ६.३० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—७ मार्च , २००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.७/३/२००५ रोजीच्या
विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा सोमवार दि. ७.३.२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी
२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३७. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३८ | श्री. सुरेश जाधव |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३९ | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४० | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ४१ | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४२. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ४३. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४४. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४५. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १२. | श्री. एडके गणपत गोविंद | ४६. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १३ | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४७ | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| १४. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४८. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १५. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४९. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १६. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५०. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १७. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५१. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १८. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५२. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १९. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंन्द्र | ५३. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २०. | श्री. नाना आनंदा पवार | ५४. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २१. | श्री. जग्यासी राजु | ५५. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २२. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५६. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २३. | श्री. शांताराम निकम, | ५७. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २४. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५८. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २५. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५९. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २६. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६०. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २७. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६१. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २८. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६२. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २९. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६३. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३०. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ६४. | श्रीमती करोतिया मालती |
| ३१. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६५. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३२. | श्रीमती भावना रवी खिलनानी | ६६ | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३३. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६७. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३४. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | ६८. | श्री. हरदास माखिजा |
| ३५. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | ६९ | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३६. | श्री. चव्हाण रमेश महादेव | ७०. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. वाघे शामु बाबु,२. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम,३. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन,४. श्रीमती आहुजा निता प्रकाश,५. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास,६.श्री. मोहन साधवानी, ७. श्रीमती साधवानी जया,८. श्रीमती किरण लखी माखिजा , ९. श्री. संजय रामचंद्र बठीजा, १०. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, ११. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. २२ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव:—</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. १:—</u> उल्हासनगर शहरासाठी सुधारीत विकास योजना तयार करणेकामी इरादा जाहिर करणेस मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—</u>मा. महापौरजी, मा. उपमहापौरजी, सभागृहात उपस्थित असलेले आमचे सर्व सन्माननिय सदस्य..........

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>मा.महापौरजी, हे जे व्हीडीओ शुटींग केले जात आहे, हे लोक कोण आहेत?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौरांनी व्हीडीओ शुटींग करण्यासाठी यांना परवानगी दिली आहे. हे कायदयाच्या तरतुदीनुसार आहे . ज्या कुणालाही येथील कामकाजाचे व्हीडीओ शुटींग करायचे आहे त्यास मा. महापौरांकडुन परवागनी दिली जाते. व बाकी बाबतीत महासभेतील बहुमत निर्णय घेते की त्यांनी सभागृहातील कामकाजाचे व्हिडीओ शुटींग करावे किंवा नाही.

<u>मा.सदस्य श्री. हरदास माखिजा:—</u>मा. महापौरजी, नवनिर्वाचित महापौर व उपमहापौर त्यांच्या आसनावर आसनस्थ झाले आहेत म्हणुन सर्वात प्रथम मी त्यांना शुभेच्छा देवू इच्छितो. दुसरे असे की, उदया आंतरराष्ट्रीय महिला दिवस आहे. उदया महाशिवरात्रीच्या दिवशी संपुर्ण विश्वामध्ये हा दिवस महिला दिन म्हणुन साजरा केला जाईल. व सौभाग्याने उल्हासनगर महानगरपालिकेची महापौर सुध्दा एक महिला झाली आहे. ही गोष्ट सुध्दा आमच्यासाठी आनंदाची आहे. व दुसरी एक गोष्ट अशी आहे की, विश्वामधील ही एक पहिली सिंधी महिला आहे. जी महापौर झाली आहे. यासाठी सभागृहात जेवढे काही आमचे सन्माननिय सदस्य उपस्थित आहेत त्यांना माझे निवेदन आहे की,आजची ही पहिली सभा जी आमच्या नवनिर्वाचित महापौर चालवित आहेत. आजच्या सभा सूचनेवर जेवढे काही विषय आहेत ते शहराच्या हिताचे आहेत. शहराच्या विकासासाठीचे आहेत. म्हणुन नवनिर्वाचित महापौरांचा विशेष आदर राखण्यासाठी आजच्या सभा सूचनेवरील सर्व विषय सर्व संमतीने पारीत केले तर हे फार मोठे रेकॉर्ड होईल. म्हणुन सभागृहातील सर्व सदस्यांना, विरोधी पक्षातील सर्व सदस्यांना माझे निवेदन आहे, सभागृहातील सत्ताधारी पक्षाच्या सर्व सदस्यांना व सभागृह नेत्यांना माझे निवेदन आहे की, आजच्या सभा सूचनेवर जेवढे काही विषय आहेत ते सर्वसंमतीने पारीत केले जावेत कारण की, शहराच्या विकासासाठी आम्ही एक पाऊल पुढे टाकत आहोत. तर हे सर्व विषय जर सर्वसंमतीने पारीत केले तर असे मला वाटते. नवनिर्वाचित महापौरांना एक अतिशय चांगली भेट दिल्यासारखी होईल.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मा. महापौर महोदया, आताच शहरातील प्रथम सिंधी महिला महापौर म्हणुन श्री. हरदास माखिजा यांनी मा.महापौर श्रीमती ज्योती कालानी यांचा उल्लेख केला त्यामध्ये काही दुमत नाही. भारतीय जनता पार्टी व शिवसेनेच्या वतीनेही आम्ही नवनिर्वाचित महापौर व उपमहापौरांना शुभेच्छा देतो. परंतु श्री. हरदास माखिजा यांना कदाचित काही शंका असेल की, आजच्या सभा सूचनेवर जे विषय आले आहेत त्यामध्ये विरोधी पक्षाचे सदस्य विरोध करतील तर मी त्यांना निवेदन करतो की, कृपया सभागृहात जेव्हा येता व सभा सूचनेवर जेव्हा विषय ठेवलेले असतात त्याबाबतीत आपल्या मनामध्ये काही शंका ठेवू नका. कारण की विरोधी पक्ष जो आहे शहर हिताच्या विषयाबाबत नेहमीच सत्ताधारी पक्षाबरोबर राहील. व आजच्या सभेपुढे जे विषय आहेत ते अतिशय महत्वाचे विषय आहेत. हे जे विषय आहेत ते शहराच्या हिताचे आहेत. ज्या विषयांवर विरोध करण्यासारखे असेल त्यावर आम्ही प्रखर विरोध करू. व जे महत्वाचे विषय आहेत त्यांच्यावर सत्ताधारी व विरोधी पक्षांच्या वतीने प्रत्येक विषयावर सविस्तर चर्चा झाली पाहिजे. कारण की आजचे जे विषय आहेत ते १९८२ पासुन

आजपर्यंत या शहरात जी अनाधिकृत बांधकामे झाली. व जी आज सुध्दा होत आहेत व न्यायालयाचे जे आदेश आहेत त्या सर्वाशी निगडित असे विषय आहेत. कारण की या शहराचे पुढील भविष्य यावर अवलंबुन आहे. म्हणुन या विषयावर विस्तृतपणे चर्चा झाली पाहिजे. व या विषयाबाबत शहर हिताचे जे काही कामकाज होईल त्यामध्ये आमचे सहकार्य राहील.

मा. सचिव:—पास?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—सभा सूचनेवरील हा जो पहिल्या व दुस—या क्रमांकाचा विषय आहे. त्यातील पहिल्या क्रमांकाचा विषय सर्व संमतीने पारीत केला जावा.

मा. महापौर:—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १:— उल्हासनगर शहरासाठी सुधारीत विकास योजना तयार करणेकामी इरादा जाहिर करणेस मान्यता देणे.

प्रस्तावना :—

शासन नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र. टि पी एस.१२०२/८०६/ सी आर—८३/२००२/ओडी—१२, दि. २६ ऑक्टोंबर २००४ नुसार (१) शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे अधिकारानुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र 'उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगाव—बदलापुर आणि परिसर अधिसुचित क्षेत्र' यातुन वगळणेचा निर्णय घेतलेला आहे. व परीणामी उल्हासनगर महानगरपालिका आपल्या क्षेत्रासाठी उक्त अधिनियमानुसार 'नियोजन प्राधिकरण' आहे.

त्याचप्रमाणे शासनाने या अधिसुचनेनुसार 'उल्हासनगर महानगरपालिकेने आपल्या क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार करणेबाबत दोन महिन्याचे आत निर्णय घ्यावा. व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ नुसार सुधारीत विकास योजना प्रसिद्‌ध होई पर्यंत मंजुर विकास आराखडा व मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने प्रसिदध केलेल्या प्रारूप सुधारीत विकास आराखडयाचे तरतुदी विकास नियंत्रण नियमावलीसह लागु असतील.' असे निर्देश दिलेले आहेत.

ही अधिसुचना शासन राजपत्र प्रसिद्‌ध झालेपासुन अंमलात येणार असुन ती महाराष्ट्र शासन राजपत्र 'भाग एक' (कोकण विभाग पुरवणी) दि ३ फेबुवारी,२००५ मध्ये प्रसिदध झालेली आहे. त्यामुळे ती त्या दिवसापासुन अंमलात आलेली आहे.

उल्हासनगर शहरासाठीचा विकास योजना शासन निर्णय क्रमांक टि पी एस/१२७२/६०१८५ आ.पी.सी, दि. २०/०५/१९७४ नुसार मंजुर झालेली असुन दि. १/७/१९७४ पासुन अंमलात आलेला आहे.

शासन निर्णय क्रमांक टि पी बी/१२७५/११९९/ युडी ८, दि. १५/३/१९७६ नुसार उल्हासनगर शहराचे क्षेत्रासह 'कल्याण परिसर अधिसुचित क्षेत्र' घोषित करून या क्षेत्रासाठी शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास अधिनियमाचे कलम ४०(१) च्या तरतुदीनुसार 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणुन घोषित केलेले होते. या क्षेत्रात वेळोवेळी बदल झालेतरीही दि. ३/२/२००५ पर्यत उल्हासनगर शहरासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यरत होते. विशेष नियोजन प्राधिकरणाने दि. १८/८/१९८६ रोजी अधिसुचित क्षेत्रासाठी पुर्वीच्या विकास नियंत्रण नियमावली ऐवजी सुधारीत विकास नियंत्रण नियमावली प्रसिद्‌ध करून ती लागु केलेली आहे. व सद्या ही नियमावली लागु आहे.

अधिनियमाचे कलम ३८ नुसार विकास योजना लागु झालेनंतर किमान २० वर्षातुन एकदा किंवा शासन निर्देश देईल त्यावेळेस नियोजन प्राधिकरणाने सुधारीत विकास योजना तयार केली पाहिजे.

तत्कालिन विशेष नियोजन प्राधिकरण मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी विकास नियंत्रण नियमावलीसह सुधारीत प्रारूप विकास योजना तयार करून

अधिनियमाचे कलम २६ नुसार दि. १०/५/२००१ रोजी प्रसिद्ध करून त्याबाबत नागरीकांकडुन हरकती व सुचना मागविणेत आलेल्या होत्या. त्यानुसार उल्हासनगर शहराचे या सुधारीत प्रारूप विकास आराखडयाबाबत विशेष नियोजन प्राधिकरणाकडेस मोठया प्रमाणावर हरकती व सुचना प्राप्त झालेल्या होत्या.

या हरकती व सुचना तसेच नागरीकांचे या विकास आराखडयाबाबतच्या तक्रारी विचारात घेवुन स्थानिक प्राधिकरण उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. २१, दि. ३१/८/२००२ नुसार उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर प्रारूप सुधारीत विकास योजना रद्द करणे व महासभा ठराव क्र. २३, दि. ३१/८/२००२ नुसार उल्हासनगर महानगरपालिका विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अधिसुचित क्षेत्रातुन वगळणेबाबत शासनास विनंती केलेली होती. महानगरपालिकेच्या या प्रस्तावास अनुसरून शासनाने विशेष नियोजन प्राधिकरणास प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांवर सुनावणी घेणेस पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिलेली होती.

अंतिमता शासनाने आपले दि. २६ ऑक्टोंबर २००४ चे अधिसुचनेनुसार महानगरपालिकेचे विनंती मान्य करून उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र अधिसचित क्षेत्रातुन वगळणेचा व उल्हासनगर महानगरपालिकेने सुधारीत विकास योजना तयार करणेबाबत दोन महिन्याचे आत निर्णय घेण्याचे निर्देश दिलेले आहेत. ही अधिसुचना दि. ३/२/२००५ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेने अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे सुधारीत विकास योजना तयार करणेबाबत दि. २/४/२००५ पर्यंत निर्णय घेणे आवश्यक आहे.

नियोजन प्राधिकरणाने विकास योजना तयार करणे व त्यासंबंधी कार्यपद्धती याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये तरतुदी विहीत करण्यात आलेल्या आहेत. या वैधानिक तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

अधिनियमाचे कलम ३८ नुसार नियोजन प्राधिकरणाने विकास योजना अंमलात आलेनंतर वीस वर्षातुन किमान एकदा किंवा शासन निर्देश देईल त्यावेळेस आपल्या क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार केली पाहिजे. व अधिनियमातील विकास योजना तयार करणेचे कार्यपद्धतीबाबत तरतुद अंर्तभुत असलेले कलम २२ ते ३१ मधील तरतुदी अशी सुधारीत विकास योजना तयार करताना शक्य तितक्या प्रमाणात लागु राहतील. अशी तरतुद आहे.

त्यामुळे शासन निर्देशाप्रमाणे सुधारीत विकास योजना तयार करताना अधिनियमातील खालील तरतुदी विचारात घेणे आवश्यक आहे.

कलम २३ नुसार नियोजन प्राधिकरणाने आपल्या क्षेत्राचे सर्वेक्षण करून विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करणेपुर्वी आपल्या ठरावाद्वारे विकास योजना तयार करणे संबंधी इरादा जाहीर केला पाहिजे. व अशा ठरावासह विकास योजनेत समाविष्ट करावयाच्या क्षेत्राचे हद्दि दर्शविणारा नकाशासह ठराव शासनाकडेस सादर केला पाहिजे. त्याचप्रमाणे नियोजन प्राधिकरणाने या इरादयाबाबत आपली अधिसुचना शासन राजपत्र व एक किंवा अधिक स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करून त्याबाबत नागरीकांकडुन ६० दिवसाचे आत हरकती सुचना मागविल्या पाहिजे.

अधिनियमाच्या वर नमुद तरतूदी विचारात घेवुन उल्हासनगर महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ व २३(१) मधील तरतुदीप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार करणेसंबंधी आपला इरादा जाहीर करणेसाठी महासभेपुढे खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१. महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणुन अधिनियमाचे कलम ३८ व २३(१) नुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार करणेचा इरादा जाहीर करणेस मान्यता देणे.

२. सुधारीत विकास आराखडयात समाविष्ट करावयाचे क्षेत्राच्या नकाशासह उपरोक्त ठराव शासनाकडे सादर करणेस मान्यता देणे.

३. सुधारीत विकास आराखडा तयार करणेच्या इरादया संबंधी कलम २३ प्रमाणे शासन राजपत्र व स्थानिक वर्तमानपत्रात सुचना प्रसिद्ध करून नागरीकांकडुन हरकती व सुचना मागविणे.

वरीलप्रमाणे प्रस्तावास महासभेकडुन मान्यता मिळणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

विशेष महासभा ठराव क्र. ७१ दिनांकः—७.३.२००५

सुचकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरासाठी सुधारित विकास योजना तयार करणेकामी प्रस्ताव पुढीलप्रमाणे मान्य करीत आहे.

१. महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणुन अधिनियमाचे कलम ३८ व २३(१) नुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार करणेचा इरादा जाहीर करणे.
२. सुधारीत विकास आराखडयात समाविष्ट करावयाचे क्षेत्राच्या नकाशासह उपरोक्त ठराव शासनाकडे सादर करणे.
३. सुधारीत विकास आराखडा तयार करणेच्या इरादया संबंधी कलम २३ प्रमाणे शासन राजपत्र व स्थानिक वर्तमानपत्रात सुचना प्रसिद्ध करून नागरीकांकडुन हरकती व सुचना मागविणे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः—विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २:— उल्हासनगर शहर सुधारीत विकास योजना तयार करणेसाठी नगररचना अधिका—यांची नेमणुक करणे व त्यासाठी राज्य शासनास शिफारस करणे.

पास?

काही सदस्यः—पास. पास.

मा. महापौरः—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. २:— उल्हासनगर शहर सुधारीत विकास योजना तयार करणेसाठी नगररचना अधिका—यांची नेमणुक करणे व त्यासाठी राज्य शासनास शिफारस करणे.

प्रस्तावना :—

शासन नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र. टि पी एस.१२०२/८०६/ सी आर—८३/२००२/ओडी—१२, दि. २६ ऑक्टोंबर २००४ नुसार (१) शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६५ चे अधिकारानुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र हे “ उल्हासनगर, अंबरनाथ,

कुळगाव–बदलापुर आणि परिसर अधिसुचित क्षेत्र'' यातुन वगळणेचा निर्णय घेतलेला आहे. व परीणामी उल्हासनगर महानगरपालिका आपल्या क्षेत्रासाठी अधिनियमानुसार 'नियोजन प्राधिकरण' आहे.

त्याचप्रमाणे शासनाने या अधिसुचनेनुसार 'उल्हासनगर महानगरपालिकेने आपल्या क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार करणेबाबत दोन महिन्याचे आत निर्णय घ्यावा. असे निर्देश दिलेले आहेत.

शासनाच्या वरील निर्देशाप्रमाणे सुधारीत विकास योजनेचा इरादा जाहीर करणेसंबंधी स्वतंत्र प्रस्ताव महासभेकडेस प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नरगरचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ मध्ये सुधारीत विकास योजना तयार करणेबाबत तरतुद अतंर्भुत असुन त्यानुसार सुधारीत विकास योजना तयार करताना अधिनियमाचे कलम २२ ते ३१ च्या तरतुदी शक्यतोवर लागु राहतील अशी तरतुद आहे.

अधिनियमाचे कलम २४ नुसार विकास योजना तयार करणेसाठी नियोजन प्राधिकरणाने राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने यासाठी विहीत करण्यात आलेली पात्रता धारण करणा–या व्यक्तीची **'नगररचना अधिकारी'** म्हणुन खालील कामासाठी नेमणुक केली पाहिजे.

१) नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्राचे सर्वेक्षण करून त्या क्षेत्राचा 'विद्यमान जमीन वापर नकाशा' तयार करणे.
२) नियोजन प्राधिकरणाकडे सादर करणेसाठी विकास योजनेतील प्रस्ताव तयार
करणे.

महाराष्ट्र विकास योजना नियम १९७० चे नियम क्र. ५ मध्ये नगररचना अधिका–याची पात्रता नमुद करण्यात आलेली आहे.

याकामी राज्य शासनाच्या नगररचना व मुल्य निर्धारण विभागाच्या सेवेतील उपसंचालक किंवा सहाय्यक संचालक दर्जाच्या अधिका–याची उल्हासनगर शहर सुधारीत विकास योजना तयार करणेसाठी नगररचना अधिकारी म्हणुन नेमुणक करणे योग्य होणार आहे. यासाठी शासनाने वरील संर्वगातील 'वास्तुतज्ञ व नगररचना' या विषयातील उच्च पात्रताधारक अधिका–याची नेमणुक करणेसंबंधी राज्य शासनास विनंती करणे आवश्यक आहे.

यासाठी राज्य शासनाकडेस विनंती करणे व यासाठी येणा–या खर्चास मान्यता देणेसाठी महासभेकडेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

विशेष महासभा ठराव क्र. ७२ दिनांकः–७.३.२००५

सुचकाचे नाव :–श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
अनुमोदकाचे नाव :–श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहराची विकास योजना तयार करणेकामी राज्य शासनाच्या नगररचना व मूल्य निर्धारण विभागाच्या सेवेतील उपसंचालक किंवा सहाय्यक संचालक दर्जाच्या अधिका–याची नियुक्ती करणे व त्यासाठी राज्य शासनास विनंती करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः–विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ३ः– उल्हासनगर शहर सुधारीत विकास योजना तयार करणेकामी सल्लागार अभिकरणाची नेमणुक करणेस मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—या विषयावर आम्ही काही बोलु इच्छितो. हा जो सल्लागार नेमण्याचा विषय आहे या अगोदरच्या विषय क्रमांक १ व २ ला आमची संमती आहे. या तिस—या विषयाबाबत आम्हाला काही शंका आहे. व यासाठी या प्रस्तावास आमचा विरोध आहे. शंका व विरोध यासाठी आहे की आम्ही येथे पाहिले आहे की जेव्हा महापालिका एखादया खाजगी व्यक्तीची सल्लागार म्हणुन नेमणुक करते. तर ती कशी करते त्याचे एक उदाहरण मी सांगतो. काही दिवसापुर्वी ४ अधिका—यांची येथे नेमणुक करण्यात आली होती. येथे त्यांची नावे घेतली नाही पाहिजेत. परंतु तरीही मी ती नावे घेत आहे. श्री. मोहन चिजवानी यांना पर्यावरण स्थिती अहवालासाठी सल्लागार म्हणुन नेमा, श्री. कोळेकर सेवानिवृत्त झाले यांना पुन्हा याठिकाणी वसुली अधिकारी म्हणुन नेमा. श्री. दवणे हे दुस—या कुठल्यातरी विभागात काम करत होते त्यांना सुध्दा येथे नेमणुक दिली होती. कधी कधी तर आम्हाला असे वाईट अनुभव आले आहेत. म्हणुन आम्हास असे वाटते की, खाजगी व्यक्ती सल्लागार म्हणुन असु नये की जो आपल्या मनमानी पध्दतीने चालेल, भ्रष्टाचार करेल. कारण की हा एक संवेदनाशिल विषय आहे. जेव्हा शहराचा नविन विकास आराखडा तयार होतो त्या संबंधितील अधिकारी कार्यक्षम व निपक्षपाती काम करणारा असा असला पाहिजे. हे मी यासाठी म्हणत आहे कारण की मागच्या वेळेस असे झालेले आहे. जे सल्लागार नेमले होते ते पुर्णपणे कार्यक्षम नव्हते. आणि म्हणुन यासाठी आम्हाला एक शंका आहे व यासाठी आम्ही या प्रस्तावास विरोध करतो की कोणताही खाजगी सल्लागार न नेमता, शासनाकडुन जसे आपण दुस—या ठरावामध्ये लिहिले आहे की शासनाचे नगररचनाकार, सहाय्यक संचालक असावेत अशाप्रकारे त्यांच्या सहाय्यतेसाठी दुसरे जे नगररचना विभागाचे अधिकारी आहेत त्यांची नियुक्ती झाली पाहिजे. खाजगी व्यक्तीची नेमणुक होता कामा नये.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—आयुक्त साहेब, जसे की मा. सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की खाजगी सल्लागाराच्या नेमणुकीस आमचा विरोध आहे या विरोधाची कारणे ही आहेत की, आयुक्त साहेब यासाठी अंदाजित खर्च किती असेल? आमच्या आस्थापना सूचीवर नगररचनाकार, सहाय्यक संचालक नगररचना व सहाय्यक नगररचनाकार ही पदे मंजुर आहेत या पदांवरील खर्च किती आहे.? हा जो दोन वर्षाचा कार्यकाल दिला आहे या कार्यकालावधीत हे लोक हे काम करू शकतात किंवा नाही? जर खाजगी व्यक्तीस आम्ही ठेका दिला तर याकामी किती खर्च होईल? खर्चा व्यतिरिक्त या नगररचना विभागामार्फत जे काही सल्लागार नेमले त्यांच्यावरील खर्च व्यर्थ गेला आहे. १९९६—९७मध्ये जेव्हा येथे महापालिका स्थापन झाली त्यावेळेस आयुक्त म्हणुन श्री. शुळ साहेब होते. त्यांनी हवाई सर्वेक्षण केले. तो सुध्दा खाजगी व्यक्तीमार्फत तो खर्च सुध्दा व्यर्थ गेला त्याचा काहीही उपयोग महानगरपालिकेला किंवा महापालिकेच्या लोकांना झालेला नाही. त्यानंतर अशीच एक संस्था टाटा कंन्सल्टंन्सी या नावाने या उल्हासनगर महानगरपालिकेत आणली गेली. मिळकतींच्या सर्वेक्षणाखाली ८४ लाख रू. त्याचा खर्च दाखविला गेला. पैकी ४० लाख त्यांना अगोदर दिले. तो ही खर्च पाण्यात गेला. तर हे काम करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा अधिकारी, जसे बाकीचे अधिकारी प्रतिनियुक्तीवर आलेले आहेत. तसे नगररचना विभागामध्ये नगररचना विभागातील अधिकारी प्रतिनियुक्तीवर आले तर आपल्याला विहित मुदतीत ते काम करून घेवुन पुन्हा तो खर्च आपल्याला टाळता येईल आणि उल्हासनगरमधील परिस्थिती पहाता, पक्षपातीपणा पाहता नि:पक्षपातीपणा किंवा पारदर्शीपणा दाखविण्यासाठी शासनाकडुन येणारे जे अधिकारी आहेत तेच अधिक चांगल्याप्रकारे काम करू शकतील अन्यथा इतर सल्लागार संघटनांनी जे काम केले आहे त्याचीच पुनरावृत्ती होणार आहे हा विषय तर भावनिक आहे. म्हणुन खाजगी सल्लागार न नेमता नगररचना विभागाच्या आस्थापना सूचीवर नगररचना विभागाशी संबंधित असलेली पदे भरून त्यांचा खर्च किती असेल हे जरी आता सांगितले तर बरे होईल. म्हणुन हा प्रस्ताव तयार करताना तुम्ही खर्चाचा सुध्दा आकडा काढलेला असेल.

सचिव साहेब, हे काय आहे? प्रेसवाले आहेत की कोण आहेत? महापौर महोदयांनी व्हीडीओ शुटींग करण्यासाठी यास परवानगी दिली असेल परंतु याचा दुरूपयोग होता कामा नये. जर आपणांस प्रचार माध्यमांना सभेचे कामकाज थेट प्रक्षेपणाव्दारे दाखवायचे असेल तर पुर्णच्या पुर्ण थेट प्रक्षेपण दाखवा. जर आपणांस आपल्या कामकाजामध्ये पारदर्शकता राखायची असेल तर हे काही मोजके भाग दाखविण्याचे प्रकार टाळा. असे होता कामा नये. मग तो अ,ब,क कोणीही असो. जर आपण थेट प्रक्षेपण करत असाल तर फारच चांगली गोष्ट आहे. महापौर महोदया, आपण परवानगी दिली असेल, परवानगी मागण्याचा अधिकार सर्वांना आहे परंतु गैर उपयोग होता कामा नये. एखादया व्यक्तीला आपला व्यक्तीगत स्वार्थ दाखविण्यासाठी महासभेचा उपयोग करून घेता कामा नये. सभागृहाची पवित्रता राहिली पाहिजे. जर पारदर्शकता दाखवायची असेल तर सभागृहाच्या संपुर्ण कामकाजाचे थेट प्रक्षेपण झाले पाहिजे.

मा. महापौर:—आपण निश्चिंत रहा. कोणत्याही गोष्टीचा गैरउपयोग होणार नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—हे जनादेश या वृत्त वाहिनीचे पत्रकार आहेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—जनादेश ही खाजगी वृत्तवाहिनी आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी / श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—कोणत्याही खाजगी वृत्त वाहिनीच्या पत्रकारास सभागृहात येवु दिले नाही पाहिजे. त्यांना सभागृहातुन बाहेर काढा.

मा. महापौर:—जनादेश ही एक शहरातील बातम्या देणारी वृत्त वाहिनी आहे.

यावेळी सत्ताधारी पक्षातील व विरोधी पक्षातील काही सन्माननिय सदस्य एकाच. वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—तर मग सर्व वृत्त वाहिन्यांच्या पत्रकारांना परवानगी दयावी लागेल?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—महापौर महोदया, ही आपल्या अधिकारातील बाब आहे.

यावेळी सत्ताधारी पक्षातील व विरोधी पक्षातील काही सन्माननिय सदस्य एकाच. वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—सन्माननिय सदस्य श्री. धनंजय बोडारे यांना मा. महापौरांनी आश्वासन दिले आहे की, याचा काहीही दुरूपयोग होणार नाही. यानंतर पुन्हा आपण हा मुद्दा उपस्थित करावयास नको होता. ते सभागृहामध्ये मा. महापौरांच्या परवानगीने आलेले असल्याने हा मुद्दा येथे संपुष्ठात आणला जावा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—यांना सभागृहातुन बाहेर काढा. नाहीतर आम्ही सभागृहाचे कामकाज चालु देणार नाही.

मा. महापौर:—त्यांना बाहेर काढता येणार नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—महापौरांनी निर्णय दिल्यानंतर त्यांना बाहेर काढता येणार नाही. सभागृहामध्ये महापौरांचाच अधिकार चालेल.

मा. महापौर:—याबाबत मी आपणांस यापुर्वीच खात्री दिली आहे , आजची ही जी सभा आहे या सभेमध्ये शहरातील अतिशय महत्वाचे विषय..........

यावेळी विरोधी पक्षातील काही सन्माननिय सदस्य एकाच. वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—याबाबत मा. महापौरांनी सांगितले आहे की मी परवानगी दिलेली आहे. मा. महापौरांनी परवानगी दिली आहे तर याबाबत हरकत उपस्थित करण्यात काहीच अर्थ नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—शहरातील अतिशय महत्वाचे मुद्दे या सभेत आहेत तर आपण एक तास सभेचे कामकाज स्थगित करा.............

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—हे मा. महापौरांच्या अधिकार क्षेत्रात येते की थेट प्रक्षेपण करायचे की काही ठराविक भागांचे व्हीडीओ शुटींग करायचे. यासाठी यावर हरकत घेण्यास काही अर्थ नाही.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—पाहिजे तर यावर मतदान घेतले जावे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—घ्या मतदान घ्या. धक्का मारून बाहेर काढा. थांबा थोडा वेळ आम्ही त्यांना उचलुन बाहेर काढतो.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—हा मा. महापौरांचा अधिकार आहे. आपणांस काय हरकत आहे?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—महापौरांच्या आदेशानंतर.........

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—मा. महापौरांच्या आदेशाची गोष्ट नाही. सभागृहाच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण ठेवा. पाहिजे तर एक तास सभेचे कामकाज तहकुब करा. एवढे महत्वपुर्ण विषय आहेत. पाहिजे तर एक तास सभेचे कामकाज स्थगित करा. पण सभागृहाच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण करा. नाहीतर आम्ही सभागृहाचे कामकाज चालु देणार नाही. आम्ही सभागृहाचे कामकाज चालु देणार नाही. खाजगी वृत्तवाहिनीचा तो पत्रकार जोपर्यंत सभागृहातुन बाहेर जात नाही. तोपर्यंत आम्ही सभागृहाचे कामकाज चालु देणार नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—आम्ही सभागृहाचे कामकाज कसे चालु देणार?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—आपणांस सभागृहाचे कामकाज चालवायचे असेल तर शहर महत्वाचे आहे की सभागृहाच्या कामकाजाचे व्हिडीओ शुटींग करणारा खाजगी वृत्त वाहिनीचा हा पत्रकार महत्वाचा आहे याबाबतीत आपणांस निर्णय घ्यायचा आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—प्रश्न मा. महापौरांनी दिलेल्या परवानगीचा आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—शहर विकासाचे मुद्दे महत्वाचे आहेत की, हा खाजगी वृत्त वाहिनीचा पत्रकार?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—मा. महापौरांची परवानगी घेवुन हे सभागृहात आलेले आहेत म्हणुन आपण हा विषय जास्त ताणता कामा नये. व मा. महापौरांचा हा अपमान आहे की, त्यांच्या आदेशानंतर सुध्दा आपण बोलत आहात. हा मा. महापौरांच्या आदेशाचा अपमान आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—नाही. नाही. थेट प्रक्षेपण करा.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—या सभेमध्ये दादागिरी चालणार नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—महापौरांचा निर्णय आहे की ते सभागृहात राहतील. महापौरांच्या अधिकाराची ही गोष्ट आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—पायंडा पडला जाईल म्हणुन यांना सभागृहाच्या कामकाजाचे व्हीडीओ शुटींग करू देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. आम्ही सभेचे कामकाज चालु देणार नाही. आपण सभेचे कामकाज एक तास स्थगित करा. व सभागृहाच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण करा. आम्ही आता फोन करतो थेट प्रक्षेपण करणा—यास बोलावुन घेतो.तो सभागृहाच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण करेल. पाहिजे तर सभेचे कामकाज एक तास स्थगित करा. सन्माननिय महापौरजी त्यास सभागृहातुन बाहेर काढले जावे. आपण एक तास सभेचे कामकाज स्थगित करा. थेट प्रक्षेपण करणा—यास बोलवा. तो सभागृहाच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण करेल. ही काही लहान गोष्ट नाही फार मोठी गोष्ट आहे. छोटी गोष्ट आहे तर मग त्यास सभागृहातुन बाहेर काढा.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—मा. महापौरजी, हा विषय येथे संपला पाहिजे. कारण की ते आपल्या परवानगीने सभागृहात आले आहेत. व हे जे व्हीडीओ शुटींग करतील त्यात कुठलीही कटछाट न करता ती कॅसेट महापालिका सचिवांकडे जमा केली जाईल. व ही कॅसेट जशीच्या तशी केबलवर दाखविली जावी.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—प्रश्नच उद्‌भवत नाही. जोपर्यंत तो माणुस सभागृहातुन बाहेर निघत नाही तोपर्यंत सभागृहाचे कामकाज चालु दिले जाणार नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—हे महापौरांच्या अधिकार क्षेत्रात आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—आम्ही मा. महापौरांचा मान ठेवतो. नाही तर यांना आम्ही एक मिनिटात बाहेर काढले असते. यात फार मोठी काही गोष्ट नाही.

मा.महापौर:—आपण ही जी जिद्द करत आहात की, ते सभागृहातुन बाहेर निघाले नाहीत तर सभेचे कामकाज चालु देणार नाही. हे बरोबर नाही. त्यांना परवानगी दिली आहे. परवानगी घेवुनच ते सभागृहात आले आहेत. आपण जे म्हणत आहात की पुर्ण कॅसेट दाखविली पाहिजे. तर याबाबतीत आपणांस माहित असले पाहिजे की, हया ज्या कॅसेटस असतात त्या महापालिका सचिवांकडे जमा केल्या जातात. त्यानंतरच त्यांचे वृत्तवाहिन्यांवर प्रसारण केले जाते.

मा. उपमहापौर:—हे पहा महाराजजी, त्यांना बसण्यास परवानगी दिली आहे तर त्यांचा अपमान करू नका ते मा. महापौरांच्या परवानगीने सभागृहात आले आहेत कृपया त्यांच्याबाबतीत एवढी जिद्द करू नका. महाराजजी त्यांना बसु दिले जावे. ठिक आहे कुणाची बेइज्जत करू नये. ते पण पत्रकार आहेत.
मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—ठिक आहे. परंतु त्याने जर पुन्हा व्हिडीओ शुटींग करण्याचा प्रयत्न केला तर मग आम्हाला काही बोलु नका. त्यास सांगा कॅमेरा बंद करा.

मा. उपमहापौर:—अशाप्रकारे दादागिरीने आपण बोलु नये.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—उदया महिला दिन आहे. आम्ही आपला मान ठेवुन आम्ही त्यास सभागृहात बसु देत आहोत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—आयुक्त साहेब, एक मिनिट..........

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—मा. आयुक्त साहेब याबाबतीत कायदा काय आहे त्याचे जरा स्पष्टीकरण केले जावे मा. महापौरांनी सभागृहात जो निर्णय दिला आहे. त्याबाबतीत आम्ही सभागृहात काय करू शकतो याबाबत आपण आपले मत दया. नियमामध्ये काय तरतुद आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—मा. आयुक्त साहेब या ठरावामध्ये खाजगी सल्लागार संस्था नियुक्त करण्यासाठी महापालिकेला किती खर्च येणार आहे? खाजगी संस्थेला हे काम दिल्यानंतर त्यांचे दुष्परीणाम होवु नयेत यासाठी काय उपाययोजना आहे का? दुष्परीणाम मी दोन सांगितले होते. हवाई सर्वेक्षण केले ते असेच पडुन आहे पुढे काही कारवाई झालेली नाही. ते करताना सुध्दा प्रशासनाने हाच उद्देश ठेवलेला होता की भविष्यात जो विकास आराखडा तयार करायचा आहे. त्यासाठी तो उपयोगी येईल परंतु त्याचा कुठेही उपयोग करण्यात आलेला नाही. त्यानंतर टाटा कंन्सल्टंन्सीची ही जी योजना होती. त्यामध्ये मिळकतींचे सर्वेक्षण करून बिल आकारणी करायची होती. त्यासाठी ८४ लाखाचा खर्च प्रस्तावित होता. त्यापैकी त्यांना जे ४० लाख दिले ते पाण्यात गेले. त्याचा काही उपयोग झाला नाही. आणि अशा ब—याचशा योजना आपल्या महापालिकेत खाजगी तत्वावर येत आहेत. तर लोकांचा असा भ्रम व्हावयास नको की उल्हासनगर महानगरपालिका ही एक खाजगी प्रायव्हेट लिमिटेड कंपनी होत चालली आहे. तर हे टाळण्यासाठी आपल्या आस्थापना सूचीवर जी मंजुर पदे आहेत. शासनाकडुन आलेले अधिकारी निपक्षपातीपणे काम करतात असा आमचा अनुभव आहे. तुमचा अनुभव वेगळा असेल तर तसे सांगा. नाहीतर चुकीचे आहे. ते टाळण्यासाठी तुम्ही खाजगी संस्था आणत आहात हे तुम्ही तुमच्या प्रस्तावामध्ये नमुद केले आहे. परंतु तरीही माझी खात्री आहे की शासनाकडुन आलेले अधिकारी हे निपक्षपातीपणे काम करतात. आणि उल्हासनगरचा मागील इतिहास पाहिला. या विभागात निपक्षपातीपणे काम करणारे अधिकारीच असावेत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री.आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, सभागृहासमोर हा जो प्रस्ताव आहे. त्या प्रस्तावाबाबत शंका व्यक्त करण्यात आल्या. एक तर श्री. लाल पंजाबी साहेबांनी सांगितले की जे सल्लागार नेमले त्यांच्याबाबतीत त्यांच्या काही हरकती होत्या. सल्लागारांच्या नेमणुका रद्द केल्या आहेत. वैयक्तिकपणे एकेकाची नेमणुक केली होती. आम्ही एक सल्लागार समिती नेमु इच्छितो. ते त्यांच्या क्षेत्रामध्ये तज्ञ असतील ही एक अशी कंपनी की जीच्याकडे नगररचनेचे आर्थिक व्यवहारांचे शहर विकासासाठी जे तज्ञ पाहिजेत ते या समितीमध्ये असतील. आजपर्यंत जेव्हा जेव्हा विकास आराखडा तयार केला हा जो दुस—या क्रमांकाचा प्रस्ताव आहे. नियोजन

अधिका—याच्या नेमणुकीचा तसे तर नियोजन अधिकारी व नियोजन पथक निर्माण केले आहे. व या नियोजन पथकात एक सहाय्यक संचालकांच्या दर्जाच्या अधिकारी नेमला जात होता. व त्यास मदत करण्यासाठी दोन किंवा तीन सहाय्यक नगररचनाकार व काही कनिष्ठ अभियंत्यांची नेमणुक केली जात होती. म्हणजे हे सर्व जण मिळुन पाच दहा लोकांचे एक पथक तयार होत होते. आजपर्यंत जेवढे काही या नियोजन पथकाने विकास आराखडे तयार केले. त्यास दोन वर्षपेक्षा कमी कालावधी कधी लागला नाही. व काही ठिकाणी तर असे आहे. १९९५मध्ये इरादा घोषित केला, २००० मध्ये मसुदा आराखडा तयार केला व आता २००५ हे वर्ष चालु आहे तरी सुध्दा त्यांचा विकास आराखडा अदयाप मंजुर झालेला नाही. म्हणजे एका शहराच्या विकास आराखडयास, पहिले कायदयामध्ये अशी तरतुद होती की कोणत्याही शहरासाठी जो विकास आराखडा तयार करायचा आहे तो दहा वर्षासाठी तयार करायचा आहे. त्यांनतर त्यामध्ये सुधारणा करण्यात आली व विकास आराखडा २० वर्षासाठी तयार करण्यात येवु लागला. तर २० वर्षाचा आराखडा तयार करण्यासाठी जर १० वर्षाचा कालावधी लागत असेल तर नियोजन काय होईल? व आजपर्यंत असेच होत गेले. विकास आराखडा तयार करण्यामध्ये जो वेळ गेला त्यामुळे ना आराखडा विकसित झाला ना शहराचा काही विकास झाला. मागच्या वेळेस पिंपरी—चिंचवड महानगरपालिकेचे जे क्षेत्र वाढविले गेले त्यांनी नियोजन अधिकारी जो नेमायचा तो शासनाचा अधिकारी नेमला व त्याच्या मदतीसाठी जे पथक नेमले ते त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचे नेमले १२० किलो मीटर क्षेत्राचे त्यांनी जे सर्वेक्षण केले त्याचा एकुण खर्च जो होता तो ५४ लाख रूपये होता. त्यांचा जो विकास आराखडा आहे तो तयार झाला व मंजुर सुध्दा झाला. व त्याअगोदर संचालकांच्या कार्यालयातील जे अधिकारी होते त्यांच्यामार्फत जे विकास आराखडे तयार करण्यात आले त्यामध्ये कल्याण —डोंबिवलीचा समावेश आहे. कुळगाव बदलापुर अंबरनाथचा समावेश आहे. एवढेच काय उल्हासनगर महानगरपालिकेचा स्वत:चा सुधारित विकास आराखडा तयार केला होता. हे जे आराखडे तयार केले यामध्ये ब—याचशा चुका झाल्या. येथे मी अशाप्रकारचे निवेदन करणे उचित नाही. परंतु माझ्याकडे तसे पुरावे सुध्दा आहेत. आपण कल्याणचे उदाहरण घ्या. कल्याणचा पहिले जो आराखडा तयार केला त्यामध्ये रिमोट सेनसिंग द्वारे मापे घेण्यात आली. त्याचे सुपर इनपोझिंग झाले नाही. त्यामध्ये काही चुका झाल्या त्यामुळे संपुर्ण विकास आराखडाच चुकीचा झाला. आज त्या विकास आराखडयाची छाननी करण्यास कित्येक वर्ष लागतील अशाप्रकारेच उल्हासनगरचा सुध्दा विकास आराखडा तयार करण्यात आला होता. उल्हासनगरचे एकुण क्षेत्र १३००हेक्टर होते. विकास आराखडा तयार करताना तो १३३४ हेक्टरचा तयार करण्यांत आला. कसे झाले ३४ हेक्टर कोठुन आले. आपणां सर्वांना माहित आहे, आपण ठराव केला आहे. अशाप्रकारच्या चुका होवु नये जो आराखडा आम्ही तयार करू तो कमी वेळेत व बिनचुक तयार होईल. योग्य असा आराखडा तयार व्हावा. त्यासाठी आम्ही प्रस्तावित केले आहे की, एक अशी संस्था जिच्याकडे अत्याधुनिक अशी माहिती तंत्रज्ञान आहे. कार्यक्षम असे कुशल तंत्रज्ञ आहेत. अशा संस्थेकडुन जर हा विकास आराखडा तयार केला तर तो कमी वेळेत चांगला आराखडा तयार होईल. व आपणांसर्वांचे जे एक ध्येय आहे की या शहरास योग्य असे नियोजन करून एक चांगले असे शहर तयार करण्याचे आपले ध्येय पुर्ण होईल. नाही तर या अगोदर जो सुधारित विकास आराखडा तयार केला होता आपणांमधील काही लोक विकासकर्ते असतील तर आपणांस माहित असेल विकास परवानगी देण्यासाठी आज किती अडचणी येतात. व त्याचे परिणाम असे आहेत की, अनाधिकृत बांधकामे मोठया प्रमाणावर होत आहेत. हे जर थांबवायचे असेल विकास आराखडा तयार करताना ज्या चुका झाल्या आहेत त्याजर सुधारायच्या असतील तर एक तज्ञ अशी समिती नेमणे जरूरीचे आहे. पिंपरी—चिंचवड चा जो एकुण अपेक्षित अंदाजीत खर्च होता तो ५४ लाखाचा होता. व त्यांनी अतिशय कमी वेळेत आराखडा तयार करून राज्य शासनाकडे मंजुरीस पाठविला. जर याच पध्दतीने आपण केले तर आजच्या अति प्रगत अशा तंत्रज्ञानाचे सहाय्य घेवुन एक चांगला आराखडा येथे तयार होवु शकतो. विकास प्राधिकरण पथक जर येथे आले जर दहा अधिकारी जरी आले त्यांना तीन किंवा चार वर्षे जरी लागली. या चार वर्षात जो काही खर्च होईल. त्या पेक्षा थोडा अधिक खर्च येथे होवु शकतो. परंतु कमी वेळेत विकास आराखडा तयार होईल. व ज्या मानवी चुका मोठया प्रमाणावर होतात. तंत्रज्ञानाच्या योग्य त्या वापरामुळे मानवी चुका होणार नाहीत असे मला वाटते. हा जो प्रस्ताव आहे या प्रस्तावामध्ये कोणत्याही प्रकारच्या त्रुटी आढळुन येत नाहीत. माझी सभागृहास विनंती आहे की हा प्रस्ताव पारीत केला तर एक चांगलया प्रकारचा विकास आराखडा आम्ही या शहरास देवु शकतो व तो ही अतिशय कमी वेळेत.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>आयुक्त साहेब, आपण जे म्हंटलात त्याबाबतीत आपणांवर आमचा पुर्ण विश्वास आहे. आम्हाला असे वाटते की असा कोणताही वास्तु विशारद असाता कामा नये. की ज्याला स्वत:ला यामध्ये सारस्य आहे किंवा अधिकाधिक सारस्य आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त:— </u>मा. महापौर महोदया, मी माझ्या प्रस्तावामध्ये स्पष्ट केले आहे की, एक स्पर्धात्मक निविदा मागवुन नेमणुक केली जाईल. या नेमणुकांमध्ये सुध्दा पारदर्शकता असेल......

मा. सचिवः—पास?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—सचिव साहेब, ही गोष्ट प्रथम स्पष्ट केली जावी की मा. महापौरांनी व्हिडीओ शुटींगसाठी जी परवानगी दिली आहे. व्हिडीओ शुटींगचे ते काम महापौरांच्या परवानगीनंतर सभागृहात होवु शकते किंवा नाही. जेथपर्यंत नियम, कायदयांची आम्हाला माहिती आहे त्यानुसार हे मा. महापौरांच्या अधिकार व कार्यक्षेत्रात येते. त्यांनी सभागृहात कुणाला प्रवेश दयायचा कुणाला नाही दयायचा. व व्हिडीओ शुटींग करण्याची परवानगी मा. महापौरांनी दिली आहे. त्यावर हे जे आक्षेप घेतात. तो मा. महापौरांच्या आदेशाचा / निर्देशाचा अपमान आहे. महापौर महोदया, आपल्या आदेशाचा अपमान हा संपुर्ण सभागृहाचा अपमान आहे, सत्ताधारी पक्षाचा अपमान आहे.

मा. सचिवः—सभागृहाच्या आत कुणाला येवु दयायचे, कुणाला नाही. हे मा. महापौरांच्या कार्यक्षेत्रातर्गत आहे. त्याचप्रमाणे व्हिडीओ शुटींगसाठी परवानगी देणे हे सुध्दा त्यांच्या कार्यक्षेत्रा अंतर्गत आहे. परंतु आपल्या विनियमानुसार जे व्हिडीओ शुटींग होईल त्याची पुर्णच्या पुर्ण कॅसेट कोणतीही कटछाट न करता दाखविली पाहिजे. जर पत्रकारीता करण्यासाठी सभागृहातील कामकाजाचे काही अंश त्यांना पाहिजे असतील तर ते पत्रकार कक्षात जावुन तेथुन ते सभागृहातील कामकाजाचा काही अंश चित्रीत करून घेवु शकतील. जर ते संपुर्ण कामकाजाचे चित्रिकरण करत असतील व ती कॅसेट आमच्याकडे ठेवत असतील तर त्यामध्ये कुठलीही हरकत असता कामा नये.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—हरकत कशासाठी ? आम्हास हे मान्य आहे.

मा. सचिवः—संपुर्ण कामकाजाचे चित्रीकरण करावे लागेल. कोणतीही कटछाट न करता.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः—कृपया त्यांना परवानगी दिली जावी.

मा. सचिवः—मा. महापौरांनी याबाबत जर परवानगी दिली आहे व याबाबतीत जर कुणाला हरकत असेल तर त्यावर सुध्दा बहुमताने निर्णय घेतला जावु शकतो.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—आभारी आहे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः—मा. महापौरजी, त्यांना आदेश दया की त्यांनी व्हिडीओ शुटींग सुरू करावे.

मा. महापौरः—मी सभागृहाला यापुर्वीच खात्री दिली आहे की, याचा काहीही दुरूपयोग होणार नाही. व नियमानुसार ही जी कॅसेट असते ती तशीही सचिव साहेबांकडे जमा होत असते. व संपुर्ण कामकाजाचे चित्रीकरण होईल. व ते दाखविले जाईल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—महापौर महोदया, कुण्या एकाच वृत्त वाहिनीने येथे चित्रीकरण करू नये. बाकी जेवढे काही वृत्त वाहिन्या आहेत. त्या सर्वांना सभागृहाच्या कामकाजाचे चित्रीकरण करण्यास परवानगी मिळाली पाहिजे. व त्यांनी सभागृहाच्या कामकाजाचे संपुर्णपणे चित्रीकरण केले पाहिजे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः—तत्पुर्वी मी माहिती देवु इच्छितो की, धनुषधारी वर्तमानपत्रवालेच सुरवातीस सभागृहातील कामकाजाचे चित्रीकरण करत होते. ते आज आमच्या बरोबर येथे सभागृहात उपस्थित आहेत. यापुर्वी सुध्दा एकच पत्रकार सभागृहातील कामकाजाचे चित्रीकरण करत होता. धनुषधारी चॅनेलवाले चित्रीकरण करत होते. त्यावेळस आम्ही त्यांना परवानगी देत होतो.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—ते थेट प्रक्षेपण करत होते.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः—याचे सुध्दा प्रक्षेपण होईल. कोणतेही चुकीचे काम होणार नाही.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:**—मा. महापौरजी, त्याचबरोबर आमच्या विरोधी पक्षनेत्यांना मी एक पत्र दिले आहे. मागील वेळेस स्थायी समिती सभेमध्ये एक निर्णय झाला होता. सुनामीग्रस्तांच्या मदतीसाठी सर्व नगरसेवक आपले एक महिन्याचे मानधन देतील. आम्ही लोकांनी स्वाक्ष—या करून मा. विरोधी पक्षनेता सर्व पक्षांचे गटनेते श्री. दिलीप गायकवाड व इतर सर्व नगरसेवकांनी स्वाक्षरी करून दिलेली आहे. परंतु त्याचबरोबर मी एक विनंती करेन की, या महिन्यापासुन सर्व सदस्यांचे मानधन जे ३००० चे ४००० झाले आहे. पहिले ३००० रू. मानधन दिले जात होते त्यानुसार सुनामीग्रस्तांना मदत म्हणुन प्रत्येक नगरसेवकांचे रूपये ३००० दिले जावेत. व उर्वरित जे १००० रूपये जे महाराष्ट्र शासनाने आम्हा नगरसेवकांना वाढवुन दिले आहेत त्याबद्दल आम्ही महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो. व ३००० रूपये सर्व संमतीने सुनामीग्रस्तांना मदत करण्याचे माझे व विरोधी पक्ष नेता यांचे अपिल आपण सर्व सदस्यांनी मान्य केलेत त्याबद्दल मी आपणासर्व सदस्यांचे आभार मानतो धन्यवाद.

**मा. सचिव :**—सुनामीग्रस्तांना मदत म्हणून मानधनाची रक्कम देण्यास कोणाची काही हरकत आहे काय? सर्वसंमतीने?

**मा. महापौर :**—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

**विषय क्र. ३:—** उल्हासनगर शहर सुधारीत विकास योजना तयार करणेकामी सल्लागार अभिकरणाची नेमणुक करणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना :—**

शासन नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र. टि पी एस.१२०२/८०६/ सी आर—८३/२००२/ओडी—१२, दि. २६ ऑक्टोंबर २००४ नुसार (१) शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६५ चे अधिकारानुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र हे '' उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगाव—बदलापुर आणि परिसर अधिसुचित क्षेत्र'' यातुन वगळणेचा निर्णय घेतलेला आहे. व परीणामी उल्हासनगर महानगरपालिका आपल्या क्षेत्रासाठी अधिनियमानुसार 'नियोजन प्राधिकरण' आहे.

त्याचप्रमाणे शासनाने या अधिसुचनेनुसार 'उल्हासनगर महानगरपालिकेने आपल्या क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार करणेबाबत दोन महिन्याचे आत निर्णय घ्यावा. असे निर्देश दिलेले आहेत.

शासनाच्या वरील निर्देशाप्रमाणे सुधारीत विकास योजनेचा इरादा जाहीर करणे व नगररचना अधिका—याची नेमणुक करणेबाबत स्वतंत्र प्रस्ताव महासभेकडेस प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नरगरचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ मध्ये सुधारीत विकास योजना तयार करणेबाबत तरतुद अतंर्भुत असुन त्यानुसार सुधारीत विकास योजना तयार करताना अधिनियमाचे कलम २२ ते ३१ च्या तरतुदी शक्यतोवर लागु राहतील अशी तरतुद आहे.

अधिनियमाचे कलम २२ मधील विकास योजनेत अंर्तभुत असणा—या बाबी नमुद करण्यात आलेल्या आहेत.

अधिनियमाचे कलम २५ नुसार नियोजन प्राधिकरणाने कलम २३ नुसार विकास योजना तयार करणेचा इरादा जाहीर केलेपासुन सहा महिन्याचे कालावधीचे आत विकास योजना तयार करणेसाठी आपल्या क्षेत्राचे सर्वेक्षण करून जमीनिचा अस्तिवातील वापर दर्शविणारा 'विद्यमान जमीन वापर नकाशा' तयार केला पाहिजे.

कलम २६(१) चे तरतुदीनुसार नियोजन प्राधिकरणाने कलम २३ नुसार विकास योजना तयार करणेचा इरादा जाहीर केलेपासुन दोन वर्षाचे आत प्रारूप विकास योजना तयार करून त्यासंबंधी नागरीकांकडुन हरकती व सुचना मागविणेसंबंधी शासन राजपत्रात नोटीस प्रसिद्ध केली पाहिजे.

कलम २६(२) नुसार विकास योजना प्रसिद्ध करताना नागरीकांना उपलब्ध करून दयावयाचे बाबी नमुद केलेल्या आहेत.

वरीलप्रमाणे सर्वेक्षण करून विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करणे व त्यानुसार प्रारूप विकास योजनेचे प्रस्ताव सादर करणे. हे काम नेमणुक करण्यात आलेले नगररचना अधिकारी यांनी करावयाचे आहे.

याकामी नगररचना अधिकारी यांना विकास योजना तयार करणकामी सहाय्यासाठी नगररचना विभागाकडील अधिकारी व कर्मचारी यांना प्रतिनियुक्तीवर घेवुन स्वतंत्र विकास योजना कक्ष निर्माण करण्यात येतो. व या कक्षाकडुन नगररचना अधिकारी यांचे मार्गदर्शन नियंत्रणाखाली वरीलप्रमाणे काम करण्यात येते. व यासाठी

येणारा सर्व खर्च हा नियोजन प्राधिकरणाने करावयाचा असतो. परंतु विभागाकडे असलेले मर्यादीत मनुष्यबळ व इतर बाबीमुळे अशा पद्धतीने विकास योजना तयार करणेसाठी अधिनियमात नमुद केलेले कालावधी पेक्षा मोठा कालावधी लागतो. व याकामी शासनाकडुन वारंवार मुदत वाढ घ्यावी लागते.

स्वतंत्र विकास योजना कक्ष जरी निर्माण केला तरी क्षेत्राचे सर्वेक्षण करणे व त्यावरील अस्तिवातील जमीन वापर नकाशा ही कामे अचुक व कमी वेळेत होणेसाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करणे अनिवार्य आहे. व त्यासाठी खाजगी क्षेत्रातील या विषयाच्या तज्ञ व संस्था यांची मदत घ्यावी लागते.

उल्हासनगर शहरासाठी सुधारीत विकास आराखडा तयार करताना खाली नमुद सद्य परिस्थिती विचारात घेणे आवश्यक आहे.

१) शहरातील बहुतांश भाग हा विकसित असुन दाट लोकवस्ती आहे.
२) शहराचे क्षेत्र कमी असले तरी लोकसंख्येची घनता अत्यंत जास्त आहे.
३) शहरात ब—याच भागात अनियोजीत व अनियंत्रित प्रकारे पद्धतीचा विकास झालेला आहे.
४) उल्हासनगर शहराची स्थापना ही विशिष्ट परिस्थितीत झालेली असुन आता शहरास राज्यातील किंवा देशातील महत्वाचे उद्योग व व्यापाराचे केंद्र म्हणुन स्वरूप प्राप्त झालेले आहे. शहराचे व्यापार व उद्योगातील आपले स्थान टिकवुन त्यात वाढ करणेसाठी शहरात मोठया प्रमाणावर पायाभुत सुविधा तातडीने विकसित करणे आवश्यक आहे.
५) उल्हासनगर शहराचे मंजुर विकास योजना दि. १/७/१९७४ पासुन अंमलात आलेला आहे. अधिनियमाच्या कलम ३८ मधील तत्कालीन तरतुदी लक्षात घेता शहरासाठी सुधारीत विकास योजना तयार करणेची कार्यवाही सन १९८४ मध्येच सुरू केली पाहिजे होती. त्यानंतर अधिनियमाचे या कलमात १९९४ साली झालेली सुधारणा विचारात घेतली तरीही सन १९९४ मध्ये ही कार्यवाही सुरू करून सुधारीत विकास योजना तयार करणे आवश्यक होते. ही बाब विचारात घेता यापुढील कालावधीत सुधारीत विकास योजना शक्य तितक्या लवकर तयार करणे शहराच्या हितासाठी आवश्यक आहे.

वरील कारणांमुळे विकास योजनेचे काम शक्य तितक्या लवकर पुर्ण करणेसाठी नगररचना क्षेत्रातील प्रगत व अद्यायावत तंत्रज्ञान उपलब्ध असलेल्या अनुभवी खाजगी क्षेत्रातील सल्लागार संस्थेची याकामी मदत घेणे आवश्यक आहे. व अशा सल्लागार संस्थेकडेस विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करणे बरोबरच विकास योजना प्रस्ताव तयार करणेचे काम सोपविल्यास या क्षेत्रातील अत्याधुनिक व प्रगत ज्ञानाचा याकामी उपयोग होवु शकेल. त्याचप्रमाणे हे काम मर्यादीत वेळेत करता येईल.

यापुर्वी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नगररचना अधिकारी यांचे मदतीसाठी खाजगी संस्था नियुक्त करून अत्यंत कमी वेळेत आपली विकास योजना तयार केलेली आहे. त्याचप्रमाणे इतर राज्यातील अशा प्रकारच्या विकास योजना तयार करणेसाठी या क्षेत्रातील उच्च अर्हता व अनुभव असलेल्या खाजगी संस्थांचा याकामी सहभाग घेण्यात येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अधिनियमानुसार विहीत करण्यात आलेली कार्यपद्धतीप्रमाणे उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास योजना तयार करणेसाठी या क्षेत्रातील कामाचा अनुभव व आवश्यक मनुष्यबळ, यंत्रणा उपलब्ध असलेल्या अभिकरणाची नेमणुक करणे आवश्यक आहे.

नेमणुक केलेले अभिकरण हे नगररचना अधिकारी यांचे नियंत्रणाखाली काम करेल. या कामासाठी येणारा खर्च महानगरपालिका निधीतुन करावा लागणार आहे.

सुधारीत विकास योजना तयार करणेकामी कलम २६ नुसार विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करावा लागेल. त्यासाठी संपुर्ण शहराचे अद्यायावत तंत्रज्ञानाने सर्वेक्षण करणेसह उपग्रहीय प्रतिमा यांचा वापर करावा लागणार आहे. भविष्यात महानगरपालिकेस भौगालिक माहिती सुचना प्रणाली (जी आय एस) विकसीत करणेसाठी सुध्दा हाच तपशिल उपयोगात येणार आहे. त्यामुळे हे काम करताना त्याच अभिकरणाकडुन भौगोलिक सुचना प्रणाली विकसनाचे काम करून घेतल्यास कामात एकजिन्नसी पणा येईल व त्यातील त्रुटींचे प्रमाण कमी राहील.

वरीलप्रमाणे अभिकरणाच्या नेमणुकीसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) अधिनियमाचे कलम २२ ते ३० मधील तरतुदीप्रमाणे सुधारीत विकास योजना तयार करणेचे कार्यवाही पार पाडणेकामी नगररचना अधिकारी यांचे अधिन कामासाठी खाजगी सल्लागार संस्थेची (अभिकरणाची) नियुक्ती करणेस मान्यता देणे.

२) नियुक्त करावयाच्या खाजगी अभिकरणाच्या कामाचे स्वरूप, पात्रतेच्या अटी निश्चित करणे, नेमणुकीसाठी निविदा/देकार मागविणे. यासाठी मा. आयुक्त यांना प्राधिकृत करणे.

३) खाजगी अभिकरणाकडुन विकास योजनेच्या कामाव्यतिरिक्त महानगरपालिकेसाठी भौगोलिक सुचना प्रणाली प्रस्थापित करणेसाठी आवश्यक त्या वाढीव बाबींचा सर्वेक्षणाचा समावेश करणे.

४) सर्वेक्षणासाठी येणा–या खर्चास मान्यता देणे.

विशेष महासभा ठराव क्र. ७३ दिनांक:–७.३.२००५

सुचकाचे नाव :–श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :–श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहराची विकास योजना तयार करणेकामी सल्लागार अभिकरणाची नेमणुक करण्याच्या प्रस्ताव पुढीलप्रमाणे मान्य करीत आहे.

१) अधिनियमाचे कलम २२ ते ३० मधील तरतुदीप्रमाणे सुधारीत विकास योजना तयार करणेचे कार्यवाही पार पाडणेकामी नगररचना अधिकारी यांचे अधिन कामासाठी खाजगी सल्लागार संस्थेची (अभिकरणाची) नियुक्ती करणे.
२) नियुक्त करावयाच्या खाजगी अभिकरणाच्या कामाचे स्वरूप, पात्रतेच्या अटी निश्चित करणे, नेमणुकीसाठी निविदा/देकार मागविणे. यासाठी मा. आयुक्त यांना प्राधिकृत करणे.
३) खाजगी अभिकरणाकडुन विकास योजनेच्या कामाव्यतिरिक्त महानगरपालिकेसाठी भौगोलिक सुचना प्रणाली प्रस्थापित करणेसाठी आवश्यक त्या वाढीव बाबींचा सर्वेक्षणाचा समावेश करणे.
४) सर्वेक्षणासाठी येणा–या खर्चास मान्यता.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:–विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ४:– मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने यापुर्वी उल्हासनगर शहरासाठी सुधारीत प्रारूप विकास योजने सोबत प्रसिध्द केलेल्या सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीत किरकोळ फेरफार करून ती उल्हासनगर क्षेत्रासाठीची विकास नियंत्रण नियमावली म्हणुन लागु करणेस मान्यता देणे.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:**—मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब याबाबतीत सुध्दा काही शंका आहेत. जो प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यामध्ये वर नमुद केलेल्या पान क्र. २ वर, वर नमुद केलेप्रमाणे एकाच वेळेस दोन विकास नियत्रण नियमावली अंमलात येणा—या अडचणी खालील प्रमाणे आहेत.

१) दोन्ही विकास नियंत्रण नियमावलीत चटई क्षेत्र निर्देशांक निश्चित करताना चटई क्षेत्रात समाविष्ट करावयाचे बाल्कनीचे क्षेत्र, जीना, पॅसेज यांचे क्षेत्र याबाबत वेगवेगळया तरतुदी आहेत. सांगायचे एवढेच आहे की विकास नियंत्रण नियमावली नियम आम्हाला उशिरा मिळाले. आज सकाळी मिळालेले आहेत. त्यामुळे नेमकी काय तरतुद आहे ती आम्ही पाहिलेली नाही. परंतु जे प्रस्तावात आहे त्यानुसार मी आता चर्चा करतो. १९७४चा प्रारूप विकास आराखडा आणि त्यांचे नियम, विकास नियंत्रण नियमावली आणि त्यानंतर २००१—२००२ मध्ये जो विकास आराखड आला त्याच्या बरोबर विकास नियंत्रण नियमावली आली त्या दोन्हींची एकाच वेळेस कठोरतम तरतुदीनुसार आपल्याकडे कारवाई चालु आहे. २००१मध्ये इथुन प्रस्ताव पाठवताना त्यावर हरकती आम्ही घेतल्या होत्या. काही सूचना केल्या होत्या आणि त्या हरकती आणि सूचना घेताना या संपुर्ण सभागृहाचे मत घेण्यात आले होते. त्यावेळेस महापौर म्हणुन श्री. हरदास माखिजा होते. त्यावेळेस आम्ही आपल्या सूचना हरकती पाठविल्या होत्या. तर १९७४चे विकास नियंत्रण नियमावली विषयकचे नियम व २००१चे नियम यामध्ये खुपच फरक होता जे आपण येथे नमुद केले आहे. दोन्हीमध्ये बराच फरक आहे. ही बाब आम्ही येथील लोकप्रतिनिधींनी व प्रशासनाने शासनाच्या निर्देशनास आणली होती. परंतु त्यावर अदयाप पर्यंत अंमलबजावणी झालेली नाही. परंतु आम्ही त्या ज्या सूचना हरकती दिल्या होत्या त्याचा त्यांच्यावर काहीही विचार करण्यांत आलेला नाही. याबाबतची तरतुद फक्त १०(१), १० (२) मध्ये केली आहे. परंतु '' जीना '' विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अधिकाधिक मार्जिन सोडण्याची तरतुद केली आहे. त्याबाबतीत काही सांगण्यात आले नाही. परंतु शहरवासियांची त्यावरच हरकत होती. १नंबर व २ नंबरमध्ये त्यामध्ये आपण ज्या चार सूचना दिल्या आहेत.

| | |
|---|---|
| घोषित गलिच्छ वस्ती(झोपडपट्टी) पुर्नविकासासंबंधी नियम | परिशिष्ठ डब्ल्यु |
| धोकादायक इमारतींच्या पुर्नबांधणी बाबत तरतुद | परिशिष्ठ व्हि |
| अनाधिकृत इमारती नियमानुकुल करणेबाबतची तरतुद | १०(१) व १०(२) |
| बाल्कनी बंदिस्त करणेसाठी शुल्क वसुली बाबत तरतुद | परिशिष्ठ एक्स |
| नवीन इमारतीमध्ये अपारंपारिक ऊर्जा साधनांचा वापराबाबत तरतुदी | परिशिष्ठ वाय |

व इतर ज्या अटी आहेत १०(१), १० (२) या दोन्ही तुम्ही नमुद केल्या आहेत. त्या दोन्ही मध्ये तफावत आहे. त्यावर पर्याय तुम्ही यामध्ये सांगितलेला नाही. की नक्की कुठली? प्रारूप विकास आराखडयाची तुम्ही अंमलबजावणी करणार आहात की २००१च्या विकास आराखडयाची अंमलबजावणी करणार आहात की २००१च्या विकास आराखडयावर ज्या आम्ही हरकती घेतल्या होत्या त्या तुम्ही यामध्ये अंतर्भुत केल्या आहेत का की येथील लोकांनी जिन्याबाबत, बाल्कनी यांच्याबाबतीत त्यानंतर एक दुसरी एक गोष्ट यामध्ये नमुद करताना फक्त झोपडपट्टयांचाच विचार केलेला आहे. ज्या इमारती आहेत त्या नियमित कशा करणार? ज्या आरक्षित भुखंडावर आहेत. त्या नियमित कशा करणार? त्याचा विचार होणे गरजेचे आहे. फक्त झोपडपट्टी गलिच्छ वस्ती योजने अंतर्गत तुम्ही हे करणार आहात. परंतु आरक्षित भुंखंडावर ज्या इमारती आहेत त्यांचे तुम्ही काय करणार? खेळाची मैदाने आहेत. तर माझी एक अशी सूचना होती २००१—२००२ चा जो विकास आराखडा आहे. प्रारूप विकास आराखडा तो रद्दच केलेला आहे शासनाने. परंतु नियमावली जी ठेवलेली आहे ती रद्द करा आणि नविन नियमावलीनुसार किंवा त्यावेळेस आम्ही ज्या हरकती घेतल्या होत्या त्यानुसार नियमावली बनविली तर उल्हासनगरच्यादृष्टीने बरे होईल एवढीच माझी अपेक्षा आहे.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:**—विकास नियंत्रण नियमावलीचे हे जे नियम आहेत. मला असे वाटते की काही सन्माननिय सदस्यांना त्याची प्रत रात्री मिळाली आहे. काही सदस्यांना आज सकाळी ती प्रत वाटप करण्याचे काम चालु होते. हा अतिशय संवेदनाशिल विषय आहे. मला वाटते की सर्वांनी एकत्र बसुन याबाबतीत विचार केला पाहिजे. व विचार यासाठी सुध्दा केला पाहिजे कारण की,विशेष करून दोन तीन विषय असे आहेत जसे अनाधिकृत बांधकामांना नियमित करणे, झोपडपट्टयांचे पुनर्वसन करणे. हे जे विषय आहेत या विषयांवर एका दिवसात किंवा एका तासामध्ये सविस्तर अभ्यास करू शकत नाही. गलिच्छ वस्ती सुधारणेसाठी दहा चौरस मीटरचे आपण जे निकष ठेवले आहे. त्याचे २० चौरस मीटर होवु शकते. अन्यथा या योजनेचा लोकांना फायदा मिळणार नाही. व जे एक नियमावली तयार केली आहे. अनाधिकृत बांधकामांना नियमित करण्यासाठी त्याबाबतीत सुध्दा मला असे वाटते की सर्वांनी एकत्र बसुन विचार विनिमय करणे आवश्यक आहे. कारण की, ज्या प्रमाणे त्याबाबतीत जसे मला समजले आहे ते असे आहे की, जेव्हा विकास आराखडा मंजुर होईल त्यानंतर २५ टक्के

विकासकर्त्याने १५ टक्के भुखंड मालकाने भरायचे आहे. १० टक्के वास्तुविशारदाने भरायचे आहे. व सध्या जो भोगवटादार आहे त्याने ५० टक्के भरावयाचे आहे. ती सुध्दा बाजारभावानुसारची किंमत. आपण जर बाजारभावानुसारची किंमत पाहिली तर ती हजारो, लाखो रूपयांमध्ये होईल. शहरामध्ये ज्या प्रमाणात चटई क्षेत्राचे उल्लंघन आहे ते पाहता. असे दिसुन येईल की, याबाबतचा जो फायदा आहे. तो लोकांना मिळणार नाही. व मला असे वाटते की याबाबत जर आपणांस सर्व संमतीने ठराव पारीत करायचा असेल तर सर्वांनी एकत्र बसुन विचार करून आमच्या ज्या काही सूचना आहेत. ऑक्टोबर २००२ चा हा जो प्रस्ताव आहे तो वस्तुस्थितीदर्शक नाही. या शहराची परिस्थिती अशी आहे येथे जेवढया काही इमारती तयार झाल्या आहेत. इमारतींचे जे मालक आहेत, त्यांचे जे नोकर होते. चहा वगैरे तयार करणारे त्यांच्या नावावर या इमारती होत्या. म्हणुन याबाबतची वसुली होणार नाही. तर वसुली सुध्दा होणार नाही. व हा जो विषय आहे तो असाच कागदोपत्री राहील यासाठी माझी सूचना आहे की, या विषयाबाबत सर्वांनी एकत्र बसुन विचार विनिमय करून सर्व संमतीने निर्णय घ्यावा. यासाठी आपण जर हा विषय पुढे ढकलत असाल तर पुढे ढकला. नाहीतर आम्हाला असे वाटते की, २००२मध्ये जो ठराव पारीत झाला होता त्यानुसारच ही तरतुद झाली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौरजी, नियमांना मंजुरी देण्याचा आमच्या समोर आता जो विषय आलेला आहे. मला असे वाटते की हे जे नियम आहेत. हे तर आम्हाला ब—याच दिवसापुर्वी मिळालेले आहेत. आम्हाला हे नियम सभा सूचनेबरोबर मिळाले आहेत. आज जसे श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले.....

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:— </u>सचिव साहेब, हे कसे?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी / श्री. धनंजय बोडारे:—</u>हे म्हणतात की आम्हाला सभा सूचनेबरोबर नियम दिले आहेत व आम्हाला आज नियम दिले आहेत असे कसे? त्यांना पाच दिवस अगोदर नियम दिले आहेत. आम्हाला आपण उशिरा का दिले?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>त्यांना काय विचारता मी स्पष्ट करत आहे ना? आपण ऐकुन तर घ्या ना? माझे ऐकुन तर घ्या ना. आपण पाच पाच सदस्य एकाच वेळेस बोलण्यास उभे राहता. हे योग्य नाही. जरा ऐकुन घ्या. आपण ऐकुन घेतल तर आपले समाधान होइल. हे जे नियम आहेत ते नगररचना विभागाने तयार केले, सभा सूचनेवर हा विषय ठेवण्या अगोदर जेव्हा त्यांनी हे नियम तयार केले होते. त्याचवेळेस नगररचना विभागाने आम्हास दिले होते. श्री. दुसाने साहेब सुध्दा त्यावेळेस तेथे होते. स्थायी समिती सभेमध्ये या विषयावर सदस्य चर्चा सुध्दा करत होते. परंतु श्री. लाल पंजाबी यांनी जे म्हंटले आज माझे मन प्रसन्न झाले. सभागृह नेता म्हणुन मी सहा वर्षे काम पहात आहे. प्रत्येक महासभेच्या अगोदर चर्चेसाठी मी यांना निमंत्रित करत होतो. परंतु सहा वर्षामध्ये हे कधीही चर्चेस आले नाहीत. मी ही जी मिटींग ठेवतो ती दोन तीन महिन्यापासुन आता ठेवण्याचे बंद केले आहे. कारण की सहा वर्षामध्ये विरोधी पक्षाचे सदस्य सभा सूचनेवरील विषयांवर चर्चा करण्यासाठी, सभा सूचनेवरील विषय पारीत करण्याबाबत विचार करण्यासाठी कधीही सभेस आले नाहीत. तर आज श्री. लाल पंजाबी म्हणत आहेत की, येथे सर्वांनी एकत्र बसुन शहराच्या विकासाबाबतच्या या विषयावर विचार केला पाहिजे. आम्ही तर सहा वर्षापर्वी पासुन हे करू पहात होतो की आपण आमच्या बरोबर येवुन बसावे. परंतु आपण कधीही आला नाहीत. आज ते हरकतीची गोष्ट करत आहेत. तो जो प्रस्तावित विकास आराखडा तयार केला होता त्याबाबत हरकती होत्या. हे नियम आहेत. आज आमच्या समोर हे जे नियम ठेवले आहेत. तर त्याबाबत मला असे वाटते की आमचा अभ्यास झालेला आहे. यांनी सुध्दा अभ्यास करत रहावे. त्यांचा असा काही एखादा मुद्दा आम्हाला योग्य वाटला तर यापुढे जावुन आम्ही त्याबाबत सुधारणा सुध्दा करू शकतो. मला असे वाटते की आमचे मा. सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी या विषयावर विशेष अभ्यास करावा. सखोल अभ्यास करावा. व त्यांना जर अशी काही शहराच्या हिता विरूध्दची गोष्ट आढळुन आली तर यापुढेही त्यांनी ती आमच्या निर्दशनास आणुन दयावी. त्यानुसार आम्ही सुध्दा त्याबाबत महासभेत सुधारणा प्रस्ताव आणु शकतो. हा प्रस्ताव पारीत करण्यासाठी बराच उशिर झालेला आहे. मला असे वाटते की आणखी वेळ घालविणे योग्य नाही. व आरोप प्रत्यारोप, आता मी बोलेन त्यांनतर त्यांनी बोलावे हे योग्य नाही यासाठी हेच योग्य आहे की, हा ठराव जर सर्वसंमतीने पारीत केला तर फार चांगले होईल. अन्यथा जसे प्रस्तावावर मतदान घेतले जाते त्याप्रमाणे या प्रस्तावावरील मतदान करण्यास आम्ही सज्ज आहोत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>शहराच्या हिताच्या मुद्दयावर आम्ही आपणांबरोबर आहोत परंतु एका मुद्दयास आमचा विरोध आहे विकासकर्त्याकडून २५ टक्के रक्कम भरून घेण्यासाठी त्यास कोठुन शोधुन आणणार. १५

टक्के रक्कम भरून घेण्यासाठी मालकाला कुठे शोधायचे? वास्तुविशारद जे आहेत त्यांनी अगोदरच विथड्रॉवल लेटर दिलेले आहे. त्यांच्याकडुन १० टक्के रक्कम भरून घ्यायची आहे. त्यांना कोठुन शोधुन आणायचे? ते कुठे भेटतील आम्हाला? ही पुर्ण रक्कम सदनिकाधारकाला भरावी लागणार आहे. लोकांवर हे फार मोठे ओझे लादण्यासारखे आहे म्हणुन विचार करूनच हा प्रस्ताव पारीत केला जावा. असे आमचे म्हणणे आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>मा. महापौर महोदया, नियमांबाबत आमचा विरोध नाही परंतु असे काही मुद्द आहेत त्यावर जर आपण विचार केला तर अनाधिकृत बांधकाम नियमित करण्यासाठी कुणीही व्यक्ती आपल्याकडे येणार नाही. उदाहरणा दाखल जर एखादा प्रकल्प घेतला तर समजा त्यामध्ये ५०० वार चटई क्षेत्राचे उल्लंघन आहे. ५०० चौ. वार मध्ये ४५०० चौ.फुटाचे चटई क्षेत्राचे उल्लंघन आहे. त्याची किंमत १००० रू. चौ. फुटाची आहे. तर त्यास तेथे ४५ लाख रूपये भरावे लागतील. शहरामध्ये असा कोणी इमारत मालक नाही की जो ४५ लाख रूपये भरेल. व प्रस्तावामध्ये येथे असे लिहिले आहे की, २५ टक्के एक भरेल व दुसरा १५ टक्के भरेल. परंतु येथे कुणीही विकासकर्ता, उपलब्ध नाही. कुणीही वास्तुविशारद असा नाही की जो १५ टक्केची रक्कम भरेल. भोगवटादाराने ५० टक्के भरण्याबाबत लिहिले आहे परंतु येथे प्रत्यक्षात भोगवटादारास १०० टक्के रक्कम भरावी लागेल व जेव्हा कुणी अनाधिकृत बांधकाम नियमित करण्यासाठी येईल. जर त्यांच्याकडे ५०० फुटाचे चटई क्षेत्राचे उल्लंघन असेल तर व त्याची किंमत १००० प्रती चौ. फुट रुपयाच्या हिशोबाने त्यास ५लाख रुपये भरावे लागतील. मग तो त्याचे बांधकाम नियमित का करुन घेईल? मग तर तो नविन प्लॅट खरेदी करेल. या प्रस्तावामध्ये फार मोठी चूक आहे. तिच्यावर लक्ष दिले पाहिजे. आमचा नियमांना विरोध नाही. एकसुध्दा व्यक्ती आपले अनाधिकृत बांधकाम अशाप्रकारे नियमित करु शकणार नाही. व आणखी काही मुद्दे यामध्ये आहेत. जे आम्हांला या नियमांमध्ये समाविष्ट करायचे आहेत. जसे की पहिले आम्ही बांधकामाचा नकाशा मंजुर करुन घेत होतो, तळघर होते. तळमजल्यावर जर आपण व्यवसायिक वापरासाठी बांधकाम केले व पहिल्या व दूस–या माळयावर रहिवाशासाठी वापर केला तर तळघराचे बांधकामाचा एफ.एस.आय. फुकटात मिळतो. त्याचा फायदा असा होतो की, शहरामध्ये व्यवसायिक प्रकल्प वाढतात. जर तळमजल्यावर पार्किंग होत असेल तर तळघराचा एफ.एस.आय. फुकटात मिळाला पाहिजे. यामुळे काय होईल शहरामध्ये पार्किंगची जी व्यवस्था आहे तीला सहाय्य मिळेल. तर असे काही नियम आहेत, त्यांवर अभ्यास करण्यासाठी २–४ दिवसाची वेळ आवश्यक आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>मा. महापौर महोदया, व आयुक्त साहेब, मी सुरुवातीला दोन मुद्दे सांगितले त्याचा तुम्ही येथे उल्लेख केलेला नाही. ठरावातील १ नंबर व २ नंबर संम्रंभ अवस्था दाखविलेली आहे. कोणत्या विकास आराखडयाची अंमलबजावणी करायची? आणि पर्याय देतांना त्याच्यावर तुम्ही विचार केला नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे) :–</u> मा. महापौर महोदया, आमचा सुधारीत विकास आराखडा रद्द झाल्यानंतर जी शासन अधिसूचना प्रसिध्द झाली आहे ती जर पाहिली तर आमच्याकडे जुना विकास आराखडा रद्द झाल्यानंतर इमारतींना बांधकाम परवानगी देतांना खुपच त्रासाचे होत आहे. कारण की आमचे जे मंजूर विकास नियंत्रण नियमावलीचे नियम आहेत, त्यामध्ये कित्येक त्रूटी आहेत. व सुधारीत विकास आराखडयाबरोबर विकास नियंत्रण नियमावलीचे नियम तयार करण्यात आले, त्यांच्यानेही आमच्या समस्येचे निवारण होत नाही. कारण की, ती जी अधिसुचना आहे, त्या अधिसुचनेमध्ये असे लिहिले आहे की, जो पर्यंत महानगरपालिका स्वत:चा प्रारुप विकास आराखडा तयार करत नाही. व प्रसिध्द करत नाहीत, तोपर्यंत मंजुर विकास आराखडा व सुधारीत विकास आराखडा या दोघांमधील जी कठोरात कठोर तरतूद आहे ती लागू राहिल. व त्याचबरोबर दोन्ही विकास नियंत्रण नियमावलीचे नियम लागू राहतील. आमचा नविन विकास आराखडा तयार करण्यासाठी जर दोन वर्ष लागत असतील किंवा तो प्रसिध्द होण्यास लागत असतील तर हे दोन्ही विकास नियंत्रण नियमावलीचे नियमांची जी तरतूद आहे, ती एकमेकाशी विपर्यस्त आहे. जो कोणताही प्रस्ताव आमच्यासमोर येईल, त्याच्यावर निर्णय घेतांना ब–याचश्या अडचणी निर्माण होतात. यासाठी आम्ही ही सुचना केली होती. की, हे नविन विकास नियंत्रण नियमावलीचे नियम जोपर्यंत आमचा स्वत:चा प्रारुप विकास आराखडा प्रसिध्द होत नाही तोपर्यंत विकास कामाचे प्रस्ताव अडुन राहू नयेत यासाठी ते जे मंजुर विकास नियंत्रण नियमावलीचे नियम आहेत, ठाणे महानगरपालिका, कल्याण –डोंबिवली महानगरपालिका, मुंबई महानगरपालिका यांचे मंजूर विकास नियंत्रण नियमावलीचे जे नियम आहेत त्यांचा आम्ही विचार केला. इतकेच नव्हे तर राज्य सरकारने जे निर्देश दिले आहेत जसे की, सौर उर्जेबाबत विकास नियंत्रण नियमावलीत बधंनकारक करणे त्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करणे किंवा वॉटर हार्वेस्टींगची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत करणे व विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करण्यासाठी जे निर्देश दिले आहेत. ते निर्देश या दोन्ही गोष्टी लक्षात घेवून मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत

सुधारणा करणे आमच्या दृष्टीने शक्य होते, जे सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीचे नियम आहेत त्यांच्या मध्ये सुधारणा करणे शक्य नव्हते. आणि त्यासाठी आम्ही असा विचार केला की, जो मंजुर विकास नियंत्रण नियमावलीचे नियम आहेत व सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीचे नियम हे लक्षात घेवून इतर महानगरपालिकांचे जे मंजुर विकास नियंत्रण नियमावलीचे नियम आहेत ते लक्षात घेवून व राज्य सरकारने त्या महानगरपालिकांच्या मंजुरी दिल्यानंतर जे निर्देश दिले आहेत ते निर्देश लक्षात घेवून प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीचे नियम तयार केले आहेत. या विकास नियंत्रण नियमांना जर मंजुरी मिळाली तर ते प्रसिध्द करावे लागतील. त्यांच्यावर सुचना व हरकतीही मागवाव्या लागतील. व त्या दरम्यान राज्य सरकारला जे अधिकार आहेत, जर राज्य शासनाला जर असे वाटत असेल की, एखादी आपतकालीन परिस्थिती निर्माण झाली किंवा आवश्यकता पडली तर राज्य सरकारला एक अधिकार आहे सुचना, हरकती न मागविता, जसे की, आता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये सुधारणा केली आहे. ४५६ (ए) या कलमाची तरतूद आहे. नियम, विनियम, उपविधी तयार करतांना जर मागील तारखेत प्रसिध्द करण्याची जर तरतूद असेल तर तसे न करता राज्य शासनाला या बाबतीत असा एक अधिकार आहे. त्याचा वापर करुन आमचे हे प्रारुप नियम तयार करण्यात येतील. त्यांच्यावर अंमलबजावणी करण्याचा अधिकार अंमलबजावणी करण्यासाठी नियोजन प्राधिकरणाला निर्देश देण्याचा अधिकार आहे. व जर राज्य शासनाकडुन निर्देश मिळाले तर एकच विकास नियंत्रण नियमावली राहील. व विकास आराखडा तयार करण्यासाठी जो कालावधी लागेल. त्या व्यतिरिक्त आमच्याकडे निश्चित स्वरुपाचे काही नियम असतील व प्रस्तावावर निर्णय घेणे सुकर होईल. व त्या दरम्यान राज्य शासनाने निर्देश दिले तर सुचना हरकती मागविल्या नंतर अंतिम निर्णय राज्य शासन घेवू शकते. व याबाबतीत आपल्या जर काही सुचना असतील तर त्यासुध्दा नंतर समाविष्ट केल्या जावू शकतील इतकेच नव्हे तर ही जी विकास नियंत्रण नियमावली असेल यानंतर आम्ही जेव्हा स्वत:चा विकास आराखडा तयार करु त्यावेळेस सुध्दा या सर्व तरतूदी लक्षात घेवून जर आणखी काही नविन तरतुदी करण्याची वेळ आली तर त्यांची सुध्दा त्यामध्ये तरतूद करुन प्रारुप विकास आराखडयाबरोबर पुन्हा विकास नियंत्रण नियमावली सादर केली जावू शकते. आता जो खोळंबा निर्माण झाला आहे. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आम्ही आपल्या समोर प्रस्ताव ठेवला आहे. व राज्य शासनास आम्ही विनंती करु. याबाबतची प्रसिध्दी महापालिकेच्या वतीने करण्यात येईल. सुचना, हरकती मागविण्यात येतील. परंतु त्या दरम्यान जर शासनाकडुन निर्देश प्राप्त झाले तर आमच्या नियोजनाचे जे काम ते सुकर होईल. व आपण जे म्हणत आहात की, आपण जे ठराव पारीत केले आहेत ते जर कायदयातील तरतूदीच्या विसंगत असतील तर आपल्या ठरावावर सुध्दा शासनाकडुन कोणताही निर्णय होणार नाही. आपण तीन चटई क्षेत्र निर्देशांक प्रस्तावित केला होता. तीन चटई क्षेत्र निर्देशांक आज महाराष्ट्रात कोठेही दिला जात नाही. जर आपण जर अशाप्रकारे चटई क्षेत्र निर्देशांक प्रस्तावित केला तर आपले सर्व प्रस्ताव बासनात गुंडाळून ठेवले जातील. आज आपण अश्याच गोष्टी प्रस्तावित करु शकतात. ज्यास शासनाने या अगोदर मंजुरी दिलेली आहे. जे मी उदाहरण दिले कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेची विकास नियंत्रण नियमावली मंजुर आहे. ठाणे महानगरपालिकेची विकास नियंत्रण नियमावली मंजूर आहे. मुंबई महानगरपालिकेतील विकास नियंत्रण नियमावली मंजुर आहे. त्यामध्ये जी तरतुद आहे तीच तरतुद जर राज्य शासनाकडे प्रस्तावित केली तर याबाबत आपण स्पष्टीकरण करु शकु की, अशाप्रकारच्या तरतुदीस बाकी महानगरपालिकांमधील विकास प्राधिकरणास आपण मंजुरी दिली आहे. तर हे नियम मंजुर करण्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही अशी आमची धारणा आहे. सभागृहास माझी विनंती असेल की, जो प्रस्ताव आपल्या समोर ठेवला आहे. त्यामध्ये काहीही सुधारणा न करता जर आपणाकडुन मान्यता मिळत असेल तर शासनाच्या मंजुरीसाठी आम्ही लवकरात लवकर पाठवू शकतो.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मा. आयुक्त साहेब, पृष्ठ क्र. ३२ वर हे जे दर्शविले आहे १०(२) याबाबत आपण जरा सांगा. ज्यास आम्ही विरोध केला आहे. लोकांना आपले अनाधिकृत बांधकाम नियीमत करुन घेण्यासाठी कश्याप्रकारे पैश्याचा भरणा करावा लागेल. ४०० मिटर , ५०० मिटर चटई क्षेत्राचे जे उल्लंघन झालेले आहे, त्यांना किती पैसे भरावे लागतील याबाबत जरा सांगा. समजा एखादयाने इमारत बांधतांना ५०० फुट चटई क्षेत्राचे उल्लंघन केले आहे, तर त्यास किती पैसे भरावे लागतील? व काय ते तो भरु शकेल काय? याबाबत जरा स्पष्टीकरण दया.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे) :–</u>नियम १० ची ही जी तरतुद आहे. जर आपण मंजुर विकास नियंत्रण नियमावली बघितली तर नियम १० मध्ये अशी अनाधिकृत बांधकामे नियमित करण्याची तरतुद आहे. परंतु त्यामध्ये कुठलीही दंडात्मक रक्कम वसुल करण्याची तरतुद नव्हती. ही जी मंजुर विकास नियंत्रण नियमावली आहे. माझ्या नक्की लक्षात येत नाही की ठाणे महानगरपालिकेची आहे की मुंबई महानगरपालिकेची आहे. परंतु विकास

नियंत्रण नियमावलीत अशी तरतुद आहे. व जो पिनल रेट आहे. तो सुध्दा त्याच दराने आम्ही घेतला आहे. किती पैसे भरावे लागतील हे तर मी आता सांगु शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>कमीत कमी किती ते तर सांगु शकाल. येथे लिहिले आहे. २५ टक्के, १५ टक्के, १० टक्के व ५० टक्के विकासकर्ता, मालक, वास्तुविशारद व भोगवटादार यांनी भरावयाची आहे. उल्हासनगरची ही जी स्थिती आहे येथे कोण विकासकर्ता होता हे कुणाला माहित नाही. मालक कोण होता ते माहित नाही. बॅरेकचे चार, चार रूम घेवुन कुण्या विकासकर्त्यांने तेथे बांधकाम केले. मालक म्हणुन त्याचे नाव आहे परंतु तो स्वत: एका सदनिकेचा मालक आहे. व जे वास्तुविशारद आहेत, उल्हासनगरची स्थिती अशी आहे. जेव्हा इमारतीचा बांधकाम नकाशा मंजुर होतो. व जेव्हा चटई क्षेत्राचे उल्लंघन सुरू होते. त्यावेळेस वास्तुविशारद पत्र देवुन परवाना मागे घेतो. तर कुठल्या वास्तुविशारदास आपण पकडणार? जो भोगवटाधारक आहे त्यास जर पुर्णच्या पुर्ण पैसे भरावे लागत असतील तर तो आपले अनाधिकृत बांधकाम नियमित का करेल? जर त्यास पुर्णच्या पुर्ण, १००० रूपयाच्या हिशोबाने पुर्ण रक्कम भरावी लागत असेल तर तो आपले अनाधिकृत बांधकाम नियमित का करेल? एवढी मोठी चुक येथे आहे. व त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी आम्ही सांगत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:— </u>सत्ताधारी पक्षाचे सदस्य हा प्रस्ताव पारीत करण्यासाठी पास पास म्हणत आहेत म्हणुन आम्ही आपली बाजु आपल्या समोर मांडली आहे. आयुक्त साहेब आपण भलेही आपली बाजु यावर मांडु शकता. आम्हाला काही मुद्दयांचे स्पष्टीकरण पाहिजे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे) :—</u>हा जो नियम १० (२) आहे त्याचा अर्थ असा आहे की जर सध्याची बाजारभाव किंमत ५०० रू. प्रती चौरस फुट आहे. हे ५०० रूपये अधिमुल्य म्हणुन महानगरपालिकेस किंवा पिनल रेट म्हणुन जो विकासकर्ता आहे, वास्तुविशारद आहे. जो भोगवटाधारक आहे. या सर्वांना भरावी लागेल. व त्याचे प्रमाण दिले आहे. समजा जर ५०० रू. बाजारभाव किंमत आहे. जागेच्या किंमतीसह बांधकाम खर्च ज्या ५०० रू. मध्ये २५ टक्के जे आहेत ते विकासकर्त्यास भरावे लागतील. १५ टक्के मालकास भरावे लागतील. १० टक्के वास्तुविशारदास भरावे लागतील. व ५० टक्के भोगवटाधारकास भरावे लागतील. आपण येथे ज्या गोष्टीचा उल्लेख केला या शहरात यापध्दतीने एक सुध्दा अनाधिकृत बांधकाम नियमीत होणार नाही, असे जर झाले नाही तर ते अनाधिकृत बांधकाम तोडले जाईल. हे जे पर्याय आहेत ते लोकांसमोर उघड आहेत. एक तर अनाधिकृत बांधकाम नियमित करा नाहीतर त्यांचे निष्कासन करा. व जी चुक केली आहे याची किंमत कुणाला ना कुणाला मोजावी लागणार आहे. हे खरे आहे की, वास्तुविशारद तर निघुन गेला आहे त्याला कुठून पकडुन आणणार. या सर्वांचा विचार करून ज्या कुणी हे धोरण तयार केले आहे. व शासनाने त्यास मंजुरी दिली आहे. हे सर्व विचार करून केलेले आहे. हे उल्हासनगरला लक्षात घेवुन तयार केलेले नाही. हे मी मान्य करतो. परंतु संपुर्ण जगभरातुन अशी संमती आली आहे. एवढेच नाही तर बांधकाम परवानगी देण्या अगोदर अनामत रक्कम भरण्याची पध्दत सुध्दा सुरू झाली आहे. हुबळी धारवाड महानगरपालिका जी आहे. त्यांचे आयुक्त साहेबांना काही दिवसापुर्वी आम्ही एका सेमीनारच्या दौ—यामध्ये भेटलो. विकास शुल्काच्या व्यतिरिक्त काही रक्कम अनामत रक्कम म्हणुन घेतली जाते. व जर त्यांनी बांधकाम करताना चटई क्षेत्राचे उल्लंघन केले असेल तर अनामत रक्कम जप्त केली जाते. अनाधिकृत बांधकामे थांबविण्यासाठी हे सर्व करावे लागेल. यासर्व तरतुदी विकास नियंत्रण नियमावलीत आम्ही केल्या आहेत. सध्याची जी कार्यपध्दती आहे. सध्याचे जे नियम आहेत ते लक्षात घेवुन आम्ही या तरतुदी केल्या आहेत. आपले म्हणणे बरोबर आहे. माझा स्वत:चा देखिल अनुभव असा आहे. मीरा भाईंदर महानगरपालिकेत २५००० रू. अनामत रक्कम भरून अर्धा इंचाची नळजोडणी घेतली जाते. व आमच्याकडे २२४० रू. भरून सुध्दा नळजोडणी लोक नियमित करून घेत नाहीत. हा फार मोठा फरक आहे परंतु ही जी पध्दत आहे ती कधी ना कधी थांबविली पाहिजे. व हे थांबविण्यासाठी असे काही कठोर नियम आहेत. त्याचा उपयोग केला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>मा. आयुक्त साहेब, उच्च न्यायालयाकडुन जी यादी आलेली आहे. ५९८ इमारतीबाबत तर ही बांधकामे सुध्दा आपण नियमित करू शकतो का? उच्च न्यायालयात ज्या केसेस आहेत, उच्च न्यायालयाने जे निर्णय दिले आहेत. त्या इमारती सुध्दा या पध्दतीने आपण नियमित करू शकतो का याबाबत जरा सांगा. व दुसरा एक असा प्रश्न आहे की, समजा जर ५००० चौ. फुट आमचा एफ.एस. आय होता. १९८५ ते आजपर्यंत त्यावर सहा—सात माळयांचे बांधकाम झाले म्हणजे ५००० जर आमच्या कडे एफएसआय होता त्याचे ३५००० चौ. फुट बांधकाम कसे झाले. म्हणजे जवळ जवळ ५००० ऐवजी ३५००० चौ. फुट आम्ही बांधकाम केले म्हणजे ३०००० चौ. फुट अनाधिकृत बांधकामाचे ७०० रू. जर त्याची बाजारभावानुसारची किंमत असेल,

समजा कॅम्प नं. ३ येथे ७०० रू. बाजारभाव किंमत आहे. तर ३०००० चौ.फुटाचे ७०० रू. च्या हीशोबाने २ कोटी रूपये होतात. तर आता ही जी दोन कोटी रूपये भरण्याची तरतुद केली आहे त्यामध्ये २५ टक्के विकासकर्ता, १५ टक्के मालक उर्वरित १० टक्के वास्तुविशारद व ५० टक्के सदनिकाधारक म्हणजे १ कोटी रूपये सदनिकाधारकांनी दयायचे आहेत. व एक कोटी रूपये इतर लोकांनी दिले नाहीत म्हणजेच विकासकर्त्याने दिले नाहीत. म्हणजे बिल्डरने दिले नाहीत. व उर्वरित जे १० टक्के आहेत ते त्यांनी दिले नाही. तर काय. सदनिकाधारक आपले ५० टक्याची रक्कम देण्यास तयार आहे पंरतु इतर लोकांनी आपल्या ५० टक्केची रक्कम दिली नाही तर, ते जर तेथे उपलब्ध नसतील तर मग काय ती इमारत तुटेल? असेच आहे ना? तर या सर्वांवर विचार केला पाहिजे. ही अशी गोष्ट आहे की याचा फायदा त्यांना होईल का ज्या कोर्टात केसेस प्रलंबित आहेत? आणि म्हणुन आम्ही असे विचारले आहे की, प्रत्यक्षात तशी स्थिती असली पाहिजे. वास्तविक स्वरूपातील उपाय आहे का? आणि जर नसेल तर ते बांधकाम तुटणार आहे. याबाबत प्रश्नच नाही. म्हणजे त्यासाठी आम्ही जबाबदार नाही. असे आम्हाला म्हणायचे आहे.

**मा.सदस्य श्री. अंकुश म्हस्के, श्री. मनोज साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

**मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे) :—**मा. महापौर महोदया, जो पहिला प्रश्न होता ५९८ ज्या केसेस आहेत त्यांना याचा फायदा मिळेल का? सर्वोच्च न्यायालयाचा काही दिवसापुर्वीचा एक निर्णय आहे त्यामध्ये म्हंटले आहे की, न्यायालयाचे यापुर्वी जे आदेश / निर्देश झालेले आहेत त्यांना कायदयामध्ये रूपांतरीत करून त्यांना रद्द केले जावु शकत नाही. यु कॅन डझ नॉट नलिफाय द डिसीजन ऑफ द कोर्ट बाय अमेंन्डींग रूल्स ॲन्ड ॲक्ट तर या ज्या ५९८ केसेस आहेत त्यांना या प्रस्तावातील तरतुद लागु होईल किंवा नाही. याबाबत कायदे तज्ञांशी विचार विनिमय /चर्चा करण्यासारखा विषय आहे. त्याबाबत येथे मी जास्त काही बोलु इच्छित नाही.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—**आयुक्त म्हणुन आपण असा प्रस्ताव पाठविला आहे काय?

**मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे) :—**होय तर, मी येथे जे बोलतो आहे त्यानुसार मला कायदयाचे संपुर्ण ज्ञान आहे असे तर मी कधी बोललो नाही ना कधी बोलणार. जेवढी मला माहिती आहे. त्यानुसार मला असे वाटते की, यु कॅन नॉट नलीफाय सुप्रिम कोर्टस डिसिजन बाय अमेंन्डींग रूल्स ऑर ॲक्ट, नियम किंवा अधिनियम यामध्ये बदल करून तुम्ही सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय / निवाडा रद्द बातल करू शकत नाहीत. सुप्रीम कोर्टाने नुकताच दिलेला हा निर्णय आहे. हा निर्णय येथे लागु होईल किंवा नाही याबाबत मी येथे निवेदन करणे हे चुकीचे होईल. जे घटनातज्ञ आहेत. कायदेतज्ञ आहेत. त्यांच्याशी चर्चा करून तो निर्णय काय आहे त्याच्यावर सविस्तर अभ्यास करावा लागेल. त्यानंतरच त्याचा उल्लेख करता येईल.

**मा. सदस्य श्री. लालबिहारी यादव हे सभागृहातुन बाहेर गेले.**

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—**पास पास.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी/ श्री. जमनादास पुरस्वानी:—**पास, पास काय? चर्चा करू दया ना.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब यामध्ये आणखी एक गोष्ट आम्हाला विचारायची होती की हे जे आपण लिहिले आहे १५ टक्के वास्तुविशारद भरेल तर येथे ज्या वास्तुविशारदांनी विथड्राव्हल लेटर दिले आहे. आपले प्रमाणपत्र विथड्रॉव्हल केले आहे. येथे अशा काही केसेस आहेत की जे भोगवटादार आहेत ते ५० टक्के रक्कम भरण्यास तयार आहे पंरतु बिल्डर येथे आढळुन येत नाही. वास्तुविशारद मिळत नाही. अशा बाबतीत आपण काय कराल? किंवा ज्याने आपले सर्टीफीकेट विथड्रॉ केले आहे अशा बाबतीत आपण काय कराल.

**मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे) :—**मा. महापौर महोदया, आम्ही काय करू हा काही प्रश्न नाही. जर आपणासं वाटत असेल की या नियमामध्ये काही सुधारणा सुचवायच्या आहेत तर आपण त्या सुचवू शकता. सुधारणा करायची तर ती आपण करू शकता. यासाठी सुचना आणि हरकतीसाठी वेळ दिली जाते. जे काही संबंधित लोक आहेत ते आपल्या सूचना हरकती देवू शकतात. त्यानंतरच नियमांना अंतिम स्वरूप मिळते. येथेही

एक गोष्ट आहे की पहिले आर्किटेक्ट येत असत नकाशा मंजुर करून घेत नंतर इमारतींमध्ये चटई क्षेत्राचे उल्लंघन सुरू झाल्यावर विथड्राव्हल लेटर देत होता. हे होवु नये म्हणुन आम्ही जो प्रस्ताव देत आहोत. त्यामध्ये आम्ही विकासकर्ता व वास्तुविशारद यांच्याशी सुध्दा करार करून घेतो. त्यांनतरच आम्ही प्रस्ताव स्विकारतो. म्हणजे वास्तुविशारदाने एक वेळ आमच्या समोर प्रस्ताव दिला तर ते काम पुर्ण होईपर्यंत तो विथड्रॉ करू शकत नाही. अशी एक बंधनकारक तरतुद आम्ही केलेली आहे. आमच्याकडे जे काही प्रस्ताव येतात ते करार केल्यानंतरच येतात. नाहीतर आम्ही ते स्विकारतच नाही.

**मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—मी भारतीय जनता पार्टी व शिवसेनेची भुमिका स्पष्ट करतो. आम्हाला असे वाटते की, जसे मी अगोदरच म्हंटले आहे की जी नियमावली तयार केली आहे. खास करून कलम १० (२) त्यामध्ये जे सुचविले आहे की, आम्ही जे औषध देतो तो एवढे खराब आहे की, ते आजारापेक्षाही जास्त खराब आहे. तर मला असे वाटते की हे जे कलम १० (२) त्यामध्ये आम्ही सुधारणा करू इच्छितो. कलम १० (२) जो आहे त्यामध्ये आम्ही महासभेमध्ये सर्व संमतीने जो ठराव पारीत केला आहे. महासभा ठराव क्र. ४० दि. १९ ऑक्टोबर २००२ नुसार आम्ही सुधारणा करण्याचा प्रस्ताव देत आहोत. प्रशासनाचा जो प्रस्ताव आहे तो अवास्तव आहे. यामुळे लोकांना लाखो रूपये भरावे लागतील. त्यामुळे अंमलबजावणी होवु शकणार नाही. व यासाठी आम्हास अशी सुधारणा करावीशी वाटते की, १० (२) हे जे कलम आहे याऐवजी महासभा ठराव क्र. ४० दि. १९ ऑक्टोबर २००२ याचा विचार व्हावा. ही जी नियमावली आहे. यामध्ये सुधारणा करावी. पाहिजे तर यासाठी आपण मतदान घ्या. त्यासाठी सुध्दा आम्ही तयार आहोत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा.महापौरजी, आयुक्त साहेबांना सर्व सभागृहास सांगितले की कल्याण डोंबिवली, ठाणे व मुंबई येथे जे नियम मंजुर झाले ते मंजुर करावे लागतील. व जे शासन मंजुर करेल. सुधारणा जी आहे ती नंतर आणु शकतो.

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—नाही. सुधारणा आताच झाली पाहिजे. प्रत्येकाचे आपले आपले मत आहे. आम्हास असे वाटते की या सुधारणेसह प्रस्ताव पारीत केला जावा. पाहिजे तर आपण प्रस्ताव मतदानास टाका.

मा. सचिव:—जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपल हात वर करावेत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—कोणत्या बाबींवर आपण मतदान घेत आहात.

मा. सचिव:—दोन्ही बाबींवर.

**मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—सुधारणांसह सुध्दा?

मा. सचिव:—सुधारणांसह आणि सुधारणां व्यतिरिक्त अशा दोन्ही बाबींवर म्हणजेच सुधारणा करण्याच्या विरोधात जे आहेत, सुधारणांसहच्या प्रस्तावाच्या बाजुने व सुधारणा व्यतिरिक्तच्या प्रस्तावाच्या बाजुने जे आहेत त्यांनी आपले हात वर करावेत. आपण जे म्हणत आहात की सुधारणा व्यतिरिक्त मुद्दा तर एकच आहे ना? कृपया आपले हात वर करावेत. ४१ मते, श्री. शांतराम निकम आता सभागृहात येत आहेत. त्यांच्यासह ४१.

प्रशासनाचा प्रस्ताव जसा आहे तसा स्विकारणे बाबतच्या बाजुने किंवा या प्रस्तावामध्ये काहीही बदल न करण्याच्या बाजुने ४१ मते:—

१८.श्री. टेकचंदानी राजु
१९.श्रीमती रामचंदानी भावना मनोहर

२०.श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे
२१.श्रीमती कालानी ज्योती
२२.श्री. एडके गणपत गोविंद
२३.श्री. मोकल चंदाराम विठोबा
२४.श्रीमती शर्मा कमला गंगाधर
२५.श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
२६.श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
२७.श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
२८.श्री. नाना आनंदा पवार
२९.श्री. जग्यासी राजु
३०.श्री. शांताराम निकम
३१.श्री. टाले प्रमोद नामदेवराव
३२.श्री. ठाकुर विनोद लालसिंग
३३.श्रीमती सोनेजी मीना (सोंडे)
३४.श्री. सुरेश नामदेव गायकवाड
३५.श्रीमती वनवारी मोना अशोक
३६.श्री. वनवारी किशोर नारायणदास
२०.श्री. जेसवानी सतराम पुनमदास
२१.श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
२२.श्रीमती भावना रवी खिलनानी
२३.श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ
२४.श्री. सुरेश जाधव
२५.श्री. देंवद्रसिंग खेमाणी
२६. श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल
२७. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
२८. श्री. भालेराव गौतम यशवंत
२९. श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास
३०.श्री. ठाकुर अशोक भगवानदास
३१.श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
३२.श्रीमती पंजाबी दिपा नारायण
३३.श्रीमती भटीजा कोमल अमृत
३४. श्री. रामरख्यानी मोहनदास
३५.श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना
३६.श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

३७. श्री. विनोद तलरेजा
३८. डॉ. निना प्रकाश नाथानी
३९. श्रीमती छाब्रिया भारती
४०. श्रीमती रिझवानी सुजाता रमेश
४१. श्रीमती मीनु दासानी

<u>मा. सचिव:—</u>जे सदस्य या प्रस्तावात सुधारणा करू इच्छित आहेत व हा प्रस्ताव जसा आहे तसा पारीत करू इच्छित नाहीत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

१३.श्रीमती संगिता जावळे
१४.श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
१५.श्री. सोनवणे नथु
१६.श्रीमती मोकल सीमा
१७.श्री. दिलीप गायकवाड

१८.श्री. उमाप रामदास
१९.श्रीमती खांडेकर प्रेमा
२०.श्री. बच्चाराम रूपचंदानी
२१.श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर
२२.श्रीमती माने किरण बाळकृष्ण
२३.श्री. चव्हाण रमेश महादेव
२४.श्रीमती जयश्री सुर्वे
२५.श्री. बोडारे धनंजय बाबुराव
२६.श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
२७.श्री. पाटील विश्वनाथ गौतम
२८.श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहीदास
२९.श्री. चौधरी राजेंद्र शांताराम
३०.श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद

मा.महापौर:—प्रशासनाचा प्रस्ताव जसा आहे तसा बहुमताने संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ४:— मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने यापुर्वी उल्हासनगर शहरासाठी सुधारीत प्रारूप विकास योजने सोबत प्रसिध्द केलेल्या सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीत किरकोळ फेरफार करून ती उल्हासनगर क्षेत्रासाठीची विकास नियंत्रण नियमावली म्हणुन लागु करणेस मान्यता देणे.

प्रस्तावना :—

उल्हासनगर शहरासाठीचा विकास योजना शासन निर्णय क्रमांक टि पी एस/१२७२/६०१८५ आ.पी.सी, दि. २०/०५/१९७४ नुसार मंजुर झालेली असुन दि. १/७/१९७४ पासुन अंमलात आलेला आहे. व त्यानुसार प्रस्तावित करण्यात आलेल्या विकास नियंत्रण नियमावली अस्तिवात होती.

शासन निर्णय क्रमांक टि पी बी/१२७५/११९९/युडी८, दि. १५/३/१९७६ नुसार उल्हासनगर शहराचे क्षेत्रासह 'कल्याण परिसर अधिसुचित क्षेत्र' घोषित करून या क्षेत्रासाठी शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास अधिनियमाचे कलम ४०(१) च्या तरतुदीनुसार 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणुन घोंषित केलेले होते.

विशेष नियोजन प्राधिकरणाने दि. १८/८/१९८६ रोजी अधिसुचित क्षेत्रासाठी पुर्वीच्या विकास नियंत्रण नियमावली ऐवजी सुधारीत विकास नियंत्रण नियमावली प्रसिद्ध करून ती लागु केलेली आहे. व सद्या ही नियमावली मंजुर विकास नियंत्रण नियमावली म्हणुन लागु आहे.

तत्कालिन विशेष नियोजन प्राधिकरण मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी विकास नियंत्रण नियमावलीसह सुधारीत प्रारूप विकास योजना तयार करून अधिनियमाचे कलम २६ नुसार दि. १०/५/२००१ रोजी प्रसिद्ध करून त्याबाबत नागरीकांकडुन हरकती व सुचना मागविणेत आलेल्या होत्या. त्यानंतर या प्रारूप सुधारीत विकास योजनेनुसार तयार करण्यात आलेले विकास नियंत्रण नियमावली व वर नमुद मंजुर विकास नित्रंयण नियमावली या दोन्हीचे कठोरतम तरतुदीनुसार विकास विषयक प्रस्तावांना मान्यता देण्यात येत आहे.

शासन नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र. टि पी एस.१२०२/८०६/ सी आर—८३/२००२/ओडी—१२, दि. २६ ऑक्टोंबर २००४ नुसार शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६५ चे अधिकारानुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र हे '' उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगाव—बदलापुर आणि परिसर अधिसुचित क्षेत्र'' यातुन वगळणेचा निर्णय घेतलेला आहे.

महानगरपालिकेने आपल्या क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार करणेबाबत दोन महिन्याचे आत निर्णय घ्यावा असे निर्देश दिलेले आहेत. व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ नुसार सुधारीत विकास योजना प्रसिद्ध होई पर्यंत मंजुर विकास आराखडा व मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण ने प्रसिदध केलेल्या प्रारूप सुधारीत विकास आराखडयाचे तरतुदी विकास नियंत्रण नियमावलीसह लागु असतील.' असे नमुद करण्यात आलेले आहे. यामुळे यापुढेही या दोन्ही विकास नियंत्रण नियमावलीच्या कठोरतम तरतुदीनुसार विकास प्रस्तावाबाबत कार्यवाही करावी लागणार आहे.

शासनाने दि. २६/८/२००४ अधिसुचनेनुसार दिलेल्या निर्देशाप्रमाणे किमान वेळेत जरी सुधारीत विकास योजना तयार करून प्रसिद्ध केली तरी त्यासाठी किमान दोन वर्षाचा कालावधी लागणार आहे. व तोपर्यंत वर नमुद केल्याप्रमाणेची परिस्थिती ही कायम राहणार आहे.

वर नमुद केलेप्रमाणे एकाच वेळेस दोन विकास नियत्रण नियमावली अंमलात येणा—या अडचणी खालील प्रमाणे आहेत.

१) दोन्ही विकास नियंत्रण नियमावलीत चटई क्षेत्र निर्देशांक निश्चित करताना चटई क्षेत्रात समाविष्ट करावयाचे बाल्कनीचे क्षेत्र, जीना, पॅसेज यांचे क्षेत्र याबाबत वेगवेगळया तरतुदी आहेत. त्यामुळे विकास विषयक परवानगी देताना संभ्रम निर्माण होतो.

२) दोन्ही विकास नियंत्रण नियमावलीत समास अंतर, इमारत उंची याबाबत तरतुदी भिन्न स्वरूपाच्या आहेत. त्याचप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेल्या सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीत शहराची सद्याची परिस्थिती विचारात घेवुन विविध प्रगत तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. परंतु दोन्ही विकास नियत्रणं नियमावलीचे कठोरतम तरतुदीचे तत्वामुळे या नियमांचा उपयोग सद्यस्थितीत होत नाही.

३) विकास आराखडयाच्या अंमलबजावणीच्या माध्यमातुन शहराच्या विकासासाठी विविध प्रस्तावांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. परंतु खालील बाबीसाठी या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तरतुदी समाविष्ट नाहीत

३अ) उल्हासनगर शहरासाठीचे मंजुर विकास योजनेत एकुण २०३ आरक्षणे असुन त्यापैंकी महानगरपालिकेने १५९ आरक्षणे विकसित करावयाची होती. या आरक्षणापैंकीच्या काही जागा या खाजगी मालकीच्या आहेत. त्याचप्रमाणे मंजुर विकास आराखडयातील प्रस्तावित रस्त्यांमुळेही मोठया प्रमाणावर खाजगी मालमत्ता बाधित आहेत. आरक्षणाखालील खाजगी मालकीच्या जागा तसेच रस्ते विकसित करताना त्या जागा संपादन करणेसाठी प्रदीर्घ कालावधी व मोठया प्रमाणावर निधी लागतो. परीणामी या जागा संपादित करून त्यांचा विकास योजना प्रयोजनाप्रमाणे विकसन करणे शक्य होत नाही.

मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रसिद्ध केलेल्या सुधारीत प्रारूप विकास आराखडा सोबतच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्र. १५(२) ते १५(८) यामध्ये 'सार्वजनिक सुविधांच्या जागा व मनोरंजनाच्या मोकळया जागा नियोजन प्राधिकरणास परत केल्यामुळे मिळणारे विकास हक्क' बाबतच्या सविस्तर तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. परंतु उल्हासनगर शहराच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत विकास हक्काबाबत कोणतीही तरतुद नाही. उक्त शासन निर्देश विचारात घेता कठोरतम तरतुदीचे तत्वानुसार मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत विकास हक्का बाबत तरतुद नसल्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेल्या नियमावलीत जरी विकास हक्काबाबत तरतुद असली तरी त्याप्रमाणे विकासकास विकास हक्क देता येत नाहीत.

३ब) उल्हासनगर शहर मंजुर विकास आराखडयातील शासकीय मालकीच्या महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेल्या आरक्षित भुखंडांच्या व प्रस्तावित रस्त्यांच्या जागांवर पुर्वीपासुन मोठया प्रमाणात अतिक्रमणे झालेली आहेत.

यापैंकी सन १९९५ पुर्वीचे झोपडपट्टी धारकांचे पुर्नवसन केल्याशिवाय सदर जागा विकास योजना प्रयोजनाप्रमाणे विकसित करता येत नाहीत. उल्हासनगर शहरातील सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित जागा तसेच इतर शासकीय व महानगरपालिकेच्या जागांवरील १९९५ पुर्वीचे झोपडपट्टी धारकांची संख्या अतिशय मोठी आहे. तथापि वर नमुद दोन्ही विकास नियंत्रण नियमावलीत या झोपडपट्टी धारकांचे पुर्नवसनासंबंधी कोणतीही तरतुद

करण्यात आलेली नाही. इतर काही महानगरपालिकेत या संबंधीच्या तरतुदी विकास नियंत्रण नियमावलीत करण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंघाने 'झोपडपट्टी धारकांचे पुर्नवसनासंबंधीच्या तरतुदी' उल्हासनगर शहराच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेसाठी कलम ३७ नुसार महानगरपालिकेने किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करणे व तत्पुर्वी या तरतुदी तातडीने अंमलात आणणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम कलम १५४ प्रमाणे शासनाकडुन निर्देश होणेसाठी शासनाकडेस यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

३क) या दोन्ही विकास नियंत्रण नियमावलीत शहरातील धोकादायक इमारतीच्या पुर्नबाधंणी बाबत तरतुद अर्तंभुत करण्यात आलेली नाही. उल्हासनगर शहरात अनेक इमारती या धोकादायक स्थितीत आहेत. व त्यांची पुर्नबांधणी करून इमारतीतील सर्व रहिवाश्याचें पुर्नवसन नियमानुसार उपलब्ध असलेल्या चटई क्षेत्र निर्देशांकात करणे शक्य होत नाही. त्यासाठी विशेष तरतुदीची आवश्यकता आहे. लगतचे कल्याण महानगरपालिकेचे विकास नियंत्रण नियमावलीत यासाठी विशेष तरतुद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे तरतुद उल्हासनगर महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीत अंर्तभुत करणे आवश्यक आहे.

ड) या दोन्ही विकास नियंत्रण नियमावलीत अनाधिकृत इमारतींना नियमानुकुल करणे बाबतच्या तरतुदी नमुद नाहीत. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९९६ चे कलम १४३ नुसार अधिनियमात नियमानुकूलासंबंधी तरतुद आहे. परंतु त्यासाठी नियम असणे आवश्यक आहे. उपरोक्त तरतुद नसल्यामुळे किरकोळ स्वरूपाचे अनियमिता नियमानुकूल करून महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्न मिळु शकत नाही. कल्याण–डोंबिवली महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीत याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. त्या तरतुदीत आवश्यक तो किमान बदल करून त्याप्रमाणेची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत असणे आवश्यक आहे.

इ) शहरात वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात वाढीव शैक्षणिक व वैद्यकिय सुविधांची अत्यंत आवश्यकता असुन त्यासाठी अशा संस्थांसाठी चटई क्षेत्र निर्देशांकासाठी विशेष तरतुद करणे आवश्यक आहे. मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्र. ३३ (२) प्रमाणे तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट आहे. त्याप्रमाणेच तरतुद सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीत करण्यात यावी.

४) शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे विकास नियंत्रण नियमावली मध्ये खालील बाबीसाठी तरतुद करणे अनिवार्य आहे. शासनाने यापुर्वी तत्कालीन नियोजन प्राधिकरणांस नगर विकास विभागाकडील आदेश क्र. एम एस/टि पी एस–१२००/५२७/सी आर–७९/०१/यु डी १२, दि. ५ जुर्ले २००२ नुसार विकास नियंत्रण नियमावलीत बाल्कनी बंद करणे बाबतच्या तरतुदी अंर्तभुत करणेबाबत कलम १५४ नुसार निर्देश दिलेले आहेत. तथापि, त्याअनुषंघाने विकास नियंत्रण नियमावलीत आवश्यक ते बदल झालेले नाहीत.

४अ) बांधकाम परवानगी देताना पाऊस, पाणी संकलनासाठी प्रत्येक इमारतीत तरतुद करणे.

४ब) नवीन इमारती मध्ये सौर ऊर्जाच्या/पर्यायी ऊर्जा साधनांचा वापर संबंधी तरतुद करणे.

वरील ३ व ४ मधील नमुद केलेल्या बाबीसंबंधी तरतुंदी या शहरातील विकासाच्या दृष्टिने अत्यंत महत्वाच्या अशा आहेत. महानगरपालिकेस शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे सुधारीत विकास योजना तयार करताना त्यासोबतचे विकास नियंत्रण नियमावलीत या तरतुदी करता येतील. परंतु उल्हासनगर शहरासाठी शासन निर्देशाप्रमाणे महानगरपलिकेने सुधारीत विकास योजना तयार करून त्यास शासनाची मंजुरी मिळवुन त्याप्रमाणे सुधारीत विकास नियंत्रण नियमावली लागु होणेस मोठा कालावधी लागणार आहे.

वरीलबाबी विचारात घेवुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर सुधारीत प्रारूप विकास योजने सोबतचे सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीत खालील बाबी अंर्तभुत करून ती उल्हासनगर क्षेत्रासाठीची विकास नियंत्रण नियमावली म्हणुन लागु करणे आवश्यक आहे.

| अंर्तभुत करावयाचे नियम | प्रस्तावित क्रमांक |
|---|---|
| घोषित गलिच्छ वस्ती(झोपडपट्टी) पुर्नविकासासंबंधी नियम | परिशिष्ठ डबल्यु |
| धोकादायक इमारतींच्या पुर्नबांधणी बाबत तरतुद | परिशिष्ठ व्हि |

| | |
|---|---|
| अनाधिकृत इमारती नियमानुकुल करणेबाबतची तरतुद | १०.१ व १०.२ |
| बाल्कनी बंदिस्त करणेसाठी शुल्क वसुली बाबत तरतुद | परिशिष्ठ एक्स |
| नवीन इमारतीमध्ये अपारंपारिक ऊर्जा साधनांचा वापराबाबत तरतुदी | परिशिष्ठ वाय |
| पाऊस पाणी संकलनाची तरतुद | परिशिष्ठ झेड |
| शैक्षणिक व वैद्यकिय संस्थांच्या इमारतीसाठी वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकाबाबत तरतुद | परिशिष्ठ झेड–१ |

वरील तरतुदीसह मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रसिद्ध केलेले सुधारीत विकास नियंत्रण नियमावली वरील नमुद बाबी समाविष्ठ करून उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी लागु करणेबाबत शासनास नियोजन प्राधिकरण म्हणुन विनंती करणे संबंधी महासभेकडुन ठराव पारीत होणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रारूप विकास नियंत्रण नियमावली सोबत जोडली आहे. त्यावर विचार विनिमय होवुन शासनास मंजुरीसाठी पाठविणेस मान्यता मिळावी.

**विशेष महासभा ठराव क्र.** ७४      **दिनांकः–७.३.२००५**

सुचकाचे नाव :–श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :–श्री. देवेंद्रसिंग खेमाणी

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने यापूर्वी उल्हासनगर शहरासाठी प्रसिध्द् केलेल्या सुधारित प्रारुप विकास योजनेसोबत प्रसिध्द् केलेल्या सुधारित विकास नियंत्रण नियमावलीत वरील प्रस्तावनेत सुचविल्याप्रमाणे किरकोळ फेरफार करुन ती उल्हासनगर शहासाठी लागु करण्यास व त्याप्रमाणे शासनास विनंती करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**बहुमताने**

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिवः–**विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ५:–** वालधुनी नाल्याचे प्रदुषण रोखण्यासाठी ''मिशन वालधुनी'' प्रकल्पाची अंमलबजावणी करणेस मान्यता देणे.

**काही सदस्य :–**पास. पास.

**मा. महापौरः–**सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

**विषय क्र. ५:–** वालधुनी नाल्याचे प्रदुषण रोखण्यासाठी ''मिशन वालधुनी'' प्रकल्पाची अंमलबजावणी करणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना :–**

उल्हासनगर महानगरपालिकेने 'यशदा' मार्फत तयार केलेल्या पर्यावरण विषयक अहवालामध्ये वालधुनी नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. वालधुनी नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी 'यशदाची' नियुक्ती करण्यात आलेली आहे.

वालधुनी नदीचे प्रदुषण रोखणे व नाल्याचे सुशोभिकरण करणे या दोन स्वतंत्र बाबी आहेत. पर्यावरण स्थिती अहवालातील सुचनांचा विचार करता वालधुनी नदीच्या पाण्याचे प्रदुषण रोखणे आवश्यक आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने वालधुनी नदीतील पाण्याचे प्रदुषण करणा—या सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व उदयोजकांना प्रदुषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिलेले आहेत व त्यासाठी दि. १७.२.२००५ रोजी मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी उल्हासनगर येथे स्वत: भेट देवुन सर्व संबधितांशी चर्चा केली आहे. (सोबत बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे)

सदर बैठकीत वालधुनी नदीच्या पाण्याचे प्रदुषण रोखण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेने 'नोडल एजन्सी'' म्हणुन काम करावे व सदर प्रकल्प मे. सृष्टी इको रिसर्च इन्स्टीटयुट, पुणे यांच्या मार्फत राबविण्यात यावा, असे निर्णय घेण्यात आले.

<u>प्रकल्पाची पार्श्वभुमी:—</u>

वालधुनी नाल्याचा उगम अंबरनाथ परिसरातील पहाडातुन सुरू होतो. व शेवटी हा नाला अंबरनाथ, उल्हासनगर व कल्याण परिसरातुन वाहत जावुन शेवटी उल्हासनदीच्या खारेपाणी क्षेत्रात एन.आर.सी. बंधा—यांच्या खालच्या बाजुला मिळतो. सदर नाल्यामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बदलापुर, अतिरिक्त अंबरनाथ, चिखलोली, मोरीवली, अंबरनाथ केमिकल्स झोन व इतर एमआयडीसी बाहेरील मोठया उद्योगांचे औद्योगिक सांडपाणी सोडले जाते. तसेच उल्हासनगर महानगरपालिका व अंबरनाथ नगरपालिकेचे व काही प्रमाणात कल्याण महानगरपालिकेचे सांडपाणी सुध्दा सोडले जाते. नाल्यामध्ये एकुण ११६ एम.एल. डी. सांडपाणी सोडले जाते. त्यापैकी ८० टक्के स्थानिक स्वराज्य संस्थेचे घरगुती सांडपाणी असून २० टक्के उद्योगांचे औद्योगिक सांडपाणी आहे. वालधुनी नाल्याच्या बदलत्या जलगुणवत्तेविषयी वाढत्या तक्रारीमुळे जनक्षोभ कमी होण्याच्या दृष्टीने व पर्यावरणाचे संरक्षणाच्या दृष्टीने म.प्र.नि. मंडळाने हा प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

सदर प्रकल्पाची अंमलबजावणीकरीता मप्रनि मंडळाने अधिकारी उल्हासनगर महानगरपालिकेस देखरेख करण्यामध्ये व तांत्रिक दृष्टया मदत करणार आहेत. तसेच वालधुनी नाल्याच्या पाण्याची गुणवत्ता वेळोवेळी तपासण्यासाठी त्यांच्याकडे असलेल्या प्रयोगशाळेची सुविधा पुरवतील.

उल्हासनगर महानगरपालिकेची जबाबदारी:—

शहरामधुन निघणा—या घरगुती सांडपाण्यावर योग्य ती प्रक्रीया करून वाहणा—या नाले, नदयांची गुणवत्ता राखणे त्यांना प्रदुषण मुक्त राखणे ही संवेधानिक जबाबदारी स्थानिक महापालिका / नगरपालिकांची असते.

मिशन वालधुनी प्रकल्पात उल्हासनगर महानगरपालिका 'नोडल एजन्सी' म्हणुन काम करणार आहे. उल्हासनगर शहरातुन वाहणा—या दुषित वालधुनी नाल्याच्या शुध्दीकरणात अत्यंत महत्वपुर्ण भुमिका महापालिकेला निभवावी लागेल. सुरवातीला नाल्यामध्ये असलेला घनकचरा काढून नाला स्वच्छ करणे तसेच आवश्यक तेथे नाल्याच्या काठावर तारेचे कुंपण लावणे व जागा संपादन करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. तसेच प्रकल्प उभारण्याच्या दरम्यान व नंतर संरक्षण, देखभाल करण्याची जबाबदारी आहे.

<u>कामाचे स्वरूप:—</u>

दिनांक १७.२.२००५ रोजी डॉ. श्री. डी.बी.बोराळकर,सदस्य सचिव, मप्रनि मंडळ, यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मे. सृष्टी इको रिसर्च इन्स्टिटयुटचे श्री. संदिप जोशी यांनी सुचविलेल्या 'ग्रीन ब्रिज' व 'ग्रिन लेक' या तंत्रज्ञानाचा वालधुनी नाल्याच्या शुध्दीकरणासाठी अवलंब करायचा आहे. प्रत्यक्ष प्रकल्प उभारणीचे काम मे.सृष्टी इको रिसर्च इन्स्टीटयुट, पुणे हे करणार असून ते प्रस्तावामध्ये नमुद केल्याप्रमाणे चार ठिकाणी 'ग्रिन लेक' व दहा ठिकाणी 'ग्रिन ब्रिज' यंत्रणेची उभारणी करतील व हा प्रकल्प एक वर्षाकरिता चालविणे व देखभाल करण्याची जबाबदारी त्यांच्यावर राहील.

वित्तिय आकृतीबंध:—

मिशन वालधुनी प्रकल्पात अभ्यास, उभारणी आणि एका वर्षापर्यंतच्या देखभालीचा एकुण खर्च जवळ जवळ रू. ५० लाख अपेक्षित आहे. दि. १७.२. २००५ च्या बैठकीत ठरल्याप्रमाणे वित्तिय आकृतीबंध खालीलप्रमाणे राहील.
म.प्र.नि. मंडळ, २५ टक्के.
उल्हासनगर महानगरपालिका, अंबरनाथ नगरपरिषद व कल्याण —डोंबिवली महानगरपालिका, २० टक्के
उद्योग ५० टक्के.
आमदारांच्या स्थानिक विकास निधी ५ टक्के

प्रकल्पखर्चापैकी मदतीचा पहिला हप्ता म्हणुन रू. ५ लक्ष इतका निधी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने महानगरपालिकेस अदा केला आहे.

सबब, खालील बाबीवर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा. महासभेच्या पटलावर ठेवण्यात यावा.

अ) उल्हासनगर महानगरपालिकेने 'नोडल एजन्सी' म्हणुन काम करण्यास मान्यता.
ब) सदर काम मे.सृष्टी इको रिसर्च इन्स्टीटयुट, पुणे यांचेमार्फत निविदा न मागविता करून घेण्यास मान्यता.
क) वित्तिय आकृतीबंधात नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेने करावयाच्या खर्चास मान्यता.
ड)प्रकल्प उभारणीनंतर प्रकल्प व्यवस्थापन, देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी उल्हासनगर महापालिकेने स्विकृत करण्यास मान्यता.

विशेष महासभा ठराव क्र. ७५ दिनांक:—७.३.२००५

सुचकाचे नाव :—श्री. नाना पवार

अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार वालधुनी नाल्यातील प्रदुषण रोखण्यासाठी (मिशन वालधुनी) प्रकल्पाची अंमलबजावणी करणेकामी प्रस्ताव पुढीलप्रमाणे मान्य करीत आहे.

अ) उल्हासनगर महानगरपालिकेने 'नोडल एजन्सी' म्हणुन काम करणे.
ब) सदर काम मे.सृष्टी इको रिसर्च इन्स्टीटयुट, पुणे यांचेमार्फत निविदा न मागविता करून घेणे.
क) वित्तिय आकृतीबंधात नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेने करावयाच्या खर्चास मान्यता.
ड) प्रकल्प उभारणीनंतर प्रकल्प व्यवस्थापन, देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी उल्हासनगर महापालिकेने स्विकृत करणे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:—विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ६:—** उल्हासनगर महानगरपालिका सार्वजनिक रस्त्यांच्या किंवा जागेच्या जागांमध्ये वाहने उभी करणेकामी जागा निश्चित करणे व त्यासाठी शुल्क आकारणी व शुल्क वसुलीसाठी अभिकर्ता नेमणुकीचा प्रस्ताव मान्य करणे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—**मा. महापौरजी, हा जो प्रस्ताव आलेला आहे. एक तर या ठरावामध्ये स्पष्ट केले पाहिजे की शहरातील कॅम्प नं.१ ते ५ मध्ये जे दुकानदार आहेत त्यांची जी काही वाहने असतात ती दुकानांसमोर उभी करण्यासाठी सुट असली पाहिजे. त्यांना कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारता कामा नये. हे झाले एक व दुसरे असे की, जे पण पार्कींग झोन आपलाही प्रस्ताव ठेवला आहे. आणि आमचाही प्रस्ताव ठेवला आहे. कारण की, आपलीही बाजु मला सांभाळावी लागते. दुसरे असे की पे अॅन्ड पार्कचे जे झोन तयार केले जातील त्यामध्ये आयुक्त साहेब पोलिस उपायुक्त हे या समितीचे जे प्रमुख आहेत त्यामध्ये मा. महापौर व उपमहापौर यांनीही समाविष्ट केले जावे. या लोकांनी एकत्रित बसुन निर्णय घ्यावा की पार्कींग झोन कुठे कुठे तयार करावेत. व किती करावेत यामध्ये आपण जे दर प्रस्तावित केले आहेत हे दर नंतर महासभा ठरवेल. आता आपण पार्कींग झोन तयार करू. दर नंतर महासभा निश्चित करेल. विशेष करून कॅम्प नं. १ ते ५ पर्यंतचे दुकानदार आहेत त्यांना त्यांच्या दुकानासमोर त्यांचे वाहन उभे करण्यास सुट असली पाहिजे. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—**महापौर महोदया, आयुक्त साहेब मी आपणांस धन्यवाद देतो. शहरातील वाहतुक सुकर होण्यासाठी रस्त्यावर जे अडथळे आहेत ते आपण दुर करू इच्छिता जेणे करून येथिल नागरिकांना गैरसोयीचे होवू नये, ही गैरसोय दुर झाल्यामुळे पेट्रोलची सुध्दा बचत होईल. आपण जी पार्किंगची सोय करत आहात, त्यासाठी आम्ही धन्यवाद देतो. त्याचबरोबर आम्ही आपणांस एक विनंती करतो आपण महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी १०० वेळा विचार करता, नविन नविन प्रस्ताव आणता, ही अतिशय चांगली गोष्ट आहे. परंतु येथील जे नागरिक आहेत तेथील जे दुकानदार बंधु आहेत त्यांच्या बाबतीत सुध्दा आपण विचार केला पाहिजे. प्रत्येक दिवशी महिन्याच्या ३० दिवशी पुर्ण वर्षभर दुकानदार बंधु आपल्या घरापासुन दुकानापर्यंत पोहचण्यासाठी मजबुरीने आपली स्कुटर, कार घेवुन येतात. आपली स्कुटर, कार रस्त्यावर उभी करतात, जर आपण पार्कींगची सोय करत असाल तर आपण सांगत असलेल्या पार्कींगच्या जागेवर दुकानदार आपली स्कुटर, कार पार्कींग करण्यासाठी जातील परंतु या बाबतीत आपण पार्कींगचे वाजवी दर जर ठेवले तर ते सुध्दा भरतील. हा प्रस्ताव आपण मागच्या वेळेस सुध्दा आणला होता. जो महासभेने रद्द केला होता. तर आता आपण योग्य तो विचार करून असे प्रस्ताव आणा. ज्यामुळे व्यापा—यांना गैरसोयीचे होणार नाही. आपण म्हणाल की, व्यापा—यांनी रस्त्ययावर केलेल्या स्कुटर पार्कींगचे पैसे दयावेत किंवा दुकानामध्ये जे गि—याईक येतात त्यांनी रस्त्यावर उभ्या केलेल्या स्कुटरचे पार्कींग शुल्क भरावे तर हे संभव नाही. असे प्रस्ताव आणताना व्यापा—यांकडे व नागरिकांकडे जरा लक्ष दयावे. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—**मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब पैसे दया व वाहन पार्क करा या प्रस्तावाबाबत आमचे असे म्हणणे आहे की, प्रथम या शहरामध्ये वाजवीपेक्षा जास्त मिळकत कर किंवा पाणी टॅकर वाहतुक भाडे किंवा जकात दर असे बरेचसे कर पुर्वीपेक्षा अधिक प्रमाणावर वाढविले आहेत. यासाठी आम्हाला असे वाटते की या अगोदर सुध्दा आमचा विरोध होता. आम्हाला असे वाटते की, शहरवासियांवर कोणत्याही कराचे ओझे वाढवु नये आणि यासाठी पे अॅन्ड पार्क या योजनेस उल्हासनगर योग्य नाही. आम्ही या पध्दतीचा विरोध करतो व या शहरामध्ये कोणतेही शुल्क न आकारता पे अॅन्ड पार्क तयार केले पाहिजे. लोकांना आपली स्कृटर किंवा कार निशुल्क पार करण्याची प्रथम सवय लावली पाहिजे व त्यानंतर कधी तरी अशा प्रकारच्या कराचा प्रस्ताव आणला पाहिजे. आम्ही शिवसेना भाजपाचे सदस्य पे अॅन्ड पार्क या प्रस्तावाचा विरोध करतो.

**मा. सदस्य श्री. राजेश वदारिया:—**मा. महापौरजी, याचबरोबर मी एक सूचना करू इच्छितो की उल्हासनगर स्टेशन शहाड स्टेशन व विठ्ठलवाडी स्टेशन येथे खाजगी पार्कींग चालु आहे. जी बेकायदेशिर आहे व यातुन जे काही उत्पन्न मिळते ते महापालिकेस मिळाले पाहिजे. परंतु याबाबत खाजगी व्यक्ती बेकायदेशिर रित्या उत्पन्न गोळा करत आहे. तर या प्रस्तावाची लवकरात लवकर अंमलबजावणी केली जावी.

**मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—**मा. महापौर महोदयांना व आयुक्त साहेबांना निवेदन करतो की व्यापा—यांबाबत मी जे मनोगत व्यक्त केले त्याबाबत त्यांनी कृपया खुलासा करावा. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. गोविंदराम लुंड:—मा. महापौर महोदया,आयुक्त साहेब,सन्माननिय सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांनी जे म्हंटले त्याचा खुलासा केला तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, जसे की विरोधी पक्षातील सदस्यांचे सुध्दा असे म्हणणे आहे व सत्ताधारी पक्षामध्ये सुध्दा या प्रस्तावाबाबत संभ्रमता आहे, म्हणुन या प्रस्तावावर विचार करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांची एक समिती नेमली जावी या लोकांनी निर्णय घेतल्यांनतर हा प्रस्ताव महासभेपुढे आणला जावा. आतापर्यंत काही लोक हा प्रस्ताव चांगल्याप्रकारे समजु शकले नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—जर आपणांस हा प्रस्ताव काय आहे हे समजले नाही तर आपण तो महासभेपुढे कसा आणला? आपण हा प्रस्ताव महासभेपुढे आणावयास नको होता व पास पास म्हणावयास नको होते.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—मा. महापौर महोदया, जसे की आमच्या सभागृह नेत्यांनी सांगितले ते योग्य आहे परंतु याबाबतीत आपण आता एक आदेश अवश्य दयावा. आमचे सन्माननिय सदस्य श्री. राजेश वदारिया यांनी येथे जो मुद्दा उपस्थित केला की, जे लोक महापालिकेच्या रस्त्यावर पार्क केलेल्या वाहनांचे पार्किंगचे पैसे वसुल करत आहोत ते काम महापालिकेने त्वरीत आपल्या हाती घ्यावे. व ही जी बेकायदेशिररित्या वसुली चालु आहे. ती त्वरीत थांबविली जावी. जेणेकरून महापालिकेस ते उत्पन्न मिळावे.

मा. महापौर:—आयुक्त साहेब याबाबतीत विचार करतील व याबाबत चौकशी करून जे लोक अनधिकृत पार्कींगचा व्यवसाय करतात व हा जो विषय आहे याबाबत सर्वांचे वेगवेगळे मत आहे. व सत्ताधारी व विरोधी पक्षातील सदस्यांची एक समिती नेमुन यावर विचार करून त्यानंतर हा प्रस्ताव महासभेपुढे आणला जावा. श्री. लाल पंजाबी यांना या समितीचे सभापती बनविले जाईल?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—मी विरोधी पक्षात आहे, मी कधीही याचा स्विकार करणार नाही. मी त्या समितीमध्ये येवु शकतो परंतु सभापती पद स्विकारणार नाही. व मला ते नकोच आहे. जयहिंद, जय महाराष्ट्र.

मा. सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे:—मा. महापौरजी, माझ्या पॅनल क्र. २ मध्ये शहाड पासुन बॅरेक नं. ३७४ न्युईरा स्कुल या ठिकाणी खुनी खड्डा नावाचा एक रस्ता आहे. तेथुन शहाड स्टेशन कडे येण्याजाण्यासाठी लोकांची फार मोठया प्रमाणावर वर्दळ असते. तेथे राणा ट्रेडींग कंपाऊंडमध्ये खाजगी पार्कींग चालु आहे. आनंद मुत्तु नगर येथे कंपाऊंड नसलेला एक भुखंड महानगरपालिकेची संपत्ती पडुन आहे. ज्यास खुनी खड्डा म्हंटले जाते. माझ्यामते तो भुखंड असाच कोणतेही कुंपण न घालता पडुन आहे. तेथे शहाड स्टेशनसाठी पार्कींगची सोय होवु शकते आपण या भुखंडाचा याकामी वापर करावा. धन्यवाद.

मा. सचिव:—या प्रस्तावावर अभ्यास करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्याचा प्रस्ताव आलेला आहे. त्या समितीचे अध्यक्ष असतील मा. महापौरजी, बाकी जे सदस्य असतील ते याप्रकारे.
मा. उपमहापौर— सदस्य
मा. स्थायी समिती सभापती —सदस्य
मा. सभागृह नेता—सदस्य
मा.विरोधी पक्षनेता — सदस्य
उपआयुक्त (मालमत्ता )हे .सदस्य सचिव राहतील.

काही सदस्य :—पास. पास.

मा. महापौर:—सदरच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यापुर्वी समितीची रचना करणे कामीचा प्रस्ताव पुढील प्रमाणे संमत करण्यात येत आहे.

विषय क्र. ६:— उल्हासनगर महानगरपालिका सार्वजनिक रस्त्यांच्या किंवा जागेच्या जागांमध्ये वाहने उभी करणेकामी जागा निश्चित करणे व त्यासाठी शुल्क आकारणी

व शुल्क वसुलीसाठी अभिकर्ता नेमणुकीचा प्रस्ताव मान्य करणे.

<u>प्रस्तावना :—</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम २४३अ (१) नुसार आयुक्तास, पोलिस आयुक्तांशी किंवा पोलिस आयुक्त नसेल त्याबाबतीत महानगरपालिका क्षेत्रातील पोलीस अधिका—यांच्या अधिकार श्रेणीमध्ये सर्वात वरिष्ठ दर्जा असणा—या पोलीस अधिका—याशी विचारविनिमय केल्यानंतर, वेळोवेळी, सार्वजनिक रस्त्याच्या किंवा सार्वजनिक जागेच्या कोणत्याही भागामध्ये त्याला योग्य वाटतील अशा जागी वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे म्हणुन राखून ठेवता येतील.

कलम २४३अ (२) आयुक्तास, महानगरपालिकेच्या संमतीने, त्याला योग्य वाटतील अशा अटी व शर्ती यांच्या अधीन राहून, कोणत्याही व्यक्तीकडून तिने वाहन उभी करून ठेवण्यासाठी किंवा थांबविण्यासाठी अशा जागेच्या किंवा ठिकाणाच्या केलेल्या वापराकरीता प्रत्येक दिवसासाठी किंवा त्याच्या भागासाठी त्याला योग्य वाटेल अशी फी किंवा शुल्क आकारता येईल. अशी तरतुद आहे.

उल्हासनगर शहरातील वाहतुक संमस्ये बाबत महानगरपालिका, पोलिस विभाग, व्यापारी संघटना, फेरीवाला संघटना यांच्या विविध बैठका घेवुन शहरातील वाहतुक समस्या व त्यावरील उपाययोजना याबाबत संबंधितांचे मत जाणुन घेवुन यासंबंधी करावयाची कार्यवाही निश्चित करण्यात आली.

यावेळी शहरातील वाहतुक समस्येचे निराकरण करणेसाठी शहरात विविध भागातील रस्त्यांवर कोणत्याही परवाना किंवा नियमनाशिवाय उभे राहणा—या वाहनांचे नियमन करणे आवश्यक असल्याचे सर्व संबधितांनी नमुद केलेले आहे. तथापि, कोणतेही अटी व शर्ती निश्चित करून त्यांना परवाना न दिल्याने त्यांचे प्रभावी नियंत्रण करणेत अडचणी येतात.

वरील बाब व अधिनियमातील तरतुद लक्षात घेवुन अधिनिमयमाचे कलम २४३ अ(२) प्रमाणे ''उल्हासनगर महानगरपालिका सार्वजनिक रस्त्याच्या किंवा जागेच्याभागामध्ये वाहन उभी करून ठेवणे किंवा थांबवण्याच्या जागा निश्चित करणे व त्यासाठी शुल्क आकारणी करणेसाठीच्या अटी व शर्ती'' यांचे प्रारूप तयार करण्यात आलेले आहे.

या अटी व शर्तीप्रमाणे वाहनतळ परवाना देणेस महानगरपालिकेने मान्यता दिल्यास वाहनधारकाकडुन वाहनतळ शुल्क व दंडनीय शुल्क वसुल करण्याचा महानगरपालिकेस अधिकार प्राप्त होईल. अशा वसुलीसाठी महानगरपालिका कर्मचा—याची आवश्यकता लागेल परंतु सद्यस्थितीत त्यासाठी कर्मचारी उपलब्ध करून देणे अशक्य आहे तसेच अशाप्रकारे शुल्क वसुलीसाठी येणारा खर्च हा अधिक असण्याची शक्यता आहे. अधिनियमात वरील प्रमाणे शुल्क महानगरपालिकेने स्वत: किंवा अभिकर्त्यांकडुन करावे याबाबत निश्चित अशी तरतुद दिसुन येत नाही. तथापि, अधिनियमाचे कलम ३३२(२) नुसार बाजार कत्तलखाने यांचे परवाना फी मक्त्याने वसुल करण्याची तरतूद आहे. ती विचारात घेता वाहनतळ शुल्क सुध्दा मक्त्याने वसुल करणे योग्य राहील.

यासाठी वाहनतळ शुल्क व त्यासंबंधीचे इतर शुल्काचे वसुलीसाठी अभिकर्ता नेमुणुकीसाठीचे पारूप अटी व शर्ती तयार करण्यात आलेल्या आहेत. या वरील दोन्ही अटी व शर्तीना महासभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे.

त्यामुळे १) प्रारूप ''उल्हासनगर महानगरपालिका सार्वजनिक रस्त्याच्या किंवा जागेच्याभागामध्ये वाहन उभी करून ठेवणे किंवा थांबवण्याच्या जागा निश्चित करणे व त्यासाठी शुल्क आकारणी करणेसाठीच्या अटी व शर्ती''
२) महानगरपालिका वाहनतळ शुल्क वसुलीसाठी अभिकर्ता नेमणुकीसाठीच्या अटी व शर्ती'
यांना महासभेकडुन मान्यता मिळणेस व त्याची दिनांक १/४/२००५ पासुन अंमलबजावणीचा करणेस मान्यता मिळणेसाठी मा. महासभेकडे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>विशेष महासभा ठराव क्र.</u> ७६ <u>दिनांक:—७.३.२००५</u>

सुचकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा उल्हासनगर महानगरपालिका सार्वजनिक रस्त्यांच्या किंवा जागेच्या जागांमध्ये वाहने उभी करणे कामी जागा निश्चित करणे व त्यासाठी शुल्क आकारणी व शुल्क वसुली साठी अभिकर्ता नेमणुकीचा प्रस्ताव निकालात काढण्यासाठी अभ्यास करण्याकामी मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली खालील समितीची रचना करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. महापौर | अध्यक्ष |
| २. | मा. उपमहापौर | सदस्य |
| ३. | सभापती स्थायी समिती | सदस्य |
| ४. | सभागृह नेता | सदस्य |
| ५. | विरोधी पक्षनेता | सदस्य |
| ६. | उपआयुक्त (मालमत्ता ) | सदस्य सचिव |

उपरोक्त समितीने आपल्या शिफारशीसह अहवाल पुढील महिन्याच्या महासभेत सादर करावा.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :— कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.४० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—८/४/२००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ८/४/२००५

## विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शुक्रवार दिनांक ८.४.२००५ सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा.महापौर :– श्रीमती ज्योती कालानी
२) मा. उपमहापौर :– श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३१. | श्री. रमेश चव्हाण |
| ४. | श्री. टेकचंदानी राजु | ३२. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ५. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३३. | श्री. जाधव सुरेश |
| ६. | श्रीमती मोकल सीमा | ३४. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ७. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ३५. | श्री. देवेंद्रसिंह खेमाणी |
| ८. | श्री. एडके गणपत गोविंद | ३६. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ९. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३७. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १०. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ३८. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ३९. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १२. | श्री. यादव लालबिहारी बुझारत (तुझारत) | ४०. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १३ | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४१ | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १४. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४२. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १५. | श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र | ४३. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १६. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४४. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १७. | श्री. नाना पवार | ४५. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १८. | श्री. जग्याशी राजु | ४६. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| १९. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ४७ | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २०. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ४८. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २१. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ४९. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २२. | श्रीमती सोनेजी मिना | ५०. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २३. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५१. | श्री. बेहरानी मोहन |
| २४. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, | ५२. | श्रीमती मालती करोतिया |
| २५. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ५३. | श्रीमती मिनु राज दासानी |
| २६. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५४. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २७. | श्री. सतरामदास जेसवानी | ५५. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २८. | श्री. लुंड गोविंदराम | ५६. | श्री. माखिजा हरदास |
| २९. | श्रीमती भावना रवी खिलनानी | ५७. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३०. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ५८. | श्री. राजेश वदारिया |

तर,

मा. सदस्य / सदस्या १. श्रीमती. संगिता रमेश जावळे, २. श्री. सोनवणे नथु काशिराम, ३. श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे, ४. श्री. वाघे शामु बाबु, ५. श्री. दिलीप गायकवाड, ६. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, ७. श्रीमती. आहुजा निता प्रकाश, ८. श्री. शांताराम निकम, ९. श्री. मोहन साधवानी, १०. श्रीमती जया साधवानी, ११. श्री. राज असरोंडकर, १२. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण, १३. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास, १४. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, १५. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, १६. श्री. चौधरी राजेंद्र शांताराम, १७. श्रीमती. भटीजा कोमल अमृत, १८. श्री. जयसिंघानी अनिल, १९. श्री. रामरख्यानी मोहनदास , २०. श्रीमती किरण लखी माखिजा, २१. डॉ. निना प्रकाश नाथानी, २२. श्री. संजय बठिजा, २३. श्री. ठाकुर बेहरानी हे सभेस अनुपस्थित होते.

वंदेमातरम म्हणून सांयकाळी ४.३५ वाजता सभेची सुरुवात करण्यात आली.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–** मा. महापौरजी, नुकतेच उल्हासनगरचे व्यापारी एकता मंडळाचे अध्यक्ष श्री. श्रीचंद रोहरा यांचे निधन झाले आहे. तर आम्हांला असे वाटते की, त्यांना येथे श्रध्दांजली अर्पित केली जावी

**मा. महापौर :–** पोप जॉन पॉल यांचे देखिल निधन झाले आहे. त्यांना देखील श्रध्दांजली अर्पित करण्यात येत आहे.

सुचकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

**शोक प्रस्ताव :–**

अब्जावधी कॅथलिकपंथीय ख्रिस्ती धर्मियांचे सर्वोच्च श्रध्दास्थान असलेले पोप जॉन पॉल (द्वितीय) यांचे दिनांक २/४/२००५ रोजी निधन झाले आहे. पोप यांनी केलेली समाजबांधणी मानवतेवर आधारीत होती तसेच ते शांततेचे पुरस्कर्तेही होते.

तसेच उल्हासनगरचे व्यापारी एकता मंडळाचे अध्यक्ष श्री. श्रीचंद रोहरा यांचे देखिल नुकतेच निधन झाले आहे.

वर उल्लेखिलेल्या मृतात्म्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ९३ अ (१)** **दिनांक:–८.४.२००५.**

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार ख्रिश्चन धर्मगुरु पोप जॉन पॉल (द्वितीय) व श्रीचंद रोहरा यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:–** मा. महापौरजी, सभागृहाचे कामकाज सुरु करण्यापूर्वी या शहराचे आयुक्त, कार्यक्षम अधिकारी श्री. आर.के. सोनवणे यांची उल्हासनगर महापालिकेत तीन वर्षासाठी पुर्ण वेळ आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे. यासाठी महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख व सर्व कॅबिनेट, नगरविकास विभागाचे सचिव यांचे देखिल मी अभिनंदन करतो. मी एका गोष्टीचा खास उल्लेख करु इच्छितो की, आयुक्तांच्या नियुक्तीचे जे पत्र आले आहे त्यामध्ये एक खास ओळ लिहिण्यात आली आहे की, उल्हासनगरचे

प्रभारी आयुक्त यांना नियमित आयुक्त या पदावर नेमण्याचे एक खास कारण आहे की, मागील अडीच ते तीन वर्षाच्या त्यांच्या उल्हासनगरमधील कार्यकालावधीत त्यांचे काम समाधानकारक आहे. या गोष्टीचा मी अजुन एक पुरावा देवू इच्छितो की, हा नियुक्तीचा आदेश जारी होण्यापूर्वी उल्हासनगरमधील समस्यांबाबत मंत्रालयात एक बैठक झाली होती. त्यावेळी मा. मुख्यमंत्री महोदयांनी आयुक्त साहेबांची जी स्तुती केली होती त्याचा देखील मी येथे उल्लेख करु इच्छितो. जे मी स्वत: ऐकले आहे व पाहिले आहे. मा. मुख्यमंत्री यांनी उल्हासनगरच्या आयुक्तांची स्तुती करतांना सांगितले की, त्यांनी उल्हासनगर येथे जावून नागरीक सुविधा केंद्रासारखी जी सुविधा दिली आहे, ती महाराष्ट्रातील इतर महापालिकांनी देखील अंगिकारायला पाहिजे. अशी क्षमता असणारा अधिकारी आपल्या येथे आयुक्त म्हणून आहे. मी मागील बैठकीत देखील बोललो होतो की, आपण वर्तमानपत्रात जी मुलाखत दिली आहे की, मी येथून बदली करु इच्छितो. तर आपण असा विचार देखील करु नये. आमचे सरकार आहे आम्ही सरकारला समजावु. शेवटी आमचे आमदार व मा. महापौर हे सरकारला समजावण्यात यशस्वी ठरले. आज या शहरासाठी ही सौभाग्याची बाब आहे की, त्यांना श्री सोनवणे यांच्या सारखा कार्यक्षम अधिकारी आयुक्त म्हणुन प्राप्त झाला आहे. मला आशा आहे की,त्यांच्या येत्या तीन वर्षाच्या कार्यकालावधीत ते उल्हासनगर शहरामध्ये नक्कीच चांगले काम करुन दाखवतील व शहराचे विकास कार्य जोमाने करतील. दुसरे म्हणजे भारतीय मानक संघाकडुन महापालिकेच्या सचिव कार्यालयास आयएसओ ९००१:२००० हे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. यासाठी मी आमचे सचिव श्री प्रकाश कुकरेजा यांचे देखिल अभिनंदन करतो. मला असे वाटते की, देशातील ही पहिली महापालिका असेल जीच्या महापालिका सचिव कार्यालयास असे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. अशाप्रकारे सचिव कार्यालयास हे प्रमाणपत्र देण्याचा प्रघात नाही परंतु ही उल्हासनगरच्या महापालिका सचिवांची क्षमता आहे, याबद्दल मी त्यांची सार्वजनिक ठिकाणी देखिल प्रशंसा केलेली आहे. ते महापालिका सचिव म्हणून एक उत्कृष्ट अधिकारी आहेत. आज मी सभागृहात देखील बोलतो की, जेव्हापासून त्यांनी महापालिका सचिव म्हणून काम हाती घेतले आहे, मागील सहा–सात वर्षापासून. मला असे वाटते की, १९९६ पासून महापालिका अस्तित्वात आली आहे. तेव्हा पासून ते हे काम बघत आहे. यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत ज्या महासभा झाल्या आहेत, त्या हाताळण्यामध्ये यांनी जी भुमिका बजावली आहे, मला असे वाटते की, कुणीही अधिकारी असे काम करु शकत नाही. महापालिका सचिव यांच्या कार्यालयाचे काय काम असते हे मी सभागृहाला थोडक्यात सांगु इच्छितो. महापालिकेच्या बैठकांचे आयोजन हे व्यवस्थित व शिस्तबध्दरित्या करणे तसेच सभागृहाचा गौरव व औचित्य राखणे.सभागृहातील वादविवाद, चर्चा या विधायक कामांसाठी व सभा सूचनेबरहुकूम होतील याची काळजी घेणे. महापालिकेची प्रतिमा व विश्वसनियता वाढविणे. संविधानीक व नियमातील तरतुदींची पुर्तता करणे. जनतेच्या पुर्ण समाधानासाठी गुणवत्ता व्यवस्थापन धोरणात सातत्याने परिणामकारक सुधारणा करणे. मी असे मानतो की, यामध्ये ज्या काही सुचना आहेत, या सर्व सुचनांची पुर्तता करण्यात श्री. प्रकाश कुकरेजा हे १०० टक्के यशस्वी ठरले आहेत असे मला वाटते. आपल्या महापालिकेला महापालिका सचिव म्हणून असा अधिकारी लाभला आहे हे आपले सौभाग्य आहे. मला असे वाटते की, आपल्या महापालिकेतील जे दुसरे अधिकारी आहेत त्यांनी आमचे आयुक्त श्री. आर.के. सोनवणे, महापालिका सचिव, श्री. प्रकाश कुकरेजा यांच्या पासुन धडा घेवून त्यांच्या मार्गावर चालल्यास उल्हासनगर महापालिकेबद्दल शहरातील जनतेला काही एक तक्रार राहणार नाही. धन्यवाद.

**मा. सदस्या श्रीमती मालती करोतीया हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> मा. महापौरजी, आम्ही देखील भाजपा व शिवसेनेच्या वतीने आयुक्त व सचिवांचे अभिनंदन करतो व त्याचबरोबर दोन गोष्टी राहुन गेल्या, मी त्याची पुनरावृत्ती करत नाही. एक म्हणजे राजीव गांधी प्रशासकिय गतिमानता या संदर्भात देखील महापालिकेस पारीतोषिक प्राप्त झाले आहे. व दुसरे म्हणजे एमईडीए कडुन उर्जा बचत केल्याबाबत महापालिकेस क्रमांक दोनचे पारीतोषिक प्राप्त झाले आहे. याबद्दल देखील मी प्रशासनाचे व सर्वांचे अभिनंदन करतो. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u> मा. महापौरजी, ४ तारखेला जी महासभा झाली होती त्या महासभेत मी आमचे महापौर व उपमहापौर व आयुक्त साहेबांना एक निवेदन केले होते की, माझ्या प्रभागात एके ठिकाणी जमिन बळकावण्याचा प्रयत्न सुरु होता. आज मला असे सांगतांना आनंद होत आहे की, मा. महापौरांच्या आदेशाप्रमाणे त्याच दिवशी आमचे आयुक्त साहेब यांनी फक्त ते कामच थांबविले नाही तर माझ्या सोबत तेथे येवून जे लोक फलक लावत होते, ते फलक देखील काढुन टाकले. आज या महासभेत मी महापौर , उपमहापौर व आयुक्तांना धन्यवाद देतो.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> ३१ मार्चला येथे जी बैठक झाली होती ती १८ डिसेंबर रोजी स्थगित केलेली महासभा होती. ती महासभा मालमत्ता कराच्या दरवाढी विरोधात स्थगित केली होती. त्यावेळी मी बोललो होतो,

एक सल्ला दिला होता तो मा. महापौरांनी स्विकारला होता. मी बोललो होतो की, हा जो ठराव रद्द होवून आला आहे, त्याच्या विरोधात आपण सरकारकडे अपिल करु शकतो. व दुसरा उपाय शोधु शकतो. हा सल्ला मा. महापौरांनी मान्य देखील केला होता. आता अशी माहिती मिळाली आहे की, या करवाढी विरोधात शहरातील काही नागरीक मुंबई उच्च न्यायालयात गेले आहेत. महापालिका त्यामध्ये प्रतिवादी आहे हे स्वाभाविक आहे. आपण सर्वांनी माझी सुचना मानली होती. आपण सर्व कर वाढीच्या विरोधात आहात, तर माझी अशी सूचना आहे की, त्यामध्ये महापालिका जी प्रतिवादी आहे, महापालिकेने यामध्ये करवाढीचा विरोध करण्यासाठी आपला वकील नेमायला हवा. ज्याने कर वाढीच्या विरोधात न्यायालयात बोलायला हवे. तर मला असे वाटते की, कर वाढीच्या विरोधात महापालिकेने एका वकिलाची नेमणूक करावी. महापौरजी मी खुलासा करतो की, कायदयात अशी तरतुद असते की, एक वादी असतो एक प्रतिवादी असतो. यामध्ये आयुक्त व महापालिका प्रतिवादी आहेत. तर या प्रकरणात आयुक्तांची भुमिका वेगळी असू शकते. आपण जे येथे महापालिका आहोत, आपली भुमिका वेगळी आहे. तर मला असे वाटते की, आपण तेथे कर वाढी विरोधात महापालिकेच्या वतीने लढायला हवे. ही माझी सुचना आहे. मागील वेळी आपण माझी सुचना मंजुर केली होती. म्हणून मी आपणांस येथे विनंती करीत आहे.

मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :– मा. महापौरजी, मी आपणामार्फत यांच्याकडुन माहिती घेवू इच्छितो की, हे म्हणत आहे की, काही लोक मुंबई उच्च न्यायालयात गेले आहेत. त्यांनी जनहित याचिका दाखल केली आहे की, याचिका दाखल केली आहे?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– काहीही असले तरी महापालिका ही त्यामध्ये प्रतिवादी आहे.

मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :– यामध्ये फरक आहे. जर आपण याचिका दाखल केली असेल, व निर्णय त्यांच्या बाजुने झाला तर त्याचा फायदा फक्त एकाच मालमत्तेला मिळेल. जर जनहित याचिका असेल तर सर्वांना फायदा मिळेल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– मी वाचले आहे. ती जनहित याचिका आहे.

मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :– आधी आपण पुर्ण माहिती घेवून या त्यानंतर बोला.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– जर आपण सर्व येथे खरोखर प्रमाणीक असू तर महापालिकेला कर वाढी विरोधात भुमिका घ्यावी लागेल. तसे नसेल तर गोष्ट वेगळी आहे. हवे असेल तर महापालिकेने या विरोधात जावे.

मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :– मा. महापौरजी, माझ्या माहितीप्रमाणे ती एक याचिका आहे. ते सर्व एका माणसाच्या फायदयासाठी केले जात आहे. ही गोष्ट लक्षात घेतली जावी.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– मी ती याचिका वाचली आहे. त्यामध्ये संपुर्ण शहरातील कर वाढीला आव्हान दिले आहे.मी वाचली आहे म्हणून बोलत आहे.

मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :–याचिका स्वत:च्या फायदयासाठी केली जाते.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– तुम्हांला करायचे नसेल तर गोष्ट वेगळी आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– मा. महापौर महोदया, आपण येथे जर एकमताने कर वाढीच्या विराधात बोलत असु, तीन–तीन वेळा बैठक घेत असु, आणि श्री. लाल पंजाबी यावर एक साधा सरळ मार्ग सुचवत असतील तर त्यामध्ये काही हरकत नाही. मग ती याचिका असु दे अथवा जनहित याचिका असु दे.

मा. महापौर :–याचिका जी असते ती स्वत:च्या फायदयासाठी असते. जनहित याचिका ही जनतेच्या फायदयासाठी असते. तर श्री. राजेश वदारिया यांचे एवढेच म्हणणे आहे की, ती याचिका आहे की, जनहित याचिका आहे?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– ही जी याचिका आहे त्यामध्ये आयुक्तांच्या करवाढीच्या आदेशाला आव्हान देण्यात आले आहे. त्यांनी जी करवाढ केली आहे त्याला.

मा. महापौर :– दुसरे म्हणजे आयुक्तांनी आपला ठराव शासनाकडुन विखंडीत करुन आणला आहे. आयुक्त या प्रकरणात आता काही मदत करु शकतात का हे आपण त्यांना विचारु.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– मा. महापौरजी, मी आपणांस समजावून सांगतो. या प्रकरणात आयुक्तांची व महापालिकेची भुमिका वेगवेगळी असु शकते.

मा. महापौर :– यासाठी आपणांस पुन्हा ठराव पारीत करावा लागेल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– आपणांस महापालिकेची भुमिका वेगळी घ्यायची आहे.

मा. महापौर :– आता हा विषय येथे नाही. यासाठी आपण पुन्हा बैठक बोलवून ठराव पारीत करु. जर आधीचा ठराव चालत असेल तर त्याचीच प्रत देवुन टाकु.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– कोणाला देणार?

मा. महापौर :– आयुक्त साहेबांना जे उत्तर दयायचे आहे त्यामध्ये देवु.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– मी पुन्हा एकदा आपणांस सांगतो की, कोणत्याही प्रकरणात दोन पक्ष असतात. एक आयुक्त व दुसरी महापालिका. आयुक्तांची भुमिका वेगळी आहे, आपण महापालिकेच्या वतीने लोकप्रतिनिधी म्हणुन लढु शकतो.

मा. महापौर :– आम्ही विधी अधिकारी यांना अभिप्राय देण्यासाठी सांगु.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– याचा अर्थ यासाठी आपण प्रामाणीक नाहीत. मी आपणावर उघड आरोप लावतो.

मा. सदस्य श्री.राजेश वदारिया :–आधी त्या याचिकेची प्रत सभागृहाला दयायला हवी. आम्हांला त्यावर अभ्यास करण्यासाठी संधी मिळायला हवी.

मा. सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :– मा. महापौरजी, हे श्री. वदारिया जे याचिकेबद्दल बोलतात, तर ३१ तारखेला जेव्हा आपला निर्णय झाला त्यावेळी याचिकेचा प्रश्न नव्हता. आपले असे ठरले होते की, आपणांस सुनावणी न देता जो ठराव रद्द केला आहे त्याविरुध्द अपिल करण्यात यावे. त्यावेळी याचिका अथवा जनहित याचिका याचा प्रश्नच नव्हता. आता ते बोलतात की, आम्ही याचिका वाचु. त्याच्याशी आमचा संबंध नाही. सर्व सभागृहाने एकमताने जो ठराव पास केला होता तो सुनावणी न घेता रद्द करण्यात आला. त्यासाठी आपणांस अपिल करायचे आहे. याचिकेशी आपला संबंध नाही. याचिका जनतेनी केली आहे. सभागृहाने त्या विरुध्द अपिल करावे असा निर्णय झालेला आहे. जर आपण ते टाळत असाल तर ती आपली मर्जी आहे.

मा. महापौर :–आम्ही जो ठराव पारीत केला होता, त्यावर आम्ही अजुनही ठाम आहोत.

मा. सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी:– मा. महापौर महोदया, जर कोणी न्यायालयात गेले नसते तरी आपण ३१ तारखेला निर्णय घेतला आहे की, आपण त्या विरुध्द अपिल करु. आपले सर्वानुमते ठरले होते की, करवाढी विरोधात आपण जो ठराव केला होता, तो आयुक्तांनी शासनाकडे पाठविला. शासनाने आपणांस सुनावणी न देता तो रद्द केला. आपण त्यावर अपिल करु. यासाठी आपण सहमत झाला होतात. आता याचिका, जनहित याचिका कुणी केली आहे याच्याशी काही संबंध नाही.

**मा. महापौर :—** आज हा विषय नाही. आम्ही आधी जे बोललो होतो, त्यावर आता देखील ठाम आहोत. आम्ही आपसात बसून यावर मार्ग काढण्यासाठी चर्चा करु. आवश्यकता भासल्यास पुन्हा महासभा बोलावु.

**मा. सचिव :—**विषय वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १:—** महासभा ठराव क्र ६७, दिनांक १८/२/२००५ मध्ये अंशतः बदल करणे.

**मा. सचिव :—** श्री. लाल पंजाबी व श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांच्याकडुन एक सुचना प्राप्त झाली आहे. त्याची प्रस्तावना पुढील प्रमाणे आहे.

शिवसेना — भाजपा युतीच्या वतीने प्रस्ताव देण्यात येतो की, महासभा ठराव क्र. ६७, दिनांक १८.२.२००५ मध्ये अंशतः बदल करण्याबाबतचा विषय विशेष महासभेसमोर ठेवण्यात आला असून त्यामध्ये वाढ केलेली जकात दरवाढ, मालमत्ता करवाढ, पाणी पट्टी दर वाढ, पाणी टॅंकर भाडे, व विशेष सफाई कर ही संपुर्ण वाढ रद्द करुन पुर्वी प्रमाणे लागु असलेले दर कायम ठेवावे.

**मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :—** मा. महापौरजी, आज ही जी विशेष महासभा बोलावली आहे. यामध्ये फक्त तीन बाबी ज्या मी त्यादिवशी इतिवृत्त कायम करतांना सांगितल्या होत्या. तिसरे म्हणजे, टॅंकर साठी आपण जो ठराव केला होता, त्यामध्ये स्पष्टपणे लिहिले होते की, जेथे जलवाहिन्या आहेत परंतु पाणी जात नाही मग ही इमारत असो, झोपडपट्टी असो, चाळ असो अथवा बॅरेक असो. तेथे जोपर्यंत पाण्याची सुविधा मिळत नाही तोपर्यंत तेथे टॅंकर मोफत देण्यात यावा. त्यासाठी आम्ही मा.महापौरांना , आम्ही असे ठरविले होते की, मा. महापौर हे कोणाला टॅंकर दयायचे अथवा नाही हे ठरवतील. आमची ती जी चर्चा झाली होती ती फक्त चर्चेमध्येच आली. त्याचा ठरावात उल्लेख आला नाही. असे सांगुन १ तारखेपासुन फुकट टॅंकर बंद केले आहेत. ज्यावेळी इतिवृत्त आले तेव्हा मी ओरडलो की, कृपा करुन टॅंकर मोफत करावे व ज्या दोन बाबी मध्ये बदल करावयाचा होता की, सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलियम पदार्थ जे २.५० वरुन ३.०० केले होते ते २.७० केले जावे. फक्त २० पैशांची वाढ करावी. व दुसरे जे केमिकलचे होते त्यामध्ये रुपये ३.२५ वरुन ४.०० केले होते. ते मी ३.४५ करावे असे सांगितले होते. जकातीच्या या दोन बाबींमध्ये चुक झाली होती ती दुरुस्ती केली जावी. माझे अजुनही असे म्हणणे आहे की, आता उन्हाळयाचे दिवस आहेत. ३० जुन पर्यंत मग ते इमारत असो, झोपडपट्टी असो, चाळ असो अथवा बॅरेक असो. जोपर्यंत पाणी पुरवठा सभापतींची नियुक्ती होत नाही तोपर्यंत मा. महापौरांनी त्यांना जेथे योग्य वाटेल तेथे मोफत टॅंकर दयावे. येथे आपल्या समोर एक उदाहरण आले आहे, १ तारखेपासुन आपण मोफत टॅंकर बंद केले, त्यानंतर जेथे जेथे लोकांनी पैसे देवुन टॅंकर घेतले त्या विभागात खरोखर पाण्याची टंचाई आहे हे सिध्द् होते. तर नगरसेवक मा. महापौरांना जेथे पाण्याची आवश्यकता आहे असे सांगतो तेथे मोफत टॅंकर द्यावे. तसेच आता येथे मी जे बोलत आहे ते कृपा करुन ठरावात घेतले जावे. नंतर सांगतात की, तुमचे बोलणे ६० पानांचे आहे, त्यामुळे प्रत्येक गोष्ट ठरावात घेवू शकत नाही. तर कृपा करुन मी आता जे बोलत आहे, ते ठरावासाठीच बोलत आहे. या तीन्ही बाबी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता आजपासून लागू करण्यात याव्यात. अशी माझी सभागृहाला विनंती आहे. उर्वरित आमच्या काही सदस्यांचा ठराव आला आहे. तर मला असे वाटते की, बजेटच्या मिटींगच्या वेळेस देखील त्यांच्या याच भावना होत्या. परंतु त्यावेळी बहुमताने बजेट पास झाले होते. आज आपणांस फक्त तीन सुधारणा करायच्या आहेत. जोपर्यंत आपण पाणी पुरवठा करत नाहीत, तोपर्यत त्या विभागांमध्ये टॅंकर मोफत देण्यात यावेत. याचे अधिकार मा. महापौर व पाणी पुरवठा विभागाच्या सभापतींना देण्यात यावेत. तसेच टॅंकर त्वरीत देण्यात यावेत. ज्या विभागात आपण पाणी पुरवठा करु शकत नाही, त्या विभागात कमीत कमी मोफत टॅंकर तरी दयावेत. अशी माझी सभागृहातील सर्व सदस्यांना विनंती आहे. व कृपा करुन या तीन्ही गोष्टींचा ठराव आजच तयार करावा व इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता लागु करण्यात यावा. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—**मा. महापौर व आयुक्त साहेब, १ वर्षापुर्वी आयुक्तांनी श्वेतपत्रिका जारी केलेली होती. त्यामध्ये लिहिले होते की, प्रत्येक प्रभागात दररोज किमान दोन तास पाणी दिले जाईल. तर मला असे वाटते की, आयुक्त साहेबांनी आजपर्यंत ते काम केले नाही. माझ्या प्रभागात २०—३०—४० मिनिटे पाणी येत आहे. आज गेल्या एक महिन्यापासुन मी श्री. सावकारे साहेबांना व तेथिल उप—अभियंताना विनंती करुन थकलो आहे. आज माझ्या प्रभागात काही विभाग असे आहे जेथे फक्त १० मिनिटे पाणी येते. टॅंकर देखील बंद केले

आहे. आमच्या प्रभाग क्रमांक १० मध्ये ७ झोपडपट्टया आहेत, त्यामधील ३ घोषित झोपडपट्टया आहेत. टॅंकर बंद केला त्यानंतरही आठवडयातुन एक दिवस पाणी बंद केले आहे. मी आज श्री. सावकारे यांना एक दिवसासाठी पाणी बंद करण्याचे कारण विचारले, त्यावर त्यांनी सांगितले की, बाकीचे दिवस आपणांस पाणी चांगले मिळेल. ते तर मिळाले नाहीच फक्त १० मिनिटे पाणी येत आहे. जेथे ३० मिनिटे यायचे तेथे १० मिनिटे येत आहे. जेथे एक तास होते तेथे चाळीस मिनिटे केले आहेत. यासाठी मी आयुक्तांना विनंती करतो की, याबद्दल श्री. सावकारे यांना खुलासा करण्यास सांगावे.

**<u>मा. सदस्य श्री. दिलिप लालवानी :—</u>** मा. महापौर महोदया, आम्ही हे आधी देखील सांगितले आहे की, जोपर्यंत नळामध्ये पाणी येत नाही तोपर्यंत टॅंकरचे पैसे घेवू नये. आमच्या या भुमीकेवर आजही आम्ही कायम आहोत. त्याच सोबत आयुक्तांना माझी विनंती आहे की, जे लोक व्यापारी कामासाठी पाण्याचा वापर करीत आहेत, ज्यांच्याकडे टॅंकर जात आहेत. त्यांच्याकडुन आपण पैसे घ्यावेत. परंतु घरगुती वापरासाठी पैसे घेवू नयेत. जे लोक गाडी धुण्यासाठी, बांधकामासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करीत आहेत, पाणी वाया जात आहे, अशा व्यक्तींवर दंड व कठोर कारवाई करावी. पाण्याचा वापर लोकांनी कमीत कमी करावा, यासाठी महापालिकेकडुन मोहिम चालवायला हवी.

**<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>** मा. महापौर महोदया, श्री. किशोर वनवारी, सभागृह नेता यांनी सांगितले की, दोन गोष्टी इतिवृत्तात यायला हव्यात. पहिले म्हणजे जे लोक पैसे भरु शकतात, त्याच लोकांनी पैसे भरुन टॅंकर घेतले आहेत. झोपडपट्टीचे लोक पैसे भरु शकत नाहीत. यासाठी त्यांनी पैसे भरले नाहीत. त्यांनी जो निकष लावला की, ज्यांनी पैसे भरले त्यांनाच गरज आहे व ज्यांनी पैसे भरले नाहीत त्यांना गरज नाही असे नाही. ज्यांनी पैसे भरले आहेत ते या पुढे देखिल घेवु शकतात. परंतु बरेचसे लोक जे पैसे भरु शकत नाहीत, ते आज पाण्यासाठी वणवण भटकत आहेत. दुसरे एक उदाहरण आहे, आमच्या श्री. जमनु पुरस्वानी यांनी सांगितले की, पैसे भरुन पहिला टॅंकर मी घेतला आहे, रुपये २५० भरुन. त्यांच्या घरी कार्यक्रम होता. म्हणजे मला गरज आहे असे होत नाही. पैसे भरण्याचा निकष लावणे चुकीचे होईल. दुसरे म्हणजे, जे प्रशासनाचे काम आहे ते प्रशासनानेच करायला हवे. पाण्याच्या टॅंकरसाठी महापौर व पाणी पुरवठा सभापती यांना अधिकार देणे हे चुकीचे होईल. हे प्रशासनाचे काम आहे, आयुक्त आहेत, कार्यकारी अभियंता आहेत. ते यासाठी मंजुरी देतील. जर असे झाले तर. ही चर्चा सुरु आहे. आमच्या समोर शासनाने रद्द केलेल्या ठरावाची प्रत आहे. चर्चेतुन काही निष्पन्न होईल असे मला वाटत नाही. परंतु असे झाले तर ते चुकीचे होईल. जे प्रशासनाचे काम आहे ते प्रशासनानेच करायला हवे. तुम्ही फक्त त्यांना आदेश दयावेत.

**<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>** मा. महापौर व आयुक्त साहेब, आपणांस हे माहिती आहे की, उल्हासनगर कॅम्प ४ व ५ मध्ये एमआयडीसी कडुन किती पाणी यायला हवे व प्रत्यक्षात किती पाणी येत आहे. आमचे महापौर व उपमहापौर मंत्रालयात जावुन संबंधित अधिका—यांना भेटले होते, मंत्री महोदयांनी कार्यकारी अभियंत्यांना आदेश देखील दिले परंतु कार्यकारी अभियंता यांनी अदयाप त्याची अंमलबजावणी केलेली नाही. आयुक्तांना चांगल्या प्रकारे माहिती आहे की, उल्हासनगर ४ व५ मध्ये पाण्याची टंचाई आहे. एकतर नळाला पाणी येत नाही, टॅंकर पण बंद हा कुठला न्याय आहे? ही आयुक्त साहेबांची जबाबदारी आहे. आमच्या एका सदस्याने जसे सांगितले की, हे प्रशासनाचे काम आहे तर प्रशासनाने त्यांचे काम करायला हवे. जर त्यांनी केले नसेल तर चुकीचे आहे. त्यांनी बघायला हवे की, झोपडपट्टीत जेथे पाण्याची टाकी ठेवली आहे, अथवा जेथे पाणी जात नाही. तेथिल टॅंकर कसे काय बंद केले? आधी अशा या विभागात ताबडतोब टॅंकर पाठवायला हवे. आमच्या प्रभाग क्रमांक १२ मध्ये दररोज किंमान चाळीस टॅंकरची आवश्यकता आहे. तेथे एवढया इमारती आहेत. आधी तेथे २० ते २२ टॅंकर जायचे परंतु आता एक देखील जात नाही. तर आता तेथिल लोकांची परिस्थिती काय असेल? आमच्या आमदार साहेबांनी तेथिल पाण्याची कमतरता दुर करण्यासाठी नविन जलवाहिन्या टाकण्याचा प्रस्ताव पास केला आहे. त्याचे काम अजुन चालु झाले नाही तर तेथे पाणी पोहचेल तरी कसे? तर मेहरबानी करुन जेथे नविन जलवाहिन्या टाकल्या नाहीत, ?जेथे पाणी जात नाही, तेथे टॅंकर निशुल्क देण्यात यावे. झोपडपट्टीमध्ये तर फार त्रास आहे. आम्ही झोपडपट्टयांशी जोडलेलो आहोत. तेथिल लोकांची काय हालत आहे ते आम्ही बघतो. कृपा करुन जेथे जेथे पाण्याच्या टाक्या ठेवल्या आहेत, तेथे तेथे आजपासुनच टॅंकर पाठवावेत. प्रभाग क्र. १२ मध्ये तीन वर्षापासुन पाण्याचा त्रास आहे. तर कृपा करुन पाण्याची कमतरता कशी दुर होईल, श्री. नागे हे का ऐकत नाही. आपण त्यांच्याविरुध्द येथे प्रस्ताव पास करुन पाठवावा. कृपया या बाबींकडे लक्ष दयावे धन्यवाद.

या व्यतिरिक्त श्री सतरामदास जेसवानी यांनी मा. महापौरांकडे पत्र सादर केले, पत्रातील मजकुर पुढीलप्रमाणे आहे.

''उल्हासनगर महानगरपालिका की और से नयी बन रही इमारतों, बांधकामो पर घरपट्‌टी के नए दर लगाकर घरपट्‌टी बिल भेजे जाने से यहां के नागरिको व व्यापारियों मे असंतष्टता देखी जा रही है इसके पहले भी इस घरपट्‌टी वृद्‌धी बिलो को रद्‌द कर पहले के घरपट्‌टी दर से बिल दिलाये जांए ऐसा प्रस्ताव महासभा में पास किया था सर्व सहमती से पर उस प्रस्ताव पर अब तक महापालिका की और से कोई सहयोग न मिलने से समस्या यू क्यु त्यू बनी हुयी है ।

कुछ पॅनलों मे, कुछ भागों में पाणी कमी के कारण नागरिक परेशान है वहां नई पाणी लाईने डालवाने का प्रस्ताव आमदार फंड से पास किया हुआ है पर अब तक काम चालु व पुरा न होने से पाणी कमी समस्या यू क्यू त्यू बनी हुयी है महापालिका की और से पाणी टॅंकर निशुल्क ऐसी जगह भेजे जाते रहे थे । कई जगह झोपडपट्‌टीयों मे भी पाणी टाकियां रखी गई थी जहां पाणी टॅंकर पाणी खाली कर आते थे उन टाकियों में जिससे गरीब झोपडपट्‌टीवासियों को पाणी पीने की सुविधा बनी हुयी थी १/४/२००५ से महापालिका की और से पाणी कमी रही जगहों पर निशुल्क पाणी टॅंकर भेजने बंद किये गऐ जिससे यहां के इमारतों में रहते नागरिक व झोपडपट्‌टीवासी परेशान है ।

जब तक नलो में सही मात्रा में पाणी व्यवस्था हो नई लाईनें डालवाने का काम पुरा हो पाएं तब तक ऐसी जगहों पर निशुल्क पाणी टॅंकर दिलाये जांए ।

इस वर्ष जकात दरों में बढोत्तरी किये जाने से यहां के व्यापार में बहुत परेशानी देखी जा रही है व्यापरी वर्ग इस परेशानी के कारण बहुत दुखी है जितना व जिन जिन पदार्थो पर सहयोग बन पाएं उतना सहयोग कर पाएं ताकि, शहर के व्यापार में कठनाई ना हो ।

शहर की नागरिकों व्यापारियों के मनोभावना को देखकर सही संभव सहयोग कर दिलाये नम्र विनंती धन्यवाद.''

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—</u> मा. महापौरजी, माझ्या प्रभागात गेल्या दोन अडीच महिन्यापासुन पाण्याचा त्रास आहे. एक महिन्यापुर्वी मा. आयुक्तांना पत्र देवुन मी याची माहिती दिली आहे. आमचे श्री. सेलवन व श्री. विसपुते हे प्रयत्न करीत आहेत. परंतु त्यांच्या प्रयत्नांना यश प्राप्त झाले नाही. कृष्णा नगर, दुलारी पाडा, २६ सेक्शन, गुरुनानक नगर, या विभागात पाण्याची फार टंचाई आहे. मी आपणांस निवेदन करेन की, यासाठी लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करावी.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> मा. महापौर , आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्य हिंदीमध्ये एक म्हण आहे की, हत्तीचे दात दाखवायचे वेगळे असतात व खायचे वेगळे असतात. ही म्हण सत्ताधारी पक्षासाठी लागु पडते. मालमत्ता कर वाढ झाली यासाठी आम्ही सांगितले की, आपण ठोस पावले उचला. आपण तसे न करता, टाळाटाळ करत आहात. टॅंकर बाबतीत देखील तसेच आहे. आमचे व तुमचे नगरसेवक ओरडत आहेत. टॅंकर मोफत दयायला हवे. काही जण ३० जुन पर्यत म्हणत आहेत. आमचे म्हणणे असे आहे की, जोपर्यंत शहरात सर्व ठिकाणी पाणी जात नाही तोपर्यंत मोफत दयायला हवे. परंतु हा जो ठराव रद्‌द होवुन आला आहे, ज्याची प्रत सभागृहात आल्यावर आम्हांला मिळाली, त्यावर काय करायला हवे, सरकारकडे अपिल करायला हवे, न्यायालयात कसे जायला हवे, त्यावर कोणी विचार करीत नाही. यामुळे मला नाईलाजास्तव म्हण सांगावी लागत आहे की, हत्तीच्या दात दाखवायचे वेगळे व खायचे वेगळे. कारण आपण काहीही करु इच्छित नाही. तुम्ही फक्त बाहेरुन तसे बोलत आहात की, आम्ही करवाढीच्या विरोधात आहोत, पाणी टॅंकरच्या विरोधात आहोत. परंतु मनापासुन आपण असे म्हणत नाही. कारण की, आपण कोणतीही ठोस पावले उचलत नाहीत असा माझा स्पष्ट आरोप आहे. जेथपर्यंत अन्य करांची गोष्ट आहे, जकात कर सव्वा पाच वरुन तेहतीस टक्के किंवा जे इतर कर वाढविले आहेत. आम्ही आधी देखील त्याला विरोध केला होता व आजही करत आहोत. यासाठी आम्ही ठराव दिला आहे की, ती कर वाढ रद्‌द केली जावी. अशी आमची स्पष्ट भुमिका आहे.

**मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :—** मा. महापौरजी, हे आयुक्तांच्या अधिकारात आहे. ते कुठेही त्यांच्या अधिकारात टॅकर पाठवू शकतात. आता उन्हाळयाचे दिवस आहेत, पावसाळयापर्यंत आयुक्तांना ज्याठिकाणी आवश्यकता आहे अशा ठिकाणी मोफत टॅकर पाठविण्यासाठी मा. महापौरांनी आदेश दयावेत.

**मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटीलः—** मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, आजच्या महासभेत आम्हांला जे पत्र दिले आहे, त्यामध्ये टॅकर वरील खर्च दिवसेंदिवस कसा वाढत गेला ते दाखविले आहे. या आधीच्या महासभांमध्ये मी बोललो होतो की, आधी त्याचे सर्वेक्षण करा आणि जेथे आवश्यकता आहे तेथेच टॅकरने पाणी पुरवठा करा. पण मला असे वाटते की, आजपर्यंत अशा प्रकारे सर्वेक्षण केले गेलेले नाही. कारण जेथे आवश्यकता नाही, तेथे टॅकर पाठविले जातात. आणि जेथे आवश्यकता आहे, तेथे टॅकर पाठविले जात नाही. व्यवस्थित सर्वेक्षण करुन ज्या ठिकाणी पाणी जात नाही त्या ठिकाणीच टॅकरने पाणी पुरवठा केला गेला तर निश्चितच टॅकरवरील खर्च कमी होईल. खरोखरच ज्या ठिकाणी पाणी पुरवठा होत नाही, अशा ठिकाणी देखील महापालिका मग त्याच्या घरामध्ये नळ असो अथवा नसो, पाणी पोहचत असो अथवा नसो, महापालिका त्यांच्याकडुन मालमत्ता करामध्ये पाणी पट्टी वसुल करीत आहे. त्यांना पाणी पट्टी देणे बंधनकारक आहे. परंतु अशा लोकांना पाणी मिळते अथवा नाही, मिळत नसेल तर त्यावर काय उपाययोजना आहे, याच्यावर कधी अधिकारी लोकांनी विचार केला आहे का? का टॅकरद्वारे वर्षानुवर्ष त्यांना पाणी पोहचवायचे? आणि त्यांच्याकडुन टॅक्स वसुल करायचा. ज्यांच्या घरामध्ये नळाद्वारे पाणी पुरवठा होतो आणि टॅकरद्वारे ज्यांच्याकडे पाणी पुरवठा होतो त्यांना होणारा त्रास किंवा ज्यांना कमी दाबाने पाणी पुरवठा होतो, परंतु त्यांना मोटरने स्वतःच्या घरामध्ये पाणी खेचुन घ्यावे लागते त्यांचा इलेक्ट्रीकवर होणारा खर्च याचा महापालिकेच्या अधिका—यांनी कधी विचार केला आहे का? या सर्व गोष्टी विचारात घेवून आणि पुर्ण उल्हासनगरचे सर्वेक्षण करुन कोणत्या विभागात पाणी पुरवठा होत नाही, कोणत्या विभागात पाणी पुरवठा होतो आणि असे सर्वेक्षण केल्यानंतर ठराविक प्रभागांमध्ये जेथे पाणी पुरवठा होत नाही तेथे विनाशुल्क टॅकरद्वारे पाणी पुरवठा व्हावा, असा जर अधिका—यांनी निर्णय घेतला तर हा जो वर्षानुवर्षे खर्च वाढत आहे, हा एकदम कमी होण्याची शक्यता आहे, आणि होईलच अशी माझी स्वतःची खात्री आहे. दुसरे म्हणजे टॅकरद्वारे होणा—या पाणी पुरवठयावर आपण पैसे आकारणार आहात. यामुळे असा प्रश्न उद्‌भवेल, आता आमच्या नगरसेवकांनी सांगितले की, ज्या झोपडपट्टीमध्ये पाणी पुरवठा होत नाही अशा लोकांना पाणी हवे असेल, ज्यांची पैसे भरण्याची ताकत नाही, नगरपालिका त्यांच्याकडुन पाणी पट्टी वसुल करते असे असतांना त्यांनी टॅकरसाठी पैसे का भरावे? हा सगळयात महत्वाचा प्रश्न आहे. महापालिका पाणी पट्टी वसुल करणार आणि टॅकरचेही पैसे घेणार हा कोणता न्याय आहे? दुसरे म्हणजे पैसे घेवून टॅकरद्वारे पाणी पुरवठा केला तर ज्याच्याकडे पैसे आहेत अथवा जे त्यापासुन उत्पन्न घेणार आहेत, असेच लोक पैशाने टॅकर घेणार आहेत आणि त्यांच्या फायदा करुन घेणार आहेत. ते पैसे कमवतील मग ते बिल्डर असो, अथवा मोठे हॉटेलवाले असो, अशा लोकांना जे मोठे व्यापारी आहेत, असे लोक पैसे भरुन टॅकर विकत घेतील व उत्पन्न कमवतील. जे गरीब लोक झोपडपट्टीमध्ये राहतात, जे पैसे भरुच शकत नाही आणि ज्यांना महापालिका पाणी पुरवठा करु शकत नाही त्यांनी टॅकरद्वारे पाणी पुरवठयासाठी पैसे का भरावे, आणि ते पैसे कुठून भरणार? आणखी एक गोष्ट मागच्या वेळेस मी बोललो होतो त्याला उत्तर मिळाले नाही. असा विषय आहे, तसा विषय आहे असे बोलले होते. पण आता काही नगरसेवकांनी सांगितले कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची समस्या आहे. पाणी पुरवठयाबाबत सर्व नागरीक त्रस्त आहेत. कल्याण विभागातील एका बिल्डरला पाणी पुरवठा केला जातो. आणि याचा अर्थ कॅम्प नं. ४ व ५ साठी भरपुर पाणी आहे असा होतो. दुस—यांना पाणी पुरवठा केला तरी चालेल असा त्याचा अर्थ होतो. तरी कृपया असे कोण करीत आहे व का करीत आहे याचा खुलासा येथे करावा.

**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—** मा. महापौरजी, उप—महापौरजी व आयुक्त साहेब, सर्वप्रथम महापालिका सचिव श्री. कुकरेजा यांना ज्या प्रमाणपत्राने सन्मानित केले आहे, त्याबद्‌दल त्यांचे पक्षातर्फे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे मा. सोनवणे साहेब, जे आमच्या शहराला पुर्णवेळ आयुक्त म्हणुन लाभले आहेत, तीन वर्षासाठी लाभले आहेत. त्याबद्‌दल संपुर्ण उल्हासनगर शहरामधुन त्यांना शुभेच्छा व्यक्त करतांना ब—याचशा गोष्टींचा ऊहापोह येथे करावासा वाटतो. श्री. सोनवणे हे प्रभारी आयुक्त असतांना ज्या—ज्या पध्दतीने या शहराच्या समस्या सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला, संकटातुन सोडवायचा प्रयत्न केला असेल किंवा ब—याचशा आडकाठया असतांना प्रयत्न केला असेल, पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे आणि हे सर्व करत असतांना ते प्रभारी आयुक्त होते पण आज ते पुर्णवेळ आयुक्त आहेत. या संपुर्ण शहराला विकसीत करण्यासाठी तीन वर्षाचा कालावधी हा फार मोठा आहे. आमची अपेक्षा, ज्या विभागातुन आम्ही प्रतिनिधित्व करतो, ज्या झोपडपट्टी विभागातुन आम्ही प्रतिनिधीत्व करतो, त्यांच्याकडुन आपल्याबद्‌दल फार मोठया अपेक्षा आहेत. पाण्याचा प्रश्न आहे, सुरुवातीला आपण टॅकर मुक्त उल्हासनगर करु या. आज उल्हासनगर टॅकर मुक्त झाले आहे. परंतु पाणी कुठे मिळाले आणि कुठे नाही

हा फार मोठा गहन विषय आहे. मला वाटते आजच्या परिस्थितीत पाणी फक्त शेवटच्या टोकाला, जेथे झोपडपट्टी विभाग असतो तेथे नाही. भौगोलिक परिस्थितीमुळे काही इमारतींच्या परिसरात पाणी मिळत नाही. आज आपण टॅंकर मुक्त उल्हासनगर करीत असतांना या विभागाची परिस्थिती कशी सोडवता येईल आणि किती लवकर सोडवता येईल याचा विचार येथे झाला पाहिजे. त्याच्यावर उपाययोजना झाल्या पाहिजेत. आजच आमच्या आम्रपाली येथे पाणी भरत असतांना एक माणुस वडोल गावात जात होता. वडोल गावातून रेल्वे ट्रॅक ओलांडुन पाणी आणतात. आज सकाळी १०.०० वाजता एक माणुस रेल्वे खाली कापला गेला. आज भारत नगर हा विभाग जो शेवटच्या टोकाला आहे जेथे जलवाहिन्या नाहीत. तेथिल सर्व वस्ती अंबरनाथ येथुन पाणी आणते. हे जे प्रकार आहेत हे जेव्हा पासुन टॅंकर बंद केले तेव्हा पासुन चालु झाले आहेत. आम्हांला टॅंकर मुक्त उल्हासनगर हवे आहे. परंतु पाणी देखील हवे आहे. या सर्व गोष्टींच्या उपाययोजना करीत असतांना आणखी एक आयुक्तांना विनंती करेन की, झोपडपट्टीवाल्यांचा, दारीद्रय रेषेखालच्या व्यक्तींना फोटोपास देतांना येणा–या अडचणी, फोटोपास देतांना महापालिकेचे कर्मचारी त्यांची करत असलेली अडवणुक ही कशा पध्दतीने थांबविता येईल आणि तुमच्या आयुक्त पदाच्या दोन–तीन वर्षाच्या कालावधीत संपुर्ण शहरामध्ये हा झोपडपट्टी धारक वर्ग तो सुधरवता कसा येईल, त्याचा विकास कसा करता येईल, याच्या उपाययोजना आपण आखाव्यात. आपल्या आयुक्त पदासाठी पिपल्स रिपब्लीकन पक्षातर्फे या शुभेच्छा व्यक्त करतो. धन्यवाद.

<u>मा . सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> मा. महापौर, उप–महापौर व आयुक्त साहेब, पंधरा दिवसांपुर्वी श्री. धनंजय बोडारे व माझ्या प्रभागातुन मोर्चा काढण्यात आला होता. मोर्चा काढल्यानंतर तेथे आपण आम्हांला आश्वासन दिले होते की, एक दिवस तुमच्या येथिल पाणी बंद करणार व बाकीचे दिवस पाणी वाढवुन देणार. तसे करत असतांना आपण कोणत्या विभागातील पाणी कमी केले आहे व कोणत्या विभागात वाढविले आहे. याची विस्तृत माहिती आपण आम्हांला दयावी. मला अशी शंका आहे की, आमच्याच विभागातील पाणी एक दिवस बंद केले आहे व वाढविलेले बिल्कुल नाही. उलट कमी झाले आहे. आज आमच्याकडे पंधरा –वीस मिनिटे पाणी येत आहे. आमचे जे पाणी कमी केले आहे ते कुठे वाढविले आहे? हे तुम्ही आम्हांला स्पष्ट करुन दया. दुसरी गोष्ट अशी की, आनंद नगर बुस्टर वरुन जे पाणी येते ते सकाळी तुमच्या वेळेप्रमाणे ५ तास पाणी देतात. पण आम्हांला ते दोन तासही मिळत नाही. जे दोन तास मिळते ते देखील कमी दाबाने असते. कुणाच्या घरात ते पाणी पोहचतही नाही. मी माझ्या बाजुला सुरेश जाधव, प्रशांत जाधव, सुर्वे, माने ताई आणि राज असरोंडकर आम्ही तुम्हांला एक पत्र दिले आहे की, तुम्ही आम्हांला दोन तास पाणी एम.एस. मधुन दया. सी.आय. मधुन तुम्ही पाणी देत असतांना त्या पाण्याची भरपुर ठिकाणी गळती होते, त्यावर नळ बसविले आहे. वडोल गांव व ब–याच ठिकाणी ते पाणी घेतले आहे. तुम्हीही त्यांना पाणी दया. सकाळी अडीच तास त्यांना दया. संध्याकाळी अडीच तास आम्हांला दया. परंतु ते पुरेशा दाबाने दया. कोणतीही एक वेळ ठरवा जेणेकरुन त्यांना पाणी देतांना आम्हांला त्रास व्हायला नको, व आम्हांला पाणी देतांना त्यांना त्रास व्हायला नको. तुमची समांतर जलवाहिनी तेथुन गेलेली आहे. तुम्हांला फक्त ती सुरु करायची आहे. मी तुम्हांला महिनाभरापासुन हे सांगत आहे परंतु काही कार्यवाही होत नाही. श्री. सावकारे यांच्या पाठीमागे महिनाभरापासुन लागलो आहे. ते सांगतात मी आयुक्तांशी बोलतो. दुसरी गोष्ट म्हणजे आता टॅंकर बंद केल्यामुळे ज्या–ज्या ठिकाणी तुम्ही पाणी देवु शकत नाही. त्या त्या ठिकाणी माझ्या प्रभागात जलवाहिन्या मंजुर झाल्या आहेत. ते काम जर पुर्ण झाले तर तेथे टॅंकरची आवश्यकता भासणार नाही. आणखी एका महत्वाच्या विषयावर मागे मी तुमच्याशी बोललो आहे. शहरातील बहुतेक इमारतींना कुपनलिका नाहीत. असल्या तरी ते दुरूस्त करून घेत नाहीत कारण त्यांना टॅंकरची सवय लागली आहे. तुमच्या अधिका–यांनी जावुन त्यांना सूचना दयावी की आम्ही फक्त तुम्हाला पिण्यासाठी पाणी देत आहोत बाकीच्या वापरासाठी तुम्ही बोअरवेलचे पाणी वापरावे. असे केले तरी आपले बहुतेक प्रश्न सुटतील. ज्या ठिकाणी तुम्ही पाणी देवु शकत नाही तेथे तुम्ही पाणी कसे देणार आहात हे आम्हाला सांगावे. जोपर्यंत तुम्ही पाणी देत नाही तोपर्यंत त्या लोकांनी काय करायचे? त्यांनी कुठून पाणी भरायचे. पाण्याची व्यवस्था काय आहे? तुम्ही टॅंकर बंद केले ते ठीक आहे परंतु तुम्ही त्यांना पाणी तर दया. तुम्ही जलवाहिन्या टाकाल तोपर्यत आठ ते पंधरा दिवस जातील. तोपर्यंत लोकांनी काय करायचे? तोवर कुठून भरायचे ते तुम्ही सांगा.

**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर:'–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची जी भयंकर समस्या निर्माण झाली आहे. असा कोणता दिवस नाही की आम्ही आपल्या अधिका–यांना कळविले नाही की आमच्या येथे पाणी येत नाही. यावर उत्तर असे मिळते की पाले येथुन पाण्याचा दाब कमी आहे. पाले येथुन पाण्याचा दाब कमी आहे तर यावर आपण काय करणार आहात. आपण नविन एम.बी.आर येथे पाणी घेवुन आनंद नगर मधुन पाणी पुरवू शकता. आपले अधिकारी असा प्रयत्न का करत नाहीत की आनंद नगर येथुन पाणी वाढविण्यासाठी व दुसरी गोष्ट म्हणजे टॅंकर तेथे दिला जातो जेथे महापालिका पाणी पुरवठा करण्यात अपयशी

ठरली आहे. तर अचानक महासभेत एक चर्चा झाली, काही आश्वासने दिली गेली व ठराव काही वेगळा झाला. पुर्ण शहराची जनता आज पाण्यामुळे एवढी त्रस्त आहे की शेवटी ते करतील तरी काय. जनता म्हणते की आम्ही एवढी जकात भरतो, मालमत्ता कर भरतो, पाण्याचे बिल भरतो त्यानंतरही महापालिका नळाद्वारे पाणी का देवु शकत नाही. टॅकरसाठीही आम्ही का पैसे भरावेत. अशी वेळ येईल की नगरसेवकांना हे शहर सोडुन जावे लागेल. आपण जरा विचार करावा. शहरातील जनता त्रस्त आहे. लोक बाहेरून टॅकर मागवितात त्यामुळे त्यांना त्वचा रोग होतात. कृपया लक्ष दयावे.

<u>मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी:—</u>मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब माझी आपणांस विनंती आहे की, टॅकरचे पैसे घेण्या ऐवजी ग्रामीण भागात जे पाणी जात आहे. त्यांच्याकडुन पैसे वसुल केले जावेत. त्यांच्याकडुन आपली वसुली वाढु शकते. तसेच पाले गावात जी ७००—८०० मीटरची जलवाहिनी टाकायची आहे त्यावर निर्णय घेवुन ती ही लवकरात लवकर टाकली जावी. जेणे करून पाण्याची समस्या सुटू शकेल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:—</u>मा. आयुक्त साहेब व मा. महापौरजी मी एक प्रश्न केला होता की माझ्या प्रभागात १०—१५ मिनिटे पाणी येते. आयुक्त साहेबांनी दोन तासाचे आश्वासन दिले होते. श्री. सावकारे यांना विचारावे की माझ्या प्रभागात कोणत्या वर्षी दोन तास पाणी येईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौरजी,आज आम्ही या ज्या तीन सुधारणा करणार आहोत याकरिता आता दोन चार गोष्टी ऐकाव्या लागल्या त्याबद्दल थोडे स्पष्टीकरण करतो. मा. बोडारे साहेब असे बोलले की मी मा. महापौर व सभापती पाणी पुरवठा हे टॅकर देतील असे बोललो. मागच्या महासभेत मी मा. महापौर व आयुक्त साहेब असे बोललो होतो की ते लोक टॅकर देतील. परंतु आज १ तारखेपासुन टॅकर बंद केल्याने आज शहरवासियांना जो त्रास झाला आहे. त्याकरिता मी बोललो की यानंतर मा. महापौर व सभापती हे टॅकर देतील. टॅकर बंद केल्याने आपणांस जेवढे वाईट वाटले आहे त्यापेक्षा जास्त आम्हाला वाटले आहे. श्री. अशोक ठाकुर बोलले की येथे काही बोलले आणि ठरावात काही दुसरेच आले. जर आम्ही मोफत टॅकर देण्याच्या बाजुने नसतो तर आज आम्ही सुधारणा करण्यासाठी ही महासभा बोलावली नसती. मी आधीच बोललो की इमारत असो, झोपडपट्टी असो, बॅरेक असो अथवा चाळ असो सर्व ठिकाणी टॅकर जायला हवे. मी अशा सदस्यांचे नाव घेत नाही जे ४० इमारतींना टॅकर दयावा म्हणुन पत्र घेवुन फिरत आहेत. त्रास असेल म्हणुन फिरत असतील त्यांना टॅकर दयायला हवा. मी महासभेत स्पष्ट बोललो होतो की नगरसेवक सांगेल तेथे, जेथे पाणी पुरवठा होत नाही तेथे मोफत टॅकर देण्यात यावे. आज कराचा मुद्दा येथे आला आहे, आमचे श्री. लाल पंजाबी बोलले की हत्तीचे दाखवायचे दात वेगळे असतात व खायचे दात वेगळे असतात. परंतु जे कायदेशिर असेल तेच करता येईल. मला पण यावर एक म्हण आठवते की म्हैस पुर्ण काळी असते ती गायीला म्हणते तुझी शेपुट काळी. तुम्ही नेहमी सत्ताधारी पक्षावर आरोप लावता की तुमचे दाखवायचे दात वेगळे व खायचे वेगळे आहेत. जेव्हा कर वाढ झाली तेव्हा जमिनीवर आम्ही बसलो होतो, तुम्ही बसला नव्हतात. आम्ही तीन वेळा जमिनीवर बसलो होतो. आजही सत्ताधारी पक्षाची भुमिका स्पष्ट आहे आम्ही करवाढीच्या विरोधात आहोत. जी नविन कर आकारणी झाली होती ती जुन्या दरानेच व्हायला हवी. त्यावेळी कायदा सांगण्यासाठी सचिवांनी पुस्तक देखिल मागविले होते. परंतु आपण ते ऐकलेच नाही व चर्चा संपवुन टाकली. ते सांगत होते की ठराव रद्द झाला तर पुढे काय करू शकतो. तर आपण हे निश्चित समजा जो ठराव एकमताने मंजुर झाला होता त्यावर सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष शेवट पर्यंत ठाम राहतील. परंतु ते कायदयाने व्हायला हवे. जसे लहान मुल हट्ट करते की चंद्र आणुन दया तर असे होत नाही. आपण कायदयाने जे कराल त्यासाठी आम्ही तुमच्या बरोबर आहोत. टॅकर मोफत दयायचा जो प्रश्न आहे तर आवश्यकता असेल तर दोन सहा अथवा बारा महिने मोफत देण्यात यावे. जोपर्यंत सगळीकडे पाण्याची व्यवस्था होत नाही तोपर्यंत टॅकर फुकट दयायला हवेत. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मा. महापौर, मा. आयुक्त साहेब आमच्या मनात एक शंका आहे की येथे ठरावात जे अंशत: बदल करणार आहोत जसे टॅकर मोफत देणार तर यावर मी आयुक्तांना विचारू इच्छितो की येथे ठराव पास झाल्यावर आपण मोफत टॅकर देणार आहात का? कृपया आपण सांगावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौरजी, यामुळे जी तुट निर्माण होणार आहे. व जे टॅकर मोफत देणार आहोत यापासुन जेवढी तुट निर्माण होईल तेवढी रक्कम कर वसुलीमध्ये जास्तीची दाखविण्यात येईल. यावेळी आम्ही मालमत्ता कर वसुली कमी दर्शविली आहे. जकातीमुळे व टॅकर फुकट दिल्याने जे नुकसान होणार आहे. ते मालमत्ता कर वसुलीमध्ये दर्शविण्यात यावे.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:**—आयुक्त असे करू शकतात का हे सांगावे.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:**—मा. महापौरजी, माझे मित्र श्री. जमनादास पुरस्वानी ज्याप्रकारे विचारत आहेत की, प्रस्ताव पास झाल्यावर आयुक्त त्याची अंमलबजावणी करणार अथवा नाही ............

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:**—आम्ही एवढे बोललो त्याचे आम्हाला उत्तर तर मिळायला हवे.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी बोलत असल्याने नेमके कोण काय बोलत आहे हे कळुन येत नव्हते.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:**—मा. महापौरजी, आमच्या सभागृह नेत्यांनी जे प्रस्ताव ठेवले आहेत ते लवकरात लवकर पास करावेत. काम करणारा सत्ता पक्ष आहे. निर्णय घेतल्यानंतर दुरूस्ती करण्याची आवश्यकता असेल तर तसे देखिल करू.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:**—टॅकरने पाणी घेण्याची आमची अजिबात इच्छा नाही.

**मा. आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):**—मा. महापौर महोदया, येथे दोन विषयावर चर्चा झाली. आधी करांचे दर जे कलम ९९ प्रमाणे निश्चित केले आहेत त्यामध्ये काही बदल केले आहेत. जोपर्यंत जकात नियमांचा प्रश्न आहे, तर महापालिकेला ते दर कधीही कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार आहे. परंतु ते कोणत्या तारखेपासुन लागु करायचे हे देखिल महापालिकेला ठरवायचे असते. परंतु आता सभागृहात जी चर्चा झाली त्यामध्ये ते ठरले नाही. दुसरे सभागृह नेता यांनी सांगितले की, यामुळे जे उत्पन्न कमी होईल ते जमा बाजुस वाढविण्यात यावे. असे होवु शकत नाही. जर उत्पन्न कमी होत असेल तर खर्चात देखिल कपात करावी लागेल. कोणत्या खर्चात कपात करायची हे देखिल आपणांस येथे सांगावे लागेल. हे झाले जकाती बाबत. तुमचा प्रस्ताव कायदेशिर आहे. नियम ५ मध्ये तशी तरतुद आहे. कोणत्या तारखेपासुन सुधारित दर लागु करायचे हे फक्त आपणांस आता ठरवायचे आहे. दुसरा पाण्याचा मुद्दा येथे उपस्थित केला. टॅकरद्वारे होणारा पाणी पुरवठा मोफत करावा असे बोलले गेले. आपणांसमोर आम्ही एक शासन निर्णय ठेवला आहे. प्रशासनाचा एक प्रस्ताव जो स्थायी समितीने व महासभेने फेटाळला होता त्यावर आम्ही शासनाला कलम ४५१ प्रमाणे कळविले होते. आपले ते दोन्ही ठराव विखंडीत झाले आहे. त्याशिवाय झोपडपट्टया जिकडे जलवाहिन्या नाहीत तेथे पाण्याची कमी दुर करण्यासाठी आपणांस मोफत टॅकर दयायचे असतील तर त्यासाठी देखिल खर्चासाठी आपणांस बजेटमध्ये तरतुद करावी लागेल. आपण फक्त मोफत टॅकर दयायचे आहेत असा ठराव कराल व बजेटमध्ये खर्चासाठी तरतुद नसेल तर तो खर्च करणे देखिल शक्य होणार नाही. एक तर आपणांस पुर्नसमायोजन करावे लागेल, दुसरा खर्च कमी करून यासाठी तरतुद करावी लागेल. हा निर्णयही आपणांस घ्यायचा आहे. तो निर्णय घेतल्यानंतर आपणांस हे ठरवायचे आहे की, झापडपट्टयांना दयायचे आहे की इमारतींना दयायचे आहे. आणि दयायचे असेल तरी फुकट का दयायचे. जेथे जलवाहिन्या आहेत, पाणी कमी येते. येथे असे होते की इमारतीची दैनिक गरज १०० लीटर असेल व तेथे दररोज ७० लिटर पाणी येत असेल तरी देखिल तेथे टॅकर मोफत मिळण्याची तेथिल लोक अपेक्षा करतात. हे चुकीचे आहे. जर त्या इमारतीत पुरेशा नळ जोडण्या नसतील व त्यामुळे जर इमारतीत पाणी येत नसेल तरी देखिल लोक फुकट टॅकर मिळण्याची अपेक्षा करतात हे देखिल चुकीचे आहे. आपल्याकडे जर नविन जलवाहिनी देण्याची क्षमता असेल, त्यानंतर नळाद्वारे पाणी मिळत असेल तर त्या मालमत्ता धारकाला नळाद्वारेच पाणी घ्यायला हवे. येथे मी आपल्या एका गोष्टीशी सहमत आहे की जेथे झोपडपट्टया आहेत, जलवाहिन्या कमी आहेत. तेथे सवलतीच्या दरात अथवा जे गरीब लोक आहेत त्यांना मोफत देण्यात यावे. कारण पाणी ही एक जीवनावश्यक वस्तु आहे. यासाठी त्यांना स्टॅण्ड पोस्ट अथवा टॅकरद्वारे पाणी दयायला मी सहमत आहे. परंतु जसे यापुर्वी दिले जायचे आता येथे एका सदस्याने उल्लेख केला की त्यांच्या एकटयाच्या प्रभागात ४० टॅकर्सची आवश्यकता आहे. जर एकाच्या प्रभागात ४० टॅकर दिले तर, येथे ८० नगरसेवक आहेत, ८०X ४० एवढया टॅकर्सची लोक अपेक्षा करतील, आपण सर्व लोकप्रतिनिधी अपेक्षा कराल. आणि जर त्याची पुर्तता करायची असेल तर यासाठी आधी वर्षाला सव्वा कोटी खर्च यायचा तो खर्च आता ५—६ कोटीच्या वर जाईल. तर टॅकर कुठे दयायचे हे धोरण देखिल सभागृहाला येथे ठरवावे लागेल. तसेच यासाठी मंजुरी प्राधिकरण म्हणुन कोणाला नेमायचे हे देखिल ठरवावे लागेल. आमच्या कार्यकारी अभियंत्यांना जागेवर जावुन पहाणी करून आवश्यकता भासली की येथे नळाद्वारे पाणी देता येवु शकते तर नागरिकांना आपण त्या ठिकाणी नळाद्वारे पाणी घेण्यास बंधनकारक करू शकतो. होवु शकते आम्ही दोन तास पाणी देवु शकत नाही परंतु अर्धा , एक तास देवु शकतो. तुम्हाला महाराष्ट्रातील परिस्थिती सांगतो, महाराष्ट्रात

बरीचशी जिल्हयाची ठिकाणे आहेत. जेथे आठवडयातुन एकदा पाणी येते. काही ठिकाणी आठवडयातुन दोन वेळा पाणी येते. येथे आम्ही दररोज पाणी देतो. फक्त काही ठिकाणी दोन तासांच्या जागी अर्ध्या, एक तास येते. काही ठिकाणी चार तासांपेक्षा जास्त आहे. परंतु आपली वितरण व्यवस्थाच तशी आहे. काही ठिकाणी आठ तासही येते. वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी वेळ लागेल. यामध्ये जोपर्यंत सुधारणा होत नाही तोपर्यंत जेथे वितरण वाहिन्या नाहीत त्या ठिकाणी टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणे, जेथे झोपडपट्टया आहेत तेथे टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणे याबाबत आपण धोरणात्मक निर्णय घेवुन प्रशासनाला निर्देश दिले तर प्रशासनातर्फे नक्कीच त्याचे अनुपालन केले जाईल.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:—मा. महापौरजी, माझ्या प्रभागात काही झोपडपट्टयांमध्ये सहा महिन्यापुर्वी जलवाहिन्या टाकलेल्या आहेत. त्या जलवाहिन्यांमध्ये आजपर्यंत पाणी आलेले नाही. मा. आयुक्त साहेब माझ्या प्रभागात आमदार निधीतुन व म्हाडाच्या निधीतुन काही ठिकाणी जलवाहिन्या टाकलेल्या आहेत. त्या जलवाहिन्यामध्ये आजपर्यंत एक थेंबही पाणी आलेले नाही. त्या जलवाहिन्या तशाच्या तशा आहेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—मा. महापौर महोदया, याचा अर्थ आज विशेष महासभेद्वारे येथे जो प्रस्ताव आणला आहे की, कर वाढीत अंशत: बदल व टॅकर बाबत. आयुक्तांच्या म्हणण्याप्रमाणे आपण हे केल्यास याचा परिणाम बजेटवर होणार आहे. जर आमचे उत्पन्न कमी करत असू तर खर्चातही कपात करावी लागेल. म्हणजे आता जो प्रस्ताव आहे तो अर्धवट आहे यासाठी आपणांस पुन्हा महासभा बोलवावी लागेल. दुसरे म्हणजे आयुक्त साहेब बोलले की कार्यकारी अभियंता पहाणी करतील व जेथे आवश्यकता आहे तेथे टॅकर देतील. याच्याशी आम्ही सहमत आहोत. तेथे महापौर व पाणी पुरवठा सभापती जावु शकत नाहीत. यापुर्वीही आम्ही बोललो की हे आयुक्तांचे अधिकार आहेत, कार्यकारी अभियंता यांचे अधिकार आहेत ते त्यांच्याच हातात राहायला हवेत. याला राजकीय विषय बनवायला नको. पाण्याला रंग असता कामा नये. यासाठी प्रशासनाचे जे काम आहे जेथे पाणी जात नाही तेथे त्यांचे पथक जाईल. पाणी येत असेल तर टॅकर बंद करतील. पाणी नसेल तर टॅकर चालु करतील. परंतु आमची मागणी अशी आहे की, लोकांना पाणी मिळायला हवे यासाठी प्रशासनाने जास्तीत जास्त प्रयत्न करावेत. नळाद्वारे पाणी मिळायला हवे.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, आज ही जी चर्चा झाली त्याबाबत मी खुलासा करू इच्छितो की दोन वेळा मी महासभेत बोललो की हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता आजपासुनच लागु होईल. हे मी आधीच सांगितले आहे. दुसरे म्हणजे दरवर्षी आम्ही मालमत्ता कराची वसुली रूपये ५० कोटी एवढी दाखवतो. पाणी पट्टी रू. ४५ कोटी दाखवतो. यावेळी आम्ही ती कमी दाखवली आहे. रू. २५ कोटी व त्यापेक्षा कमी दाखवली आहे. तर मी असा खुलासा केला की टॅकर मोफत दिल्याने व जकातीचे दर कमी केल्याने जे नुकसान होईल ते मालमत्ता कर वसुलीमध्ये जी दरवर्षी आम्ही रू. ४५ ते ५० कोटी ठेवतो. ती आता थोडी वाढविण्यात यावी. २५ चे २६ कोटी होतील. जर दोन कोटी वाढले तर २७ कोटी होईल. परंतु मागच्या वर्षी पेक्षा कमी असतील. दुसरे म्हणजे मी आज जो प्रस्ताव दिला तर कार्यकारी अभियंता जावुन पहाणी करतील की आवश्यकता आहे अथवा नाही. परंतु मा. महापौर व पाणी पुरवठा सभापती हे ज्या ठिकाणी पाण्याची कमतरता असेल तेथे टॅकर दयायला सांगु शकतात. यामध्ये भेदभाव केला जाणार नाही. आज मी जसा प्रस्ताव ठेवला आहे तसाच पास व्हायला हवा. आता यावर चर्चा फार झाली आपण मतदान घेवु शकता. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आम्ही आमचा प्रस्ताव ठेवला आहे. जर त्यावर सहमती असेल तर आम्ही आपल्या बरोबर आहोत. अन्यथा आपल्या प्रस्तावाला आमचा विरोध आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मी आधीच बोललो की मतदान घ्यावे.

मा. महापौर:—टॅकरच्या विषयावर मागील अर्ध्या तासापासुन जी चर्चा चालु आहे. दरवर्षी उन्हाळयात पाण्याची टंचाई निर्माण होते. ही गोष्ट लक्षात घेवुन ३० जुन पर्यंत शहरात मोफत टॅकर देण्यात यावेत. ज्या विभागात जलवाहिन्या नाहीत अथवा जेथे पाण्याची टंचाई आहे. अशा विभागात टॅकर देण्यात यावे. बजेटमध्ये देखिल याची तरतुद करण्यात येईल. जकाती बाबत सभागृहाने जो प्रस्ताव दिला आहे तो देखिल मंजुर केला जात आहे.

**मा. सदस्य श्री. रोहडा श्यामसुंदर, श्री. साधवानी मनोज व श्री. होशियारसिंग लबाना हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मा. महापौर महोदया, अशा प्रकारे जो टॅंकर वरील खर्च वाढेल व जकात वसुली कमी होईल तर जो शिल्लकीचा रूपये पाच लाखाचा अर्थसंकल्प होता तो तुटीचा होईल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मी आधीच सांगितले की, मालमत्ता कर वसुली तेवढी रक्कम जास्त दर्शविण्यात येईल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—किती रक्कम कमी होईल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—तुम्हाला माहित नाही का यापुर्वी देखिल बजेट अशाच प्रकारे वाढविण्यात आले होते. शहराचे काहीही होवु दया तुम्हाला फक्त आकडे वर खाली करायचे आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—ते मी श्री. लाल पंजाबी यांच्याकडुन शिकलो आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—आम्ही अशा गोष्टी शिकवत नाही.

मा. महापौर:—जकातीचे दर जे आम्ही आता कमी केले आहे त्यासाठी नियमाप्रमाणे सात दिवसाची नोटीस दिली जाईल व त्यांनतर १५ मे पासुन त्याची अंमलबजावणी केली जाईल.

मा. सचिव:—आपले या प्रस्तावाला समर्थन आहे का?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—आम्ही आमचा प्रस्ताव दिला आहे. संपुर्ण करवाढ रद्द करण्यात यावी.

मा. सचिव:—म्हणजे आपला प्रती प्रस्ताव आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—होय. आमचा प्रती प्रस्ताव आहे. आम्ही कोणत्याही प्रकारच्या करवाढीस विरोध करतो.

मा. सचिव:—मतदान घ्यावे?

मा. महापौर:—सचिव साहेब, मतदान घ्या.

मा. सचिव:—जे सदस्य श्री लाल पंजाबी व श्री राजेंद्रसिंह भुल्लर यांच्या प्रस्तावाच्या बाजुने आहेत व सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

*१२ मते*

३१.श्रीमती मोकल सिमा चंदाराम
३२.श्री. उमाप रामदास
३३.श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद
३४.श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
३५.श्री. भुल्लर राजेंद्रसिंह
३६.श्रीमती बामणकर नंदीनी
३७.श्रीमती खांडेकर प्रेमा
३८.श्री. चव्हाण रमेश
३९.श्री. बोडारे धनंजय
४०.श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहीदास
४१.श्री. चौधरी राजेंद्र शांताराम
४२.श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल

**मा. सचिव:—**जे सदस्य श्री लाल पंजाबी व श्री राजेंद्रसिंह भुल्लर यांच्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत व सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

*३५ मते*

३७.श्री. टेकचंदानी राजु
३८.श्रीमती रामचंदानी भावना मनोहर
३९.श्रीमती कालानी ज्योती
४०.श्री. एडके गणपत गोविंद
४१.श्री. मोकल चंदाराम विठोबा
४२.श्रीमती शर्मा कमला गंगाधर
४३.श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
४४.श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
४५.श्रीमती गुप्ता अनिता धर्मेन्द्र
४६.श्री. नाना आनंदा पवार
४७.श्री. जग्यासी राजु
४८.श्री. ठाकुर विनोद लालसिंग
४९.श्रीमती सोनेजी मीना (सोंडे)
५०.श्रीमती मसंद माया घनश्यामदास
५१.श्री. सुरेश नामदेव गायकवाड
५२.श्रीमती वनवारी मोना अशोक
५३.श्री. वनवारी किशोर नारायणदास
१८.श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१९.श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
२०.श्रीमती भावना रवी खिलनानी
२१.श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ
२२.श्री. सुरेश जाधव
२३.श्री. देंवद्रसिंग खेमाणी
२४.श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल
२५.श्री. भालेराव गौतम यशवंत
२६.श्री. ठाकुर अशोक भगवानदास
२७.श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
२८.श्रीमती पंजाबी दिपा नारायण
२९. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
३०. श्री. विनोद तलरेजा
३१. श्रीमती छाब्रिया भारती
३२. श्रीमती रिझवानी सुजाता रमेश
३३. श्रीमती मीनु दासानी
३४. श्री. लाल बिहारी यादव
३५. श्री. बेहरानी मोहन

**मा. महापौर:—**विरोधी पक्षातर्फे सादर करण्यात आलेला खालील प्रती प्रस्ताव बहुमताने अमान्य करण्यात येत आहे.

प्रस्तावकाचे नांव : श्री लाल पंजाबी

अनुमोदकाचे नांव : श्री राजेंद्रसिंह भुल्लर

**प्रस्तावना:—**

शिवसेना भाजपा युतीचे वतीने प्रस्ताव देण्यात येतो की, महासभा ठराव क्र. ६७, दिनांक १८/२/२००५ मध्ये अंशत: बदल करणेबाबतचा विषय विशेष महासभेसमोर ठेवण्यात आलेला असुन त्यामध्ये वाढ केलेली जकात दरवाढ, मालमत्ता करवाढ, पाणीपट्टी दरवाढ, पाणी टॅकर भाडे व विशेष सफाई कर ही संपूर्ण वाढ रद्द करुन पूर्वीप्रमाणेच लागू असलेले दर कायम ठेवावेत. म्हणुन महासभेपुढे प्रस्तावित.

विशेष महासभा ठराव क्र: ९३अ                                        दिनांक:—०८/०४/२००५.

ही महासभा ठराव क्र. ६७, दिनांक १८/२/२००५ अन्वये करण्यात आलेली जकात, मालमत्ताकर, विशेष सफाई दर, टॅकरभाडे ही दरवाढ पूर्णपणे रद्द करण्यास मान्यता देत नाही.

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. महापौर:—सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव खालीलप्रमाण बहुमताने संमत करण्यांत येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र. १:— महासभा ठराव क्र ६७, दिनांक १८/२/२००५ मध्ये अंशत: बदल करणे.

स्थायी समितीने दिनांक ९/२/२००५ चा ठराव क्र. १५८ प्रमाणे सन २००५—०६ चे रु. ६५,९६ लाख शिलकीचा अर्थसंकल्पीय अंदाज तयार केला होता. त्या अनुषंगाने काही वस्तुंवर जकातीचे दर वाढवणे, टॅकरद्वारे करण्यात येणा—या पाणी पुरवठयावर वाहतुक खर्च आकारणे व मालमत्ता करात दरवाढ करणे प्रस्तावित केले होते. महानगरपालिकेने दिनांक १८/२/२००५ चा ठराव क्र. ६७ अन्वये काही वस्तुंच्या जकातदरात वाढ, टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणेकामी वाहतुक खर्च आकारणे व मालमत्ता करा संबधात पथकर, पाणी पुरवठा लाभकर व विशेष साफसफाई कर या तिनही करात दरवाढ निश्चित केली होती. उल्हासनगर महानगरपालिका दिनांक १/४/२००५ पूर्वी टंचाईग्रस्त भागात टॅकरद्वारे मोफत पाणी पुरवठा करीत होती. दिनांक १/४/२००५ नंतर प्रत्येक टॅकरवर रु २५० व रु ३०० अशाप्रकारे दर आकारण्याचे निश्चित झाले होते. दिनांक १/४/२००५ नंतर महापालिकेने प्रत्येक टॅकरवर रु २५० व रु ३०० आकारणे सुरु केल्यानंतर शहरात पाण्याची टंचाई असल्याने लोकांच्या असंतोषाला तोंड द्यावे लागत होते. टंचाईग्रस्त भागातील मोफत पाणी पुरवठा बंद केल्याने तेथील जनतेची पाणी पुरवठयाअभावी कुचंबणा होत आहे. त्यामुळे टॅकरद्वारे करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठयावरील वाहतुक खर्च मागे घेणे आवश्यक आहे.

तसेच दिनांक १/४/२००५ पासून उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ अनुसूची १ मधील वस्तु गट क्रमांक १३, ३८अ, ४०ब, ५३क, ६१, ६५, ७१ व ७७ या वस्तुंवरील जकात दरात वाढ करण्याचा प्रस्ताव मान्य केला होता. वस्तु गट क्रमांक ३८अ (सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलिअम पदार्थ) व ४० ब (सर्व प्रकारचे केमिकल्स) या औद्योगिक वापराशी संबधित असुन त्याचा वापर मुख्यत्वे कच्च्या मालासाठी केला जात आहे. तसेच याचा वापर औद्योगिक क्षेत्रात मोठया प्रमाणावर होत असल्याने व्यापारी वर्गातुन सदर बाबींवरील जकात दरवाढीस मोठया प्रमाणावर विरोध व्यक्त होत आहे. व्यापा—यांनी सदर बाबींवरील जकात दर कमी करण्यासाठी अभिवेदन दिलेले असल्याने त्यावर फेरसुधारणा होणे आवश्यक आहे.

वरील बाबी विचारात घेवुन यापूर्वी महासभा ठराव क्र. ६७, दिनांक १८/२/२००५ मध्ये अंशत: बदल करण्यासाठी प्रस्ताव.

विशेष महासभा ठराव क्र: ९४ दिनांक:–०८/०४/२००५.

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :– श्री. सतरामदास जेसवानी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता खालील प्रयोजनासाठी महासभा ठराव क्र. ६७, दिनांक १८/२/२००५ मध्ये अंशत: बदल करीत आहे.

- दिनांक ३०/०६/२००५ पर्यंत टंचाईग्रस्त भागात टॅंकरने करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठयावर वाहतुक खर्चाची आकारणी न करता मोफत पाणी पुरवठा करण्यास मान्यता देत आहे.
- दिनांक १५/०५/२००५ पासून सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलिअम पदार्थ या वस्तुंवर जकात दर २.७०% या दराने लागु करण्यास फेरनिश्चित करीत आहे.
- दिनांक १५/०५/२००५ पासून सर्व प्रकारचे केमिकल्स या वस्तुंवर जकात दर ३.४५% या दराने लागु करण्यास फेरनिश्चित करीत आहे.
- उपरोक्त करांच्या दरात फेरनिश्चितीमुळे व टॅंकरद्वारे पाणी पुरवठयावर दिनांक ३०/०६/२००५ पर्यंत वाहतुक खर्चाची आकारणी न केल्याने सन २००५–०६ या वर्षातील उत्पन्न व खर्चाचा मेळ बसविण्यासाठी आवश्यक असेल तेव्हा महापालिकेने जमा खर्चाचे पुर्नसमायोजन करणेस व अर्थसंकल्पीय अंदाजात परिणामी उपाययोजनांस स्विकृती देत आहे.
- या ठरावाद्वारे ज्या सुधारणा करण्यात आल्या आहेत त्या पूर्वीचा महासभा ठराव क्र. ६७, दिनांक १८/२/२००५ चा भाग मानण्यात येतील.

सदरहु ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता करण्यात यावी.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:–मा. महापौरजी, टॅंकर कधी पासुन सुरू होणार? आज पासुन चालु होणार की उदयापासुन?

मा. सचिव:–कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५.५० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२८ एप्रिल , २००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२८/४/२००५ रोजीच्या
विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा गुरूवार दि. २८.४.२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. उपमहापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३३. | श्री. जेसवानी सतराम फतनदास |
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३४. | श्रीमती जया साधवानी |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३५. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु | ३६. | श्रीमती भावना रवी खिलनानी |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३७. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३८ | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ३९ | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ४० | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४१ | श्री. सुरेश जाधव |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४२. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४३. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १३ | श्री. एडके गणपत गोविंद | ४४. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १६. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४७ | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४८. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४९. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५०. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २०. | श्रीमती गुप्ता अनिता धर्मेन्द्र | ५१. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २१. | श्री. नाना आनंदा पवार | ५२. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २२. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५३. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २३. | श्री. जग्यासी राजु | ५४. | श्रीमती किरण लखी माखिजा |
| २४. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५५. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २५. | श्री. शांताराम निकम, | ५६. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २६. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५७. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५८. | श्रीमती करोतिया मालती |
| २८. | श्रीमती मसंद माया घनश्यामदास | ५९. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| २९. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६०. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३०. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६१. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६२. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३२. | श्री. साधवानी मोहन | | |

तर,

१. मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी मा.सदस्य / सदस्या २. श्री. ठाकुर विनोद लालसिंग, ३. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन,४. श्रीमती श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर, ५.श्रीमती. जयश्री सुर्वे, ६. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी, ७. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, ८. श्री. ठाकुर अशोक भगवानदास, ९.श्री. चौधरी राजेंद्र शांताराम, १०. श्रीमती. भटीजा कोमल अमृत, ११. श्री. जयसिंघानी अनिल, १२. श्री. रामरख्यानी मोहनदास , १३. श्रीमती. छाबरीया भारती पहलाज, १४. श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश १५. श्री. संजय रामचंद्र बठीजा, १६. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, १७. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास , १८. श्री. हरदास माखिजा, १९. श्री. वदरीया राजेश नानिकराम हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. २२ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**मा. उपमहापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.**

**मा. सदस्य श्री. मोहन साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सचिव:—विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १:— महासभा ठराव क्र ९४, दिनांक ८/४/२००५ मध्ये अंशत: बदल करणेचा प्रस्ताव——उपरोक्त ठरावाप्रमाणे सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलिअम पदार्थ व सर्व प्रकारचे केमिकल्स या वस्तुंवरील सुधारित जकात दर दिनांक १५/५/२००५ ऐवजी दिनांक १/५/२००५ पासुन लागु करणे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—मा. महापौरजी, आम्ही या प्रस्तावास या अगोदरच विरोध केलेला आहे. आता तर आपण केवळ तारीख बदली करत आहात. परंतु या अगोदरचा जो मुळ प्रस्ताव होता त्यास आम्ही विरोध केला होता व आम्हाला असे वाटत होते की ही जी जकात वृध्दी आहे ती केवळ या दोन बाबींवर कमी न करता ती सर्व बाबींवरील जकात वृध्दी रद्द केली जावी. आणि यासाठी आम्ही या ठरावाचा सुध्दा विरोध करत आहोत. कारण की जो मुळ ठराव आहे त्यालाच आमचा विरोध आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, सभागृहात आज विशेष महासभेचे आयोजन केले आहे. या सभेपुढे दोन विषय आहेत. एक विषय हा आहे की, काही जकातीच्या बाबींवर आम्ही जकात दर कमी केले होते. त्यासाठी जी कालमर्यादा निश्चित केली होती मला वाटते की, ती कालमर्यादा जास्त आहे. जो काही ठराव आहे त्याची अंमलबजावणी ७ दिवसात होवु शकत होती. सभागृहातील सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की, जकात विषयाच्या ठरावाची अंमलबजावणी आजपासुनच झाली पाहिजे. या दोन्ही दरामधील जो फरक आहे तो आजपासुन त्यांना मिळाला पाहिजे. आज नाही उदयापासुनच सुरूवात होईल. ७ दिवस झाले म्हणजे उदयापासुनच सुरूवात झाली पाहिजे. साहेब, आजपासुन कसे होईल उदया पासुन कसे होईल,व्हायचे आहे ते होईल. तर या ठरावाची अंमलबजावणी जी आहे ती उदयापासुन झाली पाहिजे. दुसरा जो कर वाढीचा प्रस्ताव आहे. जो ठराव महासभेने केला होता त्यास आयुक्तांनी...........

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—पहिल्या ठरावावर तर निर्णय होवु दया. त्यानंतर दुस—या ठरावाबाबत आपण बोला.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—एकेक ठरावावर चर्चा करू या.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—होय या प्रमाणेच.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मी बोललो तर, यापुढे बरीच चर्चा व्हायची आहे.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—आयुक्त साहेब आपण स्पष्टीकरण करा.

मा. आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदय, मागील वेळेस सुध्दा मी म्हंटले होते की, दर वाढविण्याचा अधिकार महासभेला आहे. परंतु ते कोणत्या तारखेपासुन लागु होतील ते महासभेने ठरवायचे आहे. व ते लागु होण्याअगोदर काही कार्यपध्दती पुर्ण करायची आहे. आपण लोकांनी ते नियम पाहिले पाहिजेत नियम पाच हा जो आहे त्यानुसार जो ठराव पारीत होईल त्या ठरावास प्रसिध्दी दयायची आहे. व त्यानंतर तो कोणत्या तारखेपासुन लागु होईल. वर्तमानपत्रामध्ये याबाबत जी नोटीस प्रसिध्द होईल त्या नोटीसमध्ये ही तारीख प्रसिध्द केली जाईल की  कोणत्या तारखेपासुन ठराव लागु होईल. आज आपण म्हणत आहात आजपासुन लागु करा. उदयापासुन लागु करा. सभागृह नेताजी नियमांमध्ये ही जी तरतुद आहे त्याची पुर्तता करणे हे प्रशासनाचे काम आहे. त्यासाठी प्रशासनास काही दिवसांचा कालावधी मिळाला पाहिजे. भलेही आपण आज ठराव पारीत कराल की उदयापासुन लागु करा. परंतु ठराव आमच्याकडे आल्यानंतर तो स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यासाठी जेवढा काही कालावधी पाहिजे. लोकांना त्याबाबतीत माहिती होण्यासाठी जेवढा काही वेळ पाहिजे. आमचे जकात विभागाचे जे कर्मचारी आहेत.जे जकातीची आकारणी करणार आहेत. त्यांच्याकडे आदेश पोहचण्यासाठी जो कालावधी पाहिजे. तेवढा तरी दिला पाहिजे?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—महापौर महोदय, आयुक्त साहेबांनी सांगितले की जे दर कमी करायचे आहेत त्याबाबत वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी दयायची आहे. आपल्या कर्मचा—यांना कळवायचे आहे. लोकांना सांगायचे आहे, परंतु जर आम्हाला जकात दर वाढवायचा असेल तर लोकांना कळविले पाहिजे कारण की तोपर्यंत ते जकात दर देणार नाहीत. परंतु जकात दर कमी करायचे असल्याने ही त्यांच्यासाठी आनंदाची गोष्ट आहे. जर ते ४ टक्के दराने जकात भरत असतील आणि त्यांच्याकडुन जर आता सव्वा तीन टक्क्यांनी जकात आकारली जाणार असेल तर त्यांच्यासाठी काही त्रासाचे नाही. यासाठी हे अतिशय कमी वेळेमध्ये होवु शकते. आपल्या संबंधित विभागास फक्त सांगायचे आहे व जकातीचा दर कमी करायचा आहे. त्यामुळे नागरिक खुश होणार आहेत. याबाबतीत थोडयाच वेळात लोकांना माहित पडेल. याबाबत कार्यवाही जेवढया लवकर होवु शकत असेल तेवढया लवकर केली जावी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, आता सभागृहात आम्ही लोक जकातीच्या विषयाबाबत चर्चा करत आहोत. पहिल्या याबाबतीत निश्चित झाले होते की, १५ मे पासुन कार्यवाही केली जाईल. त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी आम्ही ही सभा बोलावली आहे. परंतु त्या प्रस्तावाच्या प्रस्तावनेमध्ये १ मे पासुन कार्यवाही केली जावी असे दिले आहे. ठिक आहे. १ मे पासुन हा प्रस्ताव लागु केला जावा. व व्यापा—यांना फायदा दिला जावा. धन्यवाद.

**मा. सदस्या श्रीमती किरण माखिजा हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—मा. महापौरजी, मी आपणांकडुन दोन मिनिटाची वेळ घेवु इच्छितो. उल्हासनगरमध्ये कुण्या नगरसेवकाने चुकीचे काम केले आहे. त्याचा मी येथे उल्लेख करू इच्छितो.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—प्रत्येकाच्या घरचा वैयक्तिक प्रश्न आहे. येथे आमच्या माता, भगिनी बसलेल्या आहेत.  येथे असे घाणेरडे शब्द बाहेर पडतील की, त्यांना येथून बाहेर जावे लागेल.  म्हणून वर्तमानपत्रामध्ये छापुन आलेल्या बातमीचे कात्रण सभागृहात वाटप करण्याची व याबाबतीत सभागृहात निवेदन करण्याची अशी परवानगी कुणालाही दिली जावू नये.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— हे आजच्या वर्तमानपत्रामध्ये छापुन आलेले आहे.

यावेळी विरोधी पक्षातील काही सन्माननिय सदस्य आपापल्या आसनाजवळ उभे राहुन जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे कळुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—वर्तमानपत्रामध्ये बरेचसे छापुन येते. या अगोदर सुध्दा ब—याच वर्तमानपत्रामध्ये काही काही छापुन आले आहे ती वर्तमानपत्रे आणु का?

**मा. सदस्य श्री. शांताराम निकम व श्री.सुरेश जाधव आणि श्री. प्रशांत जाधव हे सभागृहातुन बाहेर गेले**

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—आपण राजकारण खेळता, चुकीचे धंदे करता. महिलांबरोबर अत्याचार होत आहेत.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—ते त्यांचे घरचे प्रकरण आहे ते येथे कशाला आणता?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—यापुढे असे होईल की कुणीही माता, भगिनीस निवडणूक लढविण्यात लाज वाटेल.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—कृपया आपण बसुन घ्या.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—घरगुती प्रकरण आपण येथे कशाला आणता?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—महिलांवर अत्याचार होत आहेत.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—श्री. नारायण पंजाबीजी, कृपया आपण बसुन घ्या.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—महिलांनी तर शेम, शेम असे म्हंटले पाहिजे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—महापौर महोदय, आयुक्त साहेब, मला वाटते जकात दर निश्चित करण्यासाठी ही तिसरी सभा आहे. बहुमताच्या जोरावर आपण ठराव पारीत करता, या लोकांना वारंवार अशा कितीवेळा आपण आशा दाखवाल. आज जे आपण बहुमताच्या जोरावर दर निश्चित करत आहात ते तरी अंतिम आहेत काय? नाहीतर त्यासाठी सुध्दा पुन्हा दुरूस्ती करण्यासाठी, दुरूस्ती करण्यासाठी मागील सभेत यासाठी एक समिती स्थापन केली होती. त्या समितीचे संशोधन एक वर्षापर्यंत चालु होते. प्रशासनाने आपली कार्यवाही केली तर आज आपण बहुमताच्या जोरावर नेहमी ज्या चुका करता त्याप्रमाणेच करत आहात की लोकांना काही फायदा देत आहात? आजच्या सभेत ज्यास अंतिम स्वरूप दयाल ते अंतिम असेल का? किंवा त्यासाठी पुन्हा आणखी एखादी सभा बोलवावी लागेल? एखादी विशेष महासभा........

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—महापौर महोदय, आताच आमच्या सन्माननिय सदस्यांनी म्हंटले की बहुमताच्या जोरावर आपण चुकीची कामे करत असता. सत्ताधारी पक्षात बसलो असल्यामुळे याबाबत मला आक्षेप आहे. बहुमताच्या जोरावर कोणतेही चुकीचे काम करत नाही. बहुमताच्या जोरावर आम्ही जे काही करत आहोत ते जनतेच्या हिताचे करत आहोत. व्यापा—यांचे हिताचे करत आहोत. समाजाच्या हिताचे करत आहोत. यासाठी आमच्यावर हे जे आरोप लावले जात आहेत की, आम्ही बहुमताच्या जोरावर चुकीची कामे करत आहोत. याबाबत मी येथे तीव्र आक्षेप नोंदवु इच्छितो की आम्ही कोणत्याही प्रकारचे चुकीचे काम करत नाहीत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—लालवानीजी, चुकीचे आहे म्हणुन तर शासनाने तो ठराव विखंडीत केला आहे. तो जर बरोबर असता तर शासनाने विखंडीत केला नसता. आपलेच शासन आहे, आपल्याच शासनाने आपला ठराव विखंडीत केला तो चुकीचा होता म्हणुनच विखंडीत केला.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—हे पहा जर मी माझ्या हातावर इंग्रजीत ९ हा आकडा लिहून आपणांस दाखविला तर तो आपणांस इंग्रजीतील ६ आकडा दिसेल. व मला तोच आकडा ९ असा दिसेल. म्हणुन हा आपण ज्या ठिकाणी बसतो त्या जागेचा फरक आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—आपला हा ६ चा आकडा आपल्याकडेच ठेवा.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—आपण त्यास ६ म्हणा परंतु तो आमचा ९ चा आकडा आहे. म्हणुन बहुमताच्या जोरावर आम्ही जे काही करत आहोत ते जनतेच्या हिताचे करत आहोत. जनतेने राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस व आरपीआयला बहुमत दिले आहे. जनतेच्या बाबतीत आम्ही पुर्णपणे जबाबदार आहोत. व तेवढी नैतिक जबाबदारी आम्ही समजतो.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—ठिक आहे. मतदान घेतले जावे.

**मा. सचिव:—**विषयात उल्लेख केलेल्या वस्तुंवर दि. १.५.०५ पासून जकात दर लागू करण्यास व सन २००५—२००६ करिता इतर वस्तुंवर निश्चित केलेली जकात दर वाढ कमी करण्यास सहमत नाहीत अशा सन्माननिय सदस्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

**प्रस्तावाच्या बाजुने :— ३५ मते**

१. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२. श्रीमती रामचंदानी भावना
३. श्री. लिंगे सुर्यकांत
४. श्री. वाघे शामु
५. श्री. ऐडके गणपत
६. श्रीमती. शर्मा कमला
७. श्री. वलेचा पृथ्वी
८. श्री. रोहडा श्यामसुंदर
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ
१०. श्रीमती गुप्ता अनिता
११. श्री. पवार नाना
१२. श्रीमती आहुजा निता
१३. श्री. राजु जग्यासी
१४. श्रीमती. सोनेजी मीना
१५. श्रीमती मंसद माया
१६. श्री. गायकवाड सुरेश
१७. श्रीमती वनवारी मोना अशोक
१८. श्री. वनवारी किशोर नारायणदास
१९. श्री. जेसवानी सतराम पुनमदास
२०. श्री. लुंड गोविंदराम
२१. श्रीमती खिलनानी भावना
२२. श्रीमती कारीरा रेखा
२३. श्री. पमनानी ईश्वर
२४. श्री. पंजाबी नारायण
२५. श्रीमती पंजाबी दिपा
२६. श्री. साधवानी मनोज
२७. श्री. लबाना होशियारसिंग
२८. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
२९. श्री. तलरेजा विनोद
३०. श्रीमती नाथानी नीना
३१. श्रीमती. दासानी मिनु
३२. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
३३. श्री. लालबिहारी यादव
३४. श्री. टाले प्रमोद
३५. श्री. मुलचंदानी महेंद्र

**मा. सचिव:—**व जे सन्माननिय सदस्य सन २००५—२००६ करिता इतर वस्तुंवर निश्चित केलेली दर वाढ कमी करण्यास सहमत आहेत व विषयात उल्लेख केलेल्या वस्तुंवर दि. १.५.२००५ पासुन जकात दर फेर निश्चितीस समर्थनिय नाहीत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—**प्रस्तावाच्या विरोधातच नाही तर आम्ही संपुर्ण जकात वाढीच्या विरोधात आहोत.

**मा. सचिव:—**होय. आपले जे म्हणणे आहे ते तेच आहे. आपणांस जकातीच्या कोणत्याही बाबींवर जकात वृध्दी नको आहे ना?

**प्रस्तावाच्या विरोधात १४ मते**

१. श्रीमती. जावळे संगिता
२. श्री. उमाप रामदास
३. श्री. पुरस्वानी जमनादास
४. श्री. रूपचंदानी बच्चाराम
५. श्रीमती. कृष्णानी रेखा
६. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
७. श्री. सोनावणे नथु
८. श्री. गायकवाड दिलीप
९. श्रीमती खांडेकर प्रेमा
१०. श्रीमती माने किरण
११. श्री. चव्हाण रमेश
१२. श्री. धनंजय बोडारे
१३. श्री. पाटील विश्वनाथ
१४. श्रीमती. ससाणे लक्ष्मी

**कॉग्रेसची ३ मते तटस्थ**

४. श्रीमती साधवानी जया
५. श्री. भालेराव गौतम
६. श्रीमती करोतिया मालती

**मा.उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—**सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यात येत आहे.

**विषय क्र. १:—** महासभा ठराव क्र ९४, दिनांक ८/४/२००५ मध्ये अंशत: बदल करणेचा प्रस्ताव——उपरोक्त ठरावाप्रमाणे सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलिअम पदार्थ व सर्व प्रकारचे केमिकल्स या वस्तुंवरील सुधारित जकात दर दिनांक १५/५/२००५ ऐवजी दिनांक १/५/२००५ पासुन लागु करणे.

**प्रस्तावना:—**

स्थायी समितीने दिनांक ९/२/२००५ चा ठराव क्र. १५८ प्रमाणे सन २००५—०६ चे रु. ६५,९६ लाख शिलकीचा अर्थसंकल्पीय अंदाज तयार केले होता. त्या अनुषंगाने काही वस्तुंवर जकातीचे दर वाढवणे, टॅंकरद्वारे करण्यात येणा—या पाणी पुरवठयावर वाहतुक खर्च आकारणे व मालमत्ता करात दरवाढ करणे प्रस्तावित केले होते. महानगरपालिकेने दिनांक १८/२/२००५ चा ठराव क्र. ६७ अन्वये दिनांक १/४/२००५ पासून उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ अनुसूची १ मधील वस्तु गट क्रमांक १३, ३८अ, ४०ब, ५३क, ६१, ६५, ७१ व ७७ या वस्तुंवरील जकात दरात वाढ करण्याचा प्रस्ताव मान्य केला होता. वस्तु गट क्रमांक ३८अ (सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलिअम पदार्थ) व ४० ब (सर्व प्रकारचे केमिकल्स) या औद्योगिक वापराशी संबधित असुन त्याचा वापर मुख्यत्वे औद्योगिक क्षेत्रात मोठया प्रमाणावर होत असल्याने व्यापारी वर्गातुन सदर बाबींवरील जकात दरवाढीस मोठया प्रमाणावर विरोध व्यक्त होत होता. त्यामुळे विशेष महासभा ठराव क्र. ९४, दिनांक ८/४/२००५ अन्वये सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलिअम पदार्थ व सर्व प्रकारचे केमिकल्स या वस्तुंवरील सुधारित जकात दर १५/५/२००५ लागु करणेत आले होते. परंतु आता सदरचे सुधारित जकात दर दिनांक १५/५/२००५ ऐवजी दिनांक १/५/२००५ पासुन लागु करणेकामी विशेष महासभा ठराव क्र. ९४, दिनांक ८/४/२००५ मध्ये अंशत: बदल करणेसाठी प्रस्तावित.

विशेष महासभा ठराव क्र: ८ दिनांक:—२८/०४/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार सर्व प्रकारचे खनिज तेल व पेट्रोलिअम पदार्थ व सर्व प्रकारचे केमिकल्स या वस्तुंवरील सुधारित जकात दर दिनांक १५/५/२००५ ऐवजी दिनांक १/५/२००५ पासुन लागु करणेकामी पूर्वीचा विशेष महासभा ठराव क्र ९४, दिनांक ८/४/२००५ मध्ये अंशत: बदल करण्यास मान्यता देत आहे. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावांतर्गतच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:—विषय क्र. २ वाचून दाखवितात.

विषय क्र. २ :—उल्हासनगर शहरातील मालमत्ता कराचे आकारणीसाठी पात्र असलेल्या इमारतींचे व जमिनींचे आयुक्तांनी ठरविलेले करयोग्य मुल्य संबधातील महासभा ठराव क्र. ४, दिनांक १९/५/२००४ शासनाने विखंडीत केला असुन त्या संबधात योग्य तो निर्णय घेणे.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—सर्व संमतीने पारीत?

मा. सचिव:—विरोधी पक्षाच्या सन्माननिय सदस्यांकडुन प्रति प्रस्ताव आलेला आहे. तो असा आहे.

सन २००३—२००४ पासून ज्या खाजगी मालमत्तामध्ये बदल करून नव्याने बांधण्यात आल्या किंवा मालमत्तेचे क्षेत्र वापर बांधकाम प्रकार यात बदल झाला अश्या मिळकतीवर सुधारीत दर लागु केले आहेत परंतु सदरचा दर रद्द करून सन १९९६—१९९७ या सरकारी वर्षात लागु असलेले कर योग्य मुल्यांकाचे दर लागु करणेसाठी महासभा ठराव क्र. ४ दि. १९.५.२००४ पारीत करण्यात आला. सदर ठराव शासनाने विखंडीत केल्याने महापालिकेतर्फे शासनास अपील करण्यात यावे. व करमूल्यांकना विरूध्द न्यायालयात याचिका दाखल केलेल्या याचिकाकर्त्यांना पाठिंबा जाहिर करून सन १९९६—९७ या सरकारी वर्षातील लागू असलेले कर योग्य मुल्यांकनाचे दर लागु करणेत यावेत. व सन १९९६—९७ सालचे (पुर्वीचे) दर कायम ठेवण्यात यावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—कर कमी करण्याबाबतची आजची जी प्रस्तावना / ठराव दिला आहे. या अगोदर मालमत्ता करामध्ये १ रू. सुध्दा वाढ करू नये अशाप्रकारचा ठराव सर्व पक्षांनी सर्व संमतीने पारीत केला होता. ज्यास शासनाने विखंडीत केला आहे. त्याबाबत मी खुलासा करू इच्छितो की, आपण महाराष्ट्र शासनाअंतर्गत आहोत व तो जो ठराव विखंडीत झाला आहे तो केवळ आमचा ठराव नव्हता. तर तो सर्व पक्षांचा होता. महाराष्ट्र शासनाने जो ठराव विखंडीत केला तसाच दुसरा ठराव आणु शकत नाहीत, या विरोधात आमचे काही लोक

न्यायालयात गेले होते. परंतु त्यांना न्यायालयाकडुन अंतरिम आदेश अदयाप प्राप्त झालेला नाही. याचिका केवळ दाखल करून घेण्यात आलेली आहे. यावर निर्णय कधी होईल हे सांगता येत नाही परंतु जो काही निर्णय येईल. तो आपणां सर्वांना स्विकारावा लागेल. मग भलेही ती लोकनियुक्त बॉडी असो महाराष्ट्र शासन असो किंवा आयुक्त साहेब असो त्यांना न्यायालयाचा आदेश मान्य करावाच लागेल. त्या ठरावाची जर अंमलबजावणी करण्याची वेळ आली तर सर्वात जास्त आनंद आम्हाला होईल. परंतु तोपर्यंत तसाच ठराव सभागृहापुढे आणणे योग्य नाही. परंतु त्या ठरावात थोडा फार बदल करून आम्ही येथे दिला आहे. ज्या अन्वये करामध्ये थोडीफार वृध्दी सुचविली आहे. इतर जे कर आहेत ते रद्द केले जावेत. नाममात्र कर आकारले जावेत व शहरवासियांना फायदा दिला जावा. आयुक्त साहेबांनी प्रत्येक कॅम्पात झोनींग तयार केले होते. कॅम्प नं. १ चा भाव अलग , २ चा भाव अलग, ३ चा अलग, ४ चा अलग हे जे झोनिंग आहे ते सुध्दा रद्द केले जावे. हे जे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र आहे ते अतिशय लहान आहे. महापालिकेचे पुर्ण क्षेत्र १३ चौ. कि.मी चे आहे. त्यामध्ये वेगवेगळे दर लावणे मला वाटते योग्य नाही.उल्हासनगर कॅम्प १ ते ५ मधील सर्व मालमत्ताधारकांना एकसारखाच दर आकारला पाहिजे. कारण की शहरामध्ये दिवसेंदिवस पाणीपट्टीचे दर वाढविले जात आहेत. सार्वजनिक दिवाबत्तीचेही दर वाढविले जात आहेत. नियमानुसार कर्मचा–यांचे पगारही दिवसेंदिवस वाढत असतात. या गोष्टी लक्षात घेता आणखी ओझे लादणे ठिक नाही. आयुक्त साहेब तीन वर्षापर्यंत येथे आहेत. महाराष्ट्र शासनाने आयुक्त म्हणुन त्यांना नियुक्तीचे आदेश दिले आहेत. त्यांनी या शहराचा विकास करण्याची प्रतिज्ञा केली आहे. विकास कामे करण्यासाठी करांमध्ये काही ना काही वाढ करणे आवश्यक आहे. नाहीतर आम्ही आयुक्तांकडे काम करवुन घेण्यासाठी त्यांच्याकडे जावुन बसतो व करांमध्ये वृध्दी करण्याचा प्रस्ताव आला तर त्यांना सहकार्य करणार नाही. हे चुकीचे आहे. यासाठी काही ना काही कर वृध्दी करणे आवश्यक आहे. संध्याकाळच्या वेळेस आयुक्त साहेबांकडे जावुन बसणे व त्यांना सांगणे की हे विकसित करा ते विकसित करा ही चांगली गोष्ट नाही. परंतु यापेक्षा हे चांगले आहे की हा जो प्रस्ताव आलेला आहे तो अतिशय चांगला आहे. लोकांवर कराचे फार मोठे ओझे पडु नये. व महापालिकेसही थोडाफार फायदा होवो. म्हणुन या ठरावाची अंमलबजावणी केली जावी व ४५१ नुसार आम्ही लोकांनी महाराष्ट्र शासनाकडे अपिल केले आहे की, हा जो ठराव आहे तो लागु करण्यासाठी आम्हास वेळ दिली जावी. ठराव विखंडीत झाला आहे त्याबाबत कुणालाही सूनावणी दिली नव्हती. हे लक्षात घेता महाराष्ट्र शासनास आमची अपिल आहे की हा जो ठराव आहे तो लागु केला जावा. महाराष्ट्र शासनाने महापालिकेची ही बाजु ऐकुन घ्यावी. महापालिकेचाही विचार करावा. जनतेचेही ऐकुन घ्यावे. आम्हालाही शहराचा विचार करायचा आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेता या ठरावाची अंमलबजावणी झाली पाहिजे व हा ठराव लागु झाल्यानंतर ज्या लोकांनी पैसे भरले आहेत त्यांना पुढच्या वर्षी फायदा दिला जावा. असे केल्याने फार चांगले होईल. व हा जो ठराव आहे मला वाटते तो अतिशय चांगला ठराव आहे व तो सर्वांनी मिळून पारीत केला पाहिजे अशी मी सभागृहास विनंती करतो. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:–</u>जेव्हा अर्थसंकल्पाची सभा झाली होती १८ फेब्रुवारी रोजी व कर वृध्दीबाबत बोलले जात होते, या अगोदर २००३–२००४ या वर्षात कर वृध्दीबाबत बोलले जात होते तर त्यावेळस आम्ही एक विशेष सभेची मागणी केली होती. लोकसभेच्या निवडणूकांमुळे ही सभा त्यानंतर मे महिन्यात झाली. व हा ठराव सर्व संमतीने पारीत झाला की आम्ही कर वृध्दीच्या पुर्णपणे विरोधात आहोत. याबाबतचा ठराव नंतर महाराष्ट्र शासनाकडुन रद्द होवुन आला. याबाबत आपली जी मागील सभा झाली त्यावेळेस मी म्हंटले होते की आपणांस आपले लक्ष दुसरीकडे न वळविता या प्रस्तावाकडे लक्ष केंद्रीत केले पाहिजे आम्ही आजसुध्दा करवृध्दीच्या विरोधात आहोत. व कोणत्याही प्रकारची कर वृध्दी असेल तर त्यास आम्ही प्रखर विरोध करत आहोत. आम्ही आमचा एक प्रतिप्रस्ताव दिलेला आहे. सर्वसाधारणपणे असा प्रस्ताव कधी दिला जात नाही. कारण की मुलभूत तत्वाची गोष्ट आहे. म्हणुनच आम्ही आमचा एक स्वतंत्र ठराव दिला आहे. केवळ करवृध्दीच रद्द झाली पाहिजे असे नाही तर त्याचबरोबर त्या ठरावान्वये आम्ही ही सुध्दा मागणी केली आहे की शासनाकडुन जो ठराव विखंडीत होवुन आला आहे त्याबाबत महानगरपालिकेने राज्य सरकारकडे अपिल केले पाहिजे. एवढेच नाही तर करवृध्दीच्या विरोधात आमचे जे काही लोक उच्च न्यायालयात गेले आहेत त्यांना सुध्दा आम्ही सहकार्य केले पाहिजे. आम्ही आमच्या भुमिकेवर आज सुध्दा कायम आहोत. व कोणतीही करवृध्दी असो त्यास आमचा विरोध कायम आहे.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:–</u>मा.महापौरजी, मा. आयुक्त साहेब ही जी प्रस्तावना दिली आहे त्यामध्ये दर प्रतिचौरस फुट प्रतीमहा असे लिहिले आहे. १९९६ पासुन २००४ पर्यंत तर ही टंकलेखनाची चुक आहे की बरोबर आहे. येथे दर लिहिताना प्रती चौरस फुट याप्रमाणे लिहिले आहे.

**मा. सदस्या श्रीमती जया साधवानी व मा. सदस्य श्री. गौतम भालेराव सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—बरोबर आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—बरोबर आहे?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—प्रस्तावनेमध्ये ही जी शेवटची वाक्यरचना आहे की सबब याप्रकरणी कायदयाच्या तरतुदीचे पालन झालेले नाही. म्हणजे शासनाने कायदयाचे पालन केले नाही. कायदयाच्या तरतुदीचे पालन झालेले नाही हे बरोबर आहे का? असेल तर शासनाला आपण नोटीस पाठवु शकतो. शासनाच्या अधिका—यांनी जे बेकायदेशिर केले आहे त्याबाबतीत आपण शासनाला कोर्टात खेचु शकतो. श्री. लाल पंजाबीजी हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे ना? येथे स्पष्टपणे लिहिले आहे की कायदयाच्या तरतुदीचे पालन करण्यात आले नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आम्हाला सुनावणी दिली नाही. हे बरोबर नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—कायदयाच्या तरतुदीचे पालन केलेले नाही. म्हणजेच शासनाने चुकीचे केले आहे. शासनाने जो निर्णय घेतला आहे तो चुकीचा आहे. कायदयाच्या अनुसार नाही. कायदयाच्या बाहेर आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—कायदयात तरतुद आहे की आम्हास सुनावणी दिली पाहिजे होती.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—होय ना. म्हणजेच त्यांनी चुकीचे केले आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—शासनाने आम्हाला सुनावणी दिली नाही म्हणुन आम्ही ठराव पारीत करत आहोत व विनंती करत आहोत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—अशा शासनाचा तर धिक्कार केला पाहिजे. जे चुकीचे काम करतात.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आम्ही त्यामध्ये सुधारणा करू इच्छितो की कायदयानुसार आम्हाला सुनावणी दिली पाहिजे.

**मा. सदस्या श्रीमती सीमा मोकल यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सचिव:—असे यांचे म्हणणे आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—बरोबर आहे. असे यांचे म्हणणे आहे. खरे आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—खरे आहे असे मी म्हंटले नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—आपण लेखी दिले आहे. कायदयाच्या तरतुदीचे पालन केलेले नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—ठिक आहे ना म्हंटले ना, दुरूस्ती करू म्हणुन. मी म्हंटले ना की त्यामध्ये लिहु की कायदयानुसार महाराष्ट्र शासनाने चुकीचे केले आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—हेच तर मी म्हणत आहे की आपण वारंवार चुका करता. आपण दुरदृष्टी ठेवत नाहीत. जनतेला काय पाहिजे, काय केले पाहिजे. कोणताही विचार न करता आपण करता त्यानंतर.....

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—मा. महापौर महोदय, आमचे सन्माननिय सदस्य शब्दामध्ये आम्हाला पकडत आहेत. आताच आमच्या सभागृह नेत्यांनी म्हंटले की आम्ही त्यामध्ये दुरूस्ती करतो. कृपया आपण आम्हास काय म्हणायचे आहे ते समजुन घ्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आम्ही जे लिहिले आहे त्यामध्ये असे वाक्य जोडले जावे की आमचे असे म्हणणे आहे की ..................

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—तोपर्यंत जे करयोग्य मुल्य आहे जसे आता लागु आहे तेच आहे. म्हणजे प्रशासनाने, आयुक्तांनी जे करयोग्य मुल्य लागु केले आहे. ते चालु आहे असाच प्रस्ताव आहे. म्हणुन कर वृध्दीसाठी आमचा या अगोदर सुध्दा विरोध होता. व आज सुध्दा आमचा विरोध कायम आहे. आम्ही बदलत नाहीत.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:—मा. महापौर, आयुक्त साहेब या करवाढीच्या प्रस्तावाच्या अगोदर, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्येक जमिनधारकाला किंवा तेथे राहणा—या व्यक्तीला योग्य रक्कमेचे बिल पाठवितात का? सर्वात अगोदर हा विचार केला पाहिजे कारण अशा ब—याचशा तक्रारी आहेत. की ज्यांना.......

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—हे पहा आजच्या सभा सूचनेवर हा विषय नाही.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:—हाच विषय आहे ना? घरपट्टीची बिले बरोबर पाठवत नाहीत तर करवाढींना काय अर्थ आहे. असे घर आहे जेथे भिंतीना प्लास्टर नाही. महादेव नगरमध्ये माझ्या प्रभागामध्ये एका व्यक्तीस टॅक्सचे बिल पाठविले आहे. त्याच्या घराला आतुन बाहेरून प्लास्टर सुध्दा नाही. त्यास टियर गर्डर/ आर.सी.सी. बांधकामाचे बिल पाठविले आहे. या माणसाने एका वर्षापुर्वी अर्ज केला होता की, माझे असे काही बांधकाम नाही. आपण प्रत्यक्ष येवुन पहावे व योग्य त्या प्रकारे कर आकारणी करून बिल पाठवा. तरीही अदयाप पर्यंत महापालिकेचा कुणीही संबंधित अधिकारी तेथे गेला नाही. त्या व्यक्तीस यावर्षी सुध्दा त्याच बांधकामाच्या हिशोबाने मालमत्ता कराचे देयक पाठविले आहे. योग्य त्या रक्कमेची कराची बिले महापालिका पाठवित नाही. तर मग कर वाढविण्यात किंवा कमी करण्यात फायदा काय? सर्वात प्रथम योग्य त्या प्रकारे सर्वे करून कर आकारणी करा. त्यानंतरच मग कराचे दर वाढवायचे आहेत किंवा कमी करायचे आहे याचा विचार करा.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—सचिव साहेब, जो ठराव येथे आणला आहे. त्याच्या मागील हेतु काय आहे हे कुणाच्या लक्षात आले नाही. आमच्या तरी लक्षात आले नाही. कर वृध्दीला मान्यता दयायची होती. आता यामध्ये सुध्दा तोच विषय आहे की करवृध्दीला मान्यता दयायची आहे. आमचा तर या प्रस्तावास विरोध आहे. प्रस्तावावर मतदान घेताना आपण म्हणाल की प्रस्तावाच्या बाजुने कोण आहे? प्रस्तावित ठरावातील मुद्दा क्र. ३ मध्ये स्पष्टपणे नोंद आली आहे की, जी करवृध्दी झालेली आहे तीला मान्यता देण्यात येत आहे. जी की पहिले टियर गर्डर या अगोदरचे करयोग्य मुल्य होते ७. ५० आताचे त्याचे कर योग्य मुल्य आहे ९. ५० तर यास जी मान्यता दिली आहे ती प्रशासनाने अगोदर दिलेली आहे. हा ठराव यावेळेस पुन्हा आणण्याचा उद्देश काय आहे तो काही समजुन येत नाही. परंतु त्यांनी हा जो प्रस्ताव आणलेला आहे शासनाकडुन सुनावणी घेण्यासाठी तर कृपा करून जसा ठराव आहे तो वाचुन ठरावाच्या बाजुने किंवा ठरावाच्या विरोधात अशाप्रकारे मत आजमावावे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मा. महापौर, हा जो प्रस्ताव आयुक्त साहेबांनी दिलेला आहे. व जो सत्ताधारी पक्षाकडुन देण्यात आलेला आहे यामध्ये काही फरक नाहीच आहे.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—ठिक आहे ना? आपण लोक सहमती दया ना?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आपण चौ. फुटाच्या हिशोबाने दर ठेवले आहेत. त्याचे यांनी चौ.मीटर मध्ये रूपांतर करून दर ठेवले आहेत. हे म्हणत आहेत की आम्ही कर वाढ कमी करत आहोत. तर आपण कृपया याचे रूपांतर करून पहा. आयुक्त साहेबांनी जे दर वाढविले होते २००३—२००४ चे चौ. फुटाचे जे दर आहेत. तेच दर यांनी आज चौ. मीटरमध्ये रूपांतरीत करून ठेवले आहेत. त्यामध्ये थोडासा सुध्दा फरक नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, जकातीचा ठराव आम्ही पारीत करणार आहोत तो ठराव इतिवृत्त कायम होण्याच्या अगोदर अंमलात आणला जावा. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता अंमलात आणला जावा.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—आयुक्त साहेब हे शक्य आहे का?

मा. आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदय, हा जो ठराव आपण करत आहात त्याच्या अंमलबजावणीची माझी जबाबदारी नाही. राज्य शासनाकडे तो ठराव अभिवेदन म्हणुन आपणांस पाठवायचा आहे.

महासभेचे हे जे मत आहे. पहिला ठराव विखंडीत करण्याचा शासनाने जो निर्णय घेतलेला आहे. त्याबाबत महासभेचे हे जे मत आहे ते आपण पाठवत आहात त्याची अंमलबजावणी मी करणार नाही. यावर शासनाकडुन जेव्हा निर्णय होईल तेव्हा विचार केला जाईल.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी:—मा. महापौरजी, मला असे वाटते की येथे मराठीचे बरेचसे जाणकार बसले आहेत. चुका काढुन आम्हाला विचारतात. कदाचित त्यांनी ठराव वाचला तर त्यांच्या लक्षात येईल की ठरावात असे लिहिले आहे की आम्ही त्या कायदयानुसार तो प्रस्ताव शासनाकडुन मंजुर करून घेवू. व यावर्षी जी नविन बिले निघणार आहेत ती ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये निघणार आहेत. आम्ही स्वत: राज्य शासनाकडे अपिल करत आहोत. कलम ४५१ नुसार त्यांनी जो ठराव रद्द केला आहे. त्याऐवजी हा जो ठराव आहे. हा ठराव आम्हास लागु करून दिला जावा. व अपिल करण्यासाठी आम्हाला सुनावणी दिली जावी. याबाबत आयुक्त साहेबांकडुन खुलाश्याची आवश्यकता नाही हे आमच्या प्रस्तावामध्ये लिहिले आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आपण येथे जो प्रस्ताव आणलेला आहे. त्याबाबत आपण येथे आकडेमोड करून पहा. आयुक्त साहेबांचा जो प्रस्ताव आहे. व आपला जो प्रस्ताव आहे त्यामध्ये एक नया पैशाचा सुध्दा फरक नाही. १०० चौ. मीटरचे आयुक्तांच्या हिशोबाने आकडेमोड केली तर व १०० चौ. मीटरचे आपल्या हिशोबाने आकडेमोड केली तर यामध्ये कुणाचा दर जास्त आहे? आपण जो प्रस्ताव आणला आहे त्याचा दर जास्त आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, मी स्पष्टपणे म्हंटले आहे आम्ही ७५ टक्के दर कमी करत आहोत. आपण जर चर्चा करत आहात तर सर्व संमतीने ठराव पारीत करणार असाल तरच चर्चा करा.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—सर्व संमतीने आम्ही ठराव पारीत करू परंतु ......

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—जर आपणांस प्रस्तावाच्या विरोधात मतदान करायचे आहे. तर हरकत नाही विरोधात मतदान करा.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मी सचिव साहेबांना विचारू इच्छितो की,

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आपण प्रत्येक वेळी विरोधात मतदान करता असे मला बोलण्याची वेळ का येते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—जर आपण फक्त लोकांना दाखवु इच्छिता की, आम्ही कर कमी करत आहोत तर येथे मी आपणांस विचारू इच्छितो की आज जो आपण प्रस्ताव आणलेला आहे. १०० चौ.मीटरवर एका वर्षाला किती कर लागेल? याची आकडेमोड करून मला सांगा. लोकांची दिशाभुल करू नका. १०० चौ. मीटरवर मला सांगा किती कर लागेल? आजच्या प्रस्तावाचे हिशोबाने किती कर होईल? व आयुक्त साहेबांचा या अगोदरचा जो प्रस्ताव होता त्याच्या हिशोबानुसार किती कर असेल? हे कृपया मला सांगा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मी हे सुध्दा सांगणे जरूरीचे नाही की मतदान घ्या......

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—लोकांना आपण सांगत आहात की,......

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—खुलासा केला जावा.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—श्री. जमनुजी कृपया आपण बसुन घ्यावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मतदानाबाबत मी जे म्हंटले की, आपण नेहमी आरोप लावता की, आपण बहुमताच्या जोरावर, मतदानाच्या जोरावर निर्णय घेता म्हणुन मी म्हंटले.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आपण ७५ टक्के कर कमी केलात तर आम्ही आपले समर्थन करू. परंतु प्रथम आपण ते सिध्द करून दाखवा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—आपली जी शंका आहे तीचेही आम्ही निरसन करतो.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारीः—श्री. जमनुजी आपल्या पक्षाने प्रस्तावास विरोध केला आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—विरोधाची गोष्ट नाही. मी विचारू इच्छितो, होवु शकते मी आपले समर्थन करू. परंतु त्या अगोदर मला आकडेमोड करून सांगा की १०० मीटर वर आयुक्त साहेबांनी जो दर ठेवला आहे त्या हिशोबाने किती कर होईल व आपल्या प्रस्तावाच्या हिशोबाने किती कर होईल? हे लोक उलट कर वाढवित आहेत. व लोकांना सांगत आहेत की आम्ही कर कमी करत आहोत.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारीः—आपण प्रस्तावास विरोध केला आहे ना?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—त्याची आकडेमोड करून मला सांगा.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः—कृपया ऐकुन घ्या आम्ही येथे ५० वर्षापासुन रहात आहोत. सर्व व्यापारी आहेत, प्रत्येक पंचायतीचे प्रतिनिधी येथे बसले आहेत. आज प्रशासनाकडुन जर काही झाले असेल तर त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी येथील नागरिकांना, व्यापा—यांना जर काही कराचे ओझे होत असेल तर व वाजवी पेक्षा जास्त कराचे ओझे होत असेल व आम्हाला असे वाटत असेल की हे जे कराचे ओझे लादले आहे ते नाहक लादले आहे त्यामध्ये काही सुधारणा करण्यासाठी आम्ही अपिल करत आहोत. आम्ही त्यांच्यावर कराचे ओझे वाढवु इच्छित नाही. परंतु एखादा नविन व्यवसाय उघडण्यासाठी व्यवसाय चालविण्यासाठी कधी ना कधी नाईलाजाने थोडी फार करवाढ करावी लागत असेल तर ती नाईलाजाने करावी लागते. आम्हाला सुध्दा असे वाटत नाही की तेथील नागरिकांवर कराचे ओझे पडावे. परंतु नेहमीसाठी व्यवसाय चालवायचा आहे. नेहमी करता दुकान चालवायचे आहे. दरवर्षी खर्च वाढत चालला ओह. म्हणुन नाईलाजाने काही करावे लागत आहे. म्हणुन कुणालाही आनंद होत नाही की आमच्या नागरिकांवर कराचे ओझे वाढावे असे कधीही वाटत नाही. आम्ही जे काही करत आहोत ते चांगले करत आहोत. शहरवासियांसाठी व्यापा—यांसाठी, दोन वेळेस प्रस्ताव पारीत करण्यासाठी आम्हांस आपण या अगोदर आम्हाला जसे सहकार्य दिले. आम्ही सर्व जण जमिनीवर बसलो होतो. आम्ही जो जमिनीवर बसलो होतो तो काही आनंद म्हणुन बसलो नव्हतो. कर वृध्दी येथिल नागरिकांबाबत, व्यापा—यांबाबत जेव्हा आम्हाला कष्टप्रद वाटू लागली तेव्हा आपण सुध्दा आम्हाला सहकार्य दिले होते. तो प्रस्ताव पारीत केला होता. शासनाने आमची बाजु ऐकुन घेतलेली नाही. आमचे म्हणणे ऐकुन घ्यावे म्हणुन आम्ही शासनाकडे अपिल करत आहोत. आमच्याकडे सुध्दा कुणासाठी वेळ नाही. आज येथे बसलो आहोत ते वेळेत वेळ काढुन येथे बसलो आहोत. व्यापा—यांना त्रासाचे होवु नये म्हणुन आजची सभा आयोजित केली आहे. माझी सर्व सन्माननिय सदस्यांकडुन हीच अपेक्षा आहे की कृपया यापुर्वीप्रमाणेच सहकार्य करा. जी चुक प्रशासनाने केली आहे. नागरिकांवर जे कराचे ओझे लादले आहे त्याविरोधात आपण राज्य शासनाकडे जावुन अपिल करून येथील लोकांना न्याय देवु. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—मा. महापौर महोदय, आयुक्त साहेब, १०० चौ. मीटर जागेस मा. आयुक्त साहेबांनी आकारलेल्या दरानुसार किती कर आकारला जाईल.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारीः—श्री. जमनुजी आपण बसुन घ्या.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—नाही. नाही. असे कसे बसुन घेणार. १०० चौ.मीटर मागील कर आपण सांगा.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारीः—मतदान घ्या.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—मी मतदान कसे करणार, प्रस्तावाच्या बाजुने किंवा प्रस्तावाच्या विरोधात. मला १०० चौ.मीटरला महापालिकेने कोणता दर ठेवला आहे व आताचा दर कोणता आहे हे मला आता सांगा. मला मतदान करायचे आहे. प्रस्तावाच्या बाजुने करू की विरोधात, म्हणुन मला हा दर सांगा. १०० चौ. मीटरला आयुक्त साहेबांनी जास्त दर ठेवला आहे की आपण.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—सचिव साहेब याचा खुलासा करा. होवु शकते प्रस्तावाच्या बाजुने मतदान होईल.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—जर दर कमी झाला तर आपण प्रस्तावाच्या बाजुने मतदान कराल ना?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—बिल्कुल, अ, क, ड मध्ये आयुक्त साहेबांनी जो दर प्रती चौरस मीटर १.१२ प्रती महिना ठेवला आहे. त्या हिशोबाने १०० चौ. मीटरचा कर किती होईल? व यांनी जो दर ठेवला आहे त्यानुसार १०० चौ.मीटरचा कर किती होईल?

श्री. हरेश इदनानी (मुख्य लेखा अधिकारी):—मा. महापौर, आयुक्त साहेबांकडुन जे दर निश्चित करण्यात आले होते त्यामध्ये पुर्ण शहराचे चार विभागामध्ये वर्गीकरण करण्यांत आले होते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—अ,क,ड या विभागाचे दर सांगा.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—त्यांना खुलासा करू दया ना. आपण जी मागणी केली त्यानुसार ते खुलासा करत आहेत.

**मा. सदस्य श्री. वाघे शामु व श्री. राजु टेकचंदानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मला फक्त एवढेच सांगा की आर.सी. सी. बांधकामाचे विभाग अ,क,ड मधील प्रत्येक १०० चौ. फुटामागील कराचे दर काय असतील?

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—श्री. जमनुजी प्रस्तावाच्या बाजुने मतदान करण्यासाठी आपण फक्त तयार रहा.

मा. सदस्य श्री.पृथ्वी वलेचा:—ऐकुन घेत नाहीत. शांत रहा.

श्री. हरेश इदनानी (मुख्य लेखा अधिकारी):—चार विभाग पाडण्यात आले होते.अ,ब,क,ड त्यामध्ये प्रत्येक विभागामध्ये आतील व बाहेरील असे भाग पाडण्यांत आले होते. चार विभागापैकी तीन विभागांना वेगळे करण्यात आले होते. अ,क,ड या विभागांसाठी एकसारखे दर ठेवण्यात आले होते. आतील व बाहेरील वेगळे ब मध्ये सुध्दा आतील व बाहेरील भागांसाठी वेगळे दर ठेवले होते. अशा प्रकारे दोन भागांमध्ये वर्गवारी करण्यात आली होती. परंतु त्यामध्ये चार प्रकारचे दर होते. आतील भागातील वेगळे, बाहेरील भागातील वेगळे. अ,क,ड या विभागांसाठी एकसारखे दर ठेवण्यात आले होते. आतील व बाहेरील वेगळे ब मध्ये सुध्दा आतील व बाहेरील भागांसाठी वेगळे दर ठेवले होते. यांचे म्हणजे असे आहे की हे जे चार विभाग होते त्यामध्ये सन १९९६—९७ च्या करयोग्य दरसूचीमध्ये २५ टक्के , ५० टक्के, ७० टक्के अशाप्रकारे  वेगवेगळी वाढ करण्यात आली होती. यांनी हे सर्व बाजुला सारून १९९६—९७च्या करामध्ये फक्त २५ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव येथे आणला आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आपण फिरवुन फिरवुन उत्तर दिले आहे. मी आपणांवर सुध्दा आरोप लावत आहे. आपण फक्त मला एवढेच सांगा. अ,क,ड या विभागातील बाहेरच्या बाजुच्या भागातील आर.सी.सी. बांधकामावर आयुक्त साहेबांनी आकारलेल्या दरानुसार प्रती वर्षास किती कर आकारला जाईल. व यांच्या प्रस्तावानुसार किती कर आकारला जाईल? एक मिनिटाची आकडेमोड आहे. जर आपण करत नसाल तर मी आकडेमोड करून सांगतो.

श्री. हरेश इदनानी (मुख्य लेखा अधिकारी):—मी सांगतो असे नाही सांगणार नाही. कृपया आपण मला तो अ,क,ड च्या दरांची सूची दया. हे जे दर आहेत ते अ,क, ड या विभागातील आतील बाजुच्या जे जवळचे भाग आहेत त्यांचे आहेत. किती जागेच्या कराची रक्कम आपणांस सांगायची आहे? १०० चौ. मीटरची? १०० चौ. मीटरचे चौ. फुटामध्ये रूपांतर केले तर १०.७६ने गुणायचे झाले तर त्याचे एकुण १०७६ फुट होतात. त्याचा जो दर आहे तो १ रू. १२ पैसे हा एक महिन्याचा आहे. १२ महिन्याचे वार्षिक भाडे होते १४,४६१/— त्यातुन १० टक्के सुट वजा केली असता १३,०१५/— करयोग्य मुल्य होते. यावर महानगरपालिकेचे जे कर आहेत ते मागील ४१. ५ टक्के दराने ५,४०१/— रू. कर लागेल. याच्या जवळपासचा कर लागेल.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—याच्या जवळपास म्हणजे?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—प्रत्यक्षात आपण कर वाढवत आहात आणि लोकांना मात्र सांगत आहात की आम्ही कर कमी करत आहोत. लोकांची दिशाभुल केली जात आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—एक सांगितले दुसरे सांगा. जरा स्पष्टपणे सांगा.

श्री. हरेश इदनानी (मुख्य लेखा अधिकारी):—ही जी आकडेमोड केली त्यानुसार हा दर १२.०५ असा आहे.

मा.सदस्या श्रीमती मोना वनवारी, श्रीमती मीना सोंडे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—याचाच अर्थ, आयुक्त साहेबांचा जो प्रस्ताव आहे व यांचा जो प्रस्ताव आहे यांनी चौ.फुटाचे चौ. मीटरमध्ये रूपांतर करून प्रस्ताव ठेवला आहे. आणखी काही बदल नाही. लोकांना सांगत आहेत आम्ही कर कमी करत आहोत. खरे आहे की नाही?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—७५ टक्के कर कमी केला आहे.

मा. सदस्य श्री. मोकल चंदाराम यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—७५टक्के कर कुणाचा कमी केला आहे? सावकार लोकांचा ७५ टक्के कर कमी केला आहे. गरीब लोकांचा कर कमी केला नाहीत. आपण सांगु शकता अ,क,ड या विभागात कोण येते व ब विभागात कोण येते? फक्त श्रीमंत लोकांचाच बचाव केला आहे. अ.क,ड या विभागात जेवढे काही गरीब लोक येतात त्यांना दर चौ. फुटाचे दर चौरस मीटर मध्ये रूपांतर करून सर्वांवर एकसारखाच कर आकारला आहे.व आपण लोकांना सांगत आहात की आम्ही कर कमी करत आहोत. आपण जमिनीवर बसुन शहरास काय दाखवु इच्छित आहात की आम्ही कर कमी करण्याच्या बाजुने आहोत. जमिनीवर बसु शकतो, आम्ही शहराच्या बाजुने आहोत. दर चौ. फुटाचे, दर चौ. मीटरमध्ये रूपांतर न करता आपण प्रत्यक्षात कर कमी करा. अशाप्रकारचा देखावा करू नका.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—सचिव साहेब मतदान घ्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आणखी काही अडचण असेल तर दुरूस्ती करू. श्री. जमनुजी यांनी काही सुधारणा सूचविली तर ती करण्यासाठी दुसरी सभा आयोजित करू.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—माझी काही सूचना नाही. पुर्वीचे जे कराचे दर आहेत तेच ठेवा.

मा. सदस्य श्री. मनोज साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—आपला जो प्रस्ताव होता तो श्री. हरेश इदनानी यांनी स्पष्ट केला आहे. आता यावर कुणाची काही शंका नाही. इदनानी साहेबांनी बरोबर स्पष्टीकरण केले आहे. त्याबद्दल इदनानी साहेबांचे अभिनंदन.

मा. सचिव:—जे सन्माननिय सदस्य सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावाच्या बाजुने व विरोधी पक्षाने दिलेल्या प्रतिप्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावाच्या बाजुने :—३२ मते

१. श्रीमती रामचंदानी भावना
२. श्री. लिंगे सुर्यकांत

३. श्री. मुलचंदानी महेंद्र
४. श्री. ऐडके गणपत
५. श्रीमती. शर्मा कमला
६. श्री. वलेचा पृथ्वी
७. श्री. रोहडा श्यामसुंदर
८. श्री. गुप्ता प्रभुनाथ
९. श्रीमती गुप्ता अनिता
१०. श्री. पवार नाना
११. श्रीमती आहुजा निता
१२. श्री. राजु जग्यासी
१३. श्रीमती मंसद माया
१४. श्री. गायकवाड सुरेश
१५. श्री. वनवारी किशोर नारायणदास
१६. श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१७. श्री. लुंड गोविंदराम
१८. श्रीमती खिलनानी भावना
१९. श्रीमती कारीरा रेखा
२०. श्री. पमनानी ईश्वर
२१. श्री. पंजाबी नारायण
२२. श्रीमती पंजाबी दिपा
२३ श्री. लबाना होशियारसिंग
२४. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
२५. श्री. तलरेजा विनोद
२६. श्रीमती नाथानी नीना
२७. श्रीमती. दासानी मिनु
२८. श्री. म्हस्के अंकुश निव्त्ती
२९. श्री. लालबिहारी यादव
३०. श्री. टाले प्रमोद
३१. श्री. चंदाराम मोकल
३२. श्रीमती करोतिया मालती

<u>मा. सचिव:—</u>व जे सन्माननिय सदस्य विरोधी पक्षांनी दिलेल्या प्रतिप्रस्तावाच्या बाजुने आहेत व सत्ताधारी पक्षाने दिलेल्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रति प्रस्तावाच्या बाजुने व सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावाच्या विरोधात:—१५ मते</u>

१. श्रीमती. जावळे संगिता
२. श्रीमती मोकल सिमा
३. श्री. उमाप रामदास
४. श्री. पुरस्वानी जमनादास
५. श्री. रूपचंदानी बच्चाराम
६. श्रीमती. कृष्णानी रेखा
७. श्री. राजेंद्रसिहं भुल्लर
८. श्री. सोनावणे नथु
९. श्री. गायकवाड दिलीप
१०. श्रीमती खांडेकर प्रेमा
११. श्रीमती माने किरण
१२. श्री. चव्हाण रमेश
१३. श्री. धनंजय बोडारे

१४. श्री. पाटील विश्वनाथ
१५. श्रीमती. ससाणे लक्ष्मी

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>विरोधी पक्षीय सदस्यांचा प्रतीप्रस्ताव बहुमताने नाकरण्यांत येत आहे व सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांचा प्रस्ताव बहुमताने समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :—</u> उल्हासनगर शहरातील मालमत्ता कराचे आकारणीसाठी पात्र असलेल्या इमारतीचे व जमिनीचे करयोग्य मुल्य संबधातील महासभा ठराव शासनाने विखंडीत केल्याबाबत.

**प्रस्तावक:— श्री. लाल पंजाबी.**
**अनुमोदक:— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर.**

## <u>''प्रस्ताविक''</u>

शिवसेना भाजपा युतीचे वतीने प्रस्ताव देण्यात येतो की, महासभा ठराव क्र. ४ दि. १९/५/२००४ शासनाने विखंडीत केला असून त्या संबधात योग्य तो निर्णय घेणेबाबत विशेष महासभेसमोर विषय ठेवण्यात आलेला असून खाजगी मालमत्तांपैकी ज्या मालमत्तामध्ये बदल करून नव्याने बांधण्यात आलेल्या आहेत किंवा मालमत्तेचा वापर क्षेत्र बांधकाम प्रकार यात बदल झाला अशा मिळकतीवर कर आकारणी सन २००३—२००४ पासून सूधारीत दर लागु केले होते. परंतु सदरचा दर रद्द करून सन १९९६—९७ या सरकारी वर्षात लागू असलेले कर योग्य मुल्यांकाचे दर लागु करणेसाठी महासभा ठराव क्र. ४ दि. १९/५/२००४ पारील करण्यात आला होता. सदर ठराव शासनाने विखंडीत केल्याने महानगरपालिकेतर्फे शासनाकडे अपील करण्यात आले पाहिजे तसेच मा. कोर्टात कर मूल्यांकनाविरूध्द ज्या याचिका दाखल केल्या आहेत. अश्या याचिका कर्त्यांना पाठिंबा जाहिर केला पाहिजे.

<u>विशेष महासभा ठराव क्र: ८ अ</u> <u>दिनांक:—२८/०४/२००५.</u> सन २००३—२००४ पासून ज्या खाजगी मालमत्तामध्ये बदल करून नव्याने बांधण्यात आल्या किंवा मालमत्तेचे क्षेत्र वापर बांधकाम प्रकार यात बदल झाला अश्या मिळकतीवर सुधारीत दर लागु केले आहेत परंतु सदरचा दर रद्द करून सन १९९६—१९९७ या सरकारी वर्षात लागु असलेले कर योग्य मुल्यांकाचे दर लागु करणेसाठी महासभा ठराव क्र. ४ दि. १९.५.२००४ पारीत करण्यात आला. सदर ठराव शासनाने विखंडीत केल्याने महापालिकेतर्फे शासनास अपील करण्यात यावे. व करमूल्यांकना विरूध्द न्यायालयात याचिका दाखल केलेल्या याचिकाकर्त्यांना पाठिंबा जाहिर करून सन १९९६—९७ या सरकारी वर्षातील लागू असलेले कर योग्य मुल्यांकनाचे दर लागु करणेत यावेत. व सन १९९६—९७ सालचे (पुर्वीचे) दर कायम ठेवण्यात यावे.

<u>बहुमताने</u>

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**विषय क्र. २:—** उल्हासनगर शहरातील मालमत्ता कराचे आकारणीसाठी पात्र असलेल्या इमारतींचे व जमिनींचे आयुक्तांनी ठरविलेले करयोग्य मुल्य संबधातील महासभा ठराव क्र. ४, दिनांक १९/५/२००४ शासनाने विखंडीत केला असुन त्या संबधात योग्य तो निर्णय घेणे.

प्रस्तावक:— श्री. किशोर वनवारी

अनुमोदक:— श्री. होशियारसिंग लबाना

## ‘‘प्रस्ताविक’’

सन १९४९ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर झालेल्या फाळणीमुळे सिंधप्रांतामधुन फार मोठया प्रमाणावर निर्वासित भारतामध्ये आले. महाराष्ट्र राज्यामध्ये त्यांच्यासाठी पुण्याजवळील पिंपरी व मुंबई जवळील उल्हासनगर हया प्रमुख ठिकाणी छावण्या उघडण्यात आल्या. दुसरे महायुध्द संपल्यानंतर उल्हासनगर येथे लष्करी सैनिकांसाठी बांधलेल्या बॅरेक्स निरूपयोगी व रिकाम्या झाल्या होत्या. त्यामुळे शासनाने निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी त्यांचा उपयोग करण्याचे ठरविले. एप्रिल, १९४८ च्या सुमारास या सर्व संक्रमण छावण्या भारत सरकारच्या सहाय्य आणि पुर्नवसन मंत्रालयाच्या (रिलीफ ॲड रिहॅबिलीटेशन मिनिस्ट्री) ताब्यामध्ये मुंबईमध्ये येणा—या निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी सुपूर्द करण्यात आल्या. या निर्वासितांना या ठिकाणी नुसताच आश्रय दिला नाही तर त्यांना घरगुती उपयोगाचे सामान, कामधंदा अशा प्रकारची मदतही देऊ केली. त्यावेळी अंदाजे ९४,४०० निर्वासितांनी या संक्रमण छावणीमध्ये आश्रय घेतला होता. कालांतराने या निर्वासितांनी त्याचे स्वत:चे कामधंदे सुरू केले आणि हळूहळ त्यांचे पुनर्वसन होऊन उल्हासनरमध्ये नव्याने आर्थिक आणि सांस्कृतिक समाजाची उभारणी झाली. गेल्या ४ दशकांमध्ये उल्हासनगर शहराची फार मोठया प्रमाणात वाढ होऊन आता ते शहर म्हणजे उद्योगधंद्याचे या प्रदेशातील प्रमुख केंद्र बनले आहे. उल्हासनगरमधील घर मिळकतींना सन १९८६ ते सन १९९७ पर्यंत खालीलप्रमाणे कर मुल्य निश्चिती करून घरपट्टी कराची आकारणी पालिकेतर्फे करण्यात येत होती.

दर प्रति चौ. फुट प्रति माह

| TYPE OF STRUCTURE | Ulhasnagar Municipal Corporation | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1986-87 (Any Where) | | 1991-92 (Any Where) | | 1996-97 (Any Where) | |
| | Res. | Com. | Res. | Com. | Res. | Com. |
| R.C.C. | 0. 20 | 0. 30 | 0.45 | 0.68 | 0.89 | 1.34 |
| G.Tier | 0.12 | 0.18 | 0.27 | 0.41 | 0.70 | 1.05 |
| AC.Bricks | 0.09 | 0.14 | 0.24 | 0.36 | 0.54 | 0.81 |
| Wooden | 0.07 | 0.11 | 0.15 | 0.23 | 0.19 | 0.29 |
| Mud | 0.05 | 0.08 | 0.09 | 0.14 | 0.19 | 0.29 |
| Open | 0.005 0.0075 | | 0.02 | 0.10 | 0. 09 | 0.23 |
| Ind. Open | 0.00 | 0. 030 | 0.00 | 0.10 | 0.00 | 0.23 |

सन २००३—२००४ या वर्षापासून आयुक्तांनी आपल्या अधिकारात नविन मिळकतीवर खालील प्रमाणे कर मूल्य निश्चिती करून कर आकारणी केलेली आहे.

दर प्रति चौ. फुट प्रति माह

| TYPE OF STRUCTURE | Ulhasnagar Municipal Corporation | |
|---|---|---|
| | 2003-04 (A,C,D Zone) | 2003-04 (B Zone) |

| | (Outer Area) | | (Inner Area) | | (Outer Area) | | (Inner Area) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Res. | Com. | Res. | Com. | Res. | Com. | Res. | Com. |
| R.C.C. | 1.12 | 1.67 | 1.39 | 2.09 | 1.68 | 2.51 | 1.86 | 2.79 |
| G.Tier | 0.93 | 1.39 | 1.12 | 1.67 | 1.12 | 1.67 | 1.67 | 2.51 |
| AC.Bricks | 0.75 | 1.12 | 0.84 | 1.26 | 0.84 | 1.26 | 1.12 | 1.67 |
| Wooden | 0.28 | 0.42 | 0.37 | 0.56 | 0.37 | 0.56 | 0.47 | 0.70 |
| Mud | 0.28 | 0.42 | 0.37 | 0.56 | 0.37 | 0.56 | 0.47 | 0.70 |
| Open | 0.75 | 0.74 | 0.74 | 0.74 | 1.42 | 1.42 | 1.42 | 1.42 |
| Ind. Open | -- | 0.74 | -- | 0.74 | -- | 1.42 | -- | 1.42 |

सन २००३—२००४ करिता आयुक्तांचे आदेशा अन्वये अधिकतम अधिक दराने कर योग्य मुल्य निर्धारित केलेले आहे व त्यावर आधारलेल्या कर आकरणीची रक्कम वाढुन गेलेली आहे. सन २००३—२००४ च्या सरकारी वर्षात आकारणी पुस्तकात सुधारण्याकरिता आयुक्तांनी अधिकतम अधिक कर योग्य मुल्य ठरविले आहे. त्यामुळे शहरातील लोक नाराज होऊन ओरड करित होते व दु:खी होऊन प्रत्येक नगरसेवकाकडे कर योग्य मुल्याचे विरोधात अभिवेदन देत होते.

आयुक्तांनी ठरविलेल्या कर योग्य मुल्य निर्धारणाविरूध्द ब—याचशा तक्रारी येत होत्या व लोकांवर अधिक आर्थिक बोजा पडलेला आहे. आयुक्तांनी ठरविलेले कर योग्य मूल्य खालील कारणांमुळे अयोग्य आहे.

१. रहिवास परीमंडळातील जमिनीचे व इमारतीचे कर योग्य मुल्य वाणीज्य वापर क्षेत्राशी सुसंगत करण्यात आलेले आहे. कारण सदर मालमत्ता वाणीज्य बाजारामागे आहेत.

२. कर योग्य मुल्य निर्धारणासाठी परिमंडळ अयोग्य प्रमाणे ठरविण्यात आले आहे.

३. मुल्यनिर्धारणा विरूध्द तक्रारी करणा—यास त्याच्या तक्रारीची चौकशी न करता व सुनावणी योग्य प्रकारे न देता प्रभाग निहाय कर आकारणी पुस्तक प्रमाणात करण्यात आले आहे.

४. शहरातील स्थानिक परिस्थिती, धंदे, व्यवसाय, प्रकार धरून उत्पन्नाची मर्यादा व करदात्याची क्षमता विचारात न घेता प्रशासनातर्फे कर योग्य मुल्यांकन दर सूची तयार करण्यात आली.

५. कर योग्य मुल्यांकन दर सुची महापालिकेच्या पुर्व मंजुरी विना लागु करण्यात आली आहे.

६. काही इमारती सन १९९६—९७ पुर्वी तयार असून कर आकरणीस पात्र असुन त्या संबंधी प्रशासनातर्फे कर आकारणी पुस्तकात नोंद दाखल केलेली नसून त्या इमारतीचे नोंद सन २००३—२००४ चे आकारणी पुस्तकात नोंद दाखल करण्याकरिता २००३—२००४ ची मुल्यांकन दर सुची प्रमाणे कर योग्य मुल्याची व त्यावर आधारलेल्या कर आकरणीचीच रक्कम करदात्यावर वाढविण्यात आली आहे.

वरील परिस्थिती पाहता सन २००३ —२००४ पासून शहरातील कर आकारणी पात्र असलेल्या इमारती व जमिनीस नविन कर योग्य मुल्याकन दर सूची लागु करण्यात आल्यामुळे तसेच करमुल्य निर्धारण करताना आयुक्तांनी आतील एरीया व बाहेरील एरीया असाही भेदभाव केल्याने नागरिकांत नाराजगी निर्माण होऊन करदाता मालमत्ताकर देण्यास अडचणीचे दर्शवित असल्याचे निदर्शनात आल्याने उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन्माननिय नगरसेवकांनी दि. १९.५.२००४ रोजीच्या महासभेमध्ये आयुक्तांच्या वर नमुद वाढीव दराने कर मुल्य आकारणी विरूध्द खालील प्रमाणे ठराव एक मताने संमत केला.

“ महासभा ठराव क्र. ४ दिनांक:—१९/५/२००४.

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता सन १९९६—९७ या सरकारी वर्षात लागु असलेल्या करयोग्य मुल्यांकनाची दरसुची लागु करणे मान्य करीत आहे व सन २००३—२००४ या सरकारी वर्षात प्रशासनातर्फे लागु करण्यात आलेल्या नविन करयोग्य मुल्यांकनाची दरसूची रद्दबादल करीत आहे. व त्या परिणामात सन २००३—२००४ च्या आकारणी पुस्तकातील नोंदी बाबत संबंधित व्यक्तीने अभिवेदन केल्यावर घरपट्टी रक्कम भरल्या दिनांका पासुन सहा महिन्याच्या आत परताव्याची देय रक्कम अदा करणेस प्रशासनास निर्देशित करीत आहे. ”

तरीही महापालिकेच्या उत्पन्नाची बाजू विचारात घेता तसेच या शहराचे क्षेत्रफळ १३ चौ. कि. मी लक्षात घेता आयुक्तांनी सुचविलेल्या प्रमाणे प्रभाग निहाय वर्गिकरण किंवा अंतर्गत किंवा बाहय असे भेदाभेद रूप विभागीकरण न करता समान तत्वावर खाली सुचविल्याप्रमाणे काही प्रमाणात करमुल्य वृध्दी होण्यास हरकत नाही.

प्रति चौ. मीटर प्रति माह

| Type of Structure | 1996-1997 | | Type of Structure | 2003-2004 | |
|---|---|---|---|---|---|
| | Res. | Comm. | | Res. | Comm. |
| R.C.C. | 9.59 | 14.38 | R.C.C. | 12 | 18 |
| G.Tier | 7.50 | 11.25 | G.Tier | 9.50 | 14.25 |
| AC.Bricks | 5.83 | 8.75 | AC.Bricks | 7.30 | 10.95 |
| Wooden | 2.08 | 3.12 | Wooden | 2.60 | 3.90 |
| Mud | 2.08 | 3.12 | Mud | 2.60 | 3.90 |
| Open | 1.00 | 2.50 | Open | 1.25 | 3.13 |
| Ind. Open | -- | 2.50 | Ind. Open | -- | 3.13 |

आयुक्तांनी उल्हासनगर महानगरपालिकेची नविन मालमत्ताच्या कर मुल्य निश्चितीद्वारे केलेल्या करनिर्धारणा विरूध्द उल्हासनगर महानगरपालिकेने वर नमुद प्रमाणे दि. १९/५/२००४ च्या महासभेमध्ये वरील प्रमाणे ठराव क्रमांक ४ मंजुर करून सन २००३–२००४ या सरकारी वर्षात प्रशासनातर्फे लागु करण्यात आलेल्या नविन करयोग्य मुल्यांकनाची दरसूची रद्दबादल ठरविली त्याविरूध्द आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी मा. प्रधान सचिव, नगरविकास, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे जा. क्र. उमपा/करवि/१२८०/२००४, दि. ७/१२/२००४ नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ प्रमाणे सदर महासभा दि. १९/५/२००४ ठराव क्र. ४ विखंडीत करणेकरीता प्रस्ताव सादर केला. शासनाच्या नगरविकास खात्याने त्यांच्या पत्र क्र. उमपा–२३२४/९४१९/प्र.क्र. १४९०४ नवि–२१, दि. १६/२/२००५ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेने पारित केलेला दि. १९/५/२००४ चा ठराव क्र. ४ शासनाकडुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५१ अन्वये विखंडीत केल्याचे कळविण्यात आले आहे. येणेप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेने आयुक्तांनी केलेल्या नविन करयोग्य मुल्यांकनाची दर सूची रद्दबादल करण्याचा ठराव क्र. ४ दि. १९/५/२००४ हा ठराव शासनाकडून विखंडीत करण्यात आलेला आहे. ज्याची झळ शहरातील नागरिकांना बसून शहरातील नागरिकांत असंतोषाचे वातावरण पसरत असून त्यामुळे शांततेचा भंग होण्याचा संभव आहे. नागरिक लोकप्रतिनिधींकडे या बद्दल जाब विचारत आहेत. सबब शासनाने सदरचे ठराव महानगरपालिकेस त्यांची बाजू मांडण्याची संधी न देता विखंडीत करण्यामागची शासनाची भुमिका जाणुन घेणे तसेच शासनाने विखंडीत केलेले ठराव संमत करण्यामागील महानगरपालिकेची भुमिका शासनाकडे मांडणे व जनतेची बाजु शासनापर्यंत पोहचवणे या कामी चर्चा करून आवश्यक ते निर्णय घेणेसाठी सदरची विशेष सर्वसाधारण सभा बोलविणे क्रमप्राप्त झाले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम ४५१ चे तरतुदीनुसार कोणत्याही ठरावा विरूध्द शासनास कारवाई करायची असेल तर शासन लेखी आदेशाद्वारे अशा ठरावाचे कार्यान्वयन त्यामध्ये ते विनिर्दिष्ट करील अशा मुदतीसाठी निलंबित करता येईल किंवा अशी कृती करण्यास मनाई करता येईल. अशा आदेशाची एक प्रत शासनाने महानगरपालिकेस व आयुक्तांस पाठविली पाहिजे. उपरोक्त प्रमाणे आदेशाची प्रत मिळाल्यावर महानगरपालिकेस किंवा आयुक्तांस उक्त आदेशाविरूध्द राज्य शासनाकडे अभिवेदन करता येईल. असे अभिवेदन ३० दिवसांच्या मुदतीत मिळाले नसेल तर किंवा मिळालेले कोणतेही अभिवेदन विचारात घेतल्यानंतर शासनास तयांनी दिलेला आदेश एक तर रद्द करता येईल, त्यात फेरबदल

करता येईल किंवा तो कायम करता येईल किंवा सर्व परिस्थिती विचारात घेवुन जी न्याय किंवा इष्ट असेल अशी इतर कारवाई करता येईल.

वरीलप्रमाणे कायदेशीर तरतुद पाहता शासनाने आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांचा उपरोक्त प्रस्ताव ठराव विखंडनासाठी प्राप्त झाल्यानंतर प्रथम सदर ठराव निलंबित करण्याची कारवाई करून त्याची एक प्रत महानगरपालिकेसही पाठवावयास हवी होती व या महानगरपालिकेस त्यांची बाजु मांडण्याकरिता अभिवेदन सादर करण्याची संधी द्यावयास हवी होती व त्यानंतरच ठराव विखंडीत करण्याची कारवाई करावयास हवी होती. परंतु हा ठराव विखंडीत करताना प्रथम निलंबनाची नंतर अभिवेदन विचारात घेण्याची अशी कोणतीही कारवाई केली गेली नाही व परस्पर ठराव विखंडीत करण्यात आलेला आहे. परिणामी महानगरपालिकेचा बाजू मांडण्याचा हक्क डावलला गेलेला आहे. सबब या प्रकरणी कायद्याच्या तरतुदीचे पालन झालेले नाही त्यामुळे महानगरपालिकेची बाजु शासनाच्या समोर मांडणे तसेच असे ठराव संमत करण्यामागील भुमिका शासनासमोर मांडणे करीता या प्रकरणी कलम ४५१ चे पोट कलम २ अन्वये अभिवेदन सादर करणे आवश्यक बनलेले आहे. सबब या प्रकरणी आवश्यक ते निर्णय घेण्यासाठी व आवश्यक त्या मंजुरीसाठी सदर प्रस्ताव महासभेच्या पटलावर ठेवण्यात येत आहे.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ९ <u>दिनांक:—२८/०४/२००५.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता खालील प्रमाणे ठराव मंजुर करित आहे.

१. शासनाने विखंडीत केलेल्या महासभा ठराव क्र. ४ दि. १९.५.२००४ विखंडीत करण्याच्या शासनाच्या निर्णयासंबंधाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम ४५१ पोट कलम २ अन्वये अभिवेदन शासनास सादर करून आपली व जनतेची बाजु ऐकुन घेण्याची विनंती शासनास करून व त्यानंतरच शासनाने या प्रकरणी अंतिम निर्णय घ्यावा अशीही विनंती शासनास करण्यात यावी.

२. वरीलप्रमाणे कारवाई पुर्ण होई पर्यंत व शासनाने अभिवेदन प्रस्ताव स्विकारून ठराव विखंडीत करण्याचा निर्णय रद्द केल्यास दरम्यानच्या काळात या ठराव विखंडणामुळे वसुल करण्यात आलेली रक्कम अशा वसुलीधारकास पुढील आर्थिक वर्षामध्ये वळती करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सन २००३—२००४ या सरकारी वर्षा पासून प्रशासनातर्फे लागु करण्यात आलेल्या नविन कर योग्य मुल्यांकनाची दर सुची रद्द करण्याचा निर्णय घेतला असला तरीही वर प्रस्तावनेत नमुद प्रमाणे करमुल्य वृध्दीस या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

<u>बहुमताने</u>

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u> कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५.२० वाजता मा. पीठासीन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२० मे, २००५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/५/२००५ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा बुधवार दिनांक २०.०५.२००५ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ३६. | श्री. बच्चाराम रुपचंदानी |
| ४. | श्री. टेकचंदानी राजु | ३७. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर, |
| ५. | श्रीमती रामचंदानी भावना | ३८ | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ६. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३९ | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ७. | श्री. वाघे शामु बाबु | ४० | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्रीमती मोकल सीमा | ४१ | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्री. दिलीप गायकवाड | ४२. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १०. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४३. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | श्री. एडके गणपत गोविंद | ४४. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १२. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १३ | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १४. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४७ | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १५. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४८. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १६. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४९. | श्रीमती पंजाबी दिपा |
| १७. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५०. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १८. | श्रीमती अनिता गुप्ता | ५१. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| १९. | श्री. पवार नाना | ५२. | श्रीमती भटिजा कोमल |
| २०. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५३. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २१. | श्री. जग्यासी राजु | ५४. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २२. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५५. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २३. | श्री. निकम शांताराम | ५६. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २४. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५७. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २५. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५८. | श्री. संजय रामचंद्र बठीजा, |
| २६. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २७. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६०. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २८. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६१. | श्रीमती करोतिया मालती |
| २९. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६२. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३०. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६३. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३१. | श्री. साधवानी मोहन | ६४. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३२. | श्रीमती जया साधवानी | ६५. | श्री. हरदास माखिजा |
| ३३. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ६६. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३४. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६७. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |
| ३५. | श्रीमती भावना खिलनानी | | |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्रीमती. संगिता रमेश जावळे, २. श्री. सोनवणे नथु काशिराम, ३. श्री. महेंद्र मुलचंदानी, ४.श्री. उमाप रामदास राघोजी, ५. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण, ६. श्री. चव्हाण रमेश महादेव, ७. श्री.जाधव

प्रशांत जगन्नाथ, ८. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, ९. श्री. जयसिंघानी अनिल, १०. श्रीमती किरण लखी माखिजा, ११. श्री.भालेराव गौतम यशवंत, १२. श्री. सुरेश जाधव, १३. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, १४. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सांयकाळी ४.०० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. आयुक्त श्री. आर. के. सोनवणे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री. उत्तम लोणारे, उपायुक्त (मुख्यालय) हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.

**मा. सचिव :—** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १** :—उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामांविरुध्द कारवाई वर विचार करणे व त्यांचे परिणामाबाबत दिशा ठरविणे.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**मा. महापौर, मा. उप—महापौर व आयुक्त साहेब आपले सचिव साहेब जे विधी अधिकारी सुध्दा आहेत, आम्ही त्यांना विचारु इच्छितो की, या विषयाबाबत मुंबई उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना आपण त्यावर चर्चा करु शकतो का? सांगा ना, आपण विधी अधिकारी आहात, हे जे लोक आहेत यांची दिशाभुल होता कामा नये. उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना त्यावर आपण चर्चा करु शकतो का? त्यावर निर्णय घेवू शकतो का? याबाबत सभागृहापुढे ठराव आणू शकतो का? याबाबत सभागृहाला समजावून सांगितले जावे.

**मा. सचिव :—** मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाबाबत या सभेत कोणतेही भाष्य करायचे नाही. येथे जो विषय आहे तो वेगळया प्रकारचा विषय आहे. विषय असा आहे की, अनाधिकृत बांधकामां विरुध्द कारवाई करण्याबाबत विचार करुन त्याचे परिणाम काय होतील? त्याची दिशा देण्यासाठी, परिणाम काय होतील? त्यांना दिशा देण्यासाठी............

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश आहे, त्या विरुध्द आपण येथे ठराव आणु शकतो का? याबाबत जरा आम्हांला सांगा.

**मा. सचिव :—** मी काय सांगितले, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाबाबत आपणांस कोणत्याही प्रकारचे भाष्य करायचे नाही. असे काही बोलायचे नाही की, ज्यामुळे विपरित परिणाम होतील. आपण जेव्हा भाष्य कराल तेव्हा ते विचारपुर्वक करायचे आहे, जेणेकरुन मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही. व याबाबत आपली दिशा व दशा काय आहे हे अदयाप मला समजले नाही. याबाबतची दिशा व दशा आपणांस ठरवायची आहे.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** असे ऐकण्यात आले आहे की, एक ठराव तयार होऊन येणार आहे. तर अशा प्रकारचा ठराव महासभेत आणु शकतो का?

**मा. सचिव :—** मी काय म्हटले की, असे कोणतेही प्रतिकुल भाष्य करता येणार नाही.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** ठराव आल्यानंतर आपण आपले मत दया. तोपर्यंत जावु दया. ठराव आणल्यानंतर आम्ही विचारु त्यावर चर्चा होवू शकते काय?

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—** सचिव साहेब, एक सांगा दशा व दिशा आम्हांला ठरवायची आहे का? दशा व दिशा काय होईल ते तर उच्च न्यायालयाने दिले आहे ना? आम्ही लोक कोणती दशा व दिशा करु शकतो ते आम्हांला सांगा. आम्ही उच्च न्यायालयाला निर्देश देणार आहोत का की दशा व दिशा अशी नाही होणार अशी—अशी होईल.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :– सचिव साहेब, सभा सुचनेवर आपण जो विषय आणला आहे, त्याचा व उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा काही संबंध आहे का? जर संबंध नसेल तर सभा सुचनेवरील विषय बरोबर आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णयाशी या सभा सुचनेवरील विषयाचा काही संबंध आहे किंवा नाही हे सुध्दा आपण स्पष्ट करा.

मा. सचिव :– या सभा सुचनेवर कुठेही असा उल्लेख करण्यात आलेला नाही की मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर त्यावर आपण चर्चा करत आहोत. यामध्ये असे लिहिले आहे की, अनाधिकृत बांधकामांवर जी कारवाई होणार आहे, व त्याचा काय परिणाम होणार आहे, त्याबाबतीत विचार विनिमय करुन योग्य दिशा / मार्ग काढायचा आहे. आपण कोणता ठराव करणार आहात याचे मला अनुमान नाही. आपण काय निर्णय घेणार आहात हे सुध्दा मला माहित नाही. जेव्हा महासभेमध्ये एखादा विषय येतो, तेव्हा तो महासभेची संपत्ती होतो. त्या विषयास दिशा व दशा देणे हे आपले काम आहे. आपणां सर्वांनी मिळून निर्णय घ्यायचा आहे. आपण काय निर्णय घेणार आहात त्याचा येथे काहीही उल्लेख नाही.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :– सचिव साहेब, आपण हे स्पष्ट केले पाहिजे की, उच्च न्यायालयाचा ८५५ इमारतींबाबत जो निर्णय आला आहे, त्या विषयाचा व सभा सुचनेवरील विषयाचा काही संबंध आहे का?

मा. सचिव :– मी काय म्हटले की, विषय आपल्या समोर आहे व विषयामध्ये कुठेही मा. उच्च न्यायालयाचा उल्लेख नाही. आपल्या समोर जो विषय आला आहे, त्यावर निर्णय आपणांस घ्यायचा आहे. आपण तो कोणत्या दिशेत घेवून जात आहात व कोणत्या दशेमध्ये निर्णय देत आहात. हे आपणांस ठरवायचे आहे. आता तर या विषयावर काहीही चर्चा झालेली नाही. तर मी काय म्हणणार?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :– मुंबई उच्च न्यायालयाचा जो निर्णय आला आहे, त्याचा व या विषयाचा काहीही संबंध नाही?

मा. सचिव :– मी असे काहीही म्हटलेले नाही. आपल्या चर्चेनंतर यावर अंतिम निर्णय होईल.

मा. सदस्या श्रीमती निना नाथानी :–मा. महापौर, मला एका शब्दाचा अर्थ येथे स्पष्ट करुन घ्यायचा आहे. दी कंम्पलीट सिटी ऑफ देवनगरी, देवनगरी या शब्दाचा अर्थ काय आहे, तो जरा कृपया आपण स्पष्ट कराल? उच्च न्यायालयाने आपणाकडे जो आदेश पाठविला आहे, त्यामध्ये देवनगरी हा जो शब्द वापरला आहे, त्याचा अर्थ काय? तो जरा स्पष्ट करुन सांगितला जावा.

मा. सचिव :– आपणास हे वाचनासाठी कोठुन मिळाले? कुठे आहे हे?

मा. सदस्या श्रीमती निना नाथानी :–मी अर्थ विचारत आहे.

मा. सचिव :– माझ्या तर वाचण्यात आले नाही. दि कंम्पलीट सिटी ऑफ देवनगरी असे कुठे लिहिले आहे?
मा. उप–महापौर :– ज्यांना बोलायचे आहे त्यांनी कृपया मा. महापौरांची परवानगी घ्यावी, परवानगी न घेता उभे राहून बोलणे सुरु करता?

मा. सदस्या श्रीमती निना नाथानी:–मी म्हंटले ना, मा. महापौरजी..........

मा. उप–महापौर :– आपण परवानगी घेतलीत?

मा. सदस्या श्रीमती निना नाथानी :– मी म्हटंले, ठिक आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– महापौर महोदया, हे जे व्हिडीओ शुटींग केले जाते, ते थेट प्रेक्षेपण आहे की काय?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– सहारा न्युज चॅनेलचे पत्रकार आहेत. बातम्यांसाठी ते सभागृहाच्या कामकाजाचे चित्रीकरण करत आहेत.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** हे जे दोघे बसले आहेत ते दोघेही एकाच चॅनलचे आहेत काय?

**मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :—** मा. महापौरजी, उप–महापौरजी, या सभागृहात उपस्थित असलेले माझे सहकारी बंधु आणि भंगिनींनो, आज या सभागृहामध्ये सभा सुचनेवर जो विषय आला आहे, त्या विषयाच्या बाबतीत मी एक विशेष गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की, हा जो विषय आहे ''उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामांविरुध्द कारवाई वर विचार करणे व त्यांचे परिणामाबाबत दिशा ठरविणे.'' या विषयाबाबत खास करुन मी या सभागृहामध्ये उल्लेख करु इच्छितो. या विषयाबाबत या सभागृहात जी काही चर्चा होईल, जे सन्माननिय सदस्य त्या चर्चेत भाग घेतील, ती चर्चा जी आहे, ती विल बी साट ऑफ मर्सिपिटीशन टुअडर्स द गव्हर्मेंट ॲण्ड अदर ऑथरिटीज ऑफ द स्टेट. इन नो वे दीस हाउस इन्टेन्स टू कॉमेंटस् ऑन द जजमेंट ऑफ द हॉनरेबल हायकोर्ट वुई रिस्पेक्ट व्हेरीमच. हॉनरेबल लॉर्डस ऑफ द मुंबई हायकोर्ट ॲण्ड अवर डिस्कशन वील नेव्हर बी ए पार्ट ऑफ कमेन्ट ऑन द जज्मेंट. हे मी सभागृहाला स्पष्ट करुन सांगु इच्छितो. राहिला प्रश्न सभागृहात हा जो विषय आलेला आहे, याची अंमलबजावणी काय होईल? यापुढे शहरातील वातावरण कसे होईल? लोकांच्या प्रतिक्रिया काय होतील? शहरामध्ये किती नुकसान होणार आहे? किती लोक बेघर होवू शकतात? काय शहरामध्ये अशा कारवाई मुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो? या सर्व ज्या गोष्टी आहेत, त्यावर आम्ही सभागृहात चर्चा करु इच्छितो. मी अतिशय स्पष्ट केले आहे की, मुंबई उच्च न्यालयाच्या आदेशावर आम्ही कोणतीही टिप्पणी करणार नाही. ना आम्ही टिप्पणी करु इच्छित. ना आम्ही त्यासाठी सक्षम आहोत. ना आम्ही त्यामध्ये जावु इच्छित, मी माझी चर्चा पुढे सरकविण्या अगोदर मला असे वाटते की, सभागृहामध्ये आमचे जे सदस्य आहेत, जे बंधु व भगिनी आहेत, या महानगरपालिकेची जी नोकरशाही आहे, व शहरातील जी जनता आहे, किंवा शहरातील येणारी आमची जी पिढी आहे, त्यांना कमीत कमी हे माहित पडावे. या शहराचा इतिहास काय होता? हे शहर कसे तयार झाले? व आज हे शहर जर तुटण्याच्या मार्गावर आले आहे, तर त्याचे कारण काय आहे? मी सभागृहाला सांगु इच्छितो की, देशाच्या फाळणीनंतर १९४७ मध्ये जेव्हा हिंदुस्तान व पाकिस्तान असे एका देशाचे दोन देश निर्माण झाले, व पाकिस्तानच्या भागातील जी जमिन गेली, त्यावेळेस आमच्या देशाचे जे नेता गण होते, त्यावेळेस त्यांनी पंजाबला अर्धा पंजाब दिला. बंगालला अर्धा बंगाल दिला. परंतु त्यावेळेस जो सिंध प्रांत होता, व त्यामध्ये राहणारे जे हिंदु लोक होते, त्यांना सांगण्यात आले की, आपणांस काही जमिन मिळु शकणार नाही. आमच्या विषयी असा अन्याय का? जेव्हा पंजाबला अर्धा पंजाब दिला गेला, बंगालला अर्धा बंगाल दिला, तर कमीत कमी सिंधचेही दोन भाग करा, एक भाग हिंदुंना दया. व दुसरा भाग जो आहे, ज्यांच्यामुळे आमच्या देशाची फाळणी झाली, त्या धर्मीयांना दया. परंतु त्यावेळेस भारत सरकारमध्ये आमचे जे नेतागण होते महात्मा गांधीजी, पंडीत जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, आचार्य कृपलानी जे त्यावेळेस कॉंग्रेसचे अध्यक्ष होते, कॉंग्रेस पक्ष श्रेष्ठी व भारत सरकारने आचार्य कृपलानी यांना सिंध मध्ये पाठविले व सांगितले की, आपण जरा सिंधी बंधुंना समजावून सांगा. जर आपणाला सिंधचा काही भाग मिळु शकत नसेल तर फार मोठी काही गोष्ट नाही, पुर्ण हिंदुस्तान आपला आहे. हिंदुस्तानमध्ये जेथे–जेथे आपणांस हवे तेथे आपण बसु शकतात व या देशामध्ये नागरीक म्हणुन आपणांस सर्व सन्मान मिळेल. आपल्या अधिका–यांचे रक्षण होईल. त्यावेळेस या देशाला भारत, इंडिया असे नाव दिले होते. या देशामध्ये आपल्या अधिकारांचे रक्षण होईल. काही हिंदु, सिंधी देशाच्या फाळणीनंतर नेते मंडळीच्या आश्वासनानंतर आपली जमिन, मालमत्ता, मातृभुमी, जन्मभुमी सर्व काही सोडुन नेते मंडळींवरील विश्वासावर आपल्या धर्माच्या रक्षणासाठी देशाच्या रक्षणासाठी आम्ही भारत हा जो या अगोदर सुध्दा आमचा देश होता. जो आज सुध्दा आमचा देश आहे, त्याचा आम्ही स्विकार करु. व संपुर्ण देश आमचा आहे. व संपुर्ण देशामध्ये आम्हांस सन्मानाने वागविले जाईल. व सर्व सन्मान व समान अधिकार इतर भारत वासियांप्रमाणे आम्हांलाही मिळतील. या आशा–आकांक्षा घेवून सिंध मधील आमचे सर्व हिंदु ज्यामध्ये फक्त सिंधीच नव्हते, आमचे काही महाराष्ट्रीयन बंधु सुध्दा त्यात होते, जे सिंध मध्ये राहत होते, जे शासकिय सेवेमध्ये मोठ–मोठया उच्च पदांवर कार्यरत होते, शिख होते, पंजाबी होते, असे कितीतरी जाती धर्माचे लोक होते. लबाना शिख सुध्दा होते, ते सर्व या देशातील नेतेमंडळींच्या आश्वासनावर सिंध सोडुन येथे आले. कुण्या काळात १९३५–३६ च्या अगोदर सिंध हा मुंबई राज्याचा एक भाग होता. मुंबई प्रदेश होता, त्याचा एक भाग होता. मी आज सुध्दा जेव्हा ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात जातो, तेव्हा पाहतो की, १९३० मध्ये मिरचंदानी नावाचा कुणी जिल्हाधिकारी तेथे होता. याचाच अर्थ असा आहे की, सिंध हा १९३५–३६ मध्ये मुंबई राज्याचा एक भाग होता. प्रशासकिय कामकाजाच्या दृष्टीने १९३६ मध्ये ब्रिटीशांनी सिंधला मुंबई राज्यातुन वेगळे केले. त्यास विर सावरकर यांनी विरोध केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुध्दा विरोध केला होता. इंग्रजांचे राज्य होते, त्यामुळे कुणाचे काही चालले नाही. फाळणीनंतर कित्येक सिंधी वेगवेगळया राज्यांमध्ये गेले, काही लोक मध्य प्रदेशात गेले काही उत्तर प्रदेशात गेले, काही राजस्थानमध्ये गेले, काही तामिळनाडुत तर काही

कर्नाटकात गेले. काही आंध्र प्रदेशात गेले. परंतु काही सिंधी बांधवांचा समुह मुंबई विभागात आला. १९६० मध्ये ज्याने महाराष्ट्र राज्य म्हणुन रुप धारण केले. व महाराष्ट्राच्या मुंबईच्या जनतेने, आपल्या हिंदु बांधवांना प्रेमाने जवळ केले. त्यांच्या राहण्याची येथे व्यवस्था केली. हिंदुस्तानमध्ये त्यांच्या खाण्या पिण्याची व्यवस्था केली. व त्यावेळेस मुंबई व महाराष्ट्र राज्यातील, बंधु –भंगिनींनी या सिंधी , हिंदु बांधवांना जे सहाकार्य दिले, ती एक ऐतिहासिक बाब आहे. सिंधी समुदाय ही घटना कधी विसरु शकणार नाही. आज असे वाटत आहे की, जी स्थिती १९४७ मध्ये होती, तीच स्थिती पुन्हा तर तयार होत नाही? असे का होत आहे? ज्या लोकांना लष्करी छावणी मध्ये वसविले, जो भाग दुस–या जागतिक महायुध्दात कल्याण तालुक्याचा एक भाग होता. उल्हासनगर एक लष्करी छावणी होती. ९ खेडे गांवांच्या विभागास उल्हासनगर शहराचे नांव श्री. राज गोपालाचार्य यांनी ८ ऑगस्ट, १९४९ मध्ये दिले. त्या ९ खेडेगावांमध्ये ६० हजार सिंधी बांधवांना १३ किलोमिटरची जमिन दिली गेली. ज्यावेळी ती फक्त लष्करी छावणी होती. तेथे न रस्ते होते, ना पाण्याची व्यवस्था होती, ना लाईटची व्यवस्था होती, ना शौंचालयांची व्यवस्था होती, काहीही व्यवस्था नव्हती. एवढेच नव्हे तर दळण घेवुन लोकांना कल्याणला जावे लागत होते. अशी त्या लष्करी छावणीची स्थिती होती. त्या लष्करी छावणीला मागील ५८ वर्षामध्ये, या शहरामधील जी जनता आहे, जी त्यावेळेस येथे आली होती. त्यांनी एक–एक विट ठेवून हे शहर तयार करावयास सुरुवात केली. आपल्या रोजी–रोटीसाठी जे लोक आले होते, त्यांनी सरकारवर ओझे म्हणून राहणे मान्य केले नाही की ज्या सरकारने, ज्या लोकांनी आम्हांला सहकार्य केले, सहाय्य केले. आम्ही त्यांच्यावर ओझे म्हणुन राहु इच्छित नाही. लोकांनी लहान–लहान उदयोग सुरु केले. आपल्या खांदयावर ओझे घेवून, कपडे घेवून, बिस्कीटे, कंन्फेक्शनरी घेवून मुंबईस जात होते, लोकल ट्रेनमध्ये व्यवसाय करत होते. पैसे कमावुन आपल्या कुटुंबियांचे पालन–पोषण करत होते. परंतु ५८ वर्षानंतर आपल्या मेहनतीने, आपल्या घामाने, या शहरातील लोकांनी हे शहर निर्माण केले. एवढेच नाही तर या शहराला व्यापाराच्या क्षेत्रात एवढया उच्च स्थानात नेवुन ठेवले की, भारताच्या सर्व प्रदेशातील लोक उल्हासनगरमधील व्यापारी दृष्टीकोन पाहून उल्हासनगरकडे येवू लागले. एक अशी स्थिती निर्माण झाली, देशाच्या सर्व प्रदेशातील लोकांना असे वाटु लागले की, आपणाला जर रोजगार मिळणार असेल, नोंकरी मिळणार असेल, व्यापार चालणार असेल, व त्याच बरोबर जर घरही मिळणार असेल तर ते मुंबईच्या बाजूला असलेल्या उल्हासनगरमध्येच मिळेल. जे शहर मुंबई पासुन ६० किलो मिटर अंतरावर आहे, व प्रत्यक्षात असेच झाले. आज उल्हासनगर मध्ये संपुर्ण देशभरातील लोक येथे येवून राहतात, हे शहर केवळ सिंधी बांधवांचेच राहिले नसुन ते सर्व भाषिकांचे शहर झाले आहे, देशाच्या सर्व भागातील लोक येथे राहतात, धंदा, व्यापार, व्यवसाय करतात आणि त्यांचे कुंटुंब चालवितात. आज दुस–या प्रदेशांमधुन जे लोक आले आहेत, जे येथे राहत आहेत, त्यांना येथे सुध्दा घर आहे, व त्यांच्या प्रदेशात सुध्दा घर आहे. येथे सुध्दा सदनिका असेल, दुकान असेल, मध्य प्रदेशामध्ये राजस्थानमध्ये, उत्तर प्रदेशमध्ये, तमिळनाडु, केरळामध्ये, कुठेतरी स्वत:ची जमिन असेल, बंगला असेल, शेत जमिन असेल, ५–५० एकर जमिन असेल, ५०० एकर जमिन असेल, असे लोक आज उल्हासनगरमध्ये राहत आहेत. उल्हासनगर हे एक छोटे हिंदुस्तान झाले आहे. ही आमच्यासाठी व संपुर्ण महाराष्ट्र राज्यासाठी सौभाग्याची गोष्ट आहे. या शहराने असे एक स्थान निर्माण केले आहे. ज्या शहरामध्ये विविध प्रदेशातील लोक राहतात व सुखाने व शांतीने राहतात. मागील ५८ वर्षामध्ये या शहरामध्ये कधीही जातीय दंगली झाल्या नाहीत. आज संपुर्ण देशाची स्थिती पाहीली तर आपणांस कित्येक ठिकाणी शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचा दिसेल. जातीय दंगली झाल्याचे दिसेल. ५८ वर्षाचा उल्हासनगर शहराचा इतिहास जर पाहिला तर कुठेही जातीय दंगीचा लवलेश या शहरामध्ये दिसुन येणार नाही. जेवढे काही लोक येथे राहतात मग ते कोणत्याही जाती–धर्माचे असोत शांतीने राहतात. व आपला परिवार चालविण्यासाठी या शहराची राजनिती चालविण्यासाठी, प्रत्येक क्षेत्रात त्यांची भागीदारी आहे. असे शहर ज्यास छोटे हिंदुस्तान म्हटले जाते. आज–उदया या शहराची स्थिती काय होणार आहे हे कुणालाही माहित नाही. कुणाला माहित नाही. शहरामध्ये अशा चर्चा चालु आहेत की, ८५५ ज्या इमारती तुटतील, कमीत कमी या शहरातील लोक बेघर होतील. एवढेच नाही तर काही कायदेतज्ञ जे आहेत, त्यांचे हे मानने आहे की, शहरातील प्रत्येक अनाधिकृत बांधकामाची महापालिकेकडुन ओळख पटवुन त्याच्यावर कारवाई केली जाईल. जर अशा प्रकारची कारवाई झाली तर मला असे वाटते, जवळ–जवळ ९० टक्के शहर निष्कासीत होईल. जवळ–जवळ ९० ते ९५ टक्के बांधकामे ही शासकिय किंवा खाजगी जमिनिवर, महापालिकेच्या जमिनीवर आहेत. ही सर्व बांधकामे अनाधिकृत आहेत. यामुळे संपुर्ण शहर उध्दवस्त होईल व जर असे झाले तर कमीत कमी ६ लाख लोक बेघर होतील. ही एक अशी समस्या निर्माण झाली आहे, जिच्याकडे ना केवळ महाराष्ट्र राज्य सरकारचे लक्ष गेले पाहिजे, तर भारत सरकारचे सुध्दा लक्ष गेले पाहिजे की, ज्या सढळ हेतुने ही जागा निर्वासीत लोकांना राहण्यासाठी दिली आहे. व शहर वसाहत कार्यालयाकडुन विकास आराखडयातील नियमानुसार हे शहर चालविले जात होते. १९७१ मध्ये ही सर्व जमिन भारत सरकारने हस्तांतरीत केली. व असे आदेश सुध्दा दिले की, या शहरामध्ये जमिनीच्या विक्रीचे जे व्यवहार होतील. त्यामधुन जो पैसा येईल, जो महसुल येईल महाराष्ट्र

राज्य सरकार तो पैसा प्लॉट साठी शहराच्या विकासासाठी खर्च करेल. अशा परिस्थितीतून गेलेले आमचे हे शहर आहे. मागील ५८ वर्षामध्ये आमच्या शहरामध्ये जी नेते मंडळी झाली, आमदार झाले, खासदार झाले, १ ऑक्टोंबर १९६० रोजी नगरपालिका स्थापन झाली. जे नगराध्यक्ष झाले. १९९६ मध्ये दस—याच्या दिवशी या शहरामध्ये महानगरपालिकेची स्थापना झाली. कित्येक महापौर झाले, सर्व नेत्यांनी सुरुवातीपासुन आजपर्यंत आपापल्या हिशोबाने, आपापल्या क्षमतेने, आपापल्या राजकिय प्रभावाने सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला आहे. या शहराची जी स्थिती आहे , ती एक विशिष्ट प्रकारची आहे. या शहरामध्ये एक वेगळया प्रकारची स्थिती आहे. जी बाकी शहरामध्ये नाही. परंतु १९४७ मध्ये जे लोक येथे राहु लागले त्यांनी त्यावेळेस जे सरकारी अधिकारी होते, ज्याचा उल्लेख उल्हासनगर महानगरपालिकेचे आमचे जे आयुक्त आहेत, त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात जे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे, त्यामध्ये सुध्दा केलेला आहे. त्यामध्ये हे लिहिले आहे की, त्यावेळेस जे सरकारी अधिकारी होते, जे पुर्नवसन अधिकारी होते, त्यांनी जनतेला मौखिक आदेश दिले होते की, आपणांस आपल्या रोजगारासाठी, राहण्यासाठी जेथे जमिन दिसेल ती जमिन आपण ताब्यात घ्या. असा प्रतिज्ञापत्रात हा सुध्दा उल्लेख आहे की, त्यावेळेस १९६५ पुर्वी ३० हजार पेक्षा अधिक अनाधिकृत बांधकामे आढळून आली होती. ती नियमित करण्यासाठी सरकारने धोरण ठरविले. ११/५/१९६५ पुर्वीची जेवढी काही अनाधिकृत बांधकामे असतील ती नियमित केली जावी. उल्हासनगर शहराच्या विकास आराखडयात बाधित होत नसतील तर परंतु मी एक गोष्ट सांगु इच्छितो, १९४७ पासुन या शहरामध्ये जे मोठया प्रमाणावर विकास कार्य सुरु झाले, व ज्या शहराचा विकास आराखडा १९७४ मध्ये आला. त्यावेळेस जवळ जवळ सर्व शहर विकसित झाले होते. मला चांगल्या प्रकारे आठवण आहे की, १९७८ मध्ये श्री. प्रल्हाद अडवाणी जेव्हा नगराध्यक्ष झाले होते, ते जनतेमधुन थेट निवडुन आले होते. जनतेने त्यांना थेट नगराध्यक्ष म्हणुन निवडुन दिले होते. त्यावेळेस मी विकास आराखडयावर जेव्हा नजर टाकली, तेव्हा असे वाटले की, शहराचा विकास आराखडा नाही तर शहराला उध्दवस्त करणारा प्लॅन आहे. ते यासाठी की, तो जो विकास आराखडा तयार केला होता, तो एका टेबलावर बसुन एका खोलीमध्ये शहराचा विकास आराखडा तयार केला होता. त्या प्लॅनमध्ये अशा अशा तरतुदी होत्या, एक ४० फुटाचा रस्ता जो शासनाने बांधलेल्या मिळकती होत्या ज्यांना बॅरेकस् म्हटले जात होते, जे सरकारने स्वत: बांधले होते, जे लष्कराच्या काळात बांधण्यात आलेले होते, ते तोडुन ४० फुटाचा रस्ता करायचा आहे. अशा परिस्थितीमध्ये हे शहर विकसित होवू लागले. नगरपालिका आल्यानंतर लोकनियुक्त जे प्रतिनिधी आले. बाकी शहरामध्ये जावुन दिल्ली, मुंबई, कलकत्ता, मद्रासमध्ये तेथिल विकास पाहत होते. त्यांना पण असे वाटत होते की, आम्ही उल्हासनगरमध्ये राहतो, आम्ही पण आमच्या शहरवासियांना असे शहर दयावे. जो दुस—या शहरांच्या तुलनेत काही तरी दिसेल. १९७८ पासुन आज २००५ पर्यंत शहराच्या विकासाच्या आड या शहरातील कित्येक लोकांच्या मिळकती आम्ही निष्कासीत केल्या आहेत. या शहरातील हजारो लोकांचे आर्थिक नुकसान नगरपालिका व महानगरपालिकेने केले आहे. फक्त शहर विकासाच्या नावाने कारण की, या शहराची जनता या शहरातील लोक नियुक्त प्रतिनिधी ते नगरसेवक असोत, महापौर असोत, नगराध्यक्ष असोत, आमदार असोत, खासदार असोत त्यांना वाटत होते की, हे शहर योग्य रितीने विकसीत व्हावे. असे प्रयत्नही केले होते. अनाधिकृत बांधकामे निर्माण करण्याची प्रवृत्ती या शहरामध्ये का निर्माण झाली? त्या मागे सुध्दा एक बराच मोठा इतिहास आहे. त्यावेळच्या निर्वासीतांना राहण्यासाठीही लष्करी छावणी दिली होती. त्यावेळी त्यांची संख्या होती ६० हजार व १३ चौरस किलोमिटरची जमिन व आज शहराची लोकसंख्या आहे, ती जवळ—जवळ ७ लाख. शहराचे क्षेत्र वाढविण्यासाठी येथिल नेते मंडळी राज्य शासनाकडे वेळोवेळी विनंती केली आहे. मुंबई कमी पडु लागली तर नवी मुंबई निर्माण केली गेली. औरंगाबाद कमी पडु लागले तर नविन औरंगाबाद तयार केले गेले. दिल्ली कमी पडु लागली तर नवीन दिल्लीचा विकास झाला. जेथे—जेथे लोकसंख्या वाढते तेथे राज्य सरकारचे कर्तव्य ठरते की, अशा शहरांना जादा जमिन देवुन अशा शहरातील लोकांच्या रहिवास, व्यापार व औद्योगिक विकासा आडच्या समस्या दुर व्हाव्यात, परंतु दुर्भाग्याने म्हणावे लागत आहे की, उल्हासनगरला आता पर्यंत जादा जमिन मिळालेली नाही. १३ चौरस किलोमिटरची जमिन आजपर्यंत तेवढीच राहिली आहे. त्यामध्ये आजपर्यंत काहीही वाढ झालेली नाही. याबाबत आम्ही कित्येक वेळा सरकारकडे शिष्टमंडळे घेवून गेलो आहोत. महाराष्ट्र राज्याच्या अलग—अलग मुख्यमंत्री महोदयांना भेटलो आहोत. त्यांच्याकडे आमची जी निवेदने आहेत ती त्यांच्या दप्तरी पडुन आहेत. परंतु आजपर्यंत या शहरास जमिन वाढुन मिळालेली नाही. मागील ५८ वर्षापुर्वी जी कुटुंबे आली होती, त्यावेळेस जे ५ माणसांचे कुटुंब होते त्याचे आता २५ माणसे झाली आहेत. कुठे जातील हे लोक? कुठे राहतील? त्यांना कोणताही पर्याय नाही. म्हणुनच लोक टावर सारखी उंच—उंच बांधकामे करु लागले आहेत. समांतर बांधकामांची काही शक्यता दिसत नव्हती. म्हणुनच दुर्भाग्याने आज शहरामध्ये एवढया मोठया प्रमाणावर अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत. अशी स्थिती फक्त उल्हासनगरमध्येच नाही, इतर ठिकाणी सुध्दा असे झाले आहे. उल्हासनगरच्या आजुबाजुस आपण जर नजर टाकलीत, बाजुला कल्याण—डोंबिवली महानगरपालिका आहे. ठाणे महानगरपालिका आहे. अंबरनाथ व कुळगांव—बदलापुर नगरपालिका आहेत. अशा कित्येक ठिकाणी

अनाधिकृत बांधकामे आहेत जेथे–जेथे नगरांचा विकास झाला आहे, जेथे–जेथे रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत, व्यापा–यांच्या संधी वाढल्या आहेत तेथे विविध प्रदेशातील लोकांची ये–जा सुरु होते. व त्यामुळेच या शहरांमध्ये अनाधिकृत बांधकामे करण्याची प्रवृत्ती उदयास येवून ती दिवसेंदिवस वाढत आहे. उल्हासनगर त्याला अपवाद नाही. हे एकटया उल्हासनगरचे उदाहरण नाही की जेथे अशी स्थिती निर्माण झाली आहे. अशी स्थिती आजुबाजुंच्या शहरामध्ये सुध्दा झाली आहे. कोणतीही गोष्ट लक्षात घेता अनाधिकृत बांधकामे करण्याची प्रवृत्ती कधी ना कधी आम्हांला भारी पडणार आहे. या शहरातील नेते मंडळी या बाबत वेळोवेळी राज्य सरकारकडे गेले आहेत. या शहराबाबत असे एखादे धोरण तयार करावे जसे दिल्लीमध्ये अनाधिकृत बांधकामांवर मोठया प्रमाणावर दंडाची रक्कम आकारुन ती नियमित करण्यात आली. तसेच इतर प्रदेशांमध्ये सुध्दा केले आहे. तशी एखादी योजना या शहरासाठी व या शहराच्या आजुबाजुस ठाणे जिल्हयातील जी शहरे आहेत त्या शहरांसाठी आणुन किंवा महाराष्ट्र राज्यांमध्ये बाकी जी शहरे आहेत, त्यांमध्ये अशा प्रकारच्या ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत, तेथे एखादी निश्चित अशी कालमर्यादा ठरवुन २००५ किंवा २००२ पर्यंत जी काही बांधकामे झाली आहेत, त्यांना नियमित करण्यासाठी राज्य सरकारने एखादा कायदा करावा. मी सभागृहाला सांगु इच्छितो की, मागील ५ वर्षात महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख मागच्या वेळेस महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री होते. सन २००२ मध्ये त्यावेळस मी आपल्या शहराचे आमदारांबरोबर तसेच श्री. वसंतराव डावखरे जे आमच्या विधानपरिषदेचे उप–सभापती यांच्यासह कित्येक बैठकांमध्ये सहभागी झालो होतो. व त्यांच्यासमोर आम्ही आमच्या समस्या मांडल्या होत्या की आमच्या शहराची अशी–अशी स्थिती आहे. व आमच्या शहरासाठी आपण काही तरी करा. मी, मा. विलासराव देशमुख्य, मुख्यमंत्री यांना धन्यवाद देवु इच्छितो. महाराष्ट्र राज्य सरकारच्या सर्व नेते मंडळींना धन्यवाद देवू इच्छितो. ते सर्व खुपच वास्तववादी आहेत. त्यांना अशी जाणिव झाली की, उल्हासनगरची स्थिती अशी आहे व यापुढे काही समस्या उद्‌भवु नये म्हणुन उल्हासनगर मधील अनाधिकृत बांधकामांबाबत संवेदनशिल भुमिका घेतली पाहिजे. व मानवतेच्या दृष्टीकोनातुन शहरासाठी काहीना काही निर्णय घेतला पाहिजे. शेवटच्या बैठकीच्या वेळेस मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी नगरविकास सचिव, महसुल सचिव, पुनर्वसन सचिव यांना सन २००२ मध्ये निर्देश सुध्दा दिले होते. ज्याचे इतिवृत्त आमच्याकडे आहे. उल्हासनगरमधील अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी बाकी शहरांमधील, बाकी प्रदेशांमधील अनाधिकृत बांधकामे कशी नियमित केली याचा अभ्यास करुन या शहराच्या समस्येबाबत काहीना काही तोडगा काढा. परंतु मी असे म्हणेन की, नोकरशाहीची चाल जी असते ती अतिशय संथ असते. ते लोक हळुहळु चालतात. महाराष्ट्र राज्य सरकार व त्याचें नेतागण कोणत्याही पक्षाचे असो महाराष्ट्राची ही प्रथा आहे. प्रदेशात राहणारे जितके पण १० –११ करोड लोक आहेत, जनता आहेत, त्यांचे पालन–पोषण चांगल्या त–हेने व्हावे. महाराष्ट्र प्रदेश, सर्व जगात क्रमांक १ वर असावा. त्या दृष्टीनेच महाराष्ट्राचे नेता प्रयत्न करतात. कोणत्याही जाती धर्माचे लोक असोत, त्यांना त्यांच्या वास्तव्यासाठी त्यांची चांगल्या त–हेने व्यवस्था होवू त्यासाठी नेहमी सरकार व त्यात असलेले मुंख्यमंत्री व मंत्री प्रयत्नशील असतात. आम्हांला आज देखील पुर्ण विश्वास आहे. शहरातील लोकांना विश्वास आहे. शहरातील ७ लाख जनतेला विश्वास आहे. या शहरातील नेत्यांना विश्वास आहे. या शहरातील जितके पण प्रतिनिधी आहेत वेगवेगळया राजकिय पक्षाचे त्यांना देखील विश्वास आहे की महाराष्ट्र राज्य सरकार या समस्येचे नक्कीच निराकरण करेल. या महानगरपालिकेतसुध्दा वेळोवेळी सरकारला सूचीत केले आहे. मी येथे त्याचा उल्लेख करु इच्छितो. दिनांक २०.११.९७ रोजी ठराव क्र. २७ याच महापालिकेच्या सदनामध्ये पारीत झाला होता. त्यात असे लिहिले होते की, शहरातील जितके पण अनाधिकृत बांधकामे आहेत ती १.१.९५ पर्यंत नियमित केले जावे. तो ठराव सर्व संमतीने पास करुन बोडारे साहेब ऐका जेव्हा शिवसेनेचे महापौर होते. त्यावेळेस तो ठराव सर्वसंमतीने पारीत झाला होता की महाराष्ट्र सरकारने उल्हासनगरमधील १.१.९५ मधील अनधिकृत बांधकामांना नियमित करावे. म्हणुन ती ठरावाची प्रत शासनाकडे पाठविली होती. शिवसेनेचे महापौर होते उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये आणि मला वाटते त्यावेळी महाराष्ट्र शासनावर देखील शिवसेनेचे सरकार होते. यानंतर एक दुसरा ठराव २० मार्च २००२, ठराव क्र. ३० आहे, तो संमत केला होता. ज्यात बाल्कनी स्टेअर केसेस अशा काही अनियमितता ज्या इमारत बांधकाम करतांना केल्या गेल्या. व चटई क्षेत्र वाढविण्यासाठी, चटई क्षेत्र एक वरुन तीन करण्यासाठी ठराव होता. सर्वसंमतीने तसा प्रस्ताव पारीत करण्यात आला होता. पारीत करुन महाराष्ट्र शासनाकडे पाठविला होता. सन २००२, १९ ऑक्टोंबर ठराव क्र. ४० त्यात पण असा प्रस्ताव केला गेला. ३१ मार्च २००२ मध्ये जितके पण अनाधिकृत बांधकाम झाले, त्याला शासनाने नियमित करावे असा ठराव उल्हासनगर महापालिकेने केला. सांगण्याचा अर्थ असा आहे, या शहरातील जितके पण निवडुन आलेले प्रतिनिधी आहेत, शिवसेनेचे असोत, भाजपाचे असोत, राष्ट्रवादीचे असोत, कॉंग्रेसचे असोत, विपक्ष असोत, कुणी पण असोत ते नेहमीच दक्ष राहिले आहेत या समस्येविषयी. आणि तसे महाराष्ट्र शासनाला आम्ही निवेदन देखील दिले आहे. परंतु दुर्देवाने वेळेनुसार ती गोष्ट घडु नाही शकली. परंतु आज अशी वेळ आली आहे, १–१ सेकंद जरी या विषयाबाबत विलंब झाला, तर शहरात मोठया प्रमाणात

विनाश होणार. होवू शकते शहरातील जनता उत्तेजित होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करु शकते. ते हाताळणे नंतर कठिण होवून बसेल. म्हणुन माझी सदनाला विनंती आहे, सर्वांनी सर्व संमतीने एक ठराव पारीत करुन महाराष्ट्र शासनाकडे पाठवुन त्यांना निवेदन करु. तुम्ही या प्रकरणात लक्ष घाला. आणि या समस्येचे समाधान करावे. इमारतीत राहणारे जितके लोक आहेत, त्यांच्यावर जास्त दंड आकारावा परंतु त्या बांधकामाला नियमित करावे. त्यांना बेघर करु नये. जर ८५५ बांधकाम तुटतील तर कमीत कमी २००–२५० करोड राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान होईल. ३ लाख लोक बेकार होतील. जर प्रत्येक बांधकामांना तपासले तर ९० टक्के शहराची राख होईल. निर्वासीत कॉलनी मला असे वाटते महाराष्ट्र शासन हे सहन करु शकणार नाही. उल्हासनगर शहर हे त्यांच्या शरीराचे एक अंग आहे. जर शरीराचा एखादा अवयव काढुन टाकला तर मला नाही वाटत की महाराष्ट्र सरकार हे सहन करेल. म्हणुन मित्रांनो मी तुम्हांला निवेदन करतो की, एकजुट होवून एकमताने असा एक प्रस्ताव पास करावा जो मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवहेलना करणार नाही. त्यावर आपली कोणतीही टिप्पणी नको. परंतु त्याच बरोबर राज्य सरकारला एक असे निवेदन दयावे, माणुसकीच्या नात्याने सहानुभुती दर्शक दृष्टीकोन ठेवून शहराला वाचविण्याचा प्रयत्न केला जावा. व शहराला उजाड होण्यापासुन वाचवु या. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– तुमचा हा ठराव आता आला आहे. तुम्ही प्रस्तावना वाचली का? उल्हासनगरमधील ८५५ अवैध इमारती तोडण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे या इमारतीत राहणा–या रहिवाशांची अवस्था दयनिय झाली असुन शहरात भितीचे वातावरण निर्माण झालेले असुन हा अवमान आहे की नाही उच्च न्यायालयाचा? या विषयावर चर्चा होत आहे, हा ठराव पास करायचा आहे. आम्ही करु शकतो की नाही ते जरा सांगा ना? आता ठराव तुमच्याकडे आलेला आहे. त्यावर चर्चा करु या ना चांगल्याप्रकारे? आपण आधी सांगा की, हा ठराव कायदेशीर आहे का? तुमच्या हातात ठराव आला आहे, प्रस्तावना व ठराव जरा वाचा व सांगा की यावर चर्चा करु शकतो की नाही? येथे ८६ लोक बसले आहेत, सर्वांची जबाबदारी बनते. सर्व जेल मध्ये जातील जर काही चुकीचे होत असेल तर. तर मला सांगा की हे चुकीचे आहे की बरोबर आहे? आम्ही जेल मध्ये तर नाही जाणार?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– अजुन प्रस्ताव मांडला नाही आहे, सन्माननिय सदस्यांनी फक्त शहराची स्थिती समोर मांडली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–सचिव साहेब, विधी अधिकारी म्हणुन तुमची जबाबदारी आहे आम्हांला सांगणे. या विषयावर चर्चा होवू शकते की नाही?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:– तुमचा प्रस्ताव नंतर बघु आम्हांला आधी श्री. प्रकाश कुकरेजा सचिव यांना काही विचारायचे आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– सचिव साहेब, याची जबाबदारी पुर्ण आपल्यावर राहील. जर असे काही घडले तर याला तुम्ही पुर्ण जबाबदार असाल. कृपया तुम्ही आम्हांला स्पष्ट काय ते सांगा. या विषयावर चर्चा होवु शकते की नाही?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– सचिव साहेब, तुम्ही आधी सांगितले की, प्रस्तावना काय आहे, ठराव काय आहे, हे पाहून मी नंतर टिप्पणी देईल. सुरुवातीलाच महाराज यांनी सांगितले की, ८५५ इमारती तोडणेबाबत मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे इमारतीत राहणा–या रहिवाशांची अवस्था दयनिय झाली असुन शहरात भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे म्हणजेच उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे जनतेची अवस्था दयनिय झाली आहे. हे तुमचे शब्द आले. अवस्था दयनिय व भितीचे वातावरण आहे कोर्टाच्या आदेशामुळे हा अवमान होतो की नाही? हे जरा सांगा. म्हणजेच चर्चेचा उपयोग होईल. महापौर महोदया.........

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– जे शब्द हरकती योग्य असतील ते काढुन टाकण्यात यावे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– सभागृह नेता हा काही लहान मुलांचा खेळ नाही किंवा मस्करी नाही आहे. याचा दहादा विचार करुन नंतर आणायला पाहिजे होते. म्हणुन आम्ही सांगितले की, जर तुम्हांला काही करायचे असेल तर त्यात कोर्टाचा काही विषय त्यात नसला पाहिजे. या त–हेने तुम्ही प्रस्ताव आणा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— तुम्ही प्रस्ताव बनवा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— आम्ही कशाला प्रस्ताव आणु. तुमच्याकडे एकापेक्षा एक तज्ञ माणसे बसली आहेत. हा ठराव जसाच्या तसा पास करु शकतो का? कोर्टाचा अवमान तर नाही होणार? आता तर तुम्ही ठराव वाचला तर तुम्हांला माहित पडले की नाही?

मा. सचिव :— मा. महापौर महोदया, मला आश्चर्य वाटते की, हा विषय महासभेचा आहे. चर्चा पण तुम्हांला करायची आहे. निर्णय पण तुम्हांला घ्यायचा आहे. वारंवार मला विचारले जाते की, हे योग्य आहे की नाही? मी तुमच्या कृतीचा भागीदार होवू शकत नाही. तुम्हीच ठरवायचे आहे हे चुकीचे आहे की बरोबर आहे. त्यासाठी तुम्ही तुमच्या मनाचा आणि बुध्दीचा वापर करुन निर्णय घ्यायचा आहे. काही अशा गोष्टी आहेत त्या वस्तुस्थितीबाबत मला माहित देखील नाही तर मी कोणत्या याच्यावर तुम्हांला मी त्यावर काय भाष्य करु. कृपया तुम्ही मला न विचारता मा. आयुक्तांच्या जागी जे प्राधिकृत अधिकारी आहेत त्यांना विचारा कारण यात काही अशा गोष्टी आहेत त्याची वस्तुस्थिती मला माहित नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— सचिव साहेब, तुम्हांला वस्तुस्थिती कशी माहित नाही, कागद तुमच्या हातात आहे. ठराव तुमच्या हातात आहे तुम्ही पाहिला आहे.

मा. सचिव :— हा जो प्रस्ताव आहे तो केवळ तुमच्या समोर प्रस्तृत केला आहे. सुचक आणि अनुमोदक अजुन समोर आले नाहीत. अशा प्रस्तावनेत कधीपण सुचना, उपसुचना, बदल येवु शकतो. तुम्ही अजुन निर्णय घेतला नाही. तुम्हांला जर काही हरकती योग्य वाक्य वाटत असेल किंवा उल्लेख असेल तर तो तुम्ही काढु शकता. परंतु तो तुमचा स्वत:चा निर्णय असेल. ती तुमची जबाबदारी असणार.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— आमच्या जबाबदारीचा प्रश्न नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— हे तुम्ही आता सांगत आहात. यापुर्वी तुम्ही सांगितले होते की, प्रस्तावना व ठराव आल्यावर मी सांगेन. मी माझे मत सांगेन. आता चर्चा होणार आहे, तुम्ही ट्रवीस्ट करत आहात. आणि म्हणता ही माझी जबाबदारी नाही. तुम्ही पण या शहराचा एक भाग आहात, या शहराचे नागरीक आहात. महासभेचे सचिव आहात............

मा. सचिव :— कृपया लक्ष दया.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :— महापौर महोदया, आमची विनंती आहे, १५ मिनिटासाठी सभा स्थगित करा. आम्ही सर्व पक्षीय एकत्र येवुन जर काही हरकती योग्य मुद्दे असतील तर ते प्रस्तावनेमधुन काढु. आमचे पंजाबी साहेब कायदेतज्ञ आहेत, बोडारे साहेब आहेत......

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— त्या आधी मी बोलु इच्छितो.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— महापौर महोदया, त्या आधी आम्ही काही चर्चा करु. काही मुद्दे आहेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— मला काही बोलायचे आहे. चर्चा झाल्यानंतर संशोधन करु शकतो. प्रस्तावनेत उच्च न्यायालयाचा जो उल्लेख झाला आहे त्यास आमचा विरोध आहे. तो उल्लेख नको. न्यायालयाचा अपमान आम्ही करु इच्छित नाही. उल्हासनगरच्या जनतेला महासभेकडुन जी अपेक्षा आहे ती पुर्ण करतांना उच्च न्यायालयाचा अपमान होणार नाही, हे पाहणे आपण सर्व लोकप्रतिनिधींचे कर्तव्य आहे. त्यामुळे प्रस्तावनेत बदल करावा लागेल. त्याच बरोबर जो ठराव आणला आहे. शासनाकडे उल्हासनगर शहरे १९४७ साली देशाच्या फाळणीमुळे विस्थापित होवून आलेल्या लोकांसाठी पुर्नवसन म्हणुन विकसित केलेले हे शहर असल्याने सदयस्थितीत निर्माण झालेल्या परिस्थीचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन शासनाने दिनांक १४/४/२००२ रोजी आणि २४/६/२००२, २७/१२/२००२ रोजीच्या बैठकांमध्ये या प्रकरणी दिलेल्या निदर्शनाप्रमाणे शासनाने या विस्थापित जनतेला सहकार्य होणे प्रकरणी त्याप्रमाणे कार्यवाही करावी. माखिजा साहेब म्हणाले की, ९७ पासुन

ही प्रक्रीया चालु आहे. उल्हासनगरची महानगरपालिका ठराव करुन शासनाकडे पाठवते. माखिजा साहेब जेव्हा महापौर होते तेव्हा २००२ मध्ये ठराव झाला. व श्रीमती मालती करोतिया महापौर व उप–महापौर श्रीमती जया साधवानी होत्या. २००२ च्या १० व्या महिन्यात असेच प्रस्ताव केले परंतु आजपर्यंत त्या संबंधी शासनाकडुन काही आदेश आले नाहीत. तो मंजुर झाला की नाकारला काही माहित नाही. याबाबतीत काही आदेश नाही. उल्हासनगरचे प्रत्येक प्रतिनिधी उल्हासनगरच्या जनतेसोबत आहेत. त्यांना अडचणी नाही आल्या पाहिजेत. त्यांची अवस्था दयनीय नाही झाली पाहिजे. म्हणुन प्रत्येक प्रतिनिधींचे प्रयत्न आपल्या पक्षातर्फे व वैयक्तीक रित्या चालु आहे. उल्हासनगरच्या या परिस्थितीला कोण जबाबदार आहे? कोणते अधिकारी जबाबदार आहेत. कोणत्या प्रशासनाचे, कोणत्या शासनाचे हा कुणीही विचार करत नाही. कुणाला विचार करायला वेळ पण नाही. परंतु आज जो आपण ठराव करत आहोत, त्याचा काही फायदा होईल काय? जे ९७ साली झाले आहे, २००२ मध्ये झाले, २००२ च्या १० व्या महिन्यात झाले. ते तसेच शासनाकडे प्रलंबित आहे. जर शासनाची काही इच्छा असेल तर यापुर्वीच काही कारवाई झाली असती. या पुर्वी ते आजपर्यंत कारवाई झाली नाही. तर २ महिन्यात शासन कारवाई करणार आहे का? पहिले त्याचे संशोधन झाले पाहिजे. नाहीतर एकेठिकाणी अशी परिस्थिती आहे की, सचिव आपले स्टेटमेंट दयायला घाबरत आहे. कोणी प्रतिनिधी उच्च न्यायालयाचा अपमान होईल म्हणुन घाबरत आहे. अशा अवस्थेत सर्व समस्यांना पार करुन आव्हान घेवून आपण जर ठराव पास केला तर उल्हासनगरच्या जनतेचा त्यात भले होईल का? आधी जसे स्वप्न जनतेला दाखविले तसे दाखवायचे का? आज उल्हासनगरमधील जनतेची अवस्था बिकट आहे. जिकडे जातो तिकडे हाच प्रश्न विचारला जातो की उल्हासनगरचे काय होणार? आणि अशा वेळी फक्त ठराव करुन शासनाकडे पाठवायचा. आजपर्यंत आमचे आमदार १९८७ पासुन उल्हासनगरचे एक सक्रिय नेता आहे. उल्हासनगरची प्रत्येक अवस्था त्यांना माहित आहे. ९२ पासुन ते आमदार आहेत. ते एक निष्णांत व्यक्ती आहे. त्यांना आधीच हे करायला पाहिजे होते. आज उल्हासनगरच्या महासभेला हा ठराव मांडण्याची वेळ आली नसती. जर आमदारांनी ते त्याच पक्षाचे आहे. सत्तापक्ष त्यांचा आहे. तरीपण महासभेला ठराव पाठवावा लागत आहे. उल्हासनगरच्या लोकांची काय स्थिती आहे. शासन स्तरावर निर्देश करणे त्यांच्या लक्षात आणुन देणे हे त्यांचे काम होते त्यांनी केले पण त्याचा काही परिणाम नाही झाला. उच्च न्यायालयात शासनाने काही सांगितले नाही त्यामुळे आज हे आदेश आले आहे. मी उल्लेख करु इच्छित नाही. आपल्या काही चुका आहेत, त्या यापूढे झाल्या नाही पाहिजेत. जर विकासआराखडा तुम्ही सर्व संमतीने नामंजुर केला त्यावेळी तो जर मंजुर झाला असता तर लोकांना काहीतरी सुटकेचा श्वास मिळाला असता. जे रिजर्व्हेशन साईडवर होते शासनाने ते डी.पी मध्ये रद्द केले होते. परंतु आपण त्यावेळी हा विचार केला नाही. जर तो प्लान मंजुर झाला असता तर ५० टक्के लोकांना त्याचा फायदा झाला असता. परंतु त्या चुकीमुळे १०० टक्के लोक त्रास भोगत आहेत. तर अशी चुक होवू नये म्हणुन, फक्त लोकांना दाखविण्यासाठी ठराव बनवायचा आणि त्यांना सांगायचे की आम्ही शासनाकडे पाठवला. असे नाही करायचे. फक्त लोकांकडुन प्रसिध्दी मिळविण्यासाठी सांगायचे आम्ही ठराव केला शासनाकडे पाठविला. रिजल्ट मिळण्यासाठी रिजल्टस् ओरिएंटेशन पाहिजे त्याकरीता शासनाने कार्यवाही केली नाही. उल्हासनगर महापालिकेने वारंवार निवेदन दिले. परंतु त्याच्यावर लक्ष दिले गेले नाही. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जर आंदोलन करावे लागत असेल, शासन स्तरावर, मंत्रालयासमोर. मुख्यमंत्र्यांच्या समोर आवाज निघाला पाहिजे. त्यात आम्हां सर्वांचे सहयोग असेल. शासनाने ते प्रलंबित ठेवल्यामुळे ही समस्या निर्माण झाली आहे. फक्त ठराव करुन या समस्येचे समाधान होणार नाही. परंतु ठराव केल्यानंतर त्यावर शासनाने मंजुरी देवून शासनाचे लक्ष वेधुन घेण्यासाठी असा काही प्रस्ताव आपण कराल. असा माझा सुझाव आहे. त्यात आम्ही तुमच्या सोबत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> मा. महापौर महोदया, उप–महापौर महोदया, अवैध निर्माणास आमचा नेहमी विरोध होता. मी या चर्चेच्या दरम्यान सांगु इच्छितो की, अवैध निर्माणा विरुध्द आम्ही नेहमी जागरुक राहिलो आहोत. अवैध निर्माणांना संरक्षण देण्याची गोष्ट या सभागृहात कधीही झाली नाही. नगरपालिका असो वा महानगरपालिका अवैध निर्माण झाल्यावर त्याला लगेच तोडण्याबाबत आवाज या सभागृहात उठविला आहे. आणि आज पण आम्ही सर्व लोक याच विचारांशी सहमत आहोत. अवैध निर्माण बनतांनाच पाडुन टाकले पाहिजे. आणि ही समस्या वाढली नाही पाहिजे. सरकारने कायदा केला होता की, ज्यांना दोन पेक्षा अधिक मुले आहेत, त्यांना निवडणुक लढविण्याचा अधिकार नाही, उदाहरण म्हणुन सांगत आहे. परंतु त्या नियमात असे होते की, अमुक–अमुक तारखेच्या आत जर ४–५ मुले असतील, ४–५ असोत, ८ असोत त्यांना दोनच मुले समजले जाते. त्याचप्रमाणे अवैध निर्माणची जी समस्या आहे, त्या समस्येत देखील याप्रकारे समाधान निघायला पाहिजे. अवैध निर्माणाच्या आम्ही सर्व विरोधात आहोत. हे अवैध निर्माण एका दिवसात नाही निर्माण झाले. हे अवैध निर्माण पुर्ण शहराची समस्या आहे. पुर्ण जिल्हयाची समस्या आहे. पुर्ण प्रदेशाची समस्या आहे. पुर्ण देशाची समस्या आहे. या अवैध निर्माणच्या समस्येने ग्रासले आहे. ९५ टक्के अवैध निर्माण आहे. त्याला उध्दवस्त

करुन अवैध निर्माणाचा प्रश्न सोडवावा. तर मला वाटते की, हे न्यायोच्चित नाही. सरकार जो काही कायदा तयार करते, तो जनतेसाठी असतो. जनहितासाठी असतो. अनहितासाठी नाही. महाराष्ट्र सरकारचे लक्ष जर एक ठराव पास करुन आपण वेधु इच्छितो. उल्हासनगर शहर ९०–९५ टक्के अवैध निर्माणाने वसलेले आहे. लाचारी काहीही असो, कारण काहीही असो, कल्पीत कुणीही असो, भ्रष्टाचार कारक असोत, भ्रष्टाचाराच्या कारणामुळे जे काही अवैध निर्माण झाले आहे, त्यावेळी जे अधिकारी होते, त्यांनी त्या बिल्डरांशी लागेबंधी केले. हेच कारण आहे त्यामुळे अवैध निर्माण वाढत गेले. याचा अर्थ हा तर नाही की कुणाचा दंड कुणा दुस–यावर आकारला जावा. आपल्या आयुष्याभराची कमाई प्लॅट व दुकानात गुंतवली आहे. व्याजाने पैसा घेवून त्यात ओतला आहे. ज्यांनी प्रॉपर्टी खरेदी केली आहे त्यांना बेघर करुन रोडवर फेकावे हा काय न्याय आहे? नक्कीच नाही. बियर बार बंद करावे म्हणुन मुद्दा उपस्थित झाला आहे. तर रोडवर इतके हंगामे होतात, आंदोलने होतात, त्यांचे पुनर्वसन करण्यात यावेत म्हणुन... या शहराला ओसाड करत आहेत. आपण इतके घाबरायचे? साठ, सत्तर हजार बारबाला नोकरी जात आहे म्हणुन रोडवर उतरुन प्रदर्शन करतात, हे शहर सात लाख लोकांचे आहे, ८१ त्यांचे जनप्रतीनिधी आहे, एक आमदार आहे, एक खासदार आहे, सर्वांनी मिळुन सामुहीक रित्या महाराष्ट्र सरकारला याची जाणीव करुन दिली पाहिजे की, तुम्ही कायदयात संशोधन करा. पुर्वी जे बालविवाह होत होते २–४ वर्षाच्या मुलींबरोबर तर त्यावेळी कायदा बनला होता की, १३ वर्षाची मुलगी जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विवाह होणार नाही. परत कायदयात सुधारणा होवून १४ वर्ष केले गेले. परत १६ वर्ष केले गेले. व आज १८ वर्ष वय आहे. याचा अर्थ वेळोवेळी कायदा बदलत गेला आहे. आणि तो कायदा शहराच्या, जनतेच्या व लोकांच्या हितासाठी बदलला गेला आहे. जर कायदयात संशोधन केले जाते, कारण की, त्यावेळची परिस्थिती वेगळी होती, गरजा वेगळया होत्या. आजच्या गरजा वेगळया आहेत, परिस्थिती वेगळी आहे. हे सर्व लक्षात घेवून जर कायदयात संशोधन करण्याचा जर आपण प्रयत्न केला आपण काही प्रदर्शने केली तर नक्कीच आपण गुन्हा करत नाही. या शहरातील लोकांनी आपल्याला निवडले आहे. आपल्याला जर काही भिती आहे, दहशत आहे की, आपल्याला डिस–क्वॉलीफाईड केले गेले, शहराला वाचविण्यासाठी, संघर्ष करण्यासाठी आपल्या पदांची पर्वा नाही केली पाहिजे. शहरासाठी भांडले पाहिजे. संघर्ष केला पाहिजे. या शहराचे लोक जे नक्कीच आरामात झोपत नसतील. आज ते आपल्याला मोठया अपेक्षेने पाहत आहेत. आपले जनप्रतिनिधी आपल्यासाठी काय करत आहेत? या शहरातील अवैध निर्माणात आपले अधिकारी राहतात. जनप्रतिनिधी राहतात. या शहराचा व्यापारी पण राहतो, गरीबातला गरीब व्यक्ती देखील राहतो. हे शहराची जी समस्या आहे, ती प्रत्येक समाजाची समस्या आहे. उदाहरणार्थ अजुन एक गोष्ट सांगेल जुन्या आणि प्राचीन गुफांच्या रक्षणासाठी खर्च केला जातो. आमची जी सभ्यता आहे, सिंधी सभ्यता, ज्याच्याशी आमचा संबंध आहे. मोहनजोदडो वेळची संस्कृती आहे. १० हजार वर्षापुर्वीचे आहे. एवढया प्राचिन सभ्यतेचे अवशेष वाचविण्यासाठी व देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व पणाला लावून आलेल्यांसाठी एवढा पण खर्च होवू शकत नाही. संशोधन होवू शकत नाही? प्राचिन अवशेषांचे रक्षण करण्यासाठी पुरातत्व विभाग खर्च करु शकतो. या शहरातील लोक सर्वात जास्त धर्मनिरपेक्ष आहेत. जे देशभक्त आहेत, जे उदयोगपती आहेत, व्यापारी आहेत, ज्यांनी राष्ट्राच्या प्रगतीसाठी खांदयाला खांदा लावुन सहकार्य दिले आहे. सुनामी लाटा आल्या, भुकंप आला, वादळ आले, तर हे शहर सर्वात आधी मदतीसाठी धावुन जाते. आज त्यांच्या मदतीसाठी कोण येत आहे? नक्कीच महाराष्ट्र सरकारचे लक्ष आपण वेधले पाहिजे. एकदा नाही, वारंवार लक्ष वेधले पाहिजे. रोडवर उतरले पाहिजे. ठराव पण पारीत केला पाहिजे. या शहराची जनता आपल्याला विचारत आहे, आम्ही तुम्हांला निवडुन पाठविले आहे, तुम्ही आमच्या रक्षणासाठी काय करत आहात? माझ्या मित्रांनो, सर्व सन्माननिय सदस्यांनो, माझे तुम्हांला निवेदन आहे की, ज्या प्रमाणे वेळोवेळी नियमांमध्ये सुधारणा होते. आपण अपिल मध्ये जातो का जातो? ज्युनिअर कोर्टातुन, सेशन कोर्टात , सेशन कोर्टातुन हायकोर्टात , हायकोर्टातुन बॅच, नंतर सुप्रीम कोर्ट, त्यानंतर राष्ट्रपती, एक खुनी व्यक्तीला देखील राष्ट्रपती शिक्षा माफ करतो. त्यांच्या याचनेवर त्यांना माफ करु शकतात. त्याचे प्राण वाचविण्यासाठी. तर पुर्ण शहराच्या मुद्दयावर राष्ट्रपती का नाही हस्तक्षेप करु शकत नाही? अपिल मध्ये माणुस तेव्हा जातो, जेव्हा त्याला वाटते की, माझ्यावर अन्याय झाला आहे. म्हणुन तो दुस–या कोर्टात जातो. हायर ऑथरीटी म्हणुन या शहराच्या भल्यासाठी आवाज उठविण्यास हरकत काय की या शहरावर अन्याय झाला आहे. कोर्टात हे सांगितले गेले की, ८५५ बांधकामे अवैध आहेत. हे अर्धसत्य कोर्टसमोर आणले गेले. कोर्टने विचार केला असेल, २० हजार इमारतीमधुन ८५५ इमारती अवैध आहेत. कोर्टसमोर सत्यपरिस्थिती मांडायला पाहिजे होती. पुर्ण सत्यापेक्षा अर्धसत्य खुप धोकादायक असते. पुर्ण सत्य जर कोर्टसमोर मांडले असते तर नक्कीच मानवतेच्या स्तरावर किंवा दृष्टीकोनातुन कोर्टने हा निर्णय नसता दिला जो आज दिला आहे, म्हणुन वर्तमान परिस्थितीत आपल्या शहराला वाचविण्यासाठी भले आपण पक्षात किंवा विपक्षात बसलेले असू, आज ध्येय सर्वांचे एकच आहे. उद्देश सर्वांचा एकच आहे की, या शहराला वाचवायचे आहे. माझी तुम्हां सर्वांना विनंती आहे, अपिल आहे. निवेदन आहे, आग्रह आहे. राजनैतिक मतभेद बाजुला सारुन पद राहतात की नाही? हा विचार बाजुला करुन आपले

शहर वाचु शकते की नाही? आपला समाज वाचु शकतो की नाही? जर शहरच नाही राहीले तर आपला काय फायदा? शहर राहिले तर राजनिती असणार. शहर असेल तर व्यापार असेल. शहर असेल तर आपण सलामत असु. **''सर सलामत तो पगडी पच्चास''** आमचे मित्र श्री. हरदास माखिजा यांनी जो प्रस्ताव मांडला त्या प्रस्तावाचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीतर्फे आम्ही समर्थन करतो. आणि त्याचबरोबर सभागृहाला आग्रह करतो की, जर कायदयात देखील संशोधन केले जातात. या प्रस्तावात देखील जर असे काही विवादास्पद बाब तुम्हांला वाटत असेल. तर तुम्ही त्यात संशोधन करा. सभागृहात तुम्ही जर आवाज उठविला तर तो एक स्वरात उठविला गेला पाहिजे. आपण सर्व प्रतिनिधी शहराच्या प्रती पुर्ण त–हेने प्रामाणिक आहोत. जनताची जी जबाबदारी आहे, ती जबाबदारी पेलण्यास आम्ही समर्थ आहोत. सक्षम आहोत. वेळ आली आहे, राजनैतिक भेदभाव विसरुन आपण सर्व एका मंचावर आवाज उठविला पाहिजे. राहिला प्रश्न आमच्या आमदारांविषयी बोलले गेले, या संदर्भात मी हे म्हणेण की, आमचे आमदार साहेब, पुर्ण प्रयास करत आहेत. हा ठराव पास केला नंतर देखील त्याच्यावर अंमलबजावणी व्हावी म्हणुन आमदार साहेब प्रयत्न करणार आहेत, त्यांची पण रात्रीची झोप, चैन, सुख उडाले आहे. ते पण चिंतीत आहेत कारण या शहराने त्यांच्यावर जी जबाबदारी सोपविली आहे, त्यांना त्याची जाणीव आहे. आणि आम्ही आमच्या आमदार साहेबांना आग्रह देखील केला आहे. तुम्ही खासदार साहेब परांजपे त्यांना देखील सोबत घ्या. कारण हे शहर वाचले पाहिजे, शहरातील लोक वाचले पाहिजे. हा प्रश्न फक्त सिंधी समुदायाचा नाही आहे. हा प्रश्न राजस्थानी समाजाचा नाही, गुजराथींचा नाही, महाराष्ट्रीयनचा नाही, सिंधी किंवा पंजाबी समाजाचा नाही, शिखांचा नाही, मुसलमान बांधवांचा नाही, तर हे शहर सर्व लोकांचे शहर आहे, एक धर्मनिरपेक्ष शहर आहे. एक देशभक्त शहर आहे. अशा शहराची रक्षा, सभ्यतेची रक्षा, अशा शहराच्या संस्कृतीची रक्षा झाली पाहिजे. आताच आमच्या श्री. हरदास माखिजा साहेब, अर्धा पंजाब आम्हांला मिळाला नाही. मी हे म्हणु इच्छितो की, वीर सावरकर म्हणाले होते, जोपर्यंत सिंध प्रांत हिंदुस्थानाला मिळत नाही तोपर्यंत आपला देश स्वातंत्र नाही. त्यांना माहित होते की, सिंधी सभ्यता किती गरजेची आहे. त्यांना माहित होते की, सिंधी सभ्यतामुळे हिंदुस्तानात सभ्यता निर्माण झाली. त्याचे रक्षण झाले पाहिजे. म्हणुन सर्वात जास्त सिंधी समाज असलेले हे शहर आहे. देशात सिंधु धर्माचे हे पवित्र स्थळ मानले जाते. या धर्माची रक्षा करण्याकरीता आपल्याला सामुहिकरित्या एकत्र झालेच पाहिजे. शहराची जनता व्याकुळतेने पाहत आहे. शहराची जनता गोंधळलेली आहे. मदतीची आपल्याकडुन अपेक्षा करत आहे. इथे लिहिले गेले की, भयभित आहे. ज्यासाठी हरकत घेतली गेली. मला तर वाटते जनता भयभित नाही. जनता त्रासलेली आहे. हैराण आहे, मधुमेहाचे प्रमाण वाढले आहे. उच्च रक्तदाबाचे प्रमाण वाढले आहे. जर बुलडोझर लावुन इमारत पाडायला लागल्यावर काय माहित किती लोकांना हदयविकाराचा झटका येईल. ही गोष्ट मी तुम्हांला सांगतो, जनता इतकी हैराण आहे. म्हणुन जनतेची अडचण लक्षात घेवून कमीत कमी बारबालांकडुन एवढे तरी शिका त्या ७५,००० आहेत काही बांग्ला देशातुन आले आहे, ज्यांचा अधिकार नाही पुर्नवसनाचा त्या पण आपल्या अधिकारासाठी भांडतात. आणि महाराष्ट्र सरकारने झोपडपट्टीसाठी ज्या आरक्षित भुखंडावर बनवित आहे. त्यांना १९९५ पर्यंत आरक्षण दिले, आता २००५ चालु आहे. त्यांचे पुनर्वसनाचे काम चालु आहे. ही महापालिका इतकी सक्षम आहे की इमारतींना तोडुन झोपडे बनविण्यासाठी जागा देवु शकेल? नक्कीच नाही देवु शकत. कारण की शहराची हद्द मर्यादीत आहे. म्हणुन आपण आभाळाच्या दिशेने वर गेले. या विकासाला आम्ही कोणाची नजर नाही लागु देणार, अजिबात नाही, कधीच नाही. म्हणुन आपण सर्व मिळुन या विषयी आवाज उठवू. दुसरी गोष्ट एक कडक हरकत आहे, मी माझ्या तर्फे देतो की जी करवाढ झाली आहे. ती शहराच्या विकासासाठी झाली आहे. रस्ते, पाणी, दिवाबत्ती यांच्या विकासासाठी करवाढ झाली आहे, जागा तोडण्यासाठी नाही. या करीता नाही की, या पैशामधुन जेसीबी मशीन येईल, बुलडोझर येईल त्याचे घर, त्याचा आशियाना तोडुन जाईल. हा पैसा शहराच्या विकासासाठी दिला आहे. विनाशासाठी नाही. आपले घर ओसाड बनविण्यासाठी नाही. या भावनांना प्रस्तावाच्या माध्यमाने महाराष्ट्र शासनापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करेल. तुम्ही शहराला महासभा संपल्यानंतर देखील असे आव्हान कराल जेणेकरुन शहर एक मंचावर येईल. पार्टीबाजी दुर करुन आपण सर्वांनी एकत्र येवून संघर्ष केला पाहिजे. आपल्या हक्कासाठी आपल्यालाच लढा दयावा लागेल. जेव्हा आपण आपली लढाई आपण स्वत: लढवू तर अल्ला, ईश्वर, भगवान, खुदा पण आपल्याला मदत करेल. मदत केल्याशिवाय तो राहु शकणार नाही या दोन शब्दाबरोबर आपल्या वाणीला मी विराम देतो. जय हिंद , जय महाराष्ट्र, जय भिम, जय झुलेलाल.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :–</u> मा. आयुक्त महोदय, मा. महापौरजी, मा. उप–महापौरजी, सर्व सन्माननिय सदस्य आजच्या या विशेष महासभेमध्ये अनाधिकृत बांधकामाविषयीचा जो विषय आज चर्चेला आला आहे. ब–याचशा सदस्यांची भाषणे ऐकली.........

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:–</u> टाले साहेब, हिंदीत बोला.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :— ब—याचशा सदस्यांचे विचार ऐकले. मराठी समजते ना तुम्हांला? इथे एक मुद्दा विशेष प्रामुख्याने दिसला प्रत्येकाच्या भाषणामधुन एकच जाणवले खरे तर विस्थापीत लोकांचे हे स्थापित शहर त्याचे नाव आहे उल्हासनगर. ५८ वर्षाचे कारकिर्द असलेले हे उल्हासनगर शहर या विस्थापित लोकांचे येथे स्थापित झालेले आहे. ते पुन्हा विस्थापित होण्याच्या मार्गावर आहे. परंतु ब—याचशा वक्त्यांच्या चर्चेवरुन असे दिसले की, फक्त एकच समाज तेथे बरबाद होतो. एकच नाही तर संपुर्ण या शहरामध्ये राहणारा प्रत्येक वर्ग, प्रत्येक समाज येथे बरबाद होतो. उच्च न्यायालयात ८८५ किंवा ८५५ जे काही असेल ते फक्त तेवढेच गेलेले आहेत. खर तर निर्णय असा व्हायला पाहिजे होता की, संपुर्ण शहरातील प्रत्येक घर , शहराविषयी त्यांनी निर्णय घ्यायला पाहिजे होता. आणि हा निर्णय घेत असतांना ''चोर सोडुन सन्याशाला फाशी''. जो वर्ग गोर—गरीब आहे, जो वर्ग कष्टाने कमावुन खाणारा वर्ग आहे, अशा संपुर्ण तमाम समाजाच्या प्रत्येक वर्गाला येथे आज फाशी मिळण्याची वेळ आलेली आहे. मागच्या ४ महिन्यापुर्वी झोपडपट्टी वाशियांचा प्रश्न आला, श्री. विलासराव देशमुखांनी त्यावेळेस सांगितले की, १९९५ च्या झोपडपट्टया तोडणार. त्यावेळेस आम्ही मैदानात उतरलो, रणांगणात उतरलो. आरपीआयतर्फे मुंडन आंदोलन केले. ब—याचशा संघटना तेथे मैदानावर उतरल्या. आणि त्यावेळेस २००० पर्यंतच्या झोपडपट्टया वाचविण्याचे जे निर्णय घेतले गेले तो आता अंमलात आणला गेला. माझा मुद्दा असा आहे, झोपडपट्टीमध्ये राहणारा माणुसच आहे. बिल्डींगमध्ये राहणाराही माणुसच आहे. आणि जर घटनेनुसार प्रत्येक माणसाला अन्न, वस्त्र, निवारा ज्या मुलभुत गरजा देण्याचे कर्तव्य राज्य शासनाचे आहे. तर बिल्डींगमध्ये राहणा—या एक व्यक्तीला निवारा देण्याचे काम हे शासनाचे आहे. ''चोर सोडुन सन्यासाला फाशी''. आज आमचा कमाऊ वर्ग येथे विस्थापीत होणार आहे. व जबाबदार कोण आहे येथे? त्यांच्यावर काय कारवाई होईल? ८६ नंतरच्या बिल्डींगा घेतल्या तर परंतु आता पर्यंत हा जो निर्णय घेतला गेला त्यामध्ये कोण—कोण जबाबदार आहे? शासन जबाबदार आहे की प्रशासन जबाबदार आहे? कोण—कोण जबाबदार आहे? याच्यावर आपण काय कारवाई करणार? याचा कुठेही काही उल्लेख नाही आहे. आणि हे करुन विस्थापीत जे आज होणार आहे, तसे पाहिले तर संपुर्ण शहर आधीच विस्थापित व्हायला हवे होते. संपुर्ण शहरच्या शहर उचलुन दुसरीकडे न्यायला पाहिजे. आणि हे करत असतांना अंमलबजावणी करत असतांना आजही त्या नावाखाली तुमचे प्रशासन गोर—गरीब लोकांना नाडतंय. त्या नावाखाली धमक्या दिल्या जातात. भिती दाखविली जाते. बरेचसे गैरप्रकार होतात. याचा पण विचार घ्या. अनाधिकृत बांधकामाविषयी आपण चर्चा करतो, त्यावेळेस हा विचार होणे आवश्यक आहे. उल्हासनगर शहराची परिस्थिती अशी का आहे? पुर्वीपासुन चटई निर्देशांक बाबत जर आपण भांडलो असतो, तर कदाचित आज ही परिस्थती वेगळी झाली असती. डीपी प्लॅान विषयी जर आपण योग्य निर्णय घेतला गेला असता तर आज हा प्रश्न उभा राहिला नसता. आणि हे करतांना पुर्वी शासनाने इथे जे लोक राहतात त्यांच्या विषयी कुठलीही प्रक्रीया राबवत नाही, त्यांना चटई निर्देशांक देत नाही. तर राहणार कुठे? संपुर्ण महाराष्ट्रामध्ये नव्हे तर संपुर्ण भारतामध्ये सर्वात डॅम्प सिटी म्हणुन उल्हासनगरचे नाव घेतले जाते. आणि ही डॅम्प सिटी इथे त्या पध्दतीने असेल तर येथे अनधिकृत हा प्रकार होणार म्हणजे होणार. त्याला पर्याय काय करता येईल, अधिकृत कसे करता येईल? या विषयाची जर शासनाची योग्य भुमीका असती तर हा प्रश्न उभा राहिला नसता. आमची राज्य शासनाला पक्षातर्फे आणि संपुर्ण शहरातल्या संपुर्ण लोकांतर्फे आज राष्ट्रवादी वेगळया भुमीकेतुन जाणार, कॉग्रेस वेगळया, शिवसेना वेगळया, भाजपा वेगळया, आरपीआय वेगळया भुमीकेतुन चालणार उद्देश सर्वांचा एकच आहे. परंतु उद्देश एक असतांना सर्वांनी मिळुन जर आपण त्यावर जर राज्य शासनावर दबाव आणला त्यांच्याकडुन हा विस्थापीत होण्याचा प्रश्न सोडविला तर मला वाटते ते जास्त बरं होईल. आज नेमके ते होत नाही. आणि ठराव पास करुनपण नुसते काय होणार नाही. तर त्याच्यासाठी तुम्हांला रस्त्यावर उतरण्याची तयारी पाहिजे. जोपर्यंत आपण सर्व पक्षाचे लोक जर घेणार नसतील तर त्याचा उपयोग पण होणार नाही. मी सर्व पक्षांना जाहिर विनंती करेल, सर्व नेत्यांना जाहिर विनंती करेल की तुम्ही वेगवेगळया माध्यमातुन जाण्यापेक्षा सर्वांनी एकत्रितपणे जावुन, जसे श्री. लालवानी साहेब बोलले, संशोधन होणे जरुरीचे आहे. ते संशोधन करायला लावण्याची ताकद आपल्यामध्ये व इतर नेत्यांमध्ये तयार झाली पाहिजे. आज मी पुन्हा सर्वांना, परवा मी पुण्याला गेलो, आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. कवाडे साहेब, हा मुद्दा विधानपरिषदेमध्ये ते लवकरच घेणार आहेत, परंतु मला वाटते, एका पक्षाने लढण्यापेक्षा सर्व पक्षांनी जर एकत्रितपणे लढुन आणि फक्त कायदेशीर लढा नाही कायदेशीर बरोबर रस्त्यावर उठुन आंदोलन करण्याची तयारी जर आपण दाखविली तर मला वाटते, आपले हे शहर वाचु शकेल. या शहरातील लोक विस्थापित होणार नाही आणि हे होत असतांना ही सर्व प्रक्रिया राबवत असतांना तुमच्या प्रशासनाने इतर काही लोकांवर अन्याय करु नये. याची पण तुम्ही दक्षता घ्याल एवढी मी नम्र विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो.

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–** मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. लालवानी साहेब यांनी आपल्या संभाषणातुन उल्लेख केला आहे मा. खासदार साहेबांचा. मी या ठिकाणी सांगु इच्छितो, शिवसेनेच्या सर्व नगरसेवकांना आणि पदाधिका–यांना एक बैठक घेवून सन्माननिय खासदार साहेब यांनी आणि तसेच आमचे ठाणे जिल्हा प्रमुख मा. एकनाथजी शिंदे साहेब, ठाणे जिल्हयाचे आमदार यांनी सुध्दा आम्हांला वारंवार, या अगोदर जेव्हा पासुन वृत्तपत्रात ही बातमी ८५५ इमारती तोडण्याची सुरुवात झाली तेव्हा पासुन आमच्या बैठकी सुरु केल्या. निर्देशन दिलेले आहे, मार्गदर्शन केलेले आहे की, कुठल्याही परिस्थितीत या इमारती तुटत असतांना किंवा तोडत असतांना त्याच्या विरोधात जावुन आपल्याला जे काही आंदोलन करायचे असेल त्या आंदोलनास सामोरे जायला आपली तयारी असली पाहिजे. आम्ही सर्व या शहराचे रहिवाशी सर्व, उल्हासनगर मधील कुठल्याही जाती–जमातीचे लोक इमारतीत राहतात याला महत्व नाही. सर्वात जास्त महत्व माणुसकीला आहे. अशा विचाराने आम्ही या ठिकाणी संघटनेच्या माध्यमातुन काम करत आहोत. त्याचबरोबर सन्माननिय खासदार साहेबांनी सुध्दा मा. आयुक्त साहेब यांची भेट घेवुन शासनाला एक चांगला प्रस्ताव पाठविण्याचे त्यांनी या ठिकाणी सांगुन ठेवले आहे, आम्हांला सुध्दा या ठिकाणी मार्गदर्शन केलेले आहे. तर आज या ठिकाणी मी एवढेच सांगु इच्छितो की, सन्माननिय सदस्य श्री. धनंजय बोडारे यांनी सांगितलेले आहे, आम्ही आपल्या बरोबर ज्या प्रमाणे शिवसेना आणि भारतीय जनता पार्टी हे दोन्ही पक्ष आपल्या सोबत आहेत व त्याचबरोबर उच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही, याकडे लक्ष देवून व्यवस्थित प्रस्तावना पाठविण्याची कृपा करावी धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :–** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आज उल्हासनगरच्या अवैध निर्माणाबाबतची जी चर्चा चालली आहे, मी आपल्या तर्फे विंनती करु इच्छितो उल्हासनगरमध्ये नगररचनाकार श्री. शिंदे साहेब होते, त्यांनी बरेच इमारतीचे प्लॉन मंजुर केले होते. त्या बिल्डींगांना आजपर्यंत कम्पंलीशन सर्टीफिकेट मिळाले नाही. प्लॉन नुसार बिल्डींग बनविली आहे. तर मी महापौरांना विनंती करतो की, जर त्यांना कंम्पलीशन दिले तर त्या इमारती वैध ठरतील. नाहीतर अवैध ठरतील.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–** मी या विषयावर जास्त बोलु इच्छित नाही, कारण की, आमचे श्री. धनंजय बोडारे यांनी भाजपा व शिवसेनेचे जे धोरण आहे, ते स्पष्टपणे मांडले आहे. मी त्यांच्या या गोष्टीशी सहमत आहे की, ज्याप्रकारे आम्ही आधी ठराव पास केले होते त्याची जर अंमलबजावणी आमदार किंवा सत्ताधारी पक्षातर्फे झाली असती .........

**मा. महापौर :–** सत्तापक्षात आपण सुध्दा होते, आपण सुध्दा करु शकलो असतो.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–** तर आज हा दिवस बघायला नसता मिळाला. तरीपण श्री. बोडारे जे म्हणाले की, आम्ही सर्व तुमच्या सोबत आहोत. म्हणुन फक्त तुम्ही हे पहा, जसे त्यांनी संशोधन दिले की, कोणत्याही प्रकारचा असा उल्लेख ज्यात मुंबई उच्च न्यायलयाचे नाव आले आहे. त्यात जर थोडा बदल करावा ते योग्य राहील. अजुन एक संशोधन मी देवू इच्छितो की, ती गोष्ट ठरावात लिहिली गेली पाहिजे. माखिजा साहेब, विशेष करुन तुम्हांला सांगतो आपण हे पण सांगितले पाहिजे, जर लोक डिसप्लेस झाले तर या शहराची परिस्थिती अल्टरनेट अकमोडेशन देण्यासारखी नाही. या शहरात जी जमिनीची समस्या आहे, ती अशी आहे की, त्यासाठी पर्यायी काही व्यवस्था नाही. ते पण ठरावात लिहिले पाहिजे असा माझा सुझाव आहे. आणि हा ठराव जसे श्री. हरदास माखिजा हे म्हणाले की, ५ मिनिटे बसून जर नीट पाहिला तर मला असे वाटते तर काहीना काही उपाय निघेल. अजुन एक गोष्ट सांगायची राहिली आहे की, जसे इथे म्हणत आहेत की, सर्व राजकिय पक्षांनी आपापल्या तर्फे प्रयत्न केला पाहिजे. तसेच श्री. दिलीप गायकवाड म्हणाले, शिंदेजी विषयी बोलले, आम्ही दोन दिवसापुर्वी आपल्या पक्षातर्फे मा. श्री. नितीन गडकरीजी व श्री. गोपीनाथ मुंडेजी यांना पण भेटलो. त्यांना पण आम्ही आग्रह केला होता की या प्रश्नावर फक्त सरकारच मार्ग काढु शकते. शासनाने हायकोर्टात जावुन त्या विषयी पाऊल उचलले पाहिजे. होवू शकते की, खुप काही गोष्टी उच्च न्यायालयाच्या समोर गेल्या नसतील. तर सरकारचे कर्तव्य आहे, त्या सर्व गोष्टी त्यांनी न्यायालयाच्या लक्षात आणुन दिल्या पाहिजे. त्यांनी पण आम्हांला आश्वासन दिले की, आम्ही त्या बाबतीत मुख्यमंत्री महोदयांना पत्र देवु. त्यांच्याशी पण बोलु. व म्हणुन मी बोलतो की, आपण सर्व लोक या विषयावर एकत्र आहात.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** एक मिनिट, किशोरजी थोड त्यात वाक्य जोडतो. सुचनेत शासनाला असे पण आले पाहिजे की, यापुर्वी देखील आम्ही तुम्हांला प्रस्ताव पाठविले आहेत की, उल्हासनगरच्या जनतेची हालत ही आहे. त्यावर विचार का नाही केला गेला? त्याचेपण कारण पाहिजे. त्यासाठी जर आपण एखादे उदाहरण

प्रस्तावनेत दिले जसे खासदार साहेबांनी काल आम्हांला सांगितले, आंध्र प्रदेशात नायडु यांनी अनियमित बांधकामांना दंड आकारुन नियमित केले होते व आमच्या ठाण्यामध्ये श्री. सतिश प्रधान महापौर होते, वागळे इस्टेट मध्ये अशी बांधकामे झाली होती, त्यांच्यावर दंड आकारुन त्यांना नियमित केले होते. आंध्र प्रदेशात चंद्राबाबु नायडु मुख्यमंत्री होते. त्यांनी त्या अनाधिकृत बांधकामांना नियमित करुन त्या निधीमधुन त्या प्रदेशाचा काही विकास केला तसेच जर इथे करावे असा सुझाव प्रस्तावामध्ये शासनाला दयावा. आंध्र प्रदेशात होते, ठाण्यात होते, तर इथे का नाही? आजपर्यंत आपण लक्ष दिले नाही म्हणुन आज ही कारवाई होत आहे. हे जर निर्देश दिले की यासाठी जबाबदार आपण आहात. असे येथिल जनतेचे म्हणणे आहे. हे जर तुम्ही त्यांच्या लक्षात आणून दिले तर कदाचित यापुढे उल्हासनगरच्या जनतेचा रोष शासनावर नसावा म्हणुन लवकरात लवकर कारवाई करावी. प्रस्तावात जर हे जोडु शकत असाल तर जोडा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, सर्व सन्माननिय सदस्य आज जे अनाधिकृत बांधकामाला नियमित करण्यासाठी सभा बोलावली गेली आहे, मला असे वाटते की, उच्च न्यालयायाशी त्याचा संबंध जोडण्याचा काही प्रश्नच नाही. तो विषय बाजुला ठेवुन अनाधिकृत बांधकाम नियमित करण्याचा मुद्दा जेव्हा श्री. प्रल्हाद अडवाणी नगराध्यक्ष होते तेव्हा सुरु झाला. ७८ पासुन ८४ पर्यंत तेव्हा उल्हासनगरमधील बहुतेक बांधकाम दंड आकारुन नियमित केले गेले. जेव्हा महापालिका झाली तेव्हा ९७ मध्ये जेव्हा ठराव झाला. माजी महापौर श्री. हरदास माखिजा यांनी उल्लेख केला, ठराव क्र. २७ मध्ये सुध्दा सुचक– अनुमोदक सर्व पक्षाचे होते. सुचक होते श्रीमती पन्ना वारींगे, श्री. बी.बी. मोरे, श्री. हरदास माखिजा, अनुमोदक होते श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, श्री. भिमसेन मोरे, श्री. रामभाऊ आढाव सर्व पक्षाचे सदस्यांनी तो ठराव केला होता. त्यावेळेस ९७ मध्ये भाजपा–शिवसेनेचे राज्य होते. शिवसेनेचे महापौर होते. ९७ पासुन ते ९९ पर्यंत महाराष्ट्र शासनात देखील शिवसेना–भाजपाचे राज्य होते. तरी पण त्या ठरावावर दोन वर्षात काही अंमलबजावणी झाली नाही. तेव्हा पण थेट प्रक्षेपण होते. मा. महापौर श्री. गणेश चौधरी होते, त्यानंतर सुध्दा २ वर्ष सत्ता तुमची होती. तरी पण तुम्ही त्या ठरवावर काही कार्यवाही केली नाही. मला इथे दु:खाने म्हणावे लागते, वारंवार आमदार साहेबांचे नाव घेतले जाते, ५ व्यांदा खासदार साहेब सुध्दा निवडुन आले होते. ते थेट प्रधानमंत्रीशी बोलतात. उल्हासनगर शहर सुध्दा ठाणे क्षेत्रात येते. खासदार साहेबांनी सुध्दा या गोष्टीला गांभिर्याने घेतले नाही. मला दु:खाने म्हणावे लागते, त्यांनी पण सहयोग दिला पाहिजे. मी हिंदुहृद्य सम्राट जे भारतात एकमात्र असे नेते आहेत, श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे मी आभार मानतो. सर्वात प्रथम त्यांनी जाहिर केले की उल्हासनगर शहरात जर काही संकट आले तर सर्वात आधी आम्ही तेथे उभे असू. असे सर्व पक्षांनी उभे राहिले पाहिजे. आमदार साहेब २४ तास या विषयासाठी प्रयत्न करत आहेत. फक्त उच्च न्यायालयाने दिलेले अनाधिकृत बांधकामांचा संबंध नसुन संपुर्ण शहराच्या बांधकामाचा संबंध आहे. उच्च न्यायालयात बरेचसे स्टे वॅकेट झाले आहे. ९७ च्या आधी देखील हारले होते. तेव्हा पास करते वेळेस कोर्टाचा उल्लेख नव्हता. २००२ मध्ये ठराव केला होता, तेव्हा सुध्दा खुपसे स्टे वॅकेट झाले होते. आम्ही कधी कोर्टाचा उल्लेख केला नाही ना आज करायचा. ना आम्ही कोर्टा विरुध्द जात आहे. आज आम्ही महाराष्ट्र शासनाला अपील करत आहोत. आज राजकीय पक्षातर्फे करत आहोत. ही प्रस्तावना आपण मंजुर करत नाही. सर्व पक्षाचे लोक ज्यांना काही वाक्यांवर हरकत असेल किंवा काही अजून जोडायचे असेल ते सर्व करुन नंतर महाराष्ट्र शासनाला विनंती करु. मा. पालक मंत्री यांनी वर्तमानपत्रात स्टेटमेंट दिले होते की, अनाधिकृत बांधकामाचा मुद्दा फक्त उल्हासनगर शहराचा नसुन पुर्ण महाराष्ट्राचा आहे. तर अशा त–हेने एक प्रथा सुरु होईल. शासनाने उल्हासनगर बरोबर पुर्ण महाराष्ट्राचा विचार केला पाहिजे. पुर्ण महाराष्ट्राचा प्रश्न आहे. आज जसे २००० पर्यंत झोपडपट्टयांविषयी सरकार विचार करत आहे. आमचे जे बांधकाम आहेत ती २००० पर्यंत शासनाने नियमित केली पाहिजे. आणि जर आरक्षित भुखंडावर बांधकाम असेल तर त्याविषयीचे जे कायदे आहे त्या नुसार कार्यवाही झाली पाहिजे. परंतु महाराष्ट्र शासनाने मध्ये पडुन त्यावर मार्ग काढला पाहिजे. आजपर्यंत आपण २००२ मध्ये आम्ही ३ ठराव केले होते. एफएसआय १ ते ३ अनाधिकृत बांधकाम रेग्युलाईज करणे, व तिसरा होता बाल्कनी व स्टेअर केसचा होता. स्टेअर–केसचा एफएसआय ठाण्याला मिळतो, अंबरनाथला मिळतो, मंबईला मिळतो, बाल्कनी व स्टेअरसाठी लोक पैसे भरतात, त्यांना एफएसआय वेगळे मिळते. तो कायदा सुध्दा येथे लागु झाला पाहिजे. तसेच येथे नगररचनाकार नियमित नाही, महाराष्ट्र शासनाने येथे दिले पाहिजे. नगररचनाकारांचा एडीशनल चार्ज आहे, जसे श्री. विनोद ठाकूर यांनी मुद्दा उठविला होता. कंम्पलीशन सर्टीफिकेट दया. ती बांधकामे नियमित असुन देखील त्यांना का सर्टीफिकेट मिळत नाहीत. त्या सुविधा दिल्या पाहिजेत. मी समजतो की, जितके पण सदस्य आहेत, जे पण येथे बसले आहेत, त्यांच्या सर्वांच्या प्रभागात ही समस्या आहे. सर्वांनी जर हृदयावर हात ठेवून विचारले की, पुर्ण उल्हासनगरचा विषय आहे, महाराष्ट्राचा विषय आहे, भारताचा विषय आहे. या विषयावर गंभीरतेने विचार करुन महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव दिला पाहिजे की, त्यांनी आम्हांला मदत करावी, शहर ओसाड नाही झाले पाहिजे. जे

अनाधिकृत बांधकाम आहेत ते नियमित झाले पाहिजे. जसे आमचे बोडारे साहेब म्हणाले, हे ठाण्यात होवू शकते. चंद्रबाबु नायडु करु शकतात. अशा खुपशा सर्वोच्च न्यायालयाच्या जजमेंट आहेत. ज्यात सर्वोच्च न्यायालयाने लोकांना मदत केली आहे. उच्च न्यायालयाचे निर्णय आहे. महाराष्ट्र सरकाने खुपशा जागांबाबत अनाधिकृत बांधकामाविषयी विचार केला होता. आणि त्यांना न्याय दिला जसे ठाण्याला न्याय दिला आहे. आंध्र प्रदेशात तसेच इतर ठिकाणी न्याय दिला असेल. तसेच इथे देखील विशेष सवलती देवून उल्हासनगरमध्ये अनाधिकृत बांधकामांना पास केले पाहिजे. हे आज आम्ही अपिल करतो. महासभेच्या वर महाराष्ट्र शासन आहे त्यास ही महासभा विनंती करते की, उल्हासनगर वाशियांना मा. मुख्यमंत्री, उप–मुख्यमंत्री, पक्षांचे नेतागण, विरोधी पक्ष असो, गटनेता असो, सर्व पक्षाचे नेता गण, यांनी उल्हासनगरला मदत करावी. हे जे उल्हासनगर शहर दुविधेत फसले आहे, त्यातुन त्यांना काढा. आमचे मा. खासदार साहेबांना देखील आमच्या तर्फे व आपण आपल्यातर्फे विनंती करुन पुर्ण शहराचा मुद्दा आहे. सर्व वर्गाचे जातीचे लोक त्यात आहे. कृपया हरकती योग्य शब्द काढुन टाकुन सर्व पक्षांसोबत बसुन महाराष्ट्र शासनाला अपील करण्यासाठी मुद्दा आणला आहे. हे पहिल्यांदा नाही, ९७ मध्ये पण आले होते. त्यावर कार्यवाही केली जावी. ते ठराव लागु केले जावे. व उल्हासनगरवाशियांना सवलत दिली जावी. एवढीच सदनाला विनंती करतो. धन्यवाद.

<u>मा. सचिव:–</u> मा. महापौरजी यांचे म्हणणे आहे की, कुणास काही हरकत नसेल तर ही सभा १५ मिनिटासाठी स्थगित करण्यात यावी.

<u>काही सदस्य :–</u>ठिक आहे, ठिक आहे.

<u>मा. महापौर :–</u> ही सभा १५ मिनिटासाठी स्थगित करण्यात येत आहे.

पुन्हा काही कालावधीनंतर सभा सुरु करण्यांत आली.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :–</u> मा. महापौरजी, मी आपल्या अनुमतीने सदनाला सांगु इच्छितो की, जो ठराव आम्ही सदनात पास करु इच्छितो, सत्ताधारी पक्ष व विपक्ष यांनी तुमच्या बरोबर बसुन जी चर्चा केली आहे, त्यानुंसार आम्ही सचिवांना प्राधिकृत करतो की, आमच्या म्हणण्यानुसार ठराव केला जावा. व पारीत केला जावा. यात एका गोष्टीचे विशेष लक्ष दिले जावे की, उच्च न्यायालयाचा त्या ठरावात कोणत्याही त–हेने अवमान नाही झाला पाहिजे. ही गोष्ट विशेष करुन लक्षात ठेवावी.

<u>मा. महापौर :–</u>सचिवांकडुन तयार करण्यात आलेला प्रस्ताव खालीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

**विषय क्र. १** :–उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामांविरुध्द कारवाई वर विचार करणे व त्यांचे परिणामाबाबत दिशा ठरविणे.

<u>**प्रस्तावना**</u>

हिंदुस्तानची फाळणी होवून भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे निर्माण झाल्यानंतर सिंध प्रांतातातुन येणा–या भाषिक अल्पसंख्यांक निर्वासीतांचे तत्कालीन भारत सरकारने उल्हासनगरमध्ये पुर्नवसन केले. शहराचे सिमित क्षेत्र व वाढत्या लोकसंख्येमुळे उल्हासनगर शहरात अनाधिकृत बांधकामे वाढत गेल्याचे दिसुन येते.ही परीस्थिती ध्यानी घेउन शासनाने ही बांधकामे नियमानुकुल करण्याचा विचार केला होता.

अनाधिकृत बांधकामां संदर्भात श्री. हरी होतुमल तनवानी यांनी मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. १०५ / २००३ दाखल केल्याने त्या याचिकेत मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या दिनांक २७/४/२००५ रोजीच्या अंतरीम आदेशात उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील ८५५ इमारती व इतर अनाधिकृत बांधकामे निष्कासीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्या निर्देशाप्रमाणे उल्हासनगर महापालिका प्रशासनाने अनाधिकृत बांधकामे निष्कासीत करण्याची तयारी ठेवली असून ही अनाधिकृत बांधकामे निष्कासीत केल्यास त्याचे खालीलप्रमाणे दुरगामी परिणाम होतील.

११. लाखो लोक निर्वासीत होतील.
१२. शहराचे आर्थिक व सामाजिक स्थेर्यावर त्याचे दुरगामी परिणाम होतील.
१३. शांततेचा भंग होण्याचा संभव आहे.

१४. बांधकामे निष्कासीत करण्यासाठी महापालिकेस निधीची कमतरता पडु शकते.
१५. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो.
१६. निर्वासीत व बेरोजगार होणारे लोक गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळू शकतील.
१७. अशा इमारतीच्या संदर्भातील अनिष्ट गोष्टी, स्वच्छता विषयक दोष निर्माण होवू शकतात.
१८. सार्वजनिक आरोग्यावर घातक परिणाम होवू शकतात.
१९. महापालिकेकडे पुर्नवसनाची व्यवस्था नसल्याने मोठया प्रमाणावर राहाण्याचा प्रश्न निर्माण होउन अधिकृत कायदेशीर बांधकामे उपलब्ध नसल्याने लोकांना त्रास होणार आहे.
२०. पाकिस्तानातुन एकदा निर्वासीत झालेल्या लोकांना पुन्हा निर्वासीत होण्याची वेळ येणार आहे.

वरील सर्व परिणामांचे दृष्टीकोनातुन शासनास लोकांच्या हितासाठी कल्याणकारी योजना किंवा दिशा ठरविण्यासाठी लोकांचे हित संवर्धनासाठी करावयाची उपाययोजना व आपली बाजु मा. मुंबई उच्च न्यायालयात मांडणे आवश्यक आहे त्यामुळे शासनाकडे कोणतीही माहिती प्रतिवृत्त, स्पष्टीकरण, आकडेवारी इत्यादी पुरविणे विषयी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली खालील ३५ सदस्यीय समितीची रचना करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | नाव | | पदनाम |
|---|---|---|---|
| १. | सौ. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी | महापौर | अध्यक्ष |
| २. | श्री. विनोद तलरेजा | उप—महापौर | सदस्य |
| ३. | श्री. किशोर वनवारी | सभागृह नेता | सदस्य |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर (महाराज) | विरोधी पक्षनेता | सदस्य |
| ५. | श्री. दिलीप लालवानी | गटनेता (रा.कॉ.प.) | सदस्य |
| ६. | श्री. मोहन बेहराणी | गटनेता (कॉग्रेस) | सदस्य |
| ७. | श्री. दिलीप गायकवाड | गटनेता (शिवसेना) | सदस्य |
| ८. | श्री. लाल पंजाबी | गटनेता (भा.ज.पा.) | सदस्य |
| ९. | श्री. प्रमोद टाले | गटनेता (रि.पा.ई.) | सदस्य |
| १०. | श्री. अशोक बोधा | | सदस्य |
| ११. | डॉ.(श्री.) रोचलाणी | | सदस्य |
| १२. | ॲड..(श्री.) एन.के. सोनेजी | | सदस्य |
| १३. | ॲड..(श्री.) संभाजी पाटील | | सदस्य |
| १४. | ॲड.(श्री.) एन.बी. अडवाणी | | सदस्य |
| १५. | ॲड.(श्री.) भोजराज जेसवानी | | सदस्य |
| १६. | श्री. विजय ताराणी | अध्यक्ष रोटरी क्लब | सदस्य |
| १७. | श्री. जे.के. डोके | अध्यक्ष उल्हासनगर आर.पी.आय. | सदस्य |
| १८ | श्री. दिपक गाजरीया | | सदस्य |
| १९. | श्री. मनोहर जेसवानी | | सदस्य |
| २०. | श्री. गोप पेसवाणी | | सदस्य |
| २१. | श्री. राजेश टेकचंदानी | | सदस्य |
| २२. | श्री. एन. रमेश | | सदस्य |
| २३. | श्री. नरेंद्र राजानी | | सदस्य |
| २४. | श्री. प्रकाश माखिजा | | सदस्य |
| २५. | श्री. कुमार आयलाणी | | सदस्य |
| २६. | श्री. अमरलाल छाब्रिया | | सदस्य |
| २७. | श्री. गोवर्धन गिडवाणी | | सदस्य |
| २८. | श्री. धनंजय बोडारे | | सदस्य |
| २९. | श्री. राहू अहूजा | | सदस्य |
| ३०. | श्री. विनोद ठाकुर | | सदस्य |
| ३१. | श्री. हरदास ठारवाणी | | सदस्य |
| ३२. | श्री. हरदास माखिजा | | सदस्य |
| ३३. | श्री. बुलचंद सोनेसर | | सदस्य |
| ३४. | श्री. गिरधर मलानी अध्यक्ष उमा | | सदस्य |
| ३५. | श्री. सुरेश रुपचंदानी अध्यक्ष रोटरी क्लब मिड टाउन | | सदस्य |

सदरहू याचिकेत शासन प्रतिवादी असून शासनाने जर मा.मुंबई उच्च न्यायालयात आपली बाजु मांडली तर बांधकामे निष्कासनामुळे लोकांवर होणा–या दुरगामी परिणामाची तिव्रता कमी होईल व मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची योग्य प्रमाणे कार्यान्वीता करता येईल म्हणून महासभेपूढे प्रस्तावित.

**विशेष महासभा ठराव क्र. १०** **दिनांक :–** २०/५/२००५

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :–श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेप्रमाणे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली वर उल्लेख केलेल्या ३५ सदस्यीय समितीची रचना करीत आहे व शहरातील अनधिकृत बांधकामे हटविण्याच्या परिणाामांचे दृष्टीकोनातुन लोकांचे हित संवर्धनासाठी शासनास आपली उपाययोजना व बाजु मुंबई उच्च न्यायालयासमोर मांडण्यास नम्र विनंती करीत आहे.

सुचकाची सही /–
अनुमोदकाची सही/–

एकमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :– ही सभा येथे समाप्त होत आहे. मा. महापौरांच्या आदेशान्वये दुसरी सभा आरंभ करण्यांत येत आहे.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२० जुन, २००५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/६/२००५ रोजीच्या तातडीची विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची तातडीची विशेष महासभा सोमवार दिनांक २०.०६.२००५ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ४०. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ४१. | श्रीमती माने किरण |
| ५. | श्री. सोनवणे नथु | ४२. | श्री. चव्हाण रमेश |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४३. | श्री. जाधव प्रशांत |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना | ४४. | श्री. जाधव सुरेश |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४५. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४६. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ४७ | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४९. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १३ | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ५०. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १४. | श्री. एडके गणपत गोविंद | ५१. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५२. | श्री. भालेराव गौतम |
| १६. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५३. | श्रीमती वसिटा बेबी |
| १७. | श्री. उमाप रामदास | ५४. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५५. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १९. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५६. | श्री. अंकुश म्हस्के |
| २०. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५७. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २१. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५८. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २२. | श्रीमती अनिता गुप्ता | ५९. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २३. | श्री. पवार नाना | ६०. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २४. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ६१. | श्रीमती भटिजा कोमल |
| २५. | श्री. जग्यासी राजु | ६२. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २६. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६३. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २७. | श्री. निकम शांताराम | ६४. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २८. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६५. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २९. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६६. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३०. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६७. | श्रीमती छाब्रिया भारती |
| ३१. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६८. | श्री. संजय रामचंद्र बठीजा, |
| ३२. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३३. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ७०. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| ३४. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७१. | श्रीमती करोतिया मालती |
| ३५. | श्री. साधवानी मोहन | ७२. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३६. | श्रीमती जया साधवानी | ७३. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३७. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ७४. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३८. | श्रीमती भावना खिलनानी | ७५. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३९. | श्री. बच्चाराम रुपचंदानी | | |

तर,
मा.सदस्य / सदस्या १. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल, २. श्रीमती माखिजा किरण, ३. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास, ४. श्री. हरदास माखिजा, ५. श्री. वदरीया राजेश नानिकराम, ६. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन दुपारी ३.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

**विषय १ :—उल्हासनगर शहरातील पाणी टंचाईवर उपाय योजना करणे.**

**मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—** मा. महापौर, मा. आयुक्त, मा. सचिव व सभागृहात उपस्थित सर्व सदस्य पाणी पुरवठयात सुधारणा होण्यासाठी विरोधी पक्षातर्फे विशेष महासभा बोलावण्याची मागणी करण्यात आली होती. परंतु मला दु:खाने म्हणावे लागत आहे की, गंभीर समस्या असतांना देखील एक महिन्याने बैठक बोलाविण्यात आली आहे. ती देखील तेव्हा बोलावली जेव्हा आम्ही सचिवांना विचारले की, आम्ही बैठकीचे पत्र दिले होते, त्याचे काय झाले? आम्ही विचारल्यानंतर त्वरीत आजच्या बैठकीची सुचना आम्हांला प्राप्त झाली. मला कळत नाही की, शासन व प्रशासन काय करत आहे? आजपासुन दोन महिन्यापुर्वी आमचे सभागृह नेता श्री. किशोर वनवारी, सत्ताधारी पक्षाचे श्री. सतरामदास जेसवानी, व त्यांचे अन्य सदस्य पाणी पुरवठा कार्यालया बाहेर उपोषणाला बसले होते. एका दिवसातच उपोषण पुर्ण केले जाते. काय झाले, उपोषण कसे काय पुर्ण झाले त्यामध्ये आम्ही जात नाही. आम्ही प्रशासनाला वारंवार विनंती करतो की, आमच्या विभागात पाण्याची टंचाई आहे. यावर एकच उत्तर मिळत होते की, एम.आय.डी.सी. कडुन पाणी कमी येते. आम्ही जेव्हा आयुक्तांशी बोलतो तेव्हा ते सांगतात की, एमआयडीसीचे पैसे देणे बाकी आहे. त्यामुळे पाणी पुरवठा कमी होत आहे. आम्ही जेव्हा कार्यकारी अभियंत्यांशी बोलतो तेव्हा ते सांगतात की, तिसरी जलवाहिनी कल्याणला दिली आहे. त्यामुळे आपणांस पाणी कमी मिळत आहे. शासन व प्रशासन यामध्ये काय ताळमेळ आहे हे आम्हांला समजुन येत नाही. यासाठी आम्ही आजची बैठक बोलावली आहे. मी आयुक्तांना विनंती करतो की, त्यांनी आजची व तीन महिन्यापुर्वीची पाण्याची परिस्थिती काय होती ते सांगावे. आजही आमच्या विभागात अशा काही जागा आहेत जेथे पाणी येत नाही. जेव्हा आम्ही उप—अभियंत्यांना विचारतो तेव्हा ते सांगतात की, आमच्याकडे पुष्कळ पाणी आहे. मी हे विचारु इच्छितो की, उल्हासनगर कॅम्प नं. १ व २ मध्ये किती द.ल.लि. पाणी येते व कॅम्प नं. ४ व ५ मध्ये किती पाणी येते? कारण १९ मार्चला ज्यावेळी स्थायी समिती सदस्यांची निवडणुक होती, त्यावेळी येथे महापौर महोदयांनी एक घोषणा केली होती की, पाणी समस्येवर तोडगा काढण्यासाठी एक उच्च स्तरीय बैठक सुरु आहे. त्यानंतर कॅम्प नं. ४ व ५ ची पाणी समस्या दुर होईल, त्यानंतर ३८ द.ल.लि. पाणी उपलब्ध होईल. तर आपणांस तेवढे पाणी आता प्राप्त झाले आहे काय? मी प्रशासनाला विनंती करेन की, त्यांनी आजची परिस्थिती काय आहे ते सांगावे. कॅम्प नं. ४ व ५ ला ३८ द.ल.लि. पाणी मिळाले का ते देखिल सांगावे. त्यानंतर ज्या ज्या ठिकाणी पाणी टंचाई आहे, त्या विभागांची नावे मी येथे सांगेन.

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—** मा. महापौर, आयुक्त व उपायुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्य, गेल्या अनेक दिवसांपासुन कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची समस्या भेडसावत आहे. आपणांस काही दिवसांपूर्वी पाणी समस्येबद्दल सन्माननिय खासदार श्री. प्रकाश परांजपे साहेब यांनी भेटून चर्चा केली आहे. त्यांनतर आपण आश्वासन दिले की, कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची जी समस्या आहे, ती लवकरात लवकर संपुष्टात आणण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. परंतु अजुनपर्यंत कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची समस्या गेल्या ३ वर्षापासुन भेडसावत आहे. तेथिल नागरीकांना पाण्याची जी टंचाई सोसावी लागते, त्यापासुन त्यांची सुटका झालेली नाही. तरीपण आपण याची काय उपाययोजना करणार आहात ते आम्हांला सांगाल अशी आम्ही विशेष महासभा बोलावून आपणांस याठिकाणी विनंती केलेली आहे.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप:—** मा. महापौरजी, उपमहापौरजी व आयुक्त साहेब, मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, पाणी पुरवठा विभागाचे जे अधिकारी आहेत, त्यांना मला काही विचारायचे आहे. तर त्यांना वर बोलाविण्यात यावे अशी माझी त्यांना विंनती आहे.

**मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—** मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्यांनी त्यांचे जे काही प्रश्न आहेत, ते सभागृहासमोर ठेवावे, आम्ही ते नोंदवुन घेवू व सरतेशेवटी मी व माझे सर्व अधिकारी सर्वांना एकत्र उत्तर देवु.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—** ठिक आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, पाण्याच्या समस्येबाबत मी आपल्या संबंधीत अधिका—याला किती वेळा भेटून किती वेळा विनंती केली आहे? आपण उत्तर देवु शकता. जर आपले अधिकारी वर येवू इच्छित नसतील तर आपण उत्तर दयावे.

**मा. आयुक्त :—** मा. महापौर महोदया, सदस्यांचा प्रश्नच असा आहे की, त्यांनी कितीवेळा अधिका—यांची भेट घेतली. याचे उत्तर त्यांना स्वत:ला माहिती आहे. त्यामुळे त्यांनी त्याचे उत्तर दयावे.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—** हीच तर गोष्ट आहे. जर मी सांगितले की, १०० वेळा, १५० वेळा भेटलो तर आपण ते मान्य कराल का?

**मा. आयुक्त :—** आपले काय म्हणणे आहे, ते आपण सांगु शकता. १०० वेळा भेटले, १५० वेळा भेटले तरी त्याचे उत्तर आम्ही देवु. आपण भेटल्यानंतर आम्ही काय कारवाई केली ते देखिल सांगु.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—** या विषयावर मी एवढेच सांगु शकतो की, माझ्या प्रभागातील पाणी समस्येबाबत गेल्या दिड वर्षापासुन मी पाठपुरावा करीत आहे. पाण्याच्या टंचाईमुळे दोन—तीन वेळा मोर्चे व उपोषण देखील झाले. मोर्चात मला जे आश्वासन दिले होते, त्याची पुर्ती गेल्या दिड वर्षात झालेली नाही. माझ्या प्रभागात जलवाहिन्या टाकण्याचे काम देखील ८—१० महिन्यापुर्वी मंजुर झाले आहे. परंतु त्याचे एकही काम अदयाप सुरु झालेले नाही. पाण्याच्या टंचाई बाबत जनतेचा जो रोष आहे तो नगरसेवकाला दररोज झेलावा लागत आहे. हा त्रास मला अजुन किती दिवस सहन करावा लागेल याचे उत्तर दयावे. तसेच माझ्या प्रभागात पाण्याची जी टंचाई आहे, जलवाहिनेचे जे काम आहे, त्याबद्दल आयुक्तांना मी दोन वेळा पत्र लिहिले आहे. त्यानंतर तीन—चार दिवसापुर्वी शहर अभियंता यांना देखील मी पत्र लिहिले आहे. त्या पत्रात मी त्यांना स्थळ पहाणी करुन कारवाई करण्याची विनंती केली होती. परंतु त्यानंतर देखील काहीच झाले नाही. तर प्रशासन कशा प्रकारे काम करीत आहे हे दिड वर्षाच्या अनुभवावरुन सिध्द होते. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—** मा. महापौर, मा. आयुक्त आपण सर्वांचे उत्तर नंतर एकत्रितरित्या देणार आहात का? मागच्या वेळी असे झाले की, आपण उत्तर पुर्ण देत नाहीत. मध्ये—मध्ये गाळतात. मागच्या वेळचा आमचा असा अनुभव आहे की, तुम्ही नेमकेच उत्तर देतात, आणि नंतर म्हणतात आम्ही उत्तर दिले आहे. आपण एक—एक उत्तर दिले तर बरे होईल.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—** मा. महापौर, उप—महापौर , आयुक्त व सचिव महोदय, सर्वप्रथम मी आपणांस धन्यवाद देतो कारण आज या सभागृहात आपण कुलर लावले आहेत, एसी देखील लवकरच लागतील. पाण्याच्या टंचाईसाठी आमच्या विरोधी पक्षाच्या सदस्यांनी विशेष बैठक बोलावली आहे. त्यामध्ये आम्ही सर्व उपस्थित आहोत. आता येथे श्री. बच्चाराम रुपचंदानी जे सभागृहातील वरीष्ठ सदस्य आहेत, चांगले नगसेवक आहेत, अनुभवी आहेत, त्यांनी सांगितले की, आमचे सभागृह नेता श्री. किशोर वनवारी व सतरामदास जेसवानी यांनी पाणी पुरवठा कार्यालयाबाहेर उपोषण केले होते. ही वस्तुस्थिती आहे. आम्ही सभागृहात खाली जमिनीवर देखील बसलो होतो, कदाचित हे सांगण्याचे विसरले असतील, ही देखील वस्तुस्थिती आहे. परंतु तेव्हा परिस्थिती वेगळी होती. आता वेगळी आहे. तेव्हा पाण्याची टंचाई खरोखर होती. आम्ही हे देखील विचारात घेतले नाही की, आम्ही सत्तापक्षात आहोत. आम्ही त्याचा विरोध केला होता, प्रशासनाला घेराव घातला होता. शासनात असतांना देखील शहरासाठी आम्ही मर्यादेचे उल्लंघन केले होते. आम्ही उपोषण देखील केले होते व उग्र आंदोलन करण्याची सुचना देखील दिली होती. परंतु त्यावेळी खरोखरच पाण्याची टंचाई होती. मी प्रशासनाला व शासनाला धन्यवाद देतो की, आपण पाणी पुरवठा योग्य रितीने होण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहे. याचा एक पुरावा म्हणजे एवढया महिन्यात पाण्यासाठी कुणीही हंडा मोर्चा काढला नाही, धरणे नाही, प्रदर्शने नाही, सर्व सामान्य जनतेत पाण्यासाठी असंतोष नाही. एखादे वर्तमानपत्र बघितले तरी दिसुन येईल की, कच—यासाठी लिहिले असेल, जकातीसाठी कुणी लिहिले असेल अथवा अन्य विषयी लिहिले असेल. परंतु पाणी पुरवठा कमी आहे अशी कुठेही बातमी नाही. याबद्दल आम्ही शासनाला व प्रशासनाला धन्यवाद दयायला पाहिजे. दुसरे म्हणजे सहारा टिव्हीवर काही दिवसांपुर्वी आमचे महापौर व विरोधी पक्ष नेता हे चर्चा करीत होते. त्या चर्चे

दरम्यान देखील हा मुद्दा उपस्थित झाला होता. त्यावेळी महाराज भुल्लर यांनी देखील स्विकारले होते की, पाण्याची आता पुर्वीप्रमाणे टंचाई नाही. त्यावेळी आमच्या महापौर महोदयांनी त्यांच्या निदर्शनास आणले होते की, जेथुन मुख्य जलवाहिनी जाते, तेथे आपला प्रभाग आहे. त्यामुळे आपल्या प्रभागात कधीही पाणी टंचाई होत नाही. पुर्ण शहराला प्यायला पाणी नसले तरी आपल्या प्रभागात मुबलक पाणी असते. यासाठी त्यांनी महापौरांना धन्यवाद देखील दिले होते. आता श्री. रमेश चव्हाण देखील येथे बोलले परंतु माझ्या माहितीप्रमाणे त्यांच्या प्रभागात देखील पुष्कळ पाणी आहे. श्री. बच्चाराम रुपचंदानी यांच्या प्रभागात किती जास्त पाणी आहे, याचे एक उदाहरण मी आपणांस देतो. जेव्हा श्री. ठाकुरदास बेहरानी हे स्थायी समिती सभापती होते, त्यावेळी त्यांच्या प्रभागात एक चार इंचाची जलवाहिनी होती ज्यावरुन टॅंकर भरुन त्यांनी पुर्ण शहराला पाणी पुरवठा केला जात होता. तेथे खोदुन ती जलवाहिनी काढली होती. मी परवा बघितले की त्याटिकाणी पुन्हा जलवाहिनी टाकली आहे व तेथुन पुन्हा टॅंकर भरले जात आहेत व व्यापारी दराने विकले जात आहेत. पाण्याच्या समस्येसाठी जी ही विशेष महासभा बोलावली आहे, ती बोलाविण्याचे काही औचित्य नव्हते. जर काही विभागात थोडीफार पाण्याची टंचाई असेल तर त्यासाठी हे आयुक्त महोदयांच्या दालनात जावुन ही समस्या सोडवु शकले असते.

**यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळून येत नव्हते.**

**मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर, श्रीमती भावना खिलनानी, श्रीमती लक्ष्मीबाई ससाने, श्रीमती बेबी वसिटा यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– आपणांस बोलण्याची संधी मिळेल. मला माझे म्हणणे पुर्ण करु दया. काही विभागात पाण्याची समस्या आहे. याचे कारण काही ठिकाणी वितरणाची समस्या आहे. पाण्याची या शहरात अजिबात कमतरता नाही. वितरणाकडे प्रशासनाने लक्ष दयावे. परंतु त्याच नगरसेवकांनी येथे बोलावे ज्यांच्या प्रभागात पाण्याची खरोखर समस्या आहे. परंतु ज्यांच्यावर झुलेलालची कृपा आहे, ते नगरसवेक जर बोलले की, पाण्याची कमतरता आहे, तर मला असे वाटते की ते योग्य होणार नाही. जर प्रशासन योग्य प्रकारे काम करीत नसेल तर त्यांना घेराव करणे हे आपले काम आहे. परंतु प्रशासन ज्यावेळी चांगल्या प्रकारे काम करते, त्यावेळी त्यांची पाठ थोपटणे हे देखील आमचे काम आहे. जेणेकरुन त्यांचे मनोबल उंचावुन ते चांगल्या प्रकारे काम करु शकतील. या विशेष सभेत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा गटनेता म्हणुन मी प्रशासनाला अनुरोध करेन की, ज्या विभागात पाणी जात नसेल त्या प्रभागात लक्ष देण्यात यावे. वितरण प्रणाली सुधारण्यात यावी. जर एखादया नगरसेवकाच्या प्रभागात ६ तास पाणी येत असेल, एखादयाच्या ३ तास येत असेल तर दोघांच्या प्रभागात ४–४ तास पाणी कसे येईल. याकडे थोडे लक्ष दयावे. अन्यथा पाण्याची टंचाई एवढी नाही जेवढी दाखविली जात आहे. यासाठी मी शासनाला व प्रशासनाला येथे धन्यवाद देतो. आमचे पाणी पुरवठा विभागाचे जे अधिकारी आहेत, ते फार मेहनत करीत आहेत यामध्ये काही संशय नाही. हे योग्य होणार नाही की, एखादयाने १०० वेळा बोलाविले तरी जायचे नाही. माझी पाणी पुरवठा विभागातील अधिका–यांना विनंती आहे की, जर आपणांस कुणी बोलवत असेल तर आपण त्यांच्याकडुन लेखी पत्र घेवुन लेखी उत्तर दयावे. जेणेकरुन आपणावर कुणी असे आरोप लावु शकणार नाही. ही जी विशेष बैठक बोलावली आहे, यामध्ये आमचे निवेदन आहे की, जर एखादया विभागात पाणी पुरवठा होत नसेल, तर असे विभाग शोधुन तेथे पाणी पुरवठा करावा. जेणे करुन पुर्ण शहरात सर्वांना पाणी पुरवठा होईल. तसेच या ठिकाणी फक्त त्यांनीच बोलावे. ज्यांच्या विभागात खरोखर पाणी पुरवठा होत नाही. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः– मा. महापौर, उप–महापौर व आयुक्त साहेब, मी पाण्यासाठी बोलणार नाही, कारण माझ्या प्रभागात पुष्कळ पाणी आहे. परंतु एका गोष्टीसाठी यांना शुभेच्छा देईन कारण यांनी मानले की, जकातीत चोरी होत आहे. वर्तमानपत्रामध्ये जकातीबाबत येत आहे, जकातीमध्ये चोरी होत आहे. ही गोष्ट एनसीपीच्या गटनेत्यांनी मानली याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. कचरा उचलला जात नाही, हे देखील वर्तमानपत्रामध्ये येत आहे. ही गोष्ट मानल्याबदृदल देखील मी त्यांना धन्यवाद देतो.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– माझा हरकतीचा मुददा आहे. ही विशेष महासभा पाणी पुरवठयाच्या विषयावर बोलावली आहे.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळून येत नव्हते.

मा. सदस्या श्रीमती भावना रामचंदानी, श्रीमती दिपा पंजाबी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– ओरडु नका, आम्हांला देखील ओरडता येते. ही बैठक पाणी पुरवठयासाठी आहे. पाणी पुरवठयाबद्दल कुणाचीही तक्रार नाही.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :– पाण्याबद्दल आम्ही सर्व खुश आहोत.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :– मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब मी फक्त एनसीपी गटनेत्यांना शुभेच्छा देवु इच्छितो की, त्यांनी जकातीमध्ये चोरी होते हे मानले आहे. पाणी पुरवठया बद्दल वर्तमानपत्रात येत नाही म्हणजे काही तक्रार नाही हे ते मानतात. मग जकातीबाबत वर्तमानपत्रात येते याचा अर्थ जकातीमध्ये चोरी होत आहे. कच–याबद्दल देखील तसेच आहे.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :– आपण कॅसेट ऐकु शकतो, त्यामध्ये मी जकात चोरी होत आहे असे बोललो नाही. वर्तमानपत्रात जकातीवर, कच–यावर लेख येतात परंतु पाणी प्रश्नावर काही येत नाही असे मी बोललो होतो.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– जकात व कच–यावर बैठक बोलवा आम्ही त्याला येवु.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– येथे चर्चासत्र सुरु आहे का?

मा. महापौर :– कृपया जकातीच्या विषयावर बोलु नये. येथे तो मुद्दा नाही. जकातीवर लक्षवेधी सुचना आली आहे, त्यावर नंतर चर्चा होईल.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :– मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, श्री. दिलीप लालवानी हे सत्ताधारी पक्षाचे गटनेता असतांना देखील गोष्ट फिरवुन बोलत आहेत. मला असे वाटते की, यांच्या प्रभागात पाणी फार जास्त येत आहे, म्हणुन ते असे बोलत आहेत. तुम्ही माझ्या प्रभागात येवुन बघा. मी आयुक्त साहेबांना देखील सांगितले की, माझ्या प्रभागात पाणी येत नाही. लोक मोटार लावुन पाणी भरतात, त्यांना लाईटचे बिल किती येत आहे ते बघा. आजही माझ्या प्रभागात पाणी नाही आहे. तुम्ही माझ्या प्रभागात फिरुन बघा. श्री. चाफेकर व श्री. सभागानी यांना मी माझे प्रभागातील पाणी टंचाई बद्दल सांगितले आहे. एक टॅंकर येतो त्यानंतर पुन्हा दुसरा टॅंकर येतो. तुम्ही जावुन बघा तिकडे काय होत आहे. ते लोक पाण्याचे बिल भरत नाही का?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :– ज्याला प्रभाग असतो त्याला पाणी आहे अथवा नाही हे माहिती पडते.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :–पाण्याची एवढी समस्या असतांना आपण फिरुन न बोलले तर योग्य होईल.

मा. उप–महापौर श्री. विनोद तलरेजा हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–मा. महापौर व आयुक्त साहेब, पाण्याच्या विषयावर आज ही जी सभा ठेवली आहे, तर मी कमीत कमी एक वर्षापासुन माझ्या प्रभागातील बॅरेक क्र. ११३ येथिल पाण्याच्या टंचाई बाबत मी अधिका–यांना अवगत केले आहे. संपुर्ण वार्डात त्यांना फिरविले आहे. परंतु आजपर्यंत तेथे पाण्याची टंचाई आहे. तेथे टॅंकर देखील दिले जातात. श्री. दिलीप लालवानी यांनी सांगितले की, पाण्याची टंचाई नाही. हे म्हणणे असे झाले की, आंधळयांमध्ये चकणा राजा. जर सगळे आंधळे असतील व एक चकणा असेल तर चकण्याला राजा केले जाते. पाण्याची कमतरता आजही शहरात आहे. परंतु सत्ताधारी पक्षाला हे का दिसत नाही. मी याबद्दल श्री. सतरामदास जेसवानी यांचे उदाहरण देतो, ज्यांनी १५ दिवसांपुर्वी त्यांचे प्रभागात पाणी

नसल्याने उपोषण केले होते. जर पाण्याची टंचाई नसती तर त्यांनी उपोषण का केले असते? ते एक चांगले नगरसेवक आहेत. त्यांनी उपोषण केले म्हणजे नक्कीच समस्या असेल. जर पाण्याची समस्या नसती तर मागील १५ दिवसात टॅंकर बंद झाले असते. तुमच्या रेकॉर्ड प्रमाणे आजही टॅंकर सुरु आहे. ३० तारखेला जेव्हा टॅंकर बंद होतील तेव्हा खरी समस्या समोर येईल. मला कळत नाही की, सत्ताधारी पक्ष पाणी समस्येकडे दुर्लक्ष का करत आहे? पाणी समस्या नसेल तर टॅंकर फुकट का देण्यात येत आहे. पैशाचा अपव्यय होत आहे. अशा समस्या ब—याच ठिकाणी आहेत, परंतु सत्ताधारी पक्षाला त्या माहित नाही. त्या समस्या अवगत करण्यासाठी आम्ही ही बैठक ठेवली आहे. मी निवेदन करेन की, समस्येवर चर्चा करावी. व आमचे जे अधिकारी आहेत, यांना आम्ही काम सांगतो. काम सांगितल्यावर ते त्यावर दुर्लक्ष करतात. छोटी—छोटी कामे करण्यासाठी एक वर्ष लागते. जर २५,००० मध्ये काम होवू शकते तर ते न करता एक वर्ष टॅंकर त्या ठिकाणी पाठविण्यात येतात व एका वर्षात टॅंकरवर ७५,००० खर्च करण्यात येतो. अशा प्रकारे आपल्या शहरात पैसे वाया जात आहे. थोडया दिवसांपुर्वी आम्ही कोटा शहरात प्रशिक्षणासाठी गेलो होतो. मा. महापौर महोदया देखील आमच्या सोबत होत्या. कोटा सारखे शहर जे राजस्थानमध्ये आहे. जेथे पाण्याची टंचाई असायला हवी. परंतु त्या प्रदेशात जेथे भारतीय जनता पार्टीचे सरकार आहे, तेथे २४ तास पाणी पुरवठा होतो, एक मिनिट देखील पाणी बंद होत नाही. जेव्हा आम्ही अधिका—यांना याबद्दल विचारणा केली तेव्हा त्यांनी आम्हांला एक उदाहरण दिले की, या शहराची लोकसंख्या ८ लाख आहे, आम्ही येथुन एक रुपयाही मालमत्ता कर घेत नाही, राजस्थानमधील हे एक असे शहर आहे जेथे कोणाकडुनही, दुकानदारांकडुनही मालमत्ता कर घेतला जात नाही. तेथे जकातही नाही, परंतु २४ तास पाणी पुरवठा केला जातो. आम्ही जेव्हा त्यांना विचारले की, तुम्ही २४ तास पाणी पुरवठा कशाप्रकारे करता? तेव्हा त्यांनी सांगितले की, जर आम्ही एक तास पाणी दिले तर पाण्याचा जो खप आहे, तो २४ तासात जेवढा वापर होईल, त्यापेक्षाही जास्त होईल. पाण्याची टंचाई असल्यास लोक पाण्याचा साठा करुन ठेवतात व दुस—या दिवशी पुन्हा पाणी आल्यावर साठविलेले पाणी फेकुन देतात कारण ते ताजे पाणी वापरु इच्छितात. असे केल्याने पाण्याचा वापर जास्त होतो. परंतु २४ तास पाणी पुरवठा केल्यास लोक पाण्याचा साठा करीत नाहीत. त्यामुळे पाण्याचे नुकसान होत नाही. २४ तास पाणी पुरवठा केल्याने पुर्वीपेक्षा कमी पाणी आम्हांला लागत आहे. असे त्यांनी सांगितले आहे. तर मी निवेदन करेन की, योग्य प्रकारे समस्येवर मार्ग काढावा. एक दुस—यांवर आरोप लावुन जसे पाण्याची कमतरता नाही असे बोलुन पाण्याची टंचाई जाणार नाही. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :—</u> मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त व सचिव साहेब, मला बोलु दया, मी सकाळ पासुन येथे बसलो आहे. उल्हासनगरमध्ये पाणी नाही असे कोण बोलत आहे? पाणी पुष्कळ आहे, परंतु कोणी तुपाशी खातो, कोणी उपाशी राहतो. कोणाच्या बंगल्यात सकाळपासुन वॉचमन १०—१० गाडया धुत असतो, ते पाणी ८० फुटी रस्त्यावरुन डीडी कॉलेज पर्यंत वाहत जाते. हे कोणालाच दिसत नाही. एखादया गरीबाने नळ घेतला तर तेथे एवढे लोक जातात, आपले लक्ष पुर्ण करण्यासाठी, वसुली करण्यासाठी, सर्व फौजफाटा घेवुन नळ कनेक्शन खंडित करतात. परंतु मी प्रश्न टाकला होता, तुम्ही पाणी विकायला माणसाला परवानगी दया अथवा नका दया. परंतु तो जे पाणी विकतो त्याचे पैसे तुम्ही वसुल करा. ते पण झाले नाही. महासभेत एवढे सांगुन देखील, तेथे ४ ॲक्वागार्ड मशिन आहेत, तुम्ही तेथे जा, तेथे मशिनसुध्दा होते. परंतु येथे दाद दिली नाही. शेवटी कोकण भवन येथुन लोक आले व त्यांनी ४ मशिन व लाखो लिटर पाणी जे चोरी केले होते ते पकडले आहे. मी एवढा पाठपुरावा केला तरी आपले प्रशासन झोपलेले आहे. ते जागे व्हायलाच तयार नाही. याचा अर्थ असा की, त्या माणसाला एवढी सुट दिली की, तो एका दिवसात, एका लग्नाचे २ ते ५ हजाराचे बिल घेतो. एक दिवसात ४ ते ५ लग्नाला पाणी पुरवितो. तो माणुस रोजचे २०—३० हजार रुपये कमवत आहे. समजा आपण अर्धा इंची नळजोडणी दिली आहे. या नळ जोडणीतुन एका तासात १२०० लिटर पाणी पुरविले जाते. आपल्या जलवाहिनीत १६ तास पाणी उपलब्ध आहे. तर तो एका दिवसात २०,००० लिटर पाणी खेचतो. त्याचे पैसे किती होतात? ते पाणी विकले जात आहे. आता सुध्दा काल रात्री तेथे गाडी भरणे चालु होते. मी अधिका—यांनाही सांगितले परंतु ते फक्त हो—हो म्हणतात, चॉकलेट देतात. परंतु काही होत नाही. जसेच्या तसे चालु आहे. हे कश्यामुळे चालु आहे. आपल्याला येणारे बिल व आपण एमआयडीसीला जे बिल भरतो त्यामध्ये किती तफावत आहे, ते बघा. पाणी कुठे जात आहे, जात असेल तर ते कुणी भरायचे? आमच्या मानधनातुन कापा, नाहीतर तुमच्या पगारातुन कापा. तसे नसेल होत तर जो चोरी करतो त्याच्याकडुन वसुल करुन दाखवा. गळतीच्या नावावर एवढे पाणी वाया जाते परंतु ते पाणी वाया जात नसुन त्याची चोरी होत आहे. सकाळी रस्त्यावर हजारो लिटर पाणी वाहत असते. सोसायटयांमध्ये २०—२० गाडया आहेत, एकाकडे ४—४ गाडया आहेत. पेट्रोल पेक्षा पाण्याची किंमत जास्त आहे. पेट्रोल शिवाय माणुस जगु शकतो परंतु पाण्याशिवाय तो जगु शकत नाही. काही लोक पाण्याचा खुप उपयोग घेतात, आणि काहींना काहीच मिळत नाही. आमच्या प्रभागातुन एमआयडीसीची जलवाहिनी जाते त्यामुळे आम्हांला पाणी पुष्कळ आहे. परंतु तेथे पाण्याची चोरी झाल्याने गोल

मैदानच्या भागात पाणी जात नाही. आम्ही वेळोवेळी तक्रार करुन सुध्दा, आम्हांला त्याच्याशी काहीही घेणे–देणे नाही. तुम्ही त्या माणसाला अजुन चार अॅक्वागार्ड मशिन आणुन दया. परंतु त्याच्याकडुन पैसे तर वसुल करा. तो धंदयासाठी पाणी वापरत आहे. पिण्यासाठी वापरत असेल तर ठिक आहे. पाणी भरपुर आहे, परंतु त्याचे वितरण व्यवस्थित करा, चोरी कमी करा. गाडी धुणा–यांना आळा घाला, सर्विस सेंटर वाल्यांना आळा घाला. असे केल्याने तुमचेही नाव उज्वल होईल व आम्हांलाही त्रास होणार नाही. याची दखल घ्यावी, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा. सदस्य श्री. भालेराव गौतम, श्री. अशोक ठाकुर, श्री. मोहन साधवानी, श्रीमती जया साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–** मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, श्री. दिलीप लालवानी हे एका जबाबदार पक्षाचे जबाबदार पदाधिकारी आहेत. जेव्हा त्यांनी अत्यंत सहजतेने सांगितले की, शहरात कुठेही पाण्याची टंचाई नाही हे ऐकुन आम्हांला आघात झाला आहे व दु:ख झाले आहे. पाण्याच्या कमतरतेचा मोर्चाशी संबंध लावणे, शहरात कुठेही हंडा मोर्चा निघाला नाही, कोणतेही आंदोलन झालेले नाही. हे म्हणणे असे होईल जसे की, सकाळी कोंबडा आरवला नाही तर सुर्य उगवणार नाही. किंवा ८५५ इमारतींवर निष्कासनाचा आदेश झाला आहे. यामुळे शहरात मोठे आंदोलन झाले नाही, मोठा मोर्चा निघाला नाही, उपोषण झाले नाही याचा अर्थ लोक फार खुष आहेत, असे आपण समजायचे का? याकरिता या मुद्दयाला राजकारणाशी जोडणे योग्य होणार नाही. पाण्याची टंचाई नाही असा विचार करणे योग्य होणार नाही. ज्यावेळी १ एप्रिल पासुन मोफत टॅंकर बंद करण्याची वेळ आली होती त्यावेळी आपण सर्वांनी येथे शहरात ब–याच ठिकाणी पाण्याची टंचाई आहे यामुळे टॅंकर चालु ठेवायला हवे असा निर्णय घेतला होता. त्यावेळी असे ठरले होते की, ३० जुन पर्यंत टॅंकर चालु ठेवावे. जर आपण टॅंकरची यादी बघितली तर दिसुन येईल की, ब–याचशा प्रभागात दररोज टॅंकर लागतात. जर पाण्याची टंचाई नसती तर टॅंकरची गरज भासली नसती. मी उदाहरणा दाखल आपणांस ५–६ प्रभागांची नावे सांगतो जेथे टॅंकर पुरविले जातात. पॅनल नं. २३ मध्ये मे महिन्यात ९८ टॅंकर गेले होते. ही महापालिकेने बनविलेली यादी आहे. जर पाणी टंचाई नसेल तर टॅंकर का चालतात? पॅनल नं. १८ मध्ये मे महिन्यात २२५ टॅंकर गेले आहेत. एकतर ही यादी खोटी असेल. पॅनल नं. २० मध्ये मे महिन्यात २९८ टॅंकर गेलेत. जर टॅंकर चालु आहे तर याचा अर्थ शहरात पाण्याची टंचाई आहे असा होतो. पाण्याची कृत्रिमरित्या टंचाई केली जात असेल. मला नेमके कारण माहित नाही. दुसरे कारण असे असु शकेल की, एमआयडीसीकडुन आपणांस पाणी कमी येत असेल. किंवा आपल्याकडुन पाण्याचे असमान वितरण होत असेल त्यामुळे पाणी टंचाई झाली असेल. येथे ब–याच प्रभागात टॅंकरने पाणी पुरवठा होतो. माझ्याकडे त्याची यादी आहे. मी आपणांस उदाहरणे दिली अजुनही देवु शकतो. येथे ब–याच नगरसेवकांच्या प्रभागात टॅंकरने पाणी पुरवठा होतो परंतु ते सत्ता पक्षात असल्याने बोलु शकत नाही. परंतु ही वास्तविकता आहे. माझ्याकडे आकडे उपलब्ध आहेत, तुम्हांला हवे असेल तर मी सर्व प्रभागाची आकडेवारी सांगु शकतो. दुसरे म्हणजे आपण स्थायी समितीमध्ये पाणी पुरवठयाच्या कामासाठी नेहमी प्राकलने मंजुर करतो की, विवक्षीत विभागात पाण्याची टंचाई असल्याने तेथे जलवाहिनी टाकण्याचे काम मंजुर केले जाते. जर पाणी टंचाई नसेल तर आपण असे काम का मंजुर करतो? तर हे एक उदाहरण दिले. पाण्यासारखा महत्वाचा विषय एवढया सहजतेने घ्यायला नको. यावर आपण सर्वांनी विचार करुन मार्ग काढायला हवा. जर एमआयडीसीकडुन आपणांस पाणी कमी मिळत असेल तर त्यासाठी काय करायचे यावर विचार करायला हवा. जर पाण्याचे असमान वितरण होत असेल तर प्रशासनाचे प्रत्येक विभागात समान वितरण होण्यासाठी मार्ग काढायला हवा. तिसरे म्हणजे आपण जलवाहिन्या टाकण्यासाठी बरीच प्राकलने मंजुर केली आहे. परंतु ती कामे अदयाप चालु झालेली नाहीत. जर आपण बघितले की, २,३,४, इंचाच्या जलवाहिन्या टाकण्यासाठी जेवढी प्राकलने मंजुर झाली आहेत, तर त्यापैकी बरीचशी कामे अदयाप चालु झालेली नाही. ठेकेदार पैसे मिळत नसल्याने काम सुरु करत नाही. यासाठी जोपर्यंत ठेकेदार एक काम पुर्ण करत नाही तोपर्यंत त्याला दुसरे काम देण्यात येवु नये. जी देखील प्रलंबित कामे आहेत ती पुर्ण करण्यासाठी युध्द स्तरावर कारवाई करायला हवी. मला असे वाटते की, सदनाने याविषयी गांभीर्याने विचार केला जावा.

**मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :–**मा. महापौरजी, मा. आयुक्त उल्हासनगरमध्ये पाण्याची सगळयात जास्त टंचाई आमच्या पॅनल नं. १८ मध्ये आहे. यासाठी आम्ही ब–याचवेळा आयुक्तांना व पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना भेटलो आहोत. त्यांनी आम्हांला चांगले सहकार्य दिले आहे, परंतु आमचा प्रभाग हा शेवटच्या टोकावर असल्याने पाण्याची टंचाई कायम आहे. आता श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, मे महिन्यात माझ्या प्रभागात २२५ टॅंकर आले आहेत. ही वस्तुस्थिती आहे. पाण्याची टंचाई असल्याने टॅंकर

आवश्यक आहे. यावर मार्ग काढण्यासाठी उपाय देखील मी पाणी पुरवठा विभागाच्या श्री. सावकारे यांना सांगितला आहे. आनंद नगर येथुन आमच्या प्रभागात जे पाणी येते त्याचा कालावधी अर्धा तास वाढविल्यास टॅंकर बंद होवु शकतात. मला असे वाटते की, कार्यकारी अभियंता यांनी यावर खुलासा करावा. आम्ही सहकार्य देण्यास तयार आहोत. आता १ तारखेपासुन टॅंकरवर शुल्क आकारण्यात येणार आहे. त्यानंतर आमच्या प्रभागात पाणी कोठुन येईल? पाणी अर्धा तास वाढविल्यास समस्या सुटु शकते. यासाठी कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी, श्रीमती प्रेमा खांडेकर यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> मा. आयुक्त साहेब, आपण उत्तर नंतर देणार आहात काय? नंतर तुमचे चुकुन काही राहिल्यास पुन्हा उत्तर दयाल ना? दिनांक २५ एप्रिलला मी व श्री. धनंजय बोडारे यांनी मोर्चा काढला होता. त्यावेळी आपण आम्हांला लेखी लिहून दिले होते तसेच आश्वासनही दिले होते. कॅम्प नं. ४ व ५ मध्ये किती पाणी येते सध्या स्थिती काय आहे? त्यांच्या गटनेत्यांनी सांगितले की, सध्या पाण्याची टंचाई नाही. मी तुम्हांला विचारु इच्छितो की, जर पाण्याची कमतरता नसेल तर आमच्या कॅम्प नं. ४ मध्ये शनिवारी पुर्ण एक दिवस पाणी बंद का ठेवता? शहरात पाण्याचा प्रश्न नाही तर मग शनिवारी पाणी बंद का ठेवता? दुसरी गोष्ट म्हणजे तुम्हांला मिटर बसवायला सांगितले होते परंतु तुम्ही अदयाप मिटर बसविले नाही. का बसविले नाही? तुम्हांला वारंवार तक्रार करुन, तुमच्या दालनात येवुन सांगितले तरी अदयाप मिटर बसविले नाही. तिसरी गोष्ट म्हणजे १५ दिवसापुर्वी माझ्या प्रभागातील पाच पांडव कॉलनी व ब्राम्हणपाडयामध्ये १५ दिवस पाणी नव्हते. ही बाब मी श्री. सावकारे व श्री. सेलवन यांच्या लक्षात आणुन दिली. त्यांना आणुन दाखविले त्यानंतर त्यांनी ४ दिवस असेच घालविले. हे चेक कर, ते चेक कर, इथे टॅप मार, प्रेशर किती आहे. परंतु शेवटी असे लक्षात आले की, वॉलमेनच्या चुकीमुळे, त्याने वॉल बंद ठेवला होता, त्यामुळे १५ दिवस पाणी येत नव्हते. श्री. जवादे व श्री. सावकारे यांना मी कमीत कमी १०० वेळा फोन केला असेल. कालही फोन केला, परवाही केला. काल दुपारी केला. तेव्हा ते म्हणाले मी येतो. परंतु ते आले नाही. लोक कनेक्शन घेतात पण पाणी येत नाही. माझ्या प्रभागात एक सोसायटी आहे. परंतु तेथे पाणी येत नाही. मी सावकारे साहेबांना फोन केला ते येतो म्हणुन सांगतात पण येत नाहीत. त्या सोसायटीतील लोक त्यांची रोज वाट पाहत आहेत. लालचक्की विभागाला त्यांनी नविन कनेक्शन दिले आहे. पण ते कनेक्शन पास कसे काय करुन देणार? त्यांना तुम्ही सांगा. एकही दिवस ते येत नाहीत. लोकांनी काय करायचे? दुसरी गोष्ट टॅंकरची. मी त्यांच्या लक्षात आणुन दिले की, तुमचा जो टॅंकरवाला आहे, तो महापालिकेच्या दोन खेपा घालतो व खाजगी चार खेपा घालतो. तो असे करु शकतो का? तुमच्या पाटील साहेबांनी त्याला लेखी पत्र दिल्यानंतरही त्याची मनमानी चालु आहे. तुमच्या अधिका—यांचे त्याच्यावर काहीही नियंत्रण नाही. ते तुमच्या अधिका—याचे काहीही ऐकत नाहीत. आजही तो खाजगी खेपा मारत आहे. स्वत:ची मनमानी करत आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, आम्हांला पेमेंट मिळत नाही. आज एक ते दिड वर्षापासुन आमची प्राकलने मंजुर होवुन पडलेली आहेत. पण कुणीही काम करायला तयार नाहीत. सावकारे साहेबांना विचारले की, काम का होत नाही तर ते सांगतात की, ठेकेदाराला पैसे मिळत नाही. म्हणुन तो काम करत नाही. ते म्हणतात तुमचा ठेकेदार घेवुन या. आम्ही ठेकेदार कोठुन आणणार? ठेकेदार नेमायची जबाबदारी तुमची आहे. त्यांचे पेमेंट करायचे तुम्ही बघा. दिड वर्षापासुन माझे काम रखडले आहे. वारंवार सांगुन देखील होत नाही. ड्रेनेजच्या गाडीचे देखील तसेच आहे. गेल्या आठ दिवसापासून गाडी बंद आहे. पुर्ण शहरात पाणी वाहत आहे. नविन गाडी आली आहे, त्याचे काय झाले? ती चालु का करत नाही ते समजत नाही. पुर्ण शहरामध्ये मुख्य गटारे भरुन वाहत आहेत. याचे आपण सविस्तर उत्तर दयावे. तुम्ही मिटर का लावले नाहीत? कॅम्प नं. ४ व ५ ला किती पाणी येते ते सांगा. पाणी सगळीकडे येत असेल तर एक दिवस आमच्याकडे का बंद ठेवले जाते ते देखील सांगा. कॅम्प नं. ३ मधुन जे पाणी येते ते आधी २ के.जी. दाबाने येत होते. आता ते हळूहळू १ के.जी., त्यानंतर ०.९ के.जी., आता ०.४ के.जी. ने येत आहे. सांगुन सुध्दा तुमचे अधिकारी बिल्कुल लक्ष देत नाहीत. मुख्य जलवाहिनीवर जोडण्या देण्याचे काम चालु आहे. तुम्ही माझ्या समोर त्यांना सांगितले की, जोडणी खंडीत करा अथवा वॉलने नियंत्रित करा. परंतु काही नाही. म्हणजे आम्ही ओरडतो त्याला काही अर्थ नाही. तुम्ही याचे समाधानकारक उत्तर दया.

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्याशी :—</u> मा. महापौरजी,..............

<u>मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u> आपण सभापती आहात, आपण नंतर बोलले तर योग्य होईल.

मा. सदस्य श्री. राजु जग्याशी :– आपल्या प्रश्नांचे उत्तर देखील मीच देईन.

मा. उप–महापौर श्री. विनोद तलरेजा यांनी पुन्हा सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– माझ्या प्रश्नांची आपण उत्तर दयावीत अशी आवश्यकता मला वाटत नाही. मा. महापौरजी, मी आयुक्तांना संबोधित करत आहे. मा. सचिव व आयुक्त साहेब, असे म्हणतात की, ''पाणी रे पाणी तुझा रंग कसा?'' मी त्याला सत्तापक्षाचा अथवा विरोधी पक्षाचा रंग न देता, आपणांस हक्काने सांगते. आता तुमच्यावर हक्क सांगणे हा देखील आता आमचा हक्क राहिला नाही असे वाटते. कारण हक्काने आम्ही ब–याच वेळा आपणांस सांगितले आहे, पत्र लिहिले आहे, टेलिफोनवर बोलले आहे, पण आम्हांस आपणाकडुन अदयाप संतोषजनक उत्तर प्राप्त झाले नाही. आम्हांला उत्तर देवु नका, आम्हांला त्याची पर्वा नाही. परंतु आमच्या प्रभागाला पाणी अवश्य दया. मला यायला थोडा उशिर झाला. मला असे कळले की, श्री. लालवानी असे बोलले की, पुर्ण शहरात पाणी पुरवठा होत आहे. हे ऐकुन आश्चर्य वाटते. मी उशिरा आले, परंतु मला असे कळले आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– आपणांस चुकीची माहिती मिळाली आहे. मी चुकीची दुरुस्ती करतो.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– ठिक आहे, तुम्ही दुरुस्ती करा, त्यानंतर मी पुन्हा बोलेन.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– मी असे बोललो की, या आधी जशी पाण्याची टंचाई असायची ज्यासाठी आम्ही धरण्यावर बसायचो, उपोषण करायचो, अशी समस्या आता नाही.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– तुम्ही काय बोलले ते माझ्या लक्षात आले. मी आपणांस धन्यवाद देते की, आपण दुस–यांदा माझ्यासाठी बोललात.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– मी असे देखिल बोललो की, एखादया विभागात पाण्याचे वितरण होत नसेल तर प्रशासनाने लक्ष दयावे.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– आपले म्हणणे आम्ही लक्षपुर्वक ऐकले आहे. आपल्या माहितीसाठी मी सांगु इच्छिते की, आम्ही ब–याच वेळा शासनाला व प्रशासनाला विनंती केली आहे. विशेष करुन माझ्या प्रभागात पाणी बिल्कुल नाही. मला आठवते की, श्री. सोनवणे आयुक्त यांच्याशी माझे सर्वात मोठे भांडण गेले तीन–चार वर्षात केले असेल , मला ती तारीख अजुनही आठवते २९ मार्चला मी श्री. सोनवणे यांच्याशी जोरदारपणे वाद घातला होता. त्यावेळी आपण मला आश्वासन दिले होते की, आम्ही आपल्या प्रभागात पाणी देवु. तसेच आपण हे देखील आश्वासन दिले होते की, आपण जे टॅकर बंद करणार होता, त्यावर देखील माझे आपल्याशी भांडण झाले होते. त्यावेळी आपण आश्वासन दिले होते की, जोपर्यंत नळाद्वारे पाणी येत नाही तोपर्यंत मोफत टॅकर बंद करणार नाहीत. त्यानंतर आपण काही महिन्यांसाठी टॅकरची मुदत वाढविली आहे. मी आपणांस विनंती करेन की, आपण लवकरात लवकर आमच्या शहरातील व माझ्या प्रभागातील नागरीकांना नळाद्वारे पाणी दयावे. जोपर्यंत आपण नळाद्वारे पाणी देत नाही तोपर्यंत टॅकरचे पैसे घेण्यात येवु नये अशी माझी सर्व शहरवासियांतर्फे आपणांस विंनती आहे. आपण ही बाब गांभीर्यने घ्याल असे मला वाटते. जय हिंद।

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– मा. महापौर महोदया, राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे गटनेते श्री. दिलीप लालवानी यांनी ज्या बेफिकरीने वक्तव्य केले आहे, मी श्री. जमनादास पुरस्वानी यांचे शब्द वापरत नाही. येथे नगरसेवक आपल्या भावना ठेवतात. आधी केले होते ते खरे होते व आता केले आहे म्हणजे ते खोटे आहे, नाटक आहे असे म्हणणे चुकीचे आहे. एवढा जबाबदार माणुस असे बेफिकरीने वक्तव्य करतो, की श्री. लाल पंजाबी हे म्हणाले की, मला दु:ख वाटते परंतु मला दु:ख वाटत नाही. त्यांची क्षमता हीच आहे असे मला वाटते. त्यामुळेच त्यांनी असे वक्तव्य केले आहे. येथे ब–याचशा सदस्यांनी त्यांच्या प्रभागातील समस्या मांडल्या. यांना तर प्रभागच नाही. त्यामुळे त्यांना ही समस्या समजत नाही. मराठी मध्ये एक म्हण आहे की, ''वांझोटया बाईला प्रसुतीच्या वेदनाही कळत नाही व सुखही कळत नाही''. तसे यांना काय कळणार आहे? यासाठी त्यामध्ये जावे लागते. पाण्यात मासा कसा पोहतो हे किना–यावर बसुन कळत नाही यासाठी पाण्यात जावे लागते. आज ज्याप्रकारे आपण विधान केले हा सर्व सभागृहाचा अपमान आहे. १५ दिवसापुर्वी आम्ही सुचना दिली की, या–या

प्रभागात पाण्याची समस्या आहे. आम्ही कुणावरही आरोप केला नव्हता. आमचे म्हणणे ऐकुन घेतल्यानंतर आपण बोलला असता तर ठिक होते. परंतु आधीच उठुन तुम्ही चुकीचे आहात, आम्ही केले तेव्हा योग्य होते. हे सांगणारे आपण कोण आहात? आम्हांस आपले स्पष्टीकरण नको होते. जी समस्या होती तीचे निराकरण कसे करायचे, त्यामध्ये आपण काय करु शकतो? यावर विचार करण्यासाठी आम्ही बैठक ठेवली होती. यामध्ये कोणताही राजकिय उद्देश नव्हता, राजकीय रंग देण्याची आवश्यकता नव्हती. परंतु आज आपण जाणुन–बुजुन याला राजकिय रंग दिला. त्यांनतर आपण आमच्यावर आरोप करत आहात. विषय काय आहे हे बघा. पाण्याची समस्या आहे अथवा नाही हे पाणी पुरवठा विभागाचे अभियंता बघतील. श्री. रमेश चव्हाण यांनी सांगितले की, २४ एप्रिलला आम्ही मोर्चा काढला त्यानंतर कार्यकारी अभियंता, उप–अभियंता, कॅम्प नं. ४ व ५ मधील सर्व सदस्य यांनी बसुन तोडगा काढला व एक दिवस पाणी बंद ठेवायचे ठरले. परंतु बाकीचे ५ दिवशी काही विभागात पाणी जायला हवे. आयुक्त साहेब हे खरे आहे की नाही? जर पाणी टंचाई नसती तर आम्ही याला तयार झालो असतो का, लोक तयार झाले असते का? परंतु ५ दिवसही पाणी मिळत नाही. यासाठी लोक कार्यकारी अभियंता यांना येवुन भेटत आहेत. लोक आम्हांला येवुन भेटतात त्याला आम्हांलाही त्रास होतो. आणि हे किना–यावर बसुन म्हणतात की, पाण्याची समस्या नाही. ही कोणती पध्दत आहे? मोर्चा नाही काढला याचा अर्थ पाण्याची समस्या नाही असा होत नाही. मोर्चा काढुन लोक थकले आहेत असा याचा अर्थ होत नाही. मोर्चे येतात व जातात परंतु यांच्यावर काहीही परिणाम होत नाही. यामुळे लोकांनी त्रस्त होवुन मोर्चे काढणे थांबविले असेल. हे याचा अर्थ नकारात्मक कसा काढतात? मोर्चा नाही म्हणजे सर्व चांगले आहे असे कसे काय समजतात? जर पाण्याची समस्या नसती तर एवढया मोठया प्रमाणावर टॅंकर चालले नसते. आज आमच्याकडे आकडेवारी आहे, प्रभाग क्र. २५ मध्ये मे महिन्यात २५४ टॅंकर गेले आहेत, एकुण ५ महिन्यात १३५६ टॅंकर एकाच प्रभागात गेले आहेत. हे काय दाखवतात, पाण्याची समस्या नाही? लोक त्रस्त आहेत. यावर तोडगा काढण्याऐवजी सत्ताधारी पक्षाचे गटनेता जे एक जबाबदार नेता आहे, ते यावर हसतात. ही चुकीची बाब आहे. आयुक्त साहेब, या प्रश्नावर याआधी लोकांनी बरेच सहले आहे. ५ दिवस पाणी यायचे हे लोकांना चालायचे. विठ्ठलवाडीची टाकी तयार होवून ३ महिने झाले आहेत परंतु ती तुम्ही भरु शकत नाही. जर पाण्याची समस्या असेल तर ती दुर करण्यासाठी काय करणार हे स्पष्ट करा. जर पाण्याची समस्या नसेल तर उदया पासून विठ्ठलवाडीची टाकी भरण्यास सुरुवात करा. लोकांना पाणी मिळायला हवे. आणि येथिल ज्या–ज्या समस्या सदस्यांनी ठेवल्या आहेत त्यावर आपण काय मार्ग काढणार हे आम्हांला सांगावे अशी आमची अपेक्षा आहे. जय हिंद, जय महाराष्ट्र।

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u> सभागृह नेताजी मला श्री. लालवानी यांच्या वक्तव्यावर दोन मिनिटे बोलायचे आहे. मी जास्त बोलणार नाही. श्री. लालवानी साहेबांना मी समजावु इच्छितो की, माझ्या प्रभागातुन ३ वेळा मोर्चा काढायचे ठरले होते. तो मी रद्द केला आहे. आम्ही विरोधी पक्षात असुन देखील अधिका–यांना सहकार्य देतो. मोर्चा काढला नाही याचा अर्थ पाण्याची टंचाई नाही व मोर्चा काढला म्हणजे पाण्याची टंचाई आहे असे नाही. मी सभागृहाला सांगु इच्छितो की, आता मोर्चा काढला तरी लोक आमच्या सोबत येत नाहीत. मोर्चामुळे काहीही फायदा होत नाही हे त्याचे कारण आहे. ज्या–ज्या वेळी महासभा होईल त्यावेळी आम्ही सभागृहामध्ये पाण्याचे विषयावर आंदोलन करुन दाखवु.

**मा. सदस्य श्री. मोहन साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :–</u> मा. महापौर, आयुक्त व सचिव साहेब, सर्व सन्माननिय सदस्य आज येथे पाण्याच्या विषयावर जी चर्चा सुरु आहे हीच चर्चा काही महिन्यापुर्वी सत्ताधारी पक्षाने केली होती. त्यावेळी आजच्या पेक्षा पाण्याची टंचाई जास्त होती. परंतु त्यावेळी विपक्षाच्या एकाही सदस्याने त्या मुद्दयावर चर्चा केली नव्हती. परंतु आज जेव्हा पाण्याची समस्या ९० टक्के कमी झाली आहे तेव्हा आज काहीतरी विषय आणायचा म्हणुन सत्ताधारी पक्ष व आयुक्तांना बदनाम करण्यासाठी षडयंत्र रचले जात आहे. आता आमचे सन्माननिय सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की, ते जेव्हा कोटा येथे प्रशिक्षण घ्यायला गेले होते. त्यावेळी त्यांच्या सोबत मी देखील होतो. त्यांनी जे सांगितले ते अर्धसत्य आहे. त्यांनी सांगितले की, कोटा येथे २४ तास पाणी पुरवठा होतो. परंतु श्री. जमनुजी आपण पुढचे ऐकले नाही. तेथे काही जागा अशा आहेत की जेथे टॅंकरने पाणी पुरवठा केला जातो. त्या शहराची भौगोलिक स्थिती पाहिल्यास शहराच्या चारही बाजुस मोठे–मोठे धरणे असल्याचे दिसुन येते. धरणांमुळे तेथे २४ तास पाणी यायलाच हवे. आपणांस दुस–याच्या धरणांतुन दुरुन पाणी आणावे लागते. त्यामुळे मध्येच बरेचसे पाणी वाहुन जाते. पुर्ण पाणी आपल्याकडे येत नाही. आमचे सन्माननिय सदस्य श्री. रमेश चव्हाण यांनी विचारले की, एक दिवस पाणी बंद का ठेवले जाते त्याचे कारण हेच

आहे की, पुर्ण पाणी आपल्या शहरात येत नाही. ज्या जलवाहिन्या आहेत, त्या जुन्या झाल्या आहेत. त्यामध्ये गळती असल्याने पुर्ण पाणी टाकीत जात नाही हे कारण आपणा सर्वांना माहिती आहे. परंतु हे माहित असतांना देखील केवळ सत्ताधारी पक्षाला बदनाम करण्यासाठी आपण येथे आवाज उठवित आहात असा माझा तुमच्यावर आरोप आहे. येथे सावकारे साहेबांची जी टिम आहे, ती फार चांगल्या प्रकारे काम करीत आहे. मी पुर्ण शहराचे बोलणार नाही कारण तुम्ही शहराचे लिडर आहात, मी माझ्या प्रभागाचा लिडर आहे. माझ्या पक्षाचे, शहराचे नेते शहरासाठी बोलतील. मी माझ्या प्रभागासाठी बोलेन. जेव्हा मी नगरसेवक झालो त्यावेळी माझ्या प्रभागात २९ टॅंकर यायचे. आज माझ्या प्रभागात १ किंवा २ टॅंकर येतात. ते देखिल आठवडयातुन २ किंवा ३ वेळा येतात. जी घरे शेवटच्या टोकाला आहेत, तेथे ते टॅंकर जातात. बघायला गेले तर तो प्रभाग आमच्या क्षेत्रात येत नाही तरी देखील आम्ही त्याचे दायित्व घेतले आहे. त्या प्रभागात आम्ही दोन टॅंकर पाठवतो. मला मनोज कुमारचे एक गाणे आठवते. ''थोडेसे गुजारा होता है, हम उस देश के वासी है, जिस देश मे गंगा बैहती है ।'' जर तुमच्या प्रभागात ८ तास पाणी येवुन देखील आपण म्हणाल की, पाणी येत नाही, तर हे चुकीचे आहे. जसे श्री. मनोज कुमार यांनी सांगितले की, थोडे मिळाले तरी आमचे काम होते, अशा देशातील आम्ही रहिवासी आहोत. तर तुम्ही या देशातील रहिवासी आहात अथवा नाही हे मला कळुन येत नाही. आमच्या आयुक्तांनी ज्यावेळी श्वेतपत्रिका काढली त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, प्रत्येक प्रभागात २ तास पाणी देईन. मी आयुक्त साहेबांना सांगु इच्छितो की, काही प्रभाग असे आहेत जेथे ८ तास पाणी पुरवठा होतो. काही प्रभागात ६ तास पाणी पुरवठा होतो. काही प्रभागात ४ तास पाणी पुरवठा होतो. तर काही प्रभागात अर्धा ते पाऊण तास पाणी पुरवठा होतो. मी आयुक्त साहेबांना सांगु इच्छितो व विनंती करु इच्छितो की, ज्या प्रभागात ८ तास पाणी मिळते त्या प्रभागाचे पाणी कमी करुन ज्या प्रभागात १५–२० मिनिटे पाणी मिळते त्या प्रभागात पाणी वाढवावे. यामुळे आमच्या सदस्यांना जो त्रास होत आहे तो कमी होईल. त्यावेळी मोर्चा आला तर आपण बिल्कुल घाबरु नये आम्ही आपल्या सोबत आहोत. यामुळे यांची समस्या तात्काळ दुर होईल. आपण फक्त ठाम भुमिका घ्यायला हवी. ज्या प्रभागात ८ तास पाणी येते ते कमी करुन दुस–या प्रभागात पाणी दयावे. आपण जी श्वेतपत्रिका काढली त्यातील आश्वासन आपण पुर्ण करावे. मी आमच्या सन्माननिय सदस्यांना सांगु इच्छितो की, आपल्या येथे परिस्थिती ठिक आहे, कमीत कमी एक तास तरी पाणी मिळतें. काही प्रभागात २४ तास देखील पाणी मिळते, परंतु धुळे सारख्या शहरात १५ दिवसांनी फक्त एक तास पाणी मिळते. चाळीसगांव सारख्या शहरात ८ दिवसातुन १ तास पाणी मिळते. नागपुर मध्ये १५ दिवसांनी एक तास पाणी मिळते. तरी देखील तेथे लोक जगत आहेत. तेथिल लोक आयुक्तांना धन्यवाद देखील देतात. आपल्याला ८ तास पाणी मिळुन देखिल आपण आयुक्तांवर टिका केली तर लोकांमध्ये चुकीचा संदेश जाईल. हे वर्तमानपत्रात आले तर चुकीचे होईल. आयुक्तांच्या मनोबलावर देखिल यांचा परिणाम होवु शकतो. ते ज्या प्रकारे काम करीत आहेत त्यामध्ये तुम्ही अडथळा आणण्याचा प्रयत्न करीत आहात असे मला या ठिकाणी म्हणायचे आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती रेखा कृष्णानी :–</u> माझ्या प्रभागात ८ तास पाणी येते परंतु एक टाकी देखील भरत नाही. मला एक तास पाणी दयावे त्यांना ८ तास पाणी दया.

<u>मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :–</u> आयुक्त साहेब, श्री. शांताराम निकम यांच्या प्रभागात पाणी येत असेल तर जे दोन टॅंकर सुरु आहेत ते देखिल बंद करावे.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :–</u> मा. महापौरजी, मी आपणा सर्वांसमोर सांगतो की,.............

<u>मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :–</u> तुमच्या प्रभागात पाणी येते तर टॅंकरची आवश्यकताच नाही. आमच्या पॅनल नं. २५ मध्ये तर अजिबात पाणी येत नाही. तुम्ही तिकडे जावुन बघाल का?

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :–</u> मा. महापौरजी यांना खाली बसवावे. माझ्या नंतर बोलण्याची संधी दयावी.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> हे ज्या प्रकारे बोलत आहेत, ती पध्दत चुकीची आहे. यांच्या प्रभागात पाणी येते ठिक आहे. परंतु आमच्या प्रभागात पाणी येते आणि आम्ही नाही बोलतो असे जे म्हणत आहेत ते चुकीचे आहे.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळून येत नव्हते.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— तुम्ही दादागिरी करता का?

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— तुम्ही जेव्हा सभापती होता, तेव्हा एकदा तरी प्रभागात आला का?

मा. महापौर :— प्रत्येकाला आपली बाजु मांडण्याचा अधिकार आहे. ज्याच्या प्रभागात त्रास आहे तो त्रास आहे असेच बोलेल. ते त्यांच्या प्रभागाबद्दल बोलत आहेत.

**यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर—जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळून येत नव्हते.**

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— यांच्या शेजारीच माझा प्रभाग आहे, यांना माझ्या प्रभागात पाणी दयायला सांगा. येथे तर श्री. मुलायमसिंग यादव यांच्या सरकारने दिल्लीला पाणी दिले आहे. तर तुम्ही माझ्या प्रभागात थोडे पाणी दया.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मा. महापौरजी, मला माझे म्हणणे पुर्ण करु दया.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— सन्माननिय गुरुजी, तुमच्या प्रभागात टॅंकर सुरु आहेत....................

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. महापौर महोदया, ज्यांना त्रास नाही, ते का बोलतात? यांना पाणी येते तर गप्प बसायला सांगा. आमच्याकडे पाणी येत नाही म्हणुन आम्ही बोलत आहोत. मास्तरांना त्रास नाही तर मास्तरांनी खाली बसावे. आम्हांला त्रास आहे म्हणुन आम्ही बोलत आहोत.

मा. महापौर :— तुम्ही त्यांचे व्यवस्थित ऐकले नाही.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— टॅंकरने किती लाखाचे पाणी दिले ते बघा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— प्रत्येक सदस्याला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. भाजपाचे ८ सदस्य आहेत,......................

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— येथे भाजपा व शिवसेना वेगवेगळी नाहीत. आयुक्त साहेब आपल्याला मोर्च्याची हौस असेल तर आम्ही असा मोर्चा आणु की सर्वांना हलवुन टाकु. हे म्हणत आहेत की, यांचा मोर्चा निघु दया आम्ही उभे राहु. आमच्या मोर्च्यासमोर यांनी उभे राहुन दाखवावे. आम्ही यांना दाखवु की, दहशत काय असते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. महापौर महोदया, ज्यांना त्रास नाही, ते का बोलतात?

मा. सदस्य श्री. शांताराम निकम:— आपला खोटेपणा समोर ठेवायचा होता. म्हणुन बोलत आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मी काय बोललो ते महाराज भुल्लर यांनी ऐकले नाही. मी असे म्हणालो की, भाजपा—शिवसेना.......................

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— आपण परत तेच बोलत आहात. ते आयुक्त साहेबांना असे म्हणाले की, तुम्ही कोणत्याही मोर्चाला अथवा आंदोलनाला घाबरु नका. आयुक्त साहेबांना मोर्च्याची व आंदोलनाची एवढी हौस असेल तर मग आम्ही मोर्चा आणल्यावर त्यांना माहिती पडेल की, मोर्चा कसा असतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मला असे म्हणायचे आहे की, भाजपा—शिवसेनातर्फे सदस्य बोलतील, राष्ट्रवादी कॉंग्रेस तर्फे बोलतील, कॉंग्रेस तर्फे बोलतील, शेवटी विरोधी पक्ष नेता यांना बोलायचे आहे. त्यानंतर

मला बोलायचे आहे व शेवटी महापौर आदेश देतील. तर माझी सदस्यांना विनंती आहे की, आमचे श्री. शांताराम निकम हे दोन मिनिटे बोलतील. त्यानंतर श्री. राजु जग्याशी, त्यानंतर श्री. मोहन बेहरानी बोलतील.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–ज्यांना त्रास आहे, त्यांनी बोलावे. ज्यांना त्रास नाही, त्यांनी बोलु नये.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– तुमचे सर्व सदस्य बोलणार असतील तर आमचे देखील ४९ सदस्य बोलतील.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– मी माझे म्हणणे मांडत आहे की, ते बरोबर आहे. परंतु तुम्ही आमचे म्हणणे चुकीचे आहे असे जे म्हणतात ते चुकीचे आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– महाराजजींनी त्यांचे उत्तर दिले आहे. माझे असे म्हणणे आहे की, सर्वांनी एकेक वेळा बोलावे. जर आठ मधुन सहा बोलले, बारा मधुन नऊ बोलले तर ४९ मधुन ३० जणांना बोलावे लागेल. तुम्ही ऐकायची शक्ती ठेवा.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :–मा. महापौरजी, जर आपल्या सन्माननिय सदस्यांना चांगल्या गोष्टी ऐकायला आवडतात तर त्यांनी कटु गोष्टी ऐकायची सुध्दा सवय करायला हवी. काही सन्माननिय सदस्य येथे पाण्याची टंचाई आहे, पाण्याची टंचाई आहे असे ओरडत आहेत. त्यांच्या प्रभागात टंचाई नसतांना सुध्दा ते असे ओरडत आहे. गोबेल्स निती प्रमाणे एखादी खोटी गोष्ट जर १०० वेळा बोलुन दाखविली तर ती खोटी गोष्ट सुध्दा वारंवार बोलल्याने खरी वाटायला लागते. आम्ही देखील शहरात राहतो आम्हांला देखील परिस्थीती काय आहे हे माहित आहे.

**यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळून येत नव्हते.**

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :– मा. महापौरजी, आम्ही सर्व सदस्यांचे शांतपणे ऐकुन घेतो. आम्ही सुध्दा सदस्य आहोत आमचे म्हणणे सुध्दा शांततेने ऐकायला हवे. ज्याप्रमाणे त्यांना ओरडण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे त्यांनी शांततेने ऐकणे हे सुध्दा कर्तव्य आहे. आम्ही तुमचे ऐकतो तुम्ही सुध्दा ऐकायला हवे. मी येथे माझे वैयक्तीक मत प्रदर्शित करत आहे. जर मी आयुक्तांना सांगितले की, कुणी मोर्चा घेवुन आला तर आम्ही तुमच्या सोबत आहोत. तर हे माझे वैयक्तीक मत आहे. आयुक्तांना काय करायचे ते आयुक्तांनी ठरवावे. जर माझ्या प्रभागात पाण्याची टंचाई नसेल तर मी बोलु नये असे नाही. तुम्ही दोन तास बोलु शकतात आम्ही देखील बोलु शकतो.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :– तुमच्या प्रभागात पाण्याची टंचाई नसेल परंतु श्री. प्रमोद टाले यांच्या प्रभागात पाण्याची टंचाई आहे. ते थोडया वेळाने तुम्हांला सांगतील.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :– मा. महापौरजी, मी एका शाळेत शिक्षक आहे मला कमीत कमी ३५ मिनिट तरी बोलावे लागते. हे म्हणतात दोन तास परंतु जास्त पिरीअड घ्यायची मला सवय नाही.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– गुरुजी, एकेक तास शिकवितात इकडेही एक तास बोला.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :–हो मी बोलेन. मा. महापौरजी, जेव्हा मी नगरसेवक झालो त्यावेळी माझ्या प्रभागात पाण्याची फार टंचाई होती. ब–याचवेळा आम्ही श्री. जवादे यांच्याकडे व आयुक्त साहेबांकडे गेलो होतो. त्यांनी म्हाडाच्या निधितुन जलवाहिनी एवढया लवकर टाकली................

मा. सदस्या श्रीमती किरण माने :– तुम्ही गप्प बसा, किती बोलता?

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :– तुम्ही नंतर बोला तुम्ही कशाला मध्ये बोलत आहात? मी गप्प बसणार नाही. ऐकायचे नसेल तर निघुन जा. नंतर दुस–या सभेला या. माझ्या प्रभागात भारतनगर म्हणुन विभाग आहे. आयुक्त साहेबांना माहिती आहे तेथिल लोक उपोषणाला बसले होते. दोन–चार वेळा मोर्चे काढले. भरतनगरमध्ये

१५ वर्षापासुन पाणी मिळाले नव्हते. तेथिल लोक नाल्यातुन, कमरेएवढया, छातीएवढया पाण्यातुन जावुन अंबरनाथ येथुन पाणी भरायचे. त्या विभागात आज पाण्याची अजिबात टंचाई नाही. माझ्या प्रभागातील साईबाबा नगर मधील लोक रेल्वे लाईन ओलांडुन श्री. नाना पवार यांच्या प्रभाग क्र. ८ मधुन पाणी भरायचे. आज त्यांच्या घराघरात पाणी पोहोचले आहे. माझ्या प्रभागात जो गणेश नगर विभाग आहे, तेथे बिल्कुल पाणी नव्हते. दिवसाला दोन—तीन टॅकर जायचे. आज त्या विभागात टॅकर बंद झाले असुन त्यांना नळाने पाणी मिळत आहे. माझ्या प्रभागात नागसेन नगर म्हणुन जो विभाग आहे तेथे तीन—तीन टॅकर उभे राहायचे. आज त्या ठिकाणी टॅकर जात नाही. याचा अर्थ १९ टॅकर पैकी आम्ही फक्त २ टॅकर ठेवले आहेत. ते देखिल आणीबाणीच्या वेळेसाठी ठेवले आहेत. मी जसे आधी सांगितले की, आम्हांला जास्त नको थोडया मधुनच काम भागवुन घेवु. तर मी सगळयांना सांगेन की, जेवढे आहे, त्यामध्ये माणसाने समाधान मानायला हवे. जर मी बोललो की, बाजुच्या प्रभागात ८ तास पाणी आहे, म्हणुन मलाही आठ तास पाणी हवे तर त्याने त्रास होईल. जर एखादा माणुस इम्पाला गाडीतुन फिरत असेल आणि पायी चालत असेल तर मला त्रास तेव्हा होईल जेव्हा मला इम्पाला गाडी हवी असेल. परंतु जर मी पायी चालण्यातही समाधानी असेल तर मला त्याचा त्रास होणार नाही. यासाठी मी सर्व सदस्यांना सांगेन की, तुम्हांला जे पाणी मिळत आहे, ते पुरेसे आहे. आता टॅकर बद्दल येथे बोलले जात आहे तर काही दिवसापुर्वी आयुक्त साहेबांनी टॅकर बंद केले होते. मी सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी यांना सांगु इच्छितो की, तुम्ही जो रेकॉर्ड काढला आहे, तर आयुक्त साहेबांनी १० दिवसांसाठी जेव्हा टॅकर बंद केले होते तो रेकॉर्ड देखील काढावा. त्यावेळी आमच्या कॅम्प नं. ५ मध्ये दररोज जेथे ८० ते १०० टॅकर भरले जातात त्याच ठिकाणी १२ ते १४ टॅकर भरले जात होते. त्यावेळी पाण्याची टंचाई नव्हती का? याचा अर्थ टॅकरच्या पाण्याचा गैरवापर केला जात आहे. तो कश्याप्रकारे केला जात आहे ते मी सांगतो. जर आपण यादी पाहिली तर दिसुन येईल की, जास्तीत जास्त टॅकर हे इमारतींना दिलेले आहे. १९९७ चा रेकॉर्ड मी बघितला की, टॅकरची स्थिती काय होती. १९९७ मध्ये टॅकरवर २ लाख खर्च होता आणि आज हा खर्च रुपये १ कोटी का होत आहे? याचा अर्थ टॅकरची चोरी होत आहे. टॅकर लॉबी मोठी होत आहे. यासाठी आपले काही नगरसेवक त्यांना साथ देतात.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— नगरसेवक कोण आहेत, त्यांचे नाव सांगा.
मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. आयुक्त साहेब, यांनी आरोप लावला आहे की, ज्या प्रभागात टॅकर जातात, ते नगरसेवक पैसे घेतात.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— हा तुमच्यावर, आमच्यावर, सर्वांवर आरोप आहे.

मा. महापौर :— त्यांना त्यांचे बोलणे पुर्ण करु दया.
मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— ज्या नगरसेवकांच्या प्रभागात जास्त टॅकर जातात, त्यांची चौकशी करायला हवी.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— त्यांना त्यांचे म्हणणे तरी पुर्ण करु दया.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— तुम्हांला हा नगरसेवकांचा अपमान वाटत नसेल परंतु आम्हांला वाटतो. कोण नगरसेवक आहे त्याचे नाव सांगा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— नगरसेवक पाठींबा देतात, तर नगरसेवकांचे नाव समोर यायला हवे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— नुसते आरोप करुन चालणार नाही, कोण नगरसेवक आहे, त्याचे नांव सांगा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— कोण नगरसेवक आहे, त्याचे नांव सांगा अथवा आपले शब्द मागे घ्या.
मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—याची चौकशी बसविली जावी.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— चौकशी नंतर करा आधी येथे नांव सांगा. कोणी कमिशन घेतले ते समोर यायला हवे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौर महोदया, त्यांना काय बोलायचे याबद्दल समज दयावी.

मा. महापौर :— तुम्ही कृपया खाली बसा. आधी त्यांना त्यांचे म्हणणे पुर्ण करु दया. त्यानंतर तुम्ही बोलु शकता.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मा. महापौरजी, यांनी मध्ये अडथळा आणला तर मी पाणी पिऊन पुन्हा बोलेन व जास्त वेळ घेईन. जर त्यांना एक तास ऐकायचे असेल तर ऐकु शकता.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— मा. महापौरजी, यांना १० वाजेपर्यंत बोलु दया पुष्कळ वेळ आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— मा. आयुक्त साहेब, यांच्या प्रभागात टॅंकरवर किती खर्च झाला हे यांचे भाषण संपल्यावर त्वरीत सांगा. हे म्हणतात दोन टॅंकर आले आहेत. दोनच्या वर टॅंकर गेले असतील तर त्यांची चोरी झाली असेल. याची पण तुम्ही शहानिशा करा. यांचे संपल्यानंतर आम्हांला उत्तर हवे. आता बोला १० वाजेपर्यंत.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम:— आपले मा. सदस्य श्री. सोनवणे साहेब यांना मी स्पष्टपणे सांगितले की, माझ्या प्रभागात फक्त दोनच टॅंकर येतात तर मग अधिक खर्च मागण्याची काही गरज नाही. मराठीमध्ये एक म्हण आहे की, ''खाई त्याला खवखवे''. जर एखादयाने चोरी केली असेल व आपण त्याला म्हंटले की, मी तुम्हांला एक उदाहरण देतो, एकदा एका राजाच्या घरी चोरी झाली, चोर शोधण्यासाठी त्याने सर्व नोकरांना बोलावले व सांगितले की, सर्वानी काठी घेवुन यावी ज्याने चोरी केली असेल त्याची काठी दोन फुट छोटी होईल. जेव्हा सभा सुरु झाली तेव्हा ज्याने खरोखर चोरी केली होती त्याने दोन फुट काठी तोडुन आणली. त्याला वाटले माझी काठी मोठी होईल. व माझी काठी सर्वात मोठी दिसेल. परंतु अशाप्रकारे ज्याची छोटी काठी होती तो पकडला गेला. अजुन एक गोष्ट आहे की, ........

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :— आम्ही येथे कथा ऐकायला आलेलो नाही. पाण्याबद्दल बोला. हे काय चालु आहे? सभागृहाची दिशाभुल आहे. येथे मस्करी करत आहेत काय? हे मास्तर आहेत की कोण आहेत? आम्ही येथे कुत्रा व मांजराची कथा ऐकायला आलेलो आहोत का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—गायकवाड साहेब तुमचा पण कोंबडा बोलतो त्याला आवर घाला.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मा. महापौरजी, मी सांगितले की, जो चोरी करतो त्याच्या मनात भय असते की मी चोरी केली आहे मी पकडला जाईन. आम्ही ब—याच चित्रपटात पाहिले आहे की, एक सरदार असतो तो सर्वांना उभे करतो व विचारतो कोणी चोरी केली आहे? कोण गद्दार आहे?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— येथे कथा ऐकायला कोणीही आलेले नाही. येथे लहान मुले नाहीत. पाण्यावर बोलायचे असेल तर बोला. ही शाळा नाही. यावरुन सत्ता पक्ष पाण्याच्या प्रश्नावर गंभीर नाही हे दिसुन येते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— तुम्ही पण कोंबडयाची गोष्ट बंद करा.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— प्रत्येकजण आपली कथा सांगतो. कोणाची कथा मोठी आहे, कुणाची छोटी आहे. आम्ही तुम्हांला सहन करत आहोत, तुम्ही देखील आम्हांला सहन करा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— येथे कथा चालु केली तर आम्ही देखील एकेकाच्या कथा सांगु.
मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— महाराज जी आपण आम्हांला धमकावत आहात का?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— श्री. शांताराम निकम हे शाळेतल्या मुलांचे शिक्षक आहेत, आमचे शिक्षक नाहीत. येथे गोष्ट सांगायची आवश्यकता नाही.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— मा. महापौरजी, यांनी जी गोष्ट सांगितली ती काठीची नसुन दुसरीच आहे.

मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना :— आधी यांची गोष्ट पुर्ण होवु दया मग आम्ही नथुची गोष्ट ऐकु.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— मास्तर असून सुध्दा गोष्ट चुकीची सांगितली. बिरबलच्या राज्यात एक कोंबडी चोरीला गेली होती, सर्व लोक अकबर कडे गेले.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— भुल्लर महाराज आता तुम्ही गोष्ट ऐका. गायकवाड साहेब तुम्ही पण ऐका.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— सर्व लोक म्हणाले कोंबडीची चोरी झाली. दरबार सुरु झाला तेथे अकबर बसला होता. तो म्हणाला ज्याने कोंबडी चोरली आहे, त्याच्या डोक्यावर पिस लागले आहे. ज्याने चोरी केली होती तो डोक्याला हात लावायला लागला. त्यावरुन मग तोच चोर असल्याचे सिध्द झाले. अशी ही गोष्ट आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मा. महापौरजी, त्यांनी सांगितली ती देखील गोष्ट आहे व मी सांगितली ती देखील गोष्ट आहे.

मा. महापौर :— श्री. शांतारामजी आता गोष्ट संपली आहे व ती सर्वांना समजली आहे. मास्तरजी आता दोन मिनिटात पुर्ण विराम घ्या.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— अजुन ३५ मिनिटे झाली नाहीत. मा. महापौरजी, मी सांगितले की, १९९७ मध्ये टॅकरवर ५ ते ७ लाख रुपये खर्च होत होता. आज तो खर्च रुपये १ कोटी पर्यंत गेला आहे. याचा अर्थ काय आहे? आपली लोकसंख्या एवढी वाढली आहे का? १९९७ मध्ये जेवढे पाणी मिळत होते, त्यापेक्षा जास्त पाणी आता मिळत आहे. तर मग हे पाणी गेले कुठे? याचा अर्थ लोकांना चोरी करण्याची सवय झाली आहे. आपले नगरसेवक त्याला उत्तेजन देत आहेत. मी आपणांस हे सिध्द करुन दाखवेन.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौर महोदया, पुन्हा तेच बोलत आहेत. कोण नगरसेवक उत्तेजन देत आहेत? त्यांची नावे सांगा.

**यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर—जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे हे कळून येत नव्हते.**

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— सन्माननिय सदस्य श्री. रमेश चव्हाण जी आपणांस का वाईट वाटत आहे? तुम्ही ऐकु नका. माझे म्हणणे असे आहे की, जर एखादी इमारत बुस्टरच्या अथवा टाकीच्या शेजारी असेल तर त्या इमारतींना टॅकरने पाणी दयायची काय आवश्यकता आहे? जर आम्ही एक तासात खुश होवु शकत असु तर यांनी देखील खुश व्हायला हवे. परंतु टॅकरचे पाणी जे इमारतीत जाते त्याचा गैरवापर होत आहे. मी आपणांस असेही सिध्द करुन दाखवु शकतो की, एका बंगल्यासाठी तीन दिवसात एक टॅकर जातो. आठवडयातुन दोन टॅकर एका बंगल्यावर जातो. येथे काही ठिकाणी १०० लोक एका टॅकरने पाणी भरतात आणि काही ठिकाणी नगरसेवकाचे नातेवाईक असल्याने एक टॅकर एका घरासाठी दिला जातो. काही लोक टॅकरच्या पाण्याचा तरणतलावात वापर करतात. हे देखिल मी पाहिले आहे. येथे सर्वांनी सांगितले की, मोटरने पाणी खेचावे लागते. जर टाकीमध्ये पाणी टाकले तर त्याने विजेचा खर्च वाचेल व सर्वांना पाणीही मिळेल. ही कारणे बघितली तर ज्यावेळी आयुक्तांनी १० दिवसांसाठी टॅकरचे पाणी बंद केले होते त्यावेळी कॅम्प नं. ५ येथून जे ८० ते १०० टॅकर जायचे त्यापैकी १४ टॅकरही गेले नाहीत. तेथे टॅकरवाले उभे होते आणि लोकांची वाट बघत होते, परंतु कुणी गेले नाही, फक्त झोपडपट्टीचे लोक गेले होते व त्यांनी पाणी घेतले होते. मी असे म्हणत नाही की, इमारतींमध्ये टंचाई नाही. काही इमारतींमध्ये टंचाई आहे, परंतु काही लोक पाणी फुकट मिळत असल्याने गैरवापर करीत आहेत. मराठीमध्ये एक म्हण आहे, ''फुकटचे गावले आणि बाप, लेक धावले''. फुकट मिळाले तर बाप व मुलगा दोघे पळतात. फुकट मिळाले तर आपल्या प्रभागात २५—२५ टॅकर देखिल घेवुन जातील.

मा. महापौर :— मला देखिल एक कथा आठवत आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणु इच्छितो की जेथे जेथे टाकीच्या ठिकाणी बुस्टर आहेत तेथे ठेकेदारी तत्वावर लोक ठेवले आहेत. त्यांना काढुन टाकले व आपल्या महापालिकेचे लोक तेथे ठेवले तर ते सर्वांना समान पाणी दयावे लागेल. याकरता पुढील वेळी ठेका न काढता तो रद्द करुन

आपल्या नगरपालिकेतील लोक जे बसुन असतात, तुम्ही कोणत्याही कार्यालयात जा, तर चार–चार शिपाई बसल्याचे दिसुन येते. त्यांना तेथे पाठवा. चार–चार शिपायांची आवश्यकता नाही. येथे फक्त महिला शिपायांना ठेवा व बाकी पुरुष कर्मचा–यांना पाण्याच्या टाकीवर पाठवा. माझे म्हणणे संपवतांना मी सांगेन की, मराठीत अजुन एक म्हण आहे की ''दाटुन बोल पण रेटुन बोल''. याचा अर्थ चुकीचे असेल तरी ते ओरडुन बोलायचे, समोरच्याला गप्प बसवायचे व आपलेच म्हणणे योग्य आहे असे दाखवायचे. तर आपल्या विरोधी पक्षातील सदस्य देखील असेच करीत आहेत. त्यांचे हे कामच आहे. चांगले केले तरी विरोधी पक्ष आहे म्हणुन विरोध करणार. तुम्ही त्यांच्याकडे लक्ष देवु नका. तुम्ही तुमचे काम चालु ठेवा. मला बोलण्याची संधी दिली याबद्दल मी आपला आभारी आहे, तसेच आपण लोकांनीही ऐकुन घेतले याबद्दल देखिल आपला आभारी आहे. जय भिम।

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> मा.महापौर महोदया, यांचे बोलणे पुर्ण झाल्यावर आपण नगरसेवकाचे नाव विचारणार होतात.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :–</u> जर सन्माननिय सदस्यांना नगरसेवकांचे नाव हवे असेल तर ज्याच्या प्रभागात १५ पेक्षा जास्त टँकर जातात, त्यांची यादी आमचे श्री. लाल पंजाबी सांगतील.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:–</u>यांचे म्हणणे असे होते की, ते नगरसेवक त्यांना जाणुनबुजुन पाणी देतात, कारण त्यांचा त्यामध्ये रस आहे. तुम्ही यादी काढा, यांचे म्हणणे आहे की, ज्या प्रभागात १५ पेक्षा जास्त टँकर जातात, त्या प्रभागातील नगरसेवकाचा काहीतरी हेतु आहे. तो काय हेतु आहे ते यांनी सांगावे. महापौर महोदया, हे स्पष्ट व्हायला हवे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> मा. महापौर महोदया, आपल्या सत्ताधारी पक्षातील सदस्यांच्या प्रभागांमध्ये ४ महिन्यात ५४७६ टँकर गेलेले आहेत व इतर प्रभागात १०० टँकर गेलेले आहेत. तर यामध्ये सत्ताधारी पक्षातील कोणते नगरसेवक सामिल आहेत, त्यांची नावे सांगावे. आम्ही तुम्हांला यादी दिली आहे, तुम्ही नांवे सांगावी.

<u>मा. महापौर :–</u> तुम्ही जी यादी दिली आहे, त्याची चौकशी करण्यासाठी मी आयुक्तांना निर्देश देत आहे. कोणाच्या वार्डात आधी किती टँकर जायचे, टँकर बंद झाल्यानंतर किती जायचे व आता किती जात आहेत याची चौकशी करण्यात यावी. जर एखादया नगरसेवकाचा हात यामध्ये आढळून आल्यास आयुक्त साहेब त्याची चौकशी करतील.

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी, श्री. मनोज साधवानी, श्री. संजय बठिजा यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> जर एखादया नगरसेवकाचा हात यामध्ये आढळून आल्यास आपण काय कारवाई कराल? जर अशी प्रथा सुरु झाली तर आम्ही देखिल काहीही विधान करु.

<u>मा. महापौर :–</u> आपले म्हणणे आहे की, सत्तापक्षाच्या प्रभागांमध्ये जास्त टँकर जात आहेत.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> जास्तीत जास्त टँकर सत्तापक्षाच्या प्रभागात जात आहेत.

<u>मा. महापौर :–</u> ठिक आहे. आयुक्त साहेब याची चौकशी करुन पुढील वेळी अहवाल देतील.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> याचा अर्थ येथे कोणीही काहीही विधान केले तरी चालेल का? यामध्ये नगरसेवकाचा कुहेतु आहे असे ते म्हणाले.

<u>मा. महापौर :–</u> ते कुहेतु असु शकेल असे म्हणाले.
<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> कुहेतु आहे असे ते म्हणाले.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :–</u> हे सत्य आहे मी सिध्द करुन दाखवु शकतो.

मा. महापौर :— तसे असेल तर तुम्ही सिध्द करुन दाखवा.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :— मा. महापौरजी, आधीच आमच्या प्रभागात पाण्याची टंचाई आहे, आणि हा माणुस काहीही माहिती नसतांना काहीही विधान करेल तर आम्ही ऐकुन घेवु का? अशा प्रकारे चुकीचे आरोप लावल्यास आम्ही ऐकून घेणार नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— श्री. शांताराम निकम यांनी ज्या प्रकारे आरोप केला आहे, याकरीता मी ज्या प्रभागात १५ पेक्षा जास्त टॅंकर जातात त्या प्रभागाचे नाव व नगरसेवकाचे नाव आता येथे सांगण्यास तयार आहे. हा एक गंभीर आरोप आहे. पॅनल नं. २३ मध्ये जानेवारी महिन्यात १०७, फेब्रुवारी महिन्यात १३९, मार्च मध्ये १५१, एप्रिल मध्ये ९९, व मे महिन्यात ९८ टॅंकर गेले आहेत. आपले उप—महापौर देखिल त्या पॅनल मधुन सदस्य आहेत. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे देखिल आहेत. तिस—या डॉ. नाथानी या आहेत. अशा प्रकारे गंभीर आरोप करायला नको. आम्ही विरोधी पक्षातील सदस्य देखिल करीत नाहीत. तुम्ही अशा प्रकारे स्वत:च्या सदस्यांवरच आरोप लावत आहात. ही जी यादी आहे ही महापालिकेने बनविली आहे आम्ही बनविलेली नाही. महापालिकेच्या अधिका—यांनी बनविली आहे, आम्ही फक्त तीची प्रत घेतली आहे. पॅनल नं. १८ मध्ये श्री. अशोक ठाकुर, श्री. गौतम भालेराव व श्रीमती बेबी वसिटा हे सदस्य आहेत. हे तिन्ही नगरसेवक देखिल आपल्या युतीचे नगरसेवक आहेत. त्यानंतर पॅनल नं. २० मध्ये जानेवारी महिन्यात ११५, फेब्रुवारीमध्ये ३०५, मार्च मध्ये ३२७, एप्रिल मध्ये १९९ व मे मध्ये २९८ टॅंकर म्हणजेच जवळपास ३०० टॅंकर गेले आहेत. यामध्ये देखिल श्री. मनोज साधवानी, श्री. नारायण पंजाबी व श्रीमती दिपा पंजाबी हे सदस्य आपलेच आहेत. मी अजुन देखील सांगु शकतो. ही यादी फार मोठी आहे. अशाप्रकारेच पॅनल नं. १९,२५,२४ हे देखिल आहेत. श्री. विनोद तलरेजाजी आपण टॅंकर विकता का?

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. विनोद ठाकुर हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :— हे जे टॅंकर मागवत आहेत, यांची चौकशी करा. हे खरोखर टॅंकर मागवतात अथवा नाही हे देखील पहा. जर सत्ताधारी पक्षातील सदस्यच टॅंकरमध्ये भ्रष्टाचार करीत असतील तर यांच्यावर कारवाई करायला हवी. दुस—यावर आरोप लावण्यापुर्वी स्वत:कडे बघा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—महापौरजी, यामध्ये उप—महापौरजींचा प्रभाग देखील येतो. सत्ताधारी पक्षातील सदस्य उप—महापौरांवरच आरोप लावत आहेत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. महापौर महोदया, याची चौकशी करायला हवी. सत्ताधारी पक्षाच्या नगसेवकाने हा आरोप लावला आहे. हे खरे असेल तर जेवढा खर्च झाला आहे तेवढा खर्च संबंधीत नगरसेवकांकडुन वसुल करायला हवा.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—श्री. जमनुजी हे सत्ताधारी पक्षातील सदस्यांबद्दल बोलत आहेत जर यामध्ये विरोधी पक्षातील सदस्य असतील तर काय करणार?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— विरोधी पक्ष देखील भरण्यास तयार आहे. जर अधिका—याने लिहुन दिले की, टॅंकर चुकीच्या पध्दतीने गेले आहेत तर पुर्ण पैसे संबंधीत नगरसेवकांकडुन घेतले जावेत. अन्यथा पुढील महासभेत त्याचा अहवाल ठेवला जावा की, टॅंकर योग्य पध्दतीने गेले अथवा नाही.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— मा. महापौरजी, मला असे वाटते की, उल्हासनगरमधील जनतेला फक्त पाणी हवे आहे. आरोप व प्रत्यारोप करुन त्यांना पाणी मिळणार नाही. असे करण्याऐवजी ज्या प्रभागात पाणी मिळत नाही त्या प्रभागात पाणी मिळण्याची व्यवस्था केली जावी.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :— आमचे म्हणणे देखील हेच आहे की जेथे पाणी मिळत नाही तेथे पाणी मिळायला हवे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :– मा. महापौरजी आमचे सन्माननिय सदस्य श्री. रमेश चव्हाण हे म्हणत आहेत की आम्ही आरोप केलेला नाही. ते आरोप करतील तरी कसे? त्यांना आरोप करण्याची गरज देखील नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :– ते श्री. देवेंद्रसिंह खेमाणी यांच्या प्रश्नाला उत्तर देत होते.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– मा. महापौर महोदया त्यांना नाव सांगण्याबददल आदेश दया. त्यांच्याकडे पुरावा असेल तर सर्वांसमोर सादर करायला हवा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– हा कोण माणुस आहे? कॅमेरा घेवुन रेकॉडींग करीत आहे.

मा.महापौर :–त्यांनी परवानगी घेतली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :– चॅनल अधिकृत आहे का?
मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– परवानगी कोणी दिली आहे?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :– चित्रीकरण करण्यासाठी ते चॅनल शासनाने अधिकृत केलेले आहे का?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–आम्हांला यांनी दिलेल्या अर्जाची व परवानगीची प्रत हवी आहे.

मा. महापौर :– आपणांस प्रत देण्यात येईल. पाण्यासारखा महत्वाचा विषय सुरु आहे. वेळ वाया घालवु नका.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– मा. महापौर महोदया म्हणत आहेत की, पाण्यासारखा महत्वाचा विषय आहे, आणि आपला नगरसेवक म्हणत आहे की हे सर्व खोटे आहे. हा कुठला न्याय आहे.

मा. महापौर :– शांतारामजी आपण आपला आरोप सिध्द करणार असाल तर पुरावा दया. अन्यथा आपले शब्द मागे घ्या.
मा. सदस्य श्री. शांताराम निकम :– मी माझे शब्द मागे घेणार नाही. मी आरोप सिध्द करुन दाखवितो. मा. महापौरजी मी असे म्हणालो की, काही सन्माननिय सदस्यांचा टॅकर लॉबीमध्ये व टेंकर पुरविण्यामध्ये रस आहे. हेच शब्द मागे घेण्यासाठी तुम्ही मला बोलत आहात, परंतु ते मी मागे घेणार नाही. मी त्याचे कारण सांगतो की, माझा असा दावा आहे की, प्रत्येक नगसेवकाचा आपल्या प्रभागातील लोकांना जास्तीत जास्त प्रकारे खुश कसे करता येईल यामध्ये रस असतो. जर त्याने अशाप्रकारे काम केले नाही तर त्याला पुढील वेळी निवडणुक लढण्याचा देखील हक्क नाही. मी असे म्हणालो की, मतदारांना खुश करण्यासाठी त्यांचा हेतु आहे. यासाठी आवश्यकता नसतांना सुध्दा ते जास्तीत जास्त पाणी पाठवितात. हे मी सिध्द करु शकतो कारण त्या सदस्यांची माणसे पाणी पुरवठयाच्या ठिकाणी जातात. आमची माणसे तेथे नसतात त्यामुळे आमचा क्रमांक मागे करतात व त्यांच्या प्रभागात सतत टॅकर जातात. याचा अर्थ काय आहे? याचा अर्थ आपल्या प्रभागात जास्त टॅकर पाठवितात.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– मा. महापौर महोदया, कोणत्या नगरसेवकाचा माणुस जावुन तेथे दादागिरी करतो हे त्यांना आताच्या आता विचारा. यांच्याकडे तशी तक्रार आहे का?

मा. सदस्य श्री. शांताराम निकम:–मा. महापौरजी, सर्वांना माहिती आहे की, कुणाची माणसे जातात. श्री. रमेश चव्हाण आपल्याला सुध्दा माहिती आहे. मी आयुक्तांना सांगु इच्छितो की, उदयापासुन अशाप्रकारे तेथे माणसे दिसल्यास आपण त्यांच्या विरुध्द एफआयआर दाखल करायला हवा. अशी मी येथे मागणी करत आहे. नगरसेवकाने देखील तेथे जायला नको. जर तुम्ही वेळापत्रक बनवुन दिले असेल तर त्याप्रमाणे टॅकर जायला हवे. त्याप्रमाणेच टॅकर जातात परंतु यांची माणसे तेथे जावुन दादागिरी करुन आधी टॅकर घेवुन जातात व आपापल्या प्रभागात पाणी देतात. त्यांनतर झोपडपट्टीतील लोक मेले तरी चालतील. आयुक्तांना मी मागणी करतो की, उदयापासुन त्यांनी अशा लोकांवर एफआयआर दाखल करायला हवा. आपणांस देखील माहित आहे की, आम्ही नेहमी हे सांगत असतो. ब– याचशा नगरसेवकांची माणसे जावुन सकाळपासुन तेथे बसलेले असतात.

**मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :—** अनेक वेळा महासभेमध्ये सांगितले आहे की, टॅकरने पाणी पुरवठा केल्याने लोकांना त्रास होतो, त्यांना पाणी भरतांना त्रास होतो. टॅकर बंद करायचे सोडुन कोणता नगरसेवक स्वत:च्या प्रभागात टॅकरने पाणी पुरवठा चालु ठेवेल. हे चुकीचे आहे. कुणीही नगरसेवक स्वत:च्या प्रभागात टॅकर वाढविण्याचा प्रयत्न करणार नाही. कारण नळाला पाणी आले तर लोकांना त्रास होणार नाही. नळांना पाणी येत नाही म्हणुन तो टॅकरची मागणी करतो व प्रभागात पाणी पुरवठा करतो. दुसरी गोष्ट अशी की, टॅकरची मागणी केल्यानंतर अनेकवेळा योग्य वेळेवर टॅकर उपलब्ध होत नाही. लोकांना पाण्याची समस्या असते. एकेक, दोनदोन दिवस टॅकर येत नाही. अधिका—यांना सांगुन देखिल येत नाही कारण टॅकरच्या चालकांची तेथे लॉबी झालेली आहे. हे म्हणतात की, नगरसेवकांचा माणुस तेथे असतो. अडचण असेल तर माणुस तेथे जाणारच. माणसांना पाणी मिळाले नाही तर टॅकरसाठी माणुस तेथे पाठवावाच लागेल. अधिका—यांना सांगुनही टॅकर वेळेवर येत नसेल दोन—दोन तीन—तीन दिवस येत नसेल, तुम्ही अधिका—यांना विचारु शकता. अशा वेळी नगरसेवक माणसे पाठविणार नाही तर काय करणार? टॅकरच्या पॉइंटवर गेले तरच टॅकर येतो अन्यथा येत नाही. अनेक वेळा असे आमच्या निदर्शनास आले आहे. येथे ब—याच लोकांनी सांगितले की, आता पाण्याची समस्या नाही. परंतु समस्या आहे, हे सर्व अधिका—यांना माहिती आहे. समस्या काय आहे याची वेळोवेळी महासभेत चर्चा झालेली असतांना सुध्दा त्यांच्या प्रभागात पाणी समस्या कमी झाली असेल तर त्यांचे म्हणणे असे आहे की, पाणी समस्या कुठेच नाही असे नाही. ब—याच विभागात अजुनही पाणी समस्या आहे. अनेक वेळा मोर्चे काढले आहे, तक्रारी केल्या आहेत. अनेक वेळा उपोषणे झालेली आहेत. पॅनल नं १७ व १८ मध्ये शेवटचे टोक आहे म्हणुन पाणी पुरवठा होत नाही असे उत्तर तक्रार केल्यानंतर मिळते. परंतु आज जलवाहिन्या नसल्याने, असमान वितरण असल्याने पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही असे अधिका—यांचे म्हणणे आहे. आज काही ठिकाणी जलवाहिन्या टाकण्याचे काम सुरु आहे, परंतु अधिका—याचे तेथे नियोजन अथवा लक्ष नाही. पॅनल नं. १७ येथिल महादेव नगर म्हणुन विभाग आहे, तेथे जलवाहिनी टाकत आहेत. ती जलवाहिनी उतारा कडुन चढावाकडे जात आहे. परंतु मध्येच जलवाहिन्यांचा अडथळा आहे. हे वेळोवेळी निदर्शनास आणुन सुध्दा ठेकेदार काम तसेच सुरु ठेवत आहे. समोरची लाईन बुजवुन टाकली मी विचारल्यावर अधिका—याने सांगितले की ती बंद केली आहे. तुम्ही जर अशा प्रकारे व्यवस्थित देखरेख न केल्यास असेच होणार आहे. समान वितरण कधी होणार आहे हे देवच जाणे.मला असे वाटत नाही की उल्हासनगरमध्ये कधी समान वितरण होईल. परंतु तसा प्रयत्न करणे हा एक महत्वाचा भाग आहे व तो करुन पाण्याची समस्या दुर होईल असे म्हणायला काही हरकत नाही.

**मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :—** मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता व सन्माननिय सदस्य माझी आपणांस विनती आहे की, मी आता सभेत आपणांस जी माहिती देणार आहे पाणी पुरवठा विभागाचा सभापती म्हणुन मी फक्त ५ ते ७ मिनिटे घेणार आहे. तरी कृपया लक्षपुर्वक ऐकावे. आज या सभेत चर्चेचा मुद्दा असायला हवा आणि तो म्हणजे पाण्याच्या कमतरतेचा मुद्दा नसुन पाण्याचे समान वितरण कसे करायचे हा मुद्दा असायला हवा. आज आपल्या शहरात बरेच विभाग आहे जेथे नळाद्वारे पाणी न देता आपण टॅकरने पाणी देत आहोत. आपल्या चर्चेचा मुद्दा हा असायला हवा की, आपण कशाप्रकारे टॅकर बंद करुन त्यांना नळाने पाणी देवु शकतो. आज ही जी महासभा बोलावीली आहे तर मला सांगतांना फार दु:ख वाटते की, अशा प्रकारची महासभा आपण तीन महिन्यांपुर्वी बोलवायला हवी होती. ज्यावेळी कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची खरोखर समस्या होती. मला लक्षात आहे की, २८ फेब्रुवारीला मी होतो, श्री. विनोद ठाकुर होते, श्री. सतरामदास जेसवानी होते आम्ही सर्व एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता श्री. नागे यांना भेटलो होतो. कारण त्यांनी अचानक आपल्या शहराला होणा—या पाणी पुरवठयाचा दाब कमी केला होता. आपणांस नियमित दाबाने जे ४.५० दाबाने पाणी मिळायचे ते त्यावेळी आपणांस ३—३.१० ने मिळत होते. आम्ही त्यांच्याकडे गेलो व त्यांना विनंती केली की, आमच्या शहरात विशेषत: कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची समस्या आहे तर आपण तिकडे लक्ष दयावे. आमच्या महापौरांनी देखील दुरध्वनीवर त्यांच्याशी ब—याचवेळा चर्चा केली होती. परंतु दुर्भाग्याने त्यांच्याकडुन ज्याप्रकारचे सहकार्य मिळायला हवे होते ते मिळाले नाही. त्यानंतर २४ मार्चला आम्ही येथुन सर्वजण त्यामध्ये महापौर, उपमहापौर श्री. विनोद तलरेजा, सभागृह नेता व इतर सदस्य अंधेरीला श्री. सत्रे यांच्याकडे गेलो होतो. त्यांच्याशी आम्ही चर्चा केली. आमचे आमदार श्री. पप्पु कालानी यांनी दुरध्वनीवर त्यांच्याशी चर्चा देखील केली होती. व त्यांना असे निर्देश दिले की, श्री. नागे यांना कॅम्प नं. ४ व ५ ची पाणी समस्या दुर करण्यासाठी योग्य ती कारवाई करण्याबाबत निर्देश दिले. ते आमचे कार्यकारी अभियंता श्री. सावकारे व श्री. नागे यांच्याशी दुरध्वनीवर बोलले. त्या दोघी अभियंत्यांना जागेवर पहाणी करण्याचे निर्देश दिले. पहाणी केल्यांनतर त्यांनी एका ठिकाणी बुस्टर पंप बसविण्याबाबत सांगितले. यासाठी जवळपास रुपये ५५ लक्ष एवढा खर्च व त्या बुस्टर पंपचे विदयुत देयक रुपये ४५ लक्ष प्रतिवर्ष खर्च येईल असे सांगितले. आपल्या महापालिकेची स्थिती अशी नाही की आपण हे काम करु शकु. आम्ही आमच्या महापौर व आमदारांना यावर मार्ग

काढण्यासाठी विनंती केली. यावर एक पर्यायी मार्ग काढण्यासाठी आम्ही आमच्या आयुक्तांशी व कार्यकारी अभियंत्यांशी चर्चा केली. पाले येथिल एमजेपीच्या जलवाहिनीचे जे काम बाकी आहे, जर ते काम आपण लवकरात लवकर पुर्ण केले तर कॅम्प नं. ४ व ५ ची समस्या दूर होवु शकते. यासाठी आमचे महापौर, उप–महापौर व सर्व सदस्य यासाठी कामास लागले. आम्ही त्या गाववाल्यांशी संपर्क केला. गाववाल्यांचे असे म्हणणे होते की, आम्ही तुम्हांला जागा उपलब्ध करुन दिली तर त्याबदल्यात तुम्हांला आमच्या लोकांना महापालिकेत नोकरी दयावी लागेल. आपणांस माहिती असेल की, पुढील महासभेतच आम्ही तसा प्रस्ताव पास केला होता. २८ मे ला महापालिकेमध्ये आमचे आमदार श्री. पप्पु कालानी, श्री. किसन कथोरे यांच्या नेतृत्वाखाली आयुक्तांकडे बैठक झाली. ज्यामध्ये त्या गाववाल्यांना बोलविण्यात आले होते व त्यांनी मान्य केले आहे की जर महापालिकेने लेखी लिहून दिले व आमच्या लोकांना महापालिकेत नोकरी दिली तर त्याठिकाणी आम्ही आपणांस जलवाहिनीचे काम करु देवु. मला याठिकाणी सांगण्यास आनंद होत आहे की, ते प्रकरण सध्या ठाणे येथे भुमी संपादन कार्यालयात आहे. तेथुन एका आठवडयाच्या आत तो प्रस्ताव मंजुर होवुन येईल. त्यानंतर या कामाला जास्तीत जास्त एक महिना लागेल. ते काम झाल्यावर आपणांस या विषयावर चर्चा करण्याची काही आवश्यकता राहणार नाही. हे मी विशेषतः कॅम्प नं. ४ व ५ येथिल लोकांना सांगु इच्छितो. आमचे अशा प्रकारे काम सुरु आहे. त्या सोबत आपल्यासाठी अजुन एक चांगली गोष्ट झाली ती म्हणजे एमआयडीसीचे अधिकारी श्री. नागे हे आपली जी दिशाभुल करीत होते त्यांची बदली झाली आहे. त्यानंतर तेथे श्री. नेरे म्हणुन कार्यकारी अभियंता आले आहेत. त्यांच्या सोबत माझी चर्चा झाली आहे. आपणांस ही माहिती देतांना आनंद होत आहे की ते आल्यानंतर व त्यांच्याशी चर्चा झाल्यानंतर पाण्याचा दाब जो आधी ३.१० किंवा ३.२० असायचा तोच दाब आज ४ पर्यंत पोहोचला आहे. एवढाही पुरेसा नाही आपणांस कमीत कमी ४.५० एवढा दाब आवश्यक आहे. श्री. नागे यांची बदली झाल्यानंतर आपल्याला मिळणा–या पाण्याच्या दाबात वाढ झाली आहे. दुसरे म्हणजे त्याच बरोबर आपण पाले येथे काम करणार आहोत. त्या कामाच्या मागे आमचे आयुक्त साहेब लागले आहेत व आपले पाणी पुरवठा विभागाचे जे कार्यकारी अभियंता आहे त्यांचेही पुर्ण सहकार्य लाभत आहे. मला आनंद वाटत आहे की, आमच्या विरोधी पक्षातील सदस्यांनी देखील त्यांची प्रशंसा केली आहे. काही विभागात पाणी जात नाही हे मान्य आहे परंतु तेथे टॅकरद्वारे पाणी पुरवठा होत आहे. आपणांस तेथिल टॅकर बंद करुन नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. आता आपले सदस्य श्री. लाल पंजाबी हे बोलले की, निधीच्या कमतरतेमुळे बरीचशी प्राकलने मंजुर होवुन देखील काम सुरु करता आले नाही. मी आयुक्तांना विनंती करीन की, पाणी पुरवठा विभागाची जी प्राकलने आहेत त्यांना प्राथम्य दयावे. येथिल सर्व सदस्यांना देखील माझी विनंती राहील की आपल्या प्रभागात पाण्याची समस्या असेल तर आपण बाकीची कामे बाजुला सारुन पाण्याच्या समस्येला प्राथम्य दयावे. जर आपण आपला नगरसेवक निधी दिला तर ती कामे त्वरीत करता येतील. मी आयुक्तांना ही विनंती करीन की, एक आठवडयापुर्वी माझी आयुक्तां समवेत चर्चा झाली होती की आपल्या शहरात ब–याच व्यक्तींकडे पाण्याची बिलाची थकबाकी आहे. आपणांस आकडे मोठे मोठे दिसतात. संगणकामध्ये ब–याच व्यक्तींकडे मोठी–मोठी थकबाकी असल्याचे आकडे दिसुन येतात. कोणाला बिगर घरगुती दराने पाणी पट्टी देण्यात येते. परंतु प्रत्यक्षात इमारतीचे काम पुर्ण होवुन ५ वर्ष झाल्यानंतर देखील लोकांना त्याच दराने पाणी पुरवठा होत आहे. २००१ पासुन त्याच लोकांना मालमत्ता करासोबत पाण्याचेही देयक देण्यात येत आहे व बिगर घरगुती दराने देखिल देयक देण्यात येत आहे. आपल्या शहरातील लोकांना ही मोठी समस्या आहे. ही समस्या दुर करायला हवी तसेच ब–याचशा लोकांकडे थकबाकी आहे, त्यांच्याकडे पाणी येत नाही व ते महापालिकेत अर्ज करत असतात. आपण एक योजना सुरु करायला हवी ज्यामध्ये लोकांचा विलंब शुल्क आकार रद्द करुन वसुली करायला हवी. यामधुन जी वसुली होईल तो निधी जेथे–जेथे जलवाहिन्या टाकायच्या आहेत त्याच ठिकाणी वापरण्यात यावा. असे केल्यास आपण वेगाने काम करु शकतो. ही माहिती देणे मला उचित वाटले. आता मी आपणा सर्वांना व आयुक्तांना विनंती करीन की, पाणी पुरवठा विभागाचे जे प्राकलने आहेत व ज्या नगरसेवकांनी येथे तक्रार केली आहे त्यांनी पाणी पुरवठयासाठी आपला नगरसेवक निधी दिल्यास त्यांचे काम त्वरीत करण्यात यावे. संबंधीत अधिकारी मग त्यामध्ये येथिल कनिष्ठ अभियंता देखील आहे त्यांनी प्रभागात काय समस्या आहेत हे व्यासपिठावर येवुन सांगितले तर आम्हांस आनंद होईल. आयुक्तांऐवजी जे नगरसेवकांशी संबंधीत आहेत, जे नगरसेवक येथे बोलत आहेत की, आमच्या प्रभागात पाणी समस्या आहे त्यांच्या प्रभागातील कनिष्ठ अभियंता येथे येवुन बोलले तर सभागृहासमोर वास्तविकता येवु शकते. असे बोलुन मी माझे बोलणे संपवितो धन्यवाद.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर, श्री. मोहन साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—</u>** मा. महापौर महोदया, पाण्याचा विषय हा गंभीर विषय आहे. फक्त उल्हासनगरचा हा प्रश्न नाही पुर्ण जगात हा चिंतेचा विषय आहे. आज आपण टीव्ही वर, वर्तमानपत्रांमध्ये बघतो हा एक महत्वपुर्ण विषय म्हणुन पुर्ण जगासमोर आहे. परंतु ज्या प्रकारे या सभागृहात चर्चा सुरु आहे ते ऐकुन फार दु:ख वाटते की, या विषयातील गांर्भीर्य कोठेतरी दुखावले गेले आहे असे माझे वैयक्तीक मत आहे. कोणी उठुन मध्ये बोलण्यापुर्वी सांगतो की, हे माझे वैयक्तीक मत आहे. समस्येच्या गांभीर्याला कुठेतरी धक्का लागला आहे. या शहरात १०—१२ वर्ष मी पत्रकारीता केली असून ३ वर्षांपासुन नगरसेवक म्हणुन काम करीत आहे. या विभागातील पाणी पुरवठा विभागाची काम करण्याची पध्दत जवळुन पाहण्याची संधी मला प्राप्त झाली आहे. या विभागाबद्दल माझे पहिले निरिक्षण असे आहे की, उल्हासनगर मधील पाणी समस्या दुर करण्यासाठी कोणत्याही प्रकारची दिशा नाही. दिशाहिन प्रयत्न केले जात आहेत याचे कारण म्हणजे या सभागृहात सर्व सदस्यांना त्यामध्ये मी ही आहे आपापल्या प्रभागाची चिंता लागली आहे. आपल्या समोर एकच समस्या आहे, आपल्या समोर शहराची समस्या नाही. आपल्या समोर आज प्रामुख्याने कोणती समस्या असेल तर ती माझ्या प्रभागाची आहे. शहराची समस्या माझ्या डोळयासमोर नाही. मला असे वाटते की, या शहराच्या समस्या सोडविण्यासाठी जे प्रयत्न केले जात आहे त्यामध्ये पहिली अडचण येथेच निर्माण होते. जेव्हा मी पत्रकारीता करीत होतो त्यावेळी कल्याण—डोंबिवली महापालिकेतील एक महासभा बघत होतो. त्या महासभेत पाण्याच्या दरांबाबत चर्चा सुरु होती. बरेचसे नगरसेवक दरवाढीला विरोध करीत होते की प्रशासन पाण्याचे दर फार वाढवत आहेत व आम्ही याचा विरोध करीत आहोत. तर त्यावेळचे आयुक्त श्री. श्रीकांत सिंह यांनी सभागृहात सर्व माहिती दिली होती की जगात पाण्याची काय स्थिती आहे, भारतात काय स्थिती आहे व आपल्या शेजारीपाजारी काय स्थिती आहे त्यावेळी त्यांनी एक इशारा दिला होता की, आज आपण येथे पाण्याच्या दरवाढीला विरोध करीत आहात परंतु एक दिवस असा येईल की लोक खिश्यात पैसे घेवुन फिरतील परंतु त्यांना खरेदी करण्यासाठी पाणी उपलब्ध होणार नाही. ही अशी समस्या आहे, सर्व जगात या समस्येवर चिंतन सुरु आहे. आम्ही मागील आठवडयात राजस्थान येथे गेलो होतो. तेथे एका पोस्टरवर मी घोषवाक्य वाचले की, ''पाण्याला पाण्याप्रमाणे वाया न घालविता याला पैश्याप्रमाणे वाचवा.'' या घोषवाक्यावरुन आपणांस पाण्याचे महत्व लक्षात येते. परंतु ज्यावेळी आम्ही उल्हासनगर महापालिकेतील पाणी पुरवठा विभागाचा कारभार जवळुन पाहतो की, कश्या उपाययोजना केल्या जात आहेत. तेव्हा त्यात कोणत्याही प्रकारची दिशा अथवा झोनिंग पध्दत असल्याचे दिसुन येत नाही. एक दिड वर्षापुर्वी आयुक्त साहेबांनी एक श्वेतपत्रिका प्रसिध्द केली होती. त्या श्वेतपत्रिकेमध्ये त्यांनी उल्हानगरमध्ये पाण्याची समस्या नेमकी काय आहे, याचे मुळे कुठे आहे, येथे टॅंकरचा खर्च एवढा का आहे? लोकांवर किती भुर्दंड पडतो, लोक मोटार का लावतात? त्यामध्ये संपुर्ण विवरण दिले होते. कोण—कोणत्या विभागात पाण्याची टंचाई आहे त्या विभागांची नावे दिली होती. कोणत्या विभागात आम्ही प्रश्न सोडविणार आहोत, व कोणत्या विभागात आम्ही प्रश्न सोडविला आहे हे देखिल दिले होते. जर मागील दिड—दोन वर्षात आपण श्वेतपत्रिकेला समोर ठेवुन प्राकलने पास केली असते, जलवाहिन्या टाकल्या असत्या तर कदाचित फेब्रुवारी, मार्च व मे महिन्यात देखील आपणांस पाणी टंचाईचा सामना करावा लागला नसता. परंतु असा प्रयत्न येथे केला जात नाही. मी असे पाहिले आहे की, चेहरे बघुन प्राकलने मंजुर केले जातात. सार्वजनिक बांधकाम विभागाबद्दल देखील मी जेव्हा चर्चा करतो तेव्हा माझा प्रशासनावर असा आरोप आहे की, आवश्यकतेचा निकष नेहमी मागे ठेवला जातो व चेह—याला जास्त महत्व दिले जाते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्राकलनाबाबत जे होते तेच पाणी पुरवठा विभागाच्या प्राकलनाबाबत देखील होत आहे. चेहरे बघुन प्राकलने मंजुर केली जातात. कामाची आवश्यकता, त्या विभागातील गरज याकडे लक्ष दिले जात नाही. काम करण्याची कशी पध्दत आहे याचे मी आपणांस एक उदाहरण देतो, माझ्या प्रभागात पाच दुकाने आहेत त्याच्या मागे कधीही पाण्याची टंचाई नव्हती परंतु अचानक काही दिवसापासुन तेथे टंचाई निर्माण झाली आहे. याबद्दल मी संबंधीत विभागात विचारणा केली की, याठिकाणी कधीही पाण्याची टंचाई नव्हती तर आता कशी काय निर्माण झाली आहे? त्यांनी मला सांगितले की, तेथे नविन जलवाहिनी टाकल्याने पाणी समस्या निर्माण झाली आहे. ही कोणती कार्यपध्दती आहे? जर एका विभागात जलवाहिनी टाकल्याने दुस—या विभागात पाणी टंचाई होत असेल तर हा उपाय होवु शकत नाही. जेव्हा मी प्रभागाचा व गल्लीचा उल्लेख करतो तेव्हा हे एक उदाहरण आहे, मी स्वत: ज्या विभागात राहतो तेथे १९९९ मध्ये पाण्याचा गंभीर प्रश्न होता. ४ इंचाची जलवाहिनी आहे, तिला कनेक्शन देण्यासाठी मी त्यावेळचे आयुक्त श्री. शिंदे साहेब यांच्यासोबत प्रयत्न केला त्यावेळी श्री. हरदास माखिजा हे महापौर होते, श्री. धनंजय बोडारे हे उपमहापौर होते. यांचे सहकार्य त्यावेळी प्राप्त झाले होते. त्या ४ इंचाच्या जलवाहिनीला एक २ इंचाची जलवाहिनी जोडण्यात आली होती. त्यामुळे संपुर्ण शेवटच्या टोकाला पाण्याचा प्रश्न सुटला होता. आज आपल्या विभागाने त्या २ इंचाच्या जलवाहिनीवर एक—एक करुन खुप जोडण्या दिल्या आहेत त्यामुळे त्या २ इंचाच्या जलवाहिनीचे पाणी देखिल बंद झाले आहे. अशा प्रकारे या शहरात आपण मार्ग काढत राहिलो तर मला असे वाटत नाही की, येत्या १०—२०—५० वर्षात या शहरातील पाणी प्रश्न सुटु शकेल. आपण जी चर्चा करीत

आहोत ती तेथेच राहिल. माझ्या विभागात प्रभाग समितीच्या निधितून मी सिंटेक्सच्या दोन टाक्या मंजुर केल्या होत्या. त्यापैकी एक टाकी लागली व दुसरी टाकी लागली नाही. मला ब–याच वेळा आश्चर्य वाटते की, लोकांची मानसिकता नेमकी असते तरी काय? ज्या ठिकाणी मला टाकी बसवायची होती त्या विभागातील लोकांनी येवुन मला सांगितले की, आमच्या विभागात पुष्कळ पाणी आहे, त्यामुळे टाकीची आवश्यकता नाही. लोकांच्या मनात काय असते हे आमच्या लक्षात येत नाही. मला असे वाटते की, या मुद्दयावर आधी प्रशासनाच्या निवदेनाने सुरुवात व्हायला हवी होती. प्रशासनाने उभे राहुन माहिती दयायला हवी होती. कारण विरोधी पक्ष जेव्हा विशेष महासभा बोलवितो, तेव्हा यामध्ये राजकारण आहे असा आरोप होवु शकतो. परंतु प्रशासनाची जबाबदारी आहे की, त्यांनी तटस्थपणे येथे माहिती दयायला हवी. त्यांनी व्यासपिठावर उभे राहुन हिंमतीने सांगायला हवे होते की, आपल्या प्रभागात पाणी समस्या नाही आपण खाली बसा. आपल्या प्रभागात पाणी समस्या आहे ती आम्ही सोडवुन देवु. जोपर्यंत अधिका–यांमध्ये हे साहस येत नाही तोपर्यंत आपणांस अशा आरोपांचा सामना करावाच लागेल. सभेची सुरुवातच त्याने व्हायला हवी होती. आधी प्रशासनाने निवेदन करायला हवे होते की, मागील दोन महिन्यात पाण्याची परिस्थिती काय होती, प्रश्न काय होता. आज जेव्हा ४ के.जी. एवढया दाबाने पाणी मिळत आहे तेव्हा काय स्थिती आहे? ज्या विभागात पाणी टंचाई आहे तेथिल समस्या दुर कशी करणार? जी श्वेतपत्रिका प्रसिध्द केली होती त्याप्रमाणे काम केले असते तर मला असे वाटत नाही की, समस्या राहील. अन्यथा प्रत्येक नगरसवेक, प्रत्येक कार्यकर्ता, माझा विभाग, माझी गल्ली असे करुन पाणी ओढत राहिला, जर मी आज दुस–याच्या प्रभागातुन पाणी खेचले तर उदया दुसरा कोणी नगरसेवक माझ्या प्रभागातुन पाणी खेचु शकतो. जर मी निवडणुकीकडे बघितले, मतदारांकडे बघितले तर येणा–या दिवसात या शहरातील प्रश्न सुटेल असे मला वाटत नाही. जेव्हा मी माझ्या विभागाची समस्या सांगितली, मी उप–अभियंता श्री. सेलवन यांच्याशी बोललो की, टाकीतुन माझ्या प्रभागात जलवाहिनी आली आहे. तेथुन सरळ माझ्या प्रभागात पाणी यायला हवे. परंतु असे का होत नाही हे जेव्हा मी त्यांना विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की, जर आम्ही टाकी भरुन पाणी सोडले तर आपल्या विभागात पाणी व्यवस्थित येईल. परंतु पाणी थेट सोडले तर व्यवस्थित येणार नाही. मी त्यांना सांगितले जर आपणांस उपाय माहित आहे तर आपण तसे का करत नाही? त्यांनी मला सांगितले की, आम्हांला असे करु दिले जात नाही. याचा अर्थ काय आहे? माझ्या प्रभागात कोणाला टॅंकर हवा असेल तर टॅंकर थांबविला जातो. हे सर्व काय चालु आहे? हे जे प्रशासन आहे, पाणी पुरवठयाची जी प्रणाली आहे, ही खरोखरच प्रशासनाच्या हातात आहे काय? प्रशासनाच्या नियंत्रणात आहे का? हे आधी आपण बघा, यावर आत्मचिंतन करा की आपले यावर काही नियंत्रण आहे का? मला असे वाटत नाही, मी जबाबदारीने बोलत आहे माझे निरिक्षण असे आहे की, पाणी पुरवठयाच्या वितरण व्यवस्थेवर आपल्या प्रशासनाचे काहीही नियंत्रण नाही. लोकांना जेथे हवे तेथे जलवाहिन्या घेत आहेत, हवे तिकडे व्हॉल्व बसवत आहे. हवे तिकडे पाणी फिरवत आहेत, जे मनात येईल ते करीत आहेत. तर आपल्या हातात व्यवस्था आहे तरी कुठे? मी येथे जे बोललो आहे तर येथे आयुक्त बसले आहेत, कार्यकारी अभियंता बसले आहेत, त्यांनी माझ्या बोलण्याचे खंडन करुन दाखवावे की, मी खोटे बोलत आहे अथवा माझ्या मनाचे बोलत आहे. त्यांनी असे सांगितले तर सभागृहाचे समाधान होईल. परंतु दुसरे असेही बोलतो की, यामुळे आपण स्वत:ची दिशाभुल कराल. आपणांस साहस असायला हवे की, शहरात पाण्याची समस्या का आहे? व त्याचा उपाय काय आहे. समस्या का आहे याचे उत्तर देण्याचे साहस आपणामध्ये असायला हवे. तसेच आम्ही हा उपाय सुचवु हे सांगण्याचे साहस देखील आपणामध्ये असायला हवे. असे होत नाही तोपर्यंत काही मार्ग निघेल असे मला वाटत नाही. येथे जी चर्चा सुरु आहे ती संपण्यापुर्वी माझी महापौरांना विनंती आहे की, पाणी पुरवठा विभागाच्या अधिका–यांना येथे निवेदन करायला सांगावे. पाण्याची समस्या का आहे, कधी पर्यंत राहील, समस्या सुटेल अथवा नाही अशा प्रकारचे पुर्ण विवरण सभागृहासमोर दयायला हवे. अशी माझी विनंती आहे. जय हिंद, जय महाराष्ट्र ।

**मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी या सभागृहाबाहेर गेल्या व पीठासीन अधिकारी म्हणुन श्री विनोद तलरेजा हे आसनस्थ झाले.**

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–</u> मा. महापौर, आयुक्त साहेब, ब–याच वेळेपासुन येथे चर्चा सुरु आहे. मी काही बाबी सांगु इच्छितो. जेव्हा आमच्या श्री. सोनवणे साहेबांनी नविन नविन पदभार घेतला होता त्यावेळी टाईम्स ऑफ इंडियाच्या कल्याण–डोंबिवली पुरवणीमध्ये त्यांनी एक विधान केले होते की, आमच्याकडे पुरेसे पाणी आहे फक्त आमचे वितरण व्यवस्थित नाही. मला असे वाटते की, आज त्या गोष्टीस ३ वर्ष उलटुन गेले आहेत. परंतु ३ वर्षात आमच्या शहराची समस्या सुटलेली नाही. मला असे वाटते की, सिस्टीम फेल गेली आहे. श्री. सोनवणे यांनी जी आकडेवारी सांगितली होती, श्री. सोनवणे साहेब हे कधी चुकु शकत नाही. ही सिस्टम सुधरविण्यासाठी बरेच काही बदल करावे लागतील. काही विभाग आहेत, आपल्या शहरात जेथे पाणी जात नाही. तेथे पाणी कसे पोहचेल फक्त यावर विचार करण्याची आवश्यकता आहे. पुर्ण शहरात पाणी टंचाई आहे असे नाही. या छोटया विभागांमध्ये पाणी पोहचवायचे आहे. ही मोठी समस्या आहे असे मला वाटत नाही. माझा पॅनल नं. २५, श्री.

अशोक ठाकुर यांचा पॅनल नं. १८, पॅनल नं. १२ व अशा काही प्रभागांमध्ये पाण्याची समस्या आहे. तेथे पाणी समस्या सुटु शकत नाही असे मला वाटत नाही. आमचे आयुक्त श्री. सोनवणे हे सक्षम आहेत. आम्ही नशिबवान आहोत की आम्हांला असे अधिकारी प्राप्त झाले आहेत. परंतु त्यांनी पुरेसे लक्ष दिलेले नाही असे मला वाटत आहे. आमच्या येथे २४ सेक्शन मध्ये पाण्याची टंचाई आहे. श्री. सावकारे यांना मी यासाठी एका महिन्यात कमीत कमी १०० वेळा फोन करतो. एकाच जागेसाठी सांगतो. ते नेहमी सांगतात की, आता दुसरीकडे जात आहे तुमच्याकडे दोन दिवसात येईन. परंतु ती समस्या अजुन दुर झाली नाही. मनिष नगर मध्ये टॅंकर येतात. मी सांगुन–सांगुन थकलो परंतु मला असे कळले आहे की, तेथे दोन लाखाची जलवाहिनी टाकण्याचे काम मंजुर झाले आहे. जलवाहिनी मंजुर केल्याने समस्या सुटणार नाही. जलवाहिनी टाकण्यासाठी जर ठेकेदारच आला नाही तर काय फायदा होईल? एप्रिल २००४ मध्ये मी जेटपंपाचे काम मंजुर केले आहे. परंतु ते काम करण्यासाठी कुणीही ठेकेदार येत नाही. तर जलवाहिनी टाकण्यासाठी ठेकेदार आला नाही, जेटपंपासाठी ठेकेदार आला नाही, तर शहरातील समस्या सुटेल तरी कशी? एकच मार्ग आहे की, त्या विभागात टॅंकर पाठवावेत. आता असे सांगितले जाते की, थोडया दिवसांनी टॅंकर बंद होणार आहे. जर टॅंकर बंद केलेत तर शहरातील समस्या कशी काय सुटेल? तेथे नळाद्वारे पाणी दयावे. आपल्याकडे पाण्याची कमी नाही असे आम्हांला वाटते. परंतु मला असे वाटते की, श्री. सोनवणे यांनी व्यक्तीशः यामध्ये लक्ष देवुन उपाय काढावा. टॅंकर हा उपाय नसून तात्पुरता मार्ग आहे. मनिष नगर मध्ये वर्षानुवर्ष टॅंकर येत आहेत, तेथे दोन लाखाचे काम मंजुर झाले आहे परंतु जोपर्यंत ठेकेदार काम करत नाही तोपर्यंत समस्या कशी काय सुटेल? मी आयुक्तांना व महापौरांना विनंती करतो की, शहरामध्ये जी ४–१० ठिकाणे आहेत, तेथे नळाद्वारे पाणी देण्याची व्यवस्था करावी. ही गंभीर समस्या आहे त्याचे समाधान करण्यासाठी पावले उचलायला हवीत. जय हिंद, जय महाराष्ट्र।

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी, श्री. मनोज साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :–</u> मा. आयुक्त, मा. महापौर, उपमहापौर व सन्माननिय सदस्य, मघाशी मा. श्रीमती जया साधवानी यांनी सांगितले की, ''पाणी रे पाणी तुझा रंग कसा, ज्यामध्ये मिळविला तसा''. उल्हासनगर महानगरपालिका जेव्हा अस्तित्वात आली तेव्हापासुन येथे ब–याचवेळा पाण्याचे वेगवेगळे रंग आले. कधी भगवे पाणी आले, कधी निळे पाणी आले, कधी वेगळे पाणी आले. परंतु माणसाला पिण्यासाठी कोणत्याही कलरचे पाणी लागत नाही. त्याला पारदर्शक पाणी लागते. ही महासभा चालु असतांना पाण्याचे राजकारण न करता, पाणी का कमी आहे व समस्या सोडविण्यासाठी नेमके काय केले पाहिजे याचा ऊहापोह येथे झाला असता तर बरे झाले असते. उल्हासनगर महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर पाण्याचे व्यवस्थापन आजच्या घडीला पाणी नेमके कमी आहे का? जर असा विचार केला तर शहरामध्ये पाणी नाही, पाण्याचे प्रमाण व्यवस्थित आहे. परंतु पाण्याची टंचाई त्यावेळेस ज्या प्रकारे नव्हते त्याचप्रकारे आजही नाही. त्यावेळेस खुप पाणी होते, परंतु काही प्रभागाच्या ठरावीक लोकांसाठी पाणी होते. आजही त्याच लोकांसाठी पाणी आहे. जिथे पाणी नाही तेथे नाहीच आहे. हा सर्व विचार करतांना नेमके पाणी कुठे कुठे नाही हे जर बघितले तर जो झोपडपट्टी विभाग आहे त्या विभागात पाणी नाही. आजही शेवटच्या टोकाला झोपडपट्टी आहे तेथे पाणी नाही. हे सोडविण्यासाठी, पाण्याची टंचाई सोडविण्यासाठी समस्येचे जे मुळ आहे ते आयुक्तांपर्यंत पोहचते. गतिमान शासन, गतिमान प्रशासन ठेवतांना पाण्याचा प्रश्न जर सोडवायचा असता तर तो न सोडविण्याच्या पाठीमागे जर मुळ पोहचत असेल तर ते आयुक्तांपर्यंत पोहचते. आयुक्त व त्यांचे अधिकारी, त्यांचा कर्मचारी वर्ग, आज श्री. जवादे यांच्या सारखा एक चांगला अधिकारी येथे आल्यानंतर पाण्यामध्ये किती सुधारणा होते, पाण्याची टंचाई कमी कमी होत जाते. परंतु संपुर्ण कर्मचारी वर्ग जर बघितला तर आजच्या घडीला तुमच्या प्रशासनाला पाणी पुरवठा विभागामध्ये काम करणारा अधिकारी वर्ग पुरेसा नाही हे माझे प्रामाणिक मत आहे. एक अधिकारी त्याच्यावर १० जबाबदा–या टाकल्याने नेमकी कुठलीच जबाबदारी पुर्ण करु शकत नाही. पाण्याचा प्रश्न सोडवितांना तुमच्याकडे मजुर नसतात, खड्डे खोदले तर ते बुजवायला माणसे नसतात. गळत्या एवढया आहेत की, अर्धा वेळ घाण पाणी येतें. आणि अर्धा वेळ शेवटी स्वच्छ पाणी येते. म्हणजे तुम्ही एक तास पाणी देत असाल तर अर्धा तास पाणी वाया जाते. मागे तुम्ही श्वेतपत्रिका काढली होती. त्यामध्ये तुम्ही सांगितले होते की, या या परिसरात जलवाहिन्या टाकायला हव्यात. माझ्या प्रभागातील आम्रपाली नगर, गणेश नगर, यांचा श्वेतपत्रिकेमध्ये उल्लेख आहे. परंतु आजच्या घडीला कोणत्याही गोष्टीची अंमलबजावणी झालेली नाही. संपुर्ण शहराच्या पाण्याचे जे व्यवस्थापन आहे त्याचे तुम्ही जोपर्यंत विकेंद्रीकरण करत नाहीत, जोपर्यंत कर्मचारी वर्ग वाढवत नाहीत, तोपर्यंत यात सुधारणा होणे फार अशक्य आहे. आजही मी या महासभेतर्फे आयुक्तांना एक विनंती करतो की, व्यवस्थापन व्यवस्थित करण्यासाठी प्रभागनिहाय कर्मचारी वर्ग आणि प्रभागनिहाय व्यवस्थापन हा जर तुम्ही पुरेसा उपलब्ध केला तर प्रभागनिहाय राहिलेले कामे मग ती जलवाहिन्या टाकायच्या असतील, खड्डे बुजवायचे असतील, गळत्या काढायच्या असतील,

शेवटच्या टोकाला पाणी पोहचत नसेल, संपुर्ण उन्हाळा जेटपंप बंद होता, बोअरवेल दुरुस्ती बंद होती, कुठल्याही प्रकारची पर्यायी व्यवस्था नव्हती या सर्व व्यवस्थेचा जर आयुक्तांनी विचार केला तर मला असे वाटते की, पाण्याची टंचाई कमी होईल. आम्ही आंदोलन करीत नाही, काही लोक आंदोलन करतात, काही लोकांना पाणी असुनही आंदोलन करतात. आम्ही मागच्या ५ वर्षापुर्वी जेव्हा श्रीमती यशस्वीनी नाईक या महापौर होत्या, तेव्हा आम्ही आंदोलन केले होते. परंतु तेव्हा परिस्थिती खरोखर खराब होती. ती खरी परिस्थिती होती. आम्ही आंदोलन करीत नाही याचा अर्थ आम्ही षंढ आहोत अशातला भाग नाही, आम्हीही आंदोलन करु शकतो. परंतु योग्य वेळी आंदोलन झाले पाहिजे. मी आयुक्तांनी या सर्व गोष्टींचा विचार करावा एवढे बोलुन मी माझे दोन शब्द संपवतो. धन्यवाद.

**मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला व महापौरपदी आसनस्थ झाल्या.**

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, यांनी माझ्या प्रभागाच्या फार बढाया मारल्या, असे आहे, तसे आहे. माझ्या प्रभागात मिलिटरीच्या काळातील जलवाहिनी तुटली आहे. तिच्या जागी दुसरी जलवाहिनी टाकण्याचे काम मंजुर झाले आहे. आठ महिने झाले आहे परंतु कुणीही ठेकेदार काम करण्यास तयार नाही. तर यासाठी काय करणार हे सांगावे. तसेच एमआयडीसीची जी ३३ इंचाची जलवाहिनी येते, तेथे एवढया मोठया प्रमाणावर गळती आहे, ती सावकारे साहेबांनी त्या दिवशी बघितली. दररोज किमान १०० टॅंकर पाणी वाहुन जात आहे. १० मिनिटात एक गाडी भरते, तेथे साडे सोळा तास पाणी असते. अशाप्रकारे दररोज सुमारे १०० टॅंकर पाणी वाहत आहे. तुम्ही हे बघावे बाकी काही नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौर, उपमहापौर, सचिव साहेब, आयुक्त साहेब व आमचे श्री. आयलानी साहेब, सर्व प्रथम मी या सर्वांना धन्यवाद देतो की, आज सभागृहात कुलर ठेवले आहेत. कमीत कमी आज आमचे सर्व सदस्यांना थंडावा मिळत आहे. जर आयुक्त साहेब, महापौर व उपमहापौर यांनी सभागृहाला एसी बसविले तर आमचे सदस्य अजुन थंड होतील. कुलरला पाणी लागते. आधीच पाण्याची टंचाई आहे यासाठी एसी बसविणे योग्य होईल. आज माझ्या समोर जे मुद्दे उपस्थित झाले त्यामध्ये महत्वाचा मुद्दा म्हणजे ज्या अधिका–याने चार वर्षापासुन आपणांस त्रस्त करुन सोडले होते जे उल्हासनगरकडे दुर्लक्ष करायचे, ते श्री. नागे साहेब हे श्री. राजु जग्याशी यांनी सांगितल्याप्रमाणे बदली झाले आहेत. त्यांची बदली होताच कॅम्प नं. ४ व ५ ला जे २.८० या दाबाने पाणी मिळायचे तेच पाणी ४ ते ४.२० पर्यंत पोहोचले आहे. त्यांनतर थोडी फार सुधारणा झाली आहे. आमच्या श्री. बोडारे साहेबांनी जसे सांगितले की, जेव्हा टंचाई होती तेव्हा विजेच्या भारनियमनाप्रमाणे पाण्याचेही नियमन केले होते ही वस्तुस्थिती आहे. श्री. नागे साहेब यांनी जेव्हा पाणी कमी केले होते तेव्हा ब–याच विभागात पाणी कमी जात होते. त्यावेळी मी देखील उपोषण केले होते, श्री. सतरामदास जेसवानी हे देखिल होते. त्यावेळी सांगण्यात आले की, तुम्हांला पाणी येते, परंतु तुमचे पाणी एक दिवस बंद केल्याने कॅम्प नं. ४ मध्ये पाणी येईल. तेव्हा आम्ही विचार केला ठिक आहे की पाणी नियमन केल्याने एखादया विभागास १०० टक्के पाणी मिळणार असेल तर आम्ही सहमत होवू. आज जेव्हा पाण्याचा दाब वाढला आहे तेव्हा माझी अशी विंनती आहे की, जे पाण्याचे नियमन केले होते ते बंद केले जावे. जर एखादया सदस्याच्या प्रभागात पाणी व्यवस्थीत येत असेल व तो प्रशंसा करीत असेल, जरी श्री. भुल्लर यांनी प्रशंसा केली नाही, त्यांच्याकडे २४ तास पाणी येते. परंतु जर श्री. शांताराम निकम हे प्रशंसा करीत असतील तर त्यांना दाद दयायला हवी. परंतु हा मुद्दा गंभीर आहे, कोणत्याही सदस्याला पाण्याची समस्या असेल तर आयुक्त साहेबांनी तेथे जलवाहिन्या टाकाव्यात, अधिका–यांना पाठवुन त्यांची समस्या सोडवाल तर चांगले होईल. कारण आमचे सदस्य हे शहरासाठी बोलतात. जर कुणी सदस्य महासभेचे लक्ष केंद्रीत करत असेल तर ती गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. परंतु माझी विरोधी पक्षाच्या सदस्यांना विंनती आहे की, आपल्या व आमच्या संख्येमध्ये मध्ये फरक आहे जसे आपले १२ आहेत, ८ आहेत, आमचे ४९ आहेत, कॉंग्रेसचे ७ आहेत. जर तुमचे सदस्य बोलतात तर आमचे सदस्य शांत राहतील, आमचे सदस्य बोलतील तर तुमच्या सदस्यांनी शांत राहावे. आमचे काही सदस्य चिडतात की, पाण्याची टंचाई आहे कथा सांगु नका. तर मला असे वाटते की, श्री. लाल पंजाबी यांनी कथा सांगण्याची सुरुवात केली आहे. बजेटच्या बैठकीत देखील ते कथा सांगतात, आज पाण्याची बैठक होती तरी त्यांनी कोंबडयाची गोष्ट सांगितली. ते बोलतात तेव्हा आम्हांला ही उत्तरे दयावी लागतात. जर तिकडुन कोंबडा बोलला नाही तर इकडुनही कोणी बोलणार नाही. तेथुन बोलतील तर येथुनही बोलतील. टॅंकरची जी समस्या आहे, कोणीही माणुस लाचारीने टॅंकर घेतो. आज मी मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त व सर्वांना विनंती करीन की, जेथे–जेथे आपण पाणी देवु शकत नाही, ३० जुन नंतर आपण टॅंकर बंद करणार आहोत यासाठी यावर पुन्हा विचार करावा. यासाठी बजेटमध्ये समायोजन करावे लागले तर ते देखिल करावे. जोपर्यंत आपण नळांमध्ये

पाणी देत नाही तोपर्यंत त्यांना टॅकरने पाणी दयायला हवे. मी आयुक्तांचे लक्ष आकर्षित करु इच्छितो उल्हासनगर मध्ये असे किती प्रभाग आहेत जेथे मोटार न लावता पाणी येते? यावर मला उत्तर दिले की, फक्त चार प्रभाग आहेत. याचा अर्थ पुर्ण उल्हासनगरमध्ये लोकांना मोटारने पाणी घ्यावे लागते. जर मोटारने पाणी घ्यावे लागले नाही तर आम्ही लोडशेडिंग बंद करु असे एमएसईबी वाल्यांनी सांगितले आहे. हा गंभीर मुद्दा आहे. प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागात मोटार शिवाय पाणी जात नाही. प्रत्येक घराला मग ते दोन तास असो, तीन तास असो, चार तास असो त्यांना मोटार चालुच ठेवावी लागते. त्यांना मोटार शिवाय भुमीगत टाकीत थेट पाणी दिल्यास ते पाणी वर चढविण्यासाठी पुन्हा मोटार चालु करावी लागते. परंतु जर मोटार बंद केली तर पुर्ण शहराचा पाण्याचा प्रश्न सुटु शकतो. लोक म्हणतात जेव्हा ही विज जाते तेव्हा आम्हांला पाणी येते. याचा अर्थ जेव्हा लाईट असते तेव्हा लोक मोटारने पाणी खेचतात व बाकीच्या लोकांना पाणी येत नाही. तर उल्हासनगरमधील सर्व लोकांना मोटार न लावता पाणी उपलब्ध करुन दिले तर फार चांगले होईल. आपण कोणाचेही प्राकलन थांबवत नाही. आयुक्त साहेब पाण्याचे प्राकलन कधीही थांबवत नाही. बिल देतांना नेहमी पाणी पुरवठा विभागाच्या ठेकेदारांनी आधी दयायला हवे. जी कामे प्रलंबित आहेत ती सर्व पुर्ण केली तर सर्व सदस्यांची तक्रार दुर होईल. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.**

<u>मा. आयुक्तः—</u> मा. महापौर महोदया, पाण्याच्या समस्येवर जेवढया गंभीरतेने आज चर्चा झाली प्रशासनाला एक गोष्ट स्विकार करावी लागेल की शहरात काही ठिकाणी पाण्याची टंचाई आहे. परंतु पाण्याची खरी टंचाई काय असते हे बघण्यासाठी आपणांस महाराष्ट्राच्या दुस—या विभागात जावे लागेल. जेथे १५ दिवसातुन एकदा पाणी येते. काही विभागात आठवडयातुन एकदा पाणी येते, काही ठिकाणी दोन वेळा येते. काही ठिकाणी आठवडयातुन एक दिवसा आड पाणी पुरवठा होतो. काही ठिकाणी दिवसातुन एकदा पाणी येते जे पंधरा मिनिट ते एक तास येते. पंधरा दिवसातुन एकदा पाणी येते तेही फक्त एक तास येते. त्याच्याशी तुलना केली तर उल्हासनगर शहरात पाण्याची टंचाई आहे असे म्हणणे चुकीचे होईल असे मला वाटते. परंतु जसे आपल्या पाणी पुरवठा विभागाच्या सभापतींनी सांगितले त्याच्याशी मी सहमत आहे. पाण्याचे वितरण आपल्या शहरात व्यवस्थित नाही. पाण्याचे वितरण व्यवस्थित नसल्याने व पाण्यासाठी आपण एमआयडीसीवर निर्भर असल्याने आपणांस नेहमी पाण्याच्या समस्येला तोंड दयावे लागते. जेव्हा आम्ही २००३ मध्ये एक श्वेतपत्रिका सभागृहासमोर ठेवली होती. त्यामध्ये पाणी समस्या निर्माण होण्याची काही कारणे सांगितले होते. जी मी आपल्या परवानगीने पुन्हा सांगत आहे. आम्ही जी कारणे सांगितली होती त्यामध्ये महत्वाचे कारण म्हणजे आपल्या वितरणवाहिन्या फार जुन्या आहेत. मिलिटरी बॅरेकच्या जलवाहिन्या आपण आजही वापरतो. तिसरे म्हणजे जलकुंभ जे पाण्याचे समान दाबाने वितरण होण्यासाठी आवश्यक असतात त्यांची संख्या आपल्याकडे फार कमी आहे. आज आपण जवळपास ११० द.ल.लि. पाण्याचे वितरण करतो. एवढया पाण्याचे वितरण करण्यासाठी आपल्याकडे कमीत कमी १/३ क्षमतेचे जलकुंभ असणे आवश्यक आहेत. म्हणजेच जवळपास ३५—४० द.ल.लि. पाण्याचा साठा करणे आवश्यक आहे. २ वर्षापुर्वी या शहरात फक्त तीन जलकुंभ होते नंतर ८ जलकुंभ पहिल्या टप्प्यात बनविले गेले. ते देखिल अजुन सर्व पुर्ण झाले नाही, आणि जे पुर्ण झाले आहेत ते भरण्यासाठी ज्या प्रकारची जलवाहिनी हवी होती ती बनविलेली नाही. उदाहरणादाखल चोपडा कोर्ट येथिल जलकुंभ अथवा तक्षशिला येथिल जलकुंभ जे आम्ही पुर्ण भरु शकत नाही. दिवसातुन दोन वेळा भरणे आवश्यक आहे परंतु ते एक वेळा देखिल भरता येत नाही. चोपडा कोर्ट येथिल एकदाही भरता येत नाही. तिसरे कारण म्हणजे या शहराची भौगोलिक रचना उंच सखल म्हणजेच काही ठिकाणी सखल भाग व काही ठिकाणी उंचावरील विभाग आहेत. समान पातळी नसल्याने जे लोक टेकडीवर राहतात त्यांना पाण्याची टंचाई भासते. येथे ज्या जलवाहिन्या टाकल्या आहेत त्यामध्ये समन्वय नसल्याने पाण्याची गळती मोठया प्रमाणावर होते. आपण १९९४ मध्ये किर्लोस्कर कंसल्टन्सीद्वारा जो रिपोर्ट बनविला होता तो आपण पाहिल्यास त्यामध्ये अभ्यास करुन सांगितले आहे की, येथे पाण्याची गळती ५० टक्के आहे. बाकीच्या शहरांमध्ये हेच गळतीचे प्रमाण २० ते २५ टक्क्याच्या दरम्यान आहे. दुसरे म्हणजे येथे अनाधिकृत नळजोडण्यांचे प्रमाण फार मोठे आहे. नळ जोडण्या व बांधकामे यांचे प्रमाण आपण बघितले तर उल्हासनगर शहरात १,४९,००० मालमत्ता आहेत. परंतु इमारतींची संख्या ४०,००० पेक्षा देखील कमी आहेत. या इमारती ज्या आपण बघता यामध्ये जर एका इमारतीत एक नळ जोडणी असती तर ४०,००० जोडण्या राहिल्या असत्या. एका इमारतीत जेवढया सदनिका असतात, जेवढे लोक राहतात त्यांना लक्षात घेवुन एका इमारतीत एक नळ जोडणी हा निकष लावला तर जास्तीत जास्त ४०,००० नळ जोडण्यांची आवश्यकता होती. आमच्याकडे जो रेकॉर्ड उपलब्ध आहे, त्याप्रमाणे ५२,००० जोडण्या अधिकृत आहेत. व ३०,००० पेक्षा जास्त जोडण्या अनधिकृत आहेत. आम्ही नळजोडण्या नियमित करण्यासाठी एक योजना काढली होती त्या योजनेमध्ये ३०,००० पैकी फक्त ३,२०० लोकांनी नळ जोडण्या अधिकृत करुन घेतल्या आहेत. उर्वरित लोकांनी जे रुपये

२,२४० भरायचे होते ते देखील भरले नाही. म्हणजेच अनामत व दंड कमी असुन देखील त्या अनाधिकृत जोडण्या अधिकृत करुन घेतल्या नाहीत. पुढील कारण जे आम्ही सांगितले होते की येथे पाणी खेचण्यासाठी बुस्टर पंप लावले जातात. एका इमारतीत ४ नळजोडण्या असतात. परंतु प्रत्येक जोडणीवर अर्धा अश्वशक्ती ते दोन अश्वशक्तीपर्यंत टिलु पंप लावले जातात. जे पंप लावतात फक्त त्यांनाच पाणी येते. नळ जोडणी घेतांना वितरण वाहिनीमध्ये निपल्स टाकतात ज्यामुळे पुढे पाणी जातच नाही. एमआयडीसीवर आपण जे अवलंबुन आहोत त्याचा उल्लेख मी केला की जो पर्यंत आपण त्यांच्यावर निर्भर राहु तोपर्यंत ते जेवढे पाणी देतील तेवढेच पाणी आपण वितरीत करु शकु. जेवढे देतील, ज्या दाबाने देतील, ज्यावेळी देतील हे सर्व लक्षात घेवुन आम्हांस पाणी वितरीत करावे लागेल. आज आपणा सर्वांना माहिती आहे की, एमआयडीसीशी पाणी कपातीविरुध्द आम्हांस कसा सामना करावा लागला. पुढचे कारण आम्ही सांगितले होते की, निधी उपलब्ध व्हायला हवा. मी वारंवार येथे सांगत आलो आहे, आपणांस चांगले वाटणार नाही. येथे वितरण वाहिन्या नसल्याबाबत चर्चा झाली. या शहरात कशाला प्राथम्य दयायला हवे होते ते वितरण वाहिन्यांना दयायला हवे होते हे दिसुन येते. परंतु या शहराने नेहमी सी.सी. पॅसेजला प्राथम्य दिले आहे. मी यावर जास्त बोलुन आपणांस दु:खी करु इच्छित नाही. परंतु आपले प्राथम्य चुकल्याने दोन प्रकारचे नुकसान झाले आहे. वितरण वाहिन्या ज्याप्रकारे टाकायला हव्या होत्या त्याप्रकारे त्या टाकल्या गेल्या नाहीत. दुसरे म्हणजे सीसी पॅसेज करतांना आधी जी जलवाहिनी होती ती देखील सी.सी. पॅसेजच्या खाली दाबली गेली व पाणी ज्या प्रकारे पुढे जायला हवे, ते आज जावु शकत नाही. अजुन एक कारण आम्ही सांगितले होते की, जुन्या वितरण वाहिन्या बदलणे आवश्यक आहे. सी.सी. पॅसेज करतांना ज्या वाहिन्या दबल्या गेल्या आहेत त्या काढुन नव्याने टाकणे आवश्यक आहे. यासाठी आम्ही काही अल्पकालीन व दिर्घकालीन उपाययोजना सुचविल्या होत्या. अल्पकालीन उपाययोजनांमध्ये वितरण वाहिन्या टाकणे हे सुचविले होते. आज येथे आम्रपाली नगरचे उदाहरण दिले गेले. परंतु अम्रपाली नगर व जेथेही जलवाहिन्या नव्हत्या तेथे जलवाहिन्या टाकल्या गेल्या. परंतु त्यांना जलकुंभाद्वारे पाणी न दिल्याने किंवा झोनिंग पध्दत नसल्याने येथे लोकांना पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होत नाही. ज्यांनी ज्यांनी श्वेतपत्रिकेचा उल्लेख केला त्यांनी ती पाहिल्यास त्यामध्ये आम्ही लिहिले आहे की, आपला स्वत:चा स्त्रोत निर्माण करणे आवश्यक आहे. स्वतंत्र पाणी पुरवठा योजना आवश्यक आहे. यासाठी आम्ही निविदा मागविली होती. निविदा स्विकृतीचे काम अंतिम टप्प्यात आहे. मला खात्री आहे की, ते काम झाल्यानंतर, आपणा सर्वांना माहिती असेल की, २०३८ पर्यंत आपली पाण्याची जी आवश्यकता असेल ती लक्षात घेवुन १७० द.ल.लि. प्रति दिन एवढा कोटा मा. जलसंपदा मंत्री श्री. अजित पवार, आपले पालकमंत्री मा. श्री. गणेश नाईक, आपल्या शहराचे आमदार मा. श्री. पप्पु कलानी यांच्या सहकार्याने मंजुर झाला आहे. लवकरच बीओटी ची योजना येथे सुरु होणार आहे. श्वेतपत्रिकेत आम्ही लिहिले होते की, येथिल पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे खाजगीकरण होणे आवश्यक आहे. खाजगीकरण केल्यांनतर आपण समान वितरण करु शकतो. श्री. रमेश चव्हाण यांनी सांगितले की, एका व्हॉल्वमनच्या चुकीमुळे १५ दिवस एका विभागाला पाणी मिळाले नाही. मानवी चुकांमुळे, हस्तक्षेपामुळे काही ठिकाणी पाणी पुरवठा होत नाही. पाणी असते परंतु व्हॉल्वमनच्या अथवा विभागातील काही लोकांच्या चुकीमुळे, ब—याच विभागातुन तक्रार येते की, काही विभागातील लोक ताकदीचा उपयोग करुन स्वत:च्या विभागाला पाणी पुरवठा करुन घेतात. खाजगीकरण केल्यास अशा प्रकारच्या चुका होणार नाहीत. दिर्घ कालीन उपाययोजनांसाठी आम्ही या सभागृहाकडे ३ वर्षाची मुदत मागितली होती व सभागृहाने ती दिली आहे. ज्या अल्पकालीन उपाययोजना होत्या त्यातील काही कामे अदयाप सुरु आहेत. या सभागृहाने सुधारीत पाणी पुरवठा योजनेच्या पहिल्या टप्प्याला जी मंजुरी दिली होती त्या मंजुरीला शासनाकडुन जी मंजुरी हवी होती ती अदयाप प्राप्त झालेली नाही. परंतु पहिल्या टप्प्याचे जवळपास ९० टक्के काम पुर्ण झाले आहे. आता बिओटी तत्वावर जी योजना हाती घेतली जाईल त्यामध्ये ८ नविन जलकुंभ बनविणे व जवळपास १७ किमीच्या वितरण वाहिन्या टाकणे. म्हणजे जलशुध्दीकरण केंद्राच्या शिवाय १७ किमीच्या जलवाहिन्या टाकणे हेही काम येथे घेतलेले आहे. येथे काही सदस्यांनी वैयक्तीक प्रश्न उपस्थित केले त्यांना उत्तर देणे उचित वाटते. सुरुवात श्री. रुपचंदानी यांनी केली. त्यांनी विषय सभागृहासमोर ठेवला. टॅकरद्वारे जो पाणी पुरवठा होतो तो बघितला तर फक्त काही प्रभागात पाणी टंचाई असल्याने दिसुन येते. उदाहरणादाखल पॅनल नं. २३,१८,२०,१९,२५,२४,६,२२,७,३,५ एवढया पॅनल मध्ये सरासरी प्रतीदिन १० पर्यंत टॅकर दिले जातात. उर्वरीत पॅनलमध्ये, चुकुन एखादा पॅनल राहिला असेल, इतर प्रभागांमध्ये सरासरी एक ते दोन टॅकर जातात. आधी जे मी क्रमांक सांगितले ते लक्षात घेवुन ३ ते १० टॅकर प्रतीदिन जातात. कदाचित आपला प्रभाग यामध्ये आला नसेल. पॅनल नं. १२ असे मी बोललो. मी जी आकडेवारी सांगितली आहे ती सरासरी सांगितली आहे. १२ बोललो नसेल तर त्याचा देखील समावेश करु. जर कोणाचा समावेश करायचा असेल तर तो देखील करु. मला एवढेच म्हणायचे आहे की, हे जे पॅनल आहेत यामध्ये पाण्याची टंचाई आहे हे मानावे लागेल. ही दुर करण्यासाठी आपण काही सुचना दिल्या आहेत. त्यामध्ये अनधिकृत नळजोडण्या व त्यांचा वापर, पाणी विकले जात आहे असे बोलले गेले श्री. नथु सोनवणे हे बोलले. त्या बद्दल आम्ही जागेवर जावुन चौकशी

केली होती. तेथे अर्धा इंचाची जोडणी आहे. तो माणुस पाणी मिनरल वॉटर म्हणुन विकतो यासाठी पोलिसांनी स्वत:च तक्रार दाखल केली आहे. यांचे म्हणणे होते की, तेथे जोडण्या जास्त आहेत. परंतु तेथे दोन वेळा पहाणी केल्यानंतरही आम्हांला जास्तीच्या नळजोडण्या आढळुन आल्या नाहीत. परंतु त्या माणसाविरुध्द पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्री. रमेश चव्हाण यांनी सांगितले की, कॅम्प नं. ४ व ५ ला किती पाणी मिळते, कॅम्प नं. ४ व ५ ची लोकसंख्या विचारात घेवुन कमीत कमी ४४ द.ल.लि. पाणी मिळायला हवे. परंतु आम्हांला पाले येथुन जे पाणी मिळते, सरासरी पाणी काही दिवस ३६ द.ल.लि., काही दिवस ३८ द.ल.लि. व काही दिवस २६ द.ल.लि. पाणी मिळाले आहे. परंतु सरासरी पाणी फक्त ३२ द.ल.लि. एवढे मिळाले आहे. परंतु कॅम्प नं. ३ येथिल आनंद नगर बुस्टर येथुन जे पाणी दिले जाते, ही सरासरी ६ द.ल.लि. प्रती दिन मिळाले आहे. याचा अर्थ प्रती दिन सरासरी ३८ द.ल.लि. पाणी आम्ही कॅम्प नं. ४ व ५ ला दिले आहे. यानंतरही तेथे अजुन ६ द.ल.लि. पाण्याची आवश्यकता आहे. पाले येथे टप्पा १ अन्वये जे काम सुरु होते त्या अन्वये ७५० एमएम व्यासाची जलवाहिनी टाकायची होती. तेथिल काही लोकांची जमिन यासाठी हवी होती. त्या कामास सुरुवात केली परंतु भुसंपादनाची कारवाई पुर्ण न झाल्याने ते काम अदयाप प्रलंबित आहे. त्याबद्दल सभापतींनी आपणांस माहिती दिली. त्या लोकांबरोबर आमची चर्चा झाली आहे. त्यांना जिल्हाधिकारी यांच्याकडुन प्रकल्पग्रस्त म्हणुन दाखला मिळाला तर त्यांना महापालिकेत कामाला घेण्यासाठी देखील प्रस्ताव आम्ही सादर केला होता. तो देखील मंजुर झाला आहे. पाणी पुरवठयाचा जो दाब आहे तो जर ४ ते ४.५ एवढया दाबाने प्राप्त झाला तर कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची समस्या होणार नाही. दुसरे म्हणजे येथे मिटर बद्दल बोलले गेले. किती पाणी मिळते व किती वाया जाते हे बघण्यासाठी आम्ही अल्ट्रा सॉनिक मिटर्स भाडयाने घेण्यासाठी एमजेपीला संपर्क केला आहे. ते मिळाल्यावर व काही ठिकाणांवर बसविल्यावर आम्हांस कळेल की, एमआयडीसीकडुन किती पाणी आपणांस मिळत आहे, व कोणत्या जलकुंभात किती पाणी जात आहे. यासाठी प्रयत्न सुरु आहेत. टॅकरद्वारे खाजगी खेपा घातल्या जातात असे येथे सांगितले गेले. माझ्याकडे पहिल्यांदाच अशी तक्रार आली आहे आम्ही त्याकडे नक्कीच लक्ष देवु. जर टॅकर पुरवठा करणारी एजन्सी आधी स्वत:च्या खेपा मारत असेल व नंतर महापालिकेच्या खेपा मारत असेल तर त्यावर नक्कीच कारवाई करण्यात येईल. जी मंजुर प्राकलने आहेत त्यांचे काम, जसे श्री. बेहरानी साहेबांनी सांगितले व श्री. चव्हाण साहेब यांनी सांगितले. फक्त प्राकलने मंजुर होवुन समस्या सुटणार नाही हे आम्हांला देखील ठाऊक आहे. परंतु प्राकलन मंजुर झाल्यानंतर ठेकेदार येथे काम करण्यास का तयार नाही हे आपणा सर्वांना माहिती आहे. निधीबद्दल मागील दोन वर्षात मी कधीही उल्लेख केला नव्हता परंतु जेवढी वसुली व्हायला हवी, जेवढे पाणी आपण देतो तेवढी वसुली होत नाही. जर महापालिकेच्या तिजोरीत पैसा आला नाही तर ठेकेदाराला पैसे कुठुन देणार? जर मी असे बोललो की, पाण्याच्या समस्येसाठी जेवढी वितरण व्यवस्था जबाबदार आहे, आपण सर्वांनी प्रशासनाला यासाठी दोषी ठरविले आहे. परंतु जर प्रशासनातर्फे आपणांस स्पष्ट सांगण्यात आले तर या शहरात कर भरण्यासाठी ज्या प्रकारे लोक उदासिन आहेत, त्यांची उदासिनता देखील या समस्येमागे एक प्रमुख कारण आहे. हे बोलतांना मला काहीही संकोच होत नाही. जर लोकांनी वेळेवर कर भरला तर आम्ही देखील एमआयडीसीला जी थकबाकी असते ती दिली असती. २००३—२००४ मध्ये पुर्ण वर्षात एमआयडीसीची एक रुपयाचीही थकबाकी नव्हती. परंतु २००४—२००५ मध्ये वसुली कमी झाल्याने ३१ मे २००५ ला जवळपास ७.२२ कोटी एमआयडीसीला देणे बाकी आहे. पैसे न भरल्याने ब—याचवेळा एमआयडीसीने पाण्यात कपात केली आहे. आजही आपणांस माहिती असेल की, पाऊस उशिरा आल्याने एमआयडीसीकडुन १५ टक्के पाणी कपात लागु करण्यात आली आहे. लोकांना हे सहन करावे लागेल. ठेकेदार कार्यादेश दिल्यांनतरही काम करीत नाहीत यासाठी निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. यासाठी मी आपणांस विनंती करीन की आपल्या प्रभागातील जे करदाते आहेत त्यांना आपण त्यांची थकबाकी लवकरात लवकर भरणे बाबत समजवावे. जेणेकरुन त्यांना पाण्याची टंचाई भोगावी लागणार नाही. येथे एसएलसीएम गाडी बद्दल बोलले गेले परंतु ते पाण्याबददल नसल्याने त्याबाबत मी नंतर बोलेन. आपणांस वैयक्तीकरित्या त्याचे उत्तर देईन. त्या गाडीची दुरुस्ती सुरु आहे व ती लवकरच सुरु होईल. टॅकरमध्ये हस्तक्षेप होत असल्याबाबत व वितरण व्यवस्थित नसल्याबाबत बोलले गेले. यासाठी आम्ही वेळापत्रक बनवुन दिले होते. त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आम्ही आमच्या प्रभाग अधिकारी व शाखा अभियंता यांच्यावर सोपविली होती. आज जी तक्रार आली आहे त्यावर लक्ष देवुन जे संबंधीत अधिकारी आहेत त्यांना समज देण्यात येईल व त्यांना सुधारणा करण्याची संधी देण्यात येईल. आपली झोनिंग पध्दत व्यवस्थित नसल्याने एक दिवस पाणी पुरवठा बंद ठेवण्यात आला होता. आपणांस पाणी जर कमी मिळाले तर ते कमी पाणी ७ दिवसात ७ झोन करुन एका झोनला स्टार करुन उर्वरीत ६ झोनला व्यवस्थित रित्या पाणी पुरवठा करु शकतो. परंतु येथेही एमएसईबी कडुन विजपुरवठा नसला अथवा व्यवस्थित नसला तर बुस्टर बंद होतात व त्यामुळे व्यवस्थित वितरण होत नाही. याठिकाणी सांगितले गेले की, काही प्रभागात १५ मिनिटे पाणी आहे व काही प्रभागात ८ तास पाणी आहे. जोपर्यंत जलकुंभ तयार होत नाही व जोपर्यंत वितरण वाहिन्या व्यवस्थित होत नाही, जो पर्यंत झोनिंग

करणार नाही तोपर्यंत पाणी पुरवठा समान होणार नाही. मला असे वाटते की, कुणीतरी येथे पाणी पुरवठा विभागात कर्मचारी नसल्याचा उल्लेख केला. आज आपणांस सांगायला हवे की, पाणी पुरवठाा विभागात एक कार्यकारी अभियंता, दोन उप–अभियंता, ७ शाखा अभियंता व जवळपास १२० व्हॉल्वमन आहेत. मला असे वाटते की, ही संख्या जास्त असल्यामुळे, व्हॉल्व व व्हॉल्वमनची संख्या जास्त असल्याने असमान वितरण होत आहे. जेवढा मानवी हस्तक्षेप जास्त होईल तेवढा गोंधळ जास्त होईल. झोनिंग जर यशस्वी झाले, वॉल्व व वॉल्वमनची संख्या कमी झाली तरी देखील पाण्याचे समान वितरण संभव आहे. एक दोन ठिकाणी दुषित पाणी पुरवठा होत असल्याबद्दल बोलले गेले, त्याबद्दल देखिल आमच्या विभागाल सक्त सूचना दिल्या जातील. जेथे दुषित पाणी येत आहे, तेथे दुरुस्तीची कारवाई केली जाईल. येथे बुस्टर बद्दल बोलले गेले, प्रत्येक लाईनवर येथे बुस्टर बसविले आहे. ते काढणे तेव्हाच संभव होईल जेव्हा आपले जलकुंभ तयार होतील व जेव्हा समान वितरण वाहिन्या तयार होतील. या शहरात पाण्याची जी समस्या काही ठिकाणी आहे, जी उंच व शेवटच्या टोकाला ठिकाणे आहेत तेथे पाण्याची जी समस्या आहे ती समस्या दुर होण्यासाठी आपली स्वत:ची योजना असणे, वितरण वाहिन्या असणे व जलकुंभ बनविणे तसेच लोकांनी वेळेवर कर भरणे आवश्यक आहे. जेणेकरुन आम्ही नविन योजना हाती घेवु शकु. मला वाटते की, हाच उपाय आहे. अन्यथा येथे ब्रम्हदेव आले, भगिरथ आले तरी या शहराची पाणी पुरवठा व्यवस्था सुधरु शकत नाही. आपणा सर्वांना हे लक्षात ठेवायला हवे. यासाठी लोकांमध्ये जागृती करावी लागेल. पाण्याची जी नासाडी होत आहे, त्यासाठी जागृती करावी लागेल. यामध्ये आपले सहकार्य आम्हांला हवे आहे. ते मिळेल या विश्वासाने मी माझे निवेदन संपवित आहे. जय हिंद, जय महाराष्ट्र।

**मा. सदस्य श्री. रामरख्यानी मोहनदास यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> मा. महापौर महोदया, यामध्ये आयुक्त साहेबांनी एका बाबीचा समावेश केला नाही तो म्हणजे श्री. महाराज भुल्लर यांच्या प्रभागातुन दिवसाला जवळपास १०० टॅकर पाणी गळतीद्वारे वाहून जात आहे. याकडे लक्ष दयावे ही विनंती.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेबांनी जे निवेदन केले त्यामध्ये मी एक गोष्ट ऐकु इच्छित होतो जी आयुक्त साहेब बोलले नाहीत, जलवाहिन्यांची जी प्राकलने मंजुर झाली आहेत व जी कार्यादेश दिले आहेत, ठेकेदाराने काम केले नाही याचे कारण पेमेंट मिळाले नाही असे कळले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे जिल्हा दरसुचीतील दर व सध्याचे बाजारातील दर यामध्ये फार मोठे अंतर आहे. यामुळे कुणीही ठेकेदार काम करण्यास तयार नाही. याबदृदल आपण खुलासा करावा.

<u>मा. आयुक्त :–</u> महापौर महोदया, हे बरोबर बोलले आहेत. ज्यावेळी प्राकलने तयार केली जातात त्यावेळी जिल्हा दरसुचीवर आधारीत बनविली जातात. आमच्याकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची २००३–२००४ ची जी दरसुची उपलब्ध आहे त्यामध्ये स्टीलची किंमत प्रती मेट्रीक टन रुपये १८,००० एवढी दाखविली आहे. आज स्टीलचा बाजारभाव बघितला तर तो २७,००० पेक्षा जास्त आहे. यामुळे जी प्राकलने येत आहेत ती २०,२५,४० टक्के जास्त दराने प्राप्त होत आहेत. प्राकलनीय किंमतीपेक्षा जास्त दराने काम केल्यास लेखा परिक्षणात हरकत उपस्थित होते. हा एक मुख्य मुद्दा असल्याने आम्हांस ज्या निविदा प्राप्त झाल्या आहेत त्यामध्ये आम्ही अदयाप निर्णय घेवु शकलेलो नाही. परंतु काही प्राकलने १५ टक्के जास्त दराने आम्ही स्विकृत केलेली आहेत. जेथे वाजवी वाटले तेथे आम्ही स्विकृत केले आहे. ४० ते ४५ टक्के जास्त दराने प्राप्त झालेली निविदा स्विकृत करतांना आमच्या अधिका–यांच्या मनात नेहमी एक भिती असते की, याबद्दल जर तक्रार झाली अथवा या निर्णयामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले असा अर्थ काढला गेला तर समर्थन करणे कठिण होईल. नविन दरसुची आल्यानंतर स्टीलचे जे दर वाढले आहेत, जर निविदेत २७,००० मेट्रीक टन प्रमाणे दर प्राप्त झाले असते तर अडचण आली नसती. आम्ही फेरनिविदा काढु, त्यामध्ये निविदेच्या किंमती एवढे थोडे जास्त दर प्राप्त झाले तरी आम्ही काम करुन घेवु.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u> आयुक्त साहेब मला अशी माहिती मिळाली आहे की, बाजारात ३–४ ठिकाणच्या दराची आपण तुलना केली व त्याप्रमाणे ठेकेदाराशी वाटाघाटी केल्या तर मार्ग निघु शकतो. असें होवु शकते का?

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्याशी :–</u> आयुक्त साहेब जसे श्री. उमाप साहेबांनी सांगितले की, निविदा जास्त दराने येतात. तर जोपर्यंत नविन जिल्हा दरसुची येत नाहीत तोपर्यंत यावर आपण काही करु शकतो का? नविन दर

सुची येईपर्यंत ६ महिने जातील. तोपर्यंत प्राकलने तसेच पडुन राहतील. आपण नविन आर.ए. बनवु शकतो का? याबाबत खुलासा करावा.

<u>मा. महापौर :—</u> शहरातील पाणी टंचाईवर चर्चा करण्यासाठी विशेष महासभा बोलावली होती. तीन तासाच्या चर्चेत सत्ता व विपक्षातील सदस्यांनी त्यांना होणारा त्रास व त्यांचे मत मांडले. त्यांचे समाधान कसे करता येईल याबाबत आयुक्तांनी उत्तर देखील दिले. शहरात पाण्याची टंचाई नाही परंतु वितरण व्यवस्थित नसल्याने लोकांना त्रास होत आहे. आयुक्त साहेबांना विनंती आहे की वितरण व्यवस्था व्यवस्थित का नाही, नेहमी हाच त्रास का होतो? ब—याच ठिकाणी ही समस्या आहे. माझ्या प्रभागात देखील असे प्रश्न निर्माण होतात. माझ्या प्रभागात काही खाजगी व्यक्ती व्हॉल्व चालु—बंद करतात. मी आयुक्त साहेबांना जागेवर जावुन दाखविले देखिल होते. एक महिला आहे ती व्हॉल्व चालु—बंद करते. आमच्या बरोबर असे होते याचा अर्थ सर्वांना हा त्रास होत असेल. आयुक्त साहेबांना विनंती आहे की, त्यांनी व्हॉल्वमनवर लक्ष ठेवावे. आपण काही ठिकाणी ठेकाही दिला आहे. परंतु अशी तक्रार आली आहे की, काही ठिकाणी लोक त्यांच्यावर दबाव आणुन स्वत:ला हवा तेव्हा व्हॉल्व चालु बंद करतात. काही ठिकाणी काही प्रभागात दबावाने जास्त पाणी दिले जाते. मी स्वत: सांगते की, असे होते. तर यापुढे आपल्या वितरण व्यवस्थेत सुधारणा आणणे गरजेचे आहे. आमचे श्री. राज असरोंडकर यांनी सांगितले की, त्यांना त्यांच्या विभागात एक पाण्याची टाकी लावायची आहे. परंतु ती त्यांना लावु दिली जात नाही. यासाठी श्री. सावकारे साहेबांना निवेदन आहे की, आमच्या नगरसेवकांच्या ज्या लहान—मोठया तक्रारी आहेत, ज्यांचे समाधान लवकर व सहजतेने निघु शकते. ते लवकरात लवकर करण्यात यावे. श्री. राज असरोंडकर यांना त्यांच्या प्रभागात टाकी लावु दिली जावी. आमचे कॉंग्रेसचे सदस्य श्री. बेहरानी, श्री. ठाकुर, श्रीमती साधवानी व विरोधी पक्षांच्या सदस्यांनी पाणी समस्या असल्याबद्दल सांगितले. यादी बघितली तर दिसुन येते की, ज्या प्रभागात टॅंकर जातात तेथे पाण्याची खरोखर आवश्यकता आहे. यासाठी काय करायचे हा प्रश्न आहे. आयुक्त साहेबांना विनंती आहे की, पाण्याच्या वाहिन्या टाकण्यासाठी आमदार साहेबांनी शासनाकडुन जो दोन कोटीचा निधी आणला होता, ते काम पुर्ण झाले आहे का हे आपणांस बघावे लागेल. जर पुर्ण झाले नसेल तर आपण सर्वसाधारण निधीतुन देखील काम करु शकतो. जेथे टॅंकर जास्त जातात तेथे आम्ही विशेष लक्ष देवु. तेथिल प्रश्न लवकरात लवकर सोडविण्यासाठी देखील प्रयत्न केला जाईल. वितरण व्यवस्थित झाले तर ९५ टक्के प्रश्न सुटतील. आयुक्तांना विनंती आहे की, त्यांनी पाणी पुरवठा विभागातुन सर्व अधिका—यांची बैठक बोलावुन त्यांना योग्य ते निर्देश दयावे. आपणही आपल्या प्रभागात दक्ष राहायला हवे असे मला वाटते. ब—याचदा पाणी वाया जाते. आंघोळ करतांना बादलीत पाणी घेवुन आंघोळ केली जाते त्याऐवजी शॉवरने आंघोळ केल्यास पाणी कमी लागेल. महिला जेव्हा कपडे धुतात, त्यावेळी काही साबणांचा जास्त फेस येतो. यामुळे पाणी जास्त लागते. याकडेही लक्ष दयायला हवे. माझ्या घरी देखील बाई जेव्हा भांडे धुते तेव्हा जोरात नळ सोडते मी तिला असे न करण्याबाबत सांगत असते. माझ्या घरी देखील पाण्याचा प्रश्न आहे. काल—परवा मी देखील हंडा घेवुन फिरत होते. लोक म्हणत होते की, आपणांस देखील पाण्याचा त्रास आहे हे दिसायला हवे. कधी कधी विजेचे भार नियमन होते त्यामुळे देखील त्रास होतो. आपण भांडी धुतांना जे पाणी वापरतो ते एकत्र करुन नंतर त्याचा पुन्हा वापर करु शकतो. काही ठिकाणी पाईपने झाडांना पाणी दिले जाते तर काही ठिकाणी अजिबात पाणी नसते. अशा छोटया छोटया गोष्टींकडे आपण लक्ष दिले तर आपण हे पाणी वाचवु शकतो. या बैठकीत सर्वांच्या समस्येचे समाधान एकच आहे की, पाण्याचे वितरण व्यवस्थित व्हायला हवे. ज्या ठिकाणी खरोखर खुप समस्या आहे तेथे लवकरात लवकर तोडगा काढावा ही विनंती. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :—</u> मा. महापौरजी १ तारखेपासुन मोफत टॅंकर बंद करण्यात येणार आहे त्याचे काय करणार? जोपर्यंत वितरण व्यवस्था ठिक होत नाही, तोपर्यंत काय निर्णय घेणार?

<u>मा. महापौर :—</u> यावर्षी पाऊस देखील उशिरा येत आहे. यामुळे कालावधी थोडा वाढवायला हवा असे माझे मत आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> जोपर्यंत पाणी नळामध्ये येत नाही तोपर्यंत कालावधी वाढविला जावा. आम्ही आपणांस प्राधिकृत करीत आहोत. जेव्हा नळामध्ये पाणी येईल तेव्हा कुणीही सदस्य टॅंकरची मागणी करणार नाही.

<u>मा.आयुक्त :—</u> मा. महापौर महोदया, सर्वांना मोफत टॅंकर देणे योग्य होणार नाही असे मला वाटते. इमारतीमध्ये आपण नळाद्वारे पाणी देवु शकतो. एखादया इमारतीत १० कुंटूंबे राहत असतील व तेथे १०,००० लिटर पाण्याची आवश्यकता असेल व नळाद्वारे ७,००० लिटर पाणी येत असेल व तरी देखील टॅंकर घेवुन जात असतील अशा

ठिकाणी टॅंकर देणे योग्य होणार नाही. जेथे झोपडपट्टया आहेत, वितरण व्यवस्था नाही व जे टॅंकरचे २०० रुपये देवू शकत नाही तेथे मोफत देणे योग्य होईल. इतर ठिकाणी काही तरी आकार घेवुन, ना नफा ना तोटा या तत्वावर टॅंकर देणे योग्य होईल असे मला वाटते. निर्णय आपणांस घ्यायचा आहे. परंतु टॅंकर चालु ठेवल्याने देखील आपल्या पाणी पुरवठा व्यवस्थेत समस्या आल्या आहेत. हे देखिल आपणांस लक्षात घ्यायचे आहे. ३० जुन पुर्वी यावर मी स्थायी समितीमध्ये प्रशासनाच्या वतीने एक प्रस्ताव आणेन त्यावर आपण विचार करावा व त्यानंतर निर्णय घ्यावा.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— मा. आयुक्त साहेब आपले म्हणणे असे आहे की, इमारतींमध्ये राहणा—या लोकांकडुन पैसे घ्यायला हवे. मी आपणांस सांगु इच्छितो की, एका इमारतीत ४०—५० सदनिका असतात. ते प्रत्येक महिन्याला आपणांस पाण्याचे रुपये १०० देत असतात. तरी देखील त्यांना पाणी मिळत नाही. असे असतांनाही त्यांच्याकडुन पुन्हा पैसे घेणे हा अन्याय आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आयुक्त साहेब, श्री. बेहरानी हे जे बोलले त्यावर अजुन मी बोलु इच्छितो, ब—याचशा इमारतीत ६—७ जोडण्या असुनही पाणी येत नाही. तर त्यांनी काय करावे? जर इमारती वाल्यांनी रोज एक—दोन टॅंकर मागविले तर त्यांचा देखभालीचा खर्च एवढा वाढेल की, प्रत्येकाला दर महिन्याला रुपये ६०० ते ७०० टॅंकरसाठी दयावे लागतील. हे देखिल लक्षात घ्यायला हवे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी, आपण जर मोफत टॅंकर दिले तर त्यामध्ये भेदभाव करणार नाही सगळयांना देण्यात येईल.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— १ तारखेपासुन टॅंकर बंद करण्यात येणार आहे. त्यानंतर लोकांनी कुठे जावे? यावर काय निर्णय झाला ते सांगा.

मा. महापौर :— आम्ही आयुक्तांना १५ जुलै पर्यंत वाढविण्याबद्दल सांगितले आहे.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— आम्ही तुमच्यावर सोडतो. आपण योग्य निर्णय घेण्यास सक्षम आहात. आम्हांला असे वाटते की, जनतेला पैसे भरण्यास लागु नयेत. नळाद्वारे पाणी दिले तर कुणालाही टॅंकरने पाणी पिण्याची हौस नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— तुम्ही आजच करु शकतात. २० तारीख उलटून गेली आहे. सर्वांचे एकच मत आहे.

मा. महापौर :— आम्ही ठरावाद्वारे मंजुर करतो की, ज्या विभागात पाणी मिळत नाही त्या विभागात टॅंकरद्वारे मोफत पाणी पुरवठा केला जावा.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— मा. महापौरजी याबद्दल मी आपणांस मनापासुन धन्यवाद देते.

मा. महापौर:—सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे

प्रस्तावना:—

प्रस्तावक : श्री किशोर वनवारी

अनुमोदक : श्री राजेंद्रसिंह भुल्लर

विषय क्र. १:— उल्हासनगर शहरातील पाणी टंचाईवर उपाय योजना करणे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ब—याच ठिकाणी पाणी पुरवठा वितरण व्यवस्था ठिक नसल्याने ब—याच विभागात पाणी कमी दाबाने मिळते अथवा अजिबात मिळत नाही. यामुळे शहरात ब—याच

विभागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे. लोकांना पाणी उपलब्ध होत नसल्याने त्यांना पाणी उपलब्ध करुन घेण्यासाठी धावपळ करावी लागत आहे. यामुळे महापालिका प्रशासनाबद्दल सर्वसामान्य जनतेतुन रोष प्रकट होत आहे.

यापूर्वीचा विशेष महासभा ठराव क्र. ९४, दिनांक ८/४/२००५ अन्वये दिनांक दिनांक ३०/०६/२००५ पर्यंत टंचाईग्रस्त भागात टॅकरने करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठयावर वाहतुक खर्चाची आकारणी न करता मोफत पाणी पुरवठा करण्यास मान्यता देण्यात आली होती. दिनांक १/७/२००५ पासुन टॅकरवर वाहतुक खर्चाची आकारणी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

शहरात पाण्याची परिस्थिती बिकट असल्याने व अद्याप सर्व विभागांमध्ये समानरित्या पाणी पुरवठा होत नसल्याने मोफत टॅकर बंद केल्यास शहरातील लोकांना अडचणीला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

जोपर्यंत शहरातील प्रत्येक विभागात नळाद्वारे समानरित्या व पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होत नाही तोपर्यंत टॅकरद्वारे शुल्क वसुल करणे संयुक्तिक होणार नाही. महापालिका प्रशासनाने शहराच्या प्रत्येक भागात व प्रत्येक घराघरात नळाद्वारे समान पाणी पुरवठा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्यानंतरच टॅकरद्वारे शुल्क आकारणी करणे योग्य होईल. म्हणुन महासभेसमोर प्रस्तावित.

<u>विशेष महासभा ठराव क्र :– २२</u> <u>दिनांक:–२०/०६/२००५.</u>

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता शहरात पाणी पुरवठा वितरण व्यवस्था व्यवस्थित करण्यासाठी प्रशासनास निर्देशित करीत आहे आणि खालील प्रयोजनासाठी पूर्वीचा विशेष महासभा ठराव क्र. ९४, दिनांक ८/४/२००५ मध्ये खालीलप्रमाणे अंशत: बदल करीत आहे.

- जोपर्यंत प्रशासन संपुर्ण शहरात नळाद्वारे समान व पुरेशा दाबाने पाणी पुरवठा करीत नाही तोपर्यत टंचाईग्रस्त भागात टॅकरने करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठयावर वाहतुक खर्चाची आकारणी न करता मोफत पाणी पुरवठा करण्यास मान्यता देत आहे.
- या ठरावाद्वारे ज्या सुधारणा करण्यात आल्या आहेत त्या पूर्वीचा महासभा ठराव क्र. ६७, दिनांक १८/२/२००५ चा भाग मानण्यात येतील.

प्रस्तावकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

सांयकाळी ६.३० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:–५ डिसेंबर , २००५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ५/१२/२००५ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा गुरूवार दिनांक ५/१२/२००५ रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३४. | श्रीमती खिलनानी भावना |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ३५. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३६. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ३७. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३८ | श्री. रमेश चव्हाण |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३९ | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ९. | श्री. वाघे शामु | ४० | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ४१ | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४२. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४३. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम, |
| १३ | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४४. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १४. | श्री. एडके गणपत गोविंद | ४५. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४६. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १६. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४७ | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १७. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४८. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १८. | श्री. यादव लालबिहारी | ४९. | श्री. मनोज साधवानी |
| १९. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५०. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २०. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५१. | श्री. रामरख्यानी मोहन |
| २१. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंन्द्र | ५२. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २२. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५३. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २३. | श्री. जग्यासी राजु | ५४. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २४. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५५. | श्रीमती भारती छाब्रिया |
| २५. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५६. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २६. | श्रीमती मसंद माया | ५७. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २७. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५८. | श्री. बेहरानी मोहन |
| २८. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ५९. | श्रीमती मालती करोतिया |
| २९. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६०. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३०. | श्री. मोहन साधवानी | ६१. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३१. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ६२. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३२. | श्रीमती साधवानी जया | ६३. | श्री. हरदास माखिजा |
| ३३. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६४. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. नाना आनंदा पवार, २. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, ३. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा, ४. श्री. शांताराम निकम, ५. श्री. विनोद ठाकुर, ६. श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ, ७. श्री. सुरेश जाधव, ८. श्रीमती. जयश्री सुर्वे, ९. श्री. बोडारे धनंजय बाबुराव, १०. श्री.भालेराव गौतम यशवंत, ११. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, १२. श्री. ठाकुर अशोक भगवानदास, १३.श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद, १४. श्रीमती. भटीजा कोमल अमृत, १५. श्रीमती माखिजा किरण, १६. श्री. दिलीप लालवानी, १७. श्री. बेहरानी ठाकुरदास हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सकाळी ११. ५५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. आयुक्त श्री. आर.डी. शिंदे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी उप–आयुक्त (मुख्यालय) श्री. उत्तम लोणारे हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:–मा. महापौरजी, उल्हास विकास या पेपरमध्ये श्री. मुरली रोहडा यांच्या फोटो सकट एक लेख छापून आला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की,..................

मा. सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १ :–सुधारित विकास नियंत्रण नियमावली अंतिम करणे.

आधी नगररचनाकार त्यांचा प्रस्ताव सादर करतील. त्यानंतर ज्या सन्माननिय सदस्यांना बोलायचे असेल ते बोलु शकतील.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– मा. महापौरजी, उल्हास विकास या पेपरमध्ये श्री. मुरली रोहडा यांच्या फोटो सकट एक लेख छापून आला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, आजची ही जी बैठक आहे, यामुळे उच्च न्यायालयाचा अवमान होणार आहे. महापालिकेत जे विधी सल्लागार म्हणुन काम बघतात त्यांनी यावर त्यांचे मत दयावे. आपण असा आदेश दिला तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :– मा. महापौरजी, वृत्तपत्रातील बातमीवर येथे चर्चा होवू शकते काय? वर्तमानपत्रातील बातमी बाबत महासभेत चर्चा व्हायला नको.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :–मा. महापौरजी, या मुद्दयाबाबत आम्हांला माहिती हवी आहे. वर्तमानपत्राबाबत आम्हांला काही म्हणायचे नाही. यामुळे न्यायालयाचा अवमान होणार आहे काय याची माहिती आम्हांला आमच्या समाधानासाठी हवी आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :– मा. महापौरजी, आजकाल वर्तमानपत्रांमध्ये विविध प्रकारच्या हजारो बातम्या छापुन येत आहेत. जर त्यावरच बोलायचे असेल तर त्यासाठी दोन दिवसांची एक विशेष महासभा ठेवावी लागेल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :– मा. महापौरजी, महापालिकेचे विधी अधिकारी कोण आहे, याची अजुन सभागृहाला माहितीच नाही. तर तेही सभागृहाला कळवावे.

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी ):– मा. महापौर महोदया, आपण विधी अधिका–याचा अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. आपल्या महापालिकेत विधी अधिका–याचे पद रिक्त आहे.

मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी :– आता या प्रश्नाचे उत्तर कोण देणार आहे?

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी ):–श्रीमती प्रतिभा कुलकर्णी यांना मी त्यासाठी बोलावून घेतो. तसेच या प्रश्नाबाबत कायदेशीर मत घेवुन त्यानंतरच मला सांगता येईल.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :– आपण आयुक्तांच्या पदावर बसले आहात आणि आपणांस एवढीही माहिती नाही?

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी ):–मी विधी अधिकारी नाही.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–**मा. महापौरजी, हा जो प्रस्ताव आला आहे हा प्रशासनातर्फे आला आहे. गोषवा–यावर आयुक्तांनी सही केली आहे. आपण आता महासभेत आयुक्तांच्या जागेवर बसला आहात. मा. सदस्य व मा. सदस्या श्रीमती जया साधवानी यांनी प्रश्न विचारला आहे की, आज आपण सभा सुचनेवर जो गोषवारा आणला आहे, तो कायदेशीर आहे का? यामुळे ८५५ इमारतींबाबत न्यायालयाचा अवमान तर होणार नाही? त्यांनी सरळ प्रश्न विचारला आहे.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–** आयुक्तांनी सभागृहाचे मार्गदर्शन करायला हवे हे आपले कर्तव्य आहे.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–**यामुळे न्यायालयाचा अवमान होणार नाही याची आम्हांला खात्री करुन दया.

**श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी ):–**प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीबद्दल जे आक्षेप व सुचना आल्या होत्या त्याबाबत हा विषय आहे. यामुळे न्यायालयाचा अवमान होणार नाही.

**श्री. अे.पी. गुरगुळे (नगररचनाकार):–**मा. महापौर महोदया, उप–महापौर व सभागृहातील मा. सदस्य, मी आपल्यासमोर सुधारीत बांधकाम नियमावलीबद्दल माहिती ठेवू इच्छितो. उल्हासनगर शहराकरीता पहिला नियोजन आराखडा २०.५.७४ ला तयार झाला. याची अंमलबजावणी १.७.७६ पासुन सुरु झाली. परंतु त्यानंतर ब–याच दिवसांनी एम.आर.टी.पी ॲक्टच्या तरतुदीप्रमाणे १० वर्षाच्या आत नियोजन आराखडा तयार करणे आवश्यक होते. ते होण्यासाठी बराच कालावधी गेला. त्यानंतर उल्हासनगर नगरपालिकेचे महापालिकेत रुपांतर झाले. १९९६ नंतर महाराष्ट्र शासनाने एम.एम.आर.डी.ए. ला सुधारीत विकास योजना बनविण्यासाठी निर्देश दिले होते. त्याच वेळी एम.एम.आर.डी.ए. ने या प्लान बाबत अधिसुचना काढुन सुचना व हरकती मागविल्या होत्या. त्यावर ब–याचशा सुचना व हरकती आल्या होत्या. त्यावेळी सुचना, हरकती व तक्रारी विचारात घेवुन महासभा ठराव क्र. २१, दिनांक २१.८.२००२ अन्वये प्रारुप विकास योजना रद्द करण्यात आली होती. महासभा ठराव क्र. २३ अन्वये विशेष प्राधिकरणातुन अधिसुचीत क्षेत्र वगळण्यात आले. तो ठराव मंजुर करुन शासनाला पाठविण्यात आला होता. शासन नगरविकास विभाग अधिसुचना क्र. १२०२, दिनांक २६.१०.२००४ अन्वये शासनाने एम.आर.टी.पी. ॲक्टच्या कलम ६५ प्रमाणे उल्हासनगर महापालिकेतुन अंबरनाथ व कुळगांव–बदलापुर हे अधिसुचीत क्षेत्र वगळण्यासाठी सुचना पारीत केली. १९७४ ला मंजुर असलेली जुनी विकास योजना व एम.एम.आर.डी.ने तयार केलेला नविन आराखडा यावर चर्चा झाल्यानंतर जुनी व नविन विकास योजना यांचा समन्वय साधुन पुढील कार्यवाही महापालिकेने करण्यासाठी शासनाने काही निर्देश दिले होते. त्यानंतर एम.आर.टी.पी. ॲक्टच्या तरतुदीप्रमाणे नविन सुधारीत योजना, अधिसूचना प्रसिध्द केली गेली व शासन नगरविकास विभागाने विकास योजनेसाठी नगररचनाकाराची नियुक्ती करण्यासाठी अधिसुचना देखिल जारी केली होती. नगररचनाकाराची नियुक्ती करण्यासाठी व विकास योजना तयार करण्यासाठी बराच कालावधी लागणार असल्याने दरम्यानच्या कालावधीत शहरवाशियांसाठी बांधकाम नियंत्रण नियमावली तयार केल्यास योग्य होईल म्हणुन आम्ही एक अधिसुचना २६.१०.२००४ ला प्रसिध्द केली होती. त्यानंतर शहर वाशियांकडुन सुचना व हरकती मागविल्या होत्या. त्यामध्ये आम्हांला ३२ सुचना व हरकती प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार आम्ही त्याचा गोषवारा सभागृहासमोर सादर केला आहे. त्यामध्ये उल्हासनगर शहरासाठी एफएसआय १ वरुन ३ एवढा वाढविण्याची मागणी केली आहे. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–** बांधकामे नियमित करण्यासाठी काय प्रस्ताव आहे ते आपण सांगितले नाही. आम्हांला त्यामध्ये जास्त रस आहे.

**श्री. अे.पी. गुरगुळे (नगररचनाकार):–** मा. महापौरजी, उप–महापौर, सदस्य, उल्हासनगरमधील ८५५ इमारतींबाबत न्यायालयाने जे आदेश दिले आहेत ते लक्षात घेवुन आम्ही नियंत्रण नियमावलीमध्ये एक प्रस्ताव ठेवला आहे. कलम १०.२ मध्ये अनधिकृत बांधकाम कश्याप्रकारे नियमित करता येवु शकते याची तरतुद केली आहे. त्यानुसार वास्तुविशारद, विकासक व मालक यांच्याकडुन टक्केवारीने वसुली करण्याबाबत तरतुद केली आहे. आमच्याकडुन एवढाच प्रस्ताव आहे.

**मा.सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–** १०.२ मध्ये आपण जे लिहिले आहे ते नेमके काय आहे? तसेच १०.१० मध्ये काय आहे? तसेच जे बांधकाम नियमित होईल त्यासाठी दर काय असेल? आपण कसे काय प्रस्तावित केले आहे?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—मा. महापौरजी, मी नगररचनाकारांना एक प्रश्न विचारु इच्छितो की, त्यांनी आता जे ८५५ इमारतींबाबत सांगितले तर ही जी प्रक्रीया आहे ही आधी सुरु झाली आहे की ८५५ इमारतींच्या प्रकरणांनंतर सुरु झाली आहे? ही प्रक्रिया २७ एप्रिल पुर्वी सुरु झाली आहे त्यामुळे ८५५ इमारतींशी याचा काही संबंध नाही.

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी ):—मा. महापौर महोदया, माझी सभागृहाला विनंती आहे की, न्यायालयीन प्रकरणांवर येथे चर्चा करणे योग्य होणार नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— आपले नगररचनाकार ८५५ इमारतींबाबत बोलले म्हणुन आम्ही विचारले.

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी ):—मी हेच स्पष्ट करु इच्छितो. बांधकाम नियंत्रण नियमावलीबाबत आपण सूचना व हरकती मागविल्या होत्या त्यानंतर प्रस्ताव मान्यतेसाठी आता आपल्यासमोर ठेवला आहे. आता आपण येथे मान्यता दिल्यानंतर प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे जाईल. ८५५ इमारतींबाबतचा प्रश्न येथे उपस्थित होत नाही. कोणते बांधकाम नियमित होईल हा विषय येथे नाही. ही बाब इतिवृत्तातुनही वगळण्यात यावी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—नगररचनाकारांनी ८५५ इमारतींबाबत जे भाष्य केले ते इतिवृत्तांतातुन वगळण्यात यावे.

श्री. ए.पी. गुरगुळे (नगररचनाकार) :—माझी सभागृहाला विनंती आहे की, ८५५ इमारतींबाबत मी जे बोललो त्याचा आजच्या सभेतील विषयाशी काही संबंध नाही. त्याबाबत मी माफी मागतो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— तुम्ही जो दर लावला आहे तो कसा लावला आहे? १०.२ बद्दल स्पष्टपणे माहिती दया.

श्री. ए.पी. गुरगुळे (नगररचनाकार) :— १०.२ ची तरतुद अशी आहे की, बांधकामाच्या मुळ तक्त्यानुसार विकासकाला २५ टक्के, मालकाला १५ टक्के, वास्तुविशारद १० टक्के व भोगवटाधारक ५० टक्के याप्रमाणे तरतुद आहे. बाजारमुल्याप्रमाणे सदरचे दर लावण्यात येतील.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— बाजारमुल्य कोणते घेणार? जेव्हा इमारत बनविली तेव्हाचा की आजचा? ते सांगा.

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी ):—मा. महापौर महोदया, जेव्हा नियम तयार होतात तेव्हा पुर्वलक्षी प्रभावाने फायदा दयायचा अथवा नाही हे ठरविले जाते. आता येथे मंजुर झाल्यानंतर ते शासनाकडे जातील. आता यामध्ये पुर्वलक्षी प्रभावाने फायदा देणेबाबत लिहिलेले नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— बाजारमुल्य आजचे घेणार आहात का ते सांगा. ते कसे काय ठरविणार? मी ४ नंबर येथे राहतो तर माझ्या फ्लॅटचा दर काय आहे ते सांगा. २ नंबर येथे किती घेणार? शासनाचा नियम काय आहे? आधी ते सांगा.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :—मा. महापौरजी, कृपया मला बोलण्याची संधी दयावी कारण सभागृहाची दिशाभुल होत आहे असे मला वाटते. मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त व सभागृहातील सर्व सदस्य, मला असे वाटते की, ज्या विषयासंबंधी महासभा बोलावली आहे, व आमचे नगररचनाकार सदस्यांच्या प्रश्नांना ज्या प्रकारे उत्तर देत आहेत त्यामुळे सभागृहाची दिशाभुल होत आहे. त्यामुळे कृपया नगररचनाकार यांनी बसुन घ्यावे व मला बोलण्याची संधी दयावी त्यानंतर आपण बोलावे. इंग्रजी मध्ये एक म्हण आहे की, ''बेटर लेट दॅन नेव्हर''. जो विषय आज महासभेत आला आहे त्या विषयाची प्रक्रीया काल किंवा आज सुरु झालेली नसुन याची प्रक्रिया २००४ पासुन सुरु झाली आहे व आज हा विषय अंतिम टप्प्यात पोहचला आहे. याच्यापुढील पायरी म्हणजे शासनाने या नियमांना मंजुरी देणे ही होय. हे जे नियम आहेत ते एम.एम.आर.डी.ए. च्या नियमांप्रमाणे आहेत अशी माझी माहिती आहे. हेच नियम कल्याण—डोंबिवली महापालिकेने देखील स्विकारले आहेत.

उल्हासनगर महापालिकेने देखिल आज हे नियम स्विकारले आहेत. मला वाटते की ते शहराच्या हिताचे आहेत. उल्हासनगर शहर हे प्रगतीशील शहर आहे. मागील काही वर्षांपासुन या शहराची वाढ प्रगतीच्या दिशेने होत आहे. यासाठी अशा नियमांची आवश्यकता होती. नियोजनबध्द रितीने या शहराची प्रगती होण्यासाठी व शहरातील प्रत्येक बांधकाम मग ते छोटे दुकान असो, मोठे घर असो, इमारत असो ते नियमाप्रमाणे तयार व्हायला हवे. नियमांमध्ये हेच दाखविले आहे. एवढेच नाही तर माझे सन्माननिय सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी नगररचनाकारांना जो प्रश्न केला की, बांधकाम नियमित करण्यासाठी आपला काय प्रस्ताव आहे? मी त्यांना माहिती देवु इच्छितो की, सुधारीत नियम आपल्यासमोर ठेवले आहेत व १०.२ च्या नियमाप्रमाणे अनधिकृत बांधकाम नियमित करता येवु शकते. उल्हासनगर महापालिका यामध्ये काही सुधारणा करु इच्छिते. हे जे नियम आहेत ते आहेत तसे महापालिका स्विकारु इच्छित नाही. मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगु इच्छितो की, नियम १०.२ मध्ये आम्ही जी सुधारणा करु इच्छितो ती महापालिकेने स्विकारावी. ती अशी आहे की, ''पीनल रेट ऑफ डेप्रिशिएटेड व्हॅल्यु ऑफ दी कॉस्ट ऑफ कन्स्ट्रक्शन कन्सट्रक्टेड ॲट दी टाईम व्हेन इट कॅम इन एक्झीसटंस बी रिकव्हर्ड फ्रॉम दी ऑनर्स, ऑक्युपंटस ऑफ दी बिल्डींग ऑफ दी ऐरिया एन एक्सेस ऑर इन व्हायोलेशन ऑफ प्रिव्हेलींग डीसी रुल्स '' अशी सुधारणा आम्ही त्यामध्ये करु इच्छितो किंवा ''अपार्ट फ्रॉम अबोव्ह पिनल टॅक्स ॲट दी रेट ट्वाईस ऑफ प्रॉपर्टी टॅक्स शॅल बी रिकव्हर्ड फ्रॉम दी ऑक्युपंट्स ऑफ बिल्डींग ॲकोर्डींगली'' म्हणजेच ए अथवा बी पैकी एक पर्याय मग तो इमारतीचा मालक असो रहीवासी असो अथवा वास्तुविशारद असो. अशा प्रकारे आम्ही सुधारणा करु इच्छितो. उल्हासनगर आज ज्या परिस्थितीतुन जात आहे, उल्हासनगर शहरातील रहिवाश्यांवर २७ एप्रिल पासुन जी तलवार लटकत आहे, मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे व जसे आता आयुक्तांनी सांगितले की, बांधकाम नियंत्रण नियमावली मंजुर केल्यावर न्यायालयाचा आदेशाचा अवमान होणार नाही तर मला पुर्ण विश्वास आहे की, यामध्ये न्यायालयाचा अवमान होणार नाही. कारण या विषयाची प्रक्रिया सन २००४ पासुन सुरु होती. महापालिकेने नियम प्रसिध्द केले त्यानंतर सुचना व हरकती आल्या. त्यांना सुनावणी दिल्यानंतर आज महासभेत हे नियम सदस्यांसमोर सादर केले आहेत. मला पुर्ण विश्वास आहे की, न्यायालय याला अवमान मानणार नाही. हे महापालिकेचे नेहमी प्रमाणे होणारे काम आहे. आज जर आपण काही सुधारणांसह हे नियम पास केले तर तो एक ऐतिहासिक निर्णय ठरेल. आपण नियम पास केले तरी ते शासन मान्यतेस अधिन असतील. महाराष्ट्र राज्य सरकार हे मंजुर करत नाही तोपर्यंत आपण याची अंमलबजावणी करु शकत नाही.परंतु मला पुर्ण विश्वास आहे की, राज्य सरकार या नियमांना त्वरीत मान्यता देईल. कारण हे जे नियम आहेत ते एम.एम.आर.डी.ए.च्या आदर्श नियमावलीप्रमाणे आहेत. इतर महापालिका देखिल त्यांचा अंगिकार करीत आहे. राज्य सरकार देखील त्याला मान्यता देत आहे. त्यामुळे उल्हासनगरला ते अपवाद करणार नाही. राज्य सरकार उल्हासनगर शहराला काही विशेष सवलत देत आहे असे होणार नाही. सरकार यास नक्कीच मान्यता देईल. या सुधारणा आपण स्विकारल्यास उल्हासनगर शहरातील सुमारे ६० टक्के बांधकामांना फायदा होवुन ते नियमित होवु शकतात. औद्योगिक वापराच्या अरुंद भुखंडांना देखील विशेष सवलत दयायला हवी. त्याचप्रमाणे औद्योगिक भुखंडाचे निवासी भुखंडात परावर्तन करतांना कल्याण–डोंबिवली महापालिकेच्या धर्तीवर नियम करायला हवे. यामुळे सामान्य माणसाला दिलासा मिळु शकतो. कारण ब–याच औद्योगिक भुखंडांवर लोकांची घरे, दुकाने आहेत. त्याचप्रमाणे दाटीवाटीच्या क्षेत्रातील सामासिक अंतर बदलणेकामी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बांधकाम नियंत्रण नियमावलीच्या धर्तीवर बदल करावेत. यामुळे सामान्य माणसाला फायदा होवू शकतो. तसेच हरीत क्षेत्रामध्ये बांधकाम करणेकामी ०.२ टक्के ऐवजी ०.५ टक्के असा बदल अनुज्ञेय करावा. मला असे वाटते की, आमच्या सदस्यांनी या सुचनांवर चांगल्या प्रकारे विचार करावा. लोकांच्या फायदयासाठी या सुधारणा करण्यात येत आहेत. सर्व संमतीने हा प्रस्ताव पास झाला तर महाराष्ट्र सरकार यास त्वरीत मान्यता देईल. त्यानंतर हे नियम शहरासाठी लागु करण्यास काही अडचण येणार नाही. याचा थेट फायदा सामान्य माणसाला मिळणार आहे. सध्या सामान्य माणसाला त्याचे घर कधी तुटेल या भयाने ग्रासले आहे. या नियमांमुळे अशा माणसांना फायदा मिळणार आहे. हे नियम महापालिकेत सादर करण्यासाठी मी मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त व सर्व प्रशासनाला व आमदारांना धन्यवाद देईन. शेवटी माझे सर्व सदस्यांना निवेदन आहे की, हे नियम सर्वानुमते पास करुन एकतेचा पुरावा दयावा जेणे करुन सामान्य माणसाला असे वाटेल की, शहराच्या फायदयांसाठी, शहरातील नागरीकांच्या फायदयासाठी वेगवेगळया पक्षांचे नेते एकत्र आहेत. धन्यवाद, जयहिंद, जय महाराष्ट्र ।

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u> मा. महापौर महोदया, माझी आपणांस विनंती आहे की, आपल्या अध्यक्षतेखाली ही जी बैठक होत आहे ही एक महत्वपुर्ण बैठक आहे. या बैठकीत शहराचे हित अवलंबुन आहे. येथिल जनतेचे व व्यापाराचे हित अवलंबुन आहे. मी शासन व प्रशासन या दोघांना धन्यवाद देईल व सर्व सदस्यांना विनंती करेन की, ते निवडुन आले आहेत. हा विचार करणे अत्यंत जरुरी आहे. यामुळे आपण

लोकांना फायदा देवु शकतो. विरोधी पक्षातील सदस्यांना देखील आमची विनंती आहे की,यावर विरोध करु नये. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u> मा. महापौरजी, या सभागृहातील एक वरिष्ठ सदस्य श्री. हरदास माखिजा यांनी आताच सांगितले की, येथे आपण नियमांना मंजुरी दिल्यानंतर राज्य शासन त्यास त्वरीत मंजुरी देईल. तर मी श्री. हरदास माखिजांना सांगु इच्छितो की, २००२ मध्ये देखिल असाच प्रकारचा प्रस्ताव येथे ठेवला होता व तो प्रस्ताव शासनाला पाठविल्यानंतरही अजुन पर्यंत शासनाने त्यावर निर्णय घेतलेला नाही. आज शहरावर ही जी वेळ आली आहे ती राज्य शासनामुळे आली आहे असा आरोप मी येथे करीत आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त, मा. उप—महापौर, व सर्व सन्माननिय सदस्य, राज्य व स्थानिक शासन यांनी संपुर्ण शहराची व जनप्रतिनिधींची दिशाभुल करुन आज ही सभा लावली आहे. बांधकाम नियमावली मंजुर झाली पाहिजे परंतु इतक्या वर्षापासुन राज्य शासन व येथिल स्थानिक शासन हे आयुक्त यांच्या पातळीपासुन ते नगररचनाकार यांच्या पर्यंत हे शहराला मुर्ख कसे बनवितात, शहराची दिशाभुल कशी करतात, याचे उत्तम उदाहरण म्हणजे आजची ही महासभा होय. १९८६ च्या डीसी रुल नंतर जेव्हा एम.एम.आर.डी.ए. ने नियमावली बनविली त्याच्यामध्ये जवळपास माझ्या माहितीप्रमाणे ३३०० हरकती उल्हासनगर शहरातून गेल्या होत्या. एम.एम.आर.डी.ए. किंवा राज्य शासन आपल्या शहराचे कुठलेही हित बघत नव्हते. या दृष्टीकोनातुन जेव्हा महासभेमध्ये ठराव क्र. ७१ हा जनप्रतिनीधींनी पास करुन उल्हासनगर शहराचा विकास आराखडा उल्हासनगरच्या प्रशासनाने बनवावा असा जेव्हा केला तेव्हा राज्य शासनाने व स्थानिक शासनाने एम.एम.आर.डी.ए. चे नियम का लागु केले हा पहिला मुद्दा आहे. दोन्ही नियमातील जे जास्तीत जास्त वाईट नियम आहेत ते आपल्या शहराला लागु करायचे, म्हणजे जुना १९८६ चा नियम आपला हात कापणारा असेल तर दुसरे एम.एम. आर.डी.ए.चे नियम हे आपले पाय कापणारे आहेत. हे दोन्ही मिळुन शासनाने आपले हात व पाय कापले आहे. या संदर्भात आजपर्यंत स्थानिक शासनाने कुठलीही भुमिका घेतली नाही किंवा इथल्या जनप्रतिनिधींनी, इथल्या लोकांनी त्यावेळी जर आंदोलन केले असते तर आज जसा ८५५ चा प्रश्न निघाला तसा १० वर्षांनी पुन्हा ८५५ चा प्रश्न निघु शकतो. ही जबाबदारी पुर्णपणे शासनाची व राज्य शासनाची आहे. हा एक मुद्दा आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, येथिल स्थानिक शासन आपल्या शहराची दिशाभुल करते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे जेव्हा बांधकाम नियंत्रण नियमावली शहराला लागु झाली, एमएमआरडीए चे नियम जेव्हा लागु झाले, जेव्हा सुधारीत विकास आराखडा बनविला गेला तेव्हा त्यावर हरकती मागविण्यात आल्या. त्या हरकतीच्या सुचना एमएमआरडीए कडे ३३०० जावु शकतात आणि जेव्हा सुधारीत विकास आराखडयासाठी हरकती मागविल्या तेव्हा ३३ ही सुचना आल्या नाहीत याच्या बद्दल वाईट वाटते. याचे कारण असे आहे की, राज्य सरकारने हरकतीच्या सुचना कलम २६ अन्वये मागविल्या होत्या. हरकतीच्या सुचना कलम २६ अन्वये मागविण्याच्या स्पष्ट सुचना आहेत. परंतु आमच्या आयुक्तांनी सुचना मागवितांना त्या ३७ (१) अन्वये मागविल्या होत्या. ही पहिली दिशाभुल करणारी चुक आहे. कलम ३७ प्रमाणे डीसी रुलसाठी सुनावणी घेतात. खरे तर कलम २६ अन्वये सुचना, हरकती मागवायला हव्या होत्या. कलम ३७ मध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की, प्रारुप विकास नियमांमध्ये सुधारणा करतांना ज्या—ज्या लोकांना त्याचा नुकसानकारक भाग आहे, त्या लोकांना तुम्ही नोटिस दयायला हवी होती. परंतु एकाही माणसाला तुम्ही नोटिस दिली नाही. हरकती मागवितांना कलम २६ अन्वये मागवायला हवे होते, सुनावणी तुम्ही कलम २६ प्रमाणे केली. निर्देशानुसार कलम २८ प्रमाणे सुनावणी दयायला हवी होती. म्हणजे एवढी दिशाभुल करत आपल्या शहराचा विकास कसा खुंटेल, आपल्या शहरातील जनप्रतिनिधींना कसे अंधारात ठेवुन या शहराचा विकास कसा रोखता येईल याचे पध्दतशीर काम येथिल आयुक्त स्तरापासुन राज्य शासनापर्यंत झालेले आहे हे स्पष्ट आहे. आयुक्तांनी याचे उत्तर दयावे की कोणत्या कलमाखाली किती हरकती आल्या ही एक बाब. कोणत्या कलमाखाली तुम्ही सुनावणी घेतली हा दुसरा भाग आणि कोणत्या कलमाखाली सुनावण्या व्हायला हव्या होत्या आणि हया सुनावण्या जर झाल्या असतील तर जेव्हा आपण अंतिम टप्प्यामध्ये ही सभा घेत आहोत. अंतिम टप्प्यामध्ये मंजुरी देत आहोत. तर त्या हरकतींचे नेमके काय केले याचे उत्तर तुम्ही दिले पाहिजे. दुसरा मुद्दा असा आहे की, या बांधकाम नियंत्रण नियमावलीमध्ये पृष्ठ क्र. ३२, परिच्छेद १०, यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की, दंडाची रक्कम ही मालक, वास्तुविशारद, विकासक, यांच्याकडुन २५,१५,१०, ५० अशाप्रकारे वसुल केली पाहिजे. माझे म्हणणे असे आहे की, हे सर्व लागु करत असतांना विकास आराखडयामध्ये जे लोक बाधित होत आहेत त्यांचे पुनर्वसन करायचे आहे ते तुम्ही कसे करणार आहात? हा एक मुद्दा आहे आणि दुसरे म्हणजे ज्या जागेवर पुनर्वसन करायचे आहे त्या जागांवर आधीच अतिक्रमण असेल तर तुम्ही अतिक्रमण करणा—या लोकांचे पुनर्वसन करणार आहात की, विकास आराखडयात बाधित होणा—या विस्थापितांचे पुनर्वसन करणार आहात? हे पण उत्तर आयुक्तांनी दयायला हवे. याच विकास आराखडयात दुसरा विषय असा

आहे की, आज या शहरामध्ये लोकांकडे अडीचशे वारापेक्षा जास्त जागा नाही. कोणाची पाच वार असेल, कोणाची दहा वार असेल, कोणाची ५० वार असेल परंतु या नियमाप्रमाणे तुम्हांला एखादा भुखंड विकसित करायचा असेल तर कमीत कमी २१ चौ.मी. क्षेत्राचा भुखंड असणे आवश्यक आहे. यामुळे आजच्या घडीला छोटे दुकानदार, मध्यमवर्गीय, झोपडपट्टीतील लोक, शहरातील ८० टक्के लोक याच्या आतमध्ये आहेत. जर त्यांची जागा २१ चौ.मी. च्या आतमध्ये असेल ते विकास करु शकत नसतील तर या शहराचा विकास कसा होवू शकतो? याचे उत्तर आयुक्तांनी मला दयायला हवे. जर २१ मिटरच्या आतमध्ये सर्व लोक राहत असतील तर येथिल विकास कसा काय होईल? याचेही उत्तर येथे दयायला हवे. मी आयुक्तांना पुन्हा एकदा सांगतों, राज्य शासनाला पण सांगतो की येथिल लोकांची तुम्ही आजपर्यंत दिशाभुल केली आहे. येथिल जनप्रतिनिधींची दिशाभुल केली आहे. यापुढे या सर्व गोष्टींवर सारासार विचार करुन आमच्या सर्व जनप्रतिनीधींना माझी विनंती आहे. शहराच्या तळागाळातील लोकांना याचा फायदा कसा होईल एवढे बघुन डीसी रुलला अंतिम स्वरुप दयावे. धन्यवाद.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>मा. महापौर, मा. उप—महापौर, मा. आयुक्त साहेब, मा. सर्व सदस्य, विकास नियंत्रण नियमावलीचा विषय महत्वाचा म्हणुन आज आयत्यावेळच्या सभेत आणला आहे. या बाबतीत मी आपणांस निदर्शनास आणु इच्छितो की, यापुर्वी एफएसआय एक वरुन तीन करण्याकरीता तसेच अनधिकृत बांधकाम नियमन करण्याकरीता तीन वेळा महासभेने ठराव पारीत केलेला असून मंजुरीसाठी शासनाकडे पाठविला आहे. परंतु त्याची काडीमात्र दखल शासनाने घेतली नव्हती. आपणही त्याचा पाठपुरावा केलेला नाही असे या ठिकाणी मी सांगु इच्छितो. सत्ताधारी पक्ष किंवा आमदार म्हणुन आपली असलेली जबाबदारी पुर्ण करु न शकल्याने हे ठराव तसेच पडुन आहेत. फक्त ठराव करुन चालणार नाही तर शासनाकडे पाठपुरावा करुन मान्यता मिळवुन घेतली पाहिजे होती. ते केलेले नाही. वरील ठरावांना यापुर्वीच मान्यता घेतली असती तर शहरातील ८० ते ९० टक्के बांधकामे नियमित झाली असती व आज होणारी कार्यवाही आपण टाळू शकला असतात. त्यामुळे कृपया आज आम्ही जो प्रस्ताव तुमच्याकडे देत आहोत तो उल्हासनगर शहराच्या हिताचा आहे. तो शासनाकडे पाठपुरावा करुन मंजुर करुन घ्यायला हवा. अशी माझी या ठिकाणी नम्र विनंती आहे धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र।

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त, सर्व नगरसेवक बंधु—भगिनींनो, मला असे वाटते की, सत्ता पक्षाकडे विकास नियंत्रण नियमावली बाबत अथवा इतर बाबींबाबत स्पष्ट दिशा नाही. मग ते कलम १०.२ असो अथवा दुसरे नियम असो त्यांच्याकडे स्पष्ट अशी दिशा नाही. याच सभागृहात २००२ साली, मी जास्त बोलणार नाही फक्त दोनच मुद्दयांवर बोलेन. याच सभागृहात आम्ही ठराव क्र. ३० हा २० मार्चला मंजुर केला होता. आमचे श्री. हरदास माखिजा त्यावेळी महापौर होते, त्यावेळी सभागृहाचा सर्वानुमते ठराव झाला होता की, सर्वांसाठी एफएसआय एक वरुन तीन करण्यात यावा. जर झोपडपट्टीत चार केला व इतर ठिकाणी अजुन वाढविला तर आम्हांला जास्त आनंद होईल. परंतु त्यावेळी आम्ही असे म्हणालो होतो की, सर्व प्रकारच्या विकासासाठी एफएसआय तीन असायला हवा. मला लक्षात आहे की, त्यावेळी भाषणे झाली होती. मी कोणाचे नाव घेणार नाही. त्याचवेळी अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचा ठराव देखील आणला होता. त्यावेळी आम्हांला असे सांगितले होते की, त्यावेळी देखील अशीच भाषा होती की, हा ऐतिहासीक ठराव आहे. आपले श्री. हरदास माखिजा साहेब ज्यावेळी ऐतिहासिक निर्णय होणार असतो त्यावेळीच येथे येतात असे मला वाटते. ते नेहमी ऐतिहासिक निर्णयांबाबत बोलत असतात. त्यावेळी आम्हांला सांगितले होते की, आताच्या आता ठराव पास करा, आमचे मुख्यमंत्री यांच्याशी बोलणे झाले आहे, प्रधान सचिव नगरविकास विभाग यांच्याशी बोलणे झाले आहे. आमची माणसे तेथे बसली आहेत. तीन दिवसाच्या आत आम्ही ठराव मंजुर करुन आणु. तर आता त्या गोष्टीला तीन वर्ष उलटून गेली आहेत तरी देखिल आपले दोन्ही ठराव मंजुर झालेले नाहीत. त्यावेळी सत्तापक्ष व विरोधी पक्षातील सर्वांचे म्हणणे हेच होते की, सर्व प्रकारच्या विकासासाठी एफएसआय तीन असायला हवा. मी आधीच सांगितले की, झोपडपट्टीसाठी एफएसआय चार होत असेल तर आम्हांला आनंदच आहे. परंतु सर्व प्रकारच्या विकासासाठी एफएसआय हा तीनच असायला हवा. असे झाले नाही तर शहराचा जो प्रश्न आहे तो तसाच राहिल व आपणा सर्वांना फसविल्या सारखे होईल. जोपर्यंत नियम क्र. १०.१ व १०.२ बद्दलचा प्रश्न आहे तर आम्ही देखिल त्याचे सहमत आहोत, कुणालाही असे वाटायला नको की आम्ही त्या नियमाचा विरोध करीत आहोत. आम्हाला वाटते की नियम व्हायला हवा परंतु त्यातील दंडनिय रक्कम व वसुली कशाप्रकारे व्हावी या मुद्दयावर आमचा विरोध आहे, आमचा मतभेद आहे. आम्हांला देखिल वाटते की, त्या नियमाची तरतुद

व्हायला हवी. त्यामध्ये दुमत नाही. परंतु त्यातील दंडनियम रक्कम वसुल करण्याची जी तरतुद आहे, त्याबाबत आमचे मतभेद आहेत हे मी स्पष्ट करु इच्छितो. मी हे सांगु इच्छितो की, कोणताही कायदा अथवा नियम लागु होतो तेव्हा त्याचे काही तत्व असतात. याबाबत सुस्पष्टता असायला हवी. कोणालाही कळायला हवे की, किती पैसे भरायचे आहेत. त्यामध्ये संदिग्धता असायला नको. कायदेतज्ञांना तर याची माहिती असते, यासाठी वकिल वगैरे असतात परंतु सामान्य माणसाला देखिल हे समजायला हवे. तर याबाबत देखिल आपण ठराव क्र. ४०, दिनांक १९.१०.२००२ रोजी पारित केला होता. त्या ठरावामध्ये आपण एका तक्त्याचा अंतर्भाव केला होता. तो तक्ता देखिल आपणच सत्तापक्षातील लोकांनी बनविला होता. आम्ही देखिल मोठया मनाने तो ठराव सर्वानुमते मंजुर केला होता. तो प्रस्ताव देखिल आपणच आणला होता. त्या तक्त्यामध्ये निवासी, औद्योगिक व वाणिज्य वापराबाबत विविध दर दर्शविले होते. मला असे वाटते की, त्याशिवाय स्पष्ट व सरळ अशी दुसरी कोणतीही भाषा नसेल. कारण आता जो आपण प्रस्ताव आणला आहे त्यामध्ये जागेचे घसारा मुल्य, त्यावेळी जागेचा भाव काय होता, त्यानंतर त्याचे घसारा मुल्य काढायचे आहे. समजा एखादी ९० वर्ष जुनी इमारत आहे, त्यामध्ये दर कमीत कमी २०० ते ३०० रुपये प्रति चौरस फुट धरला तरी १५ वर्षाचे घसारा मुल्य २ टक्के अशा प्रमाणे ३० टक्के वजा केल्यास २७० ते १४० रुपये प्रति चौरस फुट दंडनिय रक्कम होईल. १९९० पर्यंत इमारती फार कमी होत्या. त्यानंतर मोठया प्रमाणावर इमारती बनल्या आहेत. तर त्यांचा बांधकामाचा दर जास्त होईल. कमीत कमी रुपये १५० ते रुपये ३०० प्रति चौरस फुट एवढा होईल. हा दर फारच जास्त होईल असे मला वाटते. आपण या आधी सभागृहात जे ठराव पास केले आहेत त्या ठरावांपासुन दुर का जात आहोत? आपण नविन नविन प्रस्ताव का आणीत आहोत? याचा अर्थ यापुर्वी आपण विचार करुन प्रस्ताव आणले नव्हते असा होतो. तर मला असे वाटते की, हे जे नियम आहेत यामध्ये सुधारणा व्हायला हवी. आम्ही दोन सुचना करतो. एक म्हणजे सर्व प्रकारच्या बांधकामांसाठी एफएसआय तीन करायला हवा. तसेच दंडनिय रक्कमेची वसुली ही यापुर्वी बनविलेल्या तक्त्यानुसार करायला हवी. ज्यामध्ये रुपये ३० प्रति चौ.मी. ते रुपये १०० पर्यंत तरतुद होती. निवासी, औद्योगिक व वाणिज्य वापरासाठी विविध तरतुद होती. आजही आपणांस तीच भुमिका घ्यायला हवी. तसेच जनतेला जे आश्वासन दिले होते त्यापासुन मागे फिरायला नको.

**मा. सदस्य श्री. मोहन साधवानी सभागृहातुन बाहेर गेले.** 

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :— मा. महापौरजी, नियम १०.२ मध्ये मी पुढीलप्रमाणे काही सुधारणा सुचवु इच्छितो. १०.२ मधून ''अपार्ट फ्रॉम अबोव्ह'' अशी जी ओळ आहे ती वगळण्यात यावी व त्या जागी 'अे' अथवा 'बी' असे लिहीण्यात यावे. तसेच १०.२.२ मध्ये ''अनधिकृत बांधकाम नियमीत करताना आयुक्तांच्या मान्यतेने नियमीत करण्यात यावे'' असाही उल्लेख करण्यात यावा. आमचे मित्र श्री. लाल पंजाबी यांनी त्यांचे भाषणामध्ये सभागृहाला सांगितले की, बांधकामे नियमित करण्याच्या मुद्दयामध्ये त्यांचा कोणताही विरोध नाही. फक्त जे जुने दर मंजुर केले होते तेच आताही अंतिम करुन ठराव मंजुर करावा असे त्यांचे म्हणणे आहे. या विषयाबाबत मी पंजाबी साहेबांना आठवण करुन देवु इच्छितो की, महासभा सुरु होण्यापुर्वी आम्ही एकत्र बसलो होतो. त्यावेळी विकास नियंत्रण नियमावली मध्ये तज्ञ असणारे श्री. कटारिया यांना बोलविले होते. त्यांच्याकडुनही सल्ला घेतला होता की, जुना ठराव शासन मंजुर करेल का? तेव्हा ते म्हणाले की, आपण अशी मागणी केली तर सरकार मान्य करणार नाही. यासाठी ठोस कारण दयावे लागेल. जर आपण एखादया २५ वर्षे जुन्या इमारतीचे उदाहरण दिले व तीचे घसारा मुल्य काढुन १/३ रक्कम दंड म्हणुन घेतली तर सरकार ते मान्य करेल. दुसरे म्हणजे त्यांनी एफएसआय वाढविण्याचे उदाहरण दिले की या सभागृहात आधी एफएसआय तीन करण्याचा ठराव मंजुर करण्यात आला होता. नगररचनाकार यांनी त्यांच्या भाषणामध्ये सांगितले की, या नियमांमध्येच एफएसआय तीन करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे या बाबतीत काही काळजी करण्याची गरज नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— श्री. माखिजा साहेब, एक मिनिट, साधारण विकास हक्काबाबत आपण एफएसआय तीन केंला आहे काय?

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :— याबाबतीत नगररचनाकार आपणांस उत्तर देतील.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— ज्यावेळी नगररचनाकार उत्तर देत होते त्यावेळी आपण बोललात मग आताही आपण उत्तर दया.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :— श्री. माखिजा साहेब, आज सभा ज्या नियमांना अंतिम मंजुरी देत आहे, तर त्याबाबत नियम आहेत की, आधी सुनावणी घ्यायला हवी. तर मला असे म्हणायचे आहे की, आयुक्तांनी अथवा

शासनाने या मुद्दयांवर हरकती मागविल्या आहेत काय? हरकतींवर सुनावणी झाली आहे काय? त्यानंतर तुम्ही अंतिम करा.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :—</u> मा. महापौरजी, मी सभागृहात एका बाबीवर स्पष्ट बोलु इच्छितो की, १०.२ मध्ये सुधारणा करण्यासाठी आम्ही जो प्रस्ताव दिला आहे तो एमएमआरडीएच्या नियमांवर आधारीत असून मी बांधकाम मुल्यांवर दंडनिय रक्कम घेण्याबद्दल बोललो आहे, मी बाजारमुल्याबद्दल काहीही बोललेलो नाही. ते आदर्श नियमावलीत लिहिले असेल परंतु आपल्याला ते स्विकारायचे नाही. आपणांस बांधकाम मुल्यांवर आधारीत घसारा मुल्य घेवुन बांधकाम नियमित करायचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—</u> मा. महापौरजी, माझे म्हणणे असे आहे की, ७ मार्च, २००५ ला महासभा ठराव क्र. ७१ हा सुधारीत विकास योजना मंजुर करण्यासाठी पास केला होता. त्यानंतर मा. आयुक्त श्री. रामनाथ सोनवणे यांनी १८.३.२००५ ला सिमारेषा आराखडा प्रसिध्द केला होता व त्यावर हरकती मागविल्या होत्या. त्यासाठी ६० दिवसाची मुदत दिली होती. त्या अवधीत १७ मेला फक्त युसीआयची एकच हरकत आली होती. त्याची आजपर्यंत कोणतीही सुनावणी झाली नाही. त्यानंतर शासनाने कलम २६ अन्वये हरकती मागविण्याचे निर्देश दिले होते. श्री. रामनाथ सोनवणे यांनी कलम ३७ (१) अन्वये हरकती मागविल्या होत्या. हे चुकीचे आहे. जर सुनावणी झाली नसेल तर तुम्ही आज याला अंतिम स्वरुप कसे काय देणार? मनमानी करुन तुम्ही असे करु शकता काय? हरकती सुचना आल्यानंतर त्यावर सुनावणी घेवुन उत्तर दयायला हवे. आजपर्यंत यावर सुनावणीच झालेली नाही तर तुम्ही अंतिम कसे काय करता?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी ):—</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. टाले यांनी सांगितले की, सूनावणी झालेली नाही. नगररचनाकार यांनी प्रस्ताव सादर करतांनाच सांगितले की, आलेल्या हरकतीवर सुनावणी झालेली होती. त्यानंतरच प्रस्ताव मंजुरीसाठी सभागृहासमोर ठेवलेला आहे. दुसरे म्हणजे कलम २६ व ३७ बद्दल त्यांनी सांगितले आहे तर मी सांगु इच्छितो की, आम्ही शासनाशी एमआरटीपी ॲक्ट अन्वये चर्चा केली होती त्यानंतर कलम ३७ अन्वये हरकती मागविल्या होत्या. जर याबाबत आपणांस काही हरकत असेल तर आम्ही शासनाचे मत घेवु. शासनाचा सल्ला घेतल्यानंतरच आम्ही कलम ३७ अन्वये हरकती मागविल्या होत्या. जर आपली काही हरकत असेल तर आम्ही शासनाकडुन मार्गदर्शन घेवू. दुसरे म्हणजे आता आम्ही हा विषय मान्यतेसाठी सभागृहासमोर सादर केला आहे. येथे मान्यता मिळाल्यानंतर आम्ही अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठवु. आपण जी काही सुधारणा सुचवाल ती आम्ही शासनाकडे पाठवु. सभागृहाने मंजुर केले तर शासन मान्यतेनंतरच अंमलात येईल.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—</u> माझा तुमच्यावर आरोप आहे की, आपण एकही सुनावणी घेतलेली नाही. जेव्हा सुधारीत सिमा रेषा नकाशा प्रसिध्द केला तेव्हा किती हरकती आल्या आहेत ते तुम्ही दाखवा. आणि ज्या हरकती आल्या असतील त्यांची सुनावणी घेतली की नाही त्याचा रेकॉर्ड मला दाखवा. जर शासनाचे निर्देश कलम ३७ (i) अन्वयचे असतील तर ३७ (i) मध्ये मॉडीफिकेशनचा मुद्दा आहे. त्याप्रमाणे सुनावणी व्हायला हवी होती. राज्य सरकारने कलम २६ अन्वये स्पष्ट निर्देश दिले आहेत की, कलम २६ अन्वये सुनावणी व्हायला हवी होती परंतु तुम्ही जाणीवपुर्वक कलम ३७ अन्वये केलेली आहे. सुनावणी कलम २८ प्रमाणे आवश्यक असतांना तुम्ही कलम २६ अन्वये केली आहे. जर असे नसेल तर तुम्ही मला स्पष्ट करुन दया.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी ):—</u>मा. महापौर महोदया, आता कलम ३७ बद्दल जी चर्चा झाली तर जेव्हा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी जाईल त्यावेळी आम्ही त्यामध्ये लिहू की, शासनाशी चर्चा करुनच कलम ३७ अन्वये आम्ही सुनावणी दिली होती. त्यानंतर शासन त्यावर निर्णय घेईल. आता बैठकीपुर्वी माझ्याकडे जो प्रस्ताव आला आहे त्या अन्वये मी आपणांस माहिती देत आहे. आता यामध्ये सुधारणा करुन तुम्ही जो प्रस्ताव पास कराल तो मी शासनाकडे मान्यतेसाठी पाठवेन. आमच्याकडे ज्या हरकती आल्या होत्या त्यावर सुनावण्या झालेल्या आहेत.

मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता सभागृहातुन बाहेर गेल्या. 

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :— तुम्ही ज्या मुद्दयावर हरकती मागवत आहात तो मुददा बाजुला राहत आहे. एखादया मध्यमवर्गीय माणसाच्या फायदयासाठी एखादी हरकत असेल तर तुम्ही ती सोडुन देत आहात व दुस—याच बाजुने चालले आहात. तुम्ही मला दाखवा तुमच्याकडे किती सुनावण्या झाल्या आहेत. सिमारेषा नकाशाबाबत किती हरकती आल्या आहेत व किती सुनावणी झाल्या आहेत?

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी ):—महासभा संपल्यानंतर आपण नगररचना विभागातुन माहिति पाहु शकता.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— मा. महापौरजी, आता आयुक्त श्री. लोणारे साहेब यांनी सभागृहाला सांगितले की, आज आपण प्रस्ताव पास केंल्यानंतर यापुढील इमारतींना फायदा होईल, मागील इमारतींना फायदा होणार नाही.

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी ):—एमआरटीपी ॲक्ट मध्ये तरतुद आहे, बांधकामाच्या वेळेपासुन दर लागु व्हायला पाहिजे. म्हणजेच मुळ कायदयात जी तरतुद आहे त्याचा भंग होवु शकत नाही. ते पाहुनच आम्ही सुधारणा करण्याचा प्रस्ताव आणला आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—आमचे असे म्हणणे आहे की, आम्ही आता जी सुधारणा करीत आहोत, त्यामध्ये बांधकाम मुल्याप्रमाणे दंडनिय रक्कमेची आकारणी करण्यात येणार आहे. मग तो दर १९८६—८७—८८ अथवा १९९० चा असेल तर आपण असे करु शकतो काय?

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी ):—एमआरटीपी ॲक्ट प्रमाणे जे बांधकाम नियमित करता येवु शकते, त्याच बांधकामाला नियमित करता येवु शकेल. मुळ कायदयामध्ये कोणतीही तरतुद नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— आम्ही कायदयात तरतुद करु इच्छितो की, १९८६ अथवा १९९० मध्ये जे बांधकाम तयार झाले असेल त्याचे जे बांधकाम मुल्य असेल त्यावर दंडनिय रक्कमेची आकारणी करण्याबाबत सुधारणा करु इच्छितो. असे कायदयाने करु शकतो का हे आपण आम्हांला सांगावे.

मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :— लोणारे साहेब आपण सांगितले की, कायदयात तशी काही तरतुद नाही तर मग त्यावर काही बंधन आहे काय की आपण करु शकत नाही. जर काही बंधन नसेल तर आपण करु शकतो. आपण आपले मत दयावे.

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी ):—मा. महापौरजी, अधिनियमातील तरतुदीनुसार आपण ठराव करु शकतो. त्याच्या बाहेर जावुन आपण काही करु शकत नाही. याबाबतीत आपले जे काही म्हणणे असेल, आपला जो काही निर्णय होईल तो आम्ही शासनाकडे पाठवु.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— आता येथे आम्ही जी सुधारणा करणार आहोत ती कायदयाप्रमाणे आहे अथवा नाही हे आम्हांला सांगावे.

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी ):—आता मी आपणांस काही सांगु शकत नाही. परंतु प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर आम्ही तो शासनाकडे मंजुरीला पाठवु.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— याचा अर्थ आपण याची खात्री देवु शकत नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— श्री.लोणारे साहेब आता आम्ही याच्यावर अंतिम निर्णय घेणार आहोत. तुम्ही आता नाही सांगणार तर कधी सांगणार? आम्हांला निर्णय आज घ्यायचा आहे, उदया नाही.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :— मा. महापौरजी, विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सुधारणा करण्यासाठी आपण येथे विषय आणला आहे. यामध्ये झोपडपट्टीसाठी २२५ चौ. फुट ऐवजी ४५० चौ.फुट अशी सुधारणा करावी ही विनंती मी करतो.

**मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :—** मा. महापौरजी, बांधकाम नियंत्रण नियमावलीमध्ये सुधारणा करण्यासाठी मी प्रस्ताव सादर करु इच्छितो. ते पुढीलप्रमाणे आहेत.........................

१) प्रारुप विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुद क्रमांक १०.१ अनुसार दंडनीय रक्कमेमध्ये फेरफार करणे.
२) दाटीवाटीच्या क्षेत्रातील औद्योगिक वापराच्या भुखंडाला कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बांधकाम नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीप्रमाणे सुसंगत अशी विशेष सवलत देणे.
३) औद्योगिक क्षेत्रातील भुखंड निवासी क्षेत्रामध्ये परावर्तीत करणेकामी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बांधकाम नियंत्रण नियमावलीप्रमाणे बदल करणे.
४) दाटीवाटीच्या क्षेत्रातील सामासिक अंतर बदलणेकामी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बांधकाम नियंत्रण नियमावलीच्या धर्तीवर बदल करणे.
५) हरीत क्षेत्रामध्ये बांधकाम करणेकामी ०.२ टक्के ऐवजी ०.५ टक्के असा बदल अनुज्ञेय करणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ३२ वरील नियम १०.२ मध्ये खालीलप्रमाणे अंतर्भाव करणे :
जे बांधकाम मंजुर विकास योजनेतील तरतुदीशी किंवा मंजुर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींशी विसंगत असेल ते दंडनिय रक्कमेची आकारणी करुन नियमीत करता येवु शकणे. यासाठी सदरचे बांधकाम कोणत्याही क्षेत्रामध्ये असले तरी नियमीत करता येवु शकणे.
अशाप्रकारे बांधकाम नियमीत करताना बांधकामाच्या बाजारमुल्याऐवजी बांधकामाच्या बांधकाम मुल्याच्या प्रमाणात घसारा मुल्य काढुन दंडनिय रक्कमेची आकारणी करणे.

किंवा

सदरच्या बांधकामाच्या मालमत्ता कराच्या दुप्पट रक्कमेची आकारणी करणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ६२ वर पुढीलप्रमाणे बदल करणे.
पृष्ठ क्रमांक ६२ वर दर्शविलेल्या तक्त्याऐवजी नवीन तक्ता दाखल करणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ७५ वर पुढीलप्रमाणे बदल करणे.
इलेक्ट्रीक सबस्टेशन संबधित नियम क्र १५.५ (इ) वगळणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ७६ वर पुढीलप्रमाणे बदल करणे.
ज्या इमारतीमध्ये २०पेक्षा जास्त सदनिका नसतील अशा इमारतीमध्ये ऑफिस रुम, कॉमन टॉयलेट, वॉचमन रुम व तत्सम स्वरुपाच्या बांधकामासाठी १०.५० चौ.मी एवढया चटईक्षेत्राची गणना न करणे तसेच ज्या इमारतींमध्ये २० पेक्षा जास्त सदनिका असतील अशा इमारतीमध्ये ऑफिस रुम, कॉमन टॉयलेट, वॉचमन रुम व तत्सम स्वरुपाच्या बांधकामासाठी २० चौ.मी एवढया क्षेत्राची चटईक्षेत्रामध्ये गणना न करणे.
नियम १५.५ (जी) मध्ये पुढीलप्रमाणे बदल करणे :
ज्या भुखंडाचे क्षेत्र ४५० चौ.मी किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशा ठिकाणी बाजुच्या व मागील बाजुच्या समासिक अंतरामध्ये बंदीस्त गॅरेज अनुज्ञेय करणे.
नियम १५.५ (क्यु) मध्ये पुढीलप्रमाणे बदल करणे :
बाजुच्या समासिक क्षेत्रात मीटररुम चटईक्षेत्र निर्देशांक वगळुन अनुज्ञेय करणे.
नियम १५.५ (आर) मध्ये पुढीलप्रमाणे बदल करणे :
वाहनतळाची उंची २.४ मीटर एवढी अनुज्ञेय करणे, पुरग्रस्त क्षेत्रासाठी हीच उंची ४.५ मीटर एवढी अनुज्ञेय करणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ७९ वर पुढीलप्रमाणे बदल करणे.
या पृष्ठावर दर्शविलेल्या तक्त्याऐवजी नवीन तक्ता दाखल करणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ८० वर पुढीलप्रमाणे बदल करणे.
गावठाणातील अरुंद भुखंडाऐवजी ''अरुंद भुखंड'' असा बदल करणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ८३ वर पुढीलप्रमाणे बदल करणे.
नियम १६.३.२ (डी) मध्ये समासिक अंतरात ३ मिटर ऐवजी १.८ मिटर असा बदल करणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ८६ वर पुढीलप्रमाणे बदल करणे.
नियम १८.५ (IV) जादा दाखल करुन त्यात ३ मीटर समासिक अंतराऐवजी ४.५ चौ.मी एवढया क्षेत्रात गॅरेज अनुज्ञेय करणे.

नियम १९.५.६ (बाल्कनी संदर्भात) १० टक्के बांधकाम क्षेत्राऐवजी परिघाच्या १/३ प्रमाणे बांधकाम अनुज्ञेय करणे.

तसेच प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीच्या परिशिष्ट डब्ल्यु मध्ये दुस–या ओळीत ''जनगणना केलेली झोपडपट्टी'' ऐवजी ''जनगणना केलेली झोपडपट्टी / दाटीवाटीचे क्षेत्र'' असा बदल करणे.

परिच्छेद क्रमांक डब्ल्यु–१ चे प्रयोजनासाठी दाटीवाटीच्या क्षेत्राची व्याख्या खालीलप्रमाणे दाखल करणे–

''एकुण भुखंडाच्या क्षेत्रापैकी ५० टक्के पेक्षा अधिक जोत्याच्या क्षेत्रावर बांधकाम झाले असल्यास अश्या क्षेत्रास दाटीवाटीचे क्षेत्र असे संबोधण्यात यावे.''

परिच्छेद क्रमांक डब्ल्यु २ प्रमाणे चटईक्षेत्र निर्देशांक २.५० ऐवजी ४.०० असे समजण्यात येईल.

**मा. सदस्य श्री. मनोज साधवानी व श्री. अनिल जयसिंघानी सभागृहातुन बाहेर गेले.** 

परिशिष्ट २ मध्ये पाउस पाणी संकलनाचे प्रयोजन ५०० चौ.मी भुखंडाच्या क्षेत्राऐवजी १००० चौ.मी पेक्षा जास्त क्षेत्रावर लागु करणे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** मा. महापौरजी, आज विकास नियंत्रण नियमावलीचा विषय सभागृहासमोर आला आहे. त्यावर मी बोलु इच्छितो की, प्रशासनाने हरकती व सुचना ऐकल्या आहेत. गोषवा–यात त्याचा दिनांकही लिहला आहे २.६.२००५ व ९.६.२००५. ३२ हरकती आल्या नंतर त्यांची अंतिम सुनावणी ९.११. २००५ ला झालेली आहे. आपण जो गोषवारा दिला आहे त्यामध्ये सर्व तारखा लिहिल्या आहेत. आता आपण जी नियमावली पास करणार आहोत त्यामुळे लोकांना फायदा मिळायला हवा. हे महापालिकेचे नियमित काम आहे, इतर बाबींशी याचा काही संबंध नाही. कल्याण–डोंबिवली महापालिकेचे काही नियम मंजुर झाले आहेत. त्याचे उदाहरण आम्ही येथे दिले आहे कारण आपला ठराव पास झाल्यावर शासनाकडे गेल्यानंतर तो मान्य व्हायला हवा. यामुळे मी देखिल जास्त खोलात न जाता एक–दोन गोष्टींपर्यंत मर्यादित राहतो. आपले काही मा. सदस्य बोलले की, २००२ मध्ये आपण अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी जो ठराव पास केला होता तो शासनाने मंजुर केला असता तर आज ही वेळ आली नसती. मी यांना सांगु इच्छितो की, १९९७ ते ९९ मध्ये जेव्हा यांचे राज्य होते त्यावेळी येथे १९९५ पर्यंतची सर्व बांधकामे नियमित करण्याचा विषय येथे आला होता. त्या सभेचे थेट प्रक्षेपण देखिल ठेवले होते. १९९५ ते ९९ या कालावधीत राज्य सरकार देखिल यांचेच होते. तो ठराव तेव्हा मंजुर झाला असता तर आज ही वेळ आली नसती. शहराच्या हितासाठी ठराव पास करणे हे आपले काम आहे. त्याला शासनाची मान्यता आवश्यक आहे. परंतु जे ठराव कायदयाने पास होतात तेच ठराव शासनाकडुन मंजुर होवुन येतात. सुचना कोणीही देईल परंतु शासनाने ते ऐकायला पाहिजे. हा जो ठराव आहे हा सर्वानुमते मंजुर करण्यासाठी आम्ही येथे दोन तास चर्चा केली. १० ते १२ वाजेपर्यंत आम्ही येथे चर्चा केली कारण मतदान व्हायला नको. हा शहराच्या हिताचा प्रश्न आहे. परंतु मला दुःखाने म्हणावे लागते की, श्री. पंजाबी साहेब यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की, दराबाबत आक्षेप आहेत. याचा अर्थ या विषयावर त्यांना मतदान घ्यायचे आहे असे मला वाटते. हा शहराचा हिताचा प्रश्न असल्याने माझी सभागृहाला विनंती आहे की, सर्वानुमते निर्णय घेतल्यास योग्य होईल. यामुळे शहरात योग्य संदेश जाईल तसेच राज्य शासनाला देखिल ठराव कायम करणे सोपे होईल. जर बहुमताने केला आणि राज्य शासनाने मंजुर केला नाही तर आपल्यावर देखिल आरोप होतील. मी पुढीलप्रमाणे सुधारणा सुचवित आहे......
नियम १७.१ प्रमाणे इमारतीच्या एकुण मजल्यांची संख्या ८ ऐवजी १२ पर्यंत निश्चित करणे. या प्रयोजनार्थ इमारतीची उंची २४ मीटर ऐवजी ३५ मीटर एवढी निर्धारीत करणे.
हा मुद्दा जोडुन हा विषय सर्वानुमते मंजुर करावा अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–** मा. महापौरजी, सभागृह नेता यांनी आता सांगितले की, यापुर्वी कोणाचे सरकार होते परंतु २००२ मध्ये जेव्हा श्री. हरदास माखिजा हे महापौर होते त्यावेळी आपणच विषय आणला होता. त्यावेळी शहराच्या हितासाठी आम्ही तो ठराव सर्वानुमते पास केला होता. आम्ही शहराच्या हिताच्या विरुध्द नाही. परंतु आपण येथे चुकीचा निर्णय घेतला तर शहरातील लोकांना त्याची फळे भोगावी लागतील. असे होवू नये यासाठी आम्ही या विषयावर सभागृहात चर्चा करु इच्छितो.

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–** मा. महापौरजी, श्री. किशोर वनवारी यांनी येथे नाव न घेता शिवसेना भाजपाला सांगितले की तुमच्यावर आरोप होतील. आम्ही या शहराच्या हितासाठी आतापर्यंत विरोध केला आहे. विरोधाला विरोध न करता तुमच्या त्रुटी लक्षात आणुन देण्याचा प्रयत्न केला आहे. मी श्री. किशोर वनवारी यांना

सांगु इच्छितो, श्री. हरदास माखिजा यांनी इंग्रजीमध्ये एक उदाहरण दिले परंतु ते आम्हांला काही कळले नाही. परंतु त्याच प्रकारे मराठीमध्ये देखिल एक म्हण आहे, जर शाळेतील एखादया विदयार्थ्याला पावसाळा सुरु होण्यापुर्वी फेब्रुवारी अथवा मार्च मध्ये तुम्ही रेनकोट दिला तर त्या रेनकोटची अवस्था पावसाळा येई पर्यंत काय होईल हे आपण समजु शकतो. तुम्ही आता रेनकोट देत आहात हे ठिक आहे परंतु हा रेनकोट जुन महिन्यामध्ये दयायला हवा होता. कारण झोपडपट्‌टी विभागात त्या मुलाच्या घरात कितीतरी उंदिर असु शकतात जे रेनकोट खावु शकतात. तर आम्ही जो विरोध करीत आहोत त्याला विरोध न समजता त्यामध्ये आम्ही काही सुचना दिल्या आहेत त्या समजुन घ्या. श्री. लाल पंजाबी यांनी आपल्या सोबत या विषयावर एक–दिड तास चर्चा केली आहे. आमचे सदस्य श्री. माखिजा साहेब यांनी देखिल त्यास संमती दिली होती. त्यामधुन काही मार्ग निघाला नाही ही आमची चुकी नाही. परंतु वारंवार तुम्ही आमच्यावर जो आरोप करीत आहात तो चुकीचा आहे. शिवसेना–भाजपाने या शहराच्या हितासाठी आपणांस नेहमी चांगल्या सुचना देण्याचा प्रयत्न केला आहे. उल्हासनगर शहराच्या नागरीकांसाठी चांगला मार्ग निघावा यासाठी आम्ही येथे प्रयत्न करीत आहोत.

<u>मा. महापौर :–</u> माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, या मुद्‌दयावर आता भरपुर चर्चा झाली आहे. जर आपली इच्छा असेल तर ठराव सर्व संमतीने पारीत करता येईल. असे झाले तर आम्हांला व शहराला फार आनंद होईल. आता यावर चर्चा न करता बसुन घ्या. कारण यावर भरपुर चर्चा झाली आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–</u> एका मुद्‌दयावर आमची सुचना आहे १०.१ व १०.२ अन्वये आपण जी बांधकामे नियमित करणार आहोत त्यामुळे लोकांना प्रत्येक चौरस फुटामागे नेमका किती दंड भरावा लागेल हे कृपा करुन येथे स्पष्ट सांगावे. तसेच दुप्पट व तिप्पट घरपट्‌टी पोटी किती रक्कम भरावी लागेल हे देखिल श्री. किशोर वनवारी व श्री. राजेश वदारिया यांनी सभागृहाला सांगावे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u> आमच्या सदस्यांनी सांगितले की,२००२ मध्ये जो ठराव होता तो याच सभागृहाचा होता.

<u>मा. महापौर :–</u> या मुद्‌दयावर बरीच चर्चा झाली आहे, पुन्हा पुन्हा त्याच विषयावर बोलु नका.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला. 

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u> आपले सदस्य दोन–तीन वेळा बोलतात मग आम्हांला का बोलु देत नाही? माझे म्हणणे एवढेच आहे की, २००२ मध्ये जो ठराव शासनाकडे पाठविला होता त्याचे काय झाले?

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना :–</u> मा. महापौरजी, मला असे वाटते की, हे २००२ बददल बोलायचे ठरवुन आलेले आहेत. वारंवार तेच बोलुन वेळ वाया घालवित आहेत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>तुमचे सदस्य वारंवार बोलतात. श्री. हरदास माखिजा हे तीन वेळा बोलले.

<u>मा. महापौर :–</u> तुम्ही मुद्‌दयावर बोला. श्री. मोहन बेहरानी यांनी आता एक मुद्‌दा उपस्थित केला तुम्ही त्याच्यावर चर्चा करा.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u> तुम्ही विरोधी पक्षातील सदस्यांचा आवाज का दाबतात? ही आरोप प्रत्यारोप करण्याची वेळ नाही. सभागृह नेता नेहमी बोलतात की, १९९५ मध्ये तुमची सत्ता होती. मग २००२ मध्ये आपली सत्ता असतांना आपण काय केले?

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोरात बोलत असल्याने कोण नेमके काय बोलत होते ते कळुन येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :–</u>तुम्हांला काय बोलायचे आहे ते मुद्‌दयावर बोला. उगाच आरडाओरड करु नका.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>मा. सचिव :–</u>कृपया लक्ष दयावे. आपणा सर्वांना जो गोषवारा व तक्ता दिला आहे, याचे मुख्य कारण असे आहे की, मागील वेळी आपण प्रारुप नियम बनविण्यासाठी जो ठराव केला होता. त्यासाठी ३२ हरकती आल्या होत्या.

गोषवा–यामध्ये सर्वच्या सर्व ३२ हरकती फेटाळण्या योग्य आहे असे लिहिले आहे. परंतु त्या सोबत जे परिशिष्ट दिले आहे ते न्याहाळून बघितले तर अनु. क्र. ९ वर हरकत घेणा–याचे नाव दिलेले नाही. ती हरकत प्राईम कन्स्ल्टंट ने घेतली आहे परंतु त्यांचे नाव आले नाही. त्याचे कारणही चुकीचे दर्शविली आहे. अनु. क्र. १७ पहा. त्यामध्ये प्रशासनाने हरकत अंशत: स्विकृत करावी असे म्हटले आहे. परंतु गोषवा–यामध्ये सर्व ३२ हरकती फेटाळाव्यात असे लिहिले आहे. अनु. क्र. २१ वर देखिल एफएसआय १ वरुन ३ एवढा करण्याची शिफारस केली आहे. पुढे जावुन लोकसंख्या वाढणार असल्याने याचा विचार करणे आवश्यक आहे. अनु. क्र. २४ वर हरकत अंशत: स्विकृत करण्यात यावी असे लिहिले आहे. अनु. क्र. २५ वर देखिल हेच लिहिले आहे. यावरुन परिशिष्ट व गोषवारा विसंगत असल्याचे दिसून येते. आपल्यासमोर प्रस्ताव आला आहे की, मागील वेळी ज्या हरकती व सुचना मागविल्या होत्या, प्रशासनाकडुन एकच शिफारस आली आहे की, हरकत मान्य करावी अथवा अमान्य करावी. प्रथम आपणासर्वांना हरकतींवर निर्णय घ्यायचा आहे. या हरकतींवर आपण काय निर्णय घेता ते आधी ठरवा. कारण ३२ पैकी ३ हरकती स्विकाराव्यात असे प्रशासनाने लिहिले आहे. परंतु गोषवा–यामध्ये ३२ हरकती नाकारण्यात याव्यात असे लिहिले आहे. परिशिष्टाप्रमाणे ३ मान्य करुन २९ अमान्य करायला हव्यात. यासाठी प्रशासनाने व विधी विभागाने खुलासा करणे आवश्यक आहे. ब–याच हरकतींमध्ये असे लिहिले आहे की, एमआरटीपीच्या कलम ३७ अन्वये ज्या हरकती मागविल्या आहेत त्यामध्ये कायदेशीर त्रुटी आहेत. याचा खुलासाही होणे आवश्यक आहे. हरकतींवर निर्णय घेतल्यानंतर त्याची जबाबदारी आपल्यावर असते. प्रशासनातर्फे आधी आपण खुलासा प्राप्त करुन घ्यावा की ते कायदेशीर आहे अथवा नाही.

श्री. ए.पी. गुरगुळे (नगररचनाकार):– मा. महापौर व सभागृहातील सर्व मा. उपस्थित सदस्य, बांधकाम नियंत्रण नियमावलीबाबत आम्ही जो गोषवारा सादर केला आहे त्यामध्ये हरकती व सुचना आहेत. प्रशासनाने कलम ३७ अन्वये आपल्याकडे प्रस्ताव सादर केला आहे व तो योग्य आहे. कलम ३७ अन्वये मॉडीफिकेशनसाठी तरतुद आहे. त्याबाबत मी आपणांस सद्यस्थिती सांगतो. एकुण प्राप्त हरकती व सुचना ३२, त्यापैकी विकास योजनेबाबतचे प्रस्ताव १६, कलम ३७ (१) अन्वये आलेले प्रस्ताव ३, २१ चौ.मी. पर्यंतच्या भुखंडाचा विकास करण्यासाठी परवानगी देण्याबाबतचे प्रस्ताव ५, प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्र. १०.१ नुसार दंडित करुन अनधिकृत बांधकाम नियमीत करण्याचा प्रस्ताव १०.१.२, उल्हासनगर शहरासाठी ३ चटई क्षेत्र निर्देशांक वाढवुन देण्याचा प्रस्ताव ४. एकुण प्राप्त झालेल्या ३२ हरकती व सुचना जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमुद केल्या आहेत. त्यावरील प्रशासनाने अभिप्राय देखील नमुद केले आहे. सर्व हरकती व सुचना यांचा सखोल अभ्यास करुन विचाराअंती असे आढळून आले की एकुण ३२ हरकती व सुचनापैकी काही सुचना मान्य करणे योग्य नाही त्यामुळे त्या हरकती व सुचना फेटाळणे आवश्यक राहील. महापालिका प्रशासनाच्या हरकती व सुचनाच्या अभ्यासाअंती मांडलेल्या मताशी सहमत असेल. दिनांक ७.३.२००५ रोजी महासभा ठराव क्र. ७१ अन्वये महापालिकेतर्फे तयार करण्यात आलेले सुधारीत विकास बांधकाम नियंत्रण नियमावलीमध्ये फेरफार करुन अंतिम करण्यासाठी महापालिकेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदरचा प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :– सिमा रेषेबाबत हरकती मागविल्या होत्या त्या किती आहेत?

श्री. ए.पी. गुरगुळे (नगररचनाकार):–सिमा रेषेबाबत हरकती प्राप्त झाल्या नसुन विकास आराखडयातील आरक्षणाबाबत व डीसी रुल बाबत आहेत. यामध्ये सिमारेषेचा प्रस्ताव अंतर्भुत नाही.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :– डीसी रुल बनवितांना सुरुवातीला सिमारेषा नकाशा बनवावा लागतो, तुम्ही त्याचे रितसर प्रसिध्दीकरणही केले आहे, हरकतीही मागविल्या आहेत.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी सभागृहातुन बाहेर गेले. 

श्री. ए.पी. गुरगुळे (नगररचनाकार):–डीसी रुल व सिमारेषा हा मुद्दा वेगवेगळा आहे. डेव्हलपमेंट कंट्रोल हे बांधकाम नियंत्रण नियमावली पुरते मर्यादीत आहे व सिमोरषा हा विषय विकास आराखडयाशी संबंधीत आहे. कलम ३७ अन्वये हरकती मागविल्या आहेत.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :– कोणत्या कलमान्वये मागवायला हव्या होत्या.

श्री. ए.पी. गुरगुळे (नगररचनाकार):–कलम ३७ अन्वये मागु शकतात.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :– राज्य सरकारचे काय निर्देश आहेत?

श्री. ए.पी. गुरगुळे (नगररचनाकार):–एमआरटीपी ॲक्टच्या कलम ३७ (१) मध्ये तशी तरतुद आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :–कलम २६ प्रमाणे काय तरतुद आहे?

श्री. ए.पी. गुरगुळे (नगररचनाकार):– नव्याने सुधारीत करायचे असेल तर त्यासाठी ही तरतुद आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :– आपण हा नव्याने करीत आहोत ना?

श्री. ए.पी. गुरगुळे (नगररचनाकार):– हा सुधारीत आहे.

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी):–आम्ही या प्रस्तावासाठी कलम ३७ अन्वये हरकती मागवुन सुनावण्या घेतल्या आहेत. जर सभागृहाला वाटत असेल की आम्ही चुकीचे केले आहे, कलम २६ अन्वये कारवाई करायला हवी होती तर सभागृहाने तसा ठराव पारीत करावा.

श्री. ए.पी. गुरगुळे (नगररचनाकार):– हरकती व सुचना खालीलप्रमाणे आहेत.....................
यावेळी नगररचनाकार यांनी प्राप्त झालेल्या हरकती, हरकतदाराचे नांव, हरकतीचा तपशिल व प्रशासनाचा त्यावरील अभिप्राय याचे विवरण सभागृहासमोर वाचुन दाखविले.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी सभागृहातुन बाहेर गेले. 

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– सचिव साहेबांनी सभागृहाला सांगितले की, निर्णय वेगळे आहे व गोषवारा वेगळा आहे, हे एकमेकांशी विसंगत आहेत. तर मला असे वाटते की, यापुढे प्रशासनाने याकडे लक्ष दयावे. जेव्हा तुम्ही गोषवारा सादर करता तेव्हा त्यामध्ये विसंगती असायला नको. एकुण ३२ हरकतींपैकी त्यांनी ३ स्विकारल्या असून २९ फेटाळल्या आहेत. तर त्या ३ हरकतींमध्ये सुधारणा करुन आम्ही आता निर्णय घेणार आहोत. गोषवा–यामध्ये देखिल महासभेने अंतिम निर्णय घ्यावा असे लिहिले आहे. गोषवारा आणि परिशिष्ट विसंगत असल्याने त्यांनी आता येथे सर्व वाचुन दाखविले आहे. तरी देखील शेवटी निर्णय महासभेलाच घ्यायचा आहे. मला असे वाटते की, आता आम्ही ज्या सुधारणा सुचविल्या आहेत त्या अंतिम करुन ठराव लवकरात लवकर शासनाला पाठविण्यात यावा. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. राजेश वदारिया:– अनु. क्र. १ ते ५ वरील हरकती फेटाळण्यात याव्यात. अनु. क्र. ७ वरील हिंदी मासिक चॅलेंज एक्सप्रेस, श्री. किशन रेलवानी यांनी जी हरकत घेतली आहे ती आम्ही अंशत: स्विकारली आहे. आम्ही त्याबद्दलचा तक्ता आपल्याकडे दिला आहे. त्यांनी २१ मिटरचे दिले आहे आम्ही त्यामध्ये सुधारणा करुन १० मिटरचे दिले आहे. भ्रष्टाचार हटाओ समितीची हरकत आम्ही फेटाळली आहे. अनु. क्र. ९ वरील प्राईम कन्सल्टंटची हरकत आम्ही अंशत: स्विकारली आहे. त्यामध्ये सुधारणा करुन आम्ही आपल्याकडे प्रस्ताव दिला आहे. अनु. क्र. १० वरील श्री. बुलचंद सोनेसर यांची हरकत फेटाळली आहे. अनु. क्र. ११ वरील प्राईम कन्सल्टंटची हरकत आम्ही अंशत: स्विकारली आहे. अनु. क्र. १२ वरील श्री. बुधरानी यांची हरकत फेटाळली आहे. अनु. क्र. १३ वरील युनायटेड कन्झुमर ऑफ इंडियाची हरकत फेटाळली आहे. अनु. क्र. १४, १५, १६ व १७ ची हरकत फेटाळली आहे. श्री. अशोक थरवानी यांनी पाऊस पाणी संकलनाची जी हरकत दिली आहे ती आम्ही स्विकारली आहे व त्याचा प्रस्ताव आपल्याकडे दिला आहे. अनु. क्र.. १९ वरील श्री. जमनादास पुरस्वानी यांची हरकत फेटाळली आहे. अनु. क्र. २० वरील हरकत व अनु. क्र. २१ वरील श्री. लाल पंजाबी, अध्यक्ष, भाजपा यांची हरकत फेटाळली आहे. अनु. क्र. २२ वर आपण काय लिहिले आहे ते समजुन येत नाही. हरकत कोणाची आहे त्याचे नावही नाही.

मा. सचिव :–यांचे असे म्हणणे आहे की, झोपडपट्टी विभागासाठी चटई क्षेत्र निर्देशांक ३.५ करायला हवा. श्री. चंद्रकांत मिश्रा यांची हरकत आहे.

मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :– श्री. चंद्रकांत मिश्रा यांनी झोपडपट्टी विकासासाठी ३.५ एफएसआयची मागणी केली आहे. आम्ही झोपडपट्टीसाठी आमचा प्रस्ताव दिला आहे. तसेच श्री. हरी तनवानी यांनी १०.१.२ मध्ये दुप्पट करण्याची मागणी केली आहे ती आम्ही फेटाळली आहे. बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या पहिल्या

दोन हरकती फेटाळल्या आहेत, तिस–या मुद्दयामध्ये त्यांनी कल्याण–डोंबिवीप्रमाणे उंची वाढविण्याबाबत हरकत दिली आहे. आम्ही त्याबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव दिला आहे त्यामुळे ही देखिल हरकत फेटाळण्यात येत आहे. भारतीय संस्कार आश्रम यांची हरकत देखिल त्याचप्रमाणे आहे. त्यामुळे फेटाळण्यात येत आहे. श्री. धनंजय बोडारे यांची हरकत फेटाळली आहे. रोटरी क्लब ऑफ उल्हासनगरची हरकत फेटाळली आहे. उल्हासनगर ट्रान्सपोर्ट असोशिएशनची हरकत फेटाळली आहे. उल्हासनगर लॉरी असोशिएशनची हरकत फेटाळली आहे. श्री. कुमार मेंघवानी व श्री. जयसिंघानी यांची हरकत फेटाळली आहे. आम्ही जो प्रस्ताव दिला आहे त्यामध्ये सविस्तर माहिती दिली आहे. धन्यवाद.

मा. सचिव :– श्री. राजेश वदारिया, श्री. हरदास माखिजा व श्री. किशोर वनवारी यांनी सादर केलेले सूचना व प्रस्ताव एकत्रित करुन प्रस्तावाच्या स्वरुपात महासभेपुढे मांडला आहे. त्यांनी जी सूचना केली आहे तो देखिल आपल्यासमोर आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– आपला ठराव काय आहे?

**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सचिव :– सत्तापक्षाचा जो प्रस्ताव आहे, हरकती बाबत ज्या सुचना दिल्या होत्या त्याप्रमाणे प्रस्ताव केला जाईल. श्री. राजेश वदारिया यांनी सुधारणा करण्यासाठी प्रस्ताव दिला आहे. त्याचा ठरावात अंतर्भाव करण्यात येईल. ठरावात त्याचा समावेश होईल. तसेच श्री. हरदास माखिजा व श्री. किशोर वनवारी यांनी ज्या सुचना दिल्या त्यांचा देखील समावेश करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– आम्ही आमचा प्रस्ताव दिला आहे. जर तो मंजुर असेल तर ठिक आहे अन्यथा मतदान घ्यावे.

मा. सचिव :–आपल्या प्रस्तावात दोनच मुद्दे आहेत. एक म्हणजे एफएसआय वाढविणे तर यांनी देखिल एफएसआय वाढविण्याची सुचना दिली आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– आमचे असे म्हणणे आहे की, सर्वांसाठी एफएसआय ३ करायला हवा. आमचा प्रस्ताव वेगळा आहे. तुम्हांला हवे असेल तर मतदान करा.

मा. सचिव :– आपली सुचना आहे की, एफएसआय वाढायला हवा. यांनी देखिल तोच प्रस्ताव दिला आहे. त्यांनी प्रत्येक बांधकामासाठी वेगवेगळे निकष लावले आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :– त्यांनी आता सांगितले की, श्री. लाल पंजाबी यांची हरकत फेटाळण्यात येत आहे.

**मा. सदस्या श्रीमती नीना नाथानी, श्रीमती मालती करोतिया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सचिव :– त्यांनी बांधकाम नियंत्रण नियमावलीबाबत घेतलेली हरकत फेटाळली आहे. आता येथे प्रस्ताव वेगळा आहे. हरकत घेतांना त्यांनी त्यामध्ये मालमत्ता कराच्या दुप्पट दंडनिय रक्कम आकारावी असे म्हटले होते. आता येथे ते २००२ च्या ठरावाप्रमाणे रक्कम आकारावी असे सांगत आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :– आम्ही एफएसआय १ वरुन ३ वाढविण्याबाबत सांगितले होते त्यांनी ते फेटाळले आहे.

**मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी सभागृहातुन बाहेर गेल्या व त्याजागी श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.**

मा. सचिव :–त्यांनी एफएसआय बाबत हरकत दिलेली नाही.

मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :— आम्ही जो प्रस्ताव दिला आहे त्यामध्ये पुर्नविकास करण्यासाठी आम्ही ३ एफएसआय दिला आहे. तसेच दाटीवाटीच्या क्षेत्रात व झोपडपट्टी विभागात ४ एफएसआय सुचविला आहे. आपण ३ ची मागणी करत आहात आम्ही तर ४ दिला आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— साधारण विकासासाठी आपण एफएसआय किती ठेवला आहे?

मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :— कृपया माझ्या बोलण्याकडे लक्ष दयावे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— मी काय सांगतो ते ऐकुन घ्या. तीन प्रकारे विकास होत असतो. एक म्हणजे ''नॉर्मल डेव्हलपमेंट राईट'' दुसरे म्हणजे '' इमारतींचा पुर्नविकास'' तसेच तिसरे म्हणजे ''झोपडपट्टयांचा पुर्नविकास''. आपण नॉर्मल डेव्हलपमेंट राईट साठी एफएसआय तीन ठेवलेला नाही आमची अशी मागणी आहे की आपण तो तेवढा ठेवावा. मी आधीच सांगितले की, झोपडपट्टीसाठी ४ करीत असाल तर आम्हांला जास्त आनंद होईल. परंतु आमचे असे म्हणणे आहे सर्वांसाठी किमान तीन एफएसआय ठेवण्यात यावा. आमची अशी स्पष्ट भुमिका आहे.

मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :— जे प्रस्ताव शासनाकडुन मंजुर होवू शकतील असे प्रस्ताव आपण पास करायला हवेत. माझ्या माहितीप्रमाणे असे कुठेही नाही की, सर्वांसाठी ३ एफएसआय आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आमची सरकारकडे अशीच मागणी आहे. सरकारला ती नाकारु दया. तुम्ही शासनाकडुन मंजुर करुन आणायला पाहिजे. तुम्ही आधीच कशी हार मानतात? आम्ही देखिल तुमच्या सोबत येवु. आपण आधी जो निर्णय घेतला आहे त्यावर ठाम राहिले पाहिजे. आपण वारंवार आपली भुमिका का बदलायची?

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :— हा शहराचा हिताचा प्रश्न असल्याने सर्वांनी एकमताने निर्णय घ्यावा. नाहीतर आपल्यावर आरोप होईल.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—मा. महापौरजी, शहरात असा संदेश जायला नको की आम्ही विरोध करीत आहोत. आम्ही शहराच्या हितासाठी आपल्यासोबत आहोत.

मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:—मा. महापौरजी, शहर ज्या परिस्थितीतुन जात आहे ते पहाता आपण कोणताही हट्ट न करता हा ठराव सर्वानुमते मंजुर करावा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— मा. महापौरजी, शहर आज ज्या परिस्थितीतुन जात आहे त्याच्याशी या ठरावाचा संबंध आहे का? हे आधी आम्हांला सांगा. लोकांची दिशाभुल करु नका. लोकांना असे वाटायला नको की, आम्ही शहराच्या हिताच्या विरोधात आहोत.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—शहराच्या हितासाठी आम्ही जो प्रस्ताव दिला आहे तो एकमताने पास करा.

मा. सचिव :—विरोधी पक्षातर्फे एक प्रस्ताव आला आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— प्रस्ताव काय आहे ते वाचुन दाखवा.

मा. सचिव :— प्रस्ताव तुमचा असल्याने तुम्हांला वाचायचा आहे.

**मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभागृहात प्रवेश केला व पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाल्या.**

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :— मा. महापौरजी, आमचे दोनच मुद्दे आहेत त्यांचा ठरावात समावेश केल्यास ठराव सर्वानुमते पास होवु शकतो. आम्ही तुमच्या सोबत आहोत तसेच यापुढे देखिल लोकांच्या हितासाठी आपल्या सोबतच राहु.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— आम्ही आपले म्हणणे मानतो तुम्ही देखिल आमच्या दोन बाबींचा ठरावात समावेश करा.

मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. राजेश वदारिया :— त्यांचा व आमचा प्रस्ताव वेगवेगळा आहे. त्यामुळे त्यावर मतदान घ्यावे.

मा. महापौर :— सचिव साहेब, कृपया मतदान घ्यावे.

मा. सचिव :— जे सदस्य विरोधी पक्षाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या बाजुने आहेत व सत्ताधारी पक्षाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

विरोधी पक्षाच्या प्रस्तावाच्या बाजुने ११ मते

१. श्रीमती. जावळे संगिता रमेश
२. श्रीमती. मोकल सिमा चंद्राराम
३. श्री. उमाप रामदास राघोजी
४. श्री. रूपचंदानी बच्चाराम बाशोमल
५. श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश
६. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग विरसिंग
७. श्री. सोनावणे नथु
८. श्री. गायकवाड दिलीप
९. श्री. चव्हाण रमेश महादेव
१०. श्री. पाटील विश्वनाथ गौतम
११. श्रीमती. ससाणे लक्ष्मी रोहिदास

मा. सचिव :— जे सदस्य सत्ताधारी पक्षाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या बाजुने आहेत व विरोधी पक्षाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावाच्या बाजुने ३६ मते

१. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२. श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर
३. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
४. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
५. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
६. श्री. वाघे शामु बाबु
७. श्री. ऐडके गणपत गोविंद
८. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
९. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
१०. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
११. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
१२. श्री. पवार नाना आनंदा
१३. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
१४. श्री. जग्याशी राजु
१५. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे)
१६. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
१७. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
१८.श्रीमती. वनवारी मोना अशोक

१९.श्री. वनवारी किशोर नारायणदास
२०. श्री. जेसवानी सतराम पुनमदास
२१.श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
२२. श्रीमती. खिलनानी भावना रवि
२३.श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
२४.श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल
२५.श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
२६.श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
२६.श्रीमती. पंजाबी दिपा नारायण
२७. श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण
२८. श्री. लबाना होशियारसिंग हरीसिंग
३०. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
३१. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
३२. श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश
३३.श्रीमती. छाब्रिया भारती पहलाज
३४. श्री. भठिजा संजय रामचंद्र
३५. श्रीमती. दासानी मिनु राजकुमार
३६.श्री. लाल बिहारी यादव

**मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के यांनी मतगणनेनंतर सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. महापौर :—</u> विरोधी पक्षाने सादर केलेला प्रस्ताव बहुमताने नाकारण्यात येत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

अनुमोदकाचे नाव :—श्री. बच्चाराम रुपचंदानी

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका ठराव क्र. ७४ ता. ७/३/२००५ नुसार प्रारुप विकास नियंत्रण नियमावली २००५ चा ठराव बहूमताने महासभेमध्ये पारीत करण्यात आला.

सदर महासभेमध्ये आम्ही प्रस्तावित केले होते की, १) सर्व प्रकारच्या बांधकामासाठीच चटई क्षेत्र निर्देशांक वाढवून एक ऐवजी तीन करावा.

२) प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीतील अट क्र. १० (२) ही अट अयोग्य असून सदर अटीमध्ये नमूद केल्याप्रमाणे अनाधिकृत बांधकाम नियमित करण्याकरीता सध्याच्या बाजारभावाप्रमाणे दंड आकारणी करुन मालमत्ता करामध्ये सध्याच्या सामान्य कराच्या दुप्पट कर वसूली दरवर्षाला करण्याचे प्रस्तावित होते. तेही अयोग्यच आहे तसेच दंडाची रक्कम वसूल करतांना सध्याच्या बाजार भावाप्रमाणे होणा—या एकूण रक्कम पैकी २५ टक्के विकासकर्ता, १५ टक्के जमिनमालक, १० टक्के वस्तुविशारद, व ५० टक्के भोगवटादार वसूल करण्याकरीता प्रस्तावित केले होते जे कि, अशक्य होते, कारण विकासाकरीता जमिनमालक तसेच वास्तूविशारद हे अस्तित्वातच नसतील. त्यामुळे संपुर्ण रक्कम हि भोगवटा धारकासच भरावी लागणार. जे अशक्य असल्याने सदरचा ठराव निरर्थक होईल, त्यामुळे त्याला पर्याय म्हणुन आम्ही सुचविण्याप्रमाणे व सर्व संमतीने महासभेतील ठराव क्र. ४०, दिनांक १९/१०/२००२ मधील तक्त्याप्रमाणे आम्ही सुचवित आहोत.

| No. | Type | Residential | | | Commercial | | | Industrial | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | A/c. Sheets | Load Bearing | R.C.C. | A/c. Sheets | Load Bearing | R.C.C. | A/c. Sheets | Load Bearing | R.C.C. |
| **1.** | Ownership Land | Rs. 30/- per sq.m | Rs. 40/- per sq.m | Rs. 50/- per sq.m | Rs. 50/- per sq.m | Rs. 60/- per sq.m | Rs. 70/- per sq.m | Rs. 40/- per sq.m | Rs. 50/- per sq.m | Rs. 60/- per sq.m |
| **2.** | U.No. Land | Rs. 40/- | Rs. 50/- | Rs. 60/- | Rs. 60/- | Rs. 70/- | Rs. 80/- | Rs. 50/- | Rs. 80/- | Rs. 70/- |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | per sq.m | per sq.m | per sq.m | per sq.m | per sq.m | per sq.m | per sq.m | per sq.m | per sq.m |
| **3.** | Government Land (unaffected by road and reservation) | Rs. 50/- per sq.m | Rs. 60/- per sq.m | Rs. 70/- per sq.m | Rs. 70/- per sq.m | Rs. 80/- per sq.m | Rs. 90/- per sq.m | Rs. 60/- per sq.m | Rs. 70/- per sq.m | Rs. 80/- per sq.m |
| **4.** | Government Land (reserved) | Rs. 60/- per sq.m | Rs. 70/- per sq.m | Rs. 80/- per sq.m | Rs. 80/- per sq.m | Rs. 90/- per sq.m | Rs. 100/- per sq.m | Rs. 70/- per sq.m | Rs. 80/- per sq.m | Rs. 90/- per sq.m |
| ***Note :-*** For all Charitable trusts, Registered societies etc. rates should be 50 % of above charges. | | | | | | | | | | |

महासभा ठराव क्र: ६४ ब                                        दिनांक:—५/१२/२००५

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीमध्ये वरीलप्रमाणे बदल करुन अंतिम करण्यास मान्यता देत नाही.

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. महापौर :— सत्ताधारी पक्षाने सादर केलेला प्रस्ताव बहुमताने मान्य करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. १ :— सुधारित विकास नियंत्रण नियमावली अंतिम करणे.**

प्रस्तावना

उल्हासनगर शहरासाठी सुधारित बांधकाम नियंत्रण नियमावलीवर हरकती व सूचना मागविण्यासाठी दिनांक २/६/२००५ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ९/६/२००५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यास अनुसरुन ३० दिवसांच्या आत एकुण ३२ सुचना व हरकती प्राप्त झाल्या. त्यास दिनांक ९/११/२००५ रोजी सुनावणी देण्यात आली. याबाबतचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १ | एकुण प्राप्त हरकती व सुचनांची संख्या | ३२ |
| २ | त्यापैकी विकास योजनाबाबतचे प्रस्ताव | १६ |
| ३ | कलम ३७/१ अन्वये सुधारीत विकास योजनेची अधिसुचना चुकीची आहे असे प्रस्ताव | ०३ |
| ४ | २१ चौ.मी. क्षेत्रापर्यंतच्या भूखंडास विकसित करण्यासाठी परवानगी देणे बाबतचा प्रस्ताव | ०५ |
| ५ | प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्र. १०१ नुसार दंडीत करुन अनधिकृत बांधकाम नियमित करण्याबाबतचे प्रस्ताव | ०४ |
| ६ | उल्हासनगर शहरासाठी ३ चटई क्षेत्र निर्देशांक वाढवून देण्याबाबतचे प्रस्ताव | ०४ |

एकुण प्राप्त झालेल्या ३२ हरकती व सुचना वर जोडलेल्या परिशिष्टामध्ये प्रशाासनाचे अभिप्राय नमुद केले आहे. सर्व हरकती सुचना व सखोल विचारांती असे आढळून आले आहे की, एकुण ३२ हरकती व सूचनांपैकी काही सुचना मान्य करणे योग्य नाही.

या सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अ.क्र २४,२५ व २७ वर प्रशासनाने ३ सूचनां अंशत: मान्य करण्याची शिफारस केलेली आहे परंतु सदरच्या तीन्ही सूचना फेटाळाव्यात असे महासभेचे मत आहे.

तसेच परिशिष्टामध्ये अ.क्र. ६,९ व ११ वरील मुद्दे प्रशासनाने फेटाळलेले आहेत परंतु ते अंशत: मान्य करणे शक्य आहे. परिशिष्टातील अ.क्र १८ वरील सूचना पुर्णपणे स्विकारणे योग्य आहे.

*या व्यतिरिक्त खालील प्रयोजनासाठी प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करणे आवश्यक आहे.*

१) प्रारुप विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुद क्रमांक १०.१ अनुसार दंडनीय रक्कमेमध्ये फेरफार करणे.

२) दाटीवाटीच्या क्षेत्रातील औद्योगिक वापराच्या भुखंडाला कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बांधकाम नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीप्रमाणे सुसंगत अशी विशेष सवलत देणे.

३) औद्योगिक क्षेत्रातील भुखंड निवासी क्षेत्रामध्ये परावर्तीत करणेकामी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बांधकाम नियंत्रण नियमावलीप्रमाणे बदल करणे.

४) दाटीवाटीच्या क्षेत्रातील सामासिक अंतर बदलणेकामी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बांधकाम नियंत्रण नियमावलीच्या धर्तीवर बदल करणे.

५) हरीत क्षेत्रामध्ये बांधकाम करणेकामी ०.२ टक्के ऐवजी ०.५ टक्के असा बदल अनुज्ञेय करणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ३२ वरील नियम १०.२ मध्ये खालीलप्रमाणे अंतर्भाव करणे :

जे बांधकाम मंजुर विकास योजनेतील तरतुदीशी किंवा मंजुर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींशी विसंगत असेल ते दंडनिय रक्कमेची आकारणी करुन नियमीत करता येवु शकणे. यासाठी सदरचे बांधकाम कोणत्याही क्षेत्रामध्ये असले तरी नियमीत करता येवु शकणे.

अशाप्रकारे बांधकाम नियमीत करताना बांधकामाच्या बाजारमुल्याऐवजी बांधकामाच्या बांधकाम मुल्याच्या प्रमाणात घसारा मुल्य काढुन दंडनिय रक्कमेची आकारणी करणे.

किंवा

सदरच्या बांधकामाच्या मालमत्ता कराच्या दुप्पट रक्कमेची आकारणी करणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ६२ वर पुढीलप्रमाणे बदल करणे.

पृष्ठ क्रमांक ६२ वर दर्शविलेल्या तक्त्याऐवजी नवीन तक्ता दाखल करणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ७५ वर पुढीलप्रमाणे बदल करणे.

इलेक्ट्रीक सबस्टेशन संबधित नियम क्र १५.५ (इ) वगळणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ७६ वर पुढीलप्रमाणे बदल करणे.

ज्या इमारतीमध्ये २०पेक्षा जास्त सदनिका नसतील अशा इमारतीमध्ये ऑफिस रुम, कॉमन टॉयलेट, वॉचमन रुम व तत्सम स्वरुपाच्या बांधकामासाठी १०.५० चौ.मी एवढया चटईक्षेत्राची गणना न करणे तसेच ज्या इमारतींमध्ये २० पेक्षा जास्त सदनिका असतील अशा इमारतीमध्ये ऑफिस रुम, कॉमन टॉयलेट, वॉचमन रुम व तत्सम स्वरुपाच्या बांधकामासाठी २० चौ.मी एवढया क्षेत्राची चटईक्षेत्रामध्ये गणना न करणे.

नियम १५.५ (जी) मध्ये पुढीलप्रमाणे बदल करणे :

ज्या भुखंडाचे क्षेत्र ४५० चौ.मी किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशा ठिकाणी बाजुच्या व मागील बाजुच्या समासिक अंतरामध्ये बंदीस्त गॅरेज अनुज्ञेय करणे.

नियम १५.५ (क्यु) मध्ये पुढीलप्रमाणे बदल करणे :

बाजुच्या समासिक क्षेत्रात मीटररुम चटईक्षेत्र निर्देशांक वगळुन अनुज्ञेय करणे.

नियम १५.५ (आर) मध्ये पुढीलप्रमाणे बदल करणे :

वाहनतळाची उंची २.४ मीटर एवढी अनुज्ञेय करणे, पुरग्रस्त क्षेत्रासाठी हीच उंची ४.५ मीटर एवढी अनुज्ञेय करणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ७९ वर पुढीलप्रमाणे बदल करणे.

या पृष्ठावर दर्शविलेल्या तक्त्याऐवजी नवीन तक्ता दाखल करणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ८० वर पुढीलप्रमाणे बदल करणे.

गावठाणातील अरुंद भुखंडाऐवजी ''अरुंद भुखंड'' असा बदल करणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ८३ वर पुढीलप्रमाणे बदल करणे.

नियम १६.३.२ (डी) मध्ये समासिक अंतरात ३ मिटर ऐवजी १.८ मिटर असा बदल करणे.

प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील पृष्ठ क्रमांक ८६ वर पुढीलप्रमाणे बदल करणे.

नियम १८.५ (IV) जादा दाखल करुन त्यात ३ मीटर समासिक अंतराऐवजी ४.५ चौ.मी एवढया क्षेत्रात गॅरेज अनुज्ञेय करणे.

नियम १९.५.६ (बाल्कनी संदर्भात) १० टक्के बांधकाम क्षेत्राऐवजी परिघाच्या १/३ प्रमाणे बांधकाम अनुज्ञेय करणे.

तसेच प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीच्या परिशिष्ट डब्ल्यु मध्ये दुस–या ओळीत ''जनगणना केलेली झोपडपट्टी'' ऐवजी ''जनगणना केलेली झोपडपट्टी / दाटीवाटीचे क्षेत्र'' असा बदल करणे.

परिच्छेद क्रमांक डब्ल्यु–१ चे प्रयोजनासाठी दाटीवाटीच्या क्षेत्राची व्याख्या खालीलप्रमाणे दाखल करणे–

''एकुण भुखंडाच्या क्षेत्रापैकी ५० टक्के पेक्षा अधिक जोत्याच्या क्षेत्रावर बांधकाम झाले असल्यास अश्या क्षेत्रास दाटीवाटीचे क्षेत्र असे संबोधण्यात यावे.''

परिच्छेद क्रमांक डब्ल्यु २ प्रमाणे चटईक्षेत्र निर्देशांक २.५० ऐवजी ४.०० असे समजण्यात येईल.

परिशिष्ट २ मध्ये पाउस पाणी संकलनाचे प्रयोजन ५०० चौ.मी भुखंडाच्या क्षेत्राऐवजी १००० चौ.मी पेक्षा जास्त क्षेत्रावर लागु करणे.

नियम १७.१ प्रमाणे इमारतीच्या एकुण मजल्यांची संख्या ८ ऐवजी १२पर्यंत निश्चित करणे. या प्रयोजनार्थ इमारतीची उंची २४ मीटर ऐवजी ३५ मीटर एवढी निर्धारीत करणे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६५ — <u>दिनांक:–५/१२/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री किशोर वनवारी
श्री राजेश वदरिया

अनुमोदकाचे नाव :– श्री नारायण पंजाबी
श्री सतरामदास जेसवानी

ही महासभा शासन मंजुरीस अधिन राहुन वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सुधारित बांधकाम नियंत्रण नियमावली संबधात प्राप्त झालेल्या एकुण ३२ हरकती व सूचनांवर सुचविलेला निर्णय व प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीत वरील प्रस्तावात उल्लेख केलेल्या काही फेरफारांस अंतिम करीत आहे.

या ठरावाद्वारे झालेल्या निर्णयाप्रमाणे अशा अंतिम नियमावलीच्या विवरणपत्राची आयुक्तांनी अधिकृत केलेली छापील प्रत ठरावाचा भाग मानण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सदस्या श्रीमती किरण माने यांनी सभागृहात प्रवेश केला.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी १.२० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका